
# महाराष्ट्र महोदयाचा पूर्वरंग

लेखक
कै. नारायण कृष्ण गद्रे

संपादक
प्रा. गणेश हरी खरे

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ १९७१



कै. नारायण कृष्ण गद्रे

जन्म : ७ मार्च १८७० ] [ मृत्यु : १४ जुलै १९३३

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ.

# महाराष्ट्र महोदयाचा पूर्वरंग

लेखक :

कै. नारायण कृष्ण गद्रे

संपादक :

प्रा. गणेश हरी खरे

४९ पुस्तके/पुस्तिका व ३५० लेख यांचे लेखक

साहित्य आणि संस्कृति मंडळ

महाराष्ट्र राज्य

संस्कारित आवृत्ती : १९७१ शके १८९३.

प्रकाशक :
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृति मंडळ,
सचिवालय,
मुंबई – ३२.

© : प्रकाशक

मुद्रक :
य. गो. जोशी
व्यवस्थापक,
आनंद मुद्रणालय,
१५२३, सदाशिव, पुणे ३०.

मूल्य ५ रुपये

# स्थूल अनुक्रम


| विषय | | | | पृष्ठ |
|---|---|---|---|---|
| १ कै. ना. कृ. गद्रे ... छायाचित्र | ... | | | ... आमुख |
| २ पुरस्कार ... श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी | ... | | ... | ३ |
| ३ कै. ना. कृ गद्रे ... व्यक्ती व वाङ्मय ... प्रा. रा. ना. गद्रे | | | | ५ |
| ४ प्रस्तावना | ... | ... | प्रा. ग. ह. खरे | ४१ |
| ५ संदर्भ ग्रंथ व त्यांचे संक्षेप | ... | ... | ,, | ५७ |
| ६ संदर्भ | ... | ... | ... ,, | ६३ |
| ७ उच्चारशुद्धि | ... | .... | ... ,, | ६८ |
| ८ वंशावळी | ... | ... | ... ,, | ७१ |
| ९ कालपट | ... | ... | ... ,, | ७४ |


## ग्रंथगर्भ


| | | | | |
|---|---|---|---|---|
| १० ग्रंथगर्भाची अनुक्रमणिका ... | | ... | ... | १ |
| ११ सूचना | ... ... | ... | ... | १ |
| १२ महाराष्ट्रमहोदयाचा पूर्वरंग... | | ... | ... | १ |
| १३ १ ले प्रकरण | ... | शालिवाहनाचे तेरावे शतक | | ३ |
| १४ २ रे प्रकरण | ... | ,, | चौदावे ,, | ६२ |
| १५ ३ रे प्रकरण | ... | ,, | पंधरावे ,, | १५६ |
| १६ परिशिष्ट : महाराष्ट्रप्रभात | | ,, | सोळावे ,, | २८३ |
| १७ सूची | .... | ... | ग. ह. खरे | ३३५ |


* * *

# पुरस्कार

१९ व्या शतकात व विसाव्या शतकातील पहिल्या जागतिक युद्धाच्या काळापर्यंत मराठी साहित्यातील प्रसिद्ध झालेली महत्त्वाची व पुस्तकांच्या बाजारात उपलब्ध न होणारी पुस्तके पुनः प्रकाशित करण्याचे धोरण महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने ठरविले आहे. अशा तऱ्हेची पुस्तके जर महाराष्ट्रातील खासगी प्रकाशक व साहित्यिक संस्था यांनी प्रकाशित करण्याचे ठरविले तर मंडळ त्यांना अनुदान देण्याचा विचारही करते.

अशा साहित्याचे महत्त्व अनेक प्रकारचे आहे. मराठी साहित्याची शैली बदलत व विकसित होत गेली आहे. कविता, कथा, लघुकथा यांचा आशय आणि आकृतिबंध वेळोवेळी बदलला आहे. ऐतिहासिक व भौगोलिक वर्णनांची पद्धती यांच्यांत फरक पडत गेलेला आहे. वैचारिक निबंध व प्रबंध यांच्यातील ध्येयवाद व तत्त्वप्रतिपादन यांमध्ये नवीन नवीन भर पडत गेली आहे; जीवन-मूल्यांमध्ये व सामाजिक परिस्थितीमध्ये जे परिवर्तन होत आहे त्याचाही वेळोवेळी वेगवेगळा ठसा साहित्यात उमटलेला आहे. या सर्व परिवर्तनांचे भिन्न भिन्न आविष्कार आज अनुपलब्ध असलेल्या ज्या ज्या जुन्या मराठी साहित्यात आढळून येतात ते ते साहित्य मराठी वाचकाला उपलब्ध करून देण्याची जबाबदारी महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने अंगावर घेतलेली आहे.

अशा साहित्यामध्ये विष्णुशास्त्री चिपळूणकरांची निबंधमाला ही अग्रगण्य आहे. ती समग्र व यथायोग्य स्वरूपात आज पुस्तकांच्या बाजारात शिल्लक नाही. कै. गोपाळ गणेश आगरकर यांचे केसरीतील व सुधारकातील सर्व निबंध आज मिळत नाहीत. लोकहितवादींचीही काही महत्त्वाची पुस्तके पुनः प्रकाशित करण्याची गरज आहे. कवी चंद्रशेखरांची समग्र कविता पुनः प्रसिद्ध केल्यास तिचे स्वागतच होणार आहे. वरील उदाहरणे केवळ दिग्दर्श-नार्थ येथे दिली आहेत.

कै. नाना गद्रे यांचा इतिहासाचा व्यासंग फार चांगला होता. 'श्रीसरस्वतीमंदिर' या नियतकालिकात 'महाराष्ट्रमहोदयाचा पूर्वरंग' त्यांनी क्रमशः प्रसिद्ध केला होता. या पुस्तकाने महाराष्ट्राचा स्वदेशाभिमान वाढविला. त्यांच्या लेखनशैलीत ओजस्विता हा गुण भरपूर आहे. त्यांचे पुत्र प्रा. रा. ना. गद्रे यांनी महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाला हे पुस्तक प्रकाशित करण्याचा अधिकार उदारपणे दिला त्याबद्दल मंडळ त्यांचे आभारी आहे. प्राचीन साहित्य मालेतील हे मंडळाचे पहिले पुस्तक आहे.

लक्ष्मणशास्त्री जोशी
अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ

वाई
दिनांक : १७ जून १९७१

# ती. कै. नारायण कृष्ण गद्रे

## व्यक्ती व वाङ्मय

(प्रा. रा. ना. गद्रे, पुणे)


### १. कुल, जन्म, बालपण :

गद्रे घराणे कृष्ण यजुर्वेदाच्या तैत्तिरीय संहितेच्या हिरण्यकेशी शाखेचे असून त्याचे गोत्र कौशिक होय. मूळ ठिकाण रत्नागिरी जिल्ह्याच्या राजापूर तालुक्यातील लावगन हे गाव. हे गाव या कुळातील पुरुषांनी वसविल्यामुळे गद्रे लावगन या नावाने ते आजही प्रसिद्ध आहे. कोकणातील अनेक कुटुंबे पेशवाईत किंवा त्यानंतर निर्वाहाचे साधन मिळविण्यासाठी देशावर आली. श. १७०० च्या सुमारास नानांचे पणजोबा अनंतराव वाईस आले. त्यामुळे गद्रे घराण्याची ही शाखा वाईकर म्हणून ओळखण्यात येते. कुटुंबातील सर्व पुरुष गृहस्थी बाण्याचे असताही नानांचे वडील वे. मू. कृष्णंभट हे मात्र स्वेच्छेने उत्तम वेदाध्ययन करून वैदिक झाले. अध्ययनाध्यापन करून हे अयाचित वृत्तीने आपला संसार चालवीत. यांचे तृतीय कुटुंब वाईच्या गोखल्यांकडील आनंदीबाई. या दांपत्याच्या पोटी श. १७९१ फाल्गुन शुद्ध पंचमीला (१८७० मार्च ७) नानांचा जन्म वाईस झाला. बारशाच्या दिवशी अपत्याचे ' दिनकर ' नाव ठेविले. आई आपल्या या पुत्राला ' नानू ' असे म्हणे. अर्थात व्यवहारात सर्वत्र ' नारायण ' हे नाव प्रचलित झाले आणि पुढे कागदोपत्रीही तेच रुळले. परंतु नानांनी ' कृष्णात्मज दिनकर ' अथवा ' दिनकर ' या नावाने लिहिलेल्या लेखांवरून व ग्रंथांवरून आणि त्यांच्या पत्नीने–म्हणजे माझ्या मातेने– नाव घेण्याच्या वेळी घेतलेल्या दिनकरपंत या नावावरून त्यांच्या पाळण्यातील नावाचा बोध होतो.

इ. १८७०–१८९४ पर्यंतच्या सालवार घटनांची नोंद करणारे वडिलांच्या हातचे एक टिपण माझ्या संग्रही आहे. त्यात स्वतःच्या कुंडलीतील ग्रहांचे काही इष्टानिष्ट योग लिहून ठेविले आहेत. त्यांचा अभ्यास करून माझे वडील बंधू

ती. अ. ना गद्रे, एम्. ए. यांनी तयार केलेली ती. कै. नानांची सायन जन्मलग्नकुंडली मी येथे देतो. ती. कै. नानांचाही ज्योतिर्गणित आणि फल-ज्योतिष यांचा चांगला अभ्यास असल्याने असे करणे सर्वथा योग्यच ठरेल.

जन्मलग्नकुंडली




शुभं भवतु

## २. शिक्षण :

वयाच्या पाचव्या वर्षी पंतोजीच्या खासगी शाळेत नानूच्या अक्षरग्रहणास आरंभ झाला. वेदोक्त उपनयन आठव्या वर्षी झाले. वे. मू. पित्याने नानूला उपनयनानंतर संध्या, ब्रह्मयज्ञ, वैश्वदेव, देवपूजा, पुरुषसूक्त, रुद्र इत्यादी आवश्यक नित्य ब्रह्मकर्म पढविले. इ. १८८० मध्ये श्री. व्यंकटराव खिरे नावाचे एक शिक्षकोत्तम नानूला लाभले. त्यांनी नानूची ज्ञानपिपासा उद्दीपित केली आणि तिला योग्य तितके खाद्यही पुरविले. इ. १८८१ मध्ये नानूच्या इंग्रजी शिक्षणास आरंभ झाला. काळाचा ओघ ध्यानात घेऊन वे. मू. कृष्णं-

भटांनी पुत्राच्या आंग्लविद्याग्रहणास विरोध न करता प्रोत्साहन दिले. स्वतःच्या शोचनीय दारिद्र्यामुळे पुत्राने स्वप्रयत्नाने आपली विद्या केली तर त्यात वावगे काही नाही हा विचार त्यांना पटला असावा. पुत्राच्या शरीरमनोबुद्धींवर आपण केलेल्या चांगल्या संस्कारांनी इंग्रजी विद्या शिकूनही आपला पुत्र आचारविचारांनी भ्रष्ट होणार नाही असा त्यांना दृढ विश्वास वाटत असावा आणि तो त्यांचा विश्वास शंभर टक्के खरा ठरला हे नानूच्या पुढील चरित्रावरून वाचकांच्या सहज निदर्शनास येईल. नानूला आपल्या विद्येसाठी काही दिवस पुणे, काही वर्षे मुंबई, तर काही काळ वाई, अशी त्रिस्थळी करावी लागली. त्यातच नानूच्या पंधराव्या वर्षी वे. मू. कृष्णंभटांचे देहावसान झाले. इ. १८८४ मध्ये शिक्षणासाठी मुंबईस असताना नानूने विष्णुपंत छत्र्यांची सर्कस पहिल्याने पाहिली.[१] वाईस इ. १८८६ मध्ये निघालेल्या ' न्यू इंग्लिश स्कूल ' या शाळेच्या पटावर नानूने आपले नाव पहिला विद्यार्थी म्हणून दाखल केले. पुढे काही काळ जन्मग्रामी असलेल्या या आपल्या शाळेत नानूने शिक्षकाचेही काम केले. एका वेळेस जेवून ( नानूच्या आईचा वाराने जेवण्यास अगदी विरोध होता ), सहाध्यायांना शिकवून, त्यांच्यापासून काही वेळेपुरत्या मागून आणलेल्या पाठ्य पुस्तकांवरून नानूला आपला अभ्यास करावा लागे. इंग्रजी सहावीची दुसरी सहामाही आणि सातव्या इयत्तेचे संपूर्ण वर्ष नानूला पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये विद्यार्थी म्हणून महाराष्ट्रातील टिळकआगरकरादी तत्कालीन प्रतिभासंपन्न अग्रणींच्या अध्यापनाचा लाभ मिळाला. मॅट्रिक्युलेशनच्या परीक्षेस न बसता नोकरीच्या दृष्टीने सद्यःफलदायी ठरणाऱ्या यू. ए. एफ्. च्या परीक्षेस नानू बसला आणि ती परीक्षा इ. १८८८ त उत्तम रीतीने उतरला. या काळात अनेक हालअपेष्टा सोसूनही नानूने इतिहास, काव्य या विषयांवरील ग्रंथांचे बरेच वाचन केले. काही किरकोळ स्फुट लेखनास आरंभ याच सुमारास झाला. शिक्षणासाठी नानूच्या पुण्यामुंबईच्या रहिवासाच्या काळात त्याची आई व लहान भाऊबहीण विष्णूदुर्गा अशी तिघेजण वाईसच राहात असत.

---

१. ना. कृ. गद्रेलिखित विष्णुपंत छत्रे यांचे चरित्र, पृ. ११५

## ३. नोकरी, विवाह आणि मुंबईत बिऱ्हाड :

इ. १८९० साली नानांना मुंबईस हवामानखात्यात हंगामी नोकरी लागली. पुढे ती कायम झाली. इ. १८९१ मध्ये त्यांचा विवाह पुसेगावी ( कोरेगाव तालुका, सातारा जिल्हा ) तेथील श्री. गणपतराव काळे यांच्या 'गंगू' नावाच्या बारा वर्षांच्या कन्येशी झाला. गंगूस तीन भाऊ व दोन बहिणी होत्या. विवाहोत्तर 'अन्नपूर्णा' या नवीन नावाने 'गंगू' चा प्रवेश गद्र्यांच्या घरात झाला. इ. १८९३ साली नानांनी मुंबईस पेंडश्यांच्या चाळीत आपले बिऱ्हाड मांडिले आणि तेथे ते आई, भाऊ, बहीण व पत्नी यांसह राहू लागले. १८९० पासून १९२३ साली नोकरीतून निवृत्त होईपर्यंत नानांचा उणापुरा तीन तपांचा काळ मुंबईत गेला. इ. १८९७ पर्यंत पेंडश्यांच्या चाळीत आणि त्यानंतर जवळजवळ सव्वीस वर्षे आग्ऱ्यांच्या चाळीत त्यांचे वास्तव्य होते. त्यांची कचेरीतील कामाची वेळ सकाळी ८–३० ते दुपारी ३ पर्यंत असे. प्रत्यही पहाटे उठून शौचमुखमार्जन, स्नान, संध्या, ब्रह्मयज्ञ, देवपूजा इत्यादी आह्निक ते यथासांग उरकीत. नैमित्तिक म्हणून ते रुद्राची एकादष्णीही करीत. देवात उजव्या सोंडेचा गणपती होता; त्यास संकष्टी चतुर्थीस गणपत्यथर्वशीर्षाच्या २१ आवर्तनांनी अभिषेकही करीत. ७–३० ला भोजनापूर्वी वैश्वदेव व काकबली होई. त्या काळच्या रिवाजानुसार सैंपाक व भोजन सोवळ्यानेच होई. त्यांचा पोषाख साधा, स्वच्छ व अतिशय नीटनेटका, टापटिपीचा असे. साधे शुभ्रकाठी धोतर, अंगात कळीचा बाटोळा सदरा, त्यावर बंदांचा बहुधा पांढरा अंगरखा, डोक्यास तांबडे पागोटे अथवा पगडी, पायात वाईचा जोडा अगर वाहणा आणि हातात छत्री अशा थाटात रस्त्याने कचेरीपर्यंत पुस्तक वाचीत जाण्याची त्यांची सवय होती. पित्याचे श्राद्धपक्ष त्यांच्या घरी बिनचूक वेळच्या वेळी होई. नंतरच्या काळात पागोटे अथवा पगडीऐवजी ब्राह्मणी पद्धतीचा शुभ्र रुमाल ते डोक्यास बांधीत. जाताजाता परिचितांशी अथवा पुस्तकांच्या दुकानांत बोलण्यासाठी त्यांना थोडेफार थांबावे लागे.

## ४. संगीत अक्षविपाक आणि नाटकमंडळीशी नाते :

हे नाटक इ. १८९२ मध्ये लिहिल्याचा उल्लेख नानांच्या हातच्या

टिपणात आहे. श्री. पांडोबा गुरवांची वाईकर संगीत नाटक मंडळी करीत असलेले 'द्यूतविनोद' नाटक अत्यंत लोकप्रिय झाल्यामुळे त्याचे प्रयोग करण्याची इच्छा स्वदेश हितचिंतक नाटक मंडळीच्या श्री. जनुभाऊ निमकरांस झाली. परंतु पांडोबा गुरवांनी या नाटकाचे प्रयोग करण्याचे मालकी हक्क (Monopoly) आपल्याकडे असल्याचे सांगून इतर नाटक मंडळ्यांस त्याचे प्रयोग करण्यास मनाई केली. या नाटकाच्या लेखनादिसंबंधाने खुद्द नानांच्या हातचा पुरावा असा : "संगीत अक्षविपाक हें नाटक मुंबईत पूर्वी नांवाजलेले सुप्रसिद्ध नट रा. सखारामपंत फाटक (हे इ. १९०९ मध्ये कैलासवासी झाले) नांवाच्या मित्राच्या आग्रहानें मी सहज लिहिलें. ते त्यांनीं आपल्या चारदोन महाराष्ट्र नटांच्या साहाय्यानें लगेच बसवून शके १८१५ (इ. १८९३) च्या ज्येष्ठ मासीं महाराष्ट्र प्रेक्षकांपुढें प्रयोगरूपानें रंगभूमीवरहि आणिलें. तेव्हापासून त्याचे प्रयोग अजूनहि (इ. १९०९) 'स्वदेशहितचिंतक मंडळी' करीत आहे.[२] "सर्व नाटककार मंडळ्यास या नाटकाचा प्रयोग करण्यास मोकळीक ठेविली आहे." अशी विशेष सूचना या नाटकाच्या छापील पुस्तकात बुद्ध्या केलेली आहे. मराठी रंगभूमीवर पुढे कीर्तियुत झालेले सव्यसाची नटवर्य कै. केशवराव भोसले आरंभी स्वदेशहितचिंतक मंडळीत होते. नानांच्या या नाटकात ते प्रथम नटी, नंतर नारद आणि शेवटी पार्वती अशा भूमिका करीत असत. या नाटकमंडळीचा आणि नानांचा दृढ संबंध नाटकमंडळीच्या अखेरीपर्यंत कायम होता. मंडळीतील नटांना आपापल्या भूमिका समजावून देऊन नाना त्यांना अभिनयाचे शिक्षणही देत. एके प्रसंगी चार महिन्यांची रजा घेऊन नाना या नाटकमंडळीबरोबर हिंडले होते.[३] नाटकमंडळीशी याप्रमाणे आलेल्या निकटच्या संबंधामुळे मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या स्थापनेनंतर त्याच्या मदतीसाठी नाटकाचे प्रयोग मिळवून देण्याच्या कामी नानांची मदत झाली असणे सर्वतोपरी संभाव्य आहे. अर्थात् नानांच्या बहुतांशी प्रसिद्धिपराङ्मुख स्वभावामुळे त्याचा कागदोपत्री लेखी पुरावा मिळणे कठीण आहे.

या नाटकासंबंधी पुढील अभिप्राय पाहा : "या नाटकाचे प्रयोग स्वदेश-

---

२. अक्षविपाक अथवा संगीत द्यूतविनोद नाटक, १९०९, प्रस्तावना.
३. ही माहिती प्रस्तुत लेखकास त्याच्या आईने सांगितलेली आहे.

हितचिंतक नाटक मंडळी करीत असे. यांत शंकर-पार्वतीचें द्यूत होऊन त्यांत शंकरांनीं पार्वतीवर रागावून वनवास पत्करला व पार्वतीनें फिरून त्यांना आपल्या अप्रतिम नृत्यगायनकौशल्यानें व किराती वेषानें भुलवून आणिलें हा कथाभाग आला आहे. नाटकांतील निरनिराळे प्रवेश शेवटपर्यंत कुतूहल कायम ठेवणारे आहेत. नारद, पार्वती, शंकर ही तीन प्रमुख पात्रे असून त्यांच्या स्वभावाचा परिपोष चांगला झाला आहे. भाषा साधी सोपी असून, संवाद सुटसुटीत व चुरचुरीत आहेत. ७८ पानांच्या या ( तीन अंकीं ) लहान नाटकांत, पानांच्या संख्येइतकीच पदें आहेत! नारद, पार्वती, शंकर हे तिघेहि गानकुशल असल्यानें नाटकांत गात सुटल्यास त्यांत कांहीं अस्वाभाविक नाहीं. पद्यें सोपी व नादमधुर आहेत. कित्येक ठिकाणीं पद्य-रचना सैल व चुकीची झाली आहे. नारदाच्या पात्रामुळें व खुद्द नाटकांतील कथानकामुळें नाटकभर शुद्ध सात्त्विक विनोदाचीं कारंजीं उडत असल्यासारखीं वाटतात. ”[४]

“ ‘ द्यूतविनोद ’ नाटक करण्याचा हक्क न मिळाल्यामुळें त्याचें मूळ चालींच्या ठेवणीसह केलेलें यथातथ्य रूपांतर ‘ अक्षविपाक ’ नाटक स्व. हि. मंडळी करीत असे. यांत शंकराचें काम गणपतराव ललित आणि पहिल्यानें जनूभाऊ आणि नंतर कृष्णा देवळी पार्वतीचें काम करीत असत. भिल्लिणीचा नाच हा नाटकांतल्या आकर्षणाचा मुख्य भाग होता. पण त्या नाचासाठीं योजलेलीं पदें धमारांतलीं असल्यामुळें नाचाचें स्वरूप कथ्थकी थाटाचें होतें. ”[५]

हे नाटक १८९३ पासून १९१४ पर्यंत म्हणजे २०-२१ वर्षे मराठी रंगभूमीवर होते; आणि संगीताच्या दृष्टीने यातील पदे लोकप्रिय असल्याचे गमक म्हणजे नाटकाची पद्यावली स्वतंत्रपणे छापून प्रसिद्ध करण्यात आली होती. नानांच्या इतर लेखनांप्रमाणेच, या नाटकापासूनही त्यांना द्रव्यलाभ न होता कीर्तिलाभ मात्र झाला.

४. डॉ. वि. पां. दांडेकर कृत पौराणिक नाटकें, पृ. २७०
५. भा वि. वरेरकरकृत माझा नाटकी संसार, पृ. ६३-६४

या नाटकलेखनाच्या अनुषंगाने नानांच्या इतर मराठी नाटकांच्या परीक्षणात्मक लेखांचा उल्लेख करणे अवश्य व अगत्याचे होईल. देवलकृत ' शारदा ' ( इंदुप्रकाश ), ' खाडिलकरांचा मराठी हॅम्लेट ' ( सरस्वतीमंदिर, सवाई माधवरावाचा मृत्यु ), य. ना. टिपणीसकृत ' मत्स्यगंधा आणि त्यांतील ऋषिपात्रें ' ( ज्ञानांजन ) आणि कोल्हटकरांचे ' वीरतनय '[६] ( मुंबई वैभव ) इत्यादी त्या त्या काळात गाजलेल्या नाट्यकृतींचे त्यांनी सडेतोड समीक्षण केले आहे.

५. काव्यरचना :

अक्षविपाक नाटकातील पद्यरचना सोपी, सुबोध व नादमधुर झाल्यामुळे काव्यरचनेचा तो ओनामा झाला आणि काव्यप्रांतात आपण उत्तम रीतीनें विहार करू असा आत्मविश्वास नानांना वाटू लागला. या आत्मविश्वासाचे फळ म्हणजे ' श्रीमत् प्रतापसिंह काव्य ' या काव्याच्या संकल्पित तीन खंडांपैकी प्रथम खंडाचे १८९४ मध्ये झालेले प्रकाशन असे म्हणता येईल. ह्या काव्यावर ' व्यंकटेशगुरुपदार्पित ' असे शब्द घालून त्यांनी आपल्या विद्यादात्या गुरूंचे ( श्री. व्यंकटेश खिरे यांचे ) कृतज्ञतेने स्मरण करून त्यांना हे आपले प्रथम काव्यपुष्प अर्पण केले आहे. या काव्याचे सहा सर्ग आहेत आणि योजिलेले वृत्त आर्या आहे. आर्यांची संख्या सुमारे ५६० आहे. संस्कृत साहित्य आणि मुक्तेश्वर-वामन–मोरोपंतादी पंडित कवींची काव्ये यांच्या सखोल, सूक्ष्म व मर्मग्राही वाचनाचा परिणाम या रचनेत स्पष्ट दिसतो. आठआठ अक्षरांची यमके साधण्यात मोरोपंतांचे अनुकरण केलेले आढळते. त्याचप्रमाणे त्या वेळच्या महाराष्ट्रात ( आणि भारतातील इतर प्रदेशात ) मालाकार विष्णुशास्त्री, टिळक इ. विचारवंत धुरीणांच्या लेखनाने स्वदेश, स्वधर्म आणि स्वभाषा यांच्या उद्धाराची तरुण पिढीला लागलेली तळमळ, या काव्याचा कवीने निवडलेला वीराग्रणी राणा प्रताप हा विषय आणि काव्यातील अनेक उद्‌गार यांवरून व्यक्त होतें. राष्ट्रीय पुनरुत्थानाचे एक महत्त्वाचे अंग म्हणून पराक्रमी पूर्वजांचे पोवाडे गाऊन स्वकीयांची मने

६. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर आत्मवृत्त, पृ. ९६

स्वराज्योन्मुख करण्याचे कार्य हळूहळू प्रगत होत होते. वाङ्मयाने राष्ट्रवादाची ज्योत प्रज्वलित करून तिचा प्रकाश सर्व देशभर पोचविण्याच्या प्रयत्नातील हे काव्य एक लहानशी पणती होय.

'महाराष्ट्रमहोदय' नावाचे दुसरे ३९१ आर्यांचे नानांचे काव्य 'काव्यरत्नावली' मासिकात १९०९ साली प्रसिद्ध झालेले आहे. या मासिकाच्या त्या वर्षाच्या अंकांत प्रसिद्ध झालेल्या प्रकरणात हे प्रकरण सर्वांत दीर्घ व मोठे आहे. या काव्याचे दहा अध्याय आहेत. काव्यलेखनाच्या छंदाने नानांनी स्फुट व दीर्घ अशी पुष्कळ रचना प्रसंगोपात्त केलेली आहे. 'हिंदुवा सूरज अथवा बाप्पा रावळ चक्रवर्ती' या त्यांच्या ऐतिहासिक कादंबरीत तेराव्या प्रकरणात (पृ. १२८) बाप्पाच्या तोंडी योगायोगाने गवसलेल्या गूढ स्वयंभू शिवलिंगाचे बारा आर्यांचे स्तोत्र आले आहे. त्यातील पुढील दोन आर्या पाहा : "पडलों आकाशांतुन धरणीनें मजसि तेंवि सावरिलें । वरिलें आपत्तीनें म्हणुनि तुझे पाय आजि मीं धरिलें ॥ २ ॥ शरणास मरण देणें यापरि दुसरें न दुःख थोरातें । हें मज ठावें झालें तुझ्या कृपेनें अनाथ पोरातें ॥ ३ ॥" 'श्रीसरस्वतीमंदिरा'त काही वेळा त्यांनी ईशस्तवनपर कविता लिहिल्या आहेत. त्याच मासिकात एकदा 'दिनकर' या टोपण नावाने त्यांची '**माझी कोंवळी फुलवेल**' (पद : अरसिक किती हा शेला या चालीवर) या नावाची पुढील कविता आली आहे :

**वेल फुलाया झाली । जशि गोंडस दिसली डोळां ठसली ।।१ ॥**
**तशि न पुढें जों फुलली । कीं पालविची टवटवि मग लपली ॥२॥**
**आशा जें सुख व्याली । तें सिद्धी प्रेमें केवळ पाळी ॥ ३ ॥**
**म्हणुनि कळी नव आली । तों भृंग भोंवतीं घिरट्या घाली ॥४॥**
**पाकळि फुगिर जाहली । कीं मधुकर जाउनि बसला जवळी ॥५॥**
**कोवळि दिनकरबाळी । ती बापा डोळ्यांआड जहाली ॥ ६ ॥**
**तो तर मानि दिवाळी । कीं ज्याची त्याला ठेव मिळाली ॥ ७ ॥**
**शुद्ध प्रेमें झाली । ही लीला वेलीभृंगांमधली ॥ ८ ॥**
**तरुणजनां जणुं गमली । ती प्रणयरसाची दीक्षा पहिली ॥ ९ ॥**

**कविला कविता स्फुरली । परि रसिक धरिल कां तिजला स्वगळीं ॥ १० ॥**

पुरातत्त्वभूषण इतिहासाचार्य वि. का. राजवाड्यांना आदरांजली अर्पिण्यासाठी लिहिलेल्या मृत्युलेखा[७]च्या आरंभी पुढील आर्या आहे : " **कवण सुमुहुर्ती नेणों ठेविति त्या विश्वनाथ हें नांव । परि सत्य आज हें की तत्कीर्तीला पुरे न जगिं ठाव ॥** "

इ. १९२७-२८ मध्ये त्यांनी '**श्रीशिवजन्मकथा**' नावाचे सुमारे ३०० आर्यांचे एक काव्य लिहिले होते; पण दुर्दैवाने आज त्याचे हस्तलिखित गहाळ झाले आहे.

## ६. जीवनातील एक अज्ञात पर्व : गणेशोत्सवातील मेळा :

आपल्या तनुमनधनानुसार देशभाषेची सेवा करण्याचे व्रत घेतलेल्या नानांनी अंगी थोडीफार कवित्वशक्ती असल्याने लो. टिळकांच्या सार्वजनिक गणेशोत्सवाचे एक अंग म्हणून पुण्यात चालू झालेल्या मेळ्यांचे अनुकरण मुंबईस आपल्या राहात्या चाळीत सार्वजनिक गणपती बसवून, मेळा काढून, १८९५ साली केले. हा मेळा १९१४ पर्यंत म्हणजे पहिल्या महायुद्धाच्या वर्षारंभापर्यंत चालू होता. या मेळ्यात म्हणावयाची विविध विषयांवरील व चालींची राष्ट्रजागृतिपर पदे नाना तयार करीत आणि ती अनेक मुलांना प्रौढांना म्हणावयास शिकवीत. सरकारी नोकरीची बेडी पायात असल्यामुळे स्वतःच्या नावाचा बभ्रा न होऊ देण्याची खबरदारी त्यांना घ्यावी लागे. ह्याचा साहजिक परिणाम म्हणजे इतक्या वर्षांत त्यानी रचिलेली शेकडो पदे प्रसिद्ध होऊ शकली नाहीत आणि त्यामुळे आज ती काळाच्या उदरात गडप झाली आहेत. श्री. नरसोपंत भागवत, आबा पुराणिक इत्यादी चाळीतील प्रमुख नागरिक नानांचे सहकारी या नात्याने मेळ्यात पुढाकार घेत. नानांनी पडद्याआड राहून १८-२० वर्षे चालविलेला हा मेळा त्या वेळी दादरपर्यंत ठिकठिकाणी होणाऱ्या सार्वजनिक गणेशोत्सवांत हजेरी देत हिंडत असे. डॉ. नानासाहेब

७. कै. राजवाडे, चित्रमयजगत्, फेब्रुवारी १९२७

देशमूख, प्राणाचार्य वासुदेवशास्त्री ऐनापुरे यांच्यासारखे त्या वेळचे मुंबईतील प्रतिष्ठित नागरिक या मेळ्याचे कार्यक्रम मुद्दाम निमंत्रण करून आपल्या गणपतीसमोर करवीत. नानांची पदे सुबोध, अर्थघन, श्लिष्ट पण प्रासादिक असत. माझ्या आईच्या तोंडून ऐकलेल्या पदांचा त्रोटक भाग येथे उद्धृत केल्यास अनुचित होणार नाही :

१. जरि जपाल गंगाधरसुत हो । सुरतिलक तरी हो सुख लाहो ॥ धृ. ॥

मंगलमूर्ति महोत्सवदायक । मंगलमूर्ति शिवोत्सवदायक ।
श्रीपार्वतिचा बाळ । श्रीदुर्गेचा बाळ । गंगाधरसुत हो,
पंचाननसुत हो ॥ १ ॥

२. धीरवीरमणि पृथ्वीराया,
भीमसिंह, पद्मिनि तज्जाया,
हमीरसिंह, प्रतापराया
धर्मरणीं बळि हो पडले;
नच घाबरले;
नच बावरले.
जातगोत वा मनांत नाणा;
काय आज ये प्रसंग जाणा;
'देशकार्य करुं' असाचि बाणा
आर्य तुम्ही निज चित्तिं धरा;
मनिं धैर्य धरा;
निज दैन्य हरा.[८]

~~~~~~~~~~

८. ९. डॉ. केतकरकृत आशावादी (पृ. १२१, १२२) कादंबरीत ही पदे उद्धृत केलेली आहेत. डॉ. केतकर या काळात शिक्षणासाठी मुंबईत होते. त्यांच्या स्वभावानुसार त्यांनी त्यांचे टिपण ठेविले असावे.
~~~~~~~~~~

३. स्मरत जा पूज्य पितरांना ।
पसरा न तोंड इतरांना ।
श्रीदाशरथी रामाला ।
श्रीकृष्णसख्या धर्माला ।
श्रीएकनाथ साधूला ।
सद्गुरू रामदासाला ।
नृपतिलका शिवरायास ।
आत्मदेशास ।
देई सौख्याला ।
जो पुनः स्थापि धर्माला[९] ।

नानांच्या संगीताच्या अभिरुचीसंबंधाने त्यांचे स्वतःचे उद्गार देऊन हा विषय संपवितो. " सुप्रसिद्ध बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर हे ' ख्याली, ' आपले चरित्रनायक विष्णुपंत छत्रे हे ' ध्रुपदे, ' नारायणबुवा गोगटे, फलटणकर, हे ' टप्पे, ' आणि सखारामबुवा हे ' लावणीवाले ' ह्या चौघांहि गवय्यांचें गाणें ऐकण्याइतकें भाग्य ह्या लेखकास ईशकृपेनें प्राप्त झालें आणि नारायणबुवा फलटणकरांचें गाणें तर, त्यानें अगदीं लहानपणापासून – त्याला कळावयास लागल्यापासून – तों ते दुर्दैवानें असत्या आयुष्यांतच कैलासवासी होईपर्यंत मिळून, शेंकडों वेळां ऐकिलें आहे. स्वतः या लेखकाला गायनकला मुळींच अवगत नाहीं. केवळ थोडीफार त्या कलेविषयीं नादलुब्धता मात्र आहे, इतकेंच.[१०] "

जुने, प्राचीन मराठी काव्य साक्षेपाने व चिकित्सेने अभ्यासिणारे बहुश्रुत विद्वान् म्हणून नानांना मिळालेल्या लौकिकाचा एक भाग म्हणून १८९९ साली मुंबईस मोरोपंतांची सार्वजनिक पुण्यतिथी ( चैत्र शु. १५ ) साजरी करणाऱ्या कार्यकर्त्यांत नाना एक प्रमुख कार्यकर्ते होते, या गोष्टीचा उल्लेख करा-

९. मागील पृष्ठात दिलेली ८ ही टीप पाहा.
१०. पं. विष्णुपंत छत्रे यांचे चरित्र, पृ. ६७-६८

वयास हवा. या वेळी नुकत्याच स्थापन झालेल्या आर्यन एज्युकेशन सोसायटीच्या चर्नीरोडवरच्या शाळेत साजऱ्या झालेल्या या पुण्यतिथीच्या व्याख्यानांत प्रो. राजारामशास्त्री भागवत, श्री. ग. ल. पागे यांजबरोबर नानांनी वक्ता म्हणून भाग घेतला होता. आर्यन एज्युकेशन सोसायटीच्या स्थापनेशी नानांचा काही संबंध असल्याचे त्या शाळेत आरंभी काही काळ अधिकारी शिक्षकाचे काम केलेल्या आणि नंतर पुण्याच्या फर्गसन महाविद्यालयात रसायनशास्त्राचे प्राध्यापक म्हणून विख्यात झालेल्या श्री. गो. बा. कोल्हटकरांच्या तोंडून प्रस्तुत लेखकाने ऐकिले आहे. या शाळेतील शिक्षक आणि वरच्या वर्गातील प्रौढ विद्यार्थी यांच्यासाठी नाना बऱ्याच वेळा इतिहास आणि मराठी वाङ्मय यावर व्याख्याने करीत आणि ऊहापोह करीत.

## ७. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय :

मराठी भाषेत प्रसिद्ध झालेल्या व वेळोवेळी होणाऱ्या सर्व पुस्तकांचा व दुर्मिळ हस्तलिखितांचा संग्रह करणे आणि मासिक प्रत्येकी दोन आणे वर्गणी घेऊन ती वाचकांस वाचावयास देणे हे दोन हेतू आरंभी निश्चित करून अकरा सामान्यतः तरुण गृहस्थांनी, 'मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय' नावाची संस्था श्रावणी पौर्णिमा शके १८२० म्हणजे १ ऑगस्ट इ. १८९८ या शुभ दिनी श्री. वि. कॉ. ओक यांच्या अध्यक्षतेने स्थापन केली. या अकरा मंडळीत शेजवलकर ( इतिहासज्ञ त्र्यं. शं. शेजवलकरांचे वडील ), पुणतांबेकर, पिटकर, बाक्रे, पागे यांच्या समवेत नाना एक होते. संग्रहालयाची सुरवात शेणव्याच्या ठाकुरद्वारी भांडारे यांच्या बंगलीत असलेल्या ब्राह्मणसभेच्या जागेत झाली. ब्राह्मणसभेचे त्या वेळचे चिटणीस श्री. बापट हे संग्रहालयाच्या संस्थापकांपैकी गुर्जर, गद्रे व पागे यांचे स्नेही असल्याने संग्रहालयास ही जागा मिळाली. श्री. पुणतांबेकर हे ३०-३२ वर्षे संस्थेचे चिटणीस या नात्याने तिचे बहिश्चर प्राण तर नाना १९२३ मध्ये मुंबई सोडीपर्यंत २५ वर्षे, व्यवस्थापक मंडळाचे सभासद पण प्रत्यक्ष अधिकारपद न स्वीकारता, संग्रहालयाची मातेप्रमाणे जपणूक व संवर्धन करणारे अंतश्चर प्राण होते. मुंबईस असेपर्यंत प्रतिवर्षी आपल्या जवळची पुस्तके व मासिके ते संग्रहालयास देणगी म्हणून देत. या गोष्टीची नोंद अहवालांत आढळते. त्यांच्या कचेरीच्या कामाच्या वेळेमुळे प्रत्यही दुपारी

चारपासून रात्री आठापर्यंत ग्रंथालयातच ते असावयाचे. तेथे ठाकुरद्वारी जिन्या-खालची खोली ही त्यांची ठरलेली बसावयाची जागा असे. स्वतंत्र किल्या जवळ असल्यामुळे रविवारी व इतर सुट्टीच्या वारी ते आपले वाचन-लेखन बहुधा त्या खोलीत बसूनच करीत. संग्रहालयाच्या व्यवस्थापक मंडळाचे ते वरीच वर्षे सभासद होते. नव्याजुन्या मराठी पुस्तकांच्या नावलेखकांची बिनचूक माहिती ते मिळवीत व चिटणिसांच्या मदतीने ती ती पुस्तके तात्काळ आणण्याची व्यवस्थाही करीत. कित्येक दुर्मिळ ग्रंथ बभ्रा न करता त्यानी अशा पद्धतीने संग्रहालयास मिळवून दिले आहेत. संस्थेच्या वार्षिक समारंभाचे अध्यक्ष आणि वक्ते यांची योजकतेने निवड करणे आणि त्यांना संस्थेचे निमंत्रण स्वीकारावयास लावणे ही कामे करणाऱ्यांमध्ये नाना हे एक प्रमुख कार्यकर्ते होते. मुंबईस निघणाऱ्या काही नियतकालिकांशी त्यांचा लेखकसंपादक या नात्याने संबंध असल्यामुळे आणि नाटक, कादंबरी, काव्य, निबंध, इतिहास, चरित्र, ग्रंथपरीक्षण इत्यादी मराठी वाङ्मयाच्या विविध क्षेत्रांत त्यांचा त्या काळी लेखक म्हणून बोलबाला असल्यामुळे, त्या काळच्या बहुतेक सर्व महाराष्ट्रीय वाङ्मयसेवकांशी त्यांचा प्रत्यक्षाप्रत्यक्ष परिचय असे. याचा फायदा संग्रहालयास अध्यक्ष-वक्ते मिळवून देण्यासाठी त्यांनी आत्मीयतेने केला असे म्हटल्यास वावगे होणार नाही.

संग्रहालयात अभ्यासासाठी येणाऱ्या जिज्ञासू वाचकास ते अचूक मार्ग दाखवीत आणि त्यांना अवश्य ती पुस्तके वाचण्यासाठी काढून देत. कै. साने गुरुजींनी यासंबंधात इ. १९४५ साली[११] डिसेंबरात मजपाशी सांगितलेली आठवण उद्बोधक आहे. साने गुरुजी आपले पहिले पुस्तक, ना. गोखले चरित्र, लिहिण्या-साठी सामग्री जमवीत असताना मुंबईस संग्रहालयात गेले होते. "तेव्हा ना. कृ. गद्र्यांनी आपल्याला ना.गोखल्यांसंबंधी संग्रहालयात असलेले सर्व साहित्य विनायास व त्वरित उपलब्ध करून दिले." संग्रहालयास भेट देणाऱ्या लहानथोरांस ग्रंथ व त्यांचे अंतरंग यांची नेमकी माहिती नाना पुरवीत; याचे कारण तेथील प्रत्येक पुस्तक त्यांच्या नजरेखालून जात असे. कित्येक जिज्ञासूंशी विचार-

११. प्रस्तुत लेखक १९४५ च्या जूनमध्ये जळगावी नवीन निघालेल्या मुळजी जेठा आर्ट्स् व सायन्स महाविद्यालयात संस्कृत-मराठी या विषयांचा प्राध्यापक होता.

विनिमय करून, कित्येकांना ग्रंथ पुरवून व माहिती देऊन त्यांनी संग्रहालयाच्या द्वारे स्वत:बरोबर इतर अनेक जिज्ञासू, वाचक, अभ्यासकांचे ज्ञान वाढविण्यास साहाय्य केले. संग्रहालयाचा स्वत:च्या ज्ञानवृद्धीसाठी जसा त्यांनी भरपूर उपयोग करून घेतला तसाच तो इतरांनाही[१२] करून घेण्यास त्यांनी भरपूर संधी दिली व मदत केली. " रा. रा. वासुदेव गोविंद आपटे, रा. रा. नारायण कृष्ण गद्रे या आणि पूर्वी सांगितलेल्या सज्जनांनीं मला मनोभावानें साहाय्य केलें व म्हणून मला हें काम हातीं घेतल्यावर पुरें करतां आले. "[१३] हा अभिप्राय पाहा. अशा रीतीने २५ वर्षे संस्थेची त्यांनी अत्यंत निष्ठेने, मनोभावाने आणि निरलस सेवा केली.

## ८. श्रीसरस्वतीमंदिर :

श्री. वा. रा. जोशी यांनी काही मित्रांच्या मदतीने मुंबईस १८९५-९६ मध्ये '**आर्यसभा**' नावाची संस्था स्थापन केली. या सभेच्या वतीने शके १८२३ ( इ. १९०१ ) मध्ये '**श्रीसरस्वतीमंदिर**' नामक नियतकालिक श्री. म. के. काळे हे प्रकाशकसंपादक म्हणून सुरू करण्यात आले. " १९०१ मध्ये निघालेले ' श्री सरस्वतीमंदिर ' हें प्रारंभीं षाण्मासिक, नंतर त्रैमासिक व अखेरीअखेरीस द्वैमासिक व मासिक होऊन १९०८ मध्यें अंतर्धान पावलें. बॅ. जयकर, वामनराव जोशी, गोपाळराव देवधर वगैरे थोर व्यक्तींच्या चालकत्वाखालीं आणि पांगारकर, राजवाडे, बाळकृष्णपंत भिडे वगैरे सिद्धहस्त लेखकांच्या साहाय्यानें गद्रे व मुंडले यांनीं हें मासिक[१४] चालविलें होतें. "

---

१२. १४ जुलै १९५८ या दिवशी नानांच्या २५ व्या पुण्यतिथीनिमित्त झालेल्या मुं म. ग्रंथसंग्रहालयातील समारंभाच्या वेळी साक्षेपी पंडित श्री. न. र. फाटकांनी आपल्या भाषणात जुने मराठी काव्य वाचण्यास आपण नाना गद्र्यांपाशी शिकल्याचे सांगितले.

१३. महाराष्ट्रियकृत श्रीरामायण-समालोचना अथवा रामायणाचा उपसंहार ( ग्रंथकर्त्याचें आत्मनिवेदन, पृ. १२ )

१४. अ. ना. देशपांडेकृत आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास, भाग पहिला पृ. ५२३, ५२४

" ' महाराष्ट्रकोकिळ ', ' भारतवर्ष ', ' ऐतिहासिक लेखसंग्रह ', ' इतिहाससंग्रह ', **'श्री सरस्वतीमंदिर'**, ' ग्रंथमाला ' वगैरे मासिकांतून ऐतिहासिक साधनें आणि ऐतिहासिक संशोधनपर वाङ्मय प्रसिद्ध झालें. " " श्री. सरस्वतीमंदिर मासिकहि लेखनादिसंपादनासंबंधानें सर्वस्वीं गद्रे यांचेंच होतें." [१५] या मासिकाच्या लेखक-वृंदात, त्यातील अंतर्गत पुराव्याने पुढील नावांचा समावेश होता असे स्पष्ट होते : श्री. जयकर, वा. रा. जोशी, ल. रा. पांगारकर, बा. अ. भिडे, गो. कृ. देवधर, वि. का. राजवाडे, ना. भ. पावगी, श्री. ना. दातार, वा. दा. मुंडले, ना. कृ. गद्रे, ' कमलाकर. ' नानांनी या मासिकाच्या आठ वर्षांच्या आयुष्यात अनेक निबंध, ग्रंथपरीक्षणे, स्फुट लेख, संपादकीये, चरित्रे, ईशस्तुती आणि **महाराष्ट्र महोदयाचा पूर्वरंग** यासारखे लेखन नावाने, टोपण नावाने अथवा संपादक या नात्याने नावावाचून केले आहे. प्रो. श्री. ग. जिन्सीवाले, स्वामी विवेकानंद यांची मृत्युलेखांसारखी पण बरीच विस्तृत चरित्रे यातच नानांनी लिहिली आहेत. स्फुट लेखांत ' रा. राजवाडे यांचे ऐतिहासिक लेख छापण्यासाठी फंड उभारणें ', ' विसाव्या शतकांतील इंग्रजी-मराठी कोश ' इत्यादी त्यांच्याच हातचे आहेत. मासिकातील सडेतोड, स्पष्ट, निर्भीड व जहाल संपादकीयांनी इ. १९०८ मधील सर्व देशातील आणि विशेषतः महाराष्ट्रातील ज्वालाग्राही वातावरणात आपले मासिक सरकारी रोषाला बळी पडणार अशा किंवदंतीने भिऊन प्रकाशक काळ्यांनी चालकसंपादकांच्या मनामतांविरुद्ध ते बंद केले. या मासिकातील लेख, त्यांचे विषय आणि लेखक यांच्या नावांत पुढे मराठी वाङ्मयात विविध प्रकारांनी मूलग्राही व मोलाची भर घालणाऱ्यांची नावे प्रामुख्याने झळकतात. या लेखकांपैकी बऱ्याच जणांच्या लेखन-गुणांचा विकास होण्याला या मासिकाने भरपूर अवसर दिला असे म्हणा-वयास हवे.

समाजात संकुचित वृत्तीच्या लोकांनी पसरविलेल्या समजुतीचा एक चांगला नमुना म्हणून समाजशास्त्रज्ञ, ज्ञानकोशकार डॉ. केतकरांची पुढील आठवण मोठी उद्बोधक ठरेल : " शेणव्यांचें प्रतिष्ठित मासिक ' विविधज्ञानविस्तार ' तर त्याला प्रतिस्पर्धी म्हणून ब्राह्मणांनीं ' सरस्वतीमंदिर ' काढलें आणि आता

१५. कै. राजवाडे, चित्रमयजगत् , फेब्रुवारी १९२७

' मनोरंजना 'ला प्रतिस्पर्धी म्हणून ' वाग्विलास ' काढलें आहे असें देखील माझ्या कानीं आलें. या प्रकारच्या विधानाला पुरावादेखील कांहीं व्यक्तींस मिळाला. एकदा कोणीतरी नेटिव ओपिनियन छापखान्यांत बसला असतां ' सरस्वतीमंदिर ' मासिकाचे एक कार्यकर्ते **नाना गद्रे** हे वाग्विलासाचीं मुद्रितें तपासतांना दिसले ! ! अर्थात् सरस्वतीमंदिर आणि महाराष्ट्र वाग्विलास हीं एकाच कंपूतल्या मंडळींनीं चालविलीं आहेत हें त्या व्यक्तीच्या मतें सिद्ध झालेंच. वाग्विलासास या तऱ्हेचें महत्त्व येईल आणि त्याचीं प्रुफें कोण तपासीत आहे याची चर्चा होईल अशी मला कल्पनाहि नव्हती. त्यांतल्या त्यांत असें झालें होतें कीं, तीं मुद्रितें तपासण्याचें काम माझ्याकरतां रा. गद्रे यांनीं केलें नसून नेटिव ओपिनियनचे मालक रा. परांजपे यांच्या विनंतीवरून त्यांनीं केलें होतें. "[१६] सरस्वतीमंदिराच्या लेखकांपैकी नाना आणि बा. अ. भिडे यांनी पुढे **विविधज्ञानविस्तारात** पुष्कळ लेखन केले आहे.

' **महाराष्ट्र इतिहास** ' नावाचे मासिक काढून चालविण्याच्या नानांच्या प्रयत्नांसंबंधी त्यांच्याच शब्दांत पुढील माहिती सांगता येईल : " गोविंदराव काळे पेशव्यांचे निजाम दरबारचे वकील ह्यांचें कागदपत्र एक ओझेंभर आणि इतरहि कांहीं अत्यंत दुर्मिळ कागदपत्र हीं राजवाड्यांनीं गद्रे यांच्या स्वाधीन केलीं. तीं इतिहाससाधनें प्रकाशित करण्यासाठीं गद्रे यांनीं आपल्या साहाय्यास रा. धारपुरे आणि जोशी ह्या दोघांस घेऊन एक प्रतिमास ५६ पानांचें, मासिकहि काढलें. तें सात अंक निघाल्यावर बंद पडलें. कारण रा. वा. रा. जोशी ह्या सहसंपादकानें आपलें अंग प्रसिद्धपणें काढून घेण्याची धमकी दिली. मासिकास वर्गणीदारहि फारसे नव्हते. १५० रुपयांची बूड सोसून मासिक[१७] बंद केलें. " कै. राजवाड्यांचा मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें, खंड ७ ( १९०४ ) मुंबईस प्रसिद्ध झाला असून त्यावर गद्रे, धारपुरे, राजवाडे अशी नावे संपादक म्हणून आहेत.

१६. " माझ्या आयुष्यांतील जुन्या बऱ्यावाईट आठवणी " प्रतिभा, वर्ष १ लें, अंक २२, १९३३

१७. कै. राजवाडे, चित्रमयजगत्, फेब्रुवारी १९२७

सरस्वतीमंदिर मासिकाशिवाय विविधज्ञानविस्तार, महाराष्ट्रसाहित्यपत्रिका' अरविंद, ज्ञानांजन, मोदवृत्त, मुमुक्षु, इंदुप्रकाश, नेटिव ओपिनियन, मुंबईवैभव, संदेश, काव्यरत्नावली, चित्रमयजगत् इत्यादी नियतकालिकांशी लेखक व कवी या नात्याने एकाधिक वेळा नानांचा अधिकउणा संबंध आलेला होता. त्यांचे बरेच लेखन त्यांनी निनावी प्रसिद्ध केल्यामुळे आज इतक्या काळानंतर ते असून नसल्यासारखेच झाले आहे.

याच संदर्भात **महाराष्ट्र साहित्य परिषद्**, महाराष्ट्र साहित्य संमेलन किंवा त्याचे पूर्वरूप असे **मराठी ग्रंथकारांचे संमेलन** यांच्याशी नानांचा असलेला संबंध सांगितल्यास अस्थानी होणार नाही. " रा. नारायण कृष्ण गद्रे यांनी ऐतिहासिक कागदपत्र छापण्याकरितां काढलेल्या मासिक पुस्तकास २५० देखील वर्गणीदार न मिळाल्यामुळें तें कसें बंद करावें लागलें ह्याचा इतिहास[१८] सांगितला. " " रा. लक्ष्मण गणेशशास्त्री लेले यांनीं सरकारी क्रमिक पुस्तकासंबंधीं आपला टीकात्मक निबंध वाचला....रा. नारायण कृष्ण गद्रे यांनीं सांप्रतच्या मराठी पुस्तकांतील चुकांचा उल्लेख केला व हल्लींच्या एका कवीच्या भाषांतरकृतींतील चुका दाखवून सांगितलें कीं या गोष्टीसंबंधानें सविस्तर ऊहापोह करण्याची तजवीज मासिक पुस्तक काढून साहित्यपरिषदेनें अवश्य केली[१९] पाहिजे. " 'विस्तारा'त महाराष्ट्र-साहित्य-पत्रिका समाविष्ट असल्यापासून १९२७ मध्ये स्वतंत्र त्रैमासिक रूपात ती निघू लागल्यावरही नाना तिचे एक लेखक होते. कै. ना. गो. चापेकरांनी म. सा. पत्रिका स्वतंत्र काढण्याचे ठरविल्यावर त्यांच्याच आग्रहाच्या पत्रावरून नानांनी त्या अंकात फिरून लिहिण्यास आरंभ केला. म. सा. परिषदेची त्यांना असलेली जुनी माहिती आणि परिषदेविषयी त्यांची आस्था '**महाराष्ट्र-साहित्य-परिषदेची पूर्वपीठिका**'[२०] या त्यांच्या लेखावरून कळून येईल.

---

१८. द. वा. पोतदारकृत महाराष्ट्र-साहित्य परिषद्-इतिहास, परिशिष्ट चौथे, पृ. १७

१९. कित्ता, परिशिष्ट सहावें, पृ. २५; श्रीसरस्वतीमंदिर, वर्ष ८ वे, अंक ३ रा, स्फुटलेखकसंग्रह

२०. म. सा. पत्रिका, वर्ष १ ले, अंक २ रा

'**काव्यसंग्रह**' या निर्णयसागरातून प्रसिद्ध होणाऱ्या व जुनी मराठी काव्ये प्रसिद्ध करणाऱ्या मासिकाचे कै. ना. चिं. केळकर हे संपादक असताना जुन्या काव्यावर अर्थनिर्णायक टीपा देण्याच्या कामात नानांनी त्यांना साहाय्य केल्याची नोंद आहे. या संबंधात हा पुरावा पहा : "नानांच्या (ना. चिं. केळकरांच्या) विद्याव्यासंगांत मुख्यतः दोन विषय असत...आणि दुसरा विषय जुन्या मराठी कवींचें काव्य. या विषयाचें संशोधन करण्याचा त्यांना नाद असे आणि या व्यासंगांत वाई येथील जुने सुप्रसिद्ध साहित्यिक रा. **नाना गद्रे** (महाराष्ट्रमहोदयाचा पूर्वरंग या पुस्तकाचे कर्ते) आणि कै. विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांचा आणि नानांचा स्नेह जमला तो अखेर-पर्यंत टिकला."[२१] "महाराष्ट्रांत संचरलेल्या या लाटेशी 'साहित्यपत्रिका' पराङ्मुख नाहीं हें योग्यच आहे. या भागांत साधारणतः जे लोकश्रुत लेखक आहेत त्यांचेच लेख दिसून येतात. रा. सरदेसाई, रा. पिसुर्लेकर, रा. **नारायण कृष्ण गद्रे**, यांनींच संशोधनपर लेखांची मोठी संख्या सजविली आहे. रा. गद्रे यांचा तुकारामचरित्राच्या कालव्याप्तीसंबंधाचा लेख मननीय आहे. चोंभाकवीवरील लहानसें कालनिर्णयदर्शक स्फुट यांचेंच आहे...दुसऱ्या अंकांत ...**ग्रामणी शब्दाच्या अर्थाचा विचार** ... हे तीन लेख चांगले आहेत."[२२]

## ९. महाराष्ट्रमहोदयाचा पूर्वरंग :

'सरस्वतीमंदिरा'त तिसऱ्या वर्षापासून पाचव्या वर्षापर्यंत क्रमशः प्रसिद्ध झालेल्या या ग्रंथाविषयी आणि यापुढील संकल्पित दोन भागांविषयी खुद्द लेखकाचा पुरावा असा आहे : "पूर्वरंगास तें नांव योजिलें गेलें त्याच वेळीं

---

२१. न. चिं. केळकरकृत गतगोष्टी अर्थात् माझी जीवनयात्रा, पृ. ८७

२२. 'महाराष्ट्र-साहित्य-पत्रिके'चें चतुर्वार्षिक समालोचन, म. सा. पत्रिका, डिसेंबर १९२१, पृ. १८८,१९२. तुकारामचरित्राच्या कालव्याप्ती-संबंधीच्या नानांच्या विस्तृत लेखाचा कै. पुं. मं. लाडांनी आपल्या **तुकारामाचें चरित्र** (पूर्वार्ध), प्रकरण चौथे (जन्मशक) मध्ये विस्ताराने परामर्श केला आहे.

पूर्वरंगापुढें लगेच **महाराष्ट्रप्रभात** नांवाचें प्रकरण लिहावयाचें आणि मग **महाराष्ट्रमहोदय** रंगवावयाचा असा महाराष्ट्र महोदयाचा पूर्वरंग लिहिणाराचा संकल्प होता. महाराष्ट्रमहोदयाच्या पूर्वरंगाची व्याप्ति शकाब्द १२०० ते १५०० पर्यंत धरण्यांत आली. त्यामुळें एकनाथ, मालोजी, दासोपंत, तुकाराम इत्यादि महाराष्ट्रीय पुरुषांचे केवळ नामनिर्देश आणि त्रोटक उल्लेखच त्यांत आले आहेत. तेव्हां पूर्वरंग आणि प्रभात ह्यांचा सांधा नीट जुळण्यास्तव प्रभातारंभीं एकनाथ जयंतीचाच ऊहापोह करण्यांत येईल. अर्थात् शकशतक पंधराव्याच्या उत्तरार्धाच्या इतिहासाचा समावेश पुनरुक्तिदोष टाळून महाराष्ट्र-प्रभातांत करण्यांत येईल. प्रभाताची उत्तरसीमा तुकाराममहाराजांच्या प्रयाणोत्तरांत आणि चाफळास श्रीसमर्थ रामदासस्वामींनीं श्रीरामाचें देऊळ बांधून त्यांत श्रीराममूर्तीची स्थापना केली त्याचे वर्णनांत आंखली जावी असा संकल्प आहे. महाराष्ट्रमहोदयाच्या पूर्वरंगांत ज्याप्रमाणें महाराष्ट्राचा धार्मिक, सामाजिक, राजकीय व वाङ्मयविषयक अशा चतुरंग इतिहासाचा समावेश साम्यानें करण्यांत आला आहे तसाच क्रम प्रभातांतहि स्वीकारण्यांत आला आहे.”[२३]

या पुस्तकावरचा पुढील अभिप्राय तत्कालीन म्हणून उद्धृत करणे अत्यवश्य आहे ...“ह्या महाराष्ट्रमहोदयाच्या पूर्वरंगांत साडेतीनशें वर्षांचा धार्मिक, राजकीय व सामाजिक इतिहास रा. गद्रे यांनीं बखरी, कागदपत्रें व शोधकांचे लेख इत्यादि सामुग्रीच्या आधारानें लिहिला आहे. रा. रा. नारायणराव गद्रे हे एक कसलेले लेखक असून, प्रस्तुत पुस्तकांतील माहिती संगतवार, भाषा प्रौढ, विवेचन मार्मिक व स्पष्ट असून, विषयाची मांडणी व्यवस्थित असल्यामुळें हें पुस्तक बहुश्रुत मराठी वाचकांच्या आदरास पात्र होईल असा आम्हांस भरंवसा वाटतो. सामान्य वाचकांसहि हें पुस्तक वाचून ऐतिहासिक कादंबरी-प्रमाणें मनोरंजन व बोध यांचा लाभ झाल्यावांचून राहणार नाहीं.” [२४]
“ ...विजयानगरच्या इतिहासाकडे महाराष्ट्राच्या दृष्टीनें पाहण्याचा एक

२३. अरविंद, मार्च १९२२, पृ. २२५–२२६
२४. केसरी, तारीख ६–२–१९०६

अभिनव प्रयत्न कै. ना. कृ. गद्रे यांनीं एका ग्रंथांत केला आहे. त्यांच्या ग्रंथाच्या नांवावरूनच त्यांच्या विचारांची दिशा कळून येण्याजोगी आहे. ' महाराष्ट्रमहोदयाचा पूर्वरंग ' हें नांवच सांगतें की, महाराष्ट्रांत जी स्वराज्य-स्थापना झाली तिच्या उदयाची पार्श्वभूमि चित्रित करणें हा रा. गद्रे यांचा उद्देश आहे. विजयानगरचें अस्तंगत साम्राज्य आणि महाराष्ट्रांतील स्वराज्याचा उदय हीं दोन्हीहि अदृश्य कार्यकारणभावानें निगडित असल्याचें प्रतिपादन रा. गद्रे यांनी केलें आहे, तें सर्वथा समर्थनीय नसलें तरी तसेंच तें सर्वथा उपेक्षणीयहि नाहीं. "[२५]

या ग्रंथाची स्वतंत्र आवृत्ती निघालीच नाही. ' सरस्वतीमंदिरा 'च्या प्रकाशकांनी मासिकात क्रमशः प्रसिद्ध झालेल्या मजकुराची पाने एकत्र बांधवून त्या प्रती विक्रीस ठेविल्या होत्या ( इ स. १९०५ ). धार्मिक, सामाजिक, राजकीय व वाङ्मयीन अशा चतुरंग व्यापक भूमिकेवरून लिहिलेला इतिहास असे ह्या ग्रंथाचे स्वरूप सर्वतोपरी अभिनव व अपूर्व असल्यामुळे ग्रंथकर्त्याला **' महाराष्ट्रमहोदयाचा पूर्वरंगकर्ता '** असे बहुमानाचे पद त्याच्या मित्र-मंडळीत आणि जाणत्या साहित्यिकांत मिळाले होते. सध्या हे पुस्तक अगदी दुर्मिळ झाले असून नवीन पिढीतील अभ्यासू वाचकांस ते अप्राप्य झाले आहे.[२६] समर्थभक्त स. खं. आळतेकरांसारख्या लेखकांनी या ग्रंथातील काही आधार आपल्या ग्रंथातील विवेचनाला पुष्टी देण्यासाठी घेतले आहेत.[२७] ग्रंथाच्या नावातील महाराष्ट्रमहोदय हा सामासिक शब्दच लेखकाच्या प्रज्ञेची उत्तुंग झेप ध्यानी आणून देण्यास समर्थ आहे. **महाराष्ट्र-महोदय** या नावाच्या तिसऱ्या संकल्पित ग्रंथात औरंगजेबाच्या मृत्यूनंतर शाहूचे दक्षिणेत

२५. वि. पां. नेने संपादित अर्वाचीन मराठी साहित्य : द. वा. पोतदार : मराठी इतिहास व इतिहाससंशोधन, पा. ३६८

२६. महाराष्ट्र राज्याच्या साहित्य आणि संस्कृति मंडळाने प्रस्तुत ग्रंथाची ही आवृत्ती प्रसिद्ध करण्याचे ठरवून ती आता प्रकाशित होत आहे. प्रस्तुत लेखक यासाठी साहित्य आणि संस्कृति मंडळाला शतशः धन्यवाद देत आहे!

२७. स. खं. आळतेकरकृत श्रीसमर्थचरित्र, पृ. ४४१–४४२, ४४४

आगमन व गादीवर बसणे येथपर्यंतचा, पूर्वीच्या दोन भागांप्रमाणे, चतुरंग इतिहास देण्याचा लेखकाचा मनोदय होता.

**१०. तीन कादंबऱ्या आणि दोन चरित्रे :**

'**प्याद्याचा फर्जी** अथवा **भोसले घराण्याचा अभ्युदय**' इ.१८८९ ही मालोजीच्या चरित्रावरील ऐतिहासिक कादंबरी आहे. तिच्या प्रस्तावनेत पुढील विधाने आहेत : "पुढील दीडदोनशें पानांत १६ व्या शतकांतील आपल्या देशाच्या स्थितीचें अगदीं संक्षिप्त आणि ओबडधोबड चित्र रेखाटण्याचा यथाशक्ति प्रयत्न केला आहे. प्रत्यक्ष गोष्टीचा काळ इ. १५५० पासून इ. १६०० पर्यंतचा आहे. यांत इतिहासास कोठेंहि रेसभर न सोडतां कादंबरीच्या रूपानें वर्णन करण्याचा प्रयत्न केला आहे." या कादंबरीतील शिखर शिंगणापुराची शंभू महादेवाची जत्रा, कुस्त्यांचा फड, माळू-विठूंचा पराक्रम, वसंताच्या व मृगसराईच्या दिवसांची वर्णनें इत्यादी भाग अत्यंत चटकदार व आकर्षक आहे. रंजकता हा ललित साहित्याचा प्रधान हेतू इतिहासाला न दुखावता यात चांगला साधला आहे. तसेच प्रसंगांची व घटनांची मांडणी मोठ्या चतुराईने केली असल्याने उद्बोधन हा हेतुही कादंबरीच्या वाचनाने अनायासे साधतो.[२८]

'**हिंदुवा सूरज** अथवा **बाप्पा रावळ चक्रवर्ती**' "ही आठव्या शतकांतील उत्तर हिंदुस्थानांतील राजकीय, धार्मिक व सामाजिक स्थिति

---

२८. प्रस्तुत कादंबरीचे पुनर्मुद्रण कै. नानांच्या २५ व्या पुण्यतिथीला, १४ जुलै १९५८ ला, अ. वि. गृह प्रकाशन, पुणे २, यांच्या वतीने प्रसिद्ध करण्यात आले. प्रसिद्ध कवी, साहित्यिक आणि शिक्षणशास्त्रज्ञ श्री. वि. द. घाट्यांनी आपल्याला लहानपणी आवडलेल्या व अद्याप स्मरणात राहिलेल्या आणि आज पुनर्मुद्रण करणे अवश्य असलेल्या दुर्मिळ ग्रंथांच्या यादीत पहिले नाव या कादंबरीचे–लेखकाचे नाव लक्षात नव्हते तरीही–घातले. हा प्रसंग जुलै १९५७ मध्ये व्हीनस प्रकाशनसंस्थेत प्रस्तुत लेखक, इतर काही मंडळी आणि स्वतः श्री. स. कृ. पाध्ये यांच्या देखत घडलेला आहे. या प्रसंगानंतर वर्षाने या कादंबरीचे वरील पुनर्मुद्रण झाले.

दाखविणारी ऐतिहासिक गोष्ट महाराष्ट्र वाचकांस " आपली दुसरी ऐतिहासिक कादंबरी म्हणून नानांनी सादर केली. वाईच्या कादंबरीकल्पद्रुम आणि मकरंद या मालांनी प्रसिद्ध केलेल्या बहुतेक कादंबऱ्या हिंदी, बंगाली व पाश्चात्य भाषांतील – प्रामुख्याने इंग्रजी भाषेतील – कादंबऱ्यांची रूपांतरे आहेत. '**मनूच फिरला**' ही नानांची 'अस्सल हिंदु समाजाचे चित्र' रेखाटणारी विस्तृत सामाजिक कादंबरी (डेमी पृष्ठ ३८३) **कृष्णतनय** या टोपण नावाने इ. १९०६ मध्ये स्वतंत्र पुस्तकरूपात प्रसिद्ध झाली. कादंबरीकल्पद्रुमातील इतर बहुतेक कादंबऱ्यांप्रमाणे रूपांतरित समजून तिची उपेक्षा झाल्यासारखी वाटते. तिच्या '**प्ररोचना**' या प्रास्ताविकात पुढील काही वाक्ये आहेत : " पुष्कळ प्रसंगीं परसमाजाचें चित्रच केवळ स्वभाषेच्या पेहरावानें स्वसमाजाचें म्हणून भासविण्याचा अनेकांकडून प्रयत्न होत असतो. परसमाज सध्यां अत्यंत विचित्र अनुकूलतेंत असून आमचा समाज अद्वितीय प्रतिकूल स्थितींत आहे...तथापि केवळ स्वसमाजाचें चित्र त्याच्या जसें जसें आढळांत आलें तसें तसेंच तें अगदीं शक्य तितकें यथायोग्य रेखाटण्याचा हा एक प्रयत्न आहे." आंग्ल विद्या, आचारविचार इत्यादींच्या बाह्य अनुकरणाने एका अविभक्त हिंदू कुटुंबाचे निघालेले धिंडवडे या कादंबरीत वर्णून '**स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः।**' हे तत्त्व सारांश म्हणून शेवटी सुचविले आहे. या कादंबरीच्या प्रकरणांना दिलेल्या मथळ्याखाली त्यातील विषय सुचविणारी मुक्तेश्वर, रामदास, तुकाराम, वामन पंडित यांची वचने आणि म्हणी यांचा सुभाषितांसारखा केलेला वापर फार रोचक वाटण्यासारखा आहे. संस्कृताचे प्रमाणशीर मिश्रण असलेली अविकृत, सुगम, शुद्ध मराठी भाषा हा या कादंबरीचा ठळक विशेष म्हणावयास हवा.

कै. प्रो. श्री. ग. जिन्सीवाले (१९०३) आणि पं. विष्णुपंत छत्रे (१९०६) यांची चरित्रे नानांनी लिहिलेली आहेत. पं. छत्र्यांचे एवढे विस्तृत दुसरे चरित्र आजकालपर्यंत तरी मराठीत नव्हते. अश्वविद्यानिपुण, सर्कसवाला आणि उत्तम गवई अशा माणसाचे मराठीतील एवढे मोठे आणि मार्मिकपणे लिहिलेले चरित्र हे बहुधा पहिलेच असावे असे वाटते. पं. विष्णुपंतांच्या वर्णनाची ही काही वेचक वाक्ये पाहा : " त्यानें भूक लागली म्हणजे खावें, तहान लागली असतां पाणी प्यावें, आणि बाकीच्या वेळांत यथेच्छ आणि

अनर्गल ' वसुनारायण ' बोकळावें, खेळावें, हाणामाऱ्या कराव्या, कुत्र्याचीं पिलें, माकडें, खबुतरें ह्यांच्यामागे नाचावें-बागडावें, ओरडावें, अशी मन-सोक्त आबाडाब करावी." (पृ.७) " एकंदरीत छत्र्यांचा विष्णु म्हणजे कधींहि दुसऱ्याच्या तंत्रानें वागणारा थापडवाईक मुलगा नसून सदासर्वदा स्वतंत्रानें वागणारा आणि इतरांसहि – पशूपक्षी आणि माणसें या सर्वांसच सारखे– आपल्याच तंत्रानें वागावयास लावणारा म्हणजे अलीकडील एक प्रकारचा " सर्वदमन " होता म्हणावयास हरकत नाहीं." ( पृ.१७ )

## ११. व्याकरण, व्युत्पत्ती आणि कोशकार्य :

प्रा. नीलकंठ बाबाजी तथा दादासाहेब रानड्यांनी इ. १८९६ ते इ. १९१६ या वीस वर्षांत विसाव्या शतकातील ' इंग्रजी-मराठी'कोश (रॉयल पृ. २००० ) संपादून प्रसिद्ध केला. लो. टिळक, डॉ. भांडारकर, डॉ. नानासाहेब देशमूख इत्यादी महाराष्ट्रातील त्या त्या विषयातील अधिकारी विद्वानांचा ह्या प्रचंड कामासाठी त्यांनी योजनापूर्वक विषयवार समित्या नेमून उपयोग करून घेतला. रानड्यांनी नेमलेल्या या समित्यांनी त्या त्या विषयाची मराठी परिभाषा संस्कृत भाषेच्या आधाराने तयार केली. नाना आणि दादासाहेब रानडे यांचा दृढ स्नेह होता. मराठी भाषेचे शुद्धलेखन, व्याकरण आणि व्युत्पत्ती या विषयात नानानी दादासाहेबांना पुष्कळ साहाय्य केले. कोशाच्या प्रस्तावनेत ' Books Consulted ' या मथळ्याने दिलेल्या ग्रंथ आणि ग्रंथकार यांच्या नावनिशींत ' मराठी व्याकरण ' या विषयात ना. कृ. गद्रे आणि श्री. ना. दातार अशी दोन नावे दिली आहेत. नानांनी मराठी व्याकरणाचे पुस्तक लिहिल्याची नोंद सापडत नाही; तरीपण या महत्त्वाच्या अधिकृत नोंदीवरून त्यांनी या कोशकार्यासाठी तसे पुस्तक तयार केले असावे; पण ते पुढे कधीच प्रसिद्ध झाले नाही अशी गोष्ट घडली असणे असंभाव्य नाही. या कोशाची अक्षरानुक्रमाने तयार होणारी मुद्रणप्रत नीट पाहणे आणि त्याची मुद्रिते वेळोवेळी कसोशीने तपासणे ही कामे नाना मित्रप्रेमाने आणि विषयाच्या आवडीने करीत असत. इ. १९०४-५ च्या सुमारास ' बालबोध ' कर्ते वि. कों. ओक प्रभृतींशी मराठी लेखनशुद्धी करण्याच्या व कायम राखण्याच्या कामात नानांनी पुरेपूर सहकार्य केले होते.

इ. १९२६ मध्ये '**महाराष्टसारस्वतकार**' वि. ल. भाव्यांनी नानांन ठाणे मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या तेहतिसाव्या वार्षिक समारंभाचे अध्यक्षपद[२९] मंडित करण्यासाठी बोलाविले होते. त्या वार्षिक समारंभाचे अध्यक्ष म्हणून १३ जूनला '**श्रीसमर्थशिवकालीन धर्मकर्मवीरांचें संतर्पण**' या विषयावर नानांनी व्याख्यान केले. सारस्वतकारांनी या भेटीत, स्वतःला यापुढे प्रकृतीच्या अस्वाथ्यामुळे पूर्ण करता न येणारे, एक महत्त्वाचे व अवघड काम मोठ्या विश्वासाने नानांनी करावे अशी सस्नेह आग्रहाची गळ घातली. महानुभाव कविश्रेष्ठ भास्करभट्ट बोरीकराचे '**शिशुपालवध**' हे एक प्राचीनतम मराठी काव्य सांकेतिक लिपीचा उलगडा करून सारस्वतकारांनी नुकतेच छापून प्रसिद्ध केले होते. त्या काव्याची अर्थबोधक आणि व्युत्पत्तिदर्शक आटोपशीर टिप्पणी तयार करण्याचे ते काम होते. मुंबई विद्यापीठाने मराठी विषयाच्या एम्. ए. च्या परीक्षेच्या अभ्यासक्रमात हे काव्य लाविले होते. नानांनी भाव्यांच्या स्नेह-पूर्ण विनंतीचा आदर करून वाईसारख्या ठिकाणी उपलब्ध होणाऱ्या अपुऱ्या साधनांचा अधिकात अधिक उपयोग करून अल्प काळात '**शिशुपालवधकथा-टिप्पणी**' लिहिली आणि ती ठाणे मराठी ग्रंथसंग्रहालयाने प्रसिद्ध केली.त्यानंतर नानांनी त्या काव्याचा परिचय करून देणारे रसास्वादपर दोन लेख 'विस्तारा'त 'कृष्णात्मज दिनकर वाईकर' या नावाने लिहिले.[३०] महानुभाव संस्थानाधि-ष्ठित महंतांच्या संग्रहातील टीपग्रंथ आणि इतर तत्सम सामग्री नानांना उपलब्ध न झाल्यामुळे त्यांच्या 'टिप्पणी'त काही त्रुटी राहणे अपरिहार्य होते, "'शिशुपालवधा'वरील रा. ना. कृ. गद्रे यांची 'टिप्पणी' त्यांच्या

२९. "मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाची स्थापना ज्या विघ्नहर्त्या विनायकाच्या हातून झाली व मराठी भाषेला वळण ज्यानें बाल-बोधांतून प्रौढ वयापर्यंत देऊन निर्णयसागरांतून मराठी भाषेचा निर्णय दिला त्या मराठी भाषाव्यासंग महर्षीला अध्यक्षपणाचा मान ठाण्यानें दिला व तशीच त्या मानाची पुनरावृत्ति मराठी भाषेवर अक्षय प्रेम व तिचा व्यासंग करणाऱ्या श्री. गद्रे यांना देण्यास ठाणेंच पुढें सरसावलें." आत्मोन्नति, दिवाळी अंक १९३४, पान. १६

३०. विविधज्ञानविस्तार, जून, ऑक्टोबर १९२७

विद्वत्तेस शोभेशीच झाली, हें खरें; पण ‘ शिशुपालवधा ’वरील ‘ टीपग्रंथ ’ उजेडांत येऊं शकल्यास, दुधांत साखरच पडणार आहे. ” [३१]

ही टिप्पणी करताना नानांची भूमिका आणि विनय पुढील शब्दांतून चांगला व्यक्त होतो : “ .... आपलाहि कांहीं प्राचीनतम मराठीचा परिचय वाढेल ह्या भावनेनेंच केवळ मी टिप्पणी करण्यास प्रवृत्त झालों ... गुरुजी राजवाडे ह्यांचें ज्ञानेश्वरीचें व्याकरण आणि इतर एतद्विषयक लेख हेच मला मार्गदर्शक झाले. तरी पुष्कळ ठेंचाळलों आहें, कित्येक ठिकाणीं कोलमडया खात मधले लहानमोठे टापू उडून गेलों आहें; आणि कसातरी केवळ स्वतःच्या अज्ञानामुळेंच निबिड अंधकारमय वाटणाऱ्या अशा या काव्याटवीच्या शेवटास पोंचल्यावर इतरांस इतकेंच सांगतों कीं, माझ्याहीपेक्षां आपण अधिक सावधतेनें आणि व्युत्पत्तीचें शक्य तितकें साहाय्य घेऊन जर ह्या काव्याच्या अंतरंगांत शिराल तर मजसारखे कष्ट न होतां आपण त्याशीं चांगलें परिचित होऊन आनंदानें विहराल. माझी टिप्पणी म्हणजे शब्द सुटलेला आणि सोडलेला धडाच आहे. ” [३२]

श्री. य. खु. देशपांडे संपादित ‘ **ऋद्धिपुरवर्णन** ’ (१९२७) या नारायण पंडिताच्या महानुभावांच्या साती ग्रंथांपैकी एकावर श्री. केळकर, कोल्हटकर, भिडे इत्यादी अकरा विद्वानांच्या मालिकेत नानांचाही एक अभिप्राय आहे. त्यात आरंभी आपल्याकडे मुद्रित पुस्तक प्रसिद्धीपूर्वीच पाठविले म्हणून आनंद व्यक्त केला आहे आणि नंतर “ आतां थोडी अवांतर चर्चा – ही केवळ अंगुलिनिर्देशापुरतीच मी करणार आहें. कारण आपली प्रस्तावना आणि तींतील संदर्भ समजण्यास अवश्य तो पुढील मूळ ग्रंथ आणि टीप वाचूनहि अशा चर्चेस जी कांहीं अत्यंत संकुचित वाव मला आढळली तिचा विचार करतां अधिक लेखनाची आवश्यकताच नाहीं. टीपग्रंथ १६ व्या शतकांतील म्हणजे मूळ ग्रंथापासून कित्येक वर्षांनीं अर्वाचीन. अर्थात् जी ज्ञानेश्वरीची एकनाथोत्तर कालीं स्थिति तीच येथेंही, म्हणजे मुळाचा अर्थ आणि मूळ

---

३१. वा. ना. देशपांडे : ‘ शिशुपालवध ’कर्ता भास्करभट्ट कवीश्वराचार्य, विविधज्ञानविस्तार, ऑक्टोबर १९२८

३२. शिशुपालवधकथा–टिप्पणी, टिप्पणीची प्रस्तावना

पाठही टीपकारास बरेच दुर्बोध झाले असण्याचा संभव. उ. १ लीच ओवी– ' जे=देव=वाणी=परा-वाचा. ' येथें देववाणी जी परावाचा असें जें म्हटलें आहे तें चिंत्य दिसतें. देववाणी म्हणजे देव जो परमेश्वर त्याची वाणी म्हणजे वेद. आणि ह्या प्रकरणाचा शेंवटही ' आगम ' आणि ' निगम ' असाच आहे. ' नंदनी ' हें रूप खोटें तें ' नंदिनी ' असें म्हणजे मध्यम स्वर ' इ ' असणारें हवें. त्या पदाचा अर्थ कामधेनुकन्या. ' कादिंबिनी '=कादंबिनी असेंच हवें. ह्याप्रमाणें सर्व ओवी लावूं लागलें तर एक परिच्छेदच लिहावा लागेल आणि तितक्या योग्यतेची ती ओवी आहेही. केवळीं परब्रह्मीं ( ओ. ३ ) ह्यावरील टीपही अशीच चिंत्य आहे. केवळीं=" मायायुक्त " हें चूक होय. केवळ-ल=मायारहित, विशुद्ध परब्रह्मीं = विशुद्ध अशा ब्रह्माचे ठिकाणीं हाच अर्थ. परब्रह्मावतारी हा प्रतिशब्द चूक होय. "[३३]

नानांनी काही लहान लेखांतून शब्दांचे अर्थ आणि त्यांच्या व्युत्पत्ती यांची शंकासमाधानपूर्वक चर्चा केलेली आहे. " बदलापूर पुस्तकात कातोड्याची भाषा दिली आहे. ती वाचून तिच्यातील विशिष्ट क्रियापदांच्या रूपांची चर्चा करा अशा आशयाच्या माझ्या पत्राचें[३४] उत्तर " म्हणून कै. ना गो. चापेकरांनी नानांचे सर्व पत्र उद्धृत केले आहे. त्या पत्रातील सिद्धांतरूप भाग असा : " कोणतीही भाषा ( १ ) प्राथमिक-सिद्ध किंवा अव्युत्पन्न आणि साधित अथवा व्युत्पन्न वा व्युत्पादित अशा तऱ्हांनीं बनते. ( २ ) एकस्थलकुलनिष्ठ, नैकस्थलकुलनिष्ठ, समकालीन आणि विषमकालीन अशीही असते. ( ३ ) ती केवळ संमुखश्राव्य आणि विमुखश्राव्य अथवा परोक्ष आणि अपरोक्ष असते. ( ४ ) प्रथम त्यांत कालभेदाची अपेक्षा नसते. त्याचप्रमाणें वचनभेदाची...तथापि तृतीयपुरुषी वचनभेद प्रथम होऊन नंतर द्वितीय व प्रथम पुरुषी वचनभेद उत्पन्न होतो. कालभेदही असाच मागूनच उत्पन्न होतो. आणि

३३. प्राचीन वाङ्मयाचे तज्ज्ञ श्री. ना. कृ. गद्रे, वाई, यांचा अभिप्राय, पृ. ६-७

३४. ना. गो. चापेकर : जीवनकथा पृ ४०१,४०२; पत्रावर आश्विन वद्य १३ श. १८४९ अशी मिती आहे.

पुरुष, वचन, काल यांच्या भेदांची संगति लागण्याकरितां मूळची ‘ सुप्तिङन्त ’ रहित भाषा ‘ सुप्तिङन्त ’ सहित होते. म्हणजे ती ‘ अविभक्तिक ’ असलेली ‘ सविभक्तिक ’ होते. ” या सर्व गोष्टींवरून नानांचा संस्कृत, प्राकृत, देशी आणि मराठी भाषा, त्यांचे व्याकरण आणि व्युत्पत्ती यांचा व्यासंग चांगला ध्यानी येतो.

ज्योतिर्गणित आणि फलज्योतिष यांचा नानांना बराच छंद असून ‘ कुंडलीविज्ञान ’ कर्ते गणकभास्कर वि. गो. नवाथे आणि ‘ दैनिक सायन स्पष्ट ग्रह ’ कर्ते ना. स. मराठे यांच्या मुंबईतील संगतीने या विषयांच्या त्यांच्या अभ्यासाला बरेच बाळसे आले होते. शिवाजी, जनार्दनस्वामी, एकनाथ, नृसिंहसरस्वती, चोंभा इत्यादींचे जन्मशक ठरविण्यास नानांना आपल्या या अभ्यासाचा बराच उपयोग करून घेता आला. नातलग आणि स्नेहीपरिचित यांच्या कुटुंबातील नवजात बालकाची जन्मकुंडली ( अंशात्मक स्पष्ट ग्रहांसह ) करण्याचे काम नानांकडे येई आणि ते काम ते आनंदाने करीत.

## १२. मित्रपरिवार :

वाङ्मय, वाचन आणि लेखन यांची अनिवार हौस, त्या लेखनवाचनाचा उपयोग स्वबांधवांसाठी करावयाची तीव्र मनीषा आणि सार्वजनिक कामाची आस्था या सर्व गोष्टींनी मुंबईतील आणि महाराष्ट्रातील तत्कालीन अनेक समवयस्क समानशीलांशी नानांचा परिचय आणि स्नेह झाला. नानांच्या स्नेह्यांपैकी काही निवडक नावे अशी : श्री. मु. रा. जयकर, मु. बा गुर्जर, ज. र. घारपुरे, अ. नी. पिटकर, ग. भा. वैद्य, विष्णुपंत नेने, प. भा. शिंगणे, अ. वा. बर्वे, ग. ल. पागे, ना. म. बाक्रे, वि. का. राजवाडे, ल. रा. पांगारकर, वि. ल. भावे, ना. चिं. केळकर, गो. कृ. देवधर, वा. गो. आपटे, धर्ममार्तंड काशीनाथ वामनशास्त्री लेले इ. भाऊशास्त्री लेल्यांचा आणि नानांचा पाठच्या भावाप्रमाणे अकृत्रिम स्नेह होता. रजा घेऊन विश्रांतीसाठी ते भाऊशास्त्र्यांकडेच घरच्याप्रमाणेच जात असत. भाऊशास्त्रीही मुंबईस नानांच्या बिऱ्हाडी उतरत. भाऊशास्त्र्यांनी केलेल्या कोटिलिंगार्चनात आणि यज्ञात नानांनी त्यांच्या घरातील जबाबदार, विश्वासू व्यक्ती या नात्याने सर्वतोपरी साहाय्य केले होते. या धर्ममार्तंडांच्या मृत्यूनंतर ( सप्टेंबर १९१८ )

' **संदेश** ' कार अ. ब. कोल्हटकरांनी नानांच्याकडून त्यांचा मृत्युलेख लिहवून घेऊन आपल्या संदेशात आवर्जून प्रसिद्ध केला. भाऊशास्त्र्यांच्या निधनोत्तर त्यांची अनेक रामबाण औषधे आणि ग्रंथ मुंबईस आपल्या घरी विक्रीस ठेवून नानांनी त्यांच्या कुटुंबातील मंडळीस सर्व प्रकारांनी मदत केली.

इतिहासाचार्य विसुभाऊ राजवाड्यांनी मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड १ ला ( पानिपत खंड ) याला जोडलेल्या विस्तृत प्रस्तावनेचे नानांनी ' **मोदवृत्ता** 'त परीक्षण लिहिले आणि ते वाचून विसुभाऊ नानांस भेटण्यास मुंबईस आले. दोघांच्या स्नेहाचा हा आरंभ! तेव्हापासून १९२६ अखेरीस निवर्तेपर्यंत विसुभाऊ नानांच्याकडे मुंबईस आणि वाईस राहण्यास येत असत. प्रस्तुत लेखकालाही जून १९२३ ते डिसेंबर १९२६ या ३-३॥ वर्षांच्या काळात राजवाडे वाईस आमच्या घरी दोनतीनदा तरी आल्याचे चांगले आठवते. ह्यांच्याविषयी वाटणारा आदर नानांनी पुढील शब्दांत व्यक्त केला आहे. " सुप्रसिद्ध इतिहाससंशोधक विद्वद्वर्य रा. रा. विश्वनाथ काशीनाथ राजवाडे हे असल्या विषयांत सध्यांच्या महाराष्ट्रीयांस खरोखर आचार्य होत. "[३५] " पैकीं पहिलीं तीन वर्षे प्रत्यक्ष मुलें पढविण्यांतच गेलीं, आणि पुढील ३३ वर्षें लेखनप्रकाशनादि व्यवसायानें राष्ट्रांतील कर्तृत्ववान् तरुण आणि समवयस्क प्रौढ अशा सर्वांस सोदाहरण शिक्षण देण्यांत लोटलीं. "[३६]

संतकवी आणि पंडितकवी यांचे चरित्रकार ल. रा. पांगारकर हेही नानांच्या घरी येणारे त्यांचे एक जुने स्नेही. " मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या संस्थापकांपैकीं पुणतांबेकर आणि नाना गद्रे यांचें माझें संघटण पुष्कळ असे. नाना गद्रे आतां मृत आहेत. मी मुंबईस कॉलेजचा अभ्यास करीत असल्या वेळेपासून त्यांच्या माझ्या वाङ्मयविषयक चर्चा अनेक वेळां झाल्या आहेत. ते वाईच्या काशीनाथशास्त्री लेल्यांचे परम मित्र आणि त्यांच्याच सारखे कर्मठ होते. ' **महाराष्ट्र महोदयाचा पूर्वरंग** ' हें त्यांचें पुस्तक त्यांच्या मताचें व व्यासंगाचें निदर्शक असून सुंदर आहे. "[३७] मराठीतील एक

३५. शिशुपालवधकथा टिप्पणी, टिप्पणीची प्रस्तावना

३६. कै. राजवाडे, चित्रमयजगत, फेब्रुवारी १९२७

३७. ल. रा. पांगारकरकृत चरित्रचंद्र, पृ. ३८५–३८६

सव्यसाची अग्रेसर वाङ्मयोपासक आणि संपादक ग. त्र्यं. माडखोलकर लिहितात : " 'इंदुप्रकाश' आणि 'केसरी' हीं पत्रें आमच्याकडे येत असत; व 'निबंधमाला,' 'निबंधचंद्रिका'...'सरस्वतीमंदिर' वगैरे मासिकांचेहि ते ( माडखोलकरांचे वडील ) वर्गणीदार होते. त्यांच्या या बहुश्रुततेमुळें कै. ना. कृ. गद्रे, कै. खंडेराव बेलसरे, कै. शिवरामशास्त्री गोरे....प्रभृति विद्वान् आणि गुणी मंडळींचा राबता[३८] आमच्याकडे असे."

## १३. विचार, त्यांची मांडणी आणि आचार :

आतापर्यंतच्या मजकुरात नानांची मते, विचार इत्यादींचे प्रसंगोपात्त दर्शन घडविले आहेच. 'महाराष्ट्रसारस्वता'च्या परीक्षणात[३९] नाना लिहितात : " आजवर आपली मायबोली जी मराठी तिची 'साठा उत्तरांची कहाणी पांचा उत्तरीं सांगितली' या न्यायाचीहि कहाणी करणारा एकहि ग्रंथ नव्हता. ती उणीव रा. भावे आणि भारत इतिहास संशोधक मंडळाचें मन्त्रीद्वय ह्यांनी बरीच वेळेवर भरून काढिली; म्हणून आपल्या सगळ्या मराठी बोलभाईच्या बाजूनें हा लेखक त्यांचे पहिल्यांदा मनापासून आभार मानीत आहे. " मयूरपंडित ह्या प्रकरणाच्या प्रारंभापासून ४८८ पृष्ठांत संपणाऱ्या शाहीर प्रकरणात ह्या ग्रंथकाराच्या लेखणीनें जी मनोहर तेजस्विता धारण केली आहे आणि त्याच्या वाणीच्या नैसर्गिक लावण्यांत जी अनेकविध शृंगाराची भर घातली आहे ती कांहीं लिहून कळवितां येणें शक्य नाहीं. " " महाराष्ट्रसारस्वताचा म्हणजे महाराष्ट्रीयांच्या संस्कृत, प्राकृत, मराठी ह्या भाषांच्या सारस्वताचा इतिहास " अशी त्यांची महाराष्ट्रसारस्वत शब्दाची व्याप्ती आहे. विजयानगरच्या नाशानंतर " मात्र सर्वत्र घोटाळाच घोटाळा माजून गेला; आणि साक्षरतेऐवजीं निरक्षरता, संस्कारत्वाऐवजीं असंस्कृतत्व हींच क्षत्रिय म्हणविणाऱ्या मराठ्यांचीं विशिष्ट लक्षणें बनलीं. " मराठेशाहीच्या विनाशाच्या अनेक कारणांमध्ये राज्यकर्त्या जातीचे निरक्षरत्व हे एक प्रमुख कारण होय अशी मीमांसा त्यांच्या तोंडून प्रस्तुत लेखकाने

३८. ग. त्र्यं. माडखोलकर : दोन तपें, पृ. ५४-५५

३९. विविधज्ञानविस्तार, एप्रिल १९२०, पृ. १४१, १४५

एकाधिक वेळां ऐकिली आहे; आणि ती उपेक्षणीय नसून विचारवंतास विचारार्ह वाटण्यासारखी खासच आहे. “ व्यवहाराच्या विशिष्ट व्यवहारावर,.... स्वतंत्र बालबोध किंवा प्रौढायोग्य असा एखादा ग्रंथ समर्थांनींहि केलेला नाहीं;....तशा ग्रंथास अधिकारी वाचकच देशांत उपलब्ध नव्हते...तसले वाचक उत्पन्न करण्याकरितां म्हणून त्यांनीं ‘ जें जें आपणांस ठावें।... ’ अशा सार्वत्रिक शिक्षणाच्या उपदेशाचा सपाटा सुरू ठेविला. सर्व जनता साक्षर व्हावी हा उद्देश निःसंशय श्रीसमर्थांस, स्वदेश, स्वधर्म आणि स्वराज्य ह्यांच्या इतकाच प्रिय होता, हें त्यांच्या एतद्विषयक उद्‌गारांवरून स्पष्ट होतें. ”४०

काही शब्दांच्या व्युत्पत्तीच्या चर्चेत राजवाड्यांचे मत गुरू म्हणून गद्र्यांस मान्य असावयास हवे या रा. वा. ना. देशपांड्यांच्या विधानास नानांनी दिलेले उत्तर असे : “ कै. राजवाडे हे मला सर्वस्वीं गुरुतुल्य आहेत याविषयीं वाद नाहीं. तथापि लीलाविग्रही परमेश्वरासहि सामान्यविग्रही मनुष्याप्रमाणें बाल्य, तारुण्य, वार्धक्य, त्याचप्रमाणें क्वचित् कदाचित् तरी स्खलनशीलता हीं असतातच असा माझा समज आहे. आणि कै. राजवाडे म्हणजे कोणी एकमेवाद्वितीय उपजतच सर्वज्ञावतारी होते अशी मात्र माझी श्रद्धा नाहीं. अशी श्रद्धा आपल्या ठिकाणीं कोणाचीहि असावी अशी त्यांचीहि

---

४०. विविधज्ञानविस्तार, मे १९२०, पा. १९२. ‘ सारस्वता ’ च्या या नानांच्या परीक्षणासंबंधी पुढील मतप्रदर्शन पाहा : “ ‘महाराष्ट्रसारस्वतां’ त महाराष्ट्रांत निर्माण झालेल्या संस्कृत-प्राकृत वाङ्मयाचा इतिहास देणें आवश्यक होतें अशी या परीक्षकाची गैरवाजवी अपेक्षा आहे. मराठी साधुकवींत जे ब्राह्मण आणि संस्कृतज्ञ होते त्यांनींच काय तें सुसंगत विचारप्रदर्शन केलें आहे आणि तेंहि सारें संस्कृतांतून घेतलेल्या उसन्या विचारांवरच आधारलेलें आहे — असा मराठींतील संतवाङ्मयाकडे पाहण्याचा या परीक्षकाचा ब्राह्मणी आणि ‘ संस्कृत ’ दृष्टिकोन आहे. ” अ. ना. देशपांडेकृत आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास, भाग पहिला, पृ. ५८९. दूषित व एकांगी म्हणून हे मत केवळ तळटीपेत दिले आहे.

कधीं इच्छा किंवा शिकवण त्यांच्या संगतींतल्यांना नसावी आणि नव्हती, असाच माझा ग्रह आहे. "[४१]

'महाराष्ट्रमहोदयाच्या पूर्वरंगा' नंतर बऱ्याच वर्षांनी १९२२ मध्ये '**महाराष्ट्रप्रभाता**' च्या आरंभी ते लिहितात : " महाराष्ट्राचा इतिहास हें केवळ नुकत्याच फुलूं लागणाऱ्या ज्ञानवल्लीचें पुष्प आहे; नव्हे ज्ञानवल्लीच्या पुष्पाचेंहि पूर्वरूप अशी अत्यंत मुग्ध कळी आहे. बारासोळा वर्षांपूर्वी तर हें त्याचें कळीपणहि पर्णांच्या देठाआड लपलेल्या मोहोराच्या मुक्या गांठीप्रमाणेंच होतें. आजहि पूर्ण विकसित फुलाचें गौरव त्या कळीला लाभलेलें नाहीं; तरी तिच्या पाकळ्यांची संख्या मोजतां येण्याच्या स्थितींत ती खचित आली आहे. "[४२]

सरकारी नोकरी त्यांनी आपद्धर्म म्हणून केली; पण ती करूनही स्वदेश, स्वधर्म आणि स्वभाषा यांची यावच्छक्य सेवा त्यांनी जन्मभर केली. त्यांचे सर्व कपडे स्वदेशी कापडाचेच असत; इतकेच नव्हे तर ते आपल्या घरी कोणतीही परदेशी वस्तू कधीही आणीत नसत. 'मोरस' साखर न खाता, महाग असली तरीही, मिळावयास लागल्यापासून ते आपल्या घरी बनारसी गुळी साखरच आणीत. दम्याची व्यथा असूनही त्यानी कधी चहा उष्टावलाही नाही. नाही म्हणावयास त्याना विडी ओढण्याची सवय होती. आठवड्यास त्याना पन्नास विडी लागे. ही सवयही लहानपणी अर्धपोटी राहावे लागल्यामुळे अगतिकतेने आपल्याला जडली, असे त्यांनी आपल्या अखेरच्या दुखण्यात मोकळेपणाने पण पश्चात्तापाच्या भरात मजपाशी सांगितले होते. अशा रीतीने विचार, उच्चार आणि आचार या त्रयीत एकरूपता आणि 'स्वत्व' राखण्याचा बाणा त्यांनी जन्मभर कुलव्रत म्हणून पाळला.

## १४. कौटुंबिक माहिती आणि मृत्यू :

नाना मोठे मातृभक्त होते. माता आणि पत्नी यांच्या बेबनावात त्यांची

४१. रा. वा. ना. देशपांडे यांस नम्र विनंती, विविधज्ञानविस्तार, ऑक्टोबर १९२८, पृ. ४३१

४२. अरविंद, मार्च १९२२, पृ. २२४

मनःस्थिती फार चमत्कारिक होई. दोघींपैकी कोणाही एकीला न दुखविण्याची अवघड कसरत त्याना करावी लागे. विवाहानंतर १५–१६ वर्षे अनपत्यतेत गेल्यामुळे मातेने त्याना दुसरे लग्न करण्याचा वारंवार आग्रह केला; परंतु नानांनी, मातृभक्त असूनही, तसे न करण्याचा आपला ठाम निर्धार तिला निक्षून वारंवार ऐकविला. इ. १९०७ पासून इ. १९२० पर्यंतच्या कालावधीत त्यांना तीन पुत्र आणि एक कन्या अशी चार अपत्ये झाली. त्यांच्यापैकी एक पुत्र जन्मानंतर तीन महिन्यांनीच निवर्तला; बाकीची तीन आज हयात आहेत. त्यांची मासिक प्राप्ती रु. ३० पासून इ. १९२३ पर्यंत मंद गतीने वाढत १२० झाली. इ. १९०८ मध्ये माता निवर्तेपर्यंत नाना आपला मासिक पगार तिच्या हाती आणि तिच्या पश्चात् आपल्या पत्नीच्या हाती न चुकता देत असत. वयाच्या ३६-३७ व्या वर्षी म्हणजे इ. १९०६-७ सालापासून त्यांच्या आनुवंशिक दम्याने डोके वर काढिले; पण युक्ताहार-विहाराने त्यानी ती हट्टी व्यथा बरीच आपल्या कह्यात ठेविली होती. शेवटी इ. १९२३ मध्ये दम्याचा जोर वाढू लागल्यामुळे आणि कचेरीची जागा कुलाबा या दूरच्या ठिकाणी गेल्यामुळे वयाची ५५ वर्षे पूर्ण होण्यापूर्वीच त्यांनी निवृत्तिपूर्व रजा घेतली आणि पत्नी-मुलांसह मुंबईस कायमचा रामराम ठोकून आपल्या जन्मभूमीस-वाईस प्रयाण केले. तेथील हवापाण्याने एकदीड वर्षात त्यांची प्रकृती बरीच सुधारली. त्यानंतर इ. १९२५-१९२९ या चारपाच वर्षांत त्यांनी पुष्कळ लेखनवाचन केले; पण इ. १९२९ च्या अखेरीस त्यांना निद्रानाशाचा विकार जडला आणि सर्व प्रकारचे औषधोपचार करूनही त्याचे पाऊल मागे आले नाही. इ. १९३३ च्या मार्चमध्ये त्यांना पक्षवाताचा झटका आला. त्यानंतर तीन चार महिन्यांनी आषाढ व. ८ शुक्रवार श. १८५५ (१४ जुलै १९३३) या दिवशी दिवसा ११-३० वाजता त्यांना देवाज्ञा झाली.[४३]

---

४३. आत्मोन्नति, दिवाळी अंक, १९३४, कांहीं साहित्यसेवक–८ (लेखक : श्री. श्री. के. नाईक) या मथळ्याने नानांचे चरित्र आले आहे. "नानांची पहिली पुण्यतिथि १ ऑगस्ट रोजीं मुंबईत दगडी घरांत, चर्नीरोड-

[ पुढील टीप पान ३५ वर ]

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या चौतिसाव्या आणि पस्तिसाव्या वार्षिक वृत्तांतात ( जानेवारी १९३२ ते डिसेंबर १९३३ ) नानांच्या मृत्यूचा दुखवटा पुढील ठरावात नमूद आहे :

" रा. रा. नारायण कृष्ण गद्रे हे ता. १४-७-३३ रोजीं कैलासवासी झाले. ही संस्था ज्या अकरा उत्साही तरुणांनीं शके १८२० सालीं स्थापन केली त्यांपैकी रा. नाना गद्रे हे एक होत. ते व्यवस्थापक मंडळाचे बरीच वर्षे सभासद होते व त्यांनीं संस्थेची अत्यंत एकनिष्ठपणानें सेवा केली होती. त्यांचा मराठी भाषेचा व्यासंग जबर होता. त्यांनीं ' महाराष्ट्र महोदयाचा पूर्वरंग ', ' मनूच फिरला ', ' प्रो. जिन्सीवाले यांचें चरित्र ' वगैरे ग्रंथहि केले आहेत. त्यांच्या ' महाराष्ट्र महोदयाचा पूर्वरंग ' या पुस्तकाचें वाङ्मयांत श्रेष्ठ स्थान असून तें त्यांच्या दीर्घ व्यासंगाची उत्तम साक्ष पटवितें. त्यांच्या वाङ्मयसेवेचें फल म्हणून त्यांना ठाणें येथील मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या ३३ व्या वार्षिक समारंभाचें अध्यक्षस्थान लाभलें होतें. अशा तऱ्हेचे एक परम व निस्सीम मित्र परलोकवासी झाल्यामुळें संस्थेचें अत्यंत नुकसान झालें आहे. "

## १५. कै. ना. कृ. गद्रे यांची ग्रंथसंपदा :

( १ ) प्याद्याचा फर्जी अथवा भोसले घराण्याचा अभ्युदय. बडोदे; दा. सा. यंदे, इंदुप्रकाश; मुंबई; १८९९; ४ + १८५; ग्रंथसंपादक व ग्रंथप्रकाशक मंडळीची पुस्तकमाला; नं. १४, रु. १
पुनर्मुद्रण १९५८, अ. वि. गृह प्रकाशन, पुणे २, मूल्य रु. २=२५

( २ ) हिंदुवा सूरज अथवा बाप्पा रावळ चक्रवर्ती. मुंबई; १९००; ४ + १८०; रु. १॥

---

[ टीप ३४ पानावरून चालू ]

वर त्यांच्या मित्रमंडळींनीं साजरी केली. " श्री. पागे, बाक्रे आणि जोगळेकर यांनी श्री. नाईकांना माहिती पुरविली. या चरित्रातील माहितीचा अवश्य तेवढा उपयोग प्रस्तुत लेखकाने येथे करून घेतला आहे ही गोष्ट मोठ्या आनंदाने आणि कृतज्ञताबुद्धीने तो मान्य करून नमूद करीत आहे.

( ३ ) श्रीमत् प्रतापसिंह काव्य, पहिला खंड, शारदाक्रीडन, मुंबई, १९०१; ४ + ४८; ·।।·

( ४ ) कै. प्रो. श्री. ग. जिन्सीवाले यांचें चरित्र, तत्त्वविवेचक मुंबई, शके १८२५, ४ + ३६; =।।·

( ५ ) महाराष्ट्रमहोदयाचा पूर्वरंग. मुंबई, तत्त्वविवेचक, १९०५, ४ + २८२, रु. १।। ( ' श्रीसरस्वतीमंदिरां 'तील प्रकरण )
सुधारित पुनर्मुद्रण, ' महाराष्ट्रप्रभाता'च्या उपलब्ध भागासह, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ, मुंबई, १९७१

( ६.) कै. पं. विष्णुपंत छत्रे यांचें चरित्र, नेटिव्ह ओपिनियन, मुंबई; शके १८२८; ८ + १३६; सचित्र; रु. १

( ७ ) मनूच फिरला ( कृष्णतनय ); मोदवृत्त; वाई; १९०६; ४ + ३८३; रु. २ ( अस्सल हिंदुसमाजाचें चित्र )

( ८ ) अक्षविपाक अथवा संगीत द्यूतविनोद नाटक; नेटिव्ह ओपिनियन; मुंबई; १९०९; ७८; ·।।·

( ९ ) कवीश्वर भास्करकृत शिशुपालवधकथा टिप्पणी; ठाणें मराठी ग्रंथसंग्रहालय; १९२७; २ + ६१; ·।।·

१६. **लेखसूची** ( ही पूर्ण नाही ) :

**श्रीसरस्वतीमंदिर :** इतिहास ( वर्ष २ ); इतिहासविकृति ( २ ); विवेकानंद ( २ ); आगाशे आणि महाराष्ट्रवाङ्मय (४); टीका, टीकाकार आणि टीकेचे विषय ( ६ ); पुराणें आणि इतिहास ( ६ ); खाडिलकरांचा मराठी हॅम्लेट ( ७ ); स्फुट-लेखसंग्रह ( ३ ); स्फुटलेखसंग्रह ( ८ );

**विविधज्ञानविस्तार** ( महाराष्ट्र साहित्यपत्रिकेसह ) :
महाराष्ट्रसारस्वत ( परीक्षण ) ५१ : ४ : १४१; ५१ : ५ : १९३. साधुकविश्रेष्ठ तुकाराममहाराज यांच्या चरित्राची काल-व्याप्ती ५१ : ९ : १०५
स्फुट लेख ५२ : १ : ११

श्रीसमर्थ रामदासकृत दासबोधांतील ग्रामणी शब्दाच्या अर्थाचा विचार ५२ : ६ : ७१; दासबोधाचा कर्ता कोण ? ५२ : ७

स्फुट लेख : श्रीशिवजन्मतिथिनिश्चय ५६ : ९ : ४३८; ५६ : ११

फाल्गुन की वैशाख ५७ : ८ : ३०५; ५७ : १२ : ४८९

शिवजन्मतिथीचा वाद ५८ : २ : ७६

शिशुपालवधकथा ५८ : ६ : २०९; ५८ : १० : ३८१

छ. संभाजीची राजमुद्रा; व्युत्पत्तिविषयक चर्चा ५९ : ७;

देशपांडे यांस विनंति ५९ : १० : ४७१

आमचा गांव, ले. १४ वा यांतील नामकरणसंस्कार ५९ : ११ : ४७७

बाजीराव बल्लाळ यांचा जन्मशक ६० : ५ : १८४

**ज्ञानांजन :**

मत्स्यगंधा ( य. ना. टिपणीसकृत ) आणि त्यांतील ऋषिपात्रें ( १ ) तुकारामबोवांनीं उल्लेखिलेला दुष्काळ कोणत्या शतकांतील असावा ? ( ३ )

# प्रस्तावना

१. ' महाराष्ट्रमहोदयाचा पूर्वरंग ' हे पुस्तक कै. नारायण कृष्ण गद्रे यांनी लिहिले व कै. महादेव केशव काळे यांनी श्रीसरस्वतीमंदिर या नियतकालिकात प्रथम श. १८२५ चैत्र ते श. १८२७ चैत्र ( वर्ष ३ अंक १ ते वर्ष ५ अंक १ ) या अवधीत क्रमशः छापून नंतर स्वतंत्र पुस्तकरूपाने इ. १९०५ मध्ये प्रसिद्ध केले. या पुस्तकाच्या प्रस्तावनेत ( पृ. ५ ते ७ मध्ये ) या पुस्तकाचा हेतू काय हे सांगितले आहे. तथापि त्यात या पुस्तकाला महाराष्ट्रमहोदयाचा पूर्वरंग हे नाव का दिले याची स्पष्टता आरंभी केलेली नाही. माझ्या मते ती स्पष्टता अशी :–शकाच्या १६ व्या शतकातल्या उत्तरार्धात किंवा इसवीच्या १७ व्या शतकाच्या दुसऱ्या व तिसऱ्या पावक्यात महाराष्ट्रातील लोकांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या नेतृत्वाखाली परकीयांशी यशस्वी लढा देऊन महाराष्ट्राचे स्वातंत्र्य प्रस्थापित केले. यास ग्रंथकर्त्याने महाराष्ट्रमहोदय म्हटले आहे. कै. म. गो. रानडे यांचा ' राइज ऑफ दि मराठा पॉवर ' हा इंग्रजी ग्रंथ इ. १९०० मध्ये प्रसिद्ध झाला. त्या ग्रंथावरून प्रस्तुत लेखकास महाराष्ट्रमहोदय हा शब्द सुचला असावा.

२. आज आमच्यापैकी काही विद्वानांस शिवाजी महाराजांनी दिलेल्या लढ्याचें स्वरूप पारतंत्र्यातून स्वतंत्र होणे असे नसून दुष्ट स्वराज्याचें सुष्ट स्वराज्य बनविणे हे होते असे वाटते. या विचारसरणीबाबत अत्यंत तीव्र मतभेद होण्यासारखा आहे. परंतु येथे त्या मतभेदाचे स्वरूप कोणत्या प्रकारचें आहे हे सांगावयाचें नसून प्रस्तुत ग्रंथकर्त्याने येथे महाराष्ट्रमहोदय हा शब्द का वापरला आहे हें जाणून घ्यावयाचे आहे. कै. रानडे किंवा कै. गद्रे यांच्या मनात शिवाजी महाराजांनी दिलेल्या लढ्यास स्वातंत्र्यसंग्राम हेच नाव योग्य आहे असे खात्रीपूर्वक वाटत होते याविषयी मला तरी काडीमात्र शंका नाही. माझ्या मनातही तो पारतंत्र्याविरुद्ध स्वातंत्र्याचा लढा होता यात तिळमात्र संशय नाही. म्हणून ग्रंथकाराने त्या लढ्यास उद्देशून ' महाराष्ट्रमहोदय ' हा शब्द वापरला आहे. हे मला मान्य आहे.

३. या लढ्यास यश का आले याचा विचार करीत असता ग्रंथकर्त्याच्या मनात लढ्याच्या पूर्वीच्या तीनशे-साडेतीनशे वर्षांचा इतिहास कसा घडत आला हे पाहण्याचें आले. ही पाहणी या ग्रंथात नमूद केली आहे. कीर्तनकार आपल्या कीर्तनाचे दोन भाग करतो. पैकी पहिल्या भागास पूर्वरंग म्हणतात. या पूर्वरंगात कीर्तनकार एखादा तात्त्विक प्रश्न घेऊन त्याचा उकल करून दाखविण्याचा प्रयत्न करतो आणि दुसऱ्या भागात त्या उकलास साजेशी कथा आख्यानरूपाने रंगवितो. या पुस्तकात पूर्वरंग हा शब्द वापरला आहे त्यावरून येथे ग्रंथकर्त्याच्या मनात ती कल्पना असावी असा सकृद्दर्शनी कुणाचाही ग्रह होईल. पण तो बरोबर ठरणार नाही. पुस्तकाच्या नावात उदय शब्द आहे; तेव्हा येथे स्वातंत्र्यसूर्योदयाची कल्पना आहे. शिवाय कै. गद्रे यांनी या ग्रंथाला पुरवणी म्हणून जे लेख लिहिले त्यांस त्यांनी महाराष्ट्रप्रभात हे नाव दिले आहे. तेव्हा येथे पूर्वरंग हा शब्द प्रभातापूर्वीचा किंवा पहाटेपूर्वीचा काळोख अशा अर्थाने कै. गद्रे यांनी वापरला आहे असेंच समजले पाहिजे.

४. प्रस्तुत ग्रंथात आरंभी सूचनारूपाने ( १ ) परिशिष्टात घालण्यासारखा दीड पृष्ठाचा मजकूर असून त्यापुढे सव्वादोन पृष्ठांचा प्रस्ताव दिला आहे. नंतर सर्व ग्रंथगर्भ ( १ ) शालिवाहनाचें तेरावे शतक ( पृ. ३ ), (२) शालिवाहनाचें चौदावे शतक ( पृ. ६२ ) आणि, (३) मराठ्यांचा मुसलमानी राजकारणात विशेष प्रवेश आणि राष्ट्रास उदयोन्मुख करणाऱ्या सत्पुरुषांचा—संतांचा उदय ( पृ.१५६ ), अशा तीन प्रकरणांत विभागला आहे. तथापि मूळ पुस्तकात पृष्ठांचे मथळे समपृष्ठास श्रीसरस्वतीमंदिर व विषमपृष्ठास महाराष्ट्रमहोदयाचा पूर्वरंग असे आहेत. शालिवाहनाचे तेरावे शतक, चौदावे शतक, पंधरावे शतक व सोळावे शतक हे मथळे नव्याने दिले आहेत. पहिल्या प्रकरणात ज्ञानदेव व त्यांच्या प्रभावळीतील निवृत्तिदेव, सोपानदेव, मुक्ताबाई, जनाबाई, नामदेव, गोरा कुंभार, विसोबा खेचर, जगमित्र, चोखामेळा, इत्यादि संत, तसेच यादव-राजवंशाचा ऱ्हास व नाश, माधवाचार्य उर्फ विद्यारण्य, सायणाचार्य, विजयनगरची स्थापना, कोंढाण्यावरील नाग नायकाचा मुसलमानांस प्रतिकार व त्याचा पाडाव, बहमनी राज्याची स्थापना हे विषय आले आहेत दुसऱ्या प्रकरणात चौदाव्या शतकात होऊन गेलेले बहमनी सुल्तान व विजयनगरचे सम्राट यांच्या हकीगती देऊन त्याशिवाय श्रीपादवल्लभ, नृसिंहसरस्वती-

दुर्गादेवीचा दुष्काळ आणि दामाजीपंत यांची विस्ताराने माहिती दिली आहे. तिसऱ्या प्रकरणांत बहमनी सुल्तान व विजयनगरचे सम्राट यांचे हर्षामर्षप्रसंग, पोर्तुगीजांचे भारतात आगमन व त्यांचे उपद्व्याप, चांगा मुधेश, भानुदास, तालिकोटची लढाई, राघवचैतन्य व केशवचैतन्य, जनार्दनपंत व एकनाथ, दासोपंत, महालिंगदास आणि त्र्यंबकराज यांची हकीकत आली आहे. महाराष्ट्रप्रभात या परिशिष्टात मुख्यतः एकनाथ व त्याचे पूर्वज, वंशज आणि त्यांचे ग्रंथ यांची विस्ताराने माहिती दिली आहे.

५. हे पुस्तक प्रसिद्ध झाले त्या वेळी दक्षिणेतील मुसलमानी शाह्या, तसेच विजयनगरचे साम्राज्य व भारतात पोर्तुगीजांच्या सत्तेची स्थापना यांची माहिती देणारे पुढील इंग्रजी-मराठी ग्रंथ प्रकाशित झाले होते. ( १,२ ) फिरिश्त्याच्या तारीख–इ–फिरिश्ता किंवा गुल्शन–इ–इब्राहीमी अथवा नवरसनामा या ग्रंथाच्या काही भागांचे सारांश देणारे व बाळाजी प्रभाकर मोडक यांनी लिहिलेले बाहामिनी ऊर्फ ब्राह्मणी राज्याचा इतिहास ( इ. १८९१ ) आणि दक्षिणेतील मुसलमानी राज्यांचा इतिहास भाग ३ ( इ. १८९१ ); ( ३ ) मोडक व वझे यांचा विजापूरच्या आदिलशाही घराण्याचा इतिहास ( इ. १८८६ ); ( ४ ) फिरिश्त्याचे ब्रिग्जकृत चतुःखण्डात्मक इंग्रजी भाषांतर ( इ. १८२९ ); ( ५ ) तबातबाईच्या बुर्हान-इ-मासिर या ग्रंथाचे बहमनी वंशापुरते मेजर किंग याने केलेले इंग्रजी भाषांतर; ( ६ ) जोनाथन स्कॉटने केलेल्या फिरिश्त्याच्या तिसऱ्या खंडाचा इंग्रजी अनुवाद; ( ७ ) सेवेलकृत ए फरगॉटन एम्पायर; ( ८ ) डॅन्व्हर्सकृत पोर्तुगीज इन इंडिया; ( ९ ) व्हाइटवेकृत राइज ऑफ पोर्तुगीज पॉवर इन इंडिया; ( १० ) द कुञ्ह्य यांचे दि ओरिजिन ऑफ बॉम्बे ( ११ ) विजयनगरच्या विध्वंसाची बखर ( श्रीसरस्वती-मंदिर अंक १४). तसेच हे पुस्तक क्रमशः प्रसिद्ध होत असताना व त्यापूर्वी गुरुचरित्र, ज्ञानेश्वरादि संतांचे गाथे इत्यादि पुस्तके निरनिराळ्या प्रतींच्या रूपांनी प्रकाशित झाली होती.

६. हे ग्रंथ प्रस्तुत ग्रंथापूर्वी प्रकाशित झाले असले तरी हे सर्व प्रस्तुत ग्रंथकाराने पाहिले होते की नाही याविषयी शंका येते. मुख्यतः इंग्रजी ग्रंथ कै. गद्रे यांच्या वाचनात–विशेषतः मननात–आले असते तर त्यांच्या हातून या ग्रंथात विशेषनामांचे उच्चार व कालनिर्देश यांच्या ज्या चुका झाल्या

आहेत त्या झाल्या नसत्या. दुर्दैवाने कै. गद्रे यांनी यादवांचा ऱ्हास व नाश, मुसलमानी शाह्या, विजयनगरचें साम्राज्य यांचा इतिहास नेमक्या कोणत्या ग्रंथांच्या आधारे लिहिला तेही कोठे दर्शविलेले नाही. याशिवाय महाराष्ट्रीय संत व ग्रंथकार यांची माहिती व त्यांच्या ग्रंथातील उतारे देताना त्यांनीं कोणत्या ग्रंथांच्या कोणत्या प्रती वापरल्या हे कोठेच नमूद केलेले दिसत नाही; यामुळे त्यांच्या विधानांचे आधार नेमके कोठे शोधले असता सापडतील याचा थांगपत्ता लागत नाही. आज शक १८९३ च्या काळात शास्त्रीय ऐतिहासिक पुस्तके लिहिण्याच्या ज्या पद्धती ठरल्या आहेत किंवा ज्या त्या काळीही शास्त्रीय पद्धतीने लिहिलेल्या ग्रंथांमध्ये अस्तित्वात होत्या, त्यांचा विचार करता या पुस्तकाची लेखनपद्धती सदोष आहे हे सांगितले पाहिजे. पण ज्या काळी हे पुस्तक लिहिले गेले त्या काळी लौकिक ( Popular ) ग्रंथलेखनाची जी पद्धती होती तीच पद्धत या पुस्तकात अवलंबिली आहे. तथापि ज्या एका विचारप्रणालीतून या पुस्तकाची रचना झाली ती ध्यानात घेता या पुस्तकास आलेले लौकिक स्वरूप ठीकच आहे असे मानले पाहिजे. येथे ग्रंथकर्त्यास इतिहास सांगावयाचा नसून इतिहासातून निघणारा अर्थ प्रकट करावयाचा होता. यामुळे येथे घटितकथन पुष्कळ केले असले तरी त्यास दुय्यम स्थान आहे हे लक्षात घेऊन या अशास्त्रीय लेखनपद्धतीकडे दुर्लक्ष केले पाहिजे. माझ्या अभ्यासात दिसून आले आहे की, उपरिनिर्दिष्ट ग्रंथांपैकी क्र. ४, ७, १०, ११ या ग्रंथांचा प्रस्तुत पुस्तकात भरपूर उपयोग केला आहे.

७. ‘ महाराष्ट्र महोदयाचा पूर्वरंग ’ हे पुस्तक मी प्रसंगवशात् मागे एकदोनदा चाळले होते. त्यात दिलेल्या महालिंगदासकृत विक्रमबत्तीशीतील उतारा किंवा चांगा मुधेशाच्या चरित्रासंबंधीचे उतारे मी पाहिले होते. महालिंग-दासाच्या मताचा मी माझ्या महाराष्ट्र-धर्म या विषयावरील एका इंग्रजी लेखात आणि चांगा मुधेशाच्या भागाचा माझ्या श्रीविठ्ठल आणि पंढरपूर या पुस्त-काच्या तिसऱ्या आवृत्तीत उपयोगही केलेला आहे. त्यावरून हे एक बऱ्यापैकी पुस्तक असावे असा माझा ग्रह झाला होता. तथापि मी पुष्कळ दिवस अथपासून इतिपर्यंत सर्व पुस्तक पूर्णतया वाचून पाहिले नव्हते. ज्या वेळी या पुस्तकाचे संपादन मी करावे असे ‘ महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ ’ याने मला सुचविले, तेव्हा ती सूचना मान्य करण्यापूर्वी मी एकदा

सर्व पुस्तक वाचून काढले. ते वाचन संपल्यावर माझा या पुस्तकाविषयीचा पूर्वग्रह तसाच कायम राहिला. यामुळे मी या पुस्तकाचे संपादन करण्याचे काम पत्करले. त्या मंडळास मी माझी अनुमति कळविल्यावर या पुस्तकाचे अधिक आलोडन करू लागलो. त्या वेळी पुस्तकातील पुढे दिलेले दोष माझ्या लक्षात आले. ( १ ) या पुस्तकात आलेल्या–विशेषतः मुसलमानी व ख्रिश्चन –नावांचे उच्चार अशुद्ध किंवा सदोष आहेत; मग ती नावे स्थलांची असोत की व्यक्तींची ( २ ) या पुस्तकात घटनांचे दिलेले काल कित्येक ठिकाणी चुकलेले आहेत. ( ३ ) हे पुस्तक सामान्यतः क्राऊन आकाराच्या २८२ ( आता ३३४ ) पृष्ठांचे असले तरी यास अनुक्रमणिकाही नव्हती व सूचीही नव्हती. अनुक्रमणिका असती तर सूचीची तहान तिजवर अंशतः भागविता आली असती. ( ४ ) या पुस्तकात दिलेले उतारे आणि इतर माहिती कोणत्या ग्रंथांच्या कोणत्या प्रतींवून घेतली याचा पत्ता लागत नाही. सध्याच्या काळात लौकिक ग्रंथातही ग्रंथकार आपला ग्रंथ कोणत्या प्रकाशित ग्रंथांच्या आधारे लिहिला ते सांगतो आणि संशोधनी ग्रंथात तर संशोधक आपल्या प्रत्येक विधानाला आधार देत असतो. त्यात ग्रंथकार, त्याच्या ग्रंथाचे नाव, विकल्पाने ग्रंथाचा प्रकाशक, ग्रंथाचे प्रकाशनस्थल व ग्रंथाचा प्रकाशनकाल इत्यादि देऊन शिवाय एखाद्या ग्रंथाच्या विविध प्रती निघाल्या असल्यास आपण त्यांपकी कोणती वापरली हेही सांगण्यास चुकत नाही. परंतु हा ग्रंथ वाचीत असता ग्रंथकाराने आपल्या विधानांस जागोजाग तर आधार दिलेले नाहीतच; पण आपण कोणत्या ग्रंथांच्या आधारे हा ग्रंथ तयार केला हेही कुठे सांगितले नाही. उदा. ग्रंथकाराने गुरुचरित्र, चैतन्यविजय, बालबोध, सिंहासन-बत्तिशी, चांगा मुधेश आख्यान इत्यादि मुद्रित व अमुद्रित ग्रंथांतील कित्येक उतारे घेतले आहेत. पण ते उतारे कोणत्या अध्यायात किंवा ग्रंथाच्या कोणत्या पृष्ठावर आहेत हे प्रत्येक ठिकाणी संपूर्णतया नमूद केलेले नाही. प्रस्तुत पुस्तक पूर्णतया प्रकाशित होईपर्यंत ( इ. १९०५ ) कै. शं. ग. दाते यांच्या मराठी ग्रंथसूचीप्रमाणे गुरुचरित्राच्या २, ज्ञानदेवांच्या गाथेच्या २, संपूर्ण नामदेवा गाथेच्या ३ व तीपैकीं बाळक्रीडेच्या २ आणि ज्ञानदेव समाधीची १ अशा-प्रती निघाल्या होत्या. पण चैतन्यविजय, बालबोध, सिंहासन–विक्रमबत्तीशी हे ग्रंथ प्रकाशित झाले नव्हते असे ठरू पाहते. पण ही माहिती कितपत अचूक

आहे याविषयी संशय येतो. उदा० कामतांनी आपल्या गुरुचरित्राच्या प्रस्तावनेत त्या ग्रंथाच्या विविध मुद्रित प्रतींची माहिती दिली आहे तीवरून इ. १९०५ पर्यंत गुरुचरित्राच्या निदान १० तरी आवृत्ती प्रकाशित झाल्या होत्या असे म्हणता येते; पण सूचीकारांनी यापैकी कामतांस मिळालेली एक आणि कामतांना न मिळालेली एक अशा केवळ दोनच प्रती नोंदल्या आहेत. हीच गत गाथ्यांची व इतर ग्रंथांची झाली नसेल का अशी शंका येते. उपर्युक्त सूचीप्रमाणे व प्रत्यक्ष पाहिले असता चैतन्यविजय व बालबोध हे दोन्ही ग्रंथ स्वतंत्रतेने श. १८३५ ( इ. १९१३ ) मध्ये प्रकाशित झाले; श. १८२७ ( इ. १९०५ ) मध्ये प्रसिद्ध झाले नव्हते. पण प्रस्तुत पुस्तकात या दोन ग्रंथांतील इतके उतारे घेतले आहेत व ते छापील पाठांशी इतके एकरूप आहेत की, कै. गद्रे यांनी ते हस्तलिखितांवरून घेतले असतील असे वाटत नाही. तेव्हा त्यांजपाशी या पुस्तकांच्या छापील प्रती असाव्या. पैकी चैतन्यविजय हा ग्रंथ काव्यसंग्रहाच्या १३० व १३१ या दोन अंकांत चैतन्यविजयकल्पतरु या नावाने छापलेला आढळतो व कै. गद्रे यांनी तसे आपल्या पुस्तकात पृ. २६५ वर या पुस्तकाचे नाव केशवचैतन्यकल्पतरु असे देऊन नमूद केले आहे. झाडून सारे छापील जुने मराठी काव्य—त्याच्या विविध आवृत्ती-प्रति असल्यास त्यांसह—एका गावी एकत्र मिळण्याची महाराष्ट्रात कुठेही सोय नाही; हे विद्येचे माहेरघर समजल्या जाणाऱ्या पुण्याच्या अनुभवावरून समजण्यास हरकत नाही. ( ५ ) कै. गद्रे यांच्या लिखाणात मला आणखी एक दोष आढळला. ते आपल्या लिखाणास काही वेळा पूर्वसूरींच्या ग्रंथांचा आधार देतात. पण तो कुठे तरी मधेच देतात. उदा० १६४ व्या पृष्ठावर ७ व्या परिच्छेदात त्यांनी पोर्तुगीजांच्या भारतातील प्रथमागमनाची माहिती प्रथमच दिली आहे. ही माहिती डॅन्व्हर्स किंवा व्हाइटवे यांच्या ग्रंथांतून घेतली असेल अशी माझी साहजिक कल्पना झाली. म्हणून हिच्या आधारासाठी प्रथम मी त्यांचे ग्रंथ पाहिले. पण त्यांत ही माहिती सापडेना. तेव्हा काहीशा निराशेनेच द कुञ्ज्य यांचे दि ओरिजिन ऑफ बॉम्बे हे पुस्तक चाळले. तेव्हा त्याच्या ६९ व्या पृष्ठावर ती माहिती सापडली. पण प्रस्तुत पुस्तकाचा निर्देश मात्र कै. गद्रे यांच्या पुस्तकात २११ व्या पृष्ठावर आल्याचे आढळले. कै. गद्र्यांनी राघव चैतन्य व केशव चैतन्य यांची माहिती पृष्ठ २३२ ते २६५यांत

दिली आहे. पण ही माहिती ज्या केशवचैतन्यकल्पतरु ग्रंथातून घेतली त्याचा उल्लेख २६५ पृष्ठावर केला आहे.

८. यामुळे मी अगदी पहिले काम करण्याचे ठरविले ते हे की, ग्रंथकाराने कोणते ग्रंथ वापरले असतील त्याचा अंदाज बांधणे आणि तो अंदाज बांधल्यावर त्या ग्रंथांतील माहिती या ग्रंथातील माहितीशी कितपत जुळते हे तपासणे; पण हे काम इतके वेळखाऊ होऊ लागले की, थोडेसे काम केल्यानंतर मी तो प्रयत्न सोडून दिला आणि या पुस्तकाच्या संपादनासाठी एक निराळीच पद्धती अवलंबिण्याचा उपक्रम केला. तिचे स्वरूप असे—( १ ) मला ज्या व्यक्तिनामांचे उच्चार अशुद्ध स्वरूपात पुस्तकामध्ये आले आहेत असे वाटले ती नामे पृष्ठानुक्रमाने उतरून काढली आणि त्यांच्या शुद्ध उच्चारांची सूची तयार केली. ( २ ) या पुस्तकात काही वंशावळी, त्या वंशावळींतील पुरुषांच्या राज्यकालांसह दिल्या आहेत. त्या वंशावळींत व त्यांमध्ये दिलेल्या कालात चुका झाल्या आहेत असे दिसल्यावरून मी अद्ययावत् संशोधनाने ठाऊक झालेल्या वंशावळी त्यांतील व्यक्तींच्या कालांसह दिल्या आहेत ( ३ ) पुस्तकात जागो-जाग लहान-मोठ्या घटनांचे काल दिले आहेत. त्यांतील काही काल चुकले आहेत, काही अचूक आहेत, तर काहींविषयीं शंका आहेत. तेव्हा प्रत्येक कालनिर्देशाची चर्चा करीत न बसता नवीन संशोधनाने सत्यप्राय ठरलेल्या कालांची व तत्संबद्ध घटनांची सूची दिली आहे. हे काम करीत असता मला असे आढळले की, कै. गद्रे यांनी मुसलमानी कालाची हकीकत देताना मुख्यतः फिरिश्त्याच्या इ. १८२९ साली प्रकाशित झालेल्या ब्रिग्जच्या भाषांतराचा उपयोग केला आहे, मोडकांच्या अनुवादाचा निश्चित केलेला नाही. कारण एक तर मोडकांच्या पुस्तकात आलेली मुसल्मानी कालनिर्देशांची खिस्ती रूपांतरे व या पुस्तकांतील रूपांतरे यांत पुष्कळ ठिकाणी भेद आहेत. शिवाय मुसल्मानी व्यक्तिस्थलनामांच्या उच्चारात भिन्नता आहे. फिरिश्त्याचा उपयोग करताना त्यांनी काही सुधारणाही केल्या आहेत. तथापि, त्यांनी केवळ फिरिश्त्याच्या भाषांतराचाच उपयोग केला असे नाही. विजयनगरकर राजे व बहमनी सुल्तान यांचे राज्यकाल आणि त्यांच्या हर्षामर्षांचे कथन याबाबत त्यांनी सेवेलकृत ' ए फरगॉटन एम्पायर ' या पुस्तकाचाही पुष्कळ उपयोग केला आहे.

९. आता या ग्रंथावर जेथल्या तेथे टीपा देतो तर अनेक व्यक्ति-

स्थलकालांवर पृष्ठोपृष्ठी त्या आल्या असत्या, त्यांची पुनरावृत्ती झाली असती व काही टीपांनी मूळ कथन झाकोळून टाकिले असते; कसे ते दोन–तीन उदाहरणे देऊन स्पष्ट करतो.

( १ ) प्रस्तुत ग्रंथाच्या आरंभी सूचना या मथळ्याखाली सुमारे दीड पृष्ठाचे लेखन आहे. यात पंढरपुराहून विठ्ठलाची मूर्ती विजयनगरला नेली असता ती भानुदासांनी परत आणली या मुद्याची चर्चा आहे. या चर्चेत पुस्तककर्त्याने पुस्तकाच्या १९३ व्या पृष्ठावर भानुदासाने विजयनगरहून विठ्ठलाची मूर्ती परत पंढरपुरास आणली इत्यादी वृत्तांतास प्रत्यंतर पुरावा नाही, असे म्हटले आहे. पण तसा पुरावा कै. राजवाडे यांनी ग्रंथमालेत चौऱ्यायशीचा शिलालेख संपादन करीत असता दिला आहे, असे सांगून राजवाड्यांच्या लेखातील सातव्या आकड्याचे उद्धरण केले आहे. ग्रंथमालेच्या कोणत्या अंकात चौऱ्या-यशीच्या लेखाचे संपादन केले होते हे मला, मी ग्रंथमालेची दोन पुस्तके पाहिली; पण त्यांवरूनही समजू शकले नाही. ग्रंथमालेत कै. राजवाड्यांनी प्रसिद्ध केलेल्या लेखाचा मथळा, ‘ पंढरपूरच्या विठोबाच्या देवळांतील चौऱ्या-यशीचा शिलालेख ’ असा आहे. कै. गद्रे यांनी घेतलेला उतारा या लेखाच्या ५२ व ५३ या पृष्ठांवर आहे. या उताऱ्यात हंपी येथील एका शिलालेखाचा पाठ दिला आहे. याची भाषा कानडी असून ती कै. गद्रे व कै. राजवाडे यांना येत नसल्यामुळे शिलालेखाच्या पाठात चुका झाल्या आहेत किंवा कै. राजवाड्यांनी जेथून शिलालेखाचा पाठ घेतला तेथेच चुका झाल्या असण्याचा संभव आहे. ते काही असले तरी या लेखात विठ्ठलाची मूर्ती पंढरपुराहून विजयनगरास नेली; पण भानुदासाने ती पंढरपुरास परत आणली; या दोन विधानांपैकी कोणतेही विधान आलेले नाही. या लेखात कृष्णदेवराय व त्याच्या राण्या यांनी विठ्ठलाचे अंगरंगभोग व विविध उत्सव यांसाठी काही दाने दिल्याचे सांगितले आहे. परंतु कानडी भाषेच्या अज्ञानामुळे दोघांनाही त्या लेखाचे अचूक तात्पर्य उमगले नाही. या लेखाचा पाठ कै. राजवाड्यांना कोठे पाहावयास मिळाला हे त्यांनी सांगितलेले नाही. परंतु हा लेख आता साउथ इंडियन इन्स्क्रिप्शन्स या मालेच्या नवव्या खंडाच्या दुसऱ्या भागात ४९१ क्रमांकाने प्रकाशित झाला आहे.

( २ ) बहमनी सुल्तान फीरूझशाह व त्याचा काही काळ समकालीन

असलेला विजयनगर सम्राट पहिला देवराय यांच्या समकालात घडली या समजुतीने सांगितलेली एका मुलीची गोष्ट आहे. तिजमध्ये असलेले मतभेद असे–

| | | |
|---|---|---|
| फिरिश्ता मूळ फार्सी पाठ, मुंबई प्रत ( १।५९९ ); नवल किशोर प्रत ( १।३१२ ). सोनाराची मुलगी व पर्थाल हे नाव | ब्रिग्जचा फिरिश्ता ( २।३८० ) सोनाराची मुलगी व नेहाल ( Nehal ) हे नाव. | स्कॉट्चा फिरिश्ता (१।८२) शेतकऱ्याची मुलगी व पेर्ताल (Pertal) हे नांव. |

बुर्हान–इ–मासिरमध्ये ही गोष्टच दिलेली नाहीं. कै. गद्रे यांनी आपल्या पुस्तकात पृ. ७४ वर मुलीची गोष्ट सांगण्यास प्रारंभ केला आहे. तेथे ती शेतकरी किंवा सोनार याची मुलगी होती म्हणून नमूद केले; पण तिचे नाव गाळले आहे. आता वर दिल्याप्रमाणे मुलीचा बाप शेतकरी होता असे स्कॉटने सांगितले आहे तर सोनार होता असे फिरिश्ता म्हणतो. स्कॉटचा उतारा सेवेलने आपल्या पुस्तकात घेतला आहे ( पृ. ५७ ). पण या मुलीच्या माहितीसाठी कै. गद्रे यांनी स्कॉटचा अनुवाद पाहिला असेल असे वाटत नाही. उलट त्यांनी आपली माहिती सेवेल वरून घेतली आहे याविषयी शंकाच नाही. याच ७४ व्या पृष्ठावर बुक्करायाच्या शेवटच्या दानपत्राचा काळ दिला आहे. तो त्यांनी सेवेलच्या ५६ व्या पृष्ठावरून उतरून घेतला आहे. याच पुस्तकाच्या ६५, ६६ पृष्ठांवर विजयनगरकर राजे व सम्राट् आणि बहमनी सुल्तान यांच्या त्यांतील व्यक्तींच्या राज्यकालांसह वंशावळी दिल्या आहेत; त्या सेवेलच्या पुस्तकात ४०४ ते ४०७ या पृष्ठांवर दिलेल्या वंशावळींचा शंभर टक्के अनुवाद आहे. पण याच पुस्तकाच्या १६३ व्या पृष्ठावर राज्यकालांसह दिलेली वंशावळ सेवेलच्या पुस्तकात १८० व्या पृष्ठावर दिलेल्या वंशावळींची अंशत: नकल आहे. या पुस्तकाच्या ८० व्या पृष्ठावर आलेल्या होजमल्ल किंवा अधिक शुद्ध रूप भुजमल्ल ( कदाचित् भुजबळ असेही असेल ) याची हकीकत कै. गद्रे यांनी श. १३२८ (इ. १४०६) मध्ये व देवराय–फीरूझ यांच्या राज्यकालात घातली आहे. पण फिरिश्त्याने भुजमल्लाची हकीकत दुसरा बहमनी सुल्तान मुहम्मद आणि विजयनगर सम्राट कोणी कृष्णराय

यांच्या राज्यकालात हि. ७६७ ( इ. १३६६ ) च्या सुमारास घडली असे सांगितले आहे ( फि २।३१४, ३१५ ). सेवेलने फिरिश्त्याचा काल मान्य केला. पण त्या वेळी विजयनगरास १ ला बुक्क राज्य करीत असल्याने त्याच्या राज्यकालांत घातली ( से ३६, ३७ ). कै. गद्रे यांनी या हकीकतीचा काळ अडतीस वर्षांनीं पुढें नेला आहे. पण त्यास आधार दिसत नाहीं. मी वर कदाचित् भुजबळ नाव असेल असे म्हटले आहे त्यास आधार सेवेलने आपल्या पुस्तकात पृ. ३७ वर दिलेल्या स्कॉटच्या उताऱ्यातील हुजमलराय या नावाचा देता येईल. ब्रिग्जने हेच नाव भुजमल असे दिले आहे. यांपैकी हुजमलराय फार्सीमध्ये अशा तऱ्हेने लिहिले जाते की, त्याचा उच्चार विशेष अडचण न पडता भुजबलराय असा करता येईल. असो. याच पर्थाल मुलीच्या गोष्टीची पुढील हकीकत सांगताना तीत देवरायाला आपल्या एका मुलीचे फीरूझशाह बहमनीशी सोहळ्याने लग्न करावे लागल्याचे नमूद केले आहे. सोहळ्याचें वर्णन फार्सी ग्रंथात आहे. पण लग्नाची वाटाघाट चालू असता कै. गद्र्यांनी मुलीच्या हीनकुलत्वाविषयी जी माहिती दिली आहे किंवा मुलीच्या फीरूझशाहाच्या जनानखान्यात जाण्याविषयी अनुकूल विचारांचे जे उच्चारण केले आहे त्यास फार्सी ग्रंथात आधार नाही. तेथे कै. गद्र्यांमधील कादंबरीकार जागा झाल्याचे दिसते; किंवा साधारणतः अशाच प्रकारची कथा हम्मीरमहाकाव्य या संस्कृत ग्रंथात आली असून तीमधील हम्मीर, त्याचा किल्ला रणथंभोर, त्यास अला-उद्दीन खल्जीने घातलेला वेढा, त्याची मुलगी देवलदेवी हिची त्याने केलेली मागणी, तिने सामान्यतः असेच विचार प्रदर्शित करून अलाउद्दीनाकडे जाण्यास दाखविलेली अनुकूलता इत्यादि हकीकतीवरून घेतली असेल. या काव्यात हम्मीराने मुलगी देण्याचे नाकारले असे आहे. येथे देवरायाने आपली मुलगी दिली. पण ती उपस्त्रीची म्हणजे हीनकुलीन मुलगी होती असे गद्र्यांनी नमूद केले आहे. सारांश, कै. गद्रे यांनी या पुस्तकात केवळ काही ग्रंथांचा अनुवाद केला आहे असे नसून इतिहासातील घटना घेऊन त्यांत आपले विचार व कल्पना यांची भर घालून त्यांचा अर्थ लावण्याचा प्रयत्न केला आहे ( भारत इतिहास संशोधक मंडळ त्रैमासिक वर्ष १२, पृ. ८८ ).

( ३ ) या पुस्तकाच्या सामान्यतः २५१ पृष्ठापासून तालीकोट अथवा राक्षसतागडीच्या लढाईचे व तिच्या परिणामांचे कथन करण्यास प्रारंभ झाला

आहे. एतद्विषयक हकीकत मुख्यतः विजयनगर विध्वंसाच्या म्हणजेच ताली-कोट–राक्षसतागडीच्या लढाईच्या बखरीतून घेतली आहे. या बखरीचे आता एक मराठी व एक कन्नड असे दोन पाठ उपलब्ध झाले आहेत ( वि; शावे २।२६३ ). त्यांची कोष्टकरूपाने, पण थोडक्यात माहिती अशी—

| मराठी पाठ | कन्नड पाठ |
| --- | --- |
| १. सुमारे ४००० शब्द | सुमारे ६५०० शब्द |
| २. अनादि, पण सांत | साद्यंत |
| ३. आरंभ नाही. | ' रा रा स्वामी यांस ' असा आरंभ. |
| ४. लेखकाचे नाव नाही. | लेखक : सेवानुसेवक रामाजी तिरमल हरकारे. |
| ५. आरंभी काल नाही. | आरंभी श. १४८६, रक्ताक्षी, वैशाख बहुल ८, असा काल. |
| ६. शेवटी शेवटी ' रक्ताक्षी, वैशाख बहुल ८, सोमवार, श्रवण नक्षत्र, १० वे तासी, रामराजाने जीव दिल्हे ' असे वाक्य. | मराठीप्रमाणेच काल; पण १० व्या तासाचा अनुल्लेख व राजभुवर मुक्त झाला अशा अर्थाचे वाक्य. |
| ७. यापुढे निम्नलिखित व्यक्ति–काल-निर्देश. ( अ ) आजी तागाईत छ २५ माहे मोहरम रोज चारी संदेस (संवेस) लिहुन् पाठविले असे अंबाजी कामदि जासूद व नाईकवाडी रोशन करिता मालूम होईल. ( आ ) हे बखेर मोर्तुब जहाले बिकलम वेंकटाद्री तक्रेल निसिदा पा संपगाऊ सो हुवेली ( इ ) याचे तालीक लिहून घेतले वेंकाजी नारायण कुलकरणी क म क ल स दा ( बा–हा ) व डे अनंदनाम संवछरे फाल्गुण सुद बीज दिवसा लिहून मोर्तब केले. ( ई ) ताजा कलम अप्पा ( ण्णा ) जी जोशी | यापुढे ' क्रोधी, आषाढ बहुल ८, मंगळवार, रामराजाची बखैयर संपूर्ण ' असे वाक्य. |

मोकदमा [पाठीवर*] मामले परंडा
मोर्तब ( सुद ) + ( तेरी )
ख छ ११ माहे जमादिलाखर सन
हजार १०९५ संपूर्ण.

मराठी पाठात लढाईपूर्वी रामराजाने सैन्यात होन वाटले त्यांची नावे व त्यांच्या संख्या दिल्या आहेत. त्यांत २० नावे व एक कोटी तेवीस लक्ष सत्तावन हजार चारशे अकरा होन अशी संख्या आली आहे. नंतर लढाईसाठी तयार केलेली घोडे, हत्ती, हत्तिणी, कुत्रे, इत्यादि जनावरे आणि बंदुकी, बाण व लहान-मोठी भांडी ( तोफा ), नदीटोकरे, हुक्के, दारू, इ. सामान व बंदुकी, प्यादे, इटे-भालेकरी, एकांगवीर, लोहार, हुनर्वंद, पाणवुडे, इत्यादिकांची संख्या दिली आहे. पुढे ९० हत्तींची नावे दिली आहेत. नंतर निजामशाह, कुत्बशाह आणि रामराजा उर्फ राजभुवर यांजकडील मेलेले, जखमी व पाडाव झालेले यांची नांवे दिलीं आहेत. त्यांची संख्या २४ भरते. पण याच तपशीलात दोन्ही बाजूंचे अगणित लोक पडले असे सांगितले आहे. नंतर राजभुवराने १५ पाळ्यांवर १५ लोक पाठविले त्यांची नावे दिली आहेत. कानडी पाठात वर दिलेला सर्व तपशील संख्यांसह आलेला आहे. पण त्यात प्रत्येक ठिकाणी वाढ झालेली दिसून येते. याशिवाय कन्नड पाठात १८ कारखाने, १२ महल, १२ बलुते, दोनदा २२ विनियोग, ६४ विद्या, ५६ देश, दोनदा अढाणे कार, यांचाही तपशील दिला आहे. यामुळे कन्नड पाठ वाढला आहे. दोन्ही पाठात अंतर्भूत असलेल्या विषयांची तुलना केली तर साम्यापेक्षा वैषम्येच अधिक असे वर वर पाहणारासही आढळून येते. या दोन्हीं पाठांत अरबी-फार्सी शब्दांची इतकी भरमार आहे की, हे दोन्ही पाठ विजयनगरच्या परिसरात तयार होणे अशक्यच आहे. हे पाठ बहुधा विजापुरास तयार झाले असावेत. यात दिलेले कालोल्लेख पंचांगाशी ताडून पाहिले तर ते अगदी अनियमित म्हणजे चुकलेले आहेत असे दिसते. दोन्ही पाठांत अनेक कानडी, मराठी व मुसलमान व्यक्तींची नावे आली आहेत. त्यांत प्रत्येक प्रकारची नावे किती आली आहेत हे तपासले तर मराठी व मुसलमान व्यक्तींची नावे कितीतरी अधिक आहेत असे आढळते. कन्नड पाठात ठार झालेल्यांमध्ये मुरारी घोरपडे व हिंदूराव अशी दोन नावे आली आहेत. ही दोन्ही नावे शिवकालोत्तर आहेत हे सहज

ध्यानात येईल आणि कन्नड पाठाचा काल ठरवण्यास त्यांचा उपयोग होईल. मला वाटते की, मराठी पाठ प्रथम तयार झाला आणि कन्नड पाठ वाढला असल्यामुळे तो नंतर तयार झाला. दोन्ही पाठ राक्षसतागडीच्या लढाईच्या वेळेस तयार झाले असणे अशक्यच आहे. कदाचित् मराठी पाठ १७ व्या शतकाच्या शेवटच्या पावक्यांत आणि कन्नड पाठ १८ व्या शतकाच्या २ ऱ्या पावक्यात तयार झाला असावा. दोन्ही पाठ इतके उत्तरकालीन असल्यामुळे त्यांतील माहितीवर विश्वास कितपत ठेवावयाचा हा प्रश्नच आहे. फिरिश्ता व तबातबा या मुस्लिम ग्रंथकारांनी आपल्या ग्रंथांत या लढाईची माहिती दिली आहे. ते या बखरीच्या मानाने लढाईच्या कालाशी अधिक जवळचे म्हणजे लढाई-नंतर सुमारे ४० ते ५० वर्षांनी झालेले आहेत. त्यांच्या लिखाणातही विसंगती आहेच. मग या बखरींमध्ये विसंगती आढळल्यास आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. तेव्हा ही बखर आजच्या अवस्थेत प्रमाणभूत मानणे उचित ठरणार नाही.

राक्षसतागडीच्या लढाईचा शेवट अळिय रामराजाच्या मृत्यूने झाला हे सर्वमान्य आहे. पण तो केव्हा झाला याविषयी फार मोठा मतभेद आहे. या पुस्तकात पृष्ठ २५८ वर हिंदू राज्य श. १४८६ च्या मार्गशीर्ष–पौषाच्या ( २५ जानेवारी सन १५६५ ) लढाईने नाहीसे झाले असे म्हटले आहे. म्हणजे लेखकाच्या मते रामराजा वरील दिवशी मारला गेला. ही तारीख त्यांनी ब्रिग्ज ३।४१४ वरून घेतली आहे. तेथे मुळात हि. ९७२ जखर २० शुक्रवार असा काळ दिला आहे. त्याचे ख्रिस्ती रूपांतर तारीख प्रमाण धरली तर इ. १५६५ जानेवारी २३ मंगळवार असे होते. म्हणजे ब्रिग्जचे रूपांतर चुकले आहे. वार प्रमाण धरावा तर मागच्या–पुढच्या शुक्रवाराशी जुळती ख्रिस्ती तारीख १९ व २६ जानेवारी अशी येईल. तारीख-इ-मुहम्मद कुली कुत्बशाहीचा अज्ञात लेखक आणि हदीकतुल्आलमचा लेखक यांनी जखर २० ही तारीख दिली आहे. हिचे ख्रिस्ती रूपांतर इ. १५६५ जानेवारी २३ मंगळवार असे येते. दोन्ही ठिकाणी वार दिलेला दिसत नाही. तबातबाने आपल्या बुर्हान-इ-मासिरमध्ये या लढाईची तारीख शुक्रवार जखर २ अशी दिली आहे. बुर्हान-इ-मासिरचे भाषांतर करताना हेगने एके ठिकाणी हिचे रूपांतर जानेवारी ७ हे दिले आहे; तर दुसरे ठिकाणी जानेवारी ४ असे दिले आहे ( इंडियन ॲंटिक्वेरी खंड ५०, पृष्ठ १४६, १९४ ).

पण पिल्ले जंत्रीप्रमाणे वास्तव रूपांतर इसवी १५६५ जानेवारी ५ शुक्रवार असे येते. डॉ. कुंटे यांच्या लक्षात हा दोष आलेला नाही. त्यांनी ७ जानेवारी अचूक असेल असे समजून आपल्या वरील पुस्तकात ती घालून टाकली आहे. ( अहमदनगरची निजामशाही पृष्ठ १३५ ). द्राविडी भाषांत असे एकही साधन नाहीं की ज्यामध्ये वरील तारखेशी जुळती अशी एखादी तारीख दिली आहे. केळदिनृपविजयम् या ग्रंथात 'श. १४८७ रक्ताक्षी माघ बहुल' एवढाच कालनिर्देश केला आहे (पृ. ६७). चालू शक वर्ष १४८७ शी जुळता रक्ताक्षी संवत्सर येतो. वर दिलेली जखर २ ही मुसल्मानी तारीख माघ महिन्यात पडते; पण तेव्हा शुद्ध पक्ष येतो. जखर २० ही तारीख माघ वद्यात पडते; पण येथे हे लक्षात ठेवले पाहिजे की, केळदिनृपविजयम् हा ग्रंथ इ. १७७० च्या सुमारास म्हणजे राक्षसतागडीची लढाई झाल्यानंतर सुमारे २०० वर्षांनी लिहिला गेला आहे. तेव्हा तेथे आलेले शक वर्ष, माघ मास, वद्य पक्ष, हा तपशील कदाचित् फिरिश्ता या मुसलमान इतिहासकाराच्या ग्रंथातील कालाचे रूपांतर करून घातला असणे शक्य आहे. जुन्या ऐतिहासिक घराण्यात अनेक ठिकाणी हिजरी किंवा सुहूर सनाशी जुळती शकवर्षे आणि मुसल्मानी महिन्यांशी जुळते हिंदू महिने यांची जंत्री केल्याचे आढळले आहे. तसेच कोणत्याही मुसल्मानी महिन्याच्या साधारणतः चौदाव्या तारखेपासून २९ तारखेपर्यंतच्या तारखा हिंदू महिन्यांच्या वद्य पक्षात पडतात हे कालज्ञानी मनुष्याच्या रोजच्या परिपाठात होते. तेव्हा 'केळदिनृपविजयम्'चा कर्ता बसवभूपाल याने दिलेला काल फिरिश्त्यावरून घेतला असण्याचा संभव आहे. या ग्रंथाखेरीज इतर कानडी साधनांत आलेली माहिती ही एकमेकांशी विरोधी आहे हे शावे खंड १ पृष्ठ २७९–२८१ यांत स्पष्ट केले आहे. बखरीच्या दोन्ही पाठांत अळिय रामराजा रक्ताक्षी संवत्सर वैशाख बहुल ८ सोमवार श्रवण नक्षत्र या वेळी मेला म्हणजे लढाई संपली असे सांगितले आहे. हा काल रक्ताक्षी ऐवजी त्याच्या पुढले संवत्सर क्रोधी घ्यावयाचे एवढा फरक केला तर जंत्रीप्रमाणे अचूक आहे. पण याचा अर्थ दोन्ही पाठांच्या लेखकांना रामराजाच्या मृत्युकालाचे अचूक ज्ञान नव्हते असा होतो. फरक मान्य केला म्हणजे त्याशीं जुळती खिस्ती तारीख इ. १५६५ एप्रिल २३ सोमवार ही येते. अर्थात् हिंदू मिति मुसलमानी तारखेनंतर सुमारे तीन महिन्यांनी येते

याचा अर्थ लढाई तीन महिने चालली असे धरावे लागेल. ते अगदीच अशक्य नसले तरी संभवनीय वाटत नाही.

१०. या पुस्तकात दिलेली प्रत्येक घटना व तिचा लावलेला अर्थ यांची अशा प्रकारे छाननी करू गेलो असतो तर माझ्या लिखाणाचा विस्तार प्रस्तुत पुस्तकाएवढाच झाला असता. ते अपेक्षित नव्हते असे वाटते.

११. याच संदर्भात आणखी एक मुद्दा लक्षात घेण्यासारखा आहे. न्यायमूर्ती रानडे यांचा मराठी सत्तेचा उदय हा ग्रंथ घटितकथन व घटितार्थ-विवेचन या दोन्ही दृष्टींनी प्रस्तुत ग्रंथापेक्षा सरस आहे. तथापि गेल्या ६०।७० वर्षांतील संशोधनाने एवढी नवी माहिती उपलब्ध झाली आहे की, ह्या ग्रंथाच्या घटितार्थविवेचनात तर फरक करावा लागेलच; पण घटितकथनातही जागोजाग उणे–अधिक करावे लागेल. अगदी तशीच किंवा त्याहून काकणभर अधिकच परिस्थिती या ग्रंथाची आहे. तेव्हा हा ग्रंथ वाचताना त्यांतील घटित-कथनाकडे अधिक लक्ष न देता अर्थविवेचनावर लक्ष केंद्रित करावयाचे आहे.

१२. आता या पुस्तकाचे संपादन व प्रकाशन कसे होत आले याविषयी आवश्यक ती माहिती येथे देतो. या पुस्तकाचा संदर्भ देणे सोपे जावे, त्यात निराळ्या आवृत्तीमुळे पृष्ठांचा बदल झाल्याने घोटाळा होतो तो टळावा म्हणून हे पुस्तक जसेच्या तसे म्हणजे पृष्ठास पृष्ठ व ओळीस ओळ छापण्याचा प्रयत्न केला आहे. यात पृष्ठास पृष्ठ छापणे बहुतेक ठिकाणी साध्य झाले; ओळीस ओळ छापणे कितपत साध्य झाले हे तपासून पाहिलेले नाही. मी मूळ कल्पना अशी केली होती की, प्रत्येक परिच्छेदास क्रमांक देऊन परिच्छेदवार टीपा देत जाव्या आणि प्रत्येक परिच्छेदातील विषयाचा निर्देश अनुक्रमणिकेत करावा. पण परिच्छेदवार विवरणात्मक टीपा देतो तर वर सांगितल्याप्रमाणे टीपाही पुस्तकाइतक्याच पृष्ठांच्या झाल्या असत्या व त्यांत वर सांगितलेले दोषही उत्पन्न झाले असते. म्हणून तो बेत सोडून द्यावा लागला आणि विशेषनामांचे शुद्ध उच्चार, संदर्भ, संदर्भ–ग्रंथसूची, कालपट, वंशावळी, आटोपशीर अनुक्रमणिका आणि सूची एवढ्या बाबी देऊन आवरते घेतले. कै. गद्रे यांनी त्यांच्या या ग्रंथाची पुरवणी म्हणून महाराष्ट्रप्रभात नावाचा एक विस्तृत लेख लिहिला. तो या ग्रंथास परिशिष्ट म्हणून जोडणे उचित वाटल्याने तसे केले आहे कै गद्रे यांचे चरित्र कोठे तरी

विस्ताराने येणे आवश्यक होते. त्यांचे चिरंजीव प्रा. रा. ना. गद्रे यांनी ते लिहून दिले. तेही या आवृत्तीस जोडले आहे. ग्रंथगर्भ व परिशिष्ट यांची मुद्रणप्रत त्यांनीच करून दिली. तीवरून प्रस्तुत पुस्तक छापले आहे. उरलेले काम मी केले आहे. सूचीच्या प्राथमिक चिठ्या साहित्य आणि संस्कृति-मंडळाच्या येथील सेवकांनी केल्या. त्या वर्णानुक्रमाने लावणे, त्यांचे एकत्रीकरण करून व त्या तपासुन शुद्ध प्रत तयार करणे मी केले. प्रस्तावना, उच्चार-शुद्धि, संदर्भग्रंथ-सूची, संदर्भ, कालपट, अनुक्रमणिका इत्यादि कामे मी करीत असता माझा पुतण्या चि. सुनील दिवाकर खरे याने पुष्कळच सहाय्य केले. तेही येथे नमूद करतो.

पुणे; श. १८९३ आषाढ शुद्ध ११ (४–७–७१) ग. ह. खरे

# संदर्भग्रंथ व त्यांचे संक्षेप

यापुढे मी या पुस्तकाच्या संपादनासाठी वापरलेल्या ग्रंथांची सूची देत आहे. हीविषयी पुढील दोन विशेष ध्यानात ठेवावयाचे आहेत. ( १ ) या सूचीत कै. गद्रे यांनी वापरलेले व न वापरलेले अशा दोन्ही प्रकारच्या ग्रंथांचा समावेश केला आहे. ( २ ) प्रथम मी त्यांनी कोणते ग्रंथ वापरले हे पाहण्याचा प्रयत्न केला. पण आपण कोणते ग्रंथ वापरले याचा त्यांनी काही ठिकाणी उल्लेख केला, तर बहुतेक ठिकाणी केलेला नाही. यामुळे त्यांच्या या ग्रंथांतील कोणता अंश कोणत्या ग्रंथांच्या व त्यांच्या कोणत्या प्रतींच्या सहाय्याने लिहिला हे अनेक ठिकाणी समजत नाही. या सूचीत दिलेल्या काही ग्रंथांच्या निराळ्या प्रती त्यांनी वापरल्या आहेत हे उघड आहे.

कि = किंग मेजर जे. एस्. : दि हिस्ट्री ऑफ दि बहमनी डिनॅस्टी; लंडन, इ. १९००; आकडा पृष्ठाचा. बुर्हान-इ-मासिर या ग्रंथातील बहमनी अंशाचे इंग्रजी भाषांतर; हे प्रथम इंडियन अँटिक्वेरी या नियतकालिकाच्या २८ व्या खंडात क्रमशः प्रकाशित झाले ( इ. १८९९ ) व नंतर वरील स्वतंत्र पुस्तकाच्या रूपाने प्रकाशित झाले. रफीउद्दीन शीराझीच्या तज्किरतुल्-मुल्क या ग्रंथाचा अगदी निर्देशात्मक सारांश यांत दिला आहे. कै. गद्रे यांनी या पुस्तकाचा उपयोग केल्याचे आढळले नाही. अलीकडे डॉ. भ. ग. कुंटे यांनी बुर्हान–इ–मासिर या फार्सी ग्रंथातील अहमदनगरची निजामशाही व बहमनी या दोन सल्तनतींच्या इतिहासाचे अनुक्रमे हेग व किंग यांनी केलेले इंग्रजी अनुवाद मराठीत भाषांतरित करून दोन स्वतंत्र पुस्तकांच्या रूपाने प्रकाशित केले आहेत. अभ्यासकाच्या दृष्टीने दोन्ही पुस्तके पूर्णतया निरुपयोगी असल्याचे मला आढळून आले आहे.

कु = कुंटे अ. मो. : ज्ञानेश्वरी; मुंबई, इ. १८९४.

के = हेग सर वूल्स्ले : केंब्रिज हिस्ट्री ऑफ इंडिया; ३ रा खंड, केंब्रिज, इ. १९२८; आकडा पृष्ठाचा. या पुस्तकात पहिल्या ६४० पृष्ठांमध्ये

सामान्यत: मुघल रियासत सुरू होईपर्यंतचा मुसलमानकालीन भारताचा इतिहास सांगितला असून ६६४ ते ६८४ पृष्ठांत या इतिहासात आलेल्या काल-निर्देशांची एकत्र इसवी सनात मांडणी केली आहे. ६८७ ते ७१५ या पृष्ठांत वरील कालात होऊन गेलेल्या राजघराण्यांच्या वंशावळी दिल्या आहेत. हे तिन्ही अंश प्रस्तुत पुस्तकाच्या अभ्यासाला उपयुक्त आहेत.

**ख** = खरे ग. ह. : विजयनगर सम्राट् कृष्णदेवराय; पुणे, इ. १९५१.

**गु** = कामत रा. कृ. : श्रीगुरुचरित्र; तिसरी आवृत्ती, मुंबई, ढवळे प्रकाशन, श. १८८८ ( इ. १९६६ ). कै. गद्रे यांनी गुरुचरित्राची कोणती प्रत वापरली होती हे कोठे नमूद केलेले नाही. प्रस्तुत पुस्तकापूर्वी गुरुचरित्राच्या निरनिराळ्या प्रती प्रकाशित झाल्या होत्या. मी वरील प्रत वापरली आहे. गुरुचरित्राच्या इतर प्रतींत एखादी दुसरी ओवी पुढे-मागे झालेली असण्याची शक्यता आहे. १ ला आकडा अध्यायाचा व २ रा ओवीचा.

**चा**=भावे वि. ल. : चांगदेवचरित्र; महाराष्ट्र कवि नियतकालिक ठाणे, श. १८२६ ( इ. १९०४ ); पहिला आकडा अध्यायाचा व दुसरा आकडा ओळीचा.

**चै** = राजर्षि वा. बा. : चैतन्यविजय; मुंबई, इ. १९१३; पहिला आकडा अध्यायाचा व २ रा आकडा ओवीचा. मी येथे वरील पुस्तक वापरले आहे. पण कै. गद्रे यांनी काव्यसंग्रह अंक १३० व १३१ यांमध्ये प्रसिद्ध झालेल्या केशवचैतन्यकल्पतरु या ग्रंथाचा उपयोग केला आहे. चैतन्य विजय व केशवचैतन्यकल्पतरु हे दोन्ही ग्रंथ एकच आहेत.

**डॅ** = डॅन्व्हर्स एफ्. सी. : दि पोर्तुगीज इन इंडिया; लंडन, इ. १८९४; दोन खंड; पहिला आकडा खंडाचा व दुसरा पृष्ठाचा. हा ग्रंथ कै. गद्रे यांनी पाहिला होता की नाही याविषयी निश्चयात्मक सांगता येत नाही.

**त्रि** = चांदोरकर गो. का. : बालबोध; धुळे, श. १८३५ (इ. १९१३); पहिला आकडा पृष्ठाचा व दुसरा आकडा त्या पृष्ठावरील ओवीचा. मी येथे या प्रतीचा उपयोग केला आहे. मूळ ग्रंथात यास बालावबोध असे म्हटले आहे. कै. गद्रे यांनी पुस्तक लिहिले त्या वेळी हा ग्रंथ प्रसिद्ध झाला होता की नाही हे समजत नाही. बहुधा प्रसिद्ध झाला नसावा. त्यांनी उद्धृत केलेल्या ओव्या

एखाद्या हस्तलिखित प्रतीवरून घेतल्या असाव्या. दाते सूचीमध्ये तरी उपर्युक्त मुद्रित प्रतीचाच उल्लेख आहे. मुद्रित प्रत व कै. गद्रे यांनी वापरलेली प्रत यांमध्ये क्वचित ओव्या पुढेमागे झाल्या आहेत.

दकु = द कुञ्ज्य जोस गेरसाँ : दि ओरिजन ऑफ बॉम्बे; मुंबई, इ. १९००. याच पुस्तकाला कै. गद्रे यांनी 'मुंबईची पूर्वपीठिका' असे नाव दिले आहे. गद्रे यांनी पोर्तुगीजांची माहिती देताना बहुतेक ठिकाणी या पुस्तकाचा उपयोग केला आहे.

फि = ब्रिग्ज जॉन : हिस्ट्री ऑफ दि राइज ऑफ दि महॉमेडन पॉवर इन इंडिया=फिरिश्त्याचे इंग्रजी भाषांतर; चार खंड, पहिला आकडा खंडाचा व २ रा पृष्ठाचा. मी येथे कलकत्त्यास १९०८ ते १९१० च्या दरम्यान प्रसिद्ध झालेली प्रत वापरली आहे. पण ही प्रत इ. १८२९ मध्ये प्रसिद्ध झालेल्या प्रतीचे यथातथ्य पुनर्मुद्रण आहे. एवढे की, येथे दिलेले खंड व पृष्ठ यांचे आकडे इ. १८२९ च्या प्रतीशी जसेच्या तसे जुळतात. इ. १८२९ ची प्रत मुंबईच्या एशियाटिक सोसायटीमध्यें आजही पहावयास मिळते. जोनाथन स्कॉटने आपल्या 'हिस्ट्री ऑफ दि डेक्कन' या द्विखंडात्मक ग्रंथाच्या पहिल्या खंडात ब्रिग्जच्या दुसऱ्या व तिसऱ्या खंडात आलेल्या बहमनी, आदिलशाही, निजामशाही, कुत्बशाही, इमादशाही व बरीदशाही अशा सहा सल्तनतींची माहिती दिली आहे.

भा = एकनाथी भागवत; महाराष्ट्र शासनाची प्रत, मुंबई, श. १८९२ (इ. १९७१); १ ला आकडा अध्यायाचा व २ रा आकडा ओवीचा. कै. गद्रे यांच्या वेळी एकनाथी भागवताच्या निरनिराळ्या प्रती निश्चित उपलब्ध असतील. त्यांपैकी त्यांनी कोणती प्रत वापरली हे कोठे सांगितलेले नाही. मी वापरलेली प्रत व त्यांनी वापरलेली प्रत यांमध्ये एखादी दुसरी ओवी पुढे मागे झालेली आहे.

भि = भिंगारकर श्री. र. : श्रीज्ञानदेवचरित्र; पुणे, श. १८०८ (इ. १८८६). या पुस्तकात काही प्राचीन लेख उद्धृत केले आहेत. पण ते मूळ स्वरूपात कोणीच पाहिलेले नसल्यामुळे त्यांच्या प्रामाणिकपणाविषयी संशय येण्यासारखी परिस्थिती आहे.

**मसा** = भावे वि. ल. व तुळपुळे शं. गो. : महाराष्ट्र सारस्वत; ५ वी आवृत्ती, पुणे, श. १८८५ (इ. १९६३). मूळ ग्रंथ कै. भावे यांनी लिहिला असून त्याचीं ८२८ पृष्ठे आहेत. श्री. तुळपुळे यांनी जोडलेल्या पुरवणीची २५० पृष्ठे त्यांपुढे आहेत.

**रा** = राजवाडे वि. का. : ज्ञानेश्वरी; आगाशे प्रत, मिरज, इ. १९२४; १ ला आकडा अध्यायाचा व २ रा ओवीचा. कै. गद्रे यांनी पुस्तक लिहिले त्या वेळी राजवाड्यांची ज्ञानेश्वरी प्रसिद्ध झाली नव्हती. परंतु कै. गद्रे यांनी उद्धृत केलेल्या ओव्यांपैकी काही कुंटे ज्ञानेश्वरीशी तर काही राजवाडे ज्ञानेश्वरीशी जुळतात. राजवाडे ज्ञानेश्वरीशी काही ओव्या जुळणे हा बहुधा काकतालीय न्याय असेल.

**रुक्मिणीस्वयंवर** : जोग संपादित, पुणे, १९३५ (इ. १९१३).

**वि** = विजयनगरचा विध्वंस; ही बखर प्रथम 'श्रीसरस्वतीमंदिर'च्या १४ व्या [ =वर्ष ४, अंक ५ (४) = श. १८२६ ] आश्विन या अंकात १ ते १६ या पृष्ठांत कै. गो. का. चांदोरकर यांच्या नावाने छापली असून ती पुन: भारत इतिहास संशोधक मंडळाच्या द्वितीय संमेलनवृत्तात पृष्ठ १६९–१८२ मध्ये त्यांच्याच नावे प्रकाशित केली आहे. मला 'श्रीसरस्वतीमंदिर 'चा तो अंक पाहावयास मिळाला. दोन्ही ठिकाणच्या बखरींचे पाठ सामान्यतः एकरूप आहेत. पण श्रीसरस्वतीमंदिरातील पाठात बरीच अशुद्धे राहिल्याने तो शुद्ध करून द्वितीय संमेलनवृत्तांत पुन: छापला असे तेथे नमूद केले आहे. बखरीचा आरंभीचा काही भाग सापडलेला नाही. शेवट मात्र पूर्ण आहे. ही बखर शावे खंड २ मधील कन्नड बखरीच्या पाठाशी, तसेच शावेच्या ३ ऱ्या खंडात दिलेल्या इंग्रजी अनुवादाशी ताडून पाहिली तर मराठीपेक्षा इंग्रजी अनुवाद अधिक मोठा आणि कानडी पाठ त्याहूनही मोठा असे दिसते. या दोनही पाठांचा अभ्यास एका स्वतंत्र लेखाचा विषय होऊ शकेल.

**व्हा** = व्हाइटवे आर. एस्. : दि राइज ऑफ पोर्तुगीज पॉवर इन इंडिया; १ली आवृत्ती, इ. १८९९; २ री आवृत्ती, कलकत्ता, इ. १९६७. पहिली आवृत्ती १८९९ साली प्रसिद्ध झाली असली तरी कै. गद्रे यांनी ती पाहिली असेल असे दिसत नाही. मी दुसऱ्या आवृत्तीचा उपयोग केला आहे.

**शास्त्री** = शास्त्री के. ए. नीलकंठ आणि वेंकटरमणय्य एन्.: फर्दर सोर्सेस ऑफ विजयनगर हिस्ट्री; ३ खंड, मद्रास विद्यापीठ, १९४६. फार पूर्वी एस्. के. अय्यंगार यांनी संपादिलेला सोर्सेस ऑफ विजयनगर हिस्ट्री हा ग्रंथ मद्रास विद्यापीठाने इ. १९१९ मध्ये प्रकाशित केला. त्यानंतर पुढील २५-२६ वर्षांत उपर्युक्त विद्वानांनी विजयनगरच्या इतिहासासंबंधी आणखी साधने जमविली व ती तीन खंडांत प्रकाशित केली. याच्या १ ल्या खंडात त्या साधनांवरून समजणारा इतिहास दिला. २ ऱ्या खंडात संस्कृत, तमिळ, कन्नड, तेलुगु, मल्याळम् आणि फार्सी या भाषांतील साधनांचे पाठ त्या त्या साधनांच्या लिपीत प्रकाशित केले आणि ३ ऱ्या खंडात या साधनांचा इंग्रजी अनुवाद प्रकाशित केला. या तीन खंडांच्या प्रकाशनामुळे विजयनगरच्या इतिहासातील राजवंश, कालपट, इत्यादींचे अधिक सूक्ष्म, अचूक व तपशील-वार ज्ञान मिळते. ही सेअची सुधारलेली आवृत्ती आहे असे म्हणण्यास हरकत नाही.

**शे** = शेरवानी एच. के.: दि बहमनीज ऑफ दि डेक्कन; हैद्राबाद, इ. १९५३. हे पुस्तक परिश्रमपूर्वक तयार केले आहे. पुस्तकाच्या शेवटी बहमनी समयाचा कालादर्श दिला आहे. तसेच त्या वंशात झालेल्या सुल्तानांची वंशावळ विस्ताराने दिली आहे. यात प्रतिपादिलेली मते मात्र सर्वांना पटतीलच असे नाही.

**स** = जोशी का. अ.: सकलसंतगाथा; पुणे, इ. १९६७. १ ला आकडा खंडाचा, २ रा आकडा विशिष्ट संताच्या अभंगांच्या पृष्ठाचा व ३ रा आकडा त्या पृष्ठातील अभंगाचा. या गाथ्याचे दोन खंड असून त्यांमध्ये अनेक संतांचे स्वतंत्र पृष्ठांनी व स्वतंत्र क्रमांकाने अभंग दिले आहेत. पहिल्या खंडात निवृत्तिनाथ, ज्ञानेश्वर, सोपानदेव, मुक्ताबाई, चांगदेव, नामदेव व तद्वंशीय, जनाबाई आणि सुमारे अठरा इतर संत यांचे अभंग दिले आहेत. कै. गद्रे यांचे वेळी यांपैकी बहुतेकांचे अभंग निरनिराळ्या प्रतींच्या रूपाने उपलब्ध होते. पण त्यांनी आपल्या पुस्तकासाठी कोणत्या प्रती वापरल्या हे सहज समजू न शकल्याने मी उपर्युक्त प्रतीचा उपयोग केला आहे.

**से** = सेवेल रॉ.: ए फरगॉटन एम्पायर = विजयनगर साम्राज्याचा इतिहास; लंडन, इ. १९००. कै. गद्रे यांनी या पुस्तकाचा मुक्त हस्ताने उपयोग केला

आहे. त्यांनी आपल्या पुस्तकात दिलेल्या विजयनगर सम्राटांच्या वंशावळी, त्यांचे राज्यकाल, इत्यादी जशाच्या तसे आपल्या पुस्तकात उतरून घेतले आहेत. अनेक ठिकाणी माहितीही जशीच्या तशी उतरून घेतली आहे. या ग्रंथात विजयनगरसमकालीन मुसल्मानी शाह्यांची माहिती देताना ब्रिग्ज व स्कॉट या दोघांनीही केलेल्या फिरिस्ताच्या भाषांतरांचा उपयोग केला आहे.

**सेअ** = सेवेल रॉ. व अय्यंगार एस्. के. : दि हिस्टॉरिकल इन्स्क्रिप्शन्स ऑफ सदर्न इंडिया; मद्रास, इ. १९३२. हे पुस्तक म्हणजे दक्षिण हिंदुस्थानचा इसवी सनात तयार केलेला कालपट असून यात इसवीपूर्व २५० ते इसवी १८७६ पर्यंत दक्षिण हिंदुस्थानांत घडलेल्या महत्त्वाच्या घटनांची ३१७ पृष्ठांत कालानुक्रमाने नोंद केली आहे आणि पुढे सुमारे ८५ पृष्ठांत दक्षिण हिंदुस्थानांत होऊन गेलेल्या राजकुलांच्या विस्तृत वंशावळी दिल्या आहेत. यांत दक्षिण हिंदुस्थानच्या इतिहासाचा सांगाडा उभा केला आहे असे म्हणण्यास हरकत नाही. इतिहासाभ्यासकांच्या दृष्टीने या पुस्तकाची योग्यता फार मोठी आहे.

# संदर्भ

या पुस्तकात निरनिराळ्या ग्रंथांतून कित्येक उतारे घेतले आहेत. त्यांपैकी ज्यांचा माग लावता आला, त्यांचे संदर्भ येथे दिले आहेत. हा माग लावताना कित्येक संदर्भ अगदी लवकर सापडले तर कित्येक संदर्भ पुष्कळ शोधाशोधी केल्यावर हाती आले, उलट आणखी काही उद्धरणे खूप शोध घेऊनही सापडली नाहीत. जी उद्धरणे सापडली नाहीत त्यांचे संदर्भ येथे दिले नाहीत. याचा अर्थ हा नव्हे की, त्यांसाठी प्रयत्नच केले नाहीत. प्रयत्न पुष्कळ केले; पण त्यात यश आले नाही असे येथे समजावयाचे आहे. हे संदर्भ देण्यासाठी मी जे ग्रंथ वापरले ते संदर्भग्रंथसूचीत दिले आहेत. काही वेळा तर संदर्भ पाहाण्यास उपयोगी असे ग्रंथ प्रयत्न करूनही हाती आले नाहीत. कै. गद्रे यांनी ग्रंथांच्या ज्या प्रती वापरल्या त्याच मला मिळाल्या असे नाही. शिवाय अभंगांच्या ओळींच्या क्रमात विविध प्रतीत बदल झालेला आढळतो. तसेच कै. गद्रे यांनी कित्येक ठिकाणीं सबंध अभंग न देता त्यांतील कारणापुरत्या ओळी उतरल्या आहेत. अशा प्रसंगी उताऱ्याचा माग लावणे अधिकच कठीण गेले.

| पृष्ठ | ग्रंथनाम | संदर्भ |
|---|---|---|
| ३ | ज्ञानेश्वरी | रा. १८।१७८३ |
| ७ | नामदेवगाथा ( स ) | १।२११।१२५४ |
| १० | ज्ञानेश्वरी | १८।शेवट |
| ११ | नामदेवगाथा ( स ) | १।१३६।९१४ |
| ,, | ,, | १।१३६।९१५ |
| ,, | ,, | १।१३८।९२१ |
| ,, | ,, | १।१३८।९२२ |
| ,, | ,, | १।१४०।९२८ |
| १७ | ज्ञानेश्वरी | कु. १८।१६३७ |
| ,, | ,, | ,, १८।१६४२ |
| ,, | ,, | ,, १८।१६४३ |
| ,, | ,, | ,, १८।१६४४ |
| ,, | ,, | ,, १८।१६४५ |

| पृष्ठ | ग्रंथनाम | संदर्भ |
|---|---|---|
| १७ | ज्ञानेश्वरी | कु. १८।१६४६ |
| ,, | ,, | ,, १८।१६४७ |
| १७ | ज्ञानेश्वरगाथा ( स ) | १।२२।१५८ |
| १८ | ज्ञानेश्वरी | कु. १८।१७०९ |
| ,, | ,, | ,, १८।१७२१ |
| ,, | ,, | ,, १८।१७३० |
| ,, | ,, | ,, १८।१७३६ |
| ,, | ,, | ,, १८।१७३७ |
| ,, | ,, | ,, १८।१७४७ |
| ,, | ,, | ,, १८।१७८० |
| १९ | नामदेवगाथा ( स ) | १।२०२।११९४,११९५ |
| २० | ,, | १।२०५।१२१४ |
| २१ | ,, | १।२२०।१२९५ |
| २२ | ,, | १।२१५।१२७५ |
| २३ | ,, | १।२२८।१३३२ |
| २९ | ,, | १।२२५।१३२४ |
| ३२ | ,, | १।३४३।२१४७ |
| ३४ | ,, | १।४५०।२७९ |
| ३५ | ,, | १।४५०।२७१ |
| ३६ | ,, | १।३५८।२२५२ |
| ४९ | ,, | १।१२०।८०९ |
| ५१ | ,, | १।२९९।१८३९ |
| ५२ | ज्ञानेश्वरी | कु. ३।७७–८० ८४, ८८, १४५, १७०, १७१ |
| ५३ | ज्ञानेश्वरगाथा ( स ) | १।६७।४६६ |
| ६२ | श्रीगुरुचरित्र | २।१३९, १४० |
| ६८ | ,, | ५३।३६, ३७ |
| ७० | ,, | १।४१, ४२ |

| पृष्ठ | ग्रंथनाम | संदर्भ |
|---|---|---|
| ९९ | गुरुचरित्र | ९।२८, ३०, ३२, ३५, ३८, ४८ |
| १०० | ,, | ११।१४–१९ |
| १०१ | ,, | ११।८१ |
| १०३ | ,, | ११।९५, ९६, ९९–१०३ |
| १०५ | ,, | १२।६४ |
| १०६ | ,, | १२।९१, ९२, ९६, ९७ |
| १०९ | ,, | १४।१२, १७ |
| ११४, ११५ | ,, | २५।६–१६ |
| ११८ | ,, | २५।६१–६४ |
| ११८–१२० | ,, | २६।२२२–२३३, २३६–२४० |
| १२२ | ,, | २७।५१ |
| १२२, १२३ | ,, | २८।४–६, ९ |
| १२८, १२९ | ,, | ३६।५५, ५६, ६०; ६२, ६५, ६६, ६८, ७२, ७३, ७५, ७६, ७८ |
| १२९ | ,, | ३७।१२–१५ |
| १३० | ,, | ३७।१८–२२, २८ |
| १३२, १३३ | ,, | ५०।२३, २४, २६, ४१, ४३. |
| १३४, १३५ | ,, | ५०।१७९, १८४, १९०, १९२, १९३, २३३, २३४ |
| १३६ | ,, | ५१।३६, ३७ |
| १६८ | चांगदेवचरित्र | ७।१४०, १४१, १५१ |
| १६९ | ,, | ५।१७, १८, २२–२६ |
| १७० | ,, | ५।४१–४९ |

| पृष्ठ | ग्रंथनाम | संदर्भ |
|---|---|---|
| १७१ | चांगदेव चरित्र | ५।७२–७७ |
| १७२ | ,, | ५।९८–१००, १०३, १०७–१०९, १२० |
| १७२ | ,, | ६।१०५ |
| १७३ | ,, | ६।५३–५५ |
| १७४ | ,, | ६।७६–७९ |
| १७५ | ,, | ६।१५२–१५५ |
| १७६ | ,, | ७।४३–४८, ५१, ८२ |
| १७७ | ,, | ७।९२–९४ |
| १७८ | ,, | ७।१२५–१२८ |
| २३३ | चैतन्यविजय | १।८० |
| २३४ | ,, | १।८१–८५, ८९, ९० |
| २३५ | ,, | २।१२, १७–१९ |
| २३६ | ,, | २।२०–२४ |
| २३७ | ,, | २।४१ |
| २३८, २३९ | ,, | १।३८–४७; २।४८ |
| २४०, २४१ | ,, | ३।२६, ४५, ५०, ५१, ५७ |
| २४२ | ,, | ३।७२ |
| २४३ | ,, | ३।७६–७९, ८३, ८४ |
| २४४, २४५ | ,, | ३।९५–१०० |
| २६९, २७० | विक्रमबत्तिशी | |
| २७१ | ,, | २०–२३, ३५ |
| २७२ | ,, | ३७, ४५–५१ |
| २७२, २७३ | बालबोध | ७, ८।८०–८५, ९३, ८६–८९ ९६–९८, १०७, ७२, ७३ |

| पृष्ठ | ग्रंथनाम | संदर्भ |
|---|---|---|
| २७४, २७५ | बालबोध | २३५।८८, ९१–९४, ९६, ९७ |
| २७६, २७७ | ,, | २८८।३४–४५, ५२, ५३, ५६, ५९, ६१, ८३, ८४, ९६ |
| २७८ | ,, | २९१।९८–१०३, |
| ,, | ,, | २९२।१०४, १०५; |
| ,, | ,, | २९४।१५७–१५९, १६४, १६८ |
| २७९ | ,, | ३०५।२०, २७, २८; ३०६।४२, ४३ |
| २८० | ,, | ३०७।६२, ६७, ७१, ७४; ३०९।१०८ |
| ३०१ | एकनाथी (ए.) भागवत | १३१–१३६ |
| ,, | सकलसंतगाथा | १२।५९।७१ |
| ३१५ | ए. भागवत | ४३०–३८ |
| ३१६ | ज्ञानेश्वरी | रा. १३।१४३–१४८ |
| ३१८ | ,, | ,, १३।८२३–८३२ |
| ३२१ | ए. भागवत | ३१।५२६, ५५१-५५४ |
| ,, | रुक्मिणीस्वयंवर | प्रसंग १८।८४–८६ |
| ३२२ | ,, | ५।५६३ |
| ३२३ | ,, | ५।५५३, ५५७–५५९ |
| ३२५ | ,, | १।११५ |
| ३२६ | ,, | ३१।५३४–५४५ |
| ३२७ | ,, | ३१।५०२,५०५–५०८ |
| ३२९ | ज्ञानेश्वरी | कु. पृ. ५४६ ( थोड्या शब्द-भेदाने ) |

# उच्चारशुद्धि

या पुस्तकांत मुसलमानी, खिस्ती व द्राविडी भाषांतील विशेषनामे व काही शब्द आले आहेत. ग्रंथकर्त्याचा त्यांच्या शुद्ध उच्चारांशी परिचय नसल्यामुळे त्याच्या हातून पुस्तकात उणे–अधिक अपभ्रष्ट उच्चार दिले गेले आहेत. ते उच्चार त्या त्या ठिकाणी शुद्ध करण्याने पुनरुक्तीचा दोष एकसारखा उत्पन्न झाला असता; म्हणून येथे ते सर्व उच्चार एकत्र करून, पण ज्या क्रमाने ते पुस्तकात आले आहेत त्याच क्रमाने येथे दिले आहेत. पुनरुक्ती नसावी म्हणून एकदा दिलेला उच्चार पुनः देण्याचे शक्य तो टाळले आहे. तसेच कोणत्या अशुद्ध उच्चाराचे शुद्ध उच्चार येथे दिले आहेत हे सहज लक्षात यावे म्हणून अशुद्धही उच्चार दिलेले आहेत. ही विशेषनामे कोठे आलीं आहेत हे समजावे म्हणून उच्चाराच्या पाठीमागे ज्या पृष्ठांत ते विशेषनाम आले त्या पृष्ठाचा क्रमांक घातला आहे. पुस्तकात मुहम्मद व महमूद या नावाचे अनेक ठिकाणी घोटाळे केले आहेत. त्याविषयी सावधान असावे. ग्रामनामांचे शुद्ध उच्चार सूचीत दिले आहेत.

११ खिलजी=खल्जी
१२ जलालउद्दीन=जलालुद्दीन
,, कौलादेवी=कमलादेवी
,, अल्लाउद्दीन=अलाउद्दीन
,, हमीरसंक=हम्मीरसिंघ
१३ खिझरखान=खिज्रखान
२० जनमित्र=जगमित्र
२४ मलिक काफर=मलिक काफ़ूर
,, ऐनुलमुलुक=अय्नुल्मुल्क
२६ महंमदधर्मानुयायी=मुहम्मद-धर्मानुयायी
,, वारंगूळचे होयसल्य, द्वारसमुद्राचे बल्लाळ=वरंगलचे काकतीय, द्वारसमुद्राचे होय्सळ
३२ तघलक=तुघ्लुक
,, ग्यासुद्दीन=घियासुद्दीन
४० महंमद=मुहम्मद
४१ बाहुद्दीन=बहाउद्दीन
४३ महंमद=मुहम्मद
४७ अल्लाउद्दीन हुसेन गंगू ब्राह्मणी=अलाउद्दीन हसन कैकू बहमनी
५७ मुहंमद शाह=मुहम्मदशाह

५८ सुलतान महंमद=सुल्तान मुहम्मद
६३ मुजाइत=मुजाहिद
,, शहाजादी अबा=शाहझादी आघा
६४ महमूद=मुहम्मद
,, ग्यासुद्दीन=घियासुद्दीन
,, समसुद्दीन=शम्सुद्दीन
,, फेरोज=फीरूझ
,, अहंमद=अहमद
६६ अल्लाउद्दीन ब्राह्मणी १ ला=
१ ला अलाउद्दीन बहमनी
,, मुहम्मद
,, दावूद=दाऊद
,, महमूद=मुहम्मद
,, निझाम=निजाम
,, महंमद=मुहम्मद
,, महमूद २ रा=महमूद
,, वलीउल्लाह=वलियुल्लाह
,, कालीमउल्ला=कलीमुल्लाह
६७ फेरोझखान=फीरूझखान
,, फेरोझशहा=फीरूझशाह
७१ शिराज=शीराझ
८७ फजलउल्लाह=फज्लुल्लाह
८८ खानखनाना=खान-इ-खानान
८९ अहंमद शाह १ ला=१ला
अहमदशाह
९६ अबदुल कादर=अब्दुल कादिर
९८ बेदरचे बमणी राजे=बीदरचे
बहमनी राजे
१३७ शाहजादा महंमद=शाहझादा
मुहम्मद
१३८ इमादुल्मुलुक=इमादुल्मुल्क
,, परीचेहेर=परीचिहरह
,, मलिक उल्तुजार=मलिकुत्तुज्जार
१४० निजाम उलमुलक=निजामुल्मुल्क
,, महमूद ख्वाजा गावान=ख्वाजा
महमूद गावान
१४२ अबदुल रझक=अब्दुर्रझ्झाक
१४५ फेरिस्ता=फिरिश्ता
१४७ निझामशहा=निजामशाह
१४८ ब्राह्मणी=बहमनी
,, ग्रांट डफ=ग्रँट डफ
१५१ अदिलखान=आदिलखान
१५८ झरीप उल्मुल्क=शरीफुल्मुल्क
,, खोदबंदखान=खुदावंद खान
,, फत्तेउल्ला इमाद उल्मुल्क=फत-
हुल्लाह इमादुल्मुल्क
,, युसफ=युसुफ
,, फकीर उल्मुल्क=फकीरुल्मुल्क
१५९ बहिरी=बहरी
१६० जोव्हर=जौहर
,, असदखान गिलनी=गीलानी
१६२ सुलतान इस्माइल=सुल्तान
इस्माईल
,, कासीम बेरीद=कासिम बरीद
१६४ वास्को दि गामा=व्हास्कु द गाम
१६५ पूर्तकाल=पोर्तुगाल
१६६ अलमीढ=आल्मैद
१८३ कुतुबशह=कुत्बशाह

१९४ युसफ अदिलशहा=युसुफ आदिलशाह
,, इब्राहिम=इब्राहीम
१९७ लॉरेन्सु द आल्मैद=लौरेन्सु द आल्मैद
,, द कुन्हा=द कुञ्ञ्य
२०० दो दुवार्ती=दॉं दुआर्ति
,, दो लुइस=दॉं लुइस
,, सेंपैआ=सांपायु
२०१ हीटर द सिल्व्हैर=हीरर द सिल्व्हैर
,, नून् द कुन्हा= नून द कुञ्ञ्य
२०२ आन्तोनियु दे सालडाना=आंतोनियु द साल्दाञ्ञ्य
,, हीटर=हीरर
२०६ मार्टिन ऑल्फान्सो डी सौजा=मार्तिन आफॉंसु द सौझ
२०७ सीमाओ बोटेल्हो=सिमाऊ बोतेल्हो
,, जाव डी कॅस्ट्रो=जुआंव द कास्त्रु
,, मेस्ट्रे फ्रेन्सिस्को=मेस्त्र फ्रांसिस्कु
,, सेंट फ्रॉन्सिस झेविअर=सेंत फ्रांसिस झेवियर
२१४ डॉ. कास्टा=द ॅस्त
२१५ बिशप अलबुकर्क=बिस्पु आल्बुकेर्क
,, जुवांव=जुआंव
२१८ बुर्हान निजामशहा=बुर्हान निजामशाह
२१९ जॉन डी कॅस्ट्रो=जुआंव द कास्त्रु
२२० सुभान कुली=सुब्हान कुली
२२१ सैफुन मुलुक=सैफुल्मुल्क
,, हुस्सेन निजामशहा=हुसैन निजामशाह
२२४ अली आदिलशाह=अली आदिलशाह
२४६ चांदबिबी=चांद बीबी
२५४ इमामन मुलुक=इमादुल्मुल्क
२५५ सेख=शेख

# वंशावळी

मूळ पुस्तकाच्या ६४ व ६५ पृष्ठांवर ( प्रस्तुत आवृत्ती पृ. ६५, ६६ ) विजयनगरकर सम्राट व बहमनी सुल्तान यांच्या वंशावळी व कारकिर्दी दिल्या आहेत. नवीन संशोधनाने आता त्यात पुष्कळच फरक पडला आहे. म्हणून त्या आता निरुपयोगी आहेत असे समजून येथे अधिक अचूक अशा नवीन वंशावळी देत आहे. या सेअ व शे अशा दोन पुस्तकांतून घेतल्या आहेत.

## १ संगम वंश

| | |
|---|---|
| ( १ ) १ ला हरिहर | इ. १३३६–१३५५ |
| ( २ ) १ ला बुक्क = १ चा भाऊ | १३५५–१३७७ |
| ( ३ ) २ रा हरिहर = २ चा मुलगा | १३७७–१४०१ |
| ( ४ ) २ रा बुक्क = ३ चा मुलगा | १४०४–१४०६ |
| ( ५ ) १ ला देवराय = ४ चा भाऊ | १४०६–१४२२ |
| ( ६ ) विजय किंवा ३ रा बुक्क = ५ चा मुलगा | १४२२ |
| ( ७ ) २ रा देवराय = ६ चा मुलगा | १४२२–१४४६ |
| ( ८ ) मल्लिकार्जुन = ७ चा मुलगा | १४४६–१४६५ |
| ( ९ ) ३ रा विरूपाक्ष = ८ चा भाऊ | १४६५–१४८६ |

## २ साळुव वंश

| | |
|---|---|
| (१०) १ ला नरसिंह | १४८५/८६–१४९२/९३ |
| (११) इम्मडि नरसिंह = १० चा मुलगा | १४९२/९३–१५०५ |

## ३ तुळुव वंश

| | |
|---|---|
| (१२) वीर नरसिंह | १५०६–१५०९ |
| (१३) कृष्णदेवराय = १२ चा भाऊ | १५०९–१५२९ |
| (१४) अच्युत = १३ चा भाऊ | १५२९–१५४२ |
| (१५) वेंकटाद्रि = १४ चा मुलगा | १५४२ |
| (१६) सदाशिव = १४ चा पुतण्या | १५४२–१५७० |

## ४ आरवीडु वंश

(१७) अळिय राम = १३ चा जावई १५४२–१५६५
(१८) तिरुमल = १७ चा भाऊ १५७०–१५७८
(१९) १ ला श्रीरंग = १८ चा मुलगा १५७८–१५८६
(२०) वेंकटपति = १९ चा भाऊ १५८६–१६१४

## ५ बहमनी सुल्तान

मुस्लिम राज्यकर्त्यांची नावे लांबट असतात. ते कोणत्या नावाने इतिहासात प्रसिद्ध आहेत ते येथे जाड टाइपात दाखविले आहे.

( १ ) **अलाउद्दीन हसन** बहमनशाह १३४७ ऑगस्ट ३–१३५८ फेब्रुवारी ११

( २ ) **१ ला मुहम्मद** = १ चा मुलगा १३५८ फेब्रु. ११–१३७५ एप्रिल २१

( ३ ) अलाउद्दीन **मुजाहिद** = २ चा मुलगा १३७५ एप्रिल २१–१३७८ एप्रिल १६

( ४ ) **दाऊद** = २ चा पुतण्या १३७८ एप्रिल १६–१३७८ मे २१

( ५ ) **२ रा मुहम्मद** = ४ चा भाऊ १३७८ मे २१–१३९७ एप्रिल २०

( ६ ) **घियासुद्दीन** तहम्तान = ५ चा मुलगा १३९७ एप्रिल २०–१३९७ जून १४

( ७ ) २ रा **शम्सुद्दीन** दाऊद = ६ चा भाऊ १३९७ जून १४–१३९७ नोव्हें. १६

( ८ ) ताजुद्दीन **फीरूझ** = २ चा पुतण्या १३९७ नोव्हें. १६–१४२२ सप्टें. २२

( ९ ) **१ ला** शिहाबुद्दीन **अहमद** = ८ चा भाऊ १४२२ सप्टें. २२–१४३६ एप्रिल १७

(१०) **२ रा** अलाउद्दीन **अहमद** = ९ चा मुलगा १४३६ एप्रिल १७–१४५८ मे ७

(११) अलाउद्दीन **हुमायून** शाह = १० चा मुलगा १४५८ मे ७–
१४६१ सप्टें. ४

(१२) ३ **रा अहमद निजामुद्दीन** = ११ चा मुलगा १४६१ सप्टें.
४–१४६३ जुलै ३०

(१३) **३ रा** शम्सुद्दीन **मुहम्मद** = १२ चा भाऊ १४६३ जुलै ३०–
१४८२ मार्च २६

(१४) शिहाबुद्दीन **महमूद** = १३ चा मुलगा १४८२ मार्च २६–
१५१८ डिसें. ७

(१५) **४ था अहमद** = १४ चा मुलगा १५१८ डिसें. १५–१५२०
डिसें. १५

(१६) **अलाउद्दीन** शाह = १५ चा मुलगा १५२० डिसें. २८–
१५२३ मार्च ५

(१७) **वलियुल्लाह** = १५ चा भाऊ १५२३ मार्च ५–१५२६

(१८) **कलीमुल्लाह** = १५ चा भाऊ १५२६–१५३८

---

# कालपट

१. यापुढे प्रस्तुत पुस्तकात आलेल्या काल्युक्त घटनांची सूची दिली आहे. कै. गद्रे यांनी या काल्युक्त घटना कोणत्या पुस्तकातून घेतल्या त्याची खुलासेवार व निश्चयात्मक अशी माहिती सामान्यतः दिलेली नाही. शिवाय त्यांनी दिलेल्या कालयुक्त घटना इ. १९०३ ते १९०५ पूर्वी प्रकाशित झालेल्या पुस्तकांतून घेतल्या असणार हे उघड आहे. ती पुस्तके प्रकाशित होऊन सुमारे ६५ वर्षांचा काळ लोटला आहे. एवढ्या अवधीत त्यांनी हाताळलेल्या विषयावर कितीतरी नवी व अधिक अचूक अशी माहिती प्रकाशित झाली आहे हे जेवढे खरे, तेवढेच कित्येक कालयुक्त घटना अधिक व बलवत्तर पुराव्याच्या अभावी पूर्वी जशा, जेवढ्या प्रमाणात माहीत होत्या तशाच, व तेवढ्याच प्रमाणात आजही माहीत आहेत हेही खरे. त्यांबाबत लक्षात घेण्यासारखा कोणताही फरक पडलेला नाही. अशा स्थितीत पुढे दिलेल्या काल्युक्त घटनामध्ये काही फरक सुचविला नसल्यास एक तर त्या घटनेविषयी नेमका कोठे अधिक शोध घ्यावा हे माझ्या ध्यानात आले नाही किंवा त्या घटनेच्या चूक-अचूकपणाविषयी कोठेही काहीही माहिती मी जो प्रयत्न केला त्यात मिळू शकली नाही असे समजण्यास हरकत नाही. मजपेक्षा अधिक प्रयत्नवादी, कालानुकूल्य असलेल्या, उपस्थितिशील व व्यापक अभ्यासकास त्या घटनांचा कालदृष्ट्या अधिक चांगला उलगडा होण्याचा संभव आहे. या काल्पटातील काही नोंदीत वर्ष आणि तारीख–मिति यांच्या संगतीने अनुक्रमे संवत्सराचे व वाराचे नाव दिलेले आढळते. पण या नोंदी बव्हंशी फार उत्तरकालीन किंवा पारंपरिक असल्याने त्या चिकित्सेच्या कसोटी-वर घासून पारखण्यात अर्थ नाही. शिवाय त्या ज्या रचनेत सापडतात त्यांच्या संशोधित आवृत्ति उपलब्ध नाहीत. मूळ पुस्तकात हकीकती कालदृष्ट्या मागे-पुढे आल्यामुळे कालपटातही कालांची आनुपूर्वी कांही ठिकाणी राहिलेली नाही हे ध्यानात घ्यावे. वंशावळी व कालपट यात दिलेल्या घटितकालात अंतर आढळल्यास वंशावळींतील काळ अधिक अचूक समजावे.

( १ ) नामदेव जन्म : श. ११९२ ( इ. १२७० ), प्रमोद, कार्तिक शुद्ध ११, रवि ( मंगळ ), ( पृ. ४ ).

( २ ) गोरा कुंभार जन्म : श. ११८९ ( इ. १२६७ ) प्रभव, ( पृ. ४ ).

( ३ ) निवृत्तिनाथ जन्म : श. ११९५ ( इ. १२७४ ) श्रीमुख, माघ वद्य १, गुरु ( बुध ), [ श. ११९० ? ], ( पृ. ४ ).

( ४ ) ज्ञानेश्वर जन्म : श. ११९७ ( इ. १२७५ ) युवा, श्रावण वद्य ८, गुरु ( शुक्र ), [ श. ११९३ ? ], ( पृ. ४ ).

( ५ ) सोपानदेव जन्म : श. ११९९ ( इ. १२७७ ) ईश्वर, कार्तिक शुद्ध १५, शुक्र. [ श. ११९६ ? ], ( पृ. ५ ).

( ६ ) मुक्ताबाई जन्म : श. १२०१ ( इ. १२७९ ), आश्विन शुद्ध १, शुक्र [ श. ११९९ ? ], ( पृ. ५ ).

( ७ ) शुद्धिपत्र : श. १२०९ ( इ. १२८८ ) सर्वजित्, माघ शुद्ध ५, ( पृ. ८ ); ( मि. ६८ = श. १२१२ ? ).

( ८ ) ज्ञानेश्वरांचे पंढरपुरास आगमन : श. १२१३ ( इ. १२९१ ), ( पृ. १० ).

( ९ ) नामदेव, ज्ञानदेव इ. तीर्थयात्रेस जातात : श. १२१३ अखेर ( इ. १२९२ आरंभ ), ( पृ. ११ ).

( १० ) अलाउद्दीन खल्जीची चितोडवर चढाई : श. १२१२ ( इ. १२९० ), ( पृ. १२ ); ( के ६६९ = इ. १३०२–३ ).

( ११ ) कौला ( कमला ) देवी अलाउद्दीनाच्या हाती लागते : श. १२१९ ( इ. १२९७ ), ( पृ. १२ ); ( के ११३ = इ. १३०६–७ ). या घटनेच्या खरेपणाविषयी शंका.

( १२ ) अलाउद्दीन खल्जीची देवगिरीच्या रामदेवावर स्वारी : श. १२१६ ( इ. १२९४ ), ( पृ. १२ ).

( १३ ) ज्ञानदेवांची समाधी : श. १२१८ ( इ. १२९६ ) दुर्मुख, कार्तिक वद्य १३, गुरु. ( पृ. १३ ).

( १४ ) अलाउद्दीन खल्जी चुलत्यास ठार मारून दिल्लीच्या तख्तावर बसतो : श. १२१७ ( इ. १२९५ ), ( पृ. २३ ); ( के ६६९ = इ. १२९६ ).

( १५ ) मलिक काफूरची वरंगलवर स्वारी : श. १२२८ ( इ. १३०६ ), ( पृ. २४ ); ( के ६६९ = इ. १३०८ ).

( १६ ) रामदेव यादवाचा मृत्यू : १२३१ ( इ. १३०९ ), ( पृ. २४ ); ( के ११५ = इ. १३०९ अखेर, १३१० प्रारंभ ).

( १७ ) मलिक काफूरची देवगिरीवर स्वारी : श. १२३४ ( इ. १३१२ ), ( पृ. २४ ).

( १८ ) मलिक काफूरच्या स्वारीविषयी पत्र : श. १२३४ ( इ. १३१२), परिधावी, चैत्र शुद्ध १३ ( पृ. २५ ).

( १९ ) रामदेवाचा जावई हरपाळदेव मुसलमान आक्रमकांच्या हाती लागतो व यादव राज्याचा नाश : श. १२४० ( इ. १३१८ ), ( पृ. २५, २६ ).

( २० ) अलाउद्दीन खल्जीचा मृत्यू व मलिक काफूरचा खून : श. १२४३ ( इ. १३२१ ), ( पृ. ३२ ); ( के ६६९ = इ. १३१६ ).

( २१ ) घियासुद्दीन तुघ्लुकचा मृत्यू : श. १२४७ ( इ. १३२५ ), ( पृ. ३२ ).

( २२ ) मुहम्मद तुघ्लुक दौलताबादेस राजधानी आणतो : श. १२४७ ( इ. १३२५ ) नंतर, ( पृ. ३३ ); ( के ६७०=१३२७–२९ ).

( २३ ) मुहम्मद तुघ्लुकची वरंगलवर दुसरी स्वारी : श. १२५५ ( इ. १३३३ ), ( पृ. ४१ ); ( के ६६९ = १३३५ ).

( २४ ) मुहम्मद तुघ्लुकची अनेगुंदीवर स्वारी : श. १२५६ (इ. १३३४), ( पृ. ४२ ).

( २५ ) विजयनगरची स्थापना : श. १२५७ ( इ. १३३५ ), ( पृ. ४३ ); ( के ६७० = १३३६ ).

( २६ ) हरिहर व बुक्क मुहम्मद तुघ्लुकास कृष्णापार घालवितात : श. १२६२ ( इ. १३४० ), ( पृ. ४५ ).

( २७ ) जअफरखान उर्फ अलाउद्दीन बहमनी दक्षिणेत स्वतंत्र बनतो : श. १२६९ ( इ. १३४७ ), ( पृ. ४७ ).

( २८ ) जगमित्र निर्याण : श. १२४० ( इ. १३१८ ), ( पृ. ४७ ); ( मसा १४८ = श. १२५२ कार्तिक शु. ११ ).

( २९ ) चोखामेळा निर्याण : श. १२६० ( इ. १३३८ ), ( पृ. ४७ ), ( मसा १४८ = श. १२६० वैशाख वद्य ५ ).

( ३० ) नामदेव निर्याण : श. १२७२ ( इ. १३५० ), ( पृ. ४८ ); ( मसा १४० = श. १२७२ आषाढ वद्य १३ ).

( ३१ ) पहिल्या हरिहरचा मृत्यू : श. १२७१ ( इ. १३४९ ), ( पृ. ५७ ); ( सेअ १९३ = इ. १३५५ ).

( ३२ ) बहमनी सुल्तान १ ला मुहम्मद जखमी होऊन कौलास किल्ल्याचा आश्रय घेतो : श. १२९९ ( इ. १३७७ ), ( पृ. ६१ ); ( के ६७१ = या वर्षी १ ल्या मुहम्मदाचा मृत्यू व बहमनी मुजाहिद गादीवर येतो. शे ७६ = इ. १३७५ ).

( ३३ ) बहमनी सुल्तानाच्या सैन्याचा बुक्क पराभव करतो : श. १३०० ( इ. १३७८ ), ( पृ. ६१ ); ( के ६७१ = या वर्षी मुजाहिद व दाऊद यांचे खून व बहमनी २ रा मुहम्मद गादीवर येतो ).

( ३४ ) विजयनगर सम्राट बुक्क याचा मृत्यू : श. १३०१ (इ. १३७९), ( पृ. ६१ ); ( सेअ ४०० = इ. १३७७ ).

( ३५ ) २ ऱ्या बहमनी मुहम्मदाचा दुष्काळात मृत्यू : श. १३१९ ( इ. १३९७ ), ( पृ. ६४ ); ( के ६७२ ).

( ३६ ) गुरुचरित्ररचना : श. १३७० नंतर ( इ. १४४८ ), ( पृ. ६७ ).

( ३७ ) श्रीपादश्रीवल्लभ जीवनकाल : श. १३०० ( इ. १३७८ ), ( पृ. ६८ ).

( ३८ ) नृसिंहसरस्वती समाधी : श. १३८० ( इ. १४५९ ) बहुधान्य, माघ वद्य १ ( पृ. ६८ ).

( ३९ ) १ ला देवराय याची रायचूर–दुआबावर स्वारी : श. १३३९ ( इ. १४१७ ), ( पृ. ७१ ).

(४०) विजयनगरकरांचा बहमनी फीरूझशाह याशी तह : श. १३२१ (इ. १३९९), (पृ. ७४).

(४१) दुसऱ्या बुक्काचे दानपत्र : श. १३२८ वैशाख शुद्ध १२ (१४०६ एप्रिल ३०) (पृ. ७४).

(४२) बहमनी फीरूझ याचा विजयनगरवर हल्ला : श. १३५८ (इ. १४३६), (पृ. ७९). हे चूक; पहा नोंद ४७.

(४३) पहिल्या देवरायाचा मृत्यू : सुमारे श. १३३४–३५ (इ. १४१२-१३ (पृ. ८५); (सेअ ४०० = इ. १४२२).

(४४) वीर विजय = ३रा बुक्क जिवंत : श. १३४१ (इ. १४१९) (पृ. ८५); (सेअ ४०० = मृत्यू इ. १४२२).

(४५) बहमनी फीरूझचा पानगल किल्ल्यावर हल्ला : श. १३३९ (इ. १४१७), (पृ. ८५).

(४६) पहिल्या देवरायाची लढाईस सिद्धता : श. १३४१ (इ. १४१९), (पृ. ८६).

(४७) बहमनी फीरूझचा मृत्यू : श. १३४४ (इ. १४२२), (पृ. ७९).

(४८) दक्षिणेत दुष्काळ : श. १३४५ (इ. १४२३) (पृ. ९६).

(४९) वरंगलकर परतंत्र होतात : श. १३४६ (इ. १४२४), (पृ. ९७).

(५०) बहमनी अहमदचा मृत्यू : श. १३६५ (इ. १४४३), (पृ. ९७); (के ६७५ = इ. १४३६).

(५१) बीदरचा किल्ला तयार झाला : श. १३५४ (इ. १४३२), (पृ. ९८).

(५२) बहमनी अलाउद्दीन अहमद गादीवर ? : श. १३५७ (इ. १४३५), (पृ. १३५); (के ६७५ = इ. १४३६).

(५३) मलिकुत्तुज्जारची कोकणावर स्वारी : श. १३७५ (इ. १४५३), (पृ. १३८).

(५४) महमूद गावानची दाभोळ व चौलवर स्वारी : श. १३९१ (इ. १४६९), (पृ. १४०)

(५५) दुसऱ्या देवरायाचा मृत्यू : श. १३६६ (इ. १४४४), (पृ. १४२) (सेअ २२० = इ. २४–५–१४४६).

(५६) दुसऱ्या देवरायावर प्राणघातक हल्ला : श. १३६४|६५ (इ १४४२|४३), (पृ. १४२); (सेअ २१९).

(५७) नृसिंहसरस्वती निर्याण : श. १३८० (इ. १४५८) (पृ. १४७).

(५८) बहमनी हुमायूनची तेलंगणावर स्वारी : श. १३८३ (इ. १४६१), (पृ. १४७); (शे ४४१ = इ. १४६०).

(५९) बहमनी हुमायूनचा मुलगा निजाम गादीवर : श. १३८५ (इ. १४६३), (पृ. १४७); (शे ४४१, के ६७६ = इ. १४६१).

(६०) बहमनी हुमायूनचे फर्मान : श. १३९६ (इ.१४७४), (पृ. १४७).

(६१) दामाजींकालीन दुष्काळ : श. १३८२ (इ. १४६०), (पृ. १४८).

(६२) महाराष्ट्रात दुष्काळ : श. १३८९ ते ९६ (१४६७ ते ७४) (पृ. १४८); (ग्रँट डफ १,५० इ. १३९६; फि २,४९३ = इ. १४७१–७२).

(६३) बहमनी हुमायूनचा मृत्यू : श. १३८३ (इ. १४६१), (पृ. १४९).

(६४) बहमनी निजाम व बहमनी २ (३) रा मुहम्मद अनुक्रमे गादीवर : श. १३८३, १३८५ (इ. १४६१ व १४६३), (पृ. १६९).

(६५) बहमनी मुहम्मदला स्वारीशिकारीची हौस : श. १३९६ (इ. १४-७४), (पृ. १५०).

(६६) मुहम्मदच्या डोक्यात धर्मवेड : श. १३९८ (इ.. १४७६), (पृ. १५०).

(६७) दामाजीपंताचा दुष्काळ : श. १३८९–९६ (इ. १४६७–७४), (पृ. १५४)

(६८) पुन: दामाजीचा किंवा दुर्गाडीचा दुष्काळ : श. १३९६ (इ. १४-७४), (पृ.१५१).

(६९) बहमनी सल्तनतीचे तुकडे : श. १४१०–११ (इ. १४८८–८९) (पृ. १५४); (सेअ २३० = इ. १४८९).

( ७० ) बहमनी २ (३) ऱ्या मुहम्मदचा मृत्यू आणि बहमनी महमूद गादीवर : श. १४०४ (इ. १४८२), (पृ. १६१ ); ( शे ४४२, सेअ २२९ ).

( ७१ ) बहमनी २ रा (४था) अहमद गादीवर : १४४२ ( इ. १५२० ), (पृ. १६१ ); ( के ६७९ = इ. १५१८ )

( ७२ ) उपर्युक्त अहमदचा मृत्यू व त्याचा भाऊ (मुलगा) बहमनी अलाउद्दीन गादीवर : श. १४४३ (इ. १५२१ ), (पृ. १६१ ); ( शे ५४३ = १५२०, के ६८० = १५२२ ).

( ७३ ) अलाउद्दीनची पदच्युती व बहमनी वलियुल्लाह गादीवर : श. १४-४६ ( इ. १४२४ ), (पृ. १६१ ); ( शे ४४३ = १५२३; के ६८० = १५२५ ).

( ७४ ) वलियुल्लाहची पदच्युती व कलीमुल्लाह गादीवर : श. १४४८ (इ. १५२६ ), ( पृ. १६१ ); ( के ६८० = १५२५ )

( ७५ ) बहमनी बादशाहीचे पाच तुकडे पक्के होतात; इमादशाही : श. १४०५ ( इ. १४८३ ); आदिलशाही : श. १४११ ( इ. १४८९ ); निजामशाही : श. १४१२ ( इ. १४९० ); बरीद-शाही : श. १४१४ ( इ. १४९२ ); कुत्बशाही : श. १४३४ ( इ. १५१२ ), ( पृ. १६१ ); ( के. ७०८, ७०४, ७०४, ७०९, ७०६ = इ. १४९०, १४९०, १४९०, १४८७, १५१२).

( ७६ ) कृष्णराय व अच्युतराय म्हैसूरी संस्थानिकांची ठाणी घेतात : श. १४२० ( इ. १४९८ ), ( पृ. १६३ ). हे अगदी चूक. या वेळी कृष्णराय व अच्युतराय अनुक्रमे सुमारे ९ व ७ वर्षांचे होते.

( ७७ ) केप ऑफ गुड होपला वळसा : श. १४२० (इ. १४९८), (पृ. १६४).

( ७८ ) व्हास्को द गाम कालिकत बंदरात : इ. १४९८ मे २० ( पृ. १६४ ), ( द कु. ६९ ); ( सेअ २३३ = २६।८।१४९८ ).

( ७९ ) चांच्यांचा होनावरवर हल्ला : श. १४२५ ( इ. १५०३ ), ( पृ. १६५ ).

(८०) गडकोट उभारण्याच्या सवलतीच्या अटीवर विजयनगरकर व पोर्तुगीज यांचा संधी : श. १४२७ (इ. १५०५), (पृ. १६६). पोर्तुगीजांनी पहिल्या नरसिंगाकडे भटकळ येथे कोट उभारण्याची परवानगी मागितली; पण ती मिळाली नव्हती.

(८१) चांगा सुधेश निर्याण : श. १४२७ (इ. १५०५), (पृ. १६८, १७८).

(८२) कोकणातील काही ठाणी पोर्तुगीजांच्या ताब्यात : श. १४३४ (इ. १५१२), (पृ. १७९). या वेळीं गोव्याकडील थोडासा प्रदेश पोर्तुगीजांच्या ताब्यात आला होता.

(८३) कृष्णदेवराय सिंहासनावर बसतो : श. १४३० (इ. १५०८), (पृ. १८१); (ख = श. १४३१ श्रावण वद्य ८ = इ. १५०९ ऑगस्ट ८.)

(८४) पोर्तुगीज युसुफ आदिलकडून गोवे घेतात : श. १४३२ (इ. १५१०), (पृ. १८२). मात्र युसुफने ते पुनः परत घेतले.

(८५) कृष्णदेवरायाने रायचूर व मुद्गल किल्ले घेतले : श. १४३४ (इ. १५१२), (पृ. १८२).

(८६) इस्माईल आदिलने उपर्युक्त किल्ले परत घेण्याचा प्रयत्न केला : श. १४४२ (इ. १५२०), (पृ. १८२, से १२७).

(८७) भानुदास प्रख्यात होतो : श. १४३६ (इ. १५१४), (पृ. १९३).

(८८) कृष्णदेवरायाचा मृत्यू : श. १४५२ (इ. १५३०), (पृ. १८६); (ख = १५२९ ऑक्टो. २७ नंतर लवकरच).

(८९) इस्माईल आदिल व कासिम बरीद रायचूर व मुद्गल जिंकतात : श. १४५४ (इ. १५३२), (पृ. १९४ से १६६).

(९०) आदिलशाह कुत्बशाहाविरुद्ध विजयनगरकरांची मदत मागतो : श. १४५६ (इ. १४३४), (पृ. १९४; फि २,५३०).

(९१) अच्युतरायाचा मृत्यू : श. १४६४ (इ. १५४२), (पृ. १९४ (सेअ २४९ = इ. १५४२ जून २५/२६ सुमार).

(९२) चौलमध्ये पोर्तुगीज–मुसलमान भांडण : श. १४२९ (इ. १५०७), (पृ. १९७, व्हा ११३).

(९३) आल्मैदाचा मुसल्मान मोड करतात : श. १४३० (इ. १५०८), (पृ. १९८).

(९४) हाटेंटाट लोकांनी आल्मैदाचा वध केला : श. १४३० (इ. १५०८), (पृ. १९९); (दकु ७२ = इ. १५०९ नोव्हें. १९ नंतर; व्हा १२७ = इ. १५१० मार्च ३; डॅ १,१४७ = इ. १५०९ डिसें.).

(९५) पोर्तुगीजांचे माहीम व मुंबई येथे अत्याचार : श. १४३९ (इ. १५१७), (पृ. २००, दकु ७३).

(९६) गव्हर्नर सांपायू हा जंगी आरमार उभारतो : श. १४५० (इ. १५२८), (पृ. २००); (दकु ७४ = इ. १५२९).

(९७) कुञ्ज्य गोव्यात आरमार एकत्र करतो : श. १४५३ (इ. १५३१), (पृ. २०२); (दकु ७७, व्हा. २२५, डॅ १,४०० = मुंबईत आरमार एकत्र करतो).

(९८) कुञ्ज्य शियाल बेटाजवळ लष्कर जमिनीवर उतरवितो : श. १४५२ (इ. १५३१ फेब्रु. ७), (पृ. २०२; डॅ १,१४१).

(९९) दियोगु द सिव्हैर विश्रांतीसाठी चौल येथे : श. १४५४ (इ. १५३२), (पृ. २०३); (दकु ८७ = इ. १५३२ एप्रिल).

(१००) कुञ्ज्य १०० लढाऊ जहाजे तयार करतो : श. १४५४ मार्गशीर्ष (इ. १५३२ डिसेंबर), (पृ. २०४; दकु ८७).

(१०१) कुञ्ज्य वसईवर हल्ला करतो : श. १४५३ माघ शुद्ध १३ (इ. १५३२ जानेवारी २०), (पृ. २०४; दकु ८७).

(१०२) वसईच्या तहावर सह्या : श. १४५६ मार्गशीर्ष (इ. १५३४ • • शुद्ध १३),
(पृ. २०६); (डॅ. १,४०६ = इ. १५३४ सप्टेंबर २१ नंतर).

(१०३) सिमाओ बोतेल्हो हिंदुस्थानात : श. १४५३ (इ. १५३१), (पृ. २०६; दकु ९२).

(१०४) बोतेल्हो व सामुरी यांची लढाई : श. १४५८ (इ. १५३६), (पृ. २०७; दकु ९२).

(१०५) मेस्त्र फ्रान्सिस्कु याच्या सांगाती गोव्यात पाद्र्यांचा पहिला तांडा : श. १४६४ (इ. १५४२), (पृ. २०७; दकु ९७).

(१०६) विजयनगरात सदाशिवराय गादीवर व रामराजाच्या हाती सत्ता : श. १४६५ (इ. १५४३), (पृ. २१६); (सेअ २४९ = इ. १५४२ जून २७).

(१०७) सदाशिवराय जिवंत : श. १४९९ (इ. १५७७), (पृ. २१६); (सेअ २५९ = इ. १५७० मार्च २९).

(१०८) रामराजाचा स्वतंत्र कारभार : श. १४८७ (इ. १५६५); (पृ. २१६); याआधी सामान्यतः सदाशिवराय गादीवर आल्यापासून हा सत्ताधारी झाला.

(१०९) कृष्णराय व जुआंव द कास्त्रु यांचा तह : श. १४६९ (इ. १५४७), (पृ. २१९); (डॅ २,४८७ = कास्त्रूचा काळ : इ. १५४५–१५४७). एव्हा कृष्णराय मरून १८ वर्षे झाली होती.

(११०) जमशीद कुत्बशाहाचा मृत्यू : श १४७२ (इ. १५५०), (पृ. २२०); (के ६८२ = इ. १५५०).

(१११) आदिलशाह व निजामशाह यांचा लढा : श. १४७५ (इ. १५५३), (पृ. २२०), (के ३४३ = इ. १५५४).

(११२) १ ल्या इब्राहीम आदिलचा मृत्यू : श. १४७९ (इ. १५५७), (पृ. २२१; के ४४४ = इ. १५५८).

(११३) हुसैन निजाम आणि इब्राहीम कुत्ब यांचा कल्याणीस वेढा : श. १४८५ (इ. १५६३), (पृ. २२३); (के ४४६ = इ. १५६२). हुसैन निजाम, अली आदिलास कल्याण, कलबर्गे परत करतो.

(११४) रामराजा विजयनगरवरील अत्याचारांचे उट्टे काढतो : श. १४६४ ते १४८५ = (इ. १५४२ ते १५६३), (पृ. २२५).

(११५) पोर्तुगीजांच्या कोकणावर स्वाऱ्या : श. १४७०, १४७७, १४७९ (इ. १५४८, १५५५, १५५७), (पृ. २२८).

(११६) पोर्तुगीज विजापुरी सैन्याचा दोनदा पराभव करतात : श. १४७७ (इ. १५५५), (पृ. २२८).
(११७) पोर्तुगीज पश्चिम किनाऱ्याचे स्वामी : श. १४८४ (इ. १५६२); (पृ. २२८).
(११८) राघव चैतन्याचे आळंद येथे निर्याण : श. १४८०–८५ (इ. १५५८–६३), (पृ. २४५).
(११९) आदिल व निजाम यांत झगडा : श. १४७३ (इ. १५५१), (पृ. २४५); हा श. १४८५ (इ. १५६४) पर्यंत चालू.
(१२०) राजस्थानात नाथद्वार येथे विठ्ठलनाथाची स्थापना : श. १४४० (इ. १५१८ सुमार;) (पृ. २५०).
(१२१) विजयनगरच्या हिंदू साम्राज्याचा अस्त : श. १४८६ मार्गशीर्ष (इ. १५६४), (पृ. २५८); (सेअ २५७ = श. १४८६ माघ वद्य ७ मंगळवार = इ. १५६५ जाने. २३).
(१२२) अली आदिलची पेनुगोंड्यावर स्वारी : श. १४८८ (इ. १५६६), (पृ. २६०), (सेअ २५८ = या वेळी सदाशिवराय पेनुगोंड्यास).
(१२३) अली आदिल अदोनीचा किल्ला घेतो : श. १४९० (इ. १५६८), (पृ. २६०); (के ४५३ = इ. १५७२ प्रारंभ).
(१२४) अली आदिलच्या बदामी व तोरगळ येथे लढाया : श. १४९५ (इ. १५७३), (पृ. २६०); (फि ३, १३५ = येथे बदामीचा निर्देश नाही.)
(१२५) अली आदिल धारवाड व बंकापूर जिंकतो : श. १४९६, १४९७ (इ. १५७४, १५७५), (पृ. २६०); (फि ३, १३५–१३६ येथे कालनिर्देश नाही).
(१२६) श्रीरंगराय गादीवर : श. १४९५ (इ. १५७३), (पृ. २६०, सेअ २६२).
(१२७) अली आदिलचा खून : श. १५०२ (इ. १५८०), (पृ. २६१); (सेअ २६२ = इ. १५८० एप्रिल ११).
(१२८) श्रीरंगाचा मृत्यू : श. १५०७ (इ. १५८५), (पृ. २६१); (सेअ २६४ = इ. १५८६ प्रारंभ).

(१२९) तिरुमलरायाचा गादीवर बसण्याचा प्रयत्न : श. १४८९ (इ. १५६७), (पृ. २६१).

(१३०) मालोजी जाधवांच्या पदरी शिलेदार : श. १४९९ (इ. १५७७), (पृ. २६२); हे वर्ष व घटित अंदाजी आहे.

(१३१) महाराष्ट्रात संतांच्या बालक्रीडा : श. १४८६–१५०० (इ. १५६४ ते १५७८), (पृ. २६३); या वेळी कोणते संत बालवयात होते हे समजत नाही.

(१३२) बाबा–केशव चैतन्य यांचे निर्याण : श. १४९३ (इ. १५७१), (पृ. २६५).

(१३३) एकनाथाचा जीवनकाल : श. १४७०–१५२१ (इ. १५४८–१५९९), (पृ. २६५); कै. गद्रे यांनी प्रथम एकनाथाचा जीवनकाल याप्रमाणे धरला. पण पुढे २९८, व पुढील पृष्ठांवर तोच जीवनकाल श. १४५५–१५२१ (इ. १५३३–१५९९) असा घेतला.

(१३४) एकनाथाचे लग्न : सुमारें श. १५०० (इ. १५७८), (पृ. २६६).

(१३५) एकनाथी भागवताची पंचाध्यायी पूर्ण : श. १४९५ (इ.१५७३), (पृ. २६७, पहा पृ. ३२१).

(१३६) त्र्यंबकराजाच्या बालबोध ग्रंथाचा प्रारंभ : श. १४९४ अंगिरा, फाल्गुन शुद्ध ५ (इ. १५७३ फेब्रु. ६), (पृ. २७९).

(१३७) बालबोध ग्रंथाची पूर्णता = श. १५००, बहुधान्य, चैत्र शुद्ध १ (इ. १५७८ मार्च ९), (पृ. २८०).

(१३८) महालिंगदासाच्या विक्रमबत्तिशीची रचना : श. १४८६ (इ. १५६४), (पृ. २८८).

(१३९) कृष्णदयार्णव श. १५९६–१६६२ (इ. १६७४–१७४०), (पृ. २९७).

(१४०) एकनाथ : श. १४५५–१५२१ (१५३३–१५९९), (पृ. २९७).

(१४१) जनार्दनपंत जीवनकाल : श. १४१३–१४९४ (इ. १४९१–१५७२), (पृ. २९८).

(१४२) भानुदास : श. १३७०-१४३६ (इ. १४४८-१५१४), (पृ. ३०१).

(१४३) एकनाथाची चतुःश्लोकी भागवतटीका : श. १४७८ (इ.१५५६), (पृ. ३२०).

(१४४) एकनाथी भागवताची पंचाध्यायी पूर्ण : श. १४९२ (इ. १५७०), (पृ. ३२१, पहा पृ. २६७)

(१४५) एकनाथाचे रुक्मिणीस्वयंवर पूर्ण : श. १४९३ (इ. १५७१), (पृ. ३२२).

(१४६) एकनाथाचे काशीस प्रयाण : श. १४९२ (इ. १५७०), (पृ. ३२२).

(१४७) एकनाथी भागवत पूर्ण : श. १४९५ (इ. १५७३), (पृ. ३२८).

(१४८) ज्ञानेश्वरसमाधीचा जीर्णोद्धार : श. १५०५ (इ. १५८३), (पृ. ३२९).

(१४९) एकनाथपुत्र हरि जन्म : श. १४९० (इ. १५६८), (पृ. ३३०).

(१५०) मुक्तेश्वर जन्म : श. १५०१-५ (इ. १५७९-१५८३), (पृ. ३३१).

(१५१) भावार्थरामायण रचनाप्रारंभ : श. १५१६ (इ. १५९४), (पृ. ३३३).

---

# अनुक्रमणिका

येथे प्रत्येक प्रकरणातील सामान्यतः प्रत्येक परिच्छेदाला त्या प्रकरणापुरते स्वतंत्र अंक दिले आहेत व त्या अंकानुसार ही अनुक्रमणिका तयार केली आहे. परिच्छेदातील मुख्य विषय तेवढाच अनुक्रमणिकेत नोंदला आहे. पण त्याशिवायही इतर विषयांची त्या त्या परिच्छेदांतून माहिती आली आहे. पहिल्या प्रकरणातील १ ते २७ परिच्छेदांना (पृ. ३–३२) क्रमांक पडलेले नाहीत. ते पुढीलप्रमाणे आहेत. त्यांची समजूत अशी–पहिला आकडा पृष्ठाचा, दुसरा परिच्छेदाचा व त्यापुढे त्या परिच्छेदातील पहिला शब्द. ३,१ शालिवाहन. ४,२ आपल्या. ४,३ नामदेवाचा. ५,४ वरील. ६,५ वरील. ७,६ आपेग्रामु. ९,७ ह्यावरून. १०,८ विसोबा. ११,९ असो. १३,१० ज्या वेळीं. १४,११ यांतील. १५,१२ ह्यावरून. १५,१३ आतां. १६,१४ अशी. १८,१५ याप्रमाणें. १८,१६ वरील. १९,१७ ज्ञानदेवाची. २०,१८ नामदेवाचे. २२,१९ वरील. २३,२० याप्रमाणें. २३,२१ मागे. २५,२२ त्या प्रसंगीच्या. २५,२३ शंकरदेवाच्या. २६,२४ याप्रमाणें. २९,२५ यापुढेंही. ३०,२६ नामदेवानें. ३२,२७ वरील.

**सूचना ( पृ. १ )**

**महाराष्ट्र महोदयाचा पूर्वरंग ( पृ. १ )**

**१ ले प्रकरण : शालिवाहनाचे तेरावे शतक ( पृ. ३–६२ )**

१ बाराव्या शतकातील लोकस्थिती. २ या शतकाच्या शेवटचे संत. ३ त्यांचे जन्मकाल. ४ या शतकातील शेवटचे राजे, त्यांचे प्रधान व तत्कालीन विद्वान. ५ नामदेवाचे पूर्ववृत्त. ६ ज्ञानेश्वरांचे पूर्ववृत्त व चरित्र. ७ ज्ञानेश्वरांचे उत्तर चरित्र. ८ ज्ञानदेव-नामदेव संवाद. ९ नामदेव–ज्ञानदेव तीर्थयात्रा. १०,११ ज्ञानदेवांचा समाधिकाल व समाधी. १२,१३ ज्ञानदेवांचे ग्रंथ. १४ ज्ञानेश्वरकालीन समाजस्थिती. १५ ज्ञानेश्वरांची अभिमानस्थले. १६ ज्ञानेश्वरकालीन संतांचे अंतकाल. १७ त्यांची समाधिस्थाने. १८ नामदेवचरित्र. १९ नामदेवमातेचा अधिकार. २० विठ्ठलाचे नामदेवास

सहाय्य. २१ मुसलमानांचे उत्तरेत व दक्षिणेत आक्रमण. २२ 'ज्ञानेश्वरकाल-निर्णय' पुस्तकातील पत्र व त्यांतील माहिती. २३ यादव राज्याचा अंत. २४ मुसलमानांच्या दक्षिणेतील आक्रमणाची प्रगती. २५,२६ पुनः नामदेव-चरित्र. २७ हिंदू–मुसलमान सत्तांचा संधिकाल. २८ तेराव्या शतकातील मराठी कवी लेखक. २९ ब्राह्मण-ब्राह्मणेतरांचे वर्तन. ३० म्लेंच्छकृत छळ. ३१ नामदेवाचा उपदेश व माधवाचार्यांचा अवतार. ३२ हक्कबुक्क व माधवाचार्य भेट. ३३ माधवाचार्यांचे ग्रंथ. ३४ दक्षिणेत बहमनी राज्याची स्थापना. ३५ जगमित्र, चोखामेळा व नामदेव यांच्या समाधी व माधवाचार्यांचे कार्य. ३६. गुरूची लक्षणे. ३७ ज्ञानेश्वर-नामदेव संवाद. ३८ पुरुषजीवन पद्धती. ३९ ईश्वरी साक्षात्कार व मुक्ति. ४० माधवाचार्य–कार्य व ग्रंथसंपत्ति. ४१ अलाउद्दीन बहमनी व हक्कबुक्क यांचे राज्यबळकटीसाठी प्रयत्न, विजयनगरवर्णन. ४२ मुहम्मद बहमनीचा पराक्रम. ४३ मुहम्मदाचे पलायन.

**२ रे प्रकरण : शालिवाहनाचे चौदावें शतक ( पृ. ६२-१५६)**

१ माधवाचार्य–कार्यमहती. २ महाराष्ट्रात मुसलमानी राज्य, ३ ऱ्या हरिहराचे पराक्रम. ४ बहमनी राज्यात अराजक, दुर्गादेवीचा दुष्काळ. ५ बहमनी राज्यातील अंदाधुंदी. ६ श्रीपादवल्लभ व नृसिंहसरस्वती यांचे अवतार. ७ या दोन अवतारांची माहिती. ८ सरस्वतीगंगाधर, सायंदेव इत्यादींचा काल. ९ देवरायाचा खून व फिरूझशाहाचा जय. १० दुसऱ्या देवरायाचा काल. ११ पर्थालची कथा. १२ देवरायाची कामुकता. १३ तिचा परिणाम. १४ देवरायाचा पर्थालसाठी प्रयत्न. १५ फीरूझशाह व देवराय यांच्या झटापटी व त्यांचे परिणाम, देवरायकन्या व फीरूझ यांचा विवाह. १६ पर्थालचे फीरूझशाहाच्या मुलाशी लग्न. १७ देवरायमृत्यू व वीरविजय गादीवर; फीरूझशाहाची स्वारी. १८ दुसऱ्या देवरायाचा पराक्रम. १९ फीरूझचा मृत्यू व अहमद गादीवर. २० दुसऱ्या देवरायाचा पराक्रम. २१ अहमदशाहाचा धुडगूस. २२ अहमदची दाणादाण व पुन: संघटना. २३ अहमदाचा मृत्यू व त्याचा मुलगा गादीवर. २४ अलाउद्दीन = गुरुचरित्रातील रजक. २५ रजकाचा उद्धार. २६ नृसिंहसरस्वतींचा अवतार. २७ नृसिंहसरस्वतींचे अलौकिकत्व. २८ नृसिंहसरस्वती व त्यांची माता यांचा संवाद आणि नृसिंहसरस्वतींचे आश्वासन. २९ यावनी सत्तेचे दुष्परिणाम. ३० श्रीगुरूंचे चम-

त्कार. ३१ श्रीगुरूंचे सामर्थ्य. ३२ श्रीगुरूंची नित्यनैमित्तिक कार्यावरील निष्ठा. ३५ अन्ननिषेध. ३६ ब्रह्मकर्माचें महत्त्व. ३७ श्रीगुरू व सायंदेव भेट. ३८ रजक सुल्तानाची उदारता. ३९ दक्षिणी व उत्तरी मुसलमान असा भेद. मलिकुत्तुज्जारची कोकणावरील अयशस्वी स्वारी. ४१ महमूद गावानची कोंकणावर स्वारी. ४२,४३ दुसऱ्या देवरायाच्या खुनाचा प्रयत्न व उडालेला गोंधळ. ४४ हेच प्रकरण पुढे चालू. ४५ ह्या गोंधळाचा बहमनी सुल्तानानें घेतलेला फायदा. ४७ देवराय व बहमनी सुल्तान यांच्या झटापटी. ४८ बहमनी वंशातील लढालढी. ४९ बहमनी सुल्तानाच्या स्वाऱ्या व धर्मच्छल. ५० हेच प्रकरण पुढे चालू. ५१ बहमनी पादशाहीचे तुकडे व काही संतांचा उदय. ५२,५३ दामाजीपंताची विशेष माहिती.

**३ रे प्रकरण-शालिवाहनाचें पंधरावें शतक ( पृ. १५६–२८२ )**

१ बहमनी सुल्तानाकडून हिंदूंचा छळ व लुटालूट. २ महमूद गावानच्या सुधारणा व वध. ३ बहमनी पादशाहीचे पाच तुकडे. ४,५ विजयनगर राज्याविषयी काही माहिती. ६–८ पोर्तुगीजांचे आगमन व त्यांचे अत्याचार. ९,१० हिंदूंचे दुर्गुण व त्यांचा पोर्तुगीजांनी घेतलेला फायदा. ११-१९ चांगा मुधेश–चरित्र. २० बहमनी पादशाहीचे तुकडे व पोर्तुगीजांकडून छळ. २१ पोर्तुगीजांकडून छळ पुढे चालू. २२ कृष्णदेवरायाची कारकिर्द. २३ कृष्णदेवराय व इस्माईल आदिलशाह यांच्या झटापटी. २४ कृष्णरायाकडून अंतर्गत बंडाचा मोड. २५–२७ कृष्णदेवरायाचे औद्योगिक व सांस्कृतिक कार्य. २८–३० भानुदासचरित्र व विठ्ठलमूर्तीचे प्रकरण. ३१ अच्युतरायाची कारकिर्द. ३२ विजयनगरकर व पोर्तुगीज यांचा तह. ३३,३४ पोर्तुगीजांच्या आक्रमक हालचाली. ३५ गुजरात सुल्तान बहादुरशाह व पोर्तुगीज यांचा तह. ३६-४० पोर्तुगीजांच्या आक्रमक हालचाली व हिंदूंचा धर्मच्छल. ४१ सदाशिवरायाची कारकिर्द. ४२ रामरायाचे पूर्वचरित्र. ४३ बरीदशाहीचा अंत. ४४ बुर्हान निजाम, इब्राहीम आदिल व कुतबशाह यांचीं भांडणें. ४५ विजयनगरकर-पोर्तुगीज तह, मुसलमानी शाह्या व रामराय यांची आपसांतील भांडणे. ४६ रामरायाचे वर्चस्व. ४७ रामरायाचा अहमदनगरास वेढा घालणे व उठविणे आणि विजयनगर येथील सांस्कृतिक कार्य. ४८ पोर्तुगीजांच्या आक्रमक हालचाली. ४९–५५ राघवचैतन्य किंवा बाबा चैतन्य व

केशव चैतन्य यांची चरित्रे. ५६ मुसल्मानी सत्तांचा रामरायाविरुद्ध कट आणि मराठ्यांची मुसल्मानी राज्यांतील सेवावृत्ती, तत्कालीन साधु-संत-महंत यांमधील वैगुण्य. ५७-६१ राक्षसतागडीची लढाई व तिचा परिणाम. ६२ सुल्तानांत मतभेद. ६३ अलीआदिलची चढाई व त्याचा खून, विजयनगरची पुढील हकीकत. ६४-६६ विजयनगरकर व मराठे यांची संकीर्ण माहिती. ६७ बाबा चैतन्य चरित्र. ६८ एकनाथाचे पूर्वचरित्र. ६९ दासोपंत चरित्र. ७० महालिंगदास व इतर. ७१-७४ महालिंगदास-चरित्र व ग्रंथ. ७५-७९ बालबोधकर्ता त्र्यंबक स्वामी—चरित्र व ग्रंथ.

## परिशिष्ट : महाराष्ट्रप्रभात ( पृ. २८३-३३४ )

पृ. २८३ महाराष्ट्रप्रभात हा लेख लिहिण्याचा उद्देश व व्याप्ति. २८५ मुक्तेश्वराच्या संक्षेपरामायणांतील उतारा व त्याचा अर्थ. २८८ महालिंग-दासाच्या विक्रमबत्तिशींतील उतारे व त्यांचा अर्थ. २९९ एकनाथजन्मशक-निर्णय. २९५ एकनाथाची कुलपरंपरा. ३०३ एकनाथजन्मकालीन परिस्थिति. ३०९ पूर्वेतिहासाचें तात्विक समालोचन. ३१५ एकनाथाची गुरुपरंपरा. ३२० एकनाथाची ग्रंथसंपत्ति, त्यांचे काल, त्यांची रचनास्थळे, त्यांचे विषय व त्यांतील विचारसंपत्ति.

सूची ( पृ. ३३५ )

---

# सूचना

या प्रकरणाच्या १९३ व्या पृष्ठामध्यें भानुदाससंबंधीं टीपेंत श्रीविठ्ठलाची मूर्ती भानुदासांनीं अनागोंदीहून आणिली इत्यादि वृत्तांतास प्रत्यंतर पुरावा नाहीं, म्हटलें आहे. परंतु त्यास रा. वि. का. राजवाडे ह्यांनीं ग्रंथमालेंत छापलेल्या चौऱ्यायशीच्या शिलालेखांत खालीलप्रमाणें पुरावा सापडतो :—

" ...यवनांनीं ह्या देवळाचा व आंतील मूर्ती भंग करण्याचा प्रयत्न केला; तेव्हां अनागोंदी येथील तत्कालीन राजानें विठोबाची मूर्ती हंपीस नेली व तिची स्थापना त्या शहरीं केली, अशी एक लोकवार्ता आहे. ही लोकवार्ता खरी आहे असें हंपी येथील खालील शिलालेखावरून दिसून येतें.

स्वस्तिश्रीविजयाभ्युदय शालिवाहन शक वर्ष १४३५ नेय श्रीमुखि संवत्सर चैत्र शुद्ध ५ यल्लू श्रीमन्महाराजाधिराजपरमेश्वरयल्लू वीरप्रताप श्रीवीर कृष्णरायमहारायनु श्रीविठ्ठलदेवर अमृतपडिनैवेद्यक्के अंगरंगवैभोग फाल्गुण मासद रथोत्सवनित्योत्सवपक्षोत्सवमासोत्सवसंवत्सरोत्सव नित्यनैवेद्यादिदीपाराधानमदलाद पुण्यतिथिगळल्लि महापूजामहानैवेद्यक्के समर्पिशिद हुल्गीमागाणीन हरिहरपुरग्राम १ वंदु होसूरमागाणीवळगिन विरुपाक्षद ग्राम वंदु १ मोसलहासि केवळगादगोडीवळगिन गद्दे बीजवरी पंचशीमीवळगिन गापीशदिय हळेग्राम १ अंतु ग्राम ३ गोडीतेलगिन गद्दी बीजवरी मोहेरीग्रामगळिगे सल्लुव तळवारिकी सुंकजूडोबिराडा साम्य सकलसंवर्गादाय सकलभत्तादायवु उंटादवु नम्म तंम्मदि नरसण्णनायक वडियरिग्यू नम्म तायिगळु नागलादेवीअम्मनवरिग्यू ई धर्मवागि सूर्यग्रहणपुण्यकालदल्लि सर्वमान्यवागि आचंद्रार्कस्थायि आगि नडियुव मर्यादियागि धारापूर्वक वारि समर्पिशि श्रीकृष्णमहारायर पघदेवियरु चिन्नादेविअम्मन तिरुमलादेविअम्मनवरू श्रीविठ्ठलदेवरिगे गोपुरदिशिदेव नैवेद्य आरोगणिहृदयचित्तेसुवक्के समर्पिशि चिन्नद हरिवाण १ कञ्चिण तूक १९९० वेळीनीरांजनद हलिग्यार्ति ९ वंटि आरुती ८ पुरुषमृगद आरुती ३ नागावरू १ धूपार्ति १ प्रतिमार्ति १ अंतू २५ आरुती दीपाराधनिगे समर्पिशिद हासलु ई २०० माडशिद्न्न आचंद्रार्कस्थायि आगि नडियोदु ई धर्म आरु

तण्णिद्वरुव तम्म तंद्रियन्नुरु वाराणाशीयल्लि कांद्वर पापके होरगु गोहत्या ब्रह्महत्या माडिद पापक्के पात्ररागुवरु ॥ मंगलं श्रीः ॥ १३ ॥

७ ह्या शिलाशासनावरून असें दिसतें कीं, शक १४३५ श्रीमुखनाम संवत्सराच्या पूर्वी वर्ष दोन वर्षे पंढरपुराहून विठोबाची मूर्ती विजयनगरच्या कृष्णदेवानें आणून हंपीस स्थापन केली. त्या वेळीं एकनाथाचा पणजा भानुदास चांगला वयांत आलेला असावा. पुढें यवनांची क्रूरदृष्टी किंचित कमी झाल्यावर भानुदासानें हंपीहून ती मूर्ती परत आणिली असावी. कर्नाटकांतील इतर मोठमोठ्या क्षेत्रांतून विठोबाचीं देवळें फारच विरळा आढळतात. प्रख्यात असें विठोबाचें देऊळ हंपीसच तेवढें एक आहे. तें कृष्णदेवानें शक १४३५ त बांधून त्याच्या अर्चेची व उत्सवाची व्यवस्था लावून दिली. ”

———

# महाराष्ट्रमहोदयाचा पूर्वरंग

श्रीमज्ज्ञानेश्वर महाराजांनीं गीतेला मराठी भाषेचा पोशाख चढवून स्वतःबरोबरच भाविक प्राकृत जनांस अमृतानुभवाची वाट दाखवून समाधि घेतल्यावर लवकरच महाराष्ट्रसाम्राज्य लयास गेलें. परंतु बाह्यतः जरी हा मोठा फरक झाला तरी ज्ञानेश्वरांनीं महाराष्ट्रीयांच्या विचारस्वातंत्र्यास जें शुद्ध, सात्त्विक आणि ठळक वळण लावून दिलें तें कायमच झालें. ज्ञानेश्वरांचा समकालीन परंतु त्यांच्या मागें अर्धशतकावर जगलेला असा जो नामदेव, त्याला परधर्मी राजाचा काच सोसावा लागलाच. तात्पर्य काय, नामदेवापासून तों तहत तुकाराम-रामदासांपर्यंत अडीच-तीनशें वर्षांत पुढें होणाऱ्या यच्चयावत् साधुसंतांस व त्यांच्या अनुयायांस आणि त्यांच्या समकालीन सर्व स्वधर्मनिष्ठ मराठ्यांस परधर्मी राजांचा आणि राजपुरुषांचा छळ सोसावा लागला. त्या सर्वांनीं तो आपापल्यापरी ईश्वरावर श्रद्धा ठेवून सोसलाही; परंतु आपणांस हा सोसावा लागत असणारा जाच अन्याय्य आहे; हे परकी लोक आपल्या देशांत केवळ शिर-जोरपणानें घुसले आहेत; त्यांचा धर्म त्यांना जितका प्रिय आहे तितकाच आपला धर्म आपणांलाही प्रिय असला पाहिजे; ते जसे, ' ईश्वराचे आपण लाडके भक्त ' असें मानितात; तसेंच आपण मराठे लोकही ईश्वराचीं लाडकीं लेंकरेंच आहोंत; असें समजण्यास काय हरकत आहे ? ईश्वर न्यायी आहे; तो सर्वांवर सारखी दया करणारा आहे. त्याच्यापुढें हा मराठा, हा मुसलमान; पहिला नावडता, दुसरा आवडता असला भेद नाहीं. मात्र जो जसें कर्तव्य बजावील, जो जसा आपल्या धर्मास, आपल्या जन्मभूमीस, आपल्या देशबांधवांस ऐक्यानें

भजेल, तसा तो, त्याची जन्मभू, त्याचे देशबांधव परस्परांस सुखप्रद होतील, व त्या सर्वांची एकतानता होऊन सर्वांचा सारखाच उद्धार होईल. त्यांच्यांतील परस्परमत्सरामुळें त्या सर्वांची झालेली, होत असलेली व पुढें होणारीही दैना दूर होईल आणि जगांतील इतर लोकांस ते सदुदाहरण घालून देऊन वैभवाच्या शिखरावर सुखनिद्रा घेऊं शकतील. अशा प्रकारच्या सात्त्विक श्रद्धेनें, दैवी संपत्तीच्या लालसेनें, स्वदेश, स्वधर्म आणि सदाचार यांची उन्नति करणें, हेंच कर्तव्य समजून, सतत कायावाचामनें प्रयत्न करणारे महाराष्ट्रांतील आचांडाळब्राह्मण जातींतील सर्व सत्पुरुष कसे वागले आणि त्यांना व त्यांच्या स्वदेश, स्वधर्म आणि स्वजन या प्राणप्रिय त्रयीला परम श्रेयस्कर अशी उन्नति कशी प्राप्त झाली, हें दाखविण्याचा ह्या लेखाचा उद्देश आहे. म्हणजे श्रीमुकुंदज्ञानेश्वरांच्या परमामृत, अमृतानुभवानंतर दैवानें उलट खाल्यामुळें 'न हिन्दुर्न यवन:' असला प्रकार झाल्यावर श्रीसमर्थ रामदासांच्या दासबोधाची आवश्यकता कशी आली आणि तो बोध सार्थनाम कसा झाला हें दाखवावयाचें आहे.

वरील उद्देश तडीस नेण्यास अवश्य असणारी विद्वत्ता लेखकाला नाहीं; तथापि 'प्रयत्नीं परमेश्वर' ह्या वृद्धवचनावर भरंवसा ठेवून तो चालणार आहे. श्रीज्ञानेश्वरमुकुंदराजप्रभृति साधुसंतांच्या लेखांचा, तसाच बखरी, कागदपत्रें आणि राजवाडे-प्रभृति स्वेतिहासशोधकांनीं उघडकीस आणलेल्या विविध माहितीचा शक्य तितका उपयोग करून हा लेख सजविण्याचा विचार आहे.

ह्यांत तेरावें चौदावें आणि पंधरावें ह्या तीन संबंध शतकांचा महाराष्ट्राचा धार्मिक, सामाजिक आणि राजकीय

असा तिन्ही बाजूंचा संक्षिप्त इतिहास येणार आहे. तरी वाचकांनीं सावधान राहून ग्राह्य घ्यावें, त्याज्य टाकावें आणि अक्षम्य चुका असतील त्या पदरांत घालून त्या सुधारण्याचा मार्ग त्याला दाखवावा आणि परस्परांची समजूत पटवून ऐक्य साधण्याचा संकल्प करावा, एवढी विनंति करून स्वीकृत कार्यास आरंभ करितों.

# प्रकरण १ लें

## शालिवाहनाचें तेरावें शतक

तेथ यदुवंशविलास । सकळ कळानिवास ।
न्यायातें पोषी क्षितीश । श्रीरामचंद्र ॥

—ज्ञानेश्वरी, अ. १८

राजे भ्रष्ट यवन झाले । ठायीं ठायीं दोष घडले ।
मग इहीं अवतार घेतले । कलिदोष हरावया ॥
नामा म्हणे पुढें हे जन । यवनसंसर्गें कठीण ।
होता गाती हरीचे गुण । ते उद्धरती सर्वथा ॥

—नामदेवाची गाथा

शालिवाहन शकाच्या बाराव्या शतकाच्या अखेरपर्यंत वरील अवतरणांतील पहिल्या ओवींत वर्णिल्याप्रमाणें आपल्या या महाराष्ट्राची स्थिति सर्वस्वीं सुखाची होती. येथें स्वराज्य होतें व स्वधर्म उत्कर्षानें नांदत होता; परंतु तेराव्या शतकाच्या आरंभांत लवकरच ही स्थिति बदलून अवतरणांतर्गत नामदेवाच्या अभंगाप्रमाणें स्थिति झाली. आज ह्या स्थित्यंतरांतील पहिल्या शतकाचा इतिहास द्यावयाचा आहे. त्यापूर्वी सिंहाव-

लोकनन्यायानें बाराव्या शतकाच्या अखेरची आपल्या ह्या महाराष्ट्राची काय स्थिति होती तें पाहिलें पाहिजे.

आपल्या अर्वाचीन इतिहासांत धार्मिक संबंधांत आबालवृद्धांच्या ओळखीचीं झालेलीं साधुसंतांचीं नांवें म्हणजे निवृत्ति, ज्ञानदेव, सोपानदेव, मुक्ताबाई आणि नामदेव ह्यांचीं होत. हें सर्व संत ह्या स्थित्यंतरांतीलच होत. ह्या सर्वांत नामदेव वडील. त्याचप्रमाणें तो त्या सर्वांपेक्षां जास्त वांचला तेव्हां त्याच्या जन्मापासून तो अखेरपर्यंतचा इतिहास दिला म्हणजे आपलें काम उरकेल.

नामदेवाचा जन्म शके ११९२ प्रमोदसंवत्सरीं कार्तिक शुद्ध ११ रविवार ( २६ आक्टोबर १२७० इ. ) रोजीं झाला. येथें नामदेवाच्या समकालीन साधूंचेहि काळ एकदमच दिले असतां ठीक पडेल म्हणूनच तसेंच करितों.¶

गोरा कुंभार जन्म—११८९ प्रभव संवत्सर (१२६७-६८ इ०)

निवृत्तिनाथांचा जन्म—११९५ श्रीमुख संवत्सर, माघ कृष्ण १ गुरुवार ( ता. २५-१-१२७४ इ० )

ज्ञानेश्वरांचा जन्म—११९७ युवा संवत्सर, श्रावण कृष्ण ८ गुरुवार ( ता. १५-८-१२७५ इ० )

---

¶ तेरडोकीमाजी भक्त । जो वैष्णवांत अतिविरक्त ।
तयाचें चरित्र अत्यद्भुत । परिसा चित्त देवोनी ॥
कुल्लाळवंशी एक जाण । महादा कुंभार नामाभिधान ॥
तया गांवींचें वतन । करी भजन श्रीहरीचें ॥
तयापोटीं झाला सुत । गोरा कुंभार जगविख्यात ॥
अकराशें एकोणनवदांत । प्रभवनाम संवत्सर ॥
शके अकराशें पंच्याण्णव वत्सरीं । निवृत्ति उदरीं प्रगटलें ॥
सत्याण्णवाच्या साली ज्ञानदेव झाले। नव्याण्णवीं देखिलें सोपानदेव ॥
बाराशतें एकी मुक्ताई जन्मली । जनी म्हणे केली मात त्यांनीं ॥

सोपानदेवाचा जन्म—११९९ ईश्वर संवत्सर, कार्तिक शुद्ध १५ शुक्रवार ( ता. १२-११-१२७७ इ० )

मुक्ताबाईचा जन्म—१२०१ प्रमाथी संवत्सर, आश्विन शुद्ध १ शुक्रवार ( ता. ८-९-१२७९ इ० )

वरील सर्व साधुसंतांच्या जन्मकाळीं देवगिरी येथील यादव राजे हे महाराष्ट्राचे, किंबहुना सर्व दक्षिण हिंदुस्थानचे सार्वभौम होते. कारण पंढरपूर येथें शके ११९२ प्रमोदनाम संवत्सरांतील एक कोरीव लेख आहे, त्यांत 'प्रौढप्रताप चक्रवर्ती' असें विशेषण देऊन यादवराज महादेव त्या काळीं राज्य करीत होता, असें वर्णन आहे. हा लेख कोणी एका काश्यपगोत्री ब्राह्मण संस्थानिकानें तेथें आप्तोर्यामनामक यज्ञ केल्याबद्दलचा आहे. शके बाराशें त्र्याण्णवांत, ज्याला श्रीज्ञानेश्वर महाराज ' सकल कलानिवास, यदुवंशविलास, न्यायातें पोषी क्षितीश, ' असें म्हणतात, तो श्रीरामचंद्र गादीवर आला. हा पूर्वीच्या महादेवाचा पुतण्या. ह्यालाच रामदेव, रामराज अशीं नांवें आहेत. ह्या रामदेवाचें राज्य चांगलेंच विस्तृत होतें. ह्याचे शिलालेख म्हैसूरपर्यंत दक्षिणेंत आढळतात. ह्या रामचंद्राचा कोंकणांत अंमल करणारा प्रतिनिधी कोणी एक भारद्वाजगोत्री कृष्ण नांवाचा ब्राह्मण होता. ठाणें येथें ह्या कृष्णाच्या नांवाचें म्हणजे त्यानें करून दिलेलें एक दानपत्र आहे. दुसरें एक अच्युत नामक संस्थानिकाचें शके ११९४ मधील दानपत्र आहे. हा अच्युतही ब्राह्मणच होता. ह्या रामचंद्राचा प्रधान ' श्रीकरणाधिप हेमाद्रि ' ह्या नांवाचा एक वत्सगोत्री ब्राह्मण होता. हा रामचंद्राच्या पूर्वी महादेवाचाही प्रधान होता. त्यानें व्रतखंड नामक ग्रंथ लिहिला असून त्यांत ' अगदीं मुळापासून यादव वंशाचा मोठा अमोलिक वृत्तांत लिहिलेला आहे, आणि त्यांतील

बहुतेक भाग निःसंशय खरा ऐतिहासिक आहे' असें डॉ. भांडारकर सुद्धां सांगतात. ह्या हेमाद्रीसच हेमाडपंत हें लौकिक नाम आहे. हा मोठा ग्रंथकार होता व स्वतां अत्यंत विद्वान् असून विद्वानांचा चहाता आणि आश्रयदाता होता. चतुर्वर्गचिंतामणि नामक ग्रंथ ह्याचाच. हेमाद्रीच्या आश्रयास असणाऱ्या विद्वानांतच बोपदेव म्हणून एक प्रख्यात ग्रंथकार होऊन गेला. ह्याचे मुक्ताफल (वैष्णवमत प्रतिपादक टीकाग्रंथ), हरिलीला ( भागवत पुराणाचें सार ) आणि मुग्धबोध म्हणून एक व्याकरणग्रंथ, असे तीन ग्रंथ सुप्रसिद्ध आहेत. वैद्यशास्त्र-विषयकही ह्या बोपदेवाचे कांहीं ग्रंथ आहेत. हेमाडपंती घरें, देवळें वगैरे बांधण्याची पद्धति सर्वश्रुतच आहे. पंढरपूरचें विठोबाचें देवालय, गाभारा व मुख्य सभामंडप हीं हेमाडपंतीच आहेत. त्याचप्रमाणें मोडी लिपी प्रथम यानें प्रचारांत आणिली असेंहि म्हणतात.

वरील संक्षिप्त कथानकावरून ज्ञानेश्वरादि साधुसंतांच्या जन्मकालाच्या स्थितीचा चांगलाच बोध होईल, असें मानण्यास कांहीं हरकत नाहीं. आतां आपण ज्ञानेश्वर, नामदेव वगैरेंच्या बाल्याबद्दल कांहीं विचार करूं. नामदेव हा नरसीगांवचा दामाशेट शिंपी याचा मुलगा. ह्याची आई गोणाई. नामदेव हें, दामा व गोणाई ह्या दांपत्याचें दुसरें अपत्य होय. पहिलें अपत्य मुलगी होती. तिचें नांव आऊबाई. ही कल्याणीसच झाली. नंतर पुत्राकरितां आतुर झालेल्या ह्या दांपत्यास नामदेव झाला. चिद्घन स्वामींनीं भक्तकथामृतसारांत—

वयाचे अष्टदशीं। प्रसन्न होउनी हृषीकेशी।
दामशेटी गोणाईचे कुशीं। नामदेव अवतरले ॥

असें सांगितलें आहे, त्यावरून दामशेटीस प्रथम अपत्य

सोळावे वर्षीच झालें असलें पाहिजे हें उघड आहे. नामदेवांनीं आपला जन्मकाल–

माझें जन्मपत्र बाबाजी ब्राह्मणें। लिहिलें त्याची खूण साल ऐका ॥
अधिक ब्याण्णव गणित अकरा शतें। उगवतां आदित्य
तेजोराशी ( रोहिणीशीं )
शुक्ल एकादशी कार्तिकी रविवार। प्रमोद संवत्सर शालिवाहन शक ॥

असा दिला आहे. आणि तो पंचांगाशीं नीट मिळतोही. आपले जन्मपत्रांतच पुढें--

प्रसवली माता मज मलमूत्रीं। तेव्हां जिव्हेवरी लिहिलें देवें ॥
शतकोटी अभंग करील प्रतिज्ञा। नाममंत्र खुणा वाचुनी पाहे ॥
ऐशी वर्षें आयुष्यपत्रिका प्रमाण। नामसंकीर्तन नामया वृद्धि ॥

असें वर्णन नामदेव करितात. त्यावरून त्यांचें अवतारकार्य ठरल्यासारखेंच होतें. आतां आपण निवृत्तिज्ञानदेव यांच्या बाळपणाकडे वळूं.

आपेग्राम वासु। त्र्यंबकपंत मूळ पुरुषु।
मग गोविंदपंतें वंशु। विस्तारिला ॥

——ज्ञानेश्वरांचें स्वात्मपत्र.

वरील ओवींतील गोविंदपंतांचे चिरंजीव विठ्ठलपंत यांस आळंदीच्या सिद्धेश्वरपंत कुळकर्ण्यांनीं आपली मुलगी दिली होती. ह्या मुलीच्या म्हणजे रखुमाबाईच्या कुशींत निवृत्ति, ज्ञानदेव, सोपानदेव, मुक्ताबाई हीं चार रत्नें जन्मास आलीं. वैराग्य होऊन विठ्ठलपंतांनीं स्त्रीची आज्ञा न घेतांच पळून जाऊन क्षेत्रवास केला होता. तेथें काशीस त्यांनीं रामानंद नांवाच्या एका ब्रह्मनिष्ठ संन्याशाची सेवा केली आणि योगसाधनापूर्वक शेवटीं संन्यासही घेतला. आपणांस स्त्रीपरिवार नाहीं, असें खोटेंच सांगून विठ्ठलपंतांनीं संन्यासदीक्षा देण्यास रामानंद गुरुजींचें मन वळविलें होतें. पुढें रामानंद तीर्थप्रवास करीत

करीत जेव्हां दक्षिणेंत आले तेव्हां ते सहजगत्या आळंदीस आले. विठ्ठलपंत गुरूच्या मठरक्षणार्थ मागें राहिले होते. आळंदीस सोन्याचे पिंपळाचे पारावर सहजगत्या रखुमाबाईनें ह्या ब्रह्मनिष्ठ संन्याशाच्या पायांवर डोकें ठेविलें, तेव्हां त्यांनीं तिला 'सौभाग्यवती पुत्रवती भव' असा आशीर्वाद दिला. परंतु आपला आशीर्वाद व्यर्थ आहे, हें त्यांस रखुमाबाईच्या तोंडून कळतांच त्यांनीं परत जाऊन आपल्या शिष्यास फिरून गृहस्थाश्रम स्वीकारण्याची आज्ञा दिली. विठ्ठलपंत परत आले. त्यानंतर त्यांना वरील संतति झाली. उभयतां मातापितरें, विठ्ठलपंत व रखुमाबाई, मुलें लहान असतांच वारलीं. सगळ्यांत वडील निवृत्तिनाथांनीं आपल्या भावंडांसह मोठ्या धैर्यानें कालक्रमणा केली. लोकांनीं ह्या सर्वांस संन्याशाचीं मुलें म्हणून बहिष्कृत केलें होतें. वास्तविक गुर्वाज्ञा आणि 'तुझ्यापासून तुझ्या स्त्रीच्या पोटीं तीन पुत्र आणि एक कन्या ईश्वरांशांनीं उत्पन्न होतील आणि तीं आपल्या नांवानेंच जगतास तारतील' असा प्रत्यक्ष गुरु रामानंदांचा विठ्ठलपंतांस आशीर्वाद होता. त्याप्रमाणें हीं मुलें तशींच ज्ञानी निपजलीं. निवृत्तिनाथांनीं आईबाप मरतांच केवळ त्यांची बाल्यावस्था होती तरी त्र्यंबकेश्वरीं जाऊन उग्र तपश्चर्या केली. तेथें ब्रह्मगिरीस प्रदक्षिणा घालीत असता व्याघ्रभयानें ते एका गुहेंत शिरले. तेथें त्यांस गहिनीनाथ भेटले. त्यांनीं निवृत्तिनाथांचा पूर्णाधिकार जाणून त्यांना ब्रह्मोपदेश केला. निवृत्तिनाथांनीं तोच उपदेश यथाक्रम आपल्या ज्ञानेश्वरादिक भावंडांस केला आणि नंतर ते पैठणास आपणांस प्रायश्चित्तपूर्वक शुद्धिपत्र मिळावें म्हणून तेथील ब्रह्मवृंदाकडे गेले. तेथील ब्राह्मणांनीं—

परी एकची उपाय यातें । बोलिला असे शास्त्रमतें ।
तो करितील तरी यातें । प्रायश्चित्त कासया ? ॥
श्रीहरीस जाऊन शरण । सर्वाभूतीं करावें भजन ।
गोखरगजादिश्वान । समसमान वंदावें ॥

असा उपदेश केला. त्याप्रमाणें ते तेथेंच वर्तू लागले असतां त्यांच्या ब्रह्मनिष्ठतेची व भक्तीची साक्ष पटून शेवटीं तेथील ब्राह्मणांनीं—

हे वेदत्रय मूर्तिमंत । यांसी न चले प्रायश्चित्त ।
कीं जगद्गुरु देहातीत । जीवन्मुक्त असती हे ॥

याप्रमाणें म्हणून त्यांना शुद्धिपत्रही दिलें. रेड्यामुखीं वेद बोलविणें वगैरे चमत्कार येथेंच झाले. ज्ञानेश्वरांस मिळालेल्या शुद्धिपत्राची रचना सुप्रसिद्ध कवी बोपदेव यानें गद्यपद्यमिश्रित केली आहे. ह्या बोपदेवाची हकीकत पुढें येणारच आहे. शुद्धिपत्रांतील शेवटचे श्लोक खालीलप्रमाणें आहेत :

निध्यम्बरयमक्षोणीसंयुते शालिवाहने ।
माघे शुक्ले च पञ्चम्यां सर्वजिन्नामवत्सरे ॥
श्रीमज्ज्ञानेशचरणयुगुले सुरसेविते ।
बोपदेवेन ग्रथितं शुद्धिपत्रं समर्पितम् ॥ *

ह्यावरुन शके १२०९ सर्वजिन्नामसंवत्सर माघ शुक्ल पंचमी ही शुद्धिपत्राची मिति निघते. ह्यापुढें सच्चिदानंदबाबांच्याच 'ज्ञानेश्वर-विजय' ग्रंथाप्रमाणें ते म्हाळसापुरास म्हणजे नेवाशास आले. तेथेंच त्यांनीं मृत झालेल्या सच्चिदानंदबाबांस जीवंत केलें. पुढें भगवद्गीतेवर निवृत्तिराजांच्या आज्ञेनें टीका केली. तीच सच्चिदानंदबाबांनीं लिहिली. पुढें आळें गांवास येऊन रेड्याला

---

*( जास्त माहिती ' ज्ञानेश्वरमहाराज यांचा कालनिर्णय व संक्षित चरित्र ' या नांवाच्या ह. प. श्रीपतीबुवा भिंगारकर यांच्या पुस्तकांत पहावी. )

समाधी दिली. नंतर विसोबा खेचरांस उपदेश दिला आहे. ह्या विसोबा खेचरांनीं नामदेवास उपदेश दिला. ज्ञानेश्वरीची मितिही चोख आहेच.

शके बाराशें बारोत्तरें । तैं टीका केली ज्ञानेश्वरें ।
सच्चिदानंदबाबा आदरें । लेखकू झाला ॥

ह्या ज्ञानेश्वरीच्या अंतींचा सच्चिदानंदांचा शेरा व

श्रीगुरुचरणीं अत्यादरें । समर्पिली असे ॥

अशी त्याच सच्चिदानंबावांची ज्ञानेश्वरीविजयांत शेवटीं ओवी आहे.

विसोबा खेचरांचे गुरु ज्ञानेश्वर असल्याबद्दल त्यांनीच एक अभंग केला आहे, त्यावरून साक्ष पटते. त्या अभंगांत ज्ञानेश्वरांची जन्मतिथिही आहे.

महाविष्णूचा अवतार । श्रीगुरु माझा ज्ञानेश्वर ॥
शके अकराशें सत्याण्णव । युवा संवत्सर नांव ॥
वर्षाऋतु श्रावणमास । कृष्णपक्ष पर्वदिवस ॥
अष्टमीचे अपर रातीं । उदया आला निशापती ॥
विठ्ठल रखुमाईचे कुशीं । अवतरले हृषीकेशी ॥
विश्व तारावया आले । खेचर वंदितो पाउलें ॥

ह्या सर्वांवरून शके १२१२ च्या पुढें शके १२१३ त केव्हां तरी ज्ञानदेव पंढरपुरास आले असावेत. तेथें आल्यावर त्यांनीं नामदेवांस खालीलप्रमाणें आग्रह केला :

ज्ञानदेव म्हणे भक्त तूं शिरोमणी । जोडिले जन्मोनि केशवचरण ॥
प्रेमसुख गोडी तुजचि पावली । वासना मावळली सकळ तुझी ॥
भक्तिप्रेम धन्य साधलें तुवां सार । केला पैं संसार देशधडी ॥
क्षण एक एकांतीं बैसोनि सहज । अंतरीचें गूज बोलों कांहीं ॥
जीवन्मुक्त ज्ञानी जरी झाले पावन । तरी देवतीर्थ भजन न सांडिती ॥

भक्तशिरोमणि धन्य तूं संसारीं । परि एक अवधारी वचन माझें ॥
भूतळींचीं तीर्थें पहावया नयनीं । असे आर्त मनीं विष्णुदासा ॥
तुझिये संगतीचें नित्य सुख घ्यावें । सार्थक करावें संसाराचें ॥
ऐसी हे उत्कंठा बहुत माझे मनीं । भाग्यें झाली ये दिनीं भेटी तुजसी ॥
ज्ञानदेव म्हणे पुरवी मनोरथ । करावे मुहूर्त प्रयाणासी ॥

यावर—

नामा म्हणे तुम्हीं पुसावें विठ्ठला । देता आज्ञा मला मीही येतां ॥

असें नामदेवांचें उत्तर आहे. देवानें मोठ्या कष्टानें आज्ञा दिली. नामदेव गेला; परंतु—

सुखरूप दोघे चालताती मार्गीं । परि चित्त पांडुरंगीं नामयाचें ॥
चिंतातुर थोर पडिलों ये परजनीं । न दिसे माझें कोणी जिवलग ॥
क्षणक्षणा वास परतोनी पाहे । न साहे वियोग पंढरीचा ॥

अशी त्याची स्थिति झाली. ज्ञानदेवांनीं 'सुखानंद तुझा तुज जवळची' म्हणून त्याची समजूत घालण्याचा यत्न केला तरी त्यानें—

सर्वभावें मज तेंचि स्वरूप आवडे । जें पुंडलिकापुढें उभें असे ॥

असाच हट्ट चालविला होता. त्यावरून ज्ञानदेवाबरोबरचा नामदेवांचा तीर्थप्रवास गुरुपसंतीच्या अगोदर ठरतो.

असो; नामदेव व ज्ञानदेव ह्या दोघां साधूंची जोडी तीर्थ-यात्रेस शके १२१३ च्या आंत खात्रीनें गेली नाहीं, असा तात्पर्यार्थ वरील विधानाचा सहजच निघतो. शके १२१३ च्या अखेरीस म्हणजे अर्थात् इ. स. १२९१ च्या सुमारास हे सुप्रसिद्ध महाराष्ट्रसंत —

पश्चिम प्रभास आदी करोनी द्वारका ।
पाहिल्या सकलिका मोक्षपुऱ्या ॥

ह्या नामदेवाच्याच अभंगांतील क्रमानें देशोदेशींचीं तीर्थें पावन करीत गेले. ह्याच सुमारास दिल्लीस खिलजी घराणें

प्रस्थापित झालेलें असून त्या घराण्यांतील जलालउद्दीन नामक पहिला मुसल्मान बादशहा तक्तावर होता, व त्याचा पुतण्या अल्लाउद्दिन खिलजी हा एक मोठा सुभेदार असे. त्यानें ह्याच सुमारास प्रथम गुजराथ, नंतर महाराष्ट्र आणि लगेच राजपुतान्यांत मेवाड ह्या तीन हिंदुराज्यांत धुमाळी मांडली. गुजराथेंत अनिलपट्टणास कर्णराज वाघेला ( करण घेलो ) हा राज्य करीत होता. राजपुतान्यांत मेवाडची राजधानी चितोड येथें राणा लखमसी राज्यावर होता. तो वयानें लहान असल्यामुळें त्याचा चुलता भीमसिंग मुख्यत्वें सर्व कारभार पाहात असे. आणि महाराष्ट्रांत देवगिरीस रामचंद्रराव जाधव हा राजा होता, हें मागें सांगितलेंच आहे. मेवाडांत राणी पद्मिनी म्हणून सीलोनच्या हम्मीर संकाची अत्यंत रूपवती मुलगी भीमसिंगाची बायको होती. हिच्यावर अल्लाउद्दिनाची वांकडी नजर जाऊन त्यानें चितोडला वेढा घातला. पुढील गोष्ट सर्वांस थोडी फार माहीतच आहे. मुद्याची गोष्ट इतकीच कीं, चितोडची लढाई इ. स. १२९० त सुरू झाली ती १३०३ मध्यें चितोडांत अल्लाचा प्रवेश, राणी पद्मिनीसह हजारों स्त्रियांनीं जोहार करुन घेतल्यावर झाला, तेव्हां संपली. कर्णराजावर ह्याच सुमारास ह्या राक्षसी अल्लाची वक्र दृष्टि होऊन त्याचाही पुरा मोड, त्याची कौलादेवी नांवाची अत्यंत रूपवती स्त्री सुमारें १२९७ इ. मध्यें अल्लाच्या हातांत सांपडून झाला. रामदेवावरही अल्लाउद्दिनाची प्रथम स्वारी शके १२१६ त म्हणजे इ. स. १२९४ त झाली. आणि पुष्कळ तजवीज करून कांहीं वळेनासें झाल्यामुळें रामदेवराव जाधवास अल्लाउद्दीनास जबरदस्त खंडणी व कांहीं थोडा मुलूखही देऊन त्या राक्षसाला कसा तरी वेढा उठवून लावून द्यावें लागलें.

मागें सांगितलेल्या कौलादेवीची मुलगी देवलदेवी गुजराथची राजकन्या ही ह्याच रामदेवराव जाधवाच्या शंकर नांवाच्या मुलास द्यावयाचें ठरलें होतें; आणि त्याप्रमाणें वनवासांत भटकत असलेल्या तिच्या बापापासून तिला सुरक्षितपणें घेऊन येण्यास शंकरदेव जाधवाचा भाऊ भीमदेव बागलाणांतून थोड्याशा सरंजामानिशीं गेला होता; परंतु तिच्यासह तो परत येत असतांना वाटेंत आलफखान नांवाच्या अल्लाउद्दिनाच्या सरदाराशीं त्याचा सामना झाला. त्यांत देवलदेवी शत्रूच्या हातांत सांपडली व तिचें पुढें अल्लाउद्दीनाचा वडील मुलगा खिझ्रखान ह्याच्याशीं लग्न लावून देण्यांत आलें. कौलादेवी ( देवलदेवीची आई ) ही अल्लाच्या खास जनान्यांत मागेंच सामील झाली होती.

ज्या वेळीं राजकीय वातावरण वरीलप्रमाणें अत्यंत क्षुब्ध होतें, त्याच सुमारास नामदेवज्ञानदेवांचा तीर्थयात्रेच्या संबंधानें जिकडे जिकडे म्हणून प्रवास झाला असेल, तिकडे तिकडे त्यांना मुसल्मानांच्या आणि हिंदूंच्या लढाया, त्यांत मुसल्मानांची निरर्गल वर्तणूक आणि दुर्दैवानें त्यांचा जयच जय पाहण्या-ऐकण्यावांचून गत्यंतरच नव्हतें, असें आतां वाचकांच्या अचूक ध्यानांत येईल, अशी आशा आहे. कारण ज्ञानदेवांची समाधि शके १२१८ दुर्मुखनाम संवत्सर मिति कार्तिक कृष्ण १३ गुरुवार म्हणजे ता. २५ ऑक्टोबर इ. स. १२९६ रोजीं झाली. तीर्थयात्रा हे ज्ञानदेवांचें इहलोकचें शेवटचें कृत्य. त्यानंतर सुमारें वर्षाच्या आंतच त्यांनीं आळंदी येथें समाधि घेतली, हें त्यांच्या समाधीवरील नामदेवांचे अभंगावरून व इतरही पडताळ्याच्या गोष्टींवरून सिद्धच आहे. तेव्हां त्यांचा प्रवास सरासरी शके १२१३ च्या अंतापासून तों शके १२१७ च्या अंतापर्यंतच्या

अवधींत झाला असला पाहिजे. नामदेवांस विसोबा खेचरांचा गुरूपदेश, ते तीर्थयात्रेहून परत आल्यावरच झाला आहे. असो; तात्पर्य, इतकेंच कीं, शके १२१३ ते १२१७ म्हणजे इ. स. १२९१ ते १२९५ ह्या काळांत जो ह्या संतद्वयास प्रवास घडला, त्यांत महंमदी हैदोसाचें पूर्ण स्वरूप त्या दोघांच्याही नजरेस आलें असलेंच पाहिजे, म्हणून जें वर म्हटलें आहे तें उलटसुलट दोन्ही प्रकारांनीं सिद्ध होतें. आणि न जाणों, कदाचित् तीर्थयात्रेहून परत येतांना ज्ञानेश्वरांनीं जी इतक्या लवकर समाधी घेतली त्यास देशांत होत असलेल्या ह्या अत्यंत अनिष्ट क्रांतीचा तिटकारा हेंहि कारण नसेल कशावरून ? आपल्या समाधीबद्दल ज्ञानदेवांनींच आपल्या 'स्वात्मपत्रां'त खालीलप्रमाणें ओवी घालून खुलासा केला आहे :

शके बाराशें अष्टादशीं । कृष्णपक्ष कार्तिक मासीं ॥
गुरुवार त्रयोदशी । **समाधिसी बैसविलें** ॥

यांतील '**समाधीसी बैसविलें**' हे शब्द विशेष लक्षांत ठेवण्याजोगे आहेत. ज्ञानेश्वरांच्या ग्रंथभांडाराबद्दलही त्यांचे परम शिष्य जे विसोबा खेचर आणि नातशिष्य नामदेव यांच्या अभंगांतून भरपूर माहिती मिळते.

विसोबा खेचर म्हणतात :

भगवद्गीतेवरी टीका । केली भावार्थदीपिका ।
अमृत-अनुभव करुनि निका । योगवासिष्ठ स्वात्मपत्र ॥

नामदेव म्हणतात :

वेदाचें पैं सार निर्मिली ती गीता । तीचा अर्थ चित्ता असों द्यावा ॥
संस्कृत भाषा जगासी कळेना । म्हणुनी नारायणा दया आली ॥
देवाजीनें त्वरें घेतला अवतार । म्हणती ज्ञानेश्वर तयालागीं ॥
गीता शोधूनियां अर्थ तो काढिला । ग्रंथ आरंभिला ज्ञानेश्वरी ॥

ज्ञानेश्वरी ग्रंथ साराहूनि सार । फोडिलें भांडार वैकुंठींचें ॥
नामा म्हणे माझा ज्ञानराज प्राण । तयाचे चरण वंदीन मी ॥

शिवाय नामदेवकृत ज्ञानदेवाच्या समाधीच्या अभंगांत त्यांनीं प्रत्यक्ष श्रीविठ्ठलाच्या मुखांतील उद्गाररूपी—

तुवां जो ग्रंथअनुभव । गीतार्थ दाखविला भाव ॥
तें मुख्य ठेवणें राणीव । अनुभवी जाणती ॥
तैसाचि अमृत-अनुभव । सिद्धिपीठ केलें सर्व ।
दावोनि मनोहर राणीव । गुजगुह्य आमुचें ॥
वासिष्ठ गीतेचो टीका । ग्रंथ रचिला नेटका ।
भावार्थ काढिला श्लोका । ग्रंथरचना दाविली ॥

असा अभंग घातला आहे.

ह्यावरून १. ज्ञानेश्वरी किंवा भावार्थदीपिका, २. अमृतानुभव ३. योगवासिष्ठ टीका ४. स्वात्मपत्र (आत्मचरित्र) इत्यादि मुख्य व चांगदेवपासष्टी, शुकाष्टक, दिव्यनमन आणि जवळजवळ सातआठशें लहान मोठे अभंग इतका ज्ञानेश्वरांचा ग्रंथसमूह आहे हें सिद्ध होतें. त्यांच्या स्फुट अभंगांत सगुण भक्ति हा विषय फारच चांगल्या तऱ्हेनें प्रतिपादिला आहे. या सगुण भक्तीवर त्यांचे चांगले साटपाऊणशें अभंग आहेत. त्यांपैकीं कित्येक दहादहा पंधरापंधरा कडव्यांचे असून त्यांत सर्व तऱ्हेचीं साधकबाधक कारणें विचारांत घेऊन सामान्यतः सर्वांनीं सगुण भक्तीच म्हणजे मूर्तिपूजाच केली पाहिजे; असा सिद्धांत ठरविला असून शिवाय वर्णाश्रमधर्मही पाळावेत, त्यांचा त्याग करून कांहीं फायदा नाहीं, तर उलट एकंदरींत तोटाच होणार आहे, असेंही जोराचें प्रतिपादन आहे. निवृत्ति वगैरेंचेंही मत असेंच असल्याबद्दल त्यांच्याही अभंगांतून सुचक दाखले आहेत. त्यांचा सविस्तर विचार ह्या लेखाच्या उत्तरार्धांत होईलच.

आतां वर जो नामदेवांचा अभिप्राय ज्ञानेश्वरांच्या ग्रंथकर्तृत्वासंबंधानें दाखल केला आहे त्यावरून त्यांनीं जे ज्ञानेश्वर्यादिक

ग्रंथ केले त्याचें कारण ' संस्कृत भाषा जगासी कळेना म्हणून नारायणा दया आली. ( आणि ) देवानें त्वरें अवतार घेतला. तयालागीं ज्ञानेश्वर म्हणती ' असेंच स्पष्ट होतें. याप्रमाणें ज्ञानेश्वरांनीं, सनातन भारतधर्माचें तात्त्विक ज्ञान करून देणारे श्रीमद्भगवद्गीता, योगवासिष्ठ हे ग्रंथ मराठींत आणून कालकृत भाषाक्रांतीचे दुष्परिणाम आमच्या समाजाला भोंवून त्याची स्वधर्माच्या सनातनाचारापासून च्युति न व्हावी अशाकरितां प्रयत्न केले हें उघड आहे. त्यांचें स्वदेश, स्वधर्म आणि स्वराज्य यांजबद्दलचें प्रेम आणि अभिमान हीं किती जागृत होतीं, हें जर कोणाला पाहावयाचें असेल तर त्यानें ज्ञानेश्वरीचा शेवटचा उपसंहार पाहावा म्हणजे त्याची खात्री होईल. आम्ही त्यांतील कांहीं निवडक भाग खालीं देतों. ज्ञानेश्वरी लिहून संपली त्या वेळेस महाराष्ट्रासच केवळ नव्हे तर, गुजराथ, राजपुताना यांनाही मुसल्मानी अमलाचा धक्का बसला नव्हता, हें मागें दिलेल्या राजकीय इतिहासावरून वाचक जाणतीलच. आणि म्हणूनच ज्ञानेश्वरीच्या अंतीं ज्ञानेश्वरांनीं खालीलप्रमाणें राजकीय स्थितीबद्दल उद्गार काढिला आहे :

तेथ यदुवंशविलास । जो सकळकळानिवास
न्यायातें पोषी क्षितीश । श्रीरामचंद्र ॥

—ज्ञानेश्वरी, अ. १८ वा ओवी १८०५

अशी पूर्ण समाधानाची स्थिति श्रीज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरी-लेखनाच्या वेळची होती. त्या वेळीं स्वराज्य होतें, स्वधर्म उत्कर्षानें नांदत होता, स्वजनांस राजा रामदेवराव जाधव हा न्यायानें पाळीत होता आणि म्हणूनच

यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ।
तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ॥

—श्रीभगवद्गीता, अ. १८ श्लो. ७८

या श्लोकाचें विवरण करतांना—

गुरु तेथें ज्ञान । ज्ञानीं आत्मदर्शन ।
दर्शनीं समाधान । आथि जैसें ॥
विजयीनामें **अर्जुन** विख्यात । विजयस्वरूप **श्रीकृष्ण**-नाथ ।
श्रियेसीं विजय निश्चित । तेथेंचि असे ॥

असा श्लोकाचा सरळ व सढळ अर्थ झाल्यावरही—

तयाचियें देशींच्या झाडीं । कल्पतरूतें होडी ।
न जिणावें कां एवढीं । मायबापें असतां ॥
ते पाषाणही आघवे । चिंतारत्नें कां नोहावे ।
तिये भूमिये कां न यावें । सुवर्णत्व ॥
तयाचिया गांवींचिया । नदी अमृतें वाहाविया ।
नवल काय राया । विचारीं पां ॥
तयांचे बिसाट शब्द । सुखें म्हणों येती वेद ।
सदेह सच्चिदानंद । कां नोहावे ते ॥
पैं स्वर्गापवर्ग दोन्ही । इथें पदें तया आधीनीं ।
**श्रीकृष्ण** बाप जननी । **कमला** जया ॥

असें श्रीकृष्ण ज्या देशाचा पिता त्याचें म्हणजे स्वदेशाचेंच वर्णन श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं पूर्ण स्फूर्तीनें आणि अभिमानानें परंतु सात्त्विक श्रद्धेनें केलें आहे. श्रीकृष्णाचा म्हणजे विठोबाचा देश **मराठा** अशाबद्दल ज्ञानेश्वरांचाच एक अभंग वागलाणी म्हणजे गुजराथी व मराठी यांच्या भेसळीसारख्या भाषेंत आहे.

मे दुरथीं कर जोड्डं । तासे सेवा न जाणुं ।
मन्हा रे कान्हा मन्हा रे कान्हा । देखि कान गेणारे ॥
मन्हा रे कान्हा ॥ धृ० ॥
**तान्हा मराठा देश** । मन्ही वागलाणी भाष ॥
धटि पटि विचार । खंडे भाले तरवार ॥
बाप रखुमादेवीवरु जाण । ऐसें मन्हा काना ॥

तसेंच--

आणि तोचि हा मी आतां। श्रीव्यासाची पदें पहातां पहातां।
आणिला श्रवणपथा। मऱ्हाठीयां॥
यालागीं आम्हां प्राकृतां। देशीकारें बंधें गीता।
म्हणणें हे अनुचिता। कारण नोहे॥
आता आयती गीता जगीं। मी सांगें मऱ्हाटीया भंगीं।
येथ कं विस्मयालागीं। ठाव आहे।
याकारणें मियां। श्रीगीतार्थ मऱ्हाठीयां।
केला लोकां यया। दिठीचा विषो॥
तरी मऱ्हाठे बोल रंगे। कळवितां पैं गीतांगें।
तैं गातयाचेनि पांगें। एकाढ्यता नोहे॥
तैसेनि आइतेपणें। कवित्वा झालें हें उपेणें।
मनन निदिध्यास श्रवणें। जिंतिलें आतां॥
तो मी एक सर्वमुका। बोलोनिया मऱ्हाटीया भाखा।
करी डोळे वरी लोकां। वेवो ये ऐसें जे॥

याप्रमाणें आपला मराठा देश, आपले मऱ्हाठे स्वजन आणि आपली मऱ्हाठी लोकभाषा, यांबद्दल मोठ्या कळवळ्यानें परिपूर्ण असें व्याख्यान ज्ञानेश्वरांनीं अठराव्या अध्यायांत केलें आहे. आपल्या देशबांधवांना गीतेंतील ज्ञान सहज मिळावें, यासाठीं त्यांना प्रचारांतून कमी होत जाणाऱ्या गीर्वाण भाषेच्या श्रमैकसाध्य अभ्यासाची जरूर राहूं नये, म्हणून त्यांनीं ज्ञानेश्वरी गीतेची भावार्थबोधिनी टीका केली.

वरील उताऱ्यांवरून स्वदेश, स्वधर्म आणि स्वजन यांजबद्दलच्या ज्ञानदेवांच्या प्रेमाचें आणि अभिमानाचें चांगलेंच अनुमान होईल; आणि त्यांचें तें तसें विशुद्ध प्रेम त्यांच्या समकालीन नामदेव, विसोबा खेचरादि यच्चयावत् साधुसंतांसही मान्य होतें. त्याबद्दल त्यांच्या एकाऱ्याही मनांत यत्किंचित्‌ही शंका नव्हती.

आणि त्यांचे सर्व उद्देश कसे पूर्ण सिद्धीस गेले हें मागें आपण नामदेवादिकांच्या, त्यांजबद्दलच्या सश्रद्ध आणि सादर उद्गारांत पाहिलेंच आहे.

ज्ञानदेवांच्या मागून निवृत्ति, सोपानदेव आणि मुक्ताबाई हीं सद्रत्नेंही पटापट समाधिस्थ झालीं. ह्यानंतरच्या काळांत नामदेवाच्या स्वतंत्र आयुष्यास सुरवात झाली.

ज्ञानदेवाची समाधि आळंदीस, त्यांच्या मागून लगेच मार्गशीर्षांत कऱ्हेकांठीं सासवड गांवीं सोपानदेवांची, नंतर माघमासांत गोदेच्या तीरीं पुणतांबें येथें चांगदेवांची, पुढें वैशाखमासीं, तापीतीरीं महत्नगरास ' प्रलयींचा वारा सुटला, गगन हालतें, अवघियांचें देहभान गेलें ( आणि ) एकदांच डोळे झांकले, मध्यान्हि, अंबुदा वळुनि आले, आता प्राण कैसे वांचतील ( असें होऊन ) कोणाकोणाचा शुद्धि नाहीं ( शी झाली आणि ) नारायणा ! मृत्यु आला ( असें सर्व ) म्हणती ( तों ) कडाडली वीज निरंजनीं जेव्हां, मुक्ताबाई तेव्हां गुप्त झाली. ' आणि शेवटीं निवृत्तिराज एकाच वेळीं अत्यंत समाधानी व कष्टी होऊन आपल्या भावंडांबद्दल —

अविट बोलणें बोलावें अनादि । जें गुह्य वेदीं सांपडेना ॥
कीर्तिवैराग्य केलें साम्राज्य । गुरुत्वासी लाज नाहीं आली ॥
नाशिवंत शरीर केलें अविनाश । बडविला विलास अध्यात्मींचा ॥
अविट बोलणीं आठवतीं मनीं । आतां त्रिभुवनीं दिसेनात ॥
तुझ्यामुळें हरि ! चालतो उगाला । देहाआधीं गेला प्राण माझा ॥
जेष्ठाच्या आधीं कनिष्ठाचें जाणें । केलें नारायणें उफराटें ॥
उफराटें फार कळलें माझे मनीं । वळचणीचें पाणी आढ्या गेलें ॥
अवघ्या परीस कष्टी केलें मुक्ताईनें । कांहींच बोलणें घडलें नाहीं ॥

— नामदेवाची गाथा, समाधीचे अभंग.

अशा प्रकारें धन्योद्गार आणि प्रेमाचे शोकोद्गार काढीत त्र्यंबकेश्वरीं नारायणस्वरूपीं लीन झाले. याप्रमाणें सर्वांनीं पुढील महंमदी हैदोसांत दिसणारें कलीचें दुर्दर्शन टाळिलें.

नलगे कलियुगींचा वारा । जें जें बोलले जगदुद्धारा ।
मागितला थारा । पदीं तुझ्या ॥
आतां वैराग्याचें बळ सिद्धिप्राप्तीचें फळ ।
ज्ञानदेवें घेतली आळ । जाणा स्थळ आवडीचें ॥

अशा प्रकारें त्या सर्वांच्या समाधीप्रसंगीं हजर असणाऱ्या नामदेवानें ह्या समाधिप्रकरणाचा उपक्रम केला आहे, त्यावरून वरील अनुमान चांगलेंच दृढ होतें. अस्तु ! आपण आतां निवृत्ति, ज्ञानदेव, सोपानदेव, मुक्ताबाई, चांगदेव या समाधिस्थ महासाधुपंचकास नामदेवांच्याच–

गेले दिगंबर ईश्वरविभूती । राहिल्या त्या कीर्ति जगामाजीं ॥
वैराग्याच्या गोष्टी ऐकिल्या त्या कानीं । आतां ऐसें कोणी होणें नाहीं ॥
सांगतील ज्ञान म्हणतील खूण । **नयेची साधन निवृत्तीचें** ॥
परब्रह्म डोळां दावूं ऐसें म्हणती । **कोणा नये युक्ति ज्ञानोबाची** ॥
करितील अर्थ सांगतील परमार्थ । **नये पां एकांत सोपानाचा** ॥
नामा म्हणे देवा सांगुनियां कांहीं । **नये मुक्ताबाई गुह्य तुझें** ॥
**चांगदेव योगी निष्काम चांगला** । स्वरूपीं रंगला केशवाच्या॥

या शब्दांनीं गौरवून व मनोमय नमस्कार करून महमदी हैदोसाशीं मोठ्या धैर्यानें टक्कर देणाऱ्या नामदेव, विसोबा खेचर, परिसा भागवत, सावता माळी, जनमित्र, चोखामेळा वगैरेंच्या स्वतंत्र चरित्रांकडे वळूं.

नामदेवांचें वय ह्या वेळीं सव्वीस वर्षांचें होतें. ह्या सुमारास निवृत्तिनाथांना संमत असे भक्तश्रेष्ठ नामदेवाच्या कुळांत चार दिसतात. कारण काव्यांतील प्रेमकवळ—

**नामया विठया नारया** लाधलें । **गोणाई** फावलें अखंडित ॥
नरहरी **विठा नारा ते गोणाई** । प्रेमभरित डोहीं वोसंडती ॥

असे निवृत्तिनाथांचे पंढरीमाहात्म्यपर अभंगांत उल्लेख आहेत. शिवाय समाधीच्या अभंगांत 'नामा विठा गोंदा म्हादा पाठविला, झाडविली जागा समाधीची' असें नामदेव म्हणतात. तेव्हां निर्णय असा निघतो कीं, नामदेवांस तीर्थयात्रेस निघण्यापूर्वीच चारही पुत्र झाले होते. आपण मागें पाहिलेंच आहे कीं, दामाशेटीस प्रथम कन्या सोळावेच वर्षी होऊन नामदेव अठरावे वर्षी झाले. त्या मानानें साधारण एकविसावे वर्षाच्या सुमारास नामदेवांसही चार अपत्यें असल्यास नवल नाहीं. समाधीच्या वेळीं नामदेवांचें वय २६ वर्षांचें होतें म्हणून सांगितलेंच आहे, तेव्हां त्या सुमारास त्यांचा शेवटचा मुलगा चारपांच वर्षांचा व पहिला नऊदहा वर्षांचा व कदाचित् लग्न झालेलाही असूं शकेल. दहावे वर्षी मुलांचीं लग्नें पांचपासून सातआठ वर्षांच्या मुलींशीं करण्याचा त्या काळीं ब्राह्मणांमध्येंच नव्हे, तर ब्राह्मणांखेरीज इतर शिंपी, सोनार इत्यादि सर्व पांढरपेशे जातींतही सर्रास प्रघात होता, आणि ह्याचें प्रत्यंतर गेल्या दहावीस वर्षांपूर्वी पाहिलेलें आहे. अजूनही ह्या जातींतून साधारण सुखवस्तु कुटुंबांत इतक्या लहान वयांत लग्नें झालेलीं दृष्टीस पडतात. गोंदा, म्हादा यांचीं नांवें निवृत्ति वगैरेंच्या अभंगांतून नाहींत हें सहजच आहे; कारण, ते अभंग तीर्थयात्रेच्या अगोदरचे आहेत. अर्थात् त्या वेळीं हे दोघे तान्हेच असले पाहिजेत. वरील प्रकारची नामदेवाच्या कुटुंबाची ह्या वेळीं स्थिति होती आणि त्याला आतां आईचें व स्त्रीचें संसाराबद्दल बोलणें सोसून घेण्याचा प्रसंग येऊं लागला होता. नामदेवाची आई—

गोणाई म्हणे नाम्या सोडीं देवपीसें । बुडविसी कैसें घर बळें ॥
तुज सईल लेंकुरें वर्तताती कैसीं । तूं मज झालासी कुलक्षय ॥

धनधान्य पुत्रकलत्र नांदती । तुज अभाग्या तो चित्तीं पांडुरंग ॥
शिवण्या टिपण्यातें घातलेंसें पाणी । न पाहसी परतोनी घराकडे ॥
अरे नामदेवा नव्हेची लेंकरूं । जाणसी विचारूं सांसारिक ॥
**मी एक आहे तंव करीन तळमळ** । मग तुझा संभाळ करील कोण ॥
जन्मासी येऊनी पराक्रम करीं । कां होशी संसारीं भूमिभार ॥
अभिमान अहंकार सांडोनीयां जगीं । नाचतोसी रंगी गीत गात ॥
तुजहुनी लोक आहेत अज्ञानी । न विसंबिती क्षण मायबापा ॥
गोणाई म्हणे नाम्या हें नव्हे भलें । विठोबानें केलें आपणाऐसें ॥
तुज नेल्यावांचून नवजाय येथुनी । पंढरी गिळीन विठोबासहित ॥
गोणाई म्हणे देवा होई का शाहाणा । बांयां कां परधना धरिशी लोभ ॥

वरील उताऱ्यावरून गोणाईचा अधिकार चांगलाच लक्षांत येऊन शिवाय नामदेवाला पुत्र वगैरे संसार पुष्कळ होता हेंही ध्यानांत येईल. असो; नामदेवांनीं उत्तर केलें: ‘ जननी, मी सांगतों तें ऐक. कायावाचामनें जें तुझें माझें ठायीं ममत्व आहे तें तूं विठ्ठलाचें पायीं ठेवीं. मग हा कृपासिंधु तुज न विसंबेल. याचे चरण दृढ धरीं. हा **कलिकाळा**पासोनि सोडवील.’ गोणाई ऐकेना; ती भांडूं लागली. जबरीनें नाम्याला घरीं नेऊं लागली. तेव्हां नामदेवांनीं देवावर भार टाकला आणि ते म्हणाले, ‘ भक्तीचा आशा सांडोनियां दूर देशा जाईन, मी आपल्या सांगातें पंढरी नेईन. संतनगरी नेईन, भिवरा नेईन, जनासांगातें येथील महिमा नेईन. केशवा ! ह्या तीर्थाचा महिमा मी मोडीन. तेव्हां तुला देवा ! भक्त ऐसा कळेल. ’ हा असा निर्धार पाहून देवाच्या प्रेरणेनें गोणाईची समजूत पटली म्हणा किंवा तिचा नाइलाज झाला म्हणून म्हणा, ती चालती झाली. पुढें नामदेवाची बायको राजाई आली. ती म्हणाली, ‘ आई जें शिकवी तें तुम्हीं न आयका. तुम्हांला लौकिकाची शंका किंवा

भय नाहीं ! लंगोटी लावून गोसावी झालेत. पण आमची ठेवाठेवी कोण करील ? तुमची तों ही गति. लेंकरें नेणतीं. मग घराचार कोण चालवील ? तुम्ही सुखाचा संसार बारावाटे केला आणि जगामाजीं मोठें नांव केलें ! ' याप्रमाणें राजाईनें पुष्कळ खटपट केली. तिनें पांडुरंगाची व रखुमाबाईची स्तुति करून नवरा शुद्धीवर येण्याबद्दल हट्टही घेतला, परंतु नामदेवानें आपला मार्ग सोडला नाहींच. उलट कांहीं साक्षात्कार होऊन तिचें पूर्ण समाधान झालें आणि –

आतां ये संसारीं मीच धन्य जगीं । जे तुम्हां अर्धांगीं विनटलें ॥
परी मला एक वेळ घाला विठोबाचें पायीं । विनविते राजाई नामदेवा ॥

अशी आपल्या नवऱ्याची करुणा भाकून त्याच्या बरोबर पांडुरंगाच्या भक्तींतच आनंद मानणारी ती भक्तोत्तमा बनली.

याप्रमाणें नामदेवाची स्थिति झाल्यावर कोणाच्याही ' मुखीं मानसीं ' उभे राहून पांडुरंगानें नामदेवाच्या कुटुंबाचें पालन-पोषण चालविलें. तरी नामदेवाचा असंग्रहाचा बाणा चालूच होता. त्याच्या मुलांचीं लग्नेंकार्यें चांगलीं थाटांत झालीं. कोणत्याही प्रकारें आपल्या भक्तोत्तमाचें पांडुरंगानें उणें पाहिलें नाहीं. परंतु परधर्मी राज्यक्रांतीनें त्याचा व त्याच्या धर्माचा चांगलाच कस लाविला. तो कसा तें आतां पाहूं.

मागें सांगितल्याप्रमाणें देवगिरीच्या रामदेवराव जाधवावर अल्लाउद्दीनाची पहिली स्वारी शके १२१६ त होऊन तो त्या दिल्लीपतीचा मांडलिक झाला खरा; परंतु त्यानें पुढें फिरून वार्षिक खंडणी देण्याचें बंद केलें. इकडे अल्लाउद्दीनानें शके १२१७ त आपल्या चुलत्यास ठार करून दिल्लीचें तख्त बळ-कावलें. पुढें तो गुजराथेंत करण वाघेल्याशीं व राजस्थानांत

चितोडच्या मेवाडवंशी राण्याशीं पद्मिनीसंबंधानें लढाईत गुंतल्यामुळें त्याला इकडे रामदेवरावाकडे नजर फेंकण्यास सवड झाली नाहीं. त्यामुळें शके १२२८ पर्यंत रामदेवरावास व त्याच्या महाराष्ट्रप्रजेस साम्राज्यसौख्य भोगावयास सांपडलें. शके १२२८ त म्हणजे इ. स. १३०७ त अल्लाउद्दीनानें आपला सरदार मलिककाफर यास दक्षिणेंत स्वारीस पाठविलें. या प्रसंगीं मुसलमानांचें सैन्य २ लाखांवर होतें. माळव्याचा सुभेदार ऐनुल मुल्क मुलतानी आणि गुजराथचा सुभेदार अलफखान हे दोन मोठे सरदार मलिकाच्या मदतीस होते. ह्याच स्वारींत कौलादेवीची मुलगी देवलदेवी ही अलफखानाच्या हातांत सांपडली, तें मागें आलेंच आहे. रामदेवरावाचा ह्या प्रसंगीं पुरा मोड झाला. त्याच्या लहानमोठ्या मांडलिकांनीं त्याला ह्या वेळीं चांगलें साहाय्य केलेंसें दिसत नाहीं. तो शत्रूच्या हातीं सांपडला. मलिकानें त्यास दिल्लीस पाठविलें. तेथें सहा महिने ठेवून घेऊन त्याचा राज्यविस्तार बराच अधिक करून म्हणजे नवसरी प्रांत त्याच्या राज्यांत सामील करून फिरून त्याला आपला मांडलिक म्हणून अल्लाउद्दीनानें आपल्या खर्चानें परत लावून दिलें. पुढें शके १२३१ त रामदेवराव वारला. त्या वर्षी मलिकानें तैलंगणावर स्वारीस जातांना देवगिरीस मुक्काम केला होता. त्याचा रोष होण्या-सारखें कृत्य देवगिरीच्या राजानें ह्या प्रसंगीं कांहींएक केलें नाहीं. रामदेवरावाच्या पश्चात् त्याचा मुलगा शंकरदेव हा गादीवर बसला. ह्यानें दिल्लीपतीची खंडणी दिली नाहीं. यामुळें शके १२३४ म्हणजे इ. स. १३१२ त देवगिरीवर मलिककाफरानें एकाएकीं धाड घातली. ह्या प्रसंगीं शंकरदेव ठार झाला आणि देवगिरीचें राज्य धुळीस मिळालें.

ह्या प्रसंगींच्या मलिककाफरच्या स्वारींत ज्ञानदेवमहाराजांच्या समाधीस बराच उपसर्ग पोंचण्याची वेळ आली होती.

त्या प्रसंगींच्या एका पत्राची हकीत रा. भिंगारकरांच्या ' ज्ञानेश्वरकालनिर्णय ' नांवाच्या पुस्तकांत आहे. हें पत्र शके १२३४ परिधावीनाम संवत्सर, चैत्र शु. १३ दिवशीं रा. कृष्णाजी पिते विश्वनाथ पाठक केंदुरकर यांस रा. गोपाळभट्ट पिते दामोदरभट्ट जोशी यांनीं लिहिलेलें आहे. त्यांतील सारांश इतकाच आहे कीं, दिल्लीपति अलाउद्दीन यांचे हस्तक मलिक-काफर यांचा सेनेसह गोदातीरीं मुक्काम आहे. त्यांनी धर्माचा अत्यंत छळ चालविला आहे. आळंदीसही त्यांचे सैनिक उपसर्ग देतीलसें वाटतें. त्यांनीं श्रीच्या समाधीस उपद्रव देऊं नये म्हणून ग्रामस्थ लोकांनीं सहस्र मुद्रिका सुवर्ण देऊन संधि करण्याचा बहुत प्रयत्न केला; परंतु निर्गम होत नाहीं. इतक्यांत गोपाळभट्ट जोशी यांचे ज्येष्ठ बंधु शंकरभट्ट हे आळंदीस प्राप्त झाले. त्यांनीं चतुराईनें यवनी मुल्लाचा वेष धरून यवनसैनि-कांची समजूत केली. अशा रीतीनें संकटाचा परिहार झाला. अस्तु !

शंकरदेवाच्या मागें रामदेवाचा जांवई हरपाळदेव यानेंही सैन्य जमवून जळत्या घराचा पडता वांसा बचाविण्याकरितां भगीरथ प्रयत्न केले. शत्रूशीं जागजागीं निकराच्या लढाया देऊन अनेक यवनांस अल्लाकडे पाठविलें. कित्येक वेळां तर यवन-सैन्याची चांगलीच लांडगेतोड करून "या अल्ला ! या खुदा ! या नबी ! यह सैतान किदरसे आया !" असे उद्गार त्यांजकडून काढविले; परंतु शेवटीं तो शके १२४० त अपघातानें शत्रूच्या हातीं लागला. मलिककाफरानें तो जीवंत असतां त्याची कातडी काढून हालहाल करून त्याला अत्यंत क्रूरतेनें ठार केलें.

याप्रमाणें शके १२२८ पासून शके १२४० पर्यंतच्या अवघ्या दहाबारा वर्षांत जरी महाराष्ट्रचक्रवर्ती जाधवराजे नामशेष झाले, तरी महंमदधर्मानुयायी लोकांच्या ताब्यांत सर्व महाराष्ट्र व दक्षिणापथ देश गेला, असें समजण्याचें कांहींएक कारण नाहीं. दुर्दैवानें महाराष्ट्रसम्राट् जाधव आणि त्यांचे मांडलिक राजे यांच्यामध्ये असावी तशी एकजूट नसल्यानें व हेमाद्री-(हेमाडपंता-) सारखा चतुर व चौरस सचिव मरण पावल्यानें जरी सम्राट् लयाला गेलें, तरी मांडलिक राजे आणि इतर महाराष्ट्र लोक यांचा व्यक्तिनिष्ठ स्वाभिमान शून्य झाला नव्हता. त्यामुळें प्रत्येक ठिकाणी कुराणभक्तांस अडथळा होऊं लागला. अनेक प्रसंगीं त्यांची कणीक चांगलीच तिंबली जात असे. 'जशास तसें' ह्या न्यायानें त्यांच्या अत्याचाराचें कडू फळ, त्यांच्या स्वधर्मी सैन्याची लांडगेतोड महाराष्ट्रीयांच्या हातून होऊन, त्यांना मिळत असे. एकंदरींत, महाराष्ट्र लोक आपल्या स्वातंत्र्या-करितां अनेक पिढ्या हातावर शिर घेऊन या अत्यंत क्रूर अशा आपल्या विधर्मी शत्रूंशीं जागजागीं झुंजले असल्याचा दाखला मिळतो. खेळण्याचा राजा, रायरी, सोनखेडचे स्वतंत्र राणे, वारंगूळचें होयसल्य राजे, द्वारसमुद्राचे बल्लाळ राजे, शिरके राजे, सुर्वे राजे, खानदेश, अशीरगड व बागलाणचे राजे वगैरे अनेक लहानलहान मांडलिक आपापले प्रांत यवनांच्या हातीं जाऊं न देण्याकरितां जीवापाड झटले व त्याप्रमाणें त्याचें त्यांना फळही मिळालें. त्या बहुतेकांचें स्वातंत्र्य पुढें सव्वाशें, दीडशें वर्षेपर्यंत म्हणजे चौदाव्या शतकाच्या तिसऱ्या पादाच्या अंतापर्यंत त्यांना टिकवितां आलें. तात्पर्य काय, शाळांतून शिकविल्या जाणाऱ्या शुष्क व 'ताकापुरतें रामायण' ह्या धर्तीच्या इतिहासाच्या पुस्तकांवरून शके १२३४ म्हणजे

इ. स. १३१२ मध्येंच महाराष्ट्र व दक्षिणापथ हीं सर्वस्वीं मुसलमानांचीं झालीं, अशी जी समजूत होते, ती सर्वथैव खोटी होय. जाधवसाम्राज्य नाहींसें झाल्यानें मुसलमानी सत्तारूप विषवृक्ष महाराष्ट्रांत रोंवला गेला खरा, परंतु त्याला पाळेंमुळें धरून त्याच्या विस्ताराप्रमाणें अंगावर उठणाऱ्या छायारूप झळांत सर्व मराठ्यांस बसावें लागण्याचा प्रसंग येण्यास पुढें सव्वाशें-दीडशें वर्षें लागलीं, ही गोष्ट विशेष ध्यानांत धरण्यासारखी आहे. मराठे लोकांच्या ह्या स्वातंत्र्यप्रियतेचा आणि स्वधर्मनिष्ठेचा जोमच असा विलक्षण असे कीं, त्यांमधील अत्यंत निवृत्तिपरायण लोकही प्रसंगीं सर्व जगांतील वीरवरांसही थक्क करून सोडण्यासारख्या कौशल्यानें आणि धैर्यानें तलवारही चालवीत असत. ह्याचें उदाहरण शोधण्यास आपणांस विशेष लांब जावयास नलगे. सर्वस्वीं ईश्वरपरायण व लोण्याहूनही मृदु अंतःकरणाच्या नामदेवांच्या चरित्रांतच त्याचा स्पष्ट दाखला आपणांस आढळतो.

दिवसेंदिवस नामा थोरचि जहाला। विवाह तो केला पितयानें ॥
प्राक्तनाचे योगें भरलासे ओहोटा। पाडितसे वाटा चोरासंगें ॥
नायके सर्वथा वडिलांचा शब्द। ब्राह्मणाचें नामजाद पाठवीले ॥
मारूनीयां तेणें सर्वही चोहोटा। फौजा सार नेटा पाठवील्या ॥
चौऱ्यांशीं राऊत नाम्यानें मारीले। चहूंकडे झाले भयाभीत ॥
धोरली विशाळ बैसावया घोडी। त्यावरी देशधडी करीतसे ॥

पुढें अशी हकीकत आहे कीं, नामदेव ह्या व्यासंगांत असतां त्यांच्या नित्यनियमाप्रमाणें ते आंवढ्या नागनाथाच्या दर्शनास गेले. त्या वेळीं ऐन दोनप्रहरचा समय असून ब्राह्मणांचा नागनाथावर रुद्राभिषेक चालू होता. नंतर त्या देवास महानैवेद्यसमर्पणाचा विधि चालू असतां हे तेथें उभे राहिले. जवळच एक अनाथ ( विधवा ) शूद्रस्त्री उभी होती व तिच्या कडेवर तिचें

लहान मूल होतें. ह्या तिच्या पुत्रानें आपणांस आईनें कांहीं खावयास द्यावें म्हणून रळी घेतली. त्याला ती दटावून गप्प करीत होती. तिला आपल्या लहानग्यास भूक लागणें हें साहजिक आहे, असें कळत होतें; परंतु काय करते बिचारी! तिच्या आंतड्याला पीळ पडत होता, तरी निरुपायानें ती मुलाची तशीच फसवणूक करीत होती. इतक्यांत महानैवेद्यावर त्या भुकेल्या लेंकराची दृष्टि जातांच त्याचा प्राण अधिकच कळवळला. त्यानें 'बाप्पाचा नेवेद दे मला' म्हणून अगदीं लोळण घेण्याची पाळी आणली. त्या माउलीचें काळीज अगदीं करपून गेलें; पण नैवेद्य आपल्या मुलाला कोण देणार! छे! फुकट आहे आपलें जिणें! असें वाटून तिला आंतून भडभडून आलें. तथापि तो उमाळा दाबून, न जाणों मुलाच्या रडण्या-आरडण्यानें नैवेद्य दाखविणाऱ्या ब्राह्मणांस राग येईल आणि ते आपणास फुकाचें येथें उभेंही राहूं देणार नाहींत, अशा भीतीनें तिनें आपल्या तान्हुल्यास मारूनमुटकून गप्प करण्याचा उपाय चालविला. हा सर्व पाषाणासही पाझर फोडणारा देखावा पाहून हाडाच्या खऱ्या वैष्णव नामदेवांसही कळवळा आला आणि 'वेडे, उगीच कां मुलाला बडवितेस?' असें म्हणून त्यांनीं तिला धिक्कारलें असतां 'तरी काय वाळूं हाडें नाम्या यांसी' असें प्रपादून रडत रडत 'चौऱ्यांशीं स्वारांत भ्रतार पडला' असें तिनें सांगितलें आणि खालीं मान घालून ती घळघळा रडावयास लागली. तेव्हां नामदेव मनांत खोंचले. त्यांनीं तेथल्या तेथें फिरून कधीं शस्त्र धरणार नाहीं, असा आपला दृढ निश्चय करून शंकराचा धांवा आरंभून आपल्या मस्तकांत सुरी भोंसकून शंकरावर रक्ताभिषेक करण्यास प्रारंभ केला. पुजारी धांवले, त्यांनीं नामदेवांस धरून त्यांचे हातपाय बांधिले आणि तेथेंच

त्यांना उंबरठ्यात सोडून देऊन ते चालते झाले. पुढें नागनाथांनीं त्यांना साक्षात्कार देऊन पंढरीस फिरून विठोबासच शरण जाण्यास सांगितलें व त्यांनीं त्याप्रमाणें केलें. मध्यंतरीं ' परमपातकी, अघोर चांडाळ, त्यांस मजजवळ आणूं नका, ' अशी विठोबाची ताकीद असल्यामुळें इतर भक्तांनीं त्यांस चंद्रभागेच्या अलीकडे येण्यास मनाई केली, तेव्हां त्यांनीं त्या संतांबरोबर विठोबास एक पत्र दिलें त्यात अनंत अपराधी मी, परंतु मला क्षमा करा व अजामिळाप्रमाणें मजवर करुणा करून, ' अंगिकारुनि मज प्रेम देई ' अशा प्रकारचा ईश्वराचा अनन्य भावनेनें धांवा केला होता. नंतर श्रीविठ्ठलांनीं व संतांनीं नामदेवांचा अंगीकार केला आहे. अशी ही कथा आहे. ह्यांत कांहीं कवित्वाची शंका वाचकांस येईल; तथापि त्यांतील तात्पर्याच्या सत्यतेबद्दल आम्हांजवळ प्रत्यंतरींचा दुसरा एक चोख पुरावा आहे, तो पाहिल्यावर तरी संशय राहणार नाहीं. तो पुरावा म्हणजे राजाईच्या — नामदेवाच्या महाप्रतिव्रता स्त्रीच्या–अभंगांतील होय. श्रीरुक्मिणी मातोश्रीजवळ आपल्या सर्व कर्मांची कहाणी सांगत असतां राजाई म्हणते :—

कन्या आणि पुत्र झालीं उपवर। अजुन न धरी घर प्राणनाथ॥
जनलोकांमाजी केलें येणें हांसें। म्हणती लागलें पिसें नामयासी ॥
जन्मीं न देखे उपाय येणें केले अपाये। कोणा सांगूं माये सुखदुःख॥
आमच्या वडिलां शस्त्र सुई आणि कातरी। हा बाण आणि सुरी वागवितसे ॥
एकातें भोंसकीलें रुदन करी त्याची नारी। वाहीयेली सुरी नागनाथीं ॥
लज्जेचा हा गांव सांडियेला येणें। शिकवावें कोणें माऊलीये ॥

ह्यापुढेंही संतचरित्रातून वीररसाचीं अशा प्रकारचीं उदाहरणें येणार आहेत. वरील गोष्टींत नामदेवांचें शस्त्रहरण कांहीं राजकीय हेतूनें झालेलें जरी दिसत नाहीं, तथापि त्यावरून मराठ्यांतील

कडवेपणा, स्वाभाविक शौर्य व करारीपणा हीं चांगलींच व्यक्त होतात. नामदेव हे जातीचे शिंपी. यांचें शस्त्र सुई व कातरी; परंतु बाण व खड्ग हीं सुद्धां त्यांनी तितक्याच सफाईनें वापरलीं. ह्या आब्राह्मण सर्व जातींच्या मराठ्यांतील व दाक्षिणात्यांतील स्वाभाविक तेजानेंच त्यांनीं महंमदी साम्राज्याचा वरवंटा आपल्या डोक्यावर अनेक पिढ्या फिरूं दिला नाही, तर त्याच्याशीं तितकीच कठीण टक्कर देऊन त्यांनीं त्याचें वजन व काठिण्य इतकें कमी करून सोडिलें कीं, शेवटीं जेव्हां कांहीं काल त्यांना तो आपल्या शिरांवर फिरूं द्यावा लागला, तेव्हां त्याच्यानें आमच्या मराठ्यांचें किंवा दाक्षिणात्यांचें विशेषसें सालडें काढवलें नाहीं; इतकेंच नव्हे, तर थोडक्याच काळांत, तो त्यांनीं आपल्या पायांखालींही घातला.

नामदेवांनीं जसा शस्त्रग्रहणांत आपला पराक्रम गाजविला, तसाच त्यांनी आपल्या वैष्णवी भक्तीच्या तेजाचाही पराक्रम गाजविला आहे. वरील प्रकारानंतर नामदेव फिरून आपल्या ईश्वरभक्तींत निमग्न झाले, ते इतकें कीं, ‘ भावाचा भुकेला ईश्वर, ’ ह्या आपल्या भक्तोत्तमाचा, कृपण जसा आपल्या आजन्म कवडी कवडी म्हणून जोडलेल्या लक्ष्मीचा तसा, अहर्निश जागृत असा संरक्षक बनला. त्याच्यावर जें जें संकट येई, तें तें त्याजवर नसून आपणांवरच आहे, असें त्या भक्तवत्सल करुणाघनास वाटावें आणि नाहीं नाहीं तसल्या मिषांनीं व रूपांनीं त्यानें आपल्या ह्या भक्तांस संकटमुक्त करावें. त्यांपैकींच एक कथानक पुढें दिलें आहे. त्या योगानें, जेथें जेथें अत्यंत सपाट प्रांतांवर यवनांची सत्ता दृढ झाली, तेथें तेथें, ते हिंदु लोकांच्या साधुसंतांचाही कसा छळ करीत, हेंही कळण्यासारखें आहे. एकदां नामदेवांस कोणीं मुसलमान सुलतानानें धरून नेलें.

तेथें त्या सुलतानाचा व नामदेवांचा धर्मसंबंधीं वाद सुरू झाला. सुलतान नामदेवांस म्हणाला, ' नाम्या, तूं झूटा, तुझा पंथ झूटा; कारण अल्ला आलं दुनियेचा कर्ता असून, त्याचा चेहेरा गुप्त आहे. आम्ही मुसल्मान तुझा माणसासारखा दिसणारा राम मानीत नाहीं; कारण त्यानें वनवासास जाऊन आपली बायको गमावली ! तुमची तीन पायांची गायत्री लंगडत लंगडत शेतांतून गवत खात जातांना व इरड करितांना दिसते. आम्हीं बकरीं व कोंबडीं कापतां. तुम्ही त्याला हलाल म्हणतां; पण मुरगीचीं अंडीही हलाल नव्हेत काय ? तीं खाण्यांत नाहीं का एकेक जीव प्रत्येक अंड्यांत हलाल होत ? ' नामदेवांनींहीं त्याला उत्तर दिलें कीं, ' रामानें जळावर जडशिला तारल्या, मेलेला ब्राह्मणपुत्र जीवंत केला, पादस्पर्शानें अहिल्याशिला उद्धरली व स्त्रीहरण करणाऱ्या दुष्ट रावणास ठार मारून बिभीषणास लंकाधिपति केलें. माझा राम तारतो, मारतो, जगाचें पालन करतो, दीनांचा उद्धार करितो, सर्व कांहीं करण्यास तो समर्थ आहे. ' ह्यावर सुल्तानसाहेबांनीं वाद सोडून दिला आणि एक गाय मारून नामदेवांपुढें टाकली, आणि म्हणाले, ' नाम्या, ही गाय जीवंत झाली तर तुझा देव खरा, नाहींतर खोटा; इतकेंच नव्हे; पण गाय जर जीवंत झाली नाहीं तर तूं विनाकारण ढोंग करितोस, असें समजून तुझें डोकें मारीन. ' अशी त्यांनीं दहशत घाल्तांच नामदेवांनीं ईश्वराचा धांवा सुरू केला. नामदेवांची आई त्यांना म्हणाली, ' नाम्या, राम सोडून खुदाचें कां भजन करीनास ! ' नामदेव तिला म्हणाले, ' मी तुझा मुलगा नाहीं, तूं माझी आई नव्हेस. मी मेलों तरी रामनाम सोडणार नाहीं. ' तेव्हां नामदेवांची आई रडूं लागली. शेवटीं त्या करुणाघन ईश्वराला

दया येऊन ईश्वरेच्छेनें नामदेवांनीं त्या गाईला हात लावला व तिला उठविले. तेव्हां–

अब तो भली बनी है जी । सबका एक धनी है जी ॥

अशी यवनाची खात्री होऊन तो डोलावयास लागला आणि नामदेवांस म्हणाला, ' यह कुच पतिया ( ईश्वर ) मुझे दिखाव ! नामदेवांनीं त्याला सांगितले कीं, ' साच शील चालो सुल्तान ! म्हणजे शेवटीं तुलाही ईश्वरसाक्षात्कार होईल ! '

वरील कथानकांतील प्रकार कोणत्या बादशहापुढें झाला, हें खात्रीनें सांगणें कठीण आहे; तथापि दिल्लीच्या कोणत्या बादशहाची किंवा बादशहाच्या सुल्तानाची नामदेवांचे हयातींत दक्षिणेंत वस्ती होती, हें पाहिलें म्हणजे, त्यासंबंधीं कांहीं सुसंभाव्य तर्क करितां येणार आहे. दक्षिणेंत मुसल्मानांची पहिली स्वारी अल्लाउद्दीन खिलजीनें केली. तो अल्ला आणि त्याचा मुख्य सरदार मलिककाफर ह्या दोघांचेही शके १२४३ (इ. स. १३२१ ) च्या अंतीं खून झालें, त्यांच्या जागीं तघलख घराण्यांतील ग्यासुद्दीन आला. हा स्वतां दक्षिणेंत आलाच नाहीं; परंतु ह्याचा मुलगा अलफखान हा बहुतेक दक्षिणेंतच असे. ग्यासुद्दीन शके १२४७ ( इ. स. १३२५ ) त मेला. त्याच्या मागें हाच अलफखान, महंमद हें नाव धारण करून दिल्लीचा बादशहा झाला. ह्याच परस्परविरुद्ध गुणावगुणी बादशहास इतिहासांत वेडा महंमद म्हणतात. वस्तुतः हा अतिशहाणा होता. इतका शहाणा कीं, ' अति तेथें माती ' न्यायाचा तो मूर्तिमंत पुतळाच होता. वळिवाच्या पावसाचेंही धोरण बांधता येईल, पाण्याची मोट बांधणेंही सुकर होईल, परंतु ह्या अलफखान उर्फ वेड्या महंमदाच्या लहरी, केव्हां, कशा आणि किती फिरतील हे कोणालाही कधीं सांगतां येणें शक्य नव्हतें. ह्याच्या

क्रौर्यास आणि धर्मवेडास कांहीं सीमाच नव्हती. माणसें मारणें म्हणजे ह्याची केवळ करमणूक असे. लढाईतच मनुष्यवध व्हावयाचा असें नसून सहज केवळ गमतीकरितां सुद्धां गरीब प्रजेंतील निःशस्त्र माणसें पकडून आणवून हा मुक्या जनावरांतील शेळ्यामेंढ्यांप्रमाणें त्यांची कत्तल करी व करवी. शके १२४७ च्या पुढें बादशहा असतांनाही ही स्वारी दक्षिणेंत अनेक वर्षें राहिलेली आहे. तेव्हां नामदेवांचा छल, जो वरील गोष्टींत स्पष्ट दिसून येतो, तो ह्याच गाजींच्या लहरींतील एक प्रकार असला पाहिजे, असें वाटतें; आणि तोही दक्षिणेचा सुभेदार म्हणून जेव्हां दक्षिणेंत होता त्या काळांतीलच असावा. म्हणजे त्या वेळीं नामदेवांचें वय चांगलें पन्नाशीच्या पुढें असलें पाहिजे. ह्यापुढें, हा अलफखान दिल्लीचा महंमद बादशहा होऊन फिरून जेव्हां शके १२५५ (इ. स. १३३३) च्या सुमारास दक्षिणेंत आला, तेव्हां सर्व रंग कसा फिरून गेला, हें वाचकांस पुढें कळेलच. त्यापूर्वी इतक्या अवकाशांत आपण नामदेवांच्या समकालीन संतांच्या हकीकती उरकून घेऊं. त्यांपासूनही आपणांस कांहीं तरी लाभ घडेलच; कारण अनेक जातींचे संत नामदेवांस समकालीन होते. त्या सर्वांनीं भक्तिपर काव्योद्गार कमीअधिक काढलेले आहेत. नामदेव हे जातीनें शिंपी म्हणजे पांढरपेशेच समजण्यास कांहीं हरकत नाहीं; परंतु ज्यांना पांढरपेशांपैकीं अगर जवळचे असेंही मानतां येत नाहीं, त्यांच्याही उद्गारांत जेव्हां संस्कृतांतील अत्यंत गहन प्रमेयें निघालेलीं दिसतात आणि तींही शालिवाहनाच्या तेराव्या शतकांत, म्हणजे जेव्हां जातिभेदावर कुऱ्हाड घालणारे सुधारक वीर आणि त्यांची सहज साहाय्यकर्ती परिस्थिती नव्हती, तेव्हां चोखामेळ्यासारख्या चांडाळास अद्वैतसिद्धान्ताचीं तत्त्वें कळावींत व तीं त्यानें प्रासादिक वाणीनें उच्चारावींत ह्यापेक्षां जातीजातींत ज्ञानवर्धनासंबंधीं

अवश्य तितका सलोखा होता, असें मानण्यास दुसरा कोणता सबळ पुरावा पाहिजे ? नामदेवांच्या समकालीन संतांत ज्ञानपंचकाशिवाय सांवता माळी, विसोबा खेचर, नरहरी सोनार, बंका महार, जनमित्र, चोखामेळा आणि कूर्मदास इतके संत मुख्यत्वें येतात, ह्यांपैकीं शके बाराशें चाळीसपर्यंत पहिले चौघे समाधिस्थ झाले होते.* नामदेवांचें कुटुंब पुष्कळच वाढलें होतें. त्यांच्या कुटुंबापैकीं प्रत्येक माणूस हरिनामसंकीर्तनांत अहर्निश गुंग असे. नामदेवाच्या कुटुंबाची गणती त्यांची दासी जी जनाबाई तिनें एका अभंगांत केली आहे. तो अभंगच खालीं देतों.

**राजाई गोजाई** दोघी सासुसुना । **दामा नामा** जाणा बापलेक॥
**नारा विठा गोंदा म्हादा** चौघे पुत्र । जन्मले पवित्र वंशीं त्याचे॥
**लोभाई बहिणाबाई येसू साखराई** । चवघी सुना पाहीं नामयाच्या ॥
**रंगाबाई लेंकीं आऊबाई** बहिणी। वेडी पिशी **जनी** नामयाची ॥

२८. ह्याचप्रमाणें जनाबाईच्या दुसऱ्या एका अभंगावरून या शतकांतील समकालीन सत्कवि आणि त्यांचे ग्रंथलेखक यांची नामावळी सांपडते. तो अभंग असा—

ज्ञानेश्वर अभंग बोलिले ज्या शब्दा । चिदानंद बावा लिही त्यास॥
**निवृत्तीचे** बोल लिहिले **सोपानें** । **मुक्ताईचीं** वचनें **ज्ञानदेवें** ॥
**चांग्याचा** लिहिणार **शामा** तो **कासार** । परमानंद **खेचर** लिहीत होता ॥

---

* सांवता माळी यांची समाधि शके १२१७, मन्मथ आषाढ कृष्ण १४
विसोबा खेचर यांची समाधि शके १२३१ सौम्य, श्रावण शुद्ध ११
नरहरि सोनार ,, ,, ,, १२३५ प्रमाथि, माघ कृष्ण १
बंका महार ,, ,, ,, १२४० कालयुक्त माघ शुद्ध १५

सांगे पूर्णानंद लिही परमानंद । भगवंत भेटी आनंद रामानंद ॥
सांवत्या माळ्याचा काशीबा गुरव । कूर्म्याचा वसुदेव काईत जाणा ॥
चोखामेळीयाचा अनंत भट्ट अभ्यंग। म्हणोनी नामयाचे जनीचा पांडुरंग ॥

२९. वरील अभंगांत शब्दरचनाविपर्यास झाला आहे, असें दिसतें; परंतु तो दोष नकल करणारांचा किंवा मुद्रणकलेचा दिसतो. वास्तविक पाठ 'जनीचा पांडुरंग नामयाच्या' असा असावेसें वाटतें. 'म्हणोनी' हा शब्द प्रक्षिप्त होय. गाथा छापतांना शुद्धाशुद्ध, पाठापपाठ यांचा विचार कोणींच केलेला दिसत नाहीं. असो. तात्पर्य इतकेंच कीं, वरील अभंगावरून ब्राह्मण व ब्राह्मणेतर किती अभेदानें व निर्मत्सर बुद्धीनें त्या काळीं वागत होते, हें चांगलेंच दिसून येतें. त्याचप्रमाणें, वरील लेखकांच्या यादींत जशीं ब्राह्मणजातीय पूर्णानंद, परमानंद, रामानंद ह्यांसारखीं संन्यासी माणसें आहेत, तशींच, गुरव, कासार, काईत असली मंडळीही आहेत. गुरव, कासार, काईत ह्यांसारख्या हीन जातींतही साक्षरत्व त्या वेळीं कसें नांदत होतें हेंही पाहण्यासारखें आहे. ब्राह्मणेतर जातींस ब्राह्मणांनीं शिक्षणाचा मार्ग बंद करून त्यांना अक्षरशत्रु बनविलें असें म्हणणारांनीं वरील गोष्ट विशेष ध्यानांत धरण्यासारखी आहे. माळी, सोनार, शिंपी, गुरव, काईत, कासार असल्या शूद्र जातीही जर निःसंशय साक्षर असलेल्या आढळतात तर क्षत्रियवैश्यादि द्विजत्वाचा अधिकार असलेल्या जाति ब्राह्मणांच्या काव्यानेंच निरक्षर झाल्या, हें म्हणणें खरोखर आश्चर्यच होय. क्षत्रियप्रुव जाती अक्षरशत्रु झाल्या याचा दोष खुद्द त्यांच्याच साक्षरत्वाबद्दल उदासीनतेमध्यें आहे. त्याच सिद्धांताचीं पुढेंही प्रत्यंतरें मिळणार आहेत. अस्तु.

३०. नामदेवांचें आतां उतारवय झालें होतें व त्यांना स्वदेशांत

घडलेल्या विधर्मीय राज्यक्रांतीचीं सुखदुःखें पुरतीं कळलीं होतीं; कारण, त्यांचा स्वतःचा पुष्कळच छल म्लेंच्छ बादशहानें केला होता. अनेक स्वधर्मी लोक जुलमानें बाटवलेले त्यांनीं पाहिले व ऐकलेही होते. त्याचप्रमाणें प्रवृत्तींत आपली जीवनयात्रा सुखकर होण्याकरितां आब्राह्मण सर्व जातींतील कित्येकांस ह्या विधर्मी व विदेशी राजाची सेवा करण्याचा प्रसंग येऊन त्यांच्या वर्णाश्रमधर्माची मर्यादा सुटत चाललेली पाहून खालीलप्रमाणें त्यांचे सहज उद्गार निघत. पुराणादिकांत वर्णन केलेली कलियुगाच्या पूर्ण प्रभावाची स्थिति त्यांच्या डोळ्यांसमोर उभी राहूं लागली. पोटोबामुळें विठोबाची हेळसांड करणारे, हीन विधर्मीयांच्या सेवेनें निर्लज्ज झालेले लोक अर्थात् स्वकर्माच्या गौरवार्थ शास्त्राविरुद्ध नाना मतें प्रतिपादून आपल्या कृत्यांचें समर्थन करूं लागल्यानें अनेक पाखांडें उत्पन्न झालीं. ह्या सर्व परिस्थितीचे द्योतक नामदेवांचे विचार खालील अभंगांत स्पष्ट आहेत.

पाखांडें बहुत कलीमाजी झालीं । वर्णाश्रम सकळीं बुडविले ॥

तरी

पापाचिया राशी जळतील नामीं । निश्चय हरिनामीं नामा म्हणे ॥

आणि मग

कलीचिये अंतीं होणार कलंकी । **मारील म्लेच्छ कीं घोड्यावरी** ॥

**फिरून धर्माची उभारील गुडी** । कृतयुगप्रौढी करी तोची ॥

तोंवरी साधन हरिनामकीर्ति । संतांची संगती नामा म्हणे ॥

३१. ह्या अभंगांवरून नामदेवास वर्णाश्रम बुडाल्याची खंतीच वाटत होती, असें स्पष्ट दिसतें. त्याचप्रमाणें, वर्णाश्रम बुडाल्यानें पापांच्या राशी पडणें हाच परिणाम, असेंही त्यांना वाटत होतें. तेव्हां वर्णाश्रमांची पुनःस्थापना हाच एक जरी त्या पापांच्या राशी पडण्याचा कारखाना निर्मूळ होण्याचा खरा व प्रत्यक्ष

उपाय होय, तथापि आपली व आपल्या परिस्थितींतील सर्वांची वर्णाश्रमधर्म पुनरर्थापनेच्या कामीं असमर्थता असल्याबद्दल त्यांची खात्री होती; कारण ' यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत। अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥' अशी श्रीमद्भगवतांची उक्ति त्यांना ठाऊक असून तिजवर त्यांची दृढ श्रद्धा होती. म्हणून त्या ईश्वराचीच करुणा भाकण्यावांचून त्यांना श्रेयस्कर अन्य मार्ग कोणताच आढळला नाहीं. म्हणून त्यांनीं ' तोंवरी साधन हरिनामकीर्ति। संतांची संगती–' असा आपत्कालधर्म सर्व लोकांना उपदेशिला आहे. कारण नाना पाखंड ( शास्त्रविरुद्ध ) मतांचा परस्पर कलह हेंच ज्याचें मूर्तिमंत स्वरूप त्या कलीच्या प्रभावाची सीमा होऊन ईश्वरदत्त वैदिक मार्गाची रहाटी बिघडून सर्वत्र अव्यवस्था माजली म्हणजे ईश्वर ती अव्यवस्था मोडण्याकरितां अवतार घेऊन स्वतः घोड्यावर बसून म्लेंच्छ मारील, आणि ( वैदिक ) धर्माची गुढी उभारील असा नामदेवांचा दृढ विश्वास होता आणि तोच पुढें अक्षरशः खरा झाला आहे. हेमाद्रीसारखा राजकार्यधुरंधर नाहींसा झाल्यानें महाराष्ट्रांतील जाधवसाम्राज्य बुडालें व त्याच्या राजधानीच्या जागीं मुसल्मानांच्या नूतनप्राप्त छोट्याशा सुभ्याची राजधानी झाली; तथापि ह्या धक्क्यानें आणि महंमदी सत्ताधाऱ्यांच्या अरेरावीपणाचीं कृत्यें पाहून, फिरून दक्षिणेंत बरीच जागृति सुरू झाली. तिचा परिणाम असा झाला कीं, ह्या विधर्मी राज्यविस्ताराचा वणवा अमर्याद पेटला नाहीं. त्याला आपल्या चातुर्यमहासेवधारांनीं दक्षिण महाराष्ट्राच्या बाजूला कायमचें विझवून टाकणारा व पुढेंमागें मध्य व उत्तर महाराष्ट्रांतही त्याचा होणारा विस्तार विझविण्याच्या सिद्धतेचा पाया घालणारा एक पुरुष ह्या सुमारास ईश्वरी संके-

तानें अवतीर्ण झाला होता. ह्या पुरुषानें दिल्लीपतीच्या महाराष्ट्र सुभ्यांत चाललेली बंडाळी अवलोकन करून तसला कपिलाषष्ठीचा योग वांया दवडला नाहीं. हा सत्पुरुष तुंगभद्रेच्या कांठीं पंपानामक खेड्यांत जन्मला. ह्याच्या बापाचें नांव मायन्ना व आईचें श्रीमती. ह्याचें गोत्र भारद्वाज. दक्षिण महाराष्ट्रांत व तैलंग-कर्नाटक वगैरेंत ह्या सुमारास जैन*, जंगम‡

* ह्या जैनांतसुद्धां सध्या शेंकड्यावरी जाति आणि आठ दहा तरी निरनिराळी धर्ममतें आहेतच.

‡ लिंगाईत धर्माचा प्रस्थापक बसव. ह्याच्या बापाचें नांव मदिगराय व आईचें नांव मदेवी किंवा महांबा. हे जातीनें आराध्य ब्राह्मण. ह्यांचें राहण्याचें ठिकाण विजापुरच्या आग्नेयीस २० कोसांवर बागेवाडीनजीक हिंगलेश्वर नांवाचें खेडें आहे तें होय. हे परंपरया निस्सीम शिवभक्त होते. त्या त्यांच्या अनेक पिढ्यांच्या भक्तीचा केवळ परिपाकच असा शिववाहन जो नंदी त्यानें ह्यांच्या कुळांत अवतार घेतला; तोच अवतारी पुरुष बसव होय असें म्हणतात. मुंजीच्या वेळीं ह्या मुलानें यज्ञोपवीत धारण करण्याचेंच नाकारिलें; कारण यज्ञोपवीत घातल्यास गायत्री ह्या सूर्यस्तुतिपर मंत्राचा जप करावा लागेल ही भीति. त्याचप्रमाणें तो असेंही म्हणाला कीं, आपण शिवभगवानाशिवाय कोणासही गुरु मानीत नाहीं. यावरून बापानें ह्या मुलास नास्तिक समजून घरांतून हांकून दिलें. ह्याच्या बरोबर ह्याची बहीण अक्का नागम्मा उर्फ पद्मावती ही पळून गेली. हीं दोघेंही बहीणभावंडें सध्यांच्या हैदराबादच्या पश्चिमेस पन्नास कोसांवर असलेल्या कल्याण नांवाच्या कल्चुरी विज्जल राजाच्या (११५६–११८२) राजधानीस गेलीं. तेथें बसवाचा मामा दंडनायक म्हणून पोलीसखात्याचा वरिष्ठाधिकारी होता त्यानें आपल्या घरीं ह्या दोघांस ठेवून घेतलें व पुढें आपली मुलगी गंगम्मा ही बसवाला दिली; आणि त्याला त्याच राज्यांत एक चांगलीशी जागाही दिली. पुढें बसवानें आपली बहीण तेथील राजास देऊन आपण राजशालक झाला आणि त्यानें आपली सांपत्तिक स्थिति सुधारली. बसवाचा मामा लवकरच मेल्यावर हे राजशालक सेनापति व मुख्य सचिव बनले. हे बसवराज मुख्य सचिव बनतांच त्यांनीं पूर्वींचे एक एक राजपुरुष काढून टाकून त्यांच्या जागीं आपले मित्र नेमिले. नंतर ह्या स्वारीनें जैन, स्मार्त व वैष्णव धर्मपंथांविरुद्ध चळवळ सुरू करून ब्राह्मणादिकांचा छळ आरंभिला. प्रौढविवाह, विधवाविवाह, जातिभेदोच्छेद हीं अलीकडील सुधारकी मतेंच ह्या बसवाचीं असत. त्याचप्रमाणें इतर सर्व प्रकारच्या मूर्तिपूजा टाकून एक लिंगपूजाच प्रमाण मानणें हा ह्याचा मुख्य उपासनामार्ग. ह्याचा परिणाम असा झाला कीं, शूद्रातिशूद्र जातींस ह्याचें हें मत बरें वाटून

( लिंगाईत ) इत्यादि अनेक वैदिकधर्मविरुद्ध पाखांडें उत्पन्न होत होतीं. शिवाय हा एक उपटसूळ महंमदी धर्मही आपलें घोडें पुढें ढकलीतच होता. पहिलीं दोन्ही मतें आमच्या लोकांतीलच होतीं. असा अंतर्बाह्य धर्मोच्छेद चालला असतां जर माधवाचार्यांसारखा समर्थ महायोगी कोणी अवतरला नसता, तर दक्षिण महाराष्ट्रांत वैदिक धर्माला, वस्तुतः वैदिक धर्मानुयायांस नामशेषच व्हावें लागतें; परंतु ईश्वरदत्त वैदिक धर्माचा उच्छेद ईश्वरासच कसा रुचावा ? त्यानें ह्या मायणपुत्र

---

त्यांच्यामध्यें ह्याचें वजन व देव्हारे वाढत चालले. तथापि वैदिक व जैनधर्मी जातींस ह्या गोष्टींनीं वळवितां येणें कांहीं शक्य नव्हतें. त्याकरितां ह्या बसवानें मद्य व मांस ह्यांचा निषेध पुकारला. अर्थात् जैनांस कांहीं बरें वाटलें, परंतु शूद्रातिशूद्र जाति तितक्याच ह्या नवीन धर्मप्रवर्तकापासून दूर पळूं लागल्या. शेवटीं बसवाचार्यांची ही कर्तबगारी विज्जलराजास अनर्थावह वाटून त्यानें त्याला धरून अटकेंत घालण्याचा विचार चालविला. बसवाचार्य ( ईश्वरी अवतार ) पळाले. त्यांच्या मागें राजाचें धरणें गेलें. बसवानें ह्या राजसैन्याचा पुरा मोड केला. शेवटीं राजा स्वतः ससैन्य ह्याचें बंड मोडण्यास निघाला; परंतु बसवाच्या साहाय्यानें अधिकार व संपत्ति ह्यांचा लाभ घडलेल्या त्याच्या मित्रांनीं ह्या प्रसंगीं त्याचा चहूंकडून पाठीराखेपणा केल्यामुळें राजाचा इलाज चालेना. त्याला फिरून बसवाला आपल्या अधिकारावर येऊं द्यावें लागलें; परंतु ह्या निर्दय व कृतघ्न आचार्यांनीं विज्जलराजास ह्या जगांतून पार करून आपल्या मार्गांतील कांटा काढून टाकण्याचें अघोर कर्म केलें. राजा विज्जल एका विजयी स्वारीवरून परत येत असतां भीमेच्या तीरीं ह्या सद्धर्म ( ? ) प्रवर्तक बसवाचार्यांनीं विषप्रयोग करून त्यास पंचत्वास पोंचविलें. ही गोष्ट इ. स. ११६८ त झाली. पुढें राज्याचा अपहार करून ह्या आचार्यांनीं अनेक घोर कर्में केलीं. राजपुत्रांशींही हे सद्धर्मसंस्थापक मोठ्या निकरानें लढले. तात्पर्य काय, ब्राह्मणकुळांत उत्पन्न होऊन रक्ताच्या नद्या स्वतः वाहवून अन्नदात्याशीं कृतघ्नपणा, राजवध असलीं घोरकर्में आचरून धर्मपंथाची स्थापना करणारा असा ह्या बसवाचार्यासारखा एक बसवाचार्यच ! अस्तु. आज ह्याच जातिभेदविध्वंसक धर्मस्थापकांच्या अनुयायांत शेंकडों जाति व पोटजाति आहेत ! त्याचप्रमाणें, प्रत्येक वर्षी अनेक किंबहुना बहुतेक बालविवाहच होत आहेत ! आणि बाळावृद्धविवाह, विधवा-विवाहनिषेध वगैरे सर्व गोष्टी सनातन कर्मठांप्रमाणेंच चालू आहेत.

माधवाचार्यांच्या मनांत स्वधर्मोद्धाराची सात्त्विक महत्त्वाकांक्षा उत्पन्न केली. हा माधवाचार्य चतुर्वेद आणि षट्शास्त्रें ह्यांत पारंगत झाला होता. ह्यानें रामेश्वरापासून सर्व दक्षिणेंत प्रवास केला होता. त्या प्रवासांत त्याला श्रीमदाचार्यांचे शृंगेरी येथील शारदापीठांत जैन व लिंगाईत धर्मीयांच्या ढवळाढवळीस वाव सांपडतो असें आढळतांच फार वाईट वाटलें. त्याच्या मनांत हा सर्व घोंटाळा मोडून फिरून वर्णाश्रमधर्माची यथायोग्य व्यवस्था लावून श्रीमदाचार्यांच्या अद्वैतसिद्धान्ताची ध्वजा फडकवावयाला लावावी असें आलें; परंतु ह्या कामीं कांहीं तरी राजाश्रयाची जरुरी वाटून त्याबद्दल जेव्हां तो विचारपूर्वक देशस्थिति अवलोकन करूं लागला, तेव्हां त्या चाणाक्षाच्या तेव्हांच लक्षांत येऊन चुकलें कीं, आपला उद्देश ज्याच्या साहाय्यानें पार पडेल असें आर्यराज्यच जागेवर नाहीं. वास्तविक वारंगूळ आणि द्वारसमुद्र येथील राज्यें अजून सर्वस्वीं नाहींशीं झालेलीं नव्हतीं. उलट, त्या राज्यांचे स्वामी एकजुटीनें मुसल्मानांशीं झगडून आपलें स्वातंत्र्य राखण्याकरितां जीवापाड श्रम — साहस करीत; तथापि माधवाचार्यांचें कांहीं तेवढ्यानें समाधान होण्या-सारखें नव्हतें. त्यांस स्वतंत्र पराक्रमाचीं आणि आपल्या वैदिक धर्मावर अमर्याद श्रद्धा असणारीं अशीं राजरत्नें हवीं होतीं. महंमद तघलखाच्या स्वारीच्या वेळीं माधवाचार्य, हंपी-विरूपाक्ष व शृंगेरी ह्यांच्या आसपास प्रवास करीत होते. हंपी-नजीक अनागोंदीसही एक लहानसा राजा असे. ह्या त्यांच्या फिरतींत त्यांना त्या काळच्या सर्व लहानमोठ्या क्षत्रिय म्हण-विणारांची परीक्षा करावयास सांपडली. शेवटीं माधवाचार्य तुंगभद्रेच्या दक्षिणतीरावर अनागोंदीच्या समोरच एका डोंगरांत मठ करून राहिले. तेथें असतांना त्यांच्या मनाप्रमाणें स्वतंत्र

तेजाचीं पुरुषरत्नें त्यांना अकस्मात् आढळलीं. तो प्रकार असा :—

३२. संगम नांवाच्या एका राजकुलोत्पन्न पुरुषाचे दोन पुत्र हरिहर आणि बुक्क, हे प्रथम वारंगूळच्या राज्यांत कोशाधिकारी होते. हे धर्मशील असून वयानें तरुण, किंबहुना विशीच्या आंतीलच होते. वारंगूळवर जेव्हां शके १२४५त महंमद तघलखाची स्वारी झाली, तेव्हां हे दोन भाऊ नुकतेच कोठें अधिकारापन्न झाले असल्यामुळें त्यांचें त्या ठिकाणीं विशेषसें वजन वगैरे नव्हतें. वारंगूळच्या राजानें मोठ्या निकरानें युद्ध चालवून शेवटीं जेव्हां निभेनासें झालें, तेव्हां पळ काढला व मागें शत्रूंनीं राजवाडा वगैरे सर्व लुटण्याचा घाट घातला असतां, ह्या दोघां भावांनीं प्रसंगावधान व शौर्य यांची शिकस्त करून सोडिली. महंमद तघलखाचा ' धर हिंदु कीं कर दोन तुकडे ' हा न्याय चालला असतां, त्या भयंकर कत्तलींतून अनेक बायकामुलांचा व इतरही पुरुषांचा जीव बचावून हे दोघे बंधु अश्वारूढ होऊन सशस्त्र पळाले, ते ह्या अनागोंदीनजीकच्या डोंगराळींत येऊन थबकले. तेथें त्यांची व माधवाचार्यांची प्रथम भेट झाली व ह्या दोघांनीं माधवाचार्यांस आपले गुरु केलें. माधवाचार्यांनींही त्यांचें सर्व वर्तमान ऐकून घेऊन त्यांना ' उत्तरोत्तर अधिक विजयी व्हा.' असा आशीर्वाद दिला आणि आपल्या सदुपदेशानें त्यांच्या मनांतील स्वधर्म, स्वदेश व स्वातंत्र्य ह्यांबद्दलचें प्रेम दृढ केलें. पुढें ह्या दोघां तरुणांनीं कंपिलाच्या (अनागोंदीच्या) राजाचा आश्रय धरिला. ह्या अनागोंदीच्या राजाच्या आश्रयास दिल्लीपति महंमद तघलखाचा भाचा बाहुद्दीन हा येऊन राहिला होता. दिल्लीपतीच्या दक्षिण सुभ्यांत ह्या प्रसंगीं बंडें उद्‌भवलीं होतीं म्हणून मागेंच आलें आहे.

त्या बंडखोरांतीलच हा बाहुद्दीनही एक प्रमुख असल्यामुळें त्याचें पारिपत्य करण्याकरितां शके १२५६ (इ. स.१३३४) त महंमदानें अनागोंदीवर हल्ला चढविला. बाहुद्दीनास अनागोंदीच्या राजानें आपल्या स्वाधीन केल्यास महंमद हल्ला तहकूब करून परत फिरण्यास राजी होता, परंतु 'पोटचें सोडावें पण पाठचें सोडूं नये' हा जो आर्यभारतीय राजांचा उदात्त वर्तनक्रम, त्याला अनुसरून अनागोंदीच्या राजानें पाठीस घातलेल्या बाहुद्दीनास शत्रूच्या स्वाधीन करण्याचें भ्याड व नीच कर्म न करितां मोठ्या निकरानें युद्ध चालविलें. दिल्लीपतीचें सैन्य अफाट असल्यामुळें अनागोंदीच्या राजाला युद्धांत जयाची आशा विशेष जेव्हां दिसेना, तेव्हां त्यानें आपल्या हातानें आपल्या स्त्रिया, लेकी, सुना व अल्पवयी मुलगे ह्यांना आपल्याच तीक्ष्ण खड्गाच्या धारातीर्थीं समाधि देऊन, महाभारतांतील संशप्तकांप्रमाणें युद्ध चालविलें. ह्याच्या बरोबर हरिहर व बुक्क हेही होतेच. शेवटीं राजाचा त्या लढाईंत अंत झाला. तेव्हां बाहुद्दीन, अनागोंदीचा किल्ला व शहर हीं शत्रूच्या हातीं लागलीं; तथापि हरिहर व बुक्क यांच्या हाताखालीं कांहीं लोक लढतच होते. किल्ला पडतांच महंमदानें आपल्या सरदारांवर सर्व व्यवस्था सोंपविली आणि आपण निघून गेला. बाहुद्दीनाची महंमदानें जी पुढें दशा केली ती केवळ अमानुषच होय. त्यानें त्याला जनानखान्यांत बायकांपुढें नेऊन तेथें त्यांस त्याच्या तोंडावर थुंकावयास सांगितलें. मग त्याचें कातडें सोलवून मांस आणि तांदूळ एकत्र शिजवून तें त्याच्या बायकापोरांकडून खावविलें व उरलेलें हत्तीपुढें ठेविलें. तें त्यांनीं नुसतें हुंगलेंही नाहीं. मग त्याच्या सोलून काढलेल्या कातड्यांत पेंढा भरवून सर्व देशभर त्याचें प्रदर्शन करविलें.

अशीच व्यवस्था बंगालच्या सुभेदार महंमद बुरा ह्याचीही ह्याच महंमदानें केली होती. असो. मुसलमान सरदारास ह्या नवीन प्रांताची व्यवस्था करणें हरिहर व बुक्क यांच्या हाल-चालींनीं अतिच अवघड जाऊं लागलें. शेवटीं त्यानें हरिहर-बुक्कांसच आपल्या वतीनें त्या प्रांतांची व्यवस्था करण्यास सांगितलें. हें जें कारस्थान झालें, त्याचें श्रेय सर्वस्वीं माधवाचार्यांची चतुराई, दूरदर्शीपणा आणि त्यांनीं वेळोवेळीं हरिहरबुक्कांस दिलेलें उत्तेजन ह्यांकडेच आहे.ह्याप्रमाणें हे प्रथम किताबी राजे झाले; परंतु पुढें तो मुसलमान सरदार निघून जातांच माधवाचार्यांनीं निराळाच विचार काढला. त्यांनीं ह्या आपल्या दोन्ही शूर व आज्ञाधारक शिष्यांना आपण जेथें मठ करून राहिले होते त्याच प्रदेशावर अभेद्य असें एक मोठें शहर बांधण्याची मागेंच आज्ञा करून त्या कामाला अत्यंत शुभ व विजयप्रद मुहूर्तावर त्यांच्या करवीं आरंभही करविला होता. तें पूर्ण होतांच त्यांनीं आपल्या शिष्यद्वयांतील वडील जो हरिहर त्याला तेथील स्वतंत्र राजा म्हणून विधियुक्त अभिषेक करविला; आणि त्या नगराचें नांव विजयानगर असें ठेविलें. ही गोष्ट शके १२५७ (इ. स. १३३५) च्या सुमारास घडली. माधवसद्गुरुप्रेरित ह्या दोघां शिष्यांनीं प्रत्यहीं नवा नवा पराक्रम करून हां हां म्हणतां हें नूतन प्रस्थापित राज्य चांगलेंच वाढविलें. मलप्रभेपासून खालीं कन्याकुमारीपर्यंतचे सर्व राजे व संस्थानिक ह्या हरिहर-बुक्कांनीं सामोपचारांनीं आपले मांडलीक करून सोडिले आणि लवकरच उघड्या मैदानावरही पांचदहा लाख सैन्य घेऊन महंमद तघलखाच्या अफाट आणि आडदांड सैन्याशीं वाटेल तेव्हां टक्कर देण्यास हे बंधुद्वय समर्थ झाले. त्याचप्रमाणें,

ह्यांच्या उत्तेजनानें व पाठबळानें वारंगूळचा राजा प्रतापरुद्रही आपलें राज्य मुसलमानांच्या हातून हिसकून घेण्यास समर्थ झाला; शिवाय द्वारसमुद्राचें राज्यही बळ धरून निर्धास्त झालें. शेवटीं वारंगूळ, द्वारसमुद्र आणि विजयानगर ह्या तिघां राजांनीं एकजूट होऊन दक्षिणेतून मुसलमानांस कायमचें हांकून लावण्याचा संकेत करून आपापली तयारी चालविली. ह्याप्रमाणें नामदेवादि संतांची ' कलीचिये अंतीं होणार कलंकी । मारील म्लेंच्छ कीं घोड्यावरी ॥ फिरून धर्माची उभारील गुढी । कृतयुग ओढी करी तोची ॥ ' ही करुणावन ईश्वराच्या कर्तृत्वाबद्दलची अचळ श्रद्धा चांगलीच फलद्रूप होऊं लागली.

३३. श्रीमन्माधवाचार्यांच्या ह्या शिष्यद्वयानें जशी ही गुरूच्या उपदेशाच्या बळावर स्वराज्याची स्थापना केली आणि विदेशी व विधर्मी मुसलमानांची खोडकी मोडून त्यांना स्वराष्ट्रांतून बाहेर घालविलें; तसेंच स्वतः माधवाचार्यांनीं, स्वदेशी व अधर्मा म्हणजे बसवानुयायी लिंगाईत व **श्रीशंकराचार्यां**पुढें खोटे पडलेले जैन ह्यानीं शृंगेरीमठांत जो धांटाळा माजविण्याचा घाट घातला होता तो मोडून स्वधर्मातील निवृत्तिमार्गाची शुद्धता करण्यास कंबर बांधिली. त्यांनीं **श्री**मदाचार्यांच्या अद्वैतसिद्धांतावरील सर्व उपटसूळ आक्षेपांचें खंडन करून त्या स्वयंप्रकाश व सत्य सिद्धांतांचें मंडन करण्याकरितां टीकाग्रंथ लिहिण्याचा उपक्रम सुरू केला. त्याचप्रमाणें, मठांत सर्व लिंगाईत व जैन या मतांच्या पक्षपाती विद्वानांबरोबर वादविवाद करून त्यांचा त्यांनीं पराजय केला व मठांतील बंडाळी मोडली. त्या योगानें फिरून त्या शारदापीठाचें महत्त्व पूर्ववत् सर्वमान्य होऊन मठाधिपतींचा जिकडेतिकडे योग्य जयजयकार व्हावयास लागला. श्रीमन्माधवाचार्यांस सायण आणिं भोगनाथ असे दोघे भाऊ होते. त्या

दोघांनाही हरिहराच्या मंत्रिमंडळांत उच्चपदें मिळालीं होतीं. हे दोघेही आपल्या ज्येष्ठ बंधुप्रमाणेंच वेदशास्त्रपारंगत, राजनीतिविशारद व शूर योद्धे होते. ह्यांनीं स्वधर्मीयांच्या प्रवृत्तिमार्गाचें संरक्षण करण्याचा विडा उचलला होता. ह्या-प्रकारें स्वराज्य व प्रवृत्तिनिवृत्तिमार्गांच्या संरक्षणास उत्तम पुढारी इतकी सामग्री एका ठिकाणीं झाल्यावर राष्ट्राच्या उत्कर्षास आणखी तें काय पाहिजे ? वरीलप्रमाणें सर्व सुव्यवस्था होतांच हरिहरबुक्कांनीं शके १२६२च्या सुमारास महंमद तब-लखास सारखें चोपीत चोपीत अगदीं कृष्णापार पिटाळलें आणि फिरून आपल्या सोडविलेल्या राष्ट्राची अंतर्व्यवस्था करण्यासाठीं त्यांनीं महंमदाचा पाठलाग सोडून दिला. महंमदाची पण अशी त्रेधा उडाली कीं, त्यानें फिरून कृष्णा वलांडण्याचें स्वप्नांत-सुद्धां आणिलें नाहीं; तथापि कृष्णेच्या उत्तरेस त्यानें आपल्या स्वभावाला अनुसरून आपलें डोंगर पोखरून उंदीर काढण्याचें व्रत चालूच ठेविलें. कोंडाणें ( सिंहगड ) किल्ल्याचा नागनाईक नावाचा एक मराठा कोळी राजा होता; त्याच्यावरच धाड घालण्याचें ह्या वेड्या पिराच्या मनानें घेतलें. नागनाईकाचा प्रांत तो काय, सरासरी चारदोन लक्ष वसुलाचा आणि लाखपन्नास हजार वस्तीचा ! नाईक स्वतां किल्ल्यांतच असे. महंमदानें आपल्या लाखों सैन्यासह त्या किल्ल्याला वेढा दिला. ह्या नाईकानें आजपर्यंत मुसल्मानांच्या अगदीं मी मी म्हणणाऱ्या अनेक सरदारांस खडे चारिले होते; परंतु ह्या प्रसंगीं महंमदाजवळ सैन्यच फार ! नाईकाजवळ जेमतेम दोनतीन हजार लोक असतीलनसतील, तथापि त्यानें धीर सोडिला नाहीं; तर खऱ्या मराठ्या शूरास योग्य असाच पराक्रम केला. एक महिना झाला, दोन झाले, चार झाले, शेवटीं आठवा

महिनाही उजाडला; पण नाईक कौलास येईना. महंमदाचे प्रत्यहीं शेंपाचशें लोक नाईकाच्या लोकांनीं अल्लाकडे पाठवावेच असा प्रकार चालला होता. शेवटीं किल्ल्यांतील अन्नाचा पुरवठा संपला. मेंढाबकराही मिळेनासा झाला. तेव्हां नाइलाज होऊन नागनाईक आपल्या चारदोनशें लोकांनिशीं किल्ल्याखालीं उतरून मुसलमानांची फळी फोडून जाण्याच्या इराद्यानें वेढा घालणाऱ्या सैन्यावर घसरला; आणि प्रतिपळास आपल्या तरवारीस शत्रूचें रक्त पाजून अखेर लढतां लढतां तो व त्याचे सर्व साथीदार जेव्हां धारातीर्थी मरण पावले तेव्हांच नुसता किल्ला–निर्जीव खडक–महंमदाच्या हातीं लागला. इतक्यांत गुजराथ वगैरेंत बंडें उद्भवल्यामुळें महंमदास नर्मदापार व्हावें लागलें.

३४. दिल्लीपतीची महाराष्ट्राकडे पाठ फिरतांच थोडक्याच अवकाशांत फिरून त्याला इकडे स्वराज्य म्हणून कधीं वळावयासच न लागावें अशी तजवीज झाली. दक्षिणेंतील इमामभक्तांतही दुफळी होऊन पक्षविपक्ष झाले असल्याचा मागें उल्लेख झालाच आहे. त्याचाच परिणाम दक्षिणेंत ब्राह्मणी राज्याची स्थापना होण्यांत झाला. आतां हें फक्त नांवाचेंच ब्राह्मणी राज्य होतें; कारण ह्याचा स्थापक इमामभक्तच होता. त्याची मूळ हकीकत थोडक्यांत अशी आहे कीं, तो प्रथम दिल्लीकडेसच एका कनोजा ब्राह्मणाचा पैसे देऊन विकत घेतलेला गुलाम होता. त्याचें नांव जाफरखान. एके दिवशीं हा आपल्या धन्याचीं शेतें नांगरीत असतां त्याला एक भूमिगत द्रव्याचा निधि सांपडला. तो त्यानें निरभिलाषबुद्धीनें आपल्या ब्राह्मण धन्यास जशाचा तसा नेऊन दिला. ह्या त्याच्या सच्छीलाचें पारितोषिक म्हणून त्याच्या धन्यानें त्याला गुलामगिरींतून मुक्त केलें आणि ‘ तूं केव्हां तरी ह्याच जन्मीं स्वतंत्र राजा होशील, ’

असा त्याला आशीर्वाद दिला. ह्या उत्तेजक ब्राह्मणवाणीनें त्या जाफरखानाच्या मनांत महत्त्वाकांक्षा चांगलीच बळावली. नंतर त्यानें दिल्लीपतीच्या सैन्यांत नोकरी पत्करली व आपल्या कर्तृत्वानें व दृढश्रद्धेनें तो वाढत वाढत पांच-हजारी, दहा-हजारी सेनापतीच्या पदवीला येऊन पोंचला. त्याच जाफर-खानानें दक्षिणेंतील महंमद तघलखाच्या सरदारांतील व प्रजेंतील परस्पर असंतोषाची ही संधि साधून सर्वांस बाजूस सारून आपला स्वतंत्र होण्याचा मार्ग सुधारला आणि त्यांत त्याला जयही आला. तेव्हां शके १२६९ (इ. स. १३४७) त त्यानें 'अल्लाउद्दीन हुसेन गंगू ब्राह्मणी' म्हणून आपल्या नांवाची द्वाही फिरविली व आपण गुलबुर्गा येथें तख्तनशीन झाला. आपल्या ब्राह्मण धन्याच्या कृपेचें व आशीर्वादाचेंच स्वतंत्र राज-पद हें फळ मानून त्यानें आपल्या बादशाही नांवापुढें 'गंगू ब्राह्मणी' अशीं अक्षरें जोडिलीं. ह्याच्या राज्यांत बेदर,गुलबर्गा व भोंवतालचा सपाट प्रदेश एवढाच टापू होता. सारांश काय कीं, दक्षिण महाराष्ट्र व कर्नाटकपासून कन्याकुमारीपर्यंतचें सर्व दक्षिण द्वीपकल्प विजयानगरकरांनीं व्यापिलें. कोंकण व इतरही डोंगराळ मुलूख मराठे लोकांनीं आपापल्या ठिकाणीं सावरून धरिला व हा जो पूर्वमहाराष्ट्राचा सपाट टापू तोही नुसता नांवाचाच कां होईना, परंतु 'ब्राह्मणी' राज्याचा भाग झाला. ह्या नुसत्या नांवाच्या ब्राह्मणी राज्यांतच भावी खऱ्या ब्राह्मणी राज्याचा पाया रोंवला गेला, असें म्हटलें असतां कांहीं बाध येणार नाहीं.

३५. मध्यंतरीं कुलकवि नामदेवांचे समकालीन जनमित्र व चोखामेळा ह्या दोघां साधूंनीं शके १२४० (इ.स.१३१८) आणि शके १२६० (इ. स. १३३८) त अनुक्रमें समाधि

घेतल्या. आतां नामदेवांच्या समकालीनांपैकीं एकही साधुकवि जीवंत राहिला नसल्यामुळें नामदेवांसही ह्या मर्त्य लोकाचा कंटाळा येणें साहजिक होतें. तेव्हां त्यांनींही आपलें इहलोककर्तव्य संपलें असें जाणून हळूहळू आपला परमपदाचा मार्ग स्वीकारला. त्यांनीं शके १२७२ ( इ. स. १३५० ) त समाधि घेतली.

ज्ञानदेवनामदेवांचेंच कार्य, ह्यापुढें विजयनगरच्या राज्य-स्थापनेचें काज ज्यांनीं कांहीं वर्षांपूर्वीं अंगावर घेऊन पार पाडलें, त्या सायणमाधवाचार्यांस पुरें करावयाचें होतें. तें त्यांनीं कसें पुरें केलें तें आतां आपण पाहूं. चातुर्वर्ण्यव्यवस्थेनें बांधलेल्या आमच्या ह्या भारतीय समाजांत धर्मकार्य साधण्यास नेहमीं दुहेरी प्रयत्न लागतात. ज्ञानदेवनामदेवांनीं प्रथम जें कार्य केलें तें मागें सांगितल्याप्रमाणें अडाणी लोकांना त्यांच्याच भाषेंत व त्यांच्याच साध्या पद्धतीनें स्वधर्माची ओळख करून दिली हें होय. मागें श्रीमच्छंकराचार्यांच्या वेळेलाही जैमिनीचे शिष्य भट्टपाद कुमारिल ह्यांनीं प्रथम लोकांची स्वधर्मावरील व वेदादि स्वधर्मप्रतिपादक वचनांवरील उडत चाललेली श्रद्धा पुनः बसविली आणि मग त्यांच्या मागून आचार्यांनीं पाखंडमतवाद्यांचें खंडन करून सनातन वैदिक धर्माचें रहस्य जो अद्वैतसिद्धांत त्याची सर्व ज्ञानाधिकाऱ्यांस ओळख पटवून दिली आणि त्याबरोबरच चारी वर्णांचे सनातन श्रुतिप्रोक्त आचारही फिरून त्या त्या वर्णांत नांदते केले. तोच प्रकार कांहीं फरकानें ह्या प्रसंगींही चालला होता. नामदेवांनीं मुख्यतः रोचक वचनांनीं जनांचें आधिभौतिक तापानें बहकलेलें मन ईश्वरासंबंधानें सश्रद्ध बनविलें. वस्तुत :—

तुटे मायाजल विघडे भवसिंधु । जरी लागे छंदु हरिनामाचा ॥
देवकर्मधर्म करितां या कली–। माजी कोण बळी तरला सांगा ॥
न पढवे वेद नव्हे शास्त्रबोध । नामाचे प्रबंध पाठ करा ॥
नव्हे अनुष्ठान नकळे ब्रह्मज्ञान । करावी सोपान कृष्णकथा ॥
न साधे हा योग न करवे वैराग्य । साधा भक्तिभाग्य संतसंगें ॥
नामा म्हणे साधन नलगे आणीक । दिधली मज भाक पांडुरंगें ॥

३५. असल्या रोचक अभंगांत सनातन श्रुतिप्रणीत वर्णाश्रम-धर्माचारांच्या विरुद्ध कांहींच प्रतिपादन नाहीं; उलट त्याच आचारांची श्रेष्ठता गृहीत धरिली आहे. परंतु वरवर पाहणाराला मात्र गुळांत घातलेला कडुलिंब जसा अज्ञान पोरास, तसा वरील अभंग आचारबंधनापासून आपणांस एकदम मुक्त करणारा असा दिसतो. परंतु आंत जों जों पहाल तों तों सर्व वर्णाश्रम व आचार ह्यांचीं बंधनें खेंचून भरलीं आहेत असेंच दिसेल. आपण आतां तो अभंग उकलून पाहूं. त्याचा अर्थ लावण्यास आम्ही नामदेवोक्त मीमांसेचाच आधार घेणार आहों. वरील अभंगांत नामदेवांनीं ‘ देवधर्म करितां या कलीमाजी कोण बळी तरला ? सांगा ’ अशा उद्गारांनीं जनांच्या कुरकुरींचाच अनुवाद करण्यास प्रारंभ केला आहे. मात्र तसा अनुवाद करितांना लोकांना त्यांनीं एक एक सुलभ म्हणून मार्ग सांगितला आहे. ते मार्ग म्हणजे ‘ नामाचे प्रबंध पाठ ’ करणें, ‘ सोपान कृष्णकथा ’ करणें, आणि ‘ संतसंगें भक्तिभाग्य ’ साधणें, हे होत. आतां हे जे सोपे म्हणून त्यांनीं मार्ग सांगितले ते वस्तुतः त्यांच्याच म्हणण्याप्रमाणें कसे आहेत, हें पाहिलें म्हणजे आपलें काम झालें. पैकीं १ ला, नामाचे प्रबंध पाठ करणें हाच घेऊं. नामासंबंधानें नामदेव म्हणतातः–

या नामाचें जें मूळ त्यामाजी जो धाला । प्रपंचाचा घाला मग नाहीं ॥
नामदेव म्हणे स्वतःसिद्ध नाम । गुरुवीण वर्म हातां नये ॥
ज्ञान व्हावें आधीं ओळखावें नांवा । मग जावें गांवा तयाचिये ॥

३६. वरील अभंग यथार्थवचनांपैकीं होय. नाम जाणावयाचें म्हणजे त्याला प्रथम गुरु हवाच. ह्या गुरूच्या कसोटीबद्दलही फिरून ज्या ज्या गोष्टी नामदेवादिकांनीं आपल्या, वरीलप्रमाणेंच, यथार्थवचनी अभंगांत गोंवल्या आहेत, त्या जर येथें दाखल केल्या तर तें मारुतीचें शेंपूटच होईल, तथापि ' अनधिकारी व्युत्पत्ति । गुरु तो कनिष्ठयाति । माता नीचशिक्षवृत्ति । शोभा न पवे ॥ ' असें नामदेवांचेंच वचन आहे. तात्पर्य हेंच कीं योग्य गुरु मिळून नामाची खरी ओळख पटून ' या नामाचें जें मूळ त्यामाजी जो धाला' म्हणजे श्रीमदाचार्यांच्या अद्वैतसिद्धांताची ज्याला अनुभूति–अपरोक्षानुभूति– झाली त्यालाच ' प्रपंचाचा घाला मग नाहीं.' आतां श्रीमदाचार्योक्त अद्वैताची अपरोक्षानुभूति व्हावयास काय काय लागतें ? किंवा वर्णाश्रम धर्माचारबंधनें सोडून चालतें किंवा काय, हा प्रश्न त्या श्रीमदाचार्यांच्याच ब्रह्मसूत्रभाष्याच्या प्रस्तावनेवरून सोडवूं लागलें म्हणजे असें दिसून येईल कीं, आचार्यांस अधिकारवाद संमत असून वर्णाश्रमधर्माचारद्वारां चित्तशुद्धि होऊन मग अद्वैतसिद्धांताच्या ब्रह्मज्ञानास कोणीही अधिकारी होतो, असा त्यांनीं सिद्धांत केला आहे. गुरु उच्च यातीचा असावा, हें मत नामदेवांसही मान्य होतें व त्यांचा गुरुही, विसोबा खेचर नांवाचा ब्राह्मणच होता. उच्च यातीचा गुरु असावा, ह्यावरून यातीचें महत्त्व संतांस मान्य आहे आणि यातीचा उच्चपणा प्रवृत्तीमध्यें जो ओळखावयाचा तो त्या त्या यातीच्या श्रुत्युक्त कर्माचारावर आहे. कारण जर

स्वयातीचा आचार कोणी करीत नसेल तर तो अधम होतो व आपल्या यातिसंबंधीं अधिकारास तो मुकतो. केवळ जातीचा ब्राह्मण तो गुरु होण्यास योग्य नसतो, आणि तो योग्य नव्हे अशीं स्पष्ट वचनेंही नामदेवादि साधुकवींचीं आहेत. दुसरा मार्ग सोपान कृष्णकथेचा. त्यासंबधानेंही वरील-प्रमाणेंच काठिण्य दाखवितां येईल; परंतु विस्तारभयास्तव तसें करितां येत नाहीं. तिसरा मार्ग संतसंगें भक्तिमार्ग साधणें हा होय. ह्यालाही वरीलप्रमाणेंच अनेक निर्बंध आहेत. हे निर्बंध काय आहेत, हें भिन्न भिन्न दाखविणें म्हणजे एक रामायणच होईल; तथापि कांहीं अभंग मोघमांत देतों :—

कांचनीक भक्ति सर्वकाल करी । बहुतांचे वैरी हित नेणें ॥
लोकांपुढें सांगे आम्ही हरिभक्त । न होय विरक्त स्थिति ज्याची ॥
असंतोषी सदा अतितासी जाळी । सुकृताची होळी स्वयें केली ॥
**वेदमर्यादा** सांडूनी चालती । हुंब ते घेती वाऱ्यासवें ॥
नामा म्हणे असो याची मात । सुख नेणें हित कदाकाळीं ॥

दशमी **एकव्रत** करा दिंडीदर्शन ।
एकादशी **उपवास** तुम्ही जागा जागरण ॥
द्वादशीसाधन कोटि कुळें उद्धरती ।
नामा म्हणे केशव ठाव देईल वैकुंठीं ॥

३७. वरील अभंगांवरून दशमीचें एकव्रत ( [illegible] जेवणें , एकादशीचा उपवास आणि रात्रीं जागरण व साधनद्वादशी पाळणें इत्यादि व्रतें व देहदंडक कर्मे भक्तांमार्गे आहेतच. त्याचप्रमाणें अतीताचा आदर, संतोषवृत्ति; विरक्ति यांचीही जरूरी भक्तांस आहेच. तात्पर्य, ‘ वेदमर्यादा सोडूनी चालती हुंब ते घेती वाऱ्यासवें ’ असाच शेवटचा निकाल नामदेवांनीं दिला आहे. वेदमर्यादेंत वर्ण, जाति, आश्रम व आचार यांच्य

बंधनांचा समावेश झालाच पाहिजे; नाहींतर त्या शब्दांचा अर्थ होऊं शकणार नाहीं. ज्ञानेश्वरांचा अभिप्राय असाच आहे.

म्हणौनि नैष्कर्म्य होआवें । तरी एथ तें न संभवे ।
आणि निषिद्ध केविं रहाटावें । विचारी पां ॥
म्हणोनि जें जें उचित । आणि अवसरें करूनि प्राप्त ।
तें कर्म **हेतुरहित** । आचरें तूं ॥
पार्था आणिकही एक । नेणसी तूं कवतिक ।
जें ऐसें कर्म **मोचक** । आपैसें असे ॥
देखें **अनुक्रमाधारें** । स्वधर्म जो आचरे ।
**तो मोक्ष तेणें व्यापारें । निश्चित पावे** ॥
हा लोक कर्मी बांधिला । जो परतंत्रा भूलला ।
तो नित्य यज्ञातें चुकला । म्हणोनियां ॥
तुम्हा **वर्णविशेषवशें** । आम्ही हा स्वधर्म वहिला असे ।
यातें उपासा मग आपैसें । पुरती काम ॥
परिस पां सव्यसाची । मूर्ति लाहोनी देहाची ।
खंती करिती कर्माची । ते गांवढे गा ॥
हे सकललोकसंस्था । रक्षणीय सर्वथा ।

* * *

म्हणोनियां मार्गाधारें वर्तावें । विश्व हें मोहरें लावावें ।
अलौकिक नोहावें । लोकांप्रति ॥

असे अनेक उतारे मिळतील; परंतु येथें केवळ दिग्दर्शनापुरतेच घेतले आहेत. वरील अवतरणांत वर्णाश्रमधर्म मोडूं नयेत इतकेंच विधान नसून ते राखणें, आणि ज्ञात्यांनीं त्याप्रमाणें वागणें म्हणजे सर्व कर्में श्रुतिस्मृतींनीं सांगितल्याप्रमाणें आचरणें, ह्यानेंच मोक्ष साधतो व जगाची रहाटी बिघडत नाहीं, असें सांगितलें आहे. मात्र तीं तीं कर्में निष्काम म्हणजे कर्मफळाची इच्छा सोडून केलीं पाहिजेत. देहाची मूर्ति लाहून म्हणजे देहधारी होऊन जो कर्मबंधनाची खंती करील तो केवळ गांवढळ अज्ञान पशु होय.

' हे सकललोकसंस्था ' म्हणजे चातुर्वर्ण्यादि जातिभेदसहित ' सर्वथा रक्षणीय ' सर्व प्रकारें प्रयत्नपुरस्सर संरक्षण करण्यासच योग्य आहेत; ह्यांचा उच्छेद करणें कदापि श्रेयस्कर होणार नाहीं. ह्याकरितां सनातन चालत आलेल्याच मार्गाधारें वागावें आणि आपल्या परिवारांतील सर्व लोकांसही तसेंच पूर्वापार चालत आलेल्या श्रुतिस्मृतिपुराणोक्त मार्गांनीं वागण्याचें सदुदाहरण घालून देऊन त्यांच्याकडून त्या वर्तनाचें वळण न बिघडेल, असें करावें. लोकांनिराळें केवळ आपल्या व्यक्तीच्याच स्वैर मतानें इष्ट व पूत वाटणाऱ्या मार्गानें वागूं नये. मतस्वातंत्र्यास वाटेल तसें ताणून अलौकिक होण्याचा प्रयत्न करूं नये. ज्ञानदेव, नामदेव यांचा असा उपदेश आहे कीं,

कां सांडिशी गृहाश्रम । कां सांडिशी क्रियाकर्म ।
कासया सांडिशी कुळांचे धर्म । आहे तें वर्म वेगळेंचि ।।
( ज्ञानदेव गाथा, स्फुट अभंग )

३८. म्हणजे गृहस्थाश्रम, कर्ममार्ग, उपासनामार्ग, त्याचप्रमाणें कुलधर्म हे सोडून देण्यांत कांहीं वर्म नाहीं; उलट, तें चालविण्यांतच पुढील विचारसरणीनें वर्म हातीं येईल.

हित तें आचरा हित तें आचरा । मनीं भाव धरा जाणतेनो ।।
प्रसंगीं पुराणें ऐकिलीं श्रवणीं । त्यांतिल कोण मनीं धरील अर्थ ? ।।
काय तें सांडीलें काय तें मांडीलें । काय तें दंडीलें प्रवृत्तीसी ? ।।
अनंत ह्या मूर्ति पाहिल्या लोचनीं । त्यांतील कोण ध्यानीं प्रतिबिंबली ।।
स्वप्नींचिया परी देखसी अभ्यास । न धरीच विश्वास चित्त तुझें ।।
वांझेचिया स्तनीं अमृताची धणी । मृगजळ पाणी ताऱ्हावोले ।।
तरी प्रेमेंवीण कळती क्रियाकर्में । हातीं येती वर्में विठोबाचीं ।।
दृष्टीचें देखणें श्रवणींचें ऐकणें । मनाचें वैसणें एक होय ।।
नामा म्हणे तरी विठो येउनी भेटे । कायाच पालटे कैवल्य होय ।।

३९. वरील अभंगांत पुराणश्रवण, देव-सगुणमूर्ति-दर्शन आणि इतर सर्व श्रौतस्मार्त कर्मबंधनें हीं पाळीत असतांच, त्याज्य काय, अत्याज्य काय, कर्मबंधनानें प्रवृत्ति-इहसुखैकदृष्टि जी तिचें दंडण कशांत आहे, ह्या गोष्टी, जर प्रेमपूर्वक आचार करून त्याबद्दल सश्रद्ध मनानें विचार केला तर सहज कळून, सगुणमूर्तिदर्शनां-गानें एखाद्या मूर्तीच्या ठिकाणीं तरी ईश्वरभावनेनें मन स्थिर होऊन ध्यानयोग साधेल व शेवटीं **दृष्टीचें देखणें, कानांचें ऐकणें** आणि **मनाची श्रद्धा** यांचें ऐक्य व ईश्वरसाक्षात्कार होऊन मनुष्य मुक्त होईल, अशी सहजपरंपरा दर्शविली आहे.

४०. ह्याप्रमाणें असंस्कृतज्ञ सामान्य जनांस रुचकर बोधानें ताळ्यावर आणण्याचें काम महाराष्ट्र साधुवर्य श्रीज्ञानदेव-नामदेवांनीं केलें व पुढें परंपराही कायम केली. दुसरें अत्यंत अवघड काम, संस्कृतज्ञ आणि कांहीं अंशीं धर्मसंबंधीं ज्ञानाचें ग्रहण संस्कृत भाषेच्याच द्वारें करूं इच्छिणारे, किंबहुना प्राकृत भाषेचा तिरस्कार करणारे असे जे विशेष आग्रही अग्रवर्णाचे व तृतीयचतुर्थाश्रमांचे लोक, त्यांचें समाधान करून धर्मश्रद्धा व धर्मव्यवस्था उत्पन्न करण्याचें, तें सायणमाधवाचार्यांनीं अंगावर घेतलें आणि विजयानगरच्या प्रतिदिन अधिकाधिक उत्कर्ष पावणाऱ्या स्वयंनिर्मित राज्याश्रयानें चांगलेंच पार पाडिलें. अद्वैतमतप्रस्थापक प्रथम श्रीमच्छंकराचार्य यांच्या मागें माधवा-चार्यांसारखा एकही कार्यक्षम पुरुष शारदापीठावर आरूढ झाला नाहीं, ह्यांस ‘ विद्यारण्य ’ अशी अन्वर्थक पदवी होती. चारी वेदांच्या संहितांवर ह्यांचीं भाष्यें आहेत; त्याचप्रमाणें सर्व उपनिषदांवरही टीका आहेतच; पराशरमाधवीय या ग्रंथांत ह्यांनीं सर्व स्मृतींचें ऐक्यभूत सार ग्रथित केलें आहे. वैद्यक, ज्योतिष, व्याकरण ह्या विषयांवरही ह्यांचे माधवनिदान,

कालमाधव, माधवीय धातुवृत्ति असे स्वतंत्र, सर्वमान्य व विस्तृत ग्रंथ आहेत. अद्वैतसिद्धान्ताची थोडक्यांत उत्तम समजूत घालून देणारा पंचदशी हा स्वतंत्र ग्रंथ यांचाच होय. पंचदशीच्याच तोडीचा ह्यांचा दुसरा स्वतंत्र ग्रंथ जीवन्मुक्तिकल्पलता. षड्दर्शनसंग्रह व शांकरदिग्विजय ग्रंथ यांचेच. ह्यांशिवाय आणखी किती तरी ह्यांचे ग्रंथ आहेत. त्या सर्वांची यादी द्यावयाची म्हणजे फारच विस्तार होईल; म्हणून येथें इतकेंच मोघम सांगतों कीं, माधवाचार्यांनीं ग्रंथकर्तृत्वानें व सिद्धान्तप्रतिपादनशैलीनें जैन, लिंगाईत, वीरवैष्णव, वीरशैव अशा प्रकारच्या साक्षर लोकांतील धर्मभेदांचा जोर पुष्कळ कमी करून फिरून एकदां श्रीमदाचार्यांचें सनातनधर्माचारविचारांशी अविरोधी असें अद्वैतमत अधिक प्रज्वलित केलें आणि शृंगेरी मठाची जिकडेतिकडे पूर्ववत् महती वाढविली.

४१. इकडे अल्लाउद्दीन सुलतान गंगू ब्राह्मणी आणि हरिहरबुक्क हे दोघेही आपापल्यापरी आपापलीं नूतनप्राप्त राज्यें जेणेंकरून व्यवस्थित आणि संरक्षणक्षम होतील, असे यत्न करीत होते. अल्लाउद्दीन गंगू हा स्वभावानें शांत आणि न्यायी असून दूरदृष्टीचा पुरुष असल्यानें वारंगूळ वगैरेंच्या हिंदु राजांना विनाकारण दुखविण्यांत लाभ नाहीं, असें समजून त्यांच्याशीं सलोख्यानेंच वागूं लागला व तेही त्याच्या चांगुलपणाबद्दल खात्री होतांच त्याचा योग्य मान राखूं लागले. हरिहरबुक्कांनींही जितके स्वधर्मी लहानलहान संस्थानिक आपल्या कक्षेंत येतील तितके आणून आपलें राज्य, त्याच्या संरक्षणार्थ भरपूर सैन्य आणि कोश यांची नीट व्यवस्था लावून भक्कम पायावर आणून ठेविलें व आपला गुरु माधवाचार्य यांच्या सन्मानार्थ म्हणून त्यांनीं एक मोठें देवालय बांधिलें. माधवाचार्य आतां शृंगेरी

मठाधीश जगद्गुरु झाले होते. विजयानगरास हरिहरबुक्कांनीं एकापुढें एक असे कोट उभारून, यांत निरनिराळे प्रकार करून प्रत्येक ठिकाणीं पुरेसे विश्वासू नगररक्षक ठेवून कशाही शत्रूला आपलें तें नगर अभेद्य केलें. विजयानगरचा विस्तार फारच मोठा असून तें शहर तुंगेच्या तीरावर पसरलें होतें. विजयानगरच्या पहिल्या वेशीपासून शेवटच्या वेशीपर्यंत अंतर जवळजवळ ४ कोसांचें म्हणजे ८ मैलांचें असून त्याची रुंदीही दोन कोस तरी होती. एकंदर घेर जवळजवळ बारा कोसांचा किंवा २५ मैलांचा सहज होईल. एका बाजूस तुंगेचा खडकाळ तास आणि दुसऱ्या टोंकास ५ कोसांवर समुद्राच्या सपाटीपासून २००० हातांच्यावर उंच असणाऱ्या टेंकड्या ह्यांच्यामध्यें असणाऱ्या विस्तीर्ण माळाच्या उत्तरकोणांत हें शहर होतें. प्रत्यक्ष शहराची वसतीही ६०–७० हातांपासून तों ६००-७०० हात उंचीच्या टेंकड्यांवरूनच होती. ह्या सर्व टेंकड्या मोठमोठ्या भिंतींनीं एकमेकींशीं जोडून घेऊन सर्व शहर कोटमय करून सोडिलें होतें. ह्या भिंतींची रांग नदीचें पात्र आणि शहर यांच्यामध्यें असणाऱ्या टेंकड्यांच्या रांगेस भिडली असल्यानें नदीच्या बाजूनेंही शहरांत प्रवेश अशक्यच होता. दक्षिण आणि नैर्ऋत्येकडून काय तो नगरांत प्रवेश होण्यास मार्ग मिळावयाचा संभव. पैकीं नैर्ऋत्येच्या बाजूस एक मोठें तळें बांधून काढलें होतें. ह्या तलावाकरितां बांधलेला फरसबंदी बांध म्हणजे एक अर्धकोस लांबीची किल्ल्याची भिंतच होय. तलावाचें क्षेत्र दोन कोस चौरस असून ह्यांत चार पुरुषांवर पाणी असे. दक्षिणेच्या अंगास जो जंगी कोट बांधला होता तो अगदीं आंतील टेंकड्यांस नेऊन भिडविला होता, व त्यांत जागजागीं बुरूज आणि माऱ्याच्या जागा केल्या असून त्या

ठिकाणीं सतत सशस्त्र रक्षक ठेविले होते. सगळ्यांत बाहेरच्या कोटाच्या आंत भातशेती असे आणि तलावाच्या पाण्याचा वाटेल तसा पुरवठा असल्यानें शेतीचें उत्पन्नही भरपूर होत असे. ह्या शेतीच्या पलीकडे मग निरनिराळे मनुष्य-वसतीचे चौक होते. अगदीं मध्यभागीं एका उंच टेंकडीवर बालेकिल्ल्याप्रमाणेंच राजवाडा, सेनापतीचा वाडा आणि टांकसाळ हीं असत. ह्याप्रमाणें विजयानगरची एकंदर रचना मोठी चातुर्यानें केलेली होती.

४२. हरिहरराय शके १२७१ च्या सुमारास कैलासवासी झाले. त्यांच्या मागें त्यांचे बंधु बुक्कराय हेच सिंहासनारूढ झाले. मध्यंतरीं कांहीं काल सिंहासनाबद्धल किंचित् लढाही लागला असावा, असा तर्क करण्यास जागा आहे. ह्या बुक्कमहाराजांस गुलबर्ग्याच्या ब्राह्मणी सुलतानांबरोबर सारखी लढाई चालवावी लागली; कारण अल्लाउद्दीन गंगू ब्राह्मणीच्या मागें त्याचा मुलगा महंमदशहा म्हणून जो तख्तनशीन झाला तो अल्लाउद्दीनाप्रमाणें सामप्रिय नसून, जसा अत्यंत उतावळा, खुनशी, चिडखोर आणि लहरी होता, तसाच तरुण, शूर व धाडशी आणि धर्म-वेडा असल्यामुळें अल्लाउद्दीनाच्या वेळची शिस्त अर्थातच मोडली; व 'येन केन प्रकारेण' काफर हिंदूंचा छळ करण्याची नवी शिस्त पडली. ह्यानें एकदां एक लाख काफरांची कत्तल करण्याचा संकल्प करून तो पुराही केला. असला संकल्प पुरा व्हावयाचा म्हणजे देशच्या देश उजाड करीत सुटल्यावांचून गत्यंतर नव्हतें. बिचारी गरीब निःशस्त्र हिंदुप्रजा ह्या इमाम दांडग्या कसायापुढें केवळ शेळ्यामेंढ्या बनावी, हें सहजच आहे. मुसल्मान तितका परदेशांत नवीन मुलूख-गिरीवरच आला असल्यानें निरपवाद सशस्त्र आणि

सुल्तानाच्या संकल्पानें शेफारलेला! मग काय विचारावें? परंतु ह्या प्रसंगीं बुकरायानें हिंदूंचा कैवार चांगलाच घेतला आणि आपल्या हिंदुत्वाच्या निसर्गसौजन्याला विनाकारण बट्टा लावण्यासारखें अमानुष क्रौर्य न दाखवितां केवळ क्षत्रियोचित रणकौशल्यानेंच शत्रूशीं सामना दिला. त्यानें सुलतान महंमदाच्या सैन्याची एका प्रसंगीं तर चांगलीच लांडगेतोड करून त्याला दांतीं तृण धरावयास लाविलें. बुक्करायाच्या पाठबळानें तेलंगण, वारंगूळचे राजेही चांगलेच बळावले. सुलतान महंमद हा इतका चिडखोर आणि संशयी होता कीं, क्षुल्लक कारणावरून त्याचें माथें फिरे आणि तो हिंदूंची कत्तल करी. त्यानें आपल्या राज्यांत नवीन सोन्याच्या नाण्यांची टांकसाळ सुरू केली. त्याच्या राज्यांतील व लगतच्या देशांतील हिंदू पेढीवाल्यांच्या हातांत तीं नाणीं जाऊं लागलीं. हे हिंदु पेढीवाले लोक पुष्कळच नाणीं साचल्यास तीं आटवून त्यांच्या लगडी करीत; कारण नाण्यांची किंमत त्यांच्या वजनाइतक्या सोन्याच्या किंमतीपेक्षां विशेष नसल्यानें तीं आटविण्यांत त्यांना तोटा वाटत नसे. पण त्यामुळें ह्या स्वारीच्या मनांत असा संशय आला कीं, हे लोक आपलें नाणें प्रचारांत राहूं नये म्हणून तें आटवितात. कदाचित् ह्या लोकांना असें करण्याबद्दल तेलंगण व विजयानगरच्या हिंदु राजांचीही फूस असेल. झालें! ह्या माथेफिरू सुल्तानानें सर्व हिंदु पेढीवाले धरून आणिले आणि त्यांना सरसहा कंठस्नानें घातलीं. ह्याप्रमाणें महंमदानें हिंदु पेढीवाल्यांचा नायनाट करून दिल्लीहून तेथील पेढीवाल्यांचे नातेवाईक आपल्या राज्यांत पेढ्या घालण्याकरितां बोलावून आणले. आणखी एकदा असें झालें कीं, गुलबर्ग्यास घोड्यांचे व्यापारी कांहीं अरबी घोडे विकण्याकरितां आले. सुलतानसाहेब खरेदीस गेले; परंतु तेथें एकही घोडा त्यांच्या पसंतीस

उतरला नाहीं; तेव्हां ते त्या घोडेवाल्यास म्हणाले 'हे असले भिकार घोडे आम्हांपुढें विक्रीकरितां कां आणले?' सुलतान-साहेबांच्या गरम मिजाशीची ख्याति होतीच;तेव्हां त्यांची मिजास थंड होण्यासारखाच कांहीं जबाब दिला पाहिजे, हें जाणून ते धूर्त सौदागर म्हणाले 'साहेब! चांगले चांगले सर्व घोडे काफरांचा राजपुत्र विनायकदेव ह्यानें आमच्याकडून बळजबरीनें घेतले, तेव्हां आमचा नाइलाज झाला. काफरांची खोड मोडण्यास खाविंद समर्थ आहेत. तेवढा बंदोबस्त झाला म्हणजे शेलका माल खाविंदांपर्यंत येऊन पोंचण्यास अडचण पडणार नाहीं.' सुलतानसाहेबांस गोष्ट पटली. लगेच वारंगूळकडे कुचाची नौबत ठोकवून चळ्या घोड्यानिशीं तेलंगणावर स्वारांनी छापा घातला. बिचारा राजपुत्र विनायकदेव! त्याच्या ध्यानींमनींही हें अरिष्ट नव्हतें! अचानक—नाहीं राजधानींत आपल्या बापाजवळ, नाहीं एखाद्या किल्ल्यांत—केवळ पांचपन्नास साथीदारांसह मजेनें हिंडत असतां तो अशा कचाट्यांत सांपडला! तो कसा तरी मूठभर लोकांनिशीं सुलतानाशीं सामन्याला उभा राहिला. पुष्कळ निकरानें विनायकानें व त्याच्या साथीदारांनीं लढाई दिली, परंतु शेवटीं तो शत्रूच्या हातीं सांपडला. ह्याच तेलंगणाच्या राजाच्या साहाय्यानें महंमदाच्या बापानें म्हणजे अल्लाउद्दीन गंगू ब्राह्मणीनें ब्राह्मणी पादशाही स्थापली होती; इतकेंच नव्हे, तर पुढें यांच्या त्यांच्या आणाशपथा होऊन कायमचा सलोखाही झालेला होता. परंतु कृतज्ञता ही मुळीं ह्या इमाम दांडग्यांच्या कोशांत दुर्गुणाचाच पर्याय असल्यानें ती त्यांच्या आश्रयाला योग्य नव्हेच. ह्या प्रसंगीं सांपडलेला हा आपल्या बापाचा दोस्त हिंदु राजा त्याच्यापुढें जेव्हां आला तेव्हां सुलतानसाहेब त्याला विचारतात 'तूं मध्येंच

घोडे कां अडविलेस !' यावर त्या मानी विनायकदेवानें आपल्या क्षत्रियत्वास उचित असा जबाब दिल्यामुळें सुलतानसाहेबांची मिजास बिघडली आणि त्यांनीं त्या आपल्या बापाच्या दोस्तास- आपली ब्राह्मणी बादशाही स्थापण्यास हातभार लावणारास- जळत्या लांकडांच्या राशींत फेंकून देण्याचा हुकूम सोडला आणि ही राक्षसी शिक्षा लागलीच अमलांतही आणली !

४३. ही एवढी राक्षसी शिकार मारून सुल्तान महंमद परत फिरला. तो एकअर्ध्या मुक्कामावर जातो न जातो, तोंच राजपुत्र विनायकदेवावरील प्राणघातक संकटाची बातमी लागून स्वराज्याचा, स्वधर्माचा व स्वदेशाचा अभिमान जागृत असणारे हिंदु क्षत्रिय वीर ससैन्य सुलतानाच्या पाठीवर येऊन पडले. विजयोन्मत्त सुलतान व त्याचे सैनिक यांची पण अशी पांचांवर धारण बसली कीं, कांहीं पुसूं नये. ही हिंदूंची तुकडी सरासरी हजारपांचशें लोकांचीच होती; पण त्यांतील प्रत्येक इसम महाभारती संशप्तकवीरांप्रमाणें 'मारूं किंवा मरूं' अशा बाण्याचा आणि स्वपक्षाभिमानी असल्यानें त्यांच्यापुढें सुलतानाच्या दशगुणित सैन्याचाही क्षणभर टिकाव लागेना. सुलतानानें तर कांहीं निवडक लोकांनिशीं पळच काढला. तो सुद्धां बाकीचें सैन्य हिंदूंशीं सारखें पळती लढाई देत राहिलें म्हणून ! ह्या सर्व सैन्यांतील बातमी सांगण्याससुद्धां कोणी शिल्लक राहिला नाहीं. डेरे, राहुट्या वगैरे सर्व चीजवस्तु हिंदूंच्या हातीं लागली. सुलतानसाहेब इतके आगाऊ पळाले तरी अपमानानें चिडलेल्या हिंदूंतील कांहीं लोकांनीं अशा शिताफीनें त्याचा पाठलाग केला कीं, त्याला गांठून त्यांनीं त्यास लढाई द्यावयास लावलें. हे सुलतानाचा पाठलाग करणारे लोक म्हणजे दोन हातांच्या बोटांइतकेहि नसल्यामुळे त्या सर्वांस

आपले देह धारातीर्थी ठेवावे लागले; परंतु सुलतानास त्यांनीं चांगलेंच जखमी करून राजधानीपासून दूर कैलास किल्ल्याचा आश्रय घेऊन लपण्यास लावलें. कैलास किल्ला हा गुलबर्ग्याचें राज्य व वारंगूळ ह्यांच्या सरहद्दीनजीक पूर्वभागास आहे. ही गोष्ट शके १२९९ त घडली. ह्यापुढें विजयानगरशीं झगडा सुरू झाला. त्या झगड्यांत पांच लाख हिंदूंचे-गरीब खेडवळ प्रजेचे-बळी ह्या राक्षसानें घेतले. त्याचें फळही पुढें चार वर्षांत बरेंचसें मुसलमानांस भोगावें लागलें. शके १३०० मध्यें सुलतान महंमदाच्या लाखों सैन्यास जागजागीं बुक्करायाचा चोप खावा लागून स्वतः महंमदास एका मारुतिभक्त ब्राह्मणाच्या शापामुळें स्वतःच्या चुलत्याच्या हातून खून होऊन मरावें लागलें. अशा रीतीनें ह्या राक्षसी झगड्याचा अंत झाला. बुक्कराय शके १३०१ त कैलासवासी झाले. त्यांच्या जागीं त्यांचा वडील मुलगा हरिहरराय २रा सिंहासनारूढ झाला. माधवाचार्य, ह्याच्याही कारकीर्दीच्या प्रथमार्धांत, आपणच वाढविलेल्या स्वराज्यवृक्षाची जोपासना करण्यास जगले होते. आतां ह्यापुढें शालिवाहनाच्या चौदाव्या शतकांत महाराष्ट्रांत स्वधर्माची ज्योत पाजळण्यास माधवाचार्यांच्या मागें त्यांच्याच शिष्यपरंपरेनें श्रीगुरु श्रीपादश्रीवल्लभ नृसिंहसरस्वती हे अवतारी पुरुष निर्माण झाले. तो इतिहास पुढें येईलच. एकंदरींत, शालिवाहनाच्या तेराव्या शतकांत महाराष्ट्रांतील प्राचीन राज्यें पार लयास गेलीं. त्यांच्या जागीं तीं लयास नेणाऱ्या अविंधांचें एक लहानसें राज्य उत्पन्न झालें आणि त्याबरोबरच परधर्मी अविंधांच्या दांडगाईस, जुलमास, धर्मच्छलास व अन्यायास बळी पडणाऱ्या, स्वजन, स्वधर्म व सर्व कांहीं स्वप्रिय ह्यांची कींव येऊन स्वाभिमानानें व धर्मश्रद्धेनें प्रेरित झालेल्या अशा नरश्रेष्ठांनीं नवीन हिंदु-

साम्राज्याची स्थापना केली; आणि त्याबरोबरच ' कीं तोडिला तरु फुटे आणखी भरानें ' ह्या न्यायानें भावी महाराष्ट्रमहोदयाची ही मुहूर्तघटिका टाकली गेली.

## प्रकरण २ रें

## शालिवाहनाचें चौदावें शतक

**गुरुः** सदा दर्शयिता प्रवृत्तिं तीर्थं व्रतं योगतपादिधर्मान् ।
आचारवर्णादिविवेकयज्ञाञ् ज्ञानं परं भक्तिविवेकयुक्तम् ॥१॥
ईश्वर जरी प्रसन्न होतां । त्यासि गुरु होय ओळखिता ।
गुरु आपण प्रसन्न होतां । ईश्वर होय आधीन आपल्या ॥२॥
( श्रीगुरुचरित्र )

१. शालिवाहनाचें चौदावें शतक म्हणजे महाराष्ट्रमहोदयाच्या पूर्वरात्रींतील दुसरा प्रहर होय. अर्थात् ' या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी ' या न्यायानेंच केवळ जो कोणी एखादा जनहितैकदक्ष पुरुष ज्ञानरूपी दिवा तेवत ठेवून आपलें कर्तव्य बजावीत असेल, तेवढ्यापुरताच कोठें कांहीं उजेड पडून उज्ज्वल कार्यभाग शोधाअंतीं दिसून येणार आहे; बाकी ' भर रे पोटा आणि जा रे दिवसा ' किंवा ' दुभत्या गाईस पान्हविण्यापुरतें आंबोण घालून दूध काढणें ' हा क्रम चालविणारे सर्वच होते. पूर्वशतकांत महाराष्ट्रत्वाचा समूळ नाश करण्यासारखी मुसलमानी वावटळ आली; परंतु वेळीं माधवाचार्यप्रमुखांच्या स्वधर्मपरायणतेमुळें त्या वावटळींतून प्राण बचावून केवळ शेपटावरच राष्ट्र निभलें आणि विजयानगरच्या साम्राज्यासारखी नवीन वेताची दुभती कामधेनु महाराष्ट्रीयांस मिळाली. ह्या दुभत्या गाईचें खिल्लार वाढवून आपली भरभराट करून घेणें हें सर्वस्वीं लोकांचें कर्तव्य होय. तें त्यांनीं कितपत पाळलें, ह्याचा

अंदाज ह्या चौदाव्या शतकांतील त्यांच्या इतिहासावरून दिसून येणार आहे.

२. मुसलमानांचें राज्य महाराष्ट्रांत नांदतें राहिलें; वास्तविक तें तसें राहूं देतां कामा नव्हतें. माधवाचार्यांच्या पश्चात् प्रवृत्ति व निवृत्ति ह्या दोन्ही बाजूंनीं फिरून नवी उमेद देणारा कोणी अलौकिक लोकाग्रणी ह्या शतकाच्या प्रथमार्धांत निपजला नाहीं. त्यामुळें विजयानगरचें साम्राज्य जरी हीनबल झालें नाहीं तरी मुसल्मानांच्या राज्यवृद्धीसही म्हणण्यासारखा प्रतिरोध महाराष्ट्रीयांकडून होऊं शकला नाहीं, हें खास.

३. ह्या शतकाच्या आरंभीं विजयनगरास प्रथम बुक्करायाचा मुलगा हरिहर २ रा हा सिंहासनस्थ झाला. शिलालेखांवरून हरिहरानें निदान वीस वर्षें तरी राज्य केलें असावें, असें दिसतें. हा दुसरा हरिहर ‘ महाराजाधिराज ’ ह्या पदवीनें शिलालेखांत उल्लेखिला आहे. ह्याचा मुख्य प्रधान माधवाचार्यांचा सहोदर सायण हाच होता. ह्याचे सेनापति मद, गुंड आणि इरुग ह्या नांवाचे होते. ह्या हरिहररायानें प्रथमच एक जो मोठा जय मिळविला तो मुसल्मान लोकांस गोवा प्रांतांतून पार हांकून लाविलें हा होय. ह्या गोवा प्रांतावर त्यानें बाचण्णा उद्दियार ह्याची नेमणूक केली. हरिहर स्वतः शिवभक्त होता. ह्याची पट्टराणी मल्लादेवी किंवा मल्लांबिका ह्या नांवाची होती.

४. इकडे ब्राह्मणी राज्याच्या गादीवर मुजाइताच्या मागें त्याचा चुलता दाउदखान आला; पण ह्या खुनी चुलत्यास पुतण्याचें राज्य फार दिवस पचलें नाहीं. ह्याची पुतणी मुजाईताची बहीण शहाजादी अघा ही आपल्या भावाचा सूड घेण्याकरितां टपून बसली होती. तिनें एक दिवस दाऊद मशिदींत गुडघे टेंकून निमाज पढत असतां मारेकरी घालून त्याला

ठार केलें आणि अल्लाउद्दीन सुलतानाचा धाकटा मुलगा जो महमूद त्याला तख्तनशीन केलें (शके १३०१). हा महंमूदशहा सर्व ब्राह्मणी सुलतानांत अत्यंत योग्य होऊन गेला. धर्मवेडास वश होऊन हिंदूंची सरसहा कत्तल करणें, त्यांचीं देवळें बाटविणें, पतिव्रता व कुमारी यांना भ्रष्ट करणें इत्यादि गोष्टी न करितां त्यानें आपला काळ परोपकाराचीं कृत्यें करण्यांत आणि विद्या व कला यांस उत्तेजन देण्यांतच घालविला. ह्याचे कारकीर्दीच्या अखेरीस महाराष्ट्रांतील 'दुर्गादेवी' नांवानें अत्यंत गाजलेल्या बारा वर्षांच्या दुष्काळास सुरुवात झाली. त्या वेळीं त्यानें गुजराथ, माळवा वगैरेंकडून धान्य आणण्या-करितां हजारों बैलांचे तांडे ठेवून शक्य तितकी धान्यसमृद्धि केली. गुलबुर्गा, बेदर, इलिचपूर, दौलताबाद, चौल, दाभोळ यांसारख्या शहरांतून गरिबांकरितां भिक्षालयें उघडलीं. हा महमूदशहा ह्या भयंकर दुष्काळास प्रारंभ होऊन दोन वर्षें झालीं नाहींत तोंच शके १३१९ त मरण पावला.

५. महमूदशहाच्या मागून त्याचा वडील मुलगा ग्यासुद्दीन सुल्तान झाला; परंतु सरासरी ५० च दिवसांनीं पुढें एका मजल-सींत आपणांस सुलतानानें वजिरी दिली नाही म्हणून रुसलेल्या लालचीन नांवाच्या तुर्की गुलामानें सूड उगविण्याच्या हेतूनें त्याचे डोळेच काढून टाकिले आणि ग्यासुद्दीनचा धाकटा भाऊ जो समसुद्दीन त्याला गादीवर बसवून हा लालचीन गुलाम राज्यकारभार चालवूं लागला. 'जशास तसें' ह्या न्यायानें ह्या लालचीनासही वाटेस लावणारे इसम भेटलेच. पुतण्याचा खून करून कांही काळ सुल्तानी गाजविणाऱ्या मागें सांगितलेल्या दाऊदखानाचे दोघे मुलगे फेरोज व अहंमद ह्यांनीं ह्या वेळीं कंबरा बांधल्या. सागरच्या सुभेदाराच्या मदतीनें

# विजयानगरच्या राजांच्या कारकीर्दी

## पहिलें घराणें.

हरिहर १ ला … … … … इ. स. १३३६ पासून १३४३ पर्यंत

बुक्क १ ला … … … … इ. स. १३४३ पासून १३७९ पर्यंत

( कांहीं शिलालेखांवरून कंप यानें इ. स. १३४३–१३५५ पर्यंत
आणि त्याचा मुलगा संगम यानें इ. स. १३५६ मध्यें
राज्य केलें असावें, असें दिसतें. )

हरिहर २ रा … … इ. स. १३७९ पासून १३९९ अखेरपर्यंत

बुक्क २ रा … … इ. स. १३९९ अखेर पासून नोवेंबर १४०६ पर्यंत

देवराय १ ला … … इ. स. १४०६ नोवेंबरपासून १४१२–१३ पर्यंत

वीरविजय … … इ. स. १४१२–१३ पासून १४१९ पर्यंत

देवराय २ रा … … इ. स. १४१९ पासून १४४४ (?) पर्यंत

— (?) … … (?) इ. स. १४४४ पासून १४४९ पर्यंत

मल्लिकार्जुन … … इ. स. १४५२-५३ पासून १४६४-६५

राजशेखर … … … … इ. स. १४६८–६९

विरूपाक्ष १ ला … … … इ. स. १४७०–७१

(?)प्रौढ देवराय … … … इ. स. १४७६–७७ (?)

राजशेखर … … … इ. स. १४७९–८०

विरूपाक्ष २ रा … … … इ. स. १४८३–८४

राजशेखर … … … … इ. स. १४८६–८७

(वरील राजांविषयी:) यांच्या कारकीर्दीचा आद्यंत निश्चित नाहीं.

## दुसरें घराणें

नरसिंह … … … … (?) इ. स. १४९० पासून (?)

नरसा अथवा विरा नरसिंह… … (?) इ. स. १५०९ पर्यंत.

कृष्णदेवराय … … … … … इ. स. १५०९ पासून १५३० ,,

अच्युत … … … … इ. स. १५३० ,, १५४२ ,,

सदाशिव ( जन्मभर कैदेंत होता. ) … इ. स. १५४२ ,, १५६७ ,,

## तिसरें घराणें

राम ( अनभिषिक्त राजा ) ... ... इ. स. १५४२ पासून १५६५ पर्यंत
तिरूमल ( ,, ,, ,, ) ... ... इ. स. १५६५ पासून १५६७ पर्यंत
तिरूमल ( खरा राजा ) ... ... इ. स. १५६७ पासून १५७५ पर्यंत
रंग २ रा ... ... ... ... इ. स. १५७५ पासून १५८६ पर्यंत
वेंकट १ ला ... .... ... ... इ. स. १५८६ पासून १६१४ पर्यंत

---

# ब्राह्मणी सुलतानांच्या कारकीर्दी

---

१ अल्लाउद्दीन ब्राह्मणी १ ला ३ ऑगष्ट १३४७पासून २फेब्रुवारी१३५८पर्यंत
२ महंमद १ ला ... ... २ फेब्रुवारी १३५८ पासून २१एप्रिल१३७५पर्यंत
३ मुजाहिद ... ...२१ एप्रिल १३७५ पासून १६ एप्रिल १३७८पर्यंत
४ दाऊद ... ...१६ एप्रिल १३७८ पासून २१ मे १३७८ पर्यंत
५ महमूद ... ...२१ मे १३७८ पासून २० एप्रिल १३९७ पर्यंत
६ ग्यासुद्दीन ... ...२० एप्रिल १३९७ पासून १४ जून १३९७पर्यंत
७ शमसुद्दीन ... ...१४ जून १३९७ पासून १५ नोवेंबर१३९७पर्यंत
८ फेरोज ... ...१५ नोवेंबर१३९७ पासून २४सप्तेंबर १४२२ पर्यंत
९ अहंमद १ ला... ...२४सप्तेंबर१४२२ पासून २७फेब्रुवारी१४३५पर्यंत
१० अल्लाउद्दीन२रा ...२७फेब्रुवारी१४३५पासून१३फेब्रुवारी१४५८पर्यंत
११ हुमायून ... ...१३फेब्रुवारी १४५८ पासून ५सप्तेंबर१४६१पर्यंत
१२ निझाम ... ... ५सप्तेंबर १४६१ पासून ३० जुलै १४६३ पर्यंत
१३ महंमद २ रा ... ...३० जुलै १४६३ पासून २१ मार्च १४८२ पर्यंत
१४ महमूद २ रा ... ...२१ मार्च १४८२ पासून १८डिसेंबर१५१७पर्यंत
१५ महंमद २ रा ... ...१८डिसेंबर१५१७ पासून (?) १५२१(?)
१६ अल्लाउद्दीन ३ रा ... ... ... ... ... ... १५२१ (?)
१७ वलीउल्ला ... ... ...(?) १५२१ पासून (?) १५२३
१८ कालीमउल्ला ... ...(?) १५२३ पासून सुमारें १५२८

(१५–१८ : नामधारी राजे)

त्यांनीं गुलबुर्ग्यावर चाल केली. प्रथम लालचीनाचे फौजेनें त्यांचा मोड केला व त्यांस माफीपत्रें पाठवून दरबारीं बोलाविलें. उद्देश हाच कीं, ते दरबारीं आल्यावर त्यांस कैद करावें; परंतु लालचीनाच्या कारभारास नाखुष असलेल्या अनेक सरदारांनीं ह्या दोघां भावांस भेद देऊन हुशार केल्यामुळें वजिराचा बेत फसला; इतकेंच नव्हे, तर उलट ह्या दोघांनीं राजधानी हस्तगत करून सुलतान समसुद्दीन व वजीर ह्यांसच कैद केलें आणि ग्यासुद्दीनास मोकळा करून तो आंधळा होता तरी त्यापुढें लालचीनास आणून त्या आंधळ्याच्या हातून त्यास अंध करणाऱ्या त्या गुलाम वजिराचा शिरच्छेद करविला. नंतर समसुद्दीनास आंधळा करून व कैदेंत टाकून फेरोजखानानें तख्त बळकाविलें.

६. आतां ह्या फेरोजशहाच्या कारकीर्दींचें वर्णन देतांना आपणांस जरा थांबलेंच पाहिजे; कारण आपल्या महाराष्ट्रांत ह्या काळांत म्हणजे नामदेवांनंतर एकहि साधु किंवा कवि उत्पन्न झाला नाहीं अशी आजपर्यंतची समजूत आहे; पण ती चुकीची असून ह्या फेरोजशहाच्याच काळीं सुप्रसिद्ध श्रीपादश्रीवल्लभ व नृसिंहसरस्वति हे जे श्रीगुरूचे दोन अवतार, त्यांपैकीं पहिला तरी झाला असावा, असा आमचा तर्क आहे. तेव्हां त्यासंबंधाची चर्चा येथें करणें जरूर आहे. हें उदाहरण येथें प्रथम उलटें सोडवावयाचें आहे; कारण श्रीगुरु नृसिंह-सरस्वति किंवा त्यांचेंच पूर्वरूप जे श्रीपादस्वामी यांजबद्दल प्रत्यक्ष माहिती फारच थोडी आहे. ती माहिती गुरुचरित्रा-वरूनच मुख्यत्वें काढावयाची आहे. गुरुचरित्रग्रंथ तर उघड-उघड शके १४७०नंतरचा म्हणजे जवळजवळ १५०वर्षांपुढला. अशी जरी वस्तुस्थिति आहे, तथापि श्रीगुरुचरित्रांत जो कांहीं

पुरावा सांपडूं शकतो, त्यावरून श्रीगुरूंच्या कालाचा चांगलाच निर्णय करतां येतो. तो कसा तें आतां पाहूं. गुरुचरित्रावरून ह्यासंबंधानें खालीलप्रमाणें खुलासा निघतो :

१. श्रीपादश्रीवल्लभ आणि नृसिंहसरस्वति हे दोन भिन्न अवतार होत. पैकीं श्रीपादश्रीवल्लभ हा पहिला अवतार व नृसिंहसरस्वति हा दुसरा अवतार.

२. हे दोन्ही अवतार एका पिढीच्याच अंतरानें झाले असावेत; म्हणजे फार तर पहिल्याच्या अंत व दुसऱ्याची प्रसिद्धि ह्यांमध्यें ३०-३५ वर्षांचेंच अंतर असावें.

३. कन्यागतीं बृहस्पती । बहुधान्य संवत्सरीं ख्याति ।
सूर्य चाले उत्तरगती । संक्रांति कुंभ परियेसा ॥ ३७ ॥
शिशिरऋतू माघमासीं । असित पक्ष प्रतिपदेसी ।
शुक्रवारीं पुण्य दिवशीं । श्रीगुरू बैसले निजानंदीं ॥ ३८ ॥

(गु. च. अ. ५१)

ह्यावरून नृसिंहसरस्वतींची समाधि शके १३८० बहुधान्यनाम संवत्सरीं माघ वद्य १ स झाली. त्या दिवशीं शुक्रवार होता. कुंभसंक्रांतीस सूर्य असून कन्येस गुरु होता म्हणजे कन्यागत वर्ष होतें. हीं सर्व लक्षणें १३८० त होतीं, असें गणितावरून सिद्ध होतें. हें आम्हीं गणित करवून पडताळून पाहिलें आहे.

४. श्रीगुरूंचें अवतारचरित्र नृसिंहसरस्वति ह्या नांवानें निदान ५० वर्षांचें तरी असावें, असें दिसतें.

७. ह्या इतक्या प्रमाणांवरून शके १३८० (५०+३०) म्हणजे शके १३०० च्या सुमारास श्रीपादश्रीवल्लभांचा काळ येतो. निदान चौदाव्या शतकाच्या प्रथम पादांत श्रीपादश्रीवल्लभ असलेच पाहिजेत असें ठरतें. हे श्रीपादश्रीवल्लभ १८।२०

वर्षांचें होईपर्यंत घरीं आईबापांजवळ होते. नंतर ते काशी, बदरिकाश्रम इत्यादि तीर्थें करीत करीत गोकर्णमहाबळेश्वरीं आले. तेथें राहून पुढें श्रीगिरिपर्वतावर कांहीं महिने वास करून शेवटीं कृष्णातीरीं पंचगंगा व कृष्णा यांच्या संगमानजीक कुरवपूर येथें येऊन कायमचे राहिले. येथेंच त्यांनीं एका रजकास त्याच्या इच्छेवरून 'तुला पुढील जन्मीं यवनराज्यपद मिळून तूं तामसवृत्तीनें राज्यभोग करशील' असा वर दिला. ह्याच ठिकाणीं त्यांनीं आपल्या पुढल्या नृसिंहसरस्वति ह्या नांवानें होणाऱ्या अवताराची एका ब्राह्मणस्त्रीस वर देऊन भविष्यवाणी काढिली. श्रीपादस्वामी निदान तीस वर्षें ह्या जगांत मनुष्यदेहधारी असले पाहिजेत, असा श्रीगुरुचरित्रावरून तर्क होतो. हा इतका वळसा येथें घेण्याचें कारण, फेरोजशहाच्या वेळीं प्रत्यक्ष श्रीदत्ताचे अवतार श्रीपादश्रीवल्लभ हे योगिराज महाराष्ट्रोद्धारार्थ प्रगटले होते, हें कळावें, हेंच होय. श्रीगुरूंचा अवतार केव्हां झाला हें कळणें अत्यंत इष्ट आहे; कारण हें शालिवाहनाचें चौदावें शतक महाराष्ट्रास, किंबहुना सर्व दक्षिणापथास ब्राह्मणी सुलतानांच्या धर्मवेडानें अत्यंत त्रासदायक झालें असलें पाहिजे, असें पुढील इतिहासावरून सहज दिसून येईल. असल्या विषम काळीं लोकांस — निदान स्वधर्मश्रद्धा ज्यांची कडकडीत आहे, असल्या लोकांस — धीर देणारा कोणी मार्गदर्शक पाहिजेच असतो. तसा मार्गदर्शक नसेल, तर राष्ट्र उत्तरोत्तर क्षीण व धर्मलंड होऊन कायमचें अवनत होईल; परंतु महाराष्ट्र तसें अवनत झालें नाहीं. उलट तें आंतून अधिकाधिक जोरच धरीत होतें, असें मानावें लागतें. तो जोर अखंडित कायम करणाऱ्यांत शालिवाहनाच्या चौदाव्या शतकांत ह्या श्रीपादश्रीवल्लभ व नृसिंहसरस्वति

नांवाच्या अवतारी महापुरुषांचीच मुख्यत्वें गणना आहे. श्रीगुरुचरित्राचा लेखक जो सरस्वति गंगाधर ह्यानें आपली पितृपरंपरा दिली आहे; त्यावरूनही श्रीगुरूंचा काल चौदावें शतक हाच ठरतो.

आपस्तंब शाखेसी । गोत्र कौंडिण्य महाऋषि ।
साखरे नाम ख्यातीसी । सायंदेवापासाव ॥ ३८ ॥
त्यापासून नागनाथ । देवराव तयाचा सुत ।
सदा श्रीसद्गुरुचरण ध्यात । गंगाधर जनक माझा ॥ ३९ ॥

८. वरील ओव्यांवरून ज्या सायंदेवास नृसिंहसरस्वतींनीं पोटशूळांतून बरें करून यवनेशाच्या भयापासून मुक्त केलें, त्यापासून सरस्वति गंगाधर हा ५ वा पुरुष होय. म्हणजे सरस्वति गंगाधराचा काळ नृसिंहसरस्वतींच्या पुढें निदान शंभरसवाशें वर्षें तरी असलाच पाहिजे. दर पिढीस सरासरी वीसपासून पंचवीस वर्षें धरण्यास कांहीं हरकत नाहीं; कारण गंगाधर सरस्वतीचे समकालीन दासोपंत व जनी जनार्दन ह्यांच्या ज्या वंशावळी आज उपलब्ध आहेत, त्यांचे तर दर पिढीस २५–३० असें प्रमाण पडतें. आणि तेंही दहा दहा पिढ्यांच्या सरासरीनें! दासोपंत, सरस्वति गंगाधर व जनी जनार्दन ह्यांचा काळ म्हणजे शकशतक पंधराव्याच्या तृतीय पादाचा अंत. अर्थात् नृसिंहसरस्वतींचा काळ शकशतक चौदाव्याच्या तृतीय पादांत आणि श्रीपादश्रीवल्लभांचा प्रथम पादांत पडलाच पाहिजे. असो तात्पर्य इतकेंच कीं, श्रीपादश्रीवल्लभ व नृसिंहसरस्वति ह्यांचें हें चौदावें शतक होय. ह्या महापुरुषांनीं काय केलें, तें पुढें यथाप्रसंग देण्यांत येईलच.

९. आतां मागील कथेचें अनुसंधान म्हणजे फेरोजशहाची कारकीर्द होय. विजयानगरच्या राजांशीं झुंज चालविणें हें ब्राह्मणी

सुलतानांचें मुख्य काम. तें बहुतेक वेळां ब्राह्मणी सुलतानच उकरून काढीत व कधीं फारच क्वचित् विजयानगरकर सुरू करीत. ह्या प्रसंगीं दुसऱ्या हरिहराचा पुत्र जो देवराय त्यानें रायचूर दोआबावर स्वारी केली (शके १३३९). देवरायानें पहिल्या धडकीसरसें मुद्गल आणि रायचूर हे दोन्ही किल्ले सर केले. सुलतानास ही खबर लागतांच त्यानेंहि कूच केला. वाटेंत जातां जातां विनाकारण एक हिंदु जमीनदार आणि त्याचे आठदहा हजार आश्रित ह्यांवर छापा घालून सुलतानानें काफरांच्या रक्तानें आपली तहान भागविली. त्या सर्व लोकांची त्यानें सरसहा कत्तल केली. देवराय कृष्णेच्या पैलतीरास छावणी करून होता व कृष्णेस पूर आला असल्या-मुळें सुलतानाची स्वारी अलीकडेच छावणी देऊन राहिली होती. नदीस उतार होत नसल्यामुळें सुलतानास मोठा विचार पडला. त्यानें आपले सर्व सरदार जमा करून मसलत चालविली. कांहीं तोड निघेना. शेवटीं फेरोजशहाची फिकीर जाणून एक काझी शिराज या नांवाचा धाडसी मनुष्य पुढें येऊन म्हणाला, ‘ शहासाहेब, आपण जर मला हुकूम फर्मावाल तर मी कांहीं सड्या साथीदारांसह नदी उतरून शत्रूच्या छावणींत जातों आणि कोणातरी राजघराण्यांतील कर्त्या पुरुषाचा घात करतों, म्हणजे त्यांची चांगली धांदल उडेल आणि आपणास फौज नदीपार नेण्यास चांगलीच सवड सांपडेल. ’ फेरोजशहानें ही गोष्ट कबूल केल्यावर काझीनें आपल्या निवडक पांचसात साथीदारांसह कपटवेष घेतला. नंतर नदी उतरून छावणींतील कलावंतिणींच्या ताफ्यांत जाऊन तेथील एका तरुण कलावंतिणीशीं लाडीगोडी करून त्यानें तिला असें भासविलें कीं, आपण तिच्या रूपास अगदीं भुलून जाऊन तिच्या प्राप्तीसाठीं आपलें मोठें कुल व शील ह्या सर्वांवर पाणी सोडण्यास

तयार आहों आणि आतां जर आपली इच्छा तृप्त न होईल तर आपण कांहीं जीवंत राहणार नाहीं. बिचारी भोळी ती कलावंतिणीची पोर ताबडतोब फसली. ह्या जवानाच्या सौंदर्यादिकांनींही तिला थोडीशी भुरळ पाडिल्यामुळें ती ह्याला आपल्या संगतींत वागूं देऊं लागली. ह्या कलावंतिणीस रोज राजपुत्राच्या मनोरंजनार्थ दरबारास जावें लागत असे. त्या ठिकाणीं आपण येणार असा जेव्हां काझी शिराजनें हट्ट घेतला, तेव्हां ती त्याला म्हणाली, 'फालतू मनुष्याचा तेथें शिरकाव होत नाहीं.' यावर त्या मायाव्यानें असें कांहीं कपटजाल पसरलें कीं, कांहीं पुसूंच नये. ती तरुणी ओतप्रोत शृंगारांनीं सज्ज झालेली होती; तिच्या लावण्याचें वर्णन करून तो एखाद्या आतुर नायकाप्रमाणें तिच्या पायां पडला आणि म्हणाला, ' एक तूं तरी जाऊं नको, कारण मला अतःपर एक क्षणभरही तुझा विरह सहन होणार नाहीं; किंवा माझे प्राण वांचावेत व तुझ्यावर हत्या येऊं नये असें जर तुला वाटत असेल तर मला तरी तुझ्याबरोबर घेऊन चल. मी तुझा बजवय्या साथीदार म्हणून येतों. मला व माझ्या स्नेह्यांना वादनकला चांगलीच अवगत आहे. ' तेव्हां नाइलाजानें तिनें त्यांना साजिंद्यांचा पोषाख चढवून त्यांची परीक्षा पाहिली. तो त्यांनीं तिला नाचकामासुद्धां सर्व गोष्टींची अशी कांहीं करामत दाखविली कीं, ह्या साथीदारांमुळें आपली सर्व कलावंतिणींत सरशी होईल; अशा महत्त्वाकांक्षेनें तिनें त्यांस मोठ्या संतोषानें आपल्याबरोबर नेलें. तेथें गेल्यावर ' ह्यांच्या नकला पाहण्याची कृपा व्हावी ' ह्या कलावंतिणीच्या विनंतीस राजपुत्रानें मान दिल्यावर त्यांनीं नाच्या स्त्रियांचा वेष घेऊन आपलें कसब दाखविण्यास प्रारंभ केला. प्रथम तऱ्हतऱ्हेच्या नकला व केरवे हावभावांसह नाचून दाख-

विल्यावर कांहीं चमत्कारिक मंडलें करून यांनीं खड्गें हातांत घेतलीं व त्यांच्यासह जोडीजोडीनें कसरतीचा सुरेख नाच केला. बराच वेळ एकमेकांवर खड्ग फेंकून मोठ्या शिताफीनें नाचतां नाचतां राजपुत्र अगदीं प्रसन्न व असावध आहे असें पाहून त्यांतील एक जोडीच्या जोडी एकदम राजपुत्रावर घसरली व त्यांनीं आपलीं दोन्ही खड्गें, एकदम त्याच्या काळजांत भोंसकलीं. रात्र अंधारी असून मंडळी सुरापानानें धुंद होती, त्यामुळें लगेच चहूंकडचे दिवे मालवून तेथील इतर लोकांचाही त्यांना क्रमाक्रमानें समाचार घेतां आला. एकंदरींत हें कपट चांगलेंच सिद्धीस गेलें व विजयानगरकरांच्या छावणींत भयंकर घोंटाळा उडाला. फेरोजशहा वाटच पाहत होता. त्यानें ही अमोलिक संधि वायां जाऊं दिली नाहीं. हजारों मुसलमान तराफ्यांवरून नदीपार झाले आणि त्यांनीं सर्वत्र एकच दंगा उसळून दिला. उजाडण्याच्या सुमारास फेरोजशहाचें सर्व सैन्य नदी उतरलें आणि हल्ल्यास सुरवात झाली. विजयानगर-करांस पाऊल परत घेण्यावांचून सोयच नव्हती; तरी देवरायनें त्यांतल्या त्यांत चांगली शिस्त बांधून शत्रूशीं सारखी पळती लढाई देत देत विजयानगर गांठलें. फेरोजशहानें आपला मुलगा अहंमद ह्याला भोंवतालचा मुलूख लुटण्यास व हिंदूंची कत्तल करण्यास पाठवून दिलें. त्यानें विजयानगरच्या दक्षिण अंगास असा कांहीं प्रलय उडवून दिला कीं, लोकांस अगदीं 'त्राहि भगवन्'च म्हणावयास लाविलें. बायका, मुलें, साधू, संन्यासी याप्रमाणें यच्चयावत् हिंदु म्हटला कीं धर, कर कैदी, नाहीं तर मार ठार, असा त्यानें क्रम आरंभिला. कित्येक अनाथ अबलांनीं जिभा हंसडून प्राण दिले; कित्येकांनीं आपलीं मुलें घेऊन विहिरीतळ्यांतून जीव दिले. ह्या प्रसंगीं हजारों वैदिक, शास्त्री

ब्राह्मण व शेंकडों संन्याशी, ब्रह्मनिष्ठ व योगी, ह्या महंमदानें आपल्याबरोबर कैद करून ठेविले होते. एकंदर सर्व जातींचे मिळून किती लोक ह्या वेळीं कैद झाले होते त्याची गणतीच नाहीं. ह्या सर्वांची कींव करून त्यांचे प्राण वाचविणें व त्यांना त्यांचा प्रिय स्वधर्म पाळतां येण्याची व्यवस्था करणें हें हिंदु राजाचें पहिलें कर्तव्य होतें. त्यामुळें जरी वर्षानुवर्षे शहर लढवून आपला बचाव करण्याचें, इतकेंच नव्हे तर प्रसंगीं शत्रूवर तुटून पडून त्यास हार देण्याचेंही देवराजादि विजया-नगरकरांच्या अंगीं सामर्थ्य वसत होतें, तरी आपल्या दीन प्रजे-करितां, गोब्राह्मणप्रतिपालक हें हिंदु राजांचें सनातन ब्रीद राखण्याकरितां वाटेल ती अट कबूल करून शत्रूंशीं साम करणेंच ह्या वेळीं भाग असल्यामुळें दहा लाख होन खंडणी भरून विजयानगरकरांनीं—आपल्या प्रजेच्या खऱ्या मायबाप राजांनीं—फेरोजशहाशीं त्यानें सर्व हिंदु कैदी सोडून द्यावेत ह्या अटीवर तह केला. दोन्ही राजांच्या सरहद्दी लढाईच्या पूर्वींच्या होत्या त्याच कायम रहाव्या व अतःपर प्रजेला फुकट त्रास देऊं नये, अशाही अटी ह्या तहांत होत्या. हा तह शके १३२१ च्या प्रारंभींच झाला. ह्यानंतर दोनचार महिन्यांच्या आंतच महाराजाधिराज हरिहर २ रा, हा कैलासवासी झाला आणि त्याच्या जागीं त्याचा वडील मुलगा बुक्क २रा, हा आला.

१०. ह्या दुसऱ्या बुक्काची कारकीर्द केवळ सहा वर्षांचीच झाली. ह्याचें शेवटचें दानपत्र शके १३२८ वैशाख शुद्ध १२ चें आहे. त्याच्या मागून त्याचा भाऊ देवराय १ ला हा सिंहासनस्थ झाला.

११. ह्या देवरायाच्या कारभारास सुरवात झाली नाहीं तोंच एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट घडून आली, ती अशी : मुदकल नगरांत एक शेतकरी असे. कोणी म्हणतात, हा इसम सोनार होता.

त्याला एक लावण्यवती व चतुर अशी मुलगी असून ती ह्या वेळीं उपवर झालेली होती. ती जशी अद्वितीय रूपवान् होती तशीच गाणेंनाचणें, वगैरे ललितकलांत आणि सर्व प्रकारच्या शृंगारिक चेष्टांतही अत्यंत प्रवीण होती. हिला लिहिणें, वाचणें व काव्य-विनोदादि गोष्टी एका वृद्ध ब्राह्मणानें शिकविल्या होत्या. तिची तीव्र बुद्धिमत्ता आणि इतर सर्व लोकोत्तर गुण त्या वृद्ध ब्राह्मण गुरूच्या दृष्टीस जितके पूर्णपणें आले होते, तितके ते दुसऱ्या कोणासही कळलेले नव्हते. प्रत्यक्ष तिच्या आईबापांसही आपल्या ह्या मुलीच्या गुणांची पुरती ओळख नव्हती. ती त्यांची फार लाडकी असे; तथापि ह्या वृद्ध ब्राह्मणाचें जें प्रेम ह्या मुलीवर होतें तें कांहीं विलक्षणच. त्याला वाटे कीं, ही आपली शिष्या महाराजाधिराजाच्याच प्रेमास पात्र होण्यास योग्य आहे आणि ह्या कामीं आपण आपलें कर्तव्य बजावण्यास यथाशक्ति झटलें पाहिजे; म्हणून तो स्वतांच विजयानगरास केला. तेथे त्यानें देवरायाची गांठ घेतली व आपल्या प्रिय शिष्येचे सर्व गुण मोठ्या प्रेमानें आणि कौतुकानें वर्णन करून देवरायाचें मन तिच्याबद्दल अगदीं आतुर करून सोडिलें. देवरायानें तिच्या आईबापांची संमति मिळवून तिचा व आपला विवाह जुळ-विण्याची कामगिरी करण्याबद्दल ह्या वृद्ध ब्राह्मणासच विनंति केली. त्या भोळ्या ब्राह्मणानें मनापासून रुकार दिला आणि तो देवरायाकडून सासरचिठीदाखल मिळालेलीं बहुमूल्य वस्त्रें व अलंकार घेऊन मुलीच्या आईबापांकडे मोठ्या उल्हासानें आणि लगबगीनें आला. आईबापांसही ह्या ब्राह्मणाचें सर्व भाषण ऐकून आणि त्यानें आणलेलें तें जडजवाहीर आणि उंची वस्त्रें पाहून फार धन्यता वाटली. आपली मुलगी राजाची राणी होणार, आपण तिचें लवकर लग्न केलें नाहीं तें चांगलेंच

झालें, नाहींतर ह्या असल्या अप्रतिम योगास अंतरावें लागतें. आपली मुलगी भाग्याचीच खरी आणि आपणही पूर्वजन्मीं कांहीं मोटें पुण्य केलेलें म्हणूनच असली मुलगी आपल्या पोटीं आली. अशा प्रकारें मनांत मांडे खात त्यांनीं आपल्या ह्या अप्सरेप्रमाणें सुंदर व गुणवती मुलीस हाक मारली. ती येतांच वरील सर्व हकीकत मोठ्या प्रेमानें आणि उल्हासानें त्यांनीं तिला सांगितली आणि राजाकडून आलेल्या सर्व अलंकारांपैकीं एक रत्नजडित गळ्यांत घालण्याचा दागिना होता तो तिच्या गळ्यांत घालण्याची तीं लगबग करूं लागलीं. पण लेक पडली ' गोरी-गोमटी आणि कपाळकरंटी ! ' तिच्या पूर्वजन्मींच्या कांहीं संस्कारांमुळें तिला हा प्रकार मुळींच पटला नाहीं. तिनें आईबापांकडून आपली मान मुरडली आणि तशीच त्यांच्याकडे पाठ करून म्हणाली, ' विजयानगरच्या महाराजाधिराजाच्या राणीवंशांत जी कोणी एकदां शिरली, ती फिरून आपल्या निकट प्रेमाच्या व रक्तमांसाच्या माहेरच्या माणसांस पुरती मुकलीच. बाबा ! आई ! हीं उंची वस्त्रें, हें जडजवाहीर पाहून व पुढें मला तेथें लागणाऱ्या राजविलासी सुखांची कल्पना होऊन आपणांस कदाचित् आनंद वाटत असेल, पण (अगदीं गहिंवरून ) मला ह्या सोन्यारुप्याची आणि हिरेमाणकांची मुळींच पर्वा नाहीं; त्यांच्या मोहास गुंतून मी आपल्या प्रिय आईबापांस मुकण्यास तयार नाहीं. मला माझें गरीब माहेरच लाख राज्यांठिकाणीं आहे. ' हें मुलीचें जिव्हाळ्याचें भाषण ऐकून तिच्या आई-बापांनीं ह्या लग्नाचा नाद सोडला आणि त्या ब्राह्मणांस तें सर्व राजधन राजाकडे घेऊन जाण्यास व तिचे आईबाप तिला राजास देण्यास सिद्ध नाहींत, असें कळविण्यास सांगितलें. तो ब्राह्मण खट्टू होऊन राजाकडे परत गेला.

१२. ब्राह्मणानें देवरायाला मुदकल येथें घडलेला सर्व प्रकार जशाचा तसाच सांगितला. तेव्हां तो अपमान सहन न होऊन त्यानें त्या सोनाराच्या मुलीसंबंधींची आपली कामुकता तरवारीच्या जोरावर तृप्त करण्याचें योजिलें व एकदम स्वराज्यसंचारार्थ म्हणून चतुरंग सैन्यासह राजधानी सोडण्याचा निश्चय केला; आणि सर्व यथासांग तयारी होतांच स्वारीचा कूच झाला. तुंगेच्या कांठीं पहिल्याच मुक्कामास त्यानें पांच हजार करोल स्वारांची निराळी तुकडी करून तीसह अचानक मुदकलची वाट धरली.

१३. या भरतखंडाच्या अर्वाचीन इतिहासांत ह्या क्षत्रिय अथवा क्षत्रियब्रुव राजांच्या अनावर कामवासनेनें एकंदर काय काय अनर्थ ओढवले आहेत, ह्याचा विचार मनांत आणला तर, निःसंशय असें वाटतें कीं, वेळोवेळीं आणि स्थलोस्थलीं आमच्या राष्ट्रीय स्वतंत्रतेचा बळी पाडण्यास ती कारण झालेली आहे. पूर्वीच्या राजांच्या उत्तम वर्तनामुळें स्वभावतःच अल्पसंतोषी अशा ब्राह्मणांच्या म्हणजे विद्वान् व साधकबाधक विचार करण्यास समर्थ अशा जनसमूहाच्या विश्वासास पात्र झालेली, परंतु ह्या वर्गाच्या अल्पसंतोषीपणामुळेंच अनियंत्रित बनलेली क्षत्रियराजसत्ता व राष्ट्रीय शौर्य, स्वाभिमान, स्वदेशाभिमान, स्वधर्मश्रद्धा, इत्यादि लोकोत्तर गुण यांची माती करण्यास आणि स्वकुलाचा व स्वराज्याचा नाश करण्यास, ही कामांधता कशी कारणीभूत झाली, हें पाहिलें म्हणजे मनांत फारच उद्वेग उत्पन्न होतो! हस्तिनापुर (दिल्ली), अन्हिलपट्टण, देवगिरी आणि आतांचें हें विजयानगर ह्या चारी ठिकाणीं भारतीय साम्राज्याचा नाश करण्यास आणि मुसल्मानी सत्तेचा उत्कर्ष होण्यास त्या त्या ठिकाणच्या चक्रवर्तींचें कामांधत्वच कारण झालें. पुढें मराठी

राज्यांतही संभाजीच्या बाबतींत तोच प्रकार होऊन मराठी राज्याची इतिश्री झाली ! विजयानगरच्या साम्राज्याची इतिश्री झाली नाहीं तरी विजयानगरकरांच्या क्षत्रियत्वास चिरकालिक डाग लागलाच. तो कसा काय तें पुढें ओघानें येईलच.

१४. देवराय पांच हजार निवडक घोडदळानिशीं जो तुंगभद्रातीराहून निघाला, तो रात्रंदिवस मार्ग काटीत थेट मुदकलवर चालला. त्याच्या उतावळेपणास कांहींतरी आळा घालावा म्हणून त्याच्या पुष्कळ हितचिंतक मित्रांनीं हरतऱ्हेनें त्याची मनधरणी केली; तथापि तो काम व क्रोध या दोन प्रबल मनोवृत्तींच्या पूर्ण आधीन झाल्यामुळें त्याच्या मित्रांच्या उपदेशाचा कांहींएक उपयोग झाला नाहीं! इतकेंच नव्हे, तर कामी पुरुषांत सामान्यतः दिसून येणारें काम्यवस्तुप्राप्त्युपाय सुचविणारें धोरणही क्रोधाच्या आधीनतेनें देवरायाच्या ठिकाणीं ह्या वेळीं राहिलें नाहीं. मुलीचे आईबाप मुलगी राजाला द्यावयाला उत्सुक आहेत, ही गोष्ट देवरायाला मध्यस्थ ब्राह्मणाकडून कळली होती; अर्थात् मुदकलवर स्वारी करण्यापूर्वी ह्या मुलीच्या आईबापांस गुप्तपणें आपल्या कटांत घेऊन कार्यभाग उरकणें किती सुखकर होतें, हें देवरायाच्या लक्षांत यावयास पाहिजे होतें, आणि तें आलें असतें तर तोच ब्राह्मण फिरून तेवढी मध्यस्थी करण्यास खात्रीनें उपयोगी पडला असता; परंतु तें लक्षांत न येऊन देवरायाची स्वारी चढ्या घोड्यानें मुदकलवर चालून जाऊं लागली. देवरायाच्या ह्या हल्ल्याची बातमी मुदकल येथील प्रजाजनांस कळतांच, आतां येथें घनघोर युद्धप्रसंग होणार, असें समजून ते गांव सोडून रानावनांत, दरीखोऱ्यांत–ज्याला जिकडे वाट फुटली आणि सुरक्षिततेची आशा वाटली तिकडे–निघून गेले.

देवरायाची इष्ट शिकारही त्यांबरोबरच गेली; यामुळें देव-रायाची एवढी खटपट व्यर्थ गेली ! मुदकलाहून रिकामें परत फिरतांना देशाची लूट आणि नासधूस करीत ही स्वारी आपण मिळविलेल्या निराशेच्या मिराशीचें जाहीर प्रदर्शन करीत असतां दोन्ही राजांच्या सरहद्दीवरचा नेहमीं भांडणास मूळ असणारा, परंतु स्वराज्याच्या पक्षपाती अशा मुदकलादि प्रदेशांतील प्रजाजन मात्र फुकटचा नाडला गेल्यामुळें स्वराज्याबद्दल केवळ उदासीन, किंबहुना प्रसंगीं वैतागानें शत्रुपक्षपाती बनविण्याचें अपयश मात्र देवरायाच्या पदरीं पडलें.

१५. सुलतान फेरोजशहानें आयतीच निघालेली ही कुरापत व्यर्थ दवडिली नाहीं. "मुदकल हा प्रांत ब्राह्मणी राज्यांत मोडत असून त्यावर देवरायानें विनाकारण स्वारी केली, तेव्हां त्याचें पारिपत्य आपण केलेंच पाहिजे" असें मिष लावून त्यानें सैन्याची जमवाजमव करून शके १३२८ च्या हिंवाळ्यांत विजयानगरावर एकदम हल्ला चढविला. वास्तविक प्रकार म्हटला म्हणजे मुदकल प्रांत केवळ विजयानगरकरांचाच होता; तथापि निमित्तापुरता तो प्रांत सुल्तानास आपला म्हणून म्हणतां आला, ह्यांतील इंगित वर दिलेंच आहे. असो. विजयानगरावर सुल्तानानें हल्ला चढवितांच देवरायानेंही सुल्तानाच्या आघाडीचा चांगलाच समाचार घेतला आणि तेवढ्यानें जी कांहीं थोडी फुरसत सांपडली तिचा उपयोग, त्यानें नगराची सर्व व्यवस्था लावून आपल्या सैन्याचा तळ बाहेरच्या थोरल्या कोटाच्या आश्रयास देऊन नगर पाठीं घालण्याकडे केला. त्यामुळें आंतील सर्व कारभार निर्भय आणि व्यवस्थित चालविण्यास व सैन्यास शस्त्रास्त्रें, धान्य इत्या-दिकांचा योग्य आणि भरपूर पुरवठा करण्यास सवड झाली.

शिवाय सुलतानाच्या तळावर झालेल्या सर्व हालचाली कळण्याची आयतीच सोय होऊन योग्य वेळीं त्यावर सहज चालून जाण्यास सांपडण्याचीही व्यवस्था झाली. एके दिवशीं देवरायानें सुलतानाच्या खास तळावरच अशा जोरानें हल्ला चढविला कीं, आपण त्याच्या कचाटींतून आतां कसें सुटतों, अशी सुलतानास मोठी पंचाईत पडली. सुलतानाच्या सैन्यास त्या खडकाळ माळावर चटचट घोडीं वळविणें फार अवघड जाऊं लागलें आणि प्रतिपळास शेंकडों हजारों मुसल्मान वीर विजयानगरकरांच्या तीरांस व तरवारींस बळी पडूं लागले. देवरायाचा रोंख खास सुलतानावर असल्यानें तो इतर सर्व सरदारांस टाळून संधि साधून आपल्या पांचपन्नास निवडक साथीदारांसह फेरोजशहाच्या तुकडीवर चालून गेला. फेरोजशहानें मोठ्या प्रसंगावधानानें आणि चपळाईनें देवरायास आपल्या पाठीवर घेऊन त्यास उघड्या मैदानांत ओढण्याचा घाट घातला; परंतु हा कावा देवरायाच्या लक्षांत येऊन त्यानें त्याबद्दल योग्य ती तजवीज केली. इतक्या झटापटींत देवरायाबरोबरच्या तिरंदाजांनीं अशी कांहीं शर्थ करून सोडली कीं, सुलतानाच्या तुकडींतील निम्मीअधिक माणसें लढाईस निरुपयोगी झालीं. तिकडे खानखनान वगैरे सरदारांचीही अशीच दशा झाली. सुलतानावरील ह्या प्रसंगाची वार्ता अहंमदखानास लागली, तेव्हां तो आपल्या सर्व लोकांनिशीं, होजमल्ल इत्यादिकांशीं लागलेलें तोंड चुकवून पाठमोरा होऊन सुलतानाकडेस वळला. त्याचें अनुकरण इतर खानांनींही केलें. याप्रमाणें पाठीवर हवा तेवढा मार खात सुलतानाचें सर्व सैन्य विजयानगराच्या तटापासून दूर मैदानाकडे एकजुटीनें गोळा होत असतां त्यानें देवरायाला मध्यें घेरून त्याचा व त्याच्या मुख्य सैन्याचा परस्पर पायबंध

तोडण्याचीच वेळ आणली होती; परंतु तितक्यांत करवेल तितकी लगट करून देवरायानें सुलतानास एक जबर जखम होईपर्यंत त्याची पाठ धरली, आणि झटक्यासरसा मोहरा फिरवून तो आपल्या पिछाडीच्या मुख्य सैन्यांत जाऊन मिळाला. सुलतानास जबर जखम झाली, तरी प्रसंगाकडे लक्ष देऊन तो घोड्यावरून उतरला नाहीं. त्यानें ती वरच्यावरच बांधली आणि आपला मोड झालेला शत्रूच्या लक्षांत न यावा, ह्या उद्देशानें धीरानें व शिस्तीनें आपला पाय रणांतून काढून तो शहरापासून बऱ्याच अंतरावर खुल्या मैदानांत सोयीच्या ठिकाणीं तळ देऊन राहिला. येथें स्वतःची जखम व आपल्या सैन्यांतील इतर लोकांच्या जखमा बऱ्या होऊन पुरेसा विसांवा मिळाल्यानंतर सुलतानानें खुद्द विजयानगरास कांहींएक उपद्रव न देतां भोंवतालच्या प्रदेशाची दाणादाण उडवून गरीब, खेडवळ व निःशस्त्र अशा हिंदु प्रजेच्या छळानें त्यांच्या राजांस कौलास आणण्याचा आपल्या पूर्वजांचा क्रम स्वीकारला. ह्या वेळची सुलतानाच्या तळाची जागा विजयानगरच्या दक्षिणेस हास्पेटनजीक होती. प्रथम त्यानें बंकापूरच्या किल्ल्यावर हल्ला केला. बंकापुर पडलें आणि भोंवतालच्या प्रदेशांतील ६०,००० निराश्रित हिंदु— ब्राह्मण, कुळंबी वगैरे–जिवंत कैदी म्हणून सुलतानाच्या सरदारांनीं आणिले; याशिवाय त्यांनीं अनेक पतिव्रता स्त्रिया, तरुण कुमारिका भ्रष्ट केल्या, ठार केल्या, बाटविल्या आणि त्यांचे संबंधी, नातेवाईक ह्यांस यमसदनीं पाठविलें. त्यांचीं घरेंदारें लुटलीं, जाळलीं वगैरे अनेक अनर्थ केले. ह्यानंतर अदवणी किल्ल्यावर मोर्चा फिरला. ह्या कामावर खासा स्वारी गेली आणि विजयानगरच्या शहास खानखनान राहिला. अदवणीचा किल्ला विजयानगरकरांच्या ताब्यांतील सर्वांत कठीण आणि

बळकट होय. त्यानें सुलतानास दाद दिली नाहीं; तथापि खान-खनानाचें सैन्य विजयानगरच्या आसपासच्या प्रदेशांत सारखा वणवा पसरीत चाललें होतें. यामुळें संधीवांचून दिवस दवडणें म्हणजे शेंकडों ब्रह्महत्या व हजारों स्त्रीबालहत्या यांकडे दुर्लक्ष करण्यासारखेंच होतें. अर्थात् या होणाऱ्या स्वप्रजाहत्यांचें पातक आपल्या माथीं घेण्याचा देवरायावर व अंशतः त्याचे सचिव सेनानायक यांवर प्रसंग आला. अशी स्थिति असल्यामुळें स्वतःच्या सुरक्षितपणाबद्दल काडीचीही भीति नसतां किंवा कांहीं प्रांत शत्रूनें घेतले तर तेवढ्यानें आपलें राज्य संपुष्टांत येईल, अशा प्रकारचीही काळजी नसतां व कदाचित् तशी वेळ आलीच तर गेलेले प्रांत फिरून सव्याज परत मिळविण्याची अंगीं हिंमत असतांही देवरायास मुठींत नाक धरून शत्रूंना हवा तसल्या अटींवर संधि करणें भाग पडलें. त्याप्रमाणें त्यानें आपले कांहीं मंत्री संधि करण्याकरितां सुल्तानाकडे पाठविले. संधि साधण्याकरितां आपण होऊन देवराय प्रयत्न करतोसें पाहतांच मुसल्मान चढले. शेवटीं हो, ना करितां करितां देवराय आपली एक मुलगी आपणास देईल तरच संधि होईल, असें सुलतानानें सांगितलें. हिंदु क्षत्रियानें वरीलसारख्या गोष्टीस रुकार द्यावयाचा म्हणजे निर्लज्जतेची किती पराकाष्ठा आहे, ह्याची कल्पना हिंदूंसच होईल. सुलतानाची अट ऐकून देवरायाला मोठें संकट पडलें. ही गोष्ट करण्यापेक्षां त्यानें मृत्युही सुखानें पतकरला असता; परंतु ज्या पातकाच्या निष्क्रियेसाठीं तो झटत होता, ती त्याच्या मृत्यूनें साधत नव्हती; यामुळें त्याचा नाइलाज झाला. सुलतानास आपण मुलगी द्यावी का ? बरें, आपण कबूल झालों, तरी मुलगी कशी कबूल होईल ? तिचें मन कोण वळवील ? मुलीच्या आईजवळ

तरी ही गोष्ट कशी काढावी ? अशा हजारों अडचणी देवरायापुढें येऊन उभ्या राहिल्या. चिंतेनें तो अगदीं चूर झाला. त्याला झोंप येईनाशी झाली व अगदीं खंगत जाऊन चारआठ दिवसांत तो केवळ क्षयी बनला. शेवटीं त्याच्या काळजीचा स्फोट होऊन राज्यकारभाराच्या ह्या परम रहस्यांत त्याच्या एका नायिकेस पडावें लागलें. ही नायिका म्हणजे त्याच्या अनेक बायकांतील एक केवळ उपभोगार्थ नटलेली बायको होती. हिलाच एक उपवर आणि सुंदर अशी कन्या होती. तिनें प्रथम आपल्या कन्येस देवरायावरील सर्व संकट समजावून सांगितलें. तें सांगतांना तिनें असे कांहीं कारुणिक शब्द योजिले आणि महाराजांवरील आपलें प्रेम इतकें कांहीं व्यक्त केलें कीं, त्या योगानें त्या मुलीच्या अंतःकरणास पाझर फुटून ती आपल्या जन्मदात्याकरितां हवें तें साहस करण्यास, किंबहुना प्राणही खर्चिण्यास सिद्ध झाली. मग त्या माउलीनें तिला सुल्तानाची अट सांगितली. ती ऐकून ती मातृपितृवत्सल मुलगी जरासा विचार करून म्हणाली, ‘ आई ! कांहीं चिंता नाहीं; मी एकटी आपल्या धर्मास मुकल्यानें जर माझ्यासारख्या अनेक कुमारींचें पातिव्रत्य आणि महाराजांच्या लाखों प्रजेचे प्राण व धर्म ह्यांचें संरक्षण होत आहे, तर सुल्तानाची अट मला कबूल आहे. तूं महाराजांना सांग कीं, आपण खुशाल संधि साधावा. ’ याप्रमाणें मुलीची कबुली मिळतांच देवरायानें प्रसंगाकडे लक्ष देऊन मोठ्या कष्टानें सुलतानास मुलगी व अश्व, गज, जडजवाहीर इत्यादि अर्पण करून संधि संपादिला. रीतीप्रमाणें लग्नसमारंभ मोठ्या थाटांत झाला. सासरेजांवयांच्या भेटी, प्रतिभेटी, त्याचप्रमाणें दोन शेजारी राजे ह्या नात्यानेंही एकमेकांकडे येणंजाणें आणि एकमेकांस साडेतीन वस्त्रें देणें इत्यादि सर्व

शिष्टाचार यथासांग पार पडले, त्यांतील देवाणघेवाणाच्या कामीं सुलतान फेरोजशहाचाच सर्वस्वीं लाभ झाला. शेवटच्या बोळवणीच्या प्रसंगीं जांवयास पोंचविण्याकरितां देवराय चांगला दोन कोस चतुरंग सैन्यासह आला होता. तरी '**सदा वक्रः सदा रुष्टः सदा पूजामपेक्षते । कन्याराशिस्थितो नित्यं जामाता दशमो ग्रहः ॥**' या श्लोकाचा प्रत्यय फेरोजशहानें आपल्या सासऱ्यास दिलाच. देवराय आपणांस आपल्या तळापर्यंत पोंचविण्यास आला नाहीं म्हणून हा सुलतान जांवई अखेर रागावलाच; आणि 'ह्या आपल्या अपमानाचा आपण केव्हां तरी लवकरच सूड घेऊं' अशी त्यानें प्रतिज्ञाही केली. जांवईबोवांचा हा रुसवा जेव्हां देवरायास कळला, तेव्हां त्यानेंही त्याबद्दल धिक्कारोद्गार काढले. एकंदरींत ह्या दोन निसर्गशत्रु राजांचें सासरेजांवयांचें जरी नातें झालें, तरी अखंड मैत्री तर दूरच राहिली, पण अल्पमैत्रीही झाली नाहीं.

१६. ही एक हिंदु नवरी पटकावल्यानंतर राजधानीस येतांच फेरोजशहानें देवरायाचें प्रीतिपात्र जी मुदकलची अप्सरा तिला पकडून आणून आपल्या घरांत दडपून टाकण्याचा जारीनें प्रयत्न केला. त्याप्रमाणें तिला आणून हजर करितांच फेरोजशहाची खात्री झाली कीं, ही सुंदरी केवळ अस्मानची परी आहे. त्याची तिजवरून किती वेळ तरी नजर ढळेना. शेवटीं त्यानें तिचा आपल्या वडील मुलाशीं संबंध जोडला. बहुशः ह्या प्रकारांत विजयानगरच्या राज्यकन्येचें अंग असावें; नाहीं तर आपल्या शत्रूस प्रयत्न करूनही अप्राप्त ठरलेलें स्त्रीरत्न फेरोजशहानें स्वतःच्या उपभोगार्थच राखिलें असतें. त्यांतच त्याची खरी मिजास होती; परंतु तसें न करितां त्यानें तें आपल्या हसन नांवाच्या मुलासच दिलें. विजयानगरच्या राज्यकन्येपेक्षां

ही स्त्री फारच रूपवती होती. ती सुल्तानाची बीबी झाल्यास त्याचें सर्व लक्ष तिजकडे वेधून जाईल, या भीतीनें सदर राजकन्येनेंच तिचा विवाह सुल्तानाच्या मुलाशीं मोठ्या शिताफीनें करविला असावा. पुढें फेरोजशहाच्या पश्चात् हसनखानास गादी मिळाली नाहीं; यामुळें त्याच्या ह्या सुंदर बिबीस अपमानांतच दिवस कंठणें भाग पडलें. तो प्रकार असा : —

१७. देवराय आणि त्याचा हा उपटसुंळ जांवई ह्यांची एकमेकांच्या सूडाची बोलाचाल लग्नाच्या शेवटीं झालीच होती; परंतु देवरायाला कांहीं तसा प्रसंग लाभला नाहीं. कारण तो पुढें लवकरच शके १३३४–३५ च्या सुमारास कैलासवासी झाला. त्याच्या मागें त्याचा मुलगा वीरविजय गादीवर बसला. ह्या वीरविजयाची कारकीर्द शके १३४१ पर्यंत होती. वीरविजय स्वतः लढाईस गेल्याचा उल्लेख खात्रीलायक असा मिळत नाहीं; तथापि ‘ आजा मेला आणि नातु झाला ’ ह्या म्हणीप्रमाणें सुलतान फेरोजशहाचा सासरा जो पहिला देवराय तोच जणूं आपल्या नातवाच्या मनांत संचरून आपलें कर्तव्य करण्यास उत्सुक झाला. ह्या नातवाचें म्हणजे वीरविजयाच्या मुलाचें नांव देवराय असेंच होतें. तो केवळ अल्लड तरुण होता; तथापि ब्राह्मणी सुल्तानाबद्दल त्याचें वैर इतकें उत्कट असे कीं, त्याच्या मनांत ‘ आपण एकदां केव्हां वयांत येऊं आणि केव्हां आपल्या मुसल्मान शत्रूशीं सामन्याला उभे राहूं ’ असे विचार वारंवार येत. ईश्वरेच्छेनें हा योग लवकरच जुळून आला. फेरोजशहानें शके १३३९ ( इ. स. १४१७ ) मध्यें विजयानगरकरांच्या पुनगल किल्ल्यावर हल्ला केला. वीरविजयानें राजधानीहूनच किल्ल्यांतील लोकांस जी काय मदत करतां येईल ती करून स्वस्थ बसण्याचें व्रत

चालविलें. त्याच्या तरतुदीचा कांहींच उपयोग होत नसे असें नाहीं; त्यामुळें किल्ल्यांतील लोकांस वेळोवेळीं उत्तेजन आणि सामग्री मिळून ते शत्रूशीं निकरानें लढत आणि किल्ल्याचें संरक्षण करीत, हें खरें; तथापि सैन्यांतील, राजकुलांतील व सचिवांपैकीं तरुण मंडळी, मागील खेपेच्या अपमानकारक तहापासून इतकी चिडलेली होती कीं, ती नेहमीं युद्धास उत्सुक असे. त्यांना हें 'उंटावरून शेळ्या राखणें' मुळींच रुचत नव्हतें. त्यांना आपलें गेलेलें यश फिरून केव्हां मिळवूं आणि आपल्या धर्माचा झालेला अपमान आणि आपल्या तोंडाला लागलेली काजळी केव्हां नाहींशी करून टाकूं, असें झालेलें होतें; परंतु करतात काय? राजाज्ञेवांचून सर्व लंगडें होई. इकडे पुनगलचा किल्ला दोन वर्षें झालीं तरी कौल देईना. सुलतानाच्या सैन्यास मात्र सारखी ओहोटी लागून राहिली होती. यांतच घोड्यांच्या रोगानें आणि माणसांतही सांथ उत्पन्न झाल्यानें विशेषच भर पडली. एक एक मुसलमान सरदार आपली तुकडी घेऊन आपापल्या जहागिरीवर चालता होऊं लागला. इतक्यांत इकडे वीरविजय राजानें परलोकमार्ग स्वीकारला आणि त्याचा मुलगा देवराय दुसरा हा मंगल दिवशीं सिंहासनाधिष्ठित झाला. ह्यास 'चिन्न' (तेलगू), 'चिक्क' (कानडी) म्हणजे मराठींत 'चिमणा राजा' असें म्हणत. हा केवळ अल्लड बाळ होता; तथापि सर्व राष्ट्रच शत्रूशीं लढण्यास उत्सुक असल्यानें ह्या चिमण्या राजाच्या अल्लड, तथापि नैसर्गिक महत्त्वाकांक्षेस जोर आला आणि ह्याच्या कारकीर्दींतल्या पहिल्याच राजसभेंत जमलेल्या सचिव व सेनानायकांनीं परस्परोत्तेजक भाषणें करून सुमुहूर्तावर शत्रूशीं टक्कर देण्याची सिद्धता करून ढाला फिरविल्या. ही गोष्ट शके १३४१ (इ. स. १४१९) त घडली.

१८. सुलतानाच्या पक्षांतील त्याचा मुख्य सेनापति मीर फझलउल्ला ह्यानें प्रथम निकरानें तोंड दिलें. वटकाभर त्यानें फळी फोडून विजयानगरच्या सैन्याच्या मध्यापर्यंत प्रवेश करून त्यांच्या उजव्या अंगावर खूप माराही केला; परंतु देवराय 'चिमणा राजा' ह्यानें आपल्या एका साथीदाराकडून अशी कांहीं लगट करविली कीं, एकाएकीं मीर फझलउल्लास एक वार लागून तो जागच्या जागींच पुरा झाला. मुसलमान इतिहासकार असें लिहितात कीं, हें काम मीर फझलउल्लाच्या विश्वासू मानल्या जाणाऱ्या नोकराकडूनच लांचानें करविलें होतें. मीर फझल कामास येतांच सुलतानाची बाजू खचलीच. त्यानें आपल्याकडून शिकस्त केली; परंतु कांहीं उपयोग झाला नाहीं. उलट त्याच्याच जीवावर मात्र येऊन बेतली. विजयानगरकरांनीं एकदां अशी कांहीं लगट केली कीं, सुलतानास अचानक वेढण्याचा रंग आणिला. तेव्हां प्राणरक्षणार्थ त्याला मोठ्या चपळाईनें आपला पाय रणांतून कसा तरी काढावा लागला. अनेक जखमा लागून तो जीवानिशीं पळाला. दक्षिणी हिंदु वीरांनीं त्या प्रसंगीं मुसल्मानांचा बारा वाटांनीं पाठलाग करून त्यांची अगदीं लांडगेतोड केली. ह्या वेळीं सशस्त्र मुसलमानांची अशी कांहीं पराकाष्ठेची कत्तल झाली कीं, रणांगणावर शिखाहीनांच्या मुंडक्यांचा सारखा थरच्या थर होऊन राहिला होता. सुल्तानाचा त्याच्या देशांत लांबवर पाठलाग करून जाळपोळ, लूटकाट आणि पीर, मशिदी, दरगे ह्यांची पुरी नासधूस व जागोजाग कडव्या आणि जीवावर उदार होऊन लढाईस येणाऱ्या मुसलमानांची कत्तल करून विजयानगरकरानीं किंवा चिमण्या देवरायानें आपला आजा जो थोरला देवराय त्याच्या वेळेपासून सुलतानानें केलेल्या अनंत अप-

कारांची ह्या वेळीं एकदमच सव्याज फेड केली. सुलतान फेरोजशहानें ह्या प्रसंगीं गुजराथचा सुलतान अहमदशहा ह्याची मदत मागितली. परंतु त्याच्या स्वतःच्या मुलखांतच स्थिरस्थावर नसल्यानें फेरोजशहाची याचना फुकट गेली. शेवटीं हिंदु लोक परतले. ह्या मोहिमेंत कांहीं प्रसंगीं खानखनानानें मात्र चांगला टिकाव धरला, यामुळें अपमान, काळजी आणि वार्धक्य यांच्या योगानें निराश व वेडा होऊन मरण्याच्या पंथास लागत चाललेल्या सुलतानापुढें त्याला बरीच फुशारकी मारावयास सांपडली. इतकेंच नव्हे, तर खऱ्या वारसास बाजूस सारून फेरोजशहाकडून आपल्या सैन्याच्या जोरावर ह्या गाजीनें सल्तनतही पटकावली. मुदकल सुदरीच्या नवऱ्यास–हसनखानास– आंखून दिलेल्या ४ कोसांच्या टापूंत खाऊनपिऊन खुशाल चैनींत असण्याची परवानगी ऊर्फ तुरुंगांतील साधी कैद मिळाली. इतकेंच होऊन राहतें तरी ठीक होतें; परंतु पुढें खानखनानाच्या मुलानें ह्या राजकीय कैद्याचे डोळे काढून त्याला अंध करून सोडलें. तेव्हां तर केवळ आंधळ्याला वागवणारी लांकडी काठी आणि मुदकल सुंदरी एकाच योग्यतेच्या झाल्या. स्वधर्मी, स्वदेशी महाराजाधिराजाची कल्पतरूप्रमाणें सर्वसुखद छाया चालून येऊन ह्या मुदकल सुंदरीवर पडत असतां कपाळकरंटीनें तेथून पळ काढला. कारण काय? तर म्हणे राजाची राणी होऊन आपल्या स्वतंत्रतेला मुकावें लागतें! पण शेवटीं ह्या अविचारी सुंदरीस धर्मांतर स्वीकारून देशद्रोही, धर्मद्रोही म्हणून आपल्या कपाळीं अखंड काळा डाग वागवून खरी खरी कैद आणि आंधळ्या नवऱ्याची सेवा हींच पत्करावीं लागलीं! कोणत्याही देशांत असल्या प्रवृत्तीचीं परधर्मी विदेशीयास धार्जिणी

माणसें निपजूं लागलीं कीं, तोच त्या देशाच्या नष्टचर्याचा आणि पारतंत्र्याचा पाया समजावा. हीं असलीं माणसें स्वतः नरक जवळ करून परंपरया आपल्या सर्व राष्ट्रासही नरक भोगावयास लावतात ! धिक् जिणें असल्यांचें ! त्यापेक्षां मरण पुरवलें ! आणि म्हणूनच ' स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः ।' असें श्रीमद्भगवंतांनीं गीतेंत सांगितलें आहे.

१९. सुलतान फेरोजशहा शके १३४४ ( इ. स. १४२२ ) च्या आश्विनांत वारला. त्याच्या मागें खानखनान हा अहमदशहा १ ला ह्या नांवानें सुल्तान झाला. ह्याची पहिली कामगिरी म्हणजे विजयानगरच्या देवरायानें केलेल्या अपकाराचें उट्टें काढणें ही होय ! त्यानें आपल्या उद्देशाच्या सिद्धयर्थ जंगी सैन्य आणि विपुल द्रव्य जमविलें. इकडे देवरायानेंहि आपले सर्व सेनापति गोळा केले आणि वारंगूळकरांना कटांत घेऊन तुंगभद्रेच्या कांठीं छावणी ठोकली. सुल्तान अहमदशहानें तुंगेच्या उत्तरतीरास तळ देऊन आपल्या सैन्याच्या मध्यभागीं सर्व दाणागल्ला आणि सामानसुमान ठेविलें व तेथेंच स्वतःचा तंबू ठोकून सर्व गोटाच्या भोवतीं बैलगाड्यांचा गराडा दिला. उद्देश हा कीं, विजयानगरच्या पायदळास रात्रीं एकदम छापा घालतां येऊं नये. अशा स्थितींत सुल्तान ४० दिवस आपल्याच सैन्यांत स्वस्थ चिणून राहिला होता. त्याला आपण होऊन चालून जाण्यास धीर झाला नाहीं. इकडे प्रथम प्रथम मुसलमानी सैन्यास बरीच दहशत पोंचवून विजयानगरकरही थोडेसे शिथिल झाले. शत्रूचा विशेषसा दम दिसेनासा होतांच देवरायाचे सैनिक आणि सेनापति बरेच असावध वागूं लागले. वारंगूळकरही रण सोडून चालते झाले. ते दिवस थंडीचे होते. नदीला उतार होता. तेव्हां विजयानगरकर असावध आहेत

असें पाहून सुल्तान अहमदशहानें हळूहळू हालचालीस सुरवात केली. एके रात्रीं त्यानें लोदीखान, अलमखान आणि दिलावरखान ह्यांस, गुप्तपणानें आपल्या सैन्यासह नदी उतरून शत्रूंच्या गोटांत उपद्रव देण्यास सांगितलें; त्याप्रमाणें ते तिन्ही सरदार उजाडण्यापूर्वीच नदीपार झाले. देवराय – चिमणा महाराज -- कालव्यानजीकच्या एका केळीच्या बनांत थोडक्याशा खेळगड्यांसह निजलेला होता. कर्मधर्मसंयोगानें मुसल्मान सैन्याची एक तुकडी त्याच बागेंत केवळ फळांची लूट आणि आवलाव करण्याच्या हेतूनें शिरली. देवरायाचे कांहीं साथीदार जागे होऊन मळ्यांत पाटावर इतस्ततः प्रातर्विधींत मग्न होते; त्यांस मुसल्मानांनीं पटापट चतुर्भुज केलें. इतक्यांत देवराय जागा झाला आणि बाहेर येऊन पाहतो, तों आपले साथीदार चतुर्भुज झालेले ! थोडासा विचार करितांच सर्व प्रकार त्याच्या ध्यानांत आला. त्यानें प्रथम आपल्या खेळगड्यांस नेत्रसंकेतानें निमूटपणें सर्व सहन करण्याची खूण केली. त्याचें केवळ पोरवय होतें तरी प्रसंगावधानानें त्यानें तो प्रसंग मारून नेण्याचा संकल्प ठरविला. त्यांचें सैन्य पुष्कळ लांब असल्यामुळें एकाएकीं ओरड करण्यापासून लाभ न होतां ' उद्यांचें मरण आजच ' यावयाचें, असा मात्र संभव होता. सुदैवानें त्या वेळीं त्याच्या अंगावर राजचिन्हें नव्हतीं, त्यामुळें त्याला कोणी ओळखिलें नाहीं. शिवाय मोठा समयसूचकपणा वापरून त्यानें तितक्यांतल्या तितक्यांत जें कांहीं मोलाचें वस्त्र अथवा इतर कांहीं त्याजवळ होतें तें सर्व चटकन फेंकून दिलें व केवळ एखाद्या सामान्य गरीबाच्या बावळ्या मुलासारखी मुद्रा करून तो उभा राहिला. शत्रूच्या लोकांनीं त्याला पाहिलें; परंतु हा राजपुत्र असेल अशी

त्यांस शंकाही आली नाहीं. त्यांचें सर्व लक्ष्य आतां त्या मळ्यांतील फळफळावळीवर हात मारण्याकडे लागलें होतें आणि आपणांस अडथळा करण्यास कोणीच नाहीं असें पाहून ते निर्भय झाले होते. विजयानगरकरांकडील कोणीच लष्करी पेशाचे लोक बागेंत नाहींत अशी त्यांची खात्री झाली होती. तेव्हां त्यांनीं केवळ वानरांची कृति करून त्या बागेचा विध्वंस चालविला! शेवटीं एकेकानें तेथील उसांची एकेक मोळी बांधली आणि देवरायाच्या खेळगड्यांस मोकळें करून ते कोणी सामान्य लोकच समजून त्यांस मोळ्या उचलण्यास सांगितलें. त्यांनीं मुकाट्यानें आपल्या चिमण्या महाराजाकडे एकदां नेत्रसंकेत करून त्या उचलल्या आणि ते इमाम दांडगे जिकडे जातील तिकडे त्यांच्या मागें हेही चालूं लागले. ह्याप्रमाणें बहुतेक शिपाई बागेंतून बाहेर गेले. देवरायाच्या साथीदारांपैकीं एकही इसम त्याच्या दृष्टीस पडेनासा झाला. देवरायाच्या मनांत अल्लडपणानें आपणही झुकांडी देऊन पळून जावें असें अनेक वेळां आलें; परंतु न जाणों, पळून जाण्यानेंच कदाचित् आपल्याबद्दल संशय येऊन नसतें विघ्न ओढवेल, असा त्या चिमण्या राजानें महान् विचार करून धैर्याचा आश्रय केला; आणि ईश्वरावर भरंवसा ठेवून तो निश्चल उभा राहिला असतां शेवटीं त्याच्यावरही एका मुसल्मान सरदारानें उसांची मोळी लादलीच! पण कांहीं एक कांकूं न करितां त्या बालराजानें ती मोळी आपल्या राजमुकुटाच्या स्थानीं धारण करून त्या मुसलमान सरदाराच्या मागोमाग मार्ग सुधारला.

२०. चिमणा राजा देवराय आणि त्याचा वाटाड्या मुसल्मान सरदार हे फार वेळ चालले नाहींत, तों इकडे सुल्तानाचें सैन्य नदी उतरून आल्याची आणि आपला प्राणप्रिय चिमणा राजा हरव-

त्याची वार्ता विजयानगराच्या सर्व गोटांत पसरून एकच गोंधळ माजून राहिला. शेवटीं निराश होऊन सेनापतींनीं आपापल्या सैन्यास एकदम परंतु व्यवस्थेनें गोट मोकळा करून नगराचा मार्ग जवळ करण्याची आज्ञा दिली. इकडे सुलतान गोटांत शिरण्याच्या अगदीं लागांत होता. हा सर्व प्रकार देवरायाच्या डोक्यावर मोळी देऊन घटकाभर त्याचा धनी झालेल्या मुसलमान सरदारास कळतांच त्याच्या मनांत ' शत्रूचा गोट लुटण्यांत उंसांच्या मोळीपेक्षां आपला कितीतरी पट फायदा होऊन, शिवाय सुलतानाकडून किताब व बढती मिळेल ' असा विचार येऊन तो धूम ठोकीत तिकडे चालला. चिमणा राजा देवराय जो तेथून पळाला तो अचानक आपल्या स्वतःच्या शिबंदीपैकीं एका लहानशा तुकडींत जाऊन मिळाला. या चिमण्या राजाच्या शिबंदीचे लोक ह्या वेळीं त्यांच्या नेमक्या स्थळीं नसून ते आपल्या धन्यास शोधीत दशदिशा पांगले होते. त्यांतील ही तुकडी अगदीं सर्वांच्या शेवटीं निघाली असल्यानें देवरायास लवकरच भेटली. आपला चिमणा राजा, आपला हरवलेला प्राण आपणांस फिरून मिळाल्याबद्दल त्या लोकांस किती आनंद झाला असेल, ह्याची कल्पना सध्यांच्या आम्हां परतंत्र आणि स्वराज्याच्या कल्पनेचा गंधही नसणाऱ्या लोकांस यथातथ्य होणेंच अशक्य आहे ! देवरायानें आपले कांहीं लोक आपल्या भोंवतीं मिळतांच ' आपला प्राण वांचला हेंच पुष्कळ, आतां लपतछपत आपली नगराची वाट धरावी आणि आपल्या राजवाड्यांत सुखासनीं पहुडावें ' असला विचार न करितां त्या पांचपन्नास लोकांतीलच निम्मे लोक विद्युद्वेगानें आपले इतर सैनिक गोळा करण्याकरितां पाठविले व उरलेल्या वीसपंचवीस

बाजीनिशीं तो एकदम नगराकडे परत फिरणाऱ्या आपल्या मुख्य सेनेचा ओघ, फिरून शत्रुसंमुख करण्याकरितां, आड परंतु जवळच्या मार्गानें तडक निघाला. इकडे सुलतानसाहेब आणि त्यांचे सैनिक लुटीच्या आशेंत चूर होते, तों आमच्या चिमण्या राजाची सर्व मंडळी जमली आणि मुख्य सेनेसही आपला बाल-राजा जीवंत आहे, इतकेंच नव्हे, तर तो आपणांस आज शत्रूवर चाल करण्याकरितां पुढें घोडा घालून उत्तेजन देण्यास सिद्ध आहे, असें कळतांच सर्व कानडी सैन्य उत्साहानें माघारें रणां-गणांत फिरलें. ऐन दुपारच्या वेळेला बालराजा देवराय सुल-तानावर उलटला आणि चार घटका दोन्ही सैन्यांचें मोठें घन-घोर युद्ध झालें. सुलतानास तो जसा सड्या स्वारीनिशीं नदीच्या अलीकडे आला होता तसेंच परतावें लागलें. मुसल-मान सैन्य परतल्यावर त्याचा पाठपुरावा करण्याचा सल्ला आपल्या बालराजाच्या सचिवांनीं न दिल्यामुळें युद्ध संपलें आणि वडील मंडळींच्या म्हणण्यास मान देऊन देवरायास परत नगरास जावें लागलें. परंतु ह्या प्रसंगींच्या त्याच्या संकटाची, साहसाची, धैर्याची, समयसूचकतेची आणि सोत्साह पराक्रमाची कच्ची गोष्ट लोकांस समजतांच त्यांची त्याच्या ठिकाणीं इतकी प्रीति जडली आणि त्याच्या उदाहरणानें त्यांच्या स्वदेशधर्माभिमानास इतकें प्रोत्साहन मिळालें कीं, पुढें लवकरच, लोकांच्या प्रयत्नानेंच सुलतान अहमदशहावरही बालराज देवरायापेक्षा बिकट प्रसंग ओढवला.

२१. देवराय व त्याचें सैन्य विजयानगरास परत गेल्यावर अह-मदशहाचीही देवरायाच्या मागोमाग जाऊन शहरास वेढा घालून नाकेबंदी करण्याची छाती झाली नाहीं; तथापि कांहीं दिवस तसेच लोटल्यावर त्यानें आपल्या एकेका सरदारास

विजयानगरकरांचा मैदानमुलूख लुटण्यासाठीं पाठविलें. त्यांनीं आपला नेहमींचा क्रम चालू केला. लूटमार, जाळपोळ आणि निरपराध गाईची, देवांची व गाईप्रमाणें निरुपद्रवी बायका-पोरांची शिकार करणें, निःशस्त्र पुरुषांची शेंडी व जानवें तोडून त्यांच्या तोंडांत गोमांस घालणें अथवा बकऱ्यांप्रमाणें त्यांचीच सागुती काढणें हीं कामें म्हणजे ह्या सुलतानाच्या मुसलमान सैन्याच्या सहज लीला होत. खुद्द खासा स्वारीनेंही तोच क्रम स्वीकारला होता. सुलतान अहमदशहा, वीस हजार काफरांची कत्तल भरली कीं, त्या ठिकाणीं तीन दिवस विजयोत्साहासाठीं मुक्काम करी. ह्यानें ह्या वेळीं कितीक देवळांतील मूर्ति फोडून टाकल्या आणि ब्राह्मणांचीं मोठमोठीं विद्यापीठें विध्वंसून त्यांतील विद्यार्थी व आचार्य ह्यांस अतोनात छळिलें. असा हा सुलतानसाहेबांचा राक्षसी क्रम चालला असतां गरीब ब्राह्मण विद्यार्थी व इतर प्रजाजन मिळून पांचएक हजार हिंदूंनीं सुलतानाच्या ह्या कृत्याचा प्रतिरोध करून सुलतानास कंठस्नान घालण्याची दुर्घट प्रतिज्ञा केली आणि ज्याला जें मिळेल तें शस्त्र व कोणी कोणी घोडीं हीं घेऊन ते एकजुटीनें व एकसंकेतानें महाभारतांतील संशप्तकांप्रमाणें किंवा केशरी पोषाख करून जोहार पुकारणाऱ्या रजपुतांप्रमाणें निघाले. आपल्या देशाकरितां, धर्माकरितां आणि उपास्य देवतांच्या मूर्तींकरितां किंबहुना आपल्या आपलेपणाकरितां ह्या पांच हजार लोकांनीं जणूं काय आपल्या शिरांचा यज्ञ करून त्याच्या पूर्णाहुतीदाखल सुलतानाचें शिर अर्पण करण्याचें योजिलें होतें. त्या महानरमेधाकरितां अवश्य असलेला अहमदशहा सुलतानरूप पशु वेळेवर हातीं लागावा म्हणून त्यांनीं गुप्तवेशधारी अनेक हेर नेमले होते. ते सुलतानाच्या हालचाली वेळोवेळीं

कळवीत. त्याप्रमाणें हे पांच हजार स्वयंसेवक हिंदु वीर अचानक येऊन त्याच्या आघाडीपिछाडीचा फडशा पाडीत आणि सुलतानाच्या उद्दिष्ट कार्यांत विघ्न आणीत; म्हणजे कुठील तरी हिंदु गांवाचा व देवदेवाल्याचा बचाव करीत.

२२. एके वेळीं अहमदशहा शिकारीस निघाला असतां त्याचें मुख्य सैन्य आणि तो ह्यांमध्यें बरेंच अंतर पडलें असल्याची बातमी ह्या स्वयंसेवकांस मिळाली. ते लगेच त्याचें सैन्य व तो ह्या दोघांच्या मध्यें घुसले. त्यांपैकीं कांहीं लोकांनीं एका तोंडानें सैन्यावर व कांहींनीं इकडे सुलतानावर हल्ला केला. मुख्य तळ व सैन्य ह्यांमध्यें एक कोसाचें व सुलतान व त्याचें सैन्य ह्यांमध्यें पांचसहा कोसांचें अंतर पडलें. तिकडे तळावरही एका तिसऱ्याच तुकडीनें हल्ला करून दाणादाण उडविली. सुलतानास आपला जीव घेऊन चोराप्रमाणें पळतां भुई थोडी झाली. सुलतानाची शरीररक्षक दोनशें वीरांची तुकडी सर्वांपूर्वीच कामास आली होती. पळतां पळतां गुरांकरितां केलेल्या एका मातीच्या गडग्यामागें लपण्याची सुलतानास आशा होती; परंतु त्यानें मधील सपाट मैदानाचा भाग आक्रमून त्या गडग्यापलीकडे घोडा उडविण्याच्या आंतच त्याच्या पाठीवरील त्याचे काळ त्याच्या लगटीस आले. सुलतानास तर आतां अल्लाची शेवटचीं प्रार्थना करण्याची पाळी आल्यासारखें वाटून निराशेनें तो आकाशाकडे बघावयासही लागला होता; इतक्यांत इहजन्मींची खात्रीनें नव्हे, परंतु त्याची कांहीं-तरी पूर्व पुण्याई उभी राहून, अचानक एक शेंदोनशें मुसल्मान तिरंदाजांची टोळी सुलतान व त्याचे पाठलागे ह्यांच्या मध्यें येऊन धडकली आणि जिवावर उदार होऊन ह्यांनीं आपल्या तिरंदाजीस सुरवात केली. क्षणामध्यें त्यांनीं तीरांचा जसा पाऊसच

पाडला ! परंतु हिंदु स्वयंसेवकांनीं एक तसूभरहि मागें न सरतां प्रतिपळास पुढेंच पाऊल टाकण्याचा क्रम नेटानें चालू ठेवून प्रतिपक्षांतील एकेका वीरास अल्लाकडे पाठविण्याचा सपाटा चालविला. होतां होतां ह्या मध्येंच आलेल्या मुसलमान वीरांचा निःशेष निःपात करून हे हिंदुवीर, ज्या गडग्याच्या पलीकडे सुलतान लपला होता त्यापाशीं येऊन धडकले; आणि लगेच त्यांनीं कुदळीं, खोरीं, पहारा इत्यादिकांनीं तो गडगा पालथा घालण्यास प्रारंभ केला. गडग्यास मार्ग पडून मंडळी आपल्या यज्ञाची पूर्णाहुति देण्यास आंत शिरणार, तों हरवलेल्या सुलतानाचा ससैन्य शोध करीत असलेला अबदुल कादर नांवाचा त्याच्या खास पागेचा मुख्य सेनापति तेथें येऊन धडकला. त्याच्या बरोबर हजारांत सैन्य होतें, आणि आमचे हे कर्नाटकी हिंदु वीर तर केवळ आतां शेंकड्यांवर असतील नसतील; तथापि ह्या नव्या दमाच्या चिडलेल्या मुसल्मानांशींही आमचे स्वयंसेवक संशप्तक वीर असे निकरानें लढले कीं, प्रत्येकानें आपल्या शत्रूंपैकीं निदान पांचांवर असामी निजविल्यावांचून देह ठेवलाच नाहीं ! मात्र असला पातकी पशु रणांत बळी पडण्यास अयोग्य म्हणूनच कीं काय कोण जाणें, ईश्वरी संकेतानें सुलतान अहमदशहा जीवानिशीं सुटला. येथें हा ऐतिहासिक चमत्कार मोठा लक्षांत ठेवण्यासारखा आहे कीं, ह्या एका मोहिमेंत लाखों सैन्याचे अधिपति असलेले दोन महान् राजे दैवदुर्विलसितानें एकेकटे शत्रूच्या आटोक्यांत सांपडून 'जीवावरचें शेंपटावरच निभलें,' अशा प्रकारानें प्रसंगांतून पार पडले ! वरील गोष्ट कानडी व दक्षिणी लोकांच्या राष्ट्राभिमानाची चांगलीच द्योतक आहे. असल्या गोष्टींच्या उदाहरणानेंच स्वातंत्र्यस्वधर्मप्रीति उत्पन्न होत असते. ह्यानंतर शके १३४५ त दक्षिणेंत

भयंकर दुष्काळ पडला. त्यामुळें ह्या दोन्ही सालीं कलबुर्गा आणि विजयानगर ह्या दोन नगरांमधील प्रदेशांत असणारी कापशीची वगैरे शेतजमीन मोकळीच पडली होती. तेव्हां सुलतान अहमदशहास, आधींच दुष्काळानें पिडलेल्या हिंदु प्रजेस फिरून पीडा देऊन त्यायोगें त्यांच्या राजासही शह देण्यांत आपला सहज फायदा होईल असें वाटलें; आणि त्याप्रमाणें त्यानें ऐन पावसाळ्यांत म्हणजे वाढलेल्या उपटसूळ उन्हाळ्यांत जाळपोळ व लूटफाट करीत विजयानगर गांठलें. विजयानगरला दोनतीन महिने वेढा देऊन बसून सुलतानानें त्याच्या दक्षिणेचा बराच प्रदेश उध्वस्त करण्याचा सपाटा चालविला. तेव्हां विजयानगरास फिरून एकदां सुल्तानाशीं लाडीगोडीनें वागून तह संपादावा लागला. ह्याप्रमाणें विजयानगरशीं तह होतांच पुढील वर्षी सुलतानानें वारंगूळवर जय्यत तयारीनें हल्ला केला आणि असहाय असें तें लहानसें राज्य आपल्या घशांत टाकलें. कारण वारंगुळचा राजा ह्या युद्धांत पडला. गेल्या ( विजयानगरकरांबरोबरच्या ) लढाईंत वारंगूळकर एकदम रण सोडून चालते झाले होते, त्या योगानें ह्या प्रसंगीं त्यांस विजयानगरकरांकडे मदत मागतां आली नाहीं. एकंदरींत शके १२२० पासून मोठ्या शर्थीनें सारखें लढून रक्षण केलेलें स्वातंत्र्य वारंगुळकरांना ह्या वेळीं म्हणजे शके १३४६त गमावून बसावें लागलें ! जवळ जवळ १२५ वर्षे त्यांनीं तें संरक्षण केलें, हें कांहीं कमी नव्हे.

२३. ह्यापुढें शके १३६५ च्या अखेरपर्यंत विशेषसें कांहीं घडलें नाहीं. वरील वर्षाच्या अखेरीस ( इ. स. १४३५ फेब्रुवारी २७ ला ) सुलतान अहमदशहा वारल्यानें त्याच्या जागीं त्याचा मुलगा अल्लाउद्दीन दुसरा तख्तनशीन झाला. अहमदशहाच्या

कारकीर्दीतच बेदर ( बीदर ) हें शहर बांधण्यास सुरवात झाली. ह्या प्रदेशाच्या पूर्वीच्या हिंदु राजधानीच्या जागीच ह्या नव्या शहराची रचना होत गेली. बेदरचा किल्ला शके १३५४ त पुरा झाल्यावर त्या सालापासून मरेपर्यंत अहमदशहा बेदर येथेंच राहत असे. पुढील सर्व सुल्तानही बेदरासच मुख्य गादीचें ठिकाण समजत. ' **बेदरचे बमणी** ' राजे अथवा सुल्तान हा शब्दप्रयोग ह्याच्या अगोदर होत नसे.

२४. मागील फेरोजशहाच्या प्रकरणांत आम्ही श्रीपादश्रीवल्लभ नृसिंहसरस्वति या महात्म्यांच्या कालसंबंधानें वाटाघाट केलीच आहे. आतां येथें इतकेंच सांगणें आहे कीं, लेखकाच्या मतें अहमदशहाचा मुलगा अल्लाउद्दीन हाच श्रीपादश्रीवल्लभांनीं वर दिलेला रजक असावा आणि ह्याच्याच कारकीर्दीत श्रीगुरूंचा दुसरा अवतार श्रीनृसिंहसरस्वति हा झाला असावा. तेव्हां श्रीगुरूंचें गुरुचरित्रावरून मिळणारें चरित्र अतिसंक्षेपरूपानें येथेंच देण्याचा यत्न करणें इष्ट आहे.

२५. श्रीपादश्रीवल्लभ व नृसिंहसरस्वति हे दोन अवतार होते हें मागेंच सिद्ध केलें आहे व त्यांपैकीं श्रीपादश्रीवल्लभांच्या अवताराची थोडीशी माहितीही त्याच वेळीं दिली आहे. आतां येथें तिची द्विरुक्ति न करितां केवळ नृसिंहसरस्वति ह्या अवताराचीच हकीकत सांगावयाची आहे. ही हकीकत सरस्वतीगंगाधराच्या श्रीगुरुचरित्र ग्रंथावरूनच सांगावी लागणार आहे. मागें फेरोजशहाच्या वेळेस श्रीगुरूंचा प्रथमावतार श्रीपादश्रीवल्लभ झाला म्हणून सांगितलें. त्या प्रसंगीं श्रीगुरुदत्त कृष्णा व गंगा ( पंचगंगा ) यांच्या संगमीं असतां आपल्या एका रजक शिष्यास वर देते झाले; तो प्रकार असा :—

श्रीपाद म्हणती रजकासी । जन्मादारभ्य कष्टलासी ।
वांच्छा असे भोगावयासी । राज्यभोग **तमोवृत्ति** ॥ २८ ॥
तुष्टवावया इंद्रियांसी । तुवां जावें म्लेंच्छवंशासी ।
आवडी झाली तुझे मानसीं । राज्य भोगीं जाय त्वरित ॥ ३० ॥
अंतरतील तुझे चरण । द्यावें मातें पुनर्दर्शन ।
तुझा अनुग्रह असे कारण । ज्ञान द्यावें दातारा ॥ ३१ ॥
श्रीगुरु म्हणती तयासी । **वैदुरानगरीं** जन्म घेसी ।
भेटी देऊं अंतकाळासी । कारण असे येणें आम्हां ॥ ३२ ॥
आणिक कायि कारणासी । अवतार घेऊं परियेसीं ।
वेष धरोनी संन्यासी । नाम **नृसिंहसरस्वती** ॥ ३५ ॥
रजक विनवीत श्रीपादासी । झालों आपण वृद्ध वयेंसी ।
भोग भोगीन बाळाभ्यासी । यौवनीं गोड राज्यभोग ॥ ३८ ॥

ह्यावर श्रीपादश्रीवल्लभांनीं ' तथास्तु ' म्हणतांच तात्काळ रजकानें देह सोडला. तोच पुढें वेदरांत अहमदशहाच्या पोटीं आला असावा, असा आमचा तर्क आहे. श्रीपाद-श्रीवल्लभही वरील प्रकारानंतर थोडक्याच दिवसांनीं

' अश्विनवद्य द्वादशीसीं । मृग नक्षत्र परियेसीं ।
श्रीगुरु बैसले निजानंदेंसीं । अदृश्य झाले गंगेंत ॥ ४५ ॥

२६. नंतर कांहीं दिवसांनीं, श्रीपादश्रीवल्लभांनीं ज्या स्त्रियेस पुत्र दिल्याची कथा पूर्वी आली आहे त्याच स्त्रीच्या पोटीं दुसऱ्या जन्मीं श्रीगुरुयति आपणही आले. ती ह्या जन्मीं उत्तरदेशीं करंजनगरीं वाजसनेय शाखेच्या एका ब्राह्मणाच्या कुळांत आली. तिचें नांव अंबाभवानी असें ठेविलें. त्याच गांवीं माधव नांवाच्या एका ब्राह्मणाशीं तिच्या आईबापांनीं तिचें लग्न केलें. हा माधव शिवरात्रीव्रत करीत असे. लग्न झाल्यावर पतीबरोबर ही अंबाभवानीही शिवव्रत मनोभावानें

करूं लागली. ह्याप्रमाणें सोळा वर्षें ह्या दंपत्यानें शिवव्रत चालविलें असतां अंबा गरोदर राहून तिच्या पोटीं शुभलग्नावर श्रीगुरूंचा जन्म झाला.

जन्मतांच तो बालक । ओंकार शब्द म्हणतसे ऐक ।
पाहून झाले तटस्थ लोक । अभिनव म्हणती तये वेळीं ॥१४॥
जातकर्म करी ब्राह्मण । विप्रांसि दक्षिणा देत आपण ।
ज्योतिषी सांगती तयाचें लक्षण । लग्न सत्वर पाहूनियां ॥१५॥
सांगती ज्योतिषी त्या द्विजासी । मुहूर्त बरवा असे विशेषीं ।
कुमर होईल कारुण्य ऋषी । गुरु सकळांचा निश्चयें ॥ १६ ॥
याचा अनुग्रह होईल ज्यासी । तो वंद्य होईल विश्वासी ।
याचें वाक्य प्रमाणेसी । चिंतामणी याचे चरण ॥ १७ ॥
अष्टसिद्धी याचे द्वारीं । वोळंगत राहतील निरंतरीं ।
नवनिधी याचे घरीं । राहतील ऐक द्विजोत्तमा ॥ १८ ॥
**न होत यासी गृहिणीसुत** । पूज्य होईल त्रिभुवनांत ॥
याचे दर्शनमात्रें पतित । पुनीत होती परियेसा ॥ १९ ॥

२७. आईबापांनीं पुढें बाराव्या दिवशीं त्याचें जन्मनाम ' **शालिग्राम देव** ' ठेविलें; परंतु व्यवहारनाम ' **नरहरि** ' असेंच ' धर्मकर्मे ' पडलें. हा 'नरहरि' अथवा ' शालिग्रामदेव ' मोठा होत होत रांगूंखेळूं लागला, चालूं लागला, धांवपळ करूं लागला; परंतु बोलणें शून्य. आईनें हांक मारिली तर ' ओंकार ' उच्चारून ओ द्यावी. एक ओंकारोच्चार मात्र लहर लागेल तेव्हां कोणाच्या कसल्याही उत्तरास प्रत्युत्तरादाखल म्हणून नरहरीच्या मुखावाटे निघावयाचा. कोणी कांहीं कोणी कांहीं अशीं नाना औषधें, तोडगे व पोपटाप्रमाणें पढविण्याच्या हरतऱ्हा सांगत; त्या सर्व त्या माउलीनें आणि त्या माधव ब्राह्मणानें अजमावून पाहिल्या; परंतु कांहीं उपयोग झाला नाहीं. होतां होतां मुलगा सात वर्षांचा झाला.

आतां उपनयन-मुंज-संस्कार झालाच पाहिजे. त्यांत गायत्र्युपदेश तर मुख्य व त्याचसाठीं तो संस्कार ! पण हा मुका मुलगा गायत्रीचा उच्चार कसा करणार ? ही माधवास मोठी चिंता उत्पन्न झाली. ‘ आपण सोळा वर्षें शिवरात्रीव्रत केलें तें फुकट झालें; कारण ईश्वरानें असा सुलक्षण मुलगा वरप्रसाद म्हणून दिला असतां त्याला वाचा नाहीं, याला काय उपाय करावा ? ’ अशा प्रकारें माधव आणि त्याची स्त्री अंबाभवानी हीं अत्यंत चिंताक्रांत झालीं असतां एक दिवस त्यांच्या ह्या अवतारी मुलानें त्यास, सहज लीलेनें हातांत घेतलेली लोखंडाची कांब सोन्याची करून दिली आणि ‘ मौंजी बांधितां आपणांसी । येतील म्हणे बोल सकळ ॥ ’ असें खुणांनीं कळविलें. मुलाचा हा संकेत त्या श्रद्धावंत आई-बापांनीं सत्य मानून मुंजीची सर्व सिद्धता केली. उत्तम मुहूर्तावर सर्व पूर्वरंगासह कार्यास प्रारंभ झाला. मोठ्या थाटानें सर्व समारंभ चालला असतां, ‘ मुक्या मुलाच्या मुंजीला एवढी थाटाची व्यवस्था कशाला हवी ? वेडा ब्राह्मण ! करतो आहे कांहींतरी झालें, ’ असें लोक म्हणूं लागले. मातृभोजनोत्तर मौंजी-बंधनपूर्वक गायत्र्युपदेश झाला व त्याप्रसंगींही मुलानें मनांतल्या मनांतच गायत्र्युच्चार केला. बापाला जरा वाईट वाटलें; परंतु पुढें लगेच भिक्षा घेऊन माता आली. तेव्हां तिनें घालूं केलेली पहिली भिक्षा बाळानें ‘ अग्निमीळे ’ हा ऋग्वेदमंत्र उच्चारून घेतली; दुसरी भिक्षा ‘ इषेत्वा ’ ह्या यजुर्वेदोक्त मंत्रानें आणि तिसरी भिक्षा ‘ अग्न आयाहि ’ हा सामवेदांतील मंत्र गाऊन घेतली. हें कौतुक पाहून अर्थात् लोकांस फार अचंबा वाटला ! ते सर्व लोक,

यातें म्हणों नये नर । होईल देवाचा अवतार ।
म्हणोनी करिती नमस्कार । जगद्गुरूसी ते समयीं ॥ ८१ ॥

२८. इतकें झाल्यावर त्या बालकानें मातेला म्हटलें, ‘ तुवां भिक्षा माग म्हणोनि उपदेश केला, तो तुझा बोल मिथ्या नव्हेच. आम्हांस त्वरित निरोप द्यावा. माझ्या चित्ताचा तीर्थें आचरावयास जावें, असा निर्धार झाला आहे. ब्रह्मचर्य आचरावयाचें म्हणजे बरोबरीं भिक्षा करावी व वेदाभ्यासांत मन लावावें.’ वरील आशयाचें मुलाचें वचन ऐकून माता अतिगहन दुःखानें दाटली, तिचे नयन उदकानें भरले, ती महाशोक करिती झाली व मूर्च्छेनें क्षणैक निर्जीव होऊन पडली आणि सावध झाल्यावर म्हणूं लागली, ‘ तूं आमचा पुत्र आमुतें रक्षिसी म्हणोनी मनीं फार आशा होती. आजवरी तूं आमच्याच प्राक्तनगुणें बोलत नव्हतास, तर आपणांस मुकेंच म्हणवीत होतास; त्यामुळें कधींही न ऐकलेला तुझा शब्द आज ऐकून संतोष झाला आणि ईश्वर पूजेनें फळला, असा आमचा विश्वास पटला नाहीं तोंच, ‘ जातों म्हणतोस ’ हें काय ? ’ अशा प्रकारें ती माउली आपल्या त्या बालकास आलिंगून त्याची परोपरींनीं कृपा भाकूं लागली असतां, बाळानें म्हणजे गुरूंनीं तिला ब्रह्मज्ञान सांगितलें, आणि म्हणाले, “ तूं आपलें अंतःकरण उगीच दुखवूं नको; कारण आम्हांस तेंच–बरोबरीं भिक्षा मागून वेदाभ्यासांत मन घालून ब्राह्मचर्य पाळणें—करणें असे. माते ! तूतें आणीक चार पुत्र होतील; निर्धारीं ते तुझी सेवा मनोभावें आणि परोपरीं करितील. पूर्वापार जन्मांतरीं तुवां श्रीशंकर आराधिला, स्मरण कर. ” असें म्हणून श्रीगुरूंनीं तिच्या मस्तकीं कर ठेवितांच तिला पूर्वजन्मींची सर्व स्मृति झाली आणि आपल्यापुढें उभा असलेला हा आपला मुलगा नसून साक्षात् श्रीपादश्रीवल्लभस्वामीच होय, असा तिचा विश्वास पटला. तेव्हां त्याच्या पायांवर डोकें ठेवण्यास ती वांकली असतां बालरूपी श्रीपादांनीं तिला उठवून सर्व गौप्य सांगितलें. ते म्हणालेः—

ऐक माते ज्ञानवंती । हा बोल करीं हो गुप्तीं ॥
संन्यासी आम्ही यती । अलिप्त असों संसारीं ॥ ९५ ॥
याच कारणें आम्ही आतां । हिंडूं समस्त तीर्थयात्रा ।
**कारण असे पुढें तत्त्वता** । म्हणोनी निरोप मागती ॥९६॥
परंतु ती माताही कमी अधिकारी होती असें नाहीं; ती म्हणाली :—

धाकुटपणीं तुम्ही तापस । कोण धर्म असे हर्ष ॥
**धर्मशास्त्र ख्याती सरस । आश्रम चारी आचरावे**॥९९॥
ब्रह्मचर्य वर्षे बारा । गृहस्थाश्रम तदनंतरा ॥
वडती पुण्यें अपरंपारा । गृहस्थाश्रमीं सुख असे ॥ १०० ॥
मुख्य आश्रम असे गृहस्थ । आचरितां होय अति समर्थ ॥
संन्यास घ्यावा मग मुख्यार्थे । धर्मशास्त्र येणें परी ॥ १ ॥
ब्रह्मचर्य मार्ग ऐका । पठण करावें वेदादिकां ॥
विवाह होतां गृहस्थें निका । पुत्रादिक लाधावे ॥ २ ॥
**यज्ञादि कर्म साधोनियां । तदनंतर संन्यासन्याया** ॥
येणें विधी आचरोनियां । **अग्राह्य संन्यास बालपणीं** ॥३॥

यावरही श्रीगुरूनीं मातेस देहाची अनित्यता आहे म्हणून पूर्ववयांतच संन्यस्त होऊन मोक्षमार्ग धरावा, असा बुद्धिवाद केल्यावर निरुपाय होऊन शेवटीं त्या माउलीनें अज्ञान स्वीकारून अशी अट घातली कीं, ‘ हे कुलदेवता पुत्रराया ! त्वां आम्हां निरोपिलें; परंतु चौघे पुत्र कुशीं होतां अगा ! आमुच्या मानसीं विश्वास येत नाहीं. तरी जोंवरी एक पुत्र तरी आम्हां होय तोंवरी समीप राहावें. मला एक पुत्र होईपर्यंत मी निरोप देणार नाहीं. याउपर माझें वचन लंघून जरी निघोनी जाशील, तरी तत्क्षणीं मी प्राण देईन, हा निश्चय. तूं आम्हांस पुत्र नव्हेस; तर तूं आमचें कुलदैवत आहेस. तेव्हां आपलें वचन सत्य कर.’ यावर श्रीगुरु म्हणाले, ‘ आमुचा बोल सत्यच जाण. हें माझें वाक्य ऐक. एकच कां ? तुला दोन पुत्र झाल्यावर तरी सं-

तोषानें निरोप द्यावा; मग मात्र मी राहणार नाहीं. आणखी एक संवत्सर मी तुझ्याजवळ राहीन. तेवढ्या अवकाशांतच माझें वचन–तुला दोन पुत्र होईपर्यंत राहण्याचें - सत्य होईल; आणि याप्रमाणें तुझी वासना पूर्ण झाल्यावर मग मात्र मज आज्ञा देऊन तूं आपलें वचन राख. याप्रमाणें बोलून श्रीगुरु अतिप्रीतीं घरीं राहिले. मग वेदाभ्यासार्थ शिष्यवर्ग जमवून त्यांनां अध्यापन चालविलें. हें पाहून, 'पहा किं हो ! सात वर्षांचा बाळ चारी वेदांचा पाठ सांगतो ' म्हणून सर्व लोक विस्मय करूं लागले. विद्वान् विद्यार्थी प्रत्यहीं त्रिकाळ पढावयास येऊं लागले. त्यांत सकलशास्त्री म्हणविणारेही शंकासमाधानार्थ येत असत. असा क्रम चालला असतां यथाकालीं श्रीगुरुमाता गरोदर होऊन नऊ महिने भरतांच अतिसुंदर पुत्रयुग्म प्रसवली. तीन महिने लोटतांच त्या दोघांही नवीन पुत्रांस ती आनंदानें खेळवीत असतां श्रीगुरु तिच्या संनिध जाऊन म्हणाले, ' जननी, तुझी मनकामना पूर्ण झाली. माझा बोल खरा झाला. दोन पुत्र तुला लाधले. ते पूर्णायुषी आहेत. आणीकही दोघे लेंक आणि त्यांच्या पाठीवर एक कन्या अशीं अपत्यें तुला होतील. त्या सर्वांसह तुम्ही सुखानें नांदाल. तुमच्या सर्व वांच्छा परिपूर्ण होतील. आतां आम्हांतें निरोप द्यावा. आम्ही जातों ते स्वभावेंच जातों. तुम्ही संतोषरूपें असावें. ' यावर ' आतां आम्ही बोलाया अशक्त आहों, परंतु या महादुर्घट संसारीं तव दर्शन जरी होय, तरीच हे आमचे कुलदेवतारूप तनया ! आम्ही वाचूं ' असें श्रीगुरूंचीं मातापितरें म्हणूं लागलीं, तेव्हां ' स्मरण करितां तुम्हांजवळ मी तात्काळ येईन; वेळोवेळीं उगाच चिंता न करावी. ' अशी श्रीगुरूंनींहि त्यांना भाक दिली; आणि ' सध्यां आपण जात आहों तरी एक वर्षानें बदरिकाश्रमीं सिद्धदर्शन

घेऊन फिरून तुम्हांस दर्शन देऊंच ' असेंही निश्चयपूर्वक सांगून मातोश्री व वडील ह्यांची आज्ञा घेऊन ते निघाले. त्यांस पोंचविण्यास त्यांच्या विरहानें दु:खीकष्टी होणारे शेंकडों ग्रामस्थ आणि त्यांचे सर्व शिष्य हे गांवाबाहेर आले. तेथें सर्वांनीं श्रीगुरुंचे अनेक गुणानुवाद गाइले व

' सात वर्षांचें बाल देखा । वेद म्हणतें अखिल शाखा ।
मनुष्यमात्र नव्हे लेखा ' । ऐसें बोलती साधुजन ॥ ६४ ॥

याप्रमाणें पवाडे गात श्रीगुरुंस नमस्कार करून व निरोप देऊन ते जड मनानें परतले. मातापितरें पुत्रामागें चाललींच होतीं. शेवटीं त्यांस श्रीगुरूंनीं निजस्वरूप – श्रीपादश्रीवल्लभश्रीनरहरिदत्तात्रय अवताराचें–दाखवून, फिरून एकवार पुनर्दर्शनाचा निश्चय सांगितला; व त्यांचें पूर्ण समाधान करून त्यांस परतविलें. नंतर बदरिकाश्रमाला जाण्याच्या संकेतानें निघालेले श्रीगुरु मार्गांत आनंदवनांत वाराणशी – काशीक्षेत्र – येथें येऊन दाखल झाले व तेथें राहून श्रीविश्वेश्वराचें दर्शन आणि नित्यपूजानुष्ठान करूं लागले. याप्रमाणें कांहीं काळ क्रमण केल्यावर अष्टांगयोगेंकरून श्रीगुरुशिरोमणि खडतर तप आचरूं लागले. वाराणशी क्षेत्रांत इतरही पुष्कळ तडीतापसी, अवधूत, यति तपोनुष्ठानांत मग्न असत. ते सर्व प्रौढ व वृद्ध वयाचे असत. त्या सर्वांना हा बालतपस्वी पाहून अत्यंत कौतुक वाटे. ते म्हणत, ' पहा, हो ! हा बालब्रह्मचारी, तप करितो नानापरी, याचे उदरीं इतकें निर्लिप्त वैराग्य ठसावलें तरी कसें असेल ! यास शरीरस्वार्थ असा कांहींच कसा नाहीं ? हा बालयोगी पूर्ण संन्यस्त दिसतो. हा मणिकर्णिकेंत त्रिकाल स्नान करितो ! ' याप्रमाणें जे ते अगदीं चकित होऊन चर्चा करीत. ह्या समुदायांतच एक कृष्ण सरस्वति नांवाचे वृद्ध यति होते. ते पूर्ण ब्रह्मनिष्ठ व ज्ञानी अस-

त्यानें त्यांनीं ह्या बालतपस्व्यास पाहतांच सत्य प्रकार ओळखिला; आणि मनांत पूर्ण स्नेहभाव उत्पन्न होऊन ते सकल यतीश्वरांस म्हणाले, ' हा बालतपस्वी आपण सामान्य ब्रह्मचारी समजूं नका; तर हा अतितापसी अवतारी पुरुष दिसतो. हा विश्ववंद्य आहे. हा साक्षात् श्रीगुरुसमर्थच लोकानुग्रहानिमित्त बाल होय. याच्या दर्शनमात्रें पतित पुनीत होतील. यास्तव या बालकास आपण सर्व मिळून यथाविधि संन्यासाश्रम स्वीकारण्या-विषयीं विनंति करूं. ' हें श्रीकृष्णसरस्वतींचें म्हणणें सर्वांस पटून ते सर्व ह्या बालतपस्व्यापुढें आले; आणि

' लोकानुग्रहाकारणें । तुम्ही आतां संन्यास घेणें ।
आम्हालागीं उद्धरणें । पूजा घ्यावी आम्हाकरीं ॥ ९१ ॥
कलियुगीं संन्यासी म्हणून । निंदा करिती सकल जन ।
स्थापना करणार कवण। भूमिवरी न दिसताती ॥९२॥
पूर्वी ऐसें वर्तमानीं । निषिद्ध केलें सकल जनीं ।
शंकराचार्य अवतरोनी । स्थापना केली परियेसा ॥ ९६ ॥
त्यावरी इतुके दिवस । चालत आला मार्ग संन्यास ।
कलि प्रबल होतां नाश । पुनरपि निंदा करिताती ' ॥९७॥

या प्रकारें त्यांची प्रार्थना करूं लागले. त्या सर्वांची ती प्रार्थना ऐकतांच श्रीगुरुंनीं विधिपूर्वक श्रीकृष्णसरस्वतींकडूनच संन्यासदीक्षेचा स्वीकार केला. हे श्रीकृष्णसरस्वति अत्यंत वृद्ध होते. ह्यांची गुरुपरंपरा श्रीमज्जद्गुरु शंकराचार्यांपासून अबाधित चालत आलेली होती. श्रीमच्छंकराचार्यांचे विश्वरूपाचार्य, त्यांचे ज्ञानबोधगिरि, त्यांचे सिद्धगिरि, त्यांचे ईश्वरतीर्थ, पुढें नृसिंह-तीर्थ, नंतर विद्यातीर्थ; ह्या विद्यातीर्थांचे शिवतीर्थ, भारतीतीर्थ; ह्यांचे श्रीविद्यारण्यमुनि, त्यांचे विद्यातीर्थ, त्यांचे मलयानंद; मलयानंदांचे देवतीर्थ सरस्वतीवृद्ध, त्यांचे सरस्वतीयादवेंद्र आणि

ह्या यादवेंद्रांचे शिष्य वरील श्रीकृष्णसरस्वति. यांनीं श्रीगुरुंस संन्यासदीक्षा देऊन त्यांचें आश्रमनाम नृसिंहसरस्वति असें ठेविलें. असो; वरील गुरुपरंपरेवरुनही श्रीमन्नृसिंहसरस्वतींचा काल शालिवाहनाच्या चौदाव्या शतकांतच पडतो, हें सहज दिसेल; कारण श्रीविद्यारण्यमुनि हे शालिवाहनाच्या तेराव्या शतकांत संन्यस्त होऊन त्यांची शिष्यपरंपराही चालू झाली होती. संन्याशाची शिष्यपरंपरा सामान्यतः संन्यासाश्रम वृद्ध-पणीं स्वीकारण्याचा असल्यानें, दहादहा वर्षांची आणि अधि-कांत अधिक म्हणजे पंधरा वर्षांची होईल. संन्याशाच्या पिढींत लक्षांत ठेवण्यासारखी अशी एक गोष्ट आहे कीं, अल्पवयस्क परंतु संन्यस्त असा इसम अत्यंत वृद्ध अशा गृहस्थाश्रम्याचा किंवा वानप्रस्थाश्रम्याचा गुरु होऊं शकतो. आणि अशा प्रसंगीं शिष्य अथवा नातशिष्यही समाधिस्थ झाले, तरी गुरुजी कैवल्यसुख अनुभवीत जगांतच वास्तव्य करीत असलेले आढळून येतात. वरील सर्व गोष्टी लक्षांत घेतल्यावर, आपणांस ऐतिहासिक कालगणनेंत नक्की ठाऊक असलेले विजयानगरसाम्राज्य-प्रस्थापक हरिहर बुक्कांचे मार्गदर्शक जे श्रीमन्माधवाचार्य किंवा विद्यारण्यस्वामी, त्यांच्यापासून श्रीगुरु श्रीनृसिंहसरस्वति हे शिष्यपरंपरेनें सहावे येतात. त्याचप्रमाणें इकडे तितक्याच अवकाशांत ब्राह्मणी बादशाही तख्तावरही सहांपेक्षां अधिक इसम आले आहेत. एवढ्या कालांत विजयानगरस्थ सिंहासनावरही तितकेच म्हणजे सहासात पुरुष अधिष्ठित झालेले दिसतात. एता-वता, शालिवाहनाच्या चौदाव्या शतकाच्या पूर्वार्धांत जें आम्हीं श्रीमन्नृसिंहसरस्वतींस गणिलें आहे, तें यथार्थ आहे. निदान गणितशुद्ध आहे, इतकें तरी खरें. असो. श्रीनृसिंहसरस्वतींनीं वाराणशीस यथाविधि चतुर्थाश्रम स्वीकारुन फार दिवस झाले

नाहींत तोंच, एक माधवनामा द्विजवर त्यांस मुमुक्षु म्हणून भेटला असतां त्यांनीं त्यास ब्रह्मज्ञानोपदेश करून संन्यासदीक्षा दिली व त्याचें नांव माधवसरस्वति ठेविलें. पुढें ते संकेताप्रमाणें प्रवास करून वाटेंत अनेकांस संन्यासदीक्षा देऊन शिष्यशाखा वाढ-वीत व धर्मोद्धार करीत फिरून दक्षिणापथ लंघून आपल्या पूर्वाश्रमींच्या करंजगांवास प्रतिज्ञेप्रमाणें मातापितरांस दर्शन देण्यास आले. तेथें चतुर्वर्गभ्राताभगिनींसह मातापित्यांची प्रेमभेटी झाली. सर्व नागरिक दर्शनास आले. समस्तांस अत्यंत हर्ष झाला. मग कांहीं दिवस पितृगृहीं राहून फिरून उत्तरपंथें गोदातीरीं श्रीगुरूंनीं प्रयाण केलें. या सुमारास श्रीगुरु नृसिंह-सरस्वति यांचें वय दहाअकरा वर्षांचें असावें. प्रयाणसमयीं रत्नाई नामक अविवाहित कन्येनें म्हणजे स्वामींच्या पूर्वाश्रमींच्या बहिणीनें ‘ स्वामी ! मातें तारीं. मी संसारमायेनें वेष्टिलेली अशी भवसागरीं बुडत आहें, तेव्हां मला निर्लेप—ह्या संसारमायेच्या लेपाविरहित—करा म्हणजे मग मी तपश्चर्येस जाईन,’ अशी विनंति केली असतां श्रीगुरूंनीं तिजला निरोपिलें कीं,‘ पतिसेवा करावी; तेणेंच बरवी मोक्षपदवी पावेल. त्यांत अन्यवृत्ति न धरावी; अगे ! स्त्रियांस भवपैलपार उतरावयास भ्रतारच नौका असे, असा मनीं निर्धार ठेवून त्यांनीं आपला दैवप्राप्त पुरुष शिवसम भजावा. तुझी तपाची वासना आहे; परंतु संचित भोगलेंच पाहिजे. तूं यथाविधि पितृशोधित पति वर आणि त्याची संगति असेपर्यंत एकनिष्ठपणें त्याची सेवा कर. शेवटीं तुझा गाणगापुरास उद्धार होईल. ’ असो. पुढें श्रीगुरु त्र्यंबकेश्वर, नाशिक, इत्यादि क्षेत्रीं वास व प्रवास करीत राहिले असतां अनेकांस दुःखांतून व व्याधींतून मुक्त करीत असत. एकदां सायंदेव नामक एका ब्राह्मणास पोटशूळ आणि अन्नद्वेष हा रोग जडला असतां त्यास आपल्या पंक्तीस भोजन

घालून श्रीमन्नृसिंहसरस्वतींनीं त्याचा रोग बरा केला. हा सायंदेव बेदरच्या ब्राह्मणी बादशहाचा पोटार्थी सेवक होता; परंतु आपला असला दुस्तर रोग ज्यांच्या कृपेनें गेला त्या सद्गुरूस सोडून दुष्ट यवनसेवा कां करावी, असें वाटून तो सद्गुरूंस म्हणाला, ' मला चाकरीवर रुजू होण्याविषयीं राजाचें बोलावणें आलें आहे खरें, तथापि तो यवन महा क्रूर आहे. प्रतिवर्षी अमुक संख्या ब्राह्मण वधीन म्हणून जणूं त्याचें उदकन सुटलेलें असतें. तो आतां जो मला बोलावतो आहे तेंही याच कारणानें नसेल असें कशावरून ? त्याच्याजवळ जातांच तो निश्चयें माझा प्राण घेईल. तेव्हां आतां इतकीच विनंति आहे कीं,

' माझे वंशपरंपरीं । भक्ति ध्यावी निर्धारीं ।
इहसौख्य पुत्रपौत्रीं । अंतीं द्यावी सद्गति ॥ १ ॥

हे साक्षात् ईश्वरस्वरूप सद्गुरो ! आपलें दर्शन आणि अनुग्रह ज्या अर्थी मजवर झाला आहे, त्या अर्थी मला आतां मरणाचें भय काय उरलें आहे ? ' यावर श्रीगुरूंनीं त्याच्या मस्तकीं अभयहस्त ठेविला आणि ते म्हणाले—

' त्वां भय सांडूनी जावें । त्या क्रूर यवनातें भेटावें ।
तो तुजवर संतोषून प्रियभावें । पुनरपि आम्हांकडे पाठवील ॥

तूं जोंवर परत येतोस तोंवर आम्ही येथेंच असूं. तूं सुरक्षित आल्यावर मग संतोषानें आम्ही येथून पुढें जाऊं. ' इतकें अभय मिळाल्यावर सायंदेव ब्राह्मण जेथें तो यवनबादशहा अल्लाउद्दीन होता, तेथें गेला. त्यास पाहतांच बादशहानें त्याच्याकडे अत्यंत क्रोधदृष्टि फेंकली व तो पाठ फिरवून अंतर्गृहांत चालता झाला. सायंदेव विप्र आपलीं शंभर वर्षे भरलीं असें समजून भयभीत होऊन, मनांत श्रीमन्नृसिंहसरस्वतींचें ध्यान करीत उभा राहिला. ब्राह्मण बाहेर हुकमाची मार्गप्रतीक्षा करीत तिष्ठत

उभा आहे, ह्याचें कांहींच भान न राहून बादशहा रागाच्या आवेशांतच झोंपीं गेला. झोंपेंत त्याला असा भास झाला कीं, आपल्या सर्वांगाचा भडका होत आहे, प्राणांतिक व्यथेनें आपण अत्यंत कष्टत आहों. तसाच तो अर्धामुर्धा जागा झाला तरी कांहीं स्मरण कांहीं विस्मरण होऊन कोणी एक ब्राह्मण शस्त्र घेऊन आपणास वार करीत आहे व आपला एक एक अवयव छेदीत आहे, असा त्याला भ्रम झाला. उघडच आहे. निरपराध्यांस छळणारे, केवळ गमतीसाठीं आणि सत्ताधारी ह्या मदानें वाटेल त्याचो वाटेल तेव्हां मान कापविणारे किंवा प्रसंग-वशात् स्वतःही कापणारे, अशांना वरीलसारखे निद्राभ्रम व्हावेत, यांत कांहीं नवल नाहीं. कारण श्रद्धाबलानें उल्हसित आणि आपल्या निर्मल वर्तनाची खात्री असल्यामुळें एक प्रकारें अत्यंत निर्भय, म्हणून किंचित् उद्दाम मुद्रा धारण करणारा एखादा मनुष्य, जर वरीलसारख्या पापाचरणरत नराधमापुढें येऊन उभा राहिला, तर त्या नराधमाची आंतल्याआंत गाळण उडून आपण केलेल्या दुष्ट कर्मांची आपल्याच मापानें आणि पद्धतीनें आपण प्रायश्चित्तरूप शिक्षा भोगीत आहों, असें त्यास वाटावें हा ईश्वरप्रणीत सृष्टिनियमच आहे. हा सृष्टिनियम ओळखून ईश्वरावर भरंवसा ठेवून वागण्याचें आणि परिवारास वाग-विण्याचें महासामर्थ्य फारच थोड्यांच्या ठायीं असतें; म्हणूनच तें ज्या कोण्या सभाग्याच्या अंगीं वास करतें तोच पुरुष समा-जाचा गुरु–मार्गदर्शक–होय. तो ज्याला मिळाला त्याचें प्रत्यक्ष काळही कांहीं वांकडें करूं शकत नाहीं, मग तेथें मनुष्याचा काय पाड ! अन्याय आणि घोर पापकर्में यांनीं ज्यांचीं अंतःकरणें किडून अगदीं निर्जीव झालीं आहेत, असे लोक बाह्यतः केवढे-ही महान् सत्ताधारी असले, तरी त्यांना सद्गुरूच्या सच्छिष्यांपुढें

मान वाकवावी लागते. असाच प्रकार येथेंही झाला. बादशहास जो निद्राभ्रम झाला, त्याचें कारण तो शोधूं लागतांच, त्यास आपण बाहेर तिष्ठत ठेवलेल्या ब्राह्मणाचे अपराधी आहोंत, असें वाटून लगेच तो त्या ब्राह्मणाजवळ धांवत येऊन त्याच्या पायांवर लोळण घालून म्हणाला, ' मी तुझा स्वामी नव्हे; तूंच माझा स्वामी आहेस. तूं खुशाल परतून आपल्या ठिकाणीं जावें.' असें म्हणून संभावनेदाखल वस्त्रेंभूषणें अर्पण करून ' महाराज, ह्या अल्प परंतु निरपेक्ष देणगीचा स्वीकार करून आपणांस विनाकारण हेलपाटा दिल्याबद्दल क्षमा करा, ' अशी बादशहानें सायंदेवाची उलट करुणा भाकली. सायंदेव श्रीगुरुसंनिध परत आला आणि झालेला प्रकार निवेदन करून म्हणाला, 'दीनदयाळ सद्गुरो, आतां आपले चरण सोडून राहण्यास लावूं नका. आपणां-बरोबरच मीही तीर्थयात्रादिकांस येणार.' यावर श्रीगुरुंनीं आपण गृहस्थाश्रमीच आहां तसें सुखें वर्तावें. उदरपूर्तिस्तव यवन-सेवाही निर्भय करावी. आपणांस कांहीं एक उणें पडणार नाहीं. आम्ही आणखी पंधरा वर्षांनीं आपणांस भेटूं. ' असें सांगून त्याची समजूत केली; आणि जेथें आरोग्यभवानी नांदते, अशा प्रख्यात वैजनाथक्षेत्रीं त्यांनीं प्रयाण केलें. वैजनाथीं श्रीगुरु विशेष प्रसिद्धपणें राहत नसत; कारण नाना यातींचे अनधिकारी लोकही येऊन वर मागतील, त्यांस सरसकट दर्शन आणि वर देणें योग्य नव्हे, म्हणून पात्रानुसार उपदेश आणि वर यांचें दान घडावें, अशा हेतूनें ते गुप्तच राहत असत. येथें असतांना त्यांनीं आपले सर्व शिष्य जमा केले व त्या सर्वांस क्षेत्रमहिमा सांगून तीर्थयात्रेस पाठवून दिलें. त्यांनीं श्रीगुरुपादतीर्थ सोडून इतर तीर्थें कोठें उगीच धुंडीत जावें म्हणून बराच अनमान केला; परंतु ' संन्यासाश्रम घेतल्यावर एके

जागीं पांचवा दिवस उजाडतां कामा नये, अशी आश्रममर्यादा आहे, तेव्हां ती उल्लंघून दीक्षेस उणेपणा आणणें योग्य नव्हे, सर्व तीर्थयात्रा करून मनाचा मळ व चंचलपणा नाहींसा करावा आणि एका परब्रह्मवस्तूचे ठिकाणीं मन स्थिर झाल्यावर मग एकस्थानीं वास करण्यास यावें, आम्ही तुम्हां सर्वांस बहुधान्य संवत्सरीं श्रीशैल्यास दर्शन देऊं, त्यावेळीं सर्वांनीं तेथें यावें.' याप्रमाणें श्रीगुरूंनीं निक्षून सांगतांच सर्व संन्यासी शिष्य तीर्थयात्रेनिमित्त मार्गस्थ झाले. श्रीगुरूंचे शिष्य पुष्कळच होते. त्यांत बालसरस्वति, कृष्णसरस्वति, उपेंद्र, माधवसरस्वति, सदानंद, ज्ञानज्योति आणि सिद्ध हे सात प्रमुख होत. यांपैकीं सिद्धमुनि मात्र गुर्वाज्ञेनुसार गुरुसंनिध सेवेस असत. ह्याच सिद्ध सरस्वतींनीं आपल्या नामकरणी शिष्यास 'श्रीगुरुचरित्र' कथा सांगितली. तिचाच परंपरया अनुवाद करून सायंदेवाच्या नातवाच्या नातवानें म्हणजे सरस्वतिगंगाधराने महाराष्ट्र भाषेंत श्रीगुरुचरित्र ग्रंथ केला. असो. शिष्यमंडळ विखरून श्रीगुरु निरुपाधिक झाल्यावर ते कार्याकारण दीनोद्धारार्थ प्रगट होत असत. श्रीगुरूंनीं वैजनाथक्षेत्रीं एक वर्ष राहून एका ब्राह्मणास ब्रह्मज्ञानोपदेश करून संशयमुक्त केलें; आणि फिरून श्रीकृष्णापश्चिमतटाकीं भिल्लवडी (भिल्लांची वाडी) गांवीं भुवनेश्वरी देवीसंनिध औदुंबरवृक्षाच्या ढोलींत ते येऊन राहिले. तेथें चातुर्मास्य निर्विघ्न तपश्चर्या चालली. भिक्षावृत्ति असेच; कारण भक्तजनसंग्रह आणि दीनोद्धार. ह्या भिल्लवडीस असतांना श्रीगुरूंनीं एका सदाचारसंपन्न सकलवेदवेदांगपारंगत अशा ब्राह्मणाच्या मतिहीन म्हणजे निरक्षर पुत्रास, त्यानें वैतागानें श्रीगुरूस जिव्हा छेदून अर्पण केली असतां प्रसन्न होऊन, विद्या व ज्ञान देऊन सकल समाजांत त्याला त्याच्या बापापेक्षांही अधिक मान्यतेस चढविलें.

तेव्हां तेथें फिरून लोकांची उपाधि वाढूं लागली; म्हणून गुप्त होऊन वारणासंगमावरून तीर्थें करीत करीत श्रीगुरु पंचगंगासंगमीं येऊन राहिले. येथें मात्र त्यांनीं सारखीं बारा वर्षें काढलीं. या स्थानास सध्यां नरसोबाची वाडी असें म्हणतात. येथेंही पूर्वक्रमानुसार वर्तन करून त्यांनीं पुढें भीमातीरीं गाणगापुरास प्रयाण केलें. गाणगापुरीं ब्रह्मराक्षसास गति दिली, त्यामुळें एका लहानशा संस्थानिकाची श्रीगुरूंवर भक्ति बसून तो त्यांस मोठ्या आवडीनें अनेक भोगोपचार करूं लागला व त्यांना भक्तप्रीत्यर्थ ते स्वीकारावे लागले. या योगानें असमंजस व कुटाळ लोकांत त्यांजविषयीं वैषम्य उत्पन्न होऊन, तेथेंच राहत असलेल्या त्रिविक्रमभारती नामक एका त्रिवेदी ब्राह्मण योग्यास-ही लोकवार्तेनें श्रीगुरूंचें वर्तन दांभिक वाटून त्यानें यांची निंदा केली. तेव्हां त्याच्या दर्शनास जाऊन श्रीमन्नृसिंहसरस्वतींनीं त्याला विश्वरूप दाखवून त्याचा गर्व खंडन केला आणि अधिकारी जाणून त्याला ब्रह्मज्ञानोपदेश करून निरहंकार पूर्ण शांतिब्रह्म करून सोडिलें. असो.

२९. सर्व भरतखंडाप्रमाणें महाराष्ट्रांतही या वेळीं यावनी सत्ता माजली असल्यामुळें महाराष्ट्रसमाजाची सर्व तऱ्हेनें शोचनीय स्थिति झाली होती. सनातन धर्मबंधनें सर्व बाजूंनीं शिथिल होऊन समाजास कोणी शास्ताच उरला नव्हता. ब्राह्मणांचा आचार नीट चालण्यास सश्रद्ध धर्माभिमानी गोब्राह्मणप्रतिपालकच जर कोणी नाहीं, तर यज्ञयाग, दानप्रतिग्रह कोठून चालणार? आणि दानच जर नाहीं, तर प्रतिग्रहैकजीवी ब्राह्मणांचा योगक्षेम तरी सरळ रीतीनें कसा होणार? अर्थात् हीनसेवा, यावनी भाषेचा अभ्यास, अग्राह्यप्रतिग्रह इत्यादि नानाप्रकारचे अनाचार वर्णगुरु म्हटले जाणाऱ्या ब्राह्मणांकडून घडूं लागले होते. अना-

चारास प्रवृत्त न होतां स्वतःच्या वर्णाश्रमधर्ममर्यादेनें रहावें, तर प्रसंगीं प्रायोपवेशनानें मरणही पत्करण्याची पाळी ! प्रायोपवेशन म्हणजे कांहीं एक खाणेंपिणें न करितां ईशनाम करत एकासनावर बसणें व अन्नमय असणाऱ्या प्राणांस अन्न न मिळाल्यानें ते सहजांच, क्लेश असह्य होऊन, शरीर सोडून चालते होतील तेव्हां त्यांस तसें करूं देणें; हें एक पतकरावें अथवा वाटेल त्या धर्मबाह्य पद्धतीनें द्रव्यादिकाची जोड करून उदरंभरण करावें. ह्या दोन मार्गांवांचून ब्राह्मणादिकांस योगक्षेम चालविण्यास निर्भय असा तिसरा कोणताच मार्ग उरला नव्हता. अशा स्थितींत गरीब वैदिक, शास्त्री, भटभिक्षुक ह्यांस केवळ छलबुद्धीनें पण वरकरणीं आदर करून श्रवणास सिद्ध झालेल्या चातुर्वर्ण्यबाह्य यवनांसही वेद ऐकविणें व शिकविणें, शास्त्रें पढविणें आणि आपले श्रौतप्रयोग चालवून दाखविणें किंवा असेच कांहीं अप्रशस्त व निंद्य प्रकार करून वीतभर पोटाची खळी भरण्याकरितां धनधान्य आणि वस्त्रपात्र यांच्या रूपानें संभावना उपटावी लागत असे; किंवा असें म्हणणें अधिक सयुक्तिक होईल कीं, केवळ द्रव्याच्या लोभानें आणि अनाचाराबद्दल शिक्षा करण्यास स्वधर्मी सत्ताधारी समर्थ नसल्यानें तसें करावयास कित्येकांस फावत असे. कसेंही म्हटलें तरी समाजाचा धार्मिक बंध सुटत चालला होता आणि जिकडेतिकडे अश्रद्धाळूपणा आणि अनाचार माजला होता एवढें खरें. ह्यामुळें गुरुचरित्रांतील पुढील अवतरणांत दिसून येणारा प्रकार कसा घडून आला हें सहज समजेल.

पुढें अपूर्व वर्तलें ऐका । ऐक शिष्या नामधारका ।
विदुरानामें नगरीं एका । होता राजा यवन तेथें ॥ ६ ॥
महा क्रूर ब्राह्मणद्वेषी । सदा करी सर्व जीवहिंसी ।
चर्चा करवी ब्राह्मणांसी । वेद म्हणवी आपणांपुढें ॥ ७ ॥

विप्रांसी म्हणे यवन । जे कां असती विद्वज्जन ।
आपल्या सभेंत येऊन । वेदशास्त्र म्हणवावें ॥ ८ ॥
त्यांतें द्रव्य येईन बहुत । सर्वांमध्यें मान्यवंत ।
जो कां सांगेल वेदअर्थ । विशेष त्याची पूजा करूं ॥ ९ ॥
ऐसें ऐकून ज्ञानीजन । ' नेणों ' म्हणती ' मतिहीन ' ।
जे कां असती मूर्खजन । कांक्षा धरिती द्रव्याची ॥ १० ॥
जाऊनि तया म्लेंच्छापुढें । वेदशास्त्र वाचिती गाढें ।
**म्लेंच्छमना असे कुडें । एकें अर्थ यज्ञकांडाचा ॥ ११ ॥**
म्हणे विप्र यज्ञ करिती । पशुहत्या करणें रीती ।
आम्हां म्लेंच्छांतें निंदिती । पशु वधिती म्हणोनियां ॥ १२ ॥
( हाच प्रकार सध्यां थिऑसाफी उर्फ देवस्की हिच्या द्वारें कसा घडत आहे, तें सुशिक्षितांनीं आणि विशेषतः ब्राह्मण सुशिक्षितांनीं विचार करण्यासारखें आहे. इतिहासाची पुनरावृत्ति ती हीच होय. )
येणेंपरी ब्राह्मणासीं । निंदा करी तो बहुवसीं ।
योग्यता पाहून द्विजवरांसीं । अपार द्रव्य देतसे ॥ १३ ॥
येणेंपरी तो यवन । देतो द्रव्य म्हणोन ।
ऐकतें झाले सकल जन । देशोदेशीं विप्रवर्ग ॥ १४ ॥
वेदशास्त्रीं अति निपुण । द्रव्यावरी ठेवूनि मन ।
भेटीस जाती ब्राह्मण । वेद म्हणतो त्यापुढें ॥ १५ ॥
**ऐसे मंदमती जे विप्र । त्यांची जोडी यमपुर**
**मदोन्मत्त दुराचार । तेचि इष्ट कलीचे ॥ १६ ॥**

या प्रकारचें वर्तमान असतां मंदभाग्य दोन विप्र बादशहाकडे येऊन म्हणाले, ' आपण वेदशास्त्रज्ञ आहों. तीन वेदांचें अध्ययन संपूर्ण झालें आहे. चारी राष्ट्रांत आम्हांसवें वाद करण्यास कोणी समर्थ नाहीं; महाराज ! तुमच्या नगरांत जर कोणी असतील, तर बोलवा. त्यांनीं आम्हांसवें चारी वेदांची चर्चा

करावी ! यावर बादशहा अभिमानास पेटून आपल्या पदरच्या ब्राह्मणादि कामगारांस आज्ञा करता झाला कीं, आपल्या नगरांत जे कोणी वैदिक, शास्त्री, पंडित असतील त्यांना पाचारुन आणा. त्याप्रमाणें सर्व ब्राह्मण पंडित केवळ राजाज्ञा म्हणून आल्यावर बादशहा त्यांस म्हणाला, ' या दोघांशीं तुम्हीं वाद करावा. जे जिंकतील त्यांस वाटेल तितकें द्रव्य मिळेल. ' यावर त्या अनुभविक ज्ञानी ब्राह्मण वैदिक शास्त्र्यांनीं सांगितलें कीं, 'आम्हांमध्यें तितकी योग्यता आणि ज्ञान नाहीं. आम्हीं यांच्याशीं वाद कसा करूं शकूं ? आम्हांपेक्षां हेच श्रेष्ठ आहेत, महावरिष्ठ आहेत; यांसच अग्रपूजेचा मान द्यावा.' हें सर्व ऐकून त्या म्लेंच्छ-पतीनें त्या दोघां ब्राह्मणांस वस्त्रें, भूषणें आणि विपुल द्रव्य दिलें व हत्तीवर बसवून आपल्या राजधानींत त्यांना मिरविण्यास सांगितलें. कारण तो म्हणाला कीं, ' मी जसा यवनांचा राजा तसेच हेही ह्या सर्व ब्राह्मणांचे राजे होत ! ' म्लेंच्छापुढें आपलें पवित्र वेद-शास्त्र म्हणणारांचा हा असा अलौकिक सन्मान झाल्यानें ते ब्राह्मण फारच चढले आणि बादशहास विनंति करिते झाले कीं, ' वेद-शास्त्रार्थांत वाद करण्याची मनांत फार उमेद होती; परंतु कोणीच वादास प्रवृत्त झाला नाहीं; यामुळें शिकून व्यर्थ श्रमलों मात्र, असें वाटतें. तरी आतां तुमच्या राष्ट्रांत फिरून कोणी वादी भेटल्यास त्याच्याशीं वाद करून त्याला जिंकावें अथवा समस्त ब्रह्मवृंदापासून अजिंक्यपत्र घ्यावें, अशी आम्हांस आज्ञा असावी. ' ब्राह्मणांचें हें म्हणणें ऐकून बादशहानें त्यांस तसें आज्ञापत्र दिलें. तें घेऊन हे दोघे तामसी ब्राह्मण गांवोगांव हिंडून विजयपत्रें मिळवीत मिळवीत भीमातीरीं कुमसी गांवीं येऊन दाखल झाले. तेथें पूर्वी सांगितलेले श्रीमन्नृसिंहसरस्वतींचे त्रिवेदी, षट्शास्त्री आणि ब्रह्मविचारैक-मग्न असे त्रिविक्रमभारती नांवाचे शिष्य वास करीत असत.

त्यांच्याशीं आपण वाद करावयास जावें असें तेथील लोकांनीं त्या विजयेच्छु ब्राह्मणांस सांगितलें. त्याप्रमाणें ते तेथें गेले आणि ‘ त्रिवेदी ऐसें म्हणविसी, त्यापक्षीं चर्चा करावी आम्हांसी, अथवा द्यावें हारिपत्र,’ असें त्या त्रिविक्रमभारती मुनींस दरडावून म्हणाले. तेव्हां त्रिविक्रममुनि म्हणाले, आम्हांला एकही वेद येत नाहीं. जर आम्हांस वेदशास्त्राचें ज्ञान असतें, तर मग तुम्हां-सारखे आम्हीहि नाना प्रकारचे भोग भोगण्यास समर्थ झालों असतों व राजे सुद्धां आमच्या पायां पडते; परंतु तीं वेदशास्त्रें आम्हांला येत नाहींत म्हणून तर आम्ही अरण्यांत राहतों. संन्यास त्याचपायीं घेतला. भिक्षेची झोळी अज्ञानमूढ म्हणूनच फिरवितों. तेव्हां हारजीत ह्या दोहोंचेंही आम्हांला प्रयोजन नाहीं. आम्हांस जर हारजितीचा अभिमान बाळगण्यासारखें कांहीं येतच नाहीं, तर मग हारजितीचा प्रश्न कशाला ? आपण उत्कृष्ट विद्वज्जन, आम्ही निरक्षर व मूर्ख, तेव्हां आम्ही आपणांशीं वाद तो काय करणार ? ’ हें भाषण उडवाउडवीचें असावें असें वाटून, ते दोघे ब्राह्मण रागावून म्हणाले, ‘ चारी राष्ट्रें फिरलों पण आम्हांबरोबर कोणीच वादास टिकत नाहीं. जेथें तेथें हीं पहा, आम्ही जयपत्रें मिळवीत आलों आहों. तेव्हां तुम्हीही वरील-सारखी लपंडावी न करितां मुकाट्यानें अजिंक्यपत्र लिहून द्या अथवा अभिमान असल्यास वादास सिद्ध व्हा ! याप्रमाणें तें द्विजद्वय हट्टास पेटलेलें पाहून त्रिविक्रममहामुनींनीं मनांत विचार केला कीं, हे ब्राह्मण म्लेंच्छास वेदविक्रय करून त्यापासून मिळालेल्या सन्मानानें मदांध झाले आहेत व यांनीं आज-पर्यंत अनेक स्वधर्मी ब्राह्मणांचा धिक्कार केला आहे; तेव्हां ह्या स्वजनधर्मद्रोही उन्मत्तांस चांगलेंच अंजन दिलें पाहिजे. असा विचार करून ते त्यांस म्हणाले, ‘ ठीक आहे, आपण

मजबरोबर गाणगापुरास चलावें. तेथें आमचे गुरुजी आहेत; त्यांच्या समक्षच तुम्हांस जयपत्र देऊं किंवा तुमच्या मनांतील विद्येचा गर्वभार तरी उतरूं.' त्या ब्राह्मणाधमांस ती गोष्ट पटली. गाणगापुरास येतांच त्रिविक्रममुनींनीं नृसिंहसरस्वतींपुढें सर्व पाढा वाचून पुढीलप्रमाणें विनंति केली :—

मदोन्मत्त विप्र दोन्ही । आले असती चर्चेसी ॥ ६१ ॥
वेदशास्त्रादि मीमांसे । म्हणती चर्चा करूं हर्षे ॥
वेद चारी जिव्हाग्रीं वसे । म्हणती मूढ विप्र दोन्ही ॥ ६२ ॥
जरी न करूं चर्चेसी । पत्र मागती हारीसीं ॥
अनेका परीं तयांसी । सांगतां न ऐकती उन्मत्त ॥ ६३ ॥
म्हणोनि आलों तुम्हांजवळी । तुम्ही श्रीगुरु चंद्रमौळी ॥
तुझें वाक्य असे बळी । तेणें परी निरोपावें ॥ ६४ ॥

यावर श्रीगुरुंनींही त्या ब्राह्मणांस संबोधून म्हटलें, 'तुम्हां वादें काय लाभ ? आम्ही संन्यासी, हे आम्हांला हारी काय होय आणि आम्हांला हारविल्यास तुम्हांला तरी थोरी काय ? तुम्हांला एवढा गर्व हवा कशाला ? गर्वानें सर्वांचा नाशच होतो. देवदानवादिकांस सुद्धां ह्या गर्वाच्या पायीं मृत्यू आलेले आहेत. बळी, बाणासुर, रावण ह्यांची काय दशा झाली ? हिताची गोष्ट जर विचाराल, तर गर्वभ्रांति सोडा. आपण चतुर्वेदी म्हणवितां त्यासारखा आपले ठायीं काय वेदांत ठसला आहे, सांगा पाहूं ?' असें म्हणून श्रीगुरुंनीं वेदव्यासापासून वेद, वेदांगें आणि वेदांतादि शास्त्रें यांचा सर्व इतिहास त्या ब्राह्मणांपुढें मांडिला. वेदांच्या अनंत शाखा सांगितल्या आणि शेवटीं ते म्हणाले :–

या भरतखंडांत । पूर्वी होतें पुण्य बहुत ॥
वर्णाश्रमधर्म आचरित । होते लोक परियेसा ॥ २१ ॥

या कलियुगाभीतरीं । कर्म सांडिलें द्विजवरीं ॥
लोपले वेद निर्धारीं । गुप्त झाले क्षितीसी ॥ २२ ॥
कर्मभ्रष्ट झाले द्विज । म्लेंच्छा सांगती वेदबीज ॥
**सत्त्व गेलें सहज** । मंदमती झाले जाणा ॥ २३ ॥
पूर्वी होतें महत्त्व । ब्राह्मणांसी वेदत्व ॥
वेदबळें नित्यत्व । भूसुर म्हणती त्या काजा ॥ २४ ॥
पूर्व राजे याच कारणीं । पूजा करिती विप्रचरणीं ॥
**सर्व देतां दक्षिणादानीं । ते अंगीकार न करिति** ॥२५॥
वेदबळें विप्रांसी । त्रिमूर्ती वश होते त्यांसी ॥
इंद्रादि सुरवरांसी । भय होतें विप्रांचें ॥ २६ ॥
कामधेनु कल्पतरु । विप्रवाक्यें होत थोरु ॥
पर्वत करित तृणाकारु । तृणा पर्वतपदत्वें ॥ २७ ॥
विष्णू आपण परियेसी । पूजा करी विप्रांसी ॥
आपुलें दैवत म्हणे त्यांसी । वेदसत्त्वें करूनिया ॥ २८ ॥
कारण—
'दैवाधीनं जगत् सर्वं मन्त्राधीनं च दैवतम् ।
ते मन्त्रा ब्राह्मणाधीना ब्राह्मणा मम दैवतम् ॥' १ ॥
ऐसें महत्त्व द्विजांसी । पूर्वी होतें परियेसीं ॥
वेदमार्ग त्यजून सुरसीं । अज्ञानमार्गे रहाटती ॥ २९ ॥
हीन यातीपुढें ऐका । वेद म्हणती मूर्ख देखा ॥
**त्यांच्या पाहूं नये मुखा** । ब्रह्मराक्षस होताती ॥ ३० ॥
**तेणें सत्त्व भंगिलें । हीन यातीतें सेविलें ॥**
**अद्यापि विक्रय करिती मोलें । वेद भ्रष्ट करिताती**॥३१॥
ऐशामध्यें काय लाभ । वेऊं नये द्विजक्षोभ ॥
कोणीं केला तूतें बोध । जाईं म्हणती येथूनी ॥ ३२ ॥
आपली आपण स्तुती करिसी । जयपत्रें दाखविसी ॥
त्रिविक्रम यतीपासी । पत्र मागसी लिहूनी ॥ ३३ ॥

आमुचे बोल ऐकूनी । जावें तुम्हीं परतोनी ॥
वायां गर्वे भ्रमोनी । प्राण आपला देऊं नका ॥ ३७ ॥

हा सुबुद्धिवाद त्या तामसवृत्तीच्या विप्रांस पटला नाहीं. कारण,

आपण न करूं जरी वाद येथें । हारी दिसेल आम्हांतें ॥
सांगती लोक राजयातें । ( मग ) महत्त्व आपुलें केवीं उरे ॥

असें त्यांस भय पडल्यामुळें ते कांहीं आपला वेडा हट्ट सोडीनात; तेव्हां त्यांस तळ्यावर आणण्यास श्रीगुरुंस खालील द्राविडीप्राणायामाची युक्ति योजावी लागली. ★

३०. श्रीगुरु आणि हे विप्र बसले होते तेथून बऱ्याच अंतरावरून एक मनुष्य जात होता. श्रीगुरुंनीं शिष्याकरवीं त्याला हांक मारून आणविलें. तो येऊन दूर दहा हातांवर उभा राहिला. कारण तो जातीनें मांग होता. तेव्हां त्यानें आपली मर्यादा राखली. श्रीगुरुंनीं त्याला विचारलें, ‘ तूं कोणत्या जातींत जन्मलास आणि कोठें राहतोस ? ’ तो म्हणाला, ‘ महाराज मी मांग आहें; गांवाबाहेर राहतों. हे दीनदयाळ गुरुमहाराज ! कृपा करून आपण मला हांक मारून दर्शन दिलेंत. माझे आपणांस दंडवत असोत. माझी आज उद्धारगति झाली. ’ याप्रमाणें स्तवन करून, त्यानें दुरूनच श्रीगुरुंस साष्टांग प्रणिपात केला. श्रीगुरुंनी शिष्या-करवीं दीडदोन हातांच्या अंतरानें सात रेघा भूमीवर काढविल्या आणि मग ते त्या मांगास म्हणाले कीं, ‘ एक रेघ ओलांडून अली-कडे ये.’ त्याप्रमाणें तो येतांच ‘ कोण तूं ? ’ असा त्यांनीं त्यास प्रश्न केला त्यावरोबर, ‘ मी, किरात. माझें नांव वनराखा,’ असें

---

★ हा सर्व उतारा आणि कथाभाग देवस्की-(थिऑसफी)-च्या नादीं लागलेल्या ब्राह्मण व ब्राह्मणब्रुव धर्मवीरांनीं लक्षपूर्वक विचार करण्यासारखा आहे. त्याप्रमाणें त्यांनीं त्याचें मनन करून आपलें वर्तन सुधारावें. नाहींतर ‘ विनाशकाले विपरीतबुद्धिः ’ असला प्रकार होऊन स्वपदनाशास मात्र ते लोक कारण होतील, इतकेंच येथें सुचवितों.

त्यानें सांगितलें. पुन्हां गुर्वाज्ञेनें तो दुसरी व तिसरी रेषा लंघून आला तेव्हां पूर्वीप्रमाणेंच, ' कोण तूं ? ' असें विचारतां ' मी गंगातटवासी गंगापुत्र आहें ' असें तो म्हणूं लागला. चौथी रेषा लंघून येतांच, ' शूद्र ' म्हणून म्हणूं लागला, पांचवीला ' वैश्य ', सहावीला ' विख्यात नामक क्षत्रिय ' आणि सातवी लंघून येतांच ' अग्रजाती विप्र आपण, वेदशास्त्रादि व्याकरण, अध्यापक नाम आपुलें ' म्हणून सांगूं लागला. तेव्हां ' वेदशास्त्री अभ्यास आहे म्हणून म्हणतोस, त्या पक्षीं हे चर्चा करण्यास विप्र आले आहेत यांच्याशीं वाद कर पाहूं ' असें म्हणून श्रीगुरुंनीं अभिमंत्रित विभूति त्याचे सर्वांगावर फेंकली.त्यासरशीं त्याला सर्व ज्ञान स्फुरत असल्याचा भास होऊन, ' ह्या विप्रांशीं आपण उत्तरपक्ष करतों ' असें तो म्हणूं लागला. हा अलौकिक प्रकार आणि हें असामान्य सामर्थ्य पाहून ते वादाला हपापलेले ब्राह्मणाधम भीतीनें थरथर कांपूं लागून त्यांचीं सर्व गात्रें, विशेषतः जिव्हा आणि कर्ण अगदीं बधिर झालीं. हृदयांत थंडीच्या कडाक्यानें भरणाऱ्या हुडहुडीप्रमाणें धडकी भरली आणि त्यांचें तीव्र मदानें उसळत असणारें रक्त अगदीं गोठून गेलें. मग ते गयावया होऊन म्हणूं लागले, ' महाराज ! आम्ही गुरुद्रोही, महान् अपराधी, पातकी, अधम आहों. आम्हीं ब्राह्मणांस व्यर्थ छळून ज्ञातिद्रोह जोडला आहे. दयानिधे ! आम्हांला क्षमा करा आणि आमचा उद्धार करा. सर्वस्वीं शरणागत आहोंत. ' याप्रमाणें-नानाप्रकारें ते विमद झालेले ब्राह्मण श्रीमन्नृसिंहसरस्वतींचीं स्तोत्रें गाऊं लागले असतां, त्यांनीं त्यास निरोप देतांना म्हटलें कीं, ' तुम्हीं जें महामुनि त्रिविक्रमभारतीस क्षोभविलेंत आणि विप्रनिंदा व छल करून ज्ञातिद्रोह व धर्मद्रोह केलात त्याचें प्रायश्चित्त तुम्हांला भोगलेंच पाहिजे. ज्याचें जें अर्जित पुण्यपाप

असेल तें त्यानें भोगलेंच पाहिजे. क्रियमाणाची निष्कृति झाल्यावांचून गति-मोक्ष-होणारच नाहीं.' श्रीगुरूंचें हें न्यायनिष्ठुर वचन ऐकून, ते विप्र फारच घाबरले आणि त्यांनीं श्रीगुरूंचे चरणीं घट्ट मिठी मारली. तेव्हां कृपामूर्ति श्रीगुरुनाथांनीं त्यास असें आश्वासन दिलें कीं, ' दुष्कर्म हें तुम्हांला जरी भोगलेंच पाहिजे तरी बारा वर्षांचे आंत तुमची सुटका होईल. तोंपर्यंत तुम्ही ब्रह्मराक्षस होऊन राहाल. तुम्हांला पूर्ण पश्चात्ताप झाला आहे, त्या योगानें त्या ब्रह्मराक्षसी उग्र योनींतही तुम्ही शांतरूप रहाल, असा माझा आशीर्वाद आहे. आपण आतां चला व गंगेवर जा; तेथें तुम्हांला बसण्यायोग्य असें स्थान सांपडेल. तुमचें पाप संपतांच अवचित विद्वज्जन येऊन तुमचा उद्धार करतील. ' हें ऐकून ते ब्राह्मण मुकाट्यानें निघाले व गांवाबाहेर येऊन गंगेवर पोंचतात, तोंच त्यांना पोटशूळाची तीक्ष्ण व्यथा होऊन ते एका क्षणांत पंचत्वास पोंचले. पुढें यथाकाळीं त्यांचा उद्धारही झाला.

३१. इकडे जो पतित मांग महाज्ञानी झाला होता, त्यास श्रीगुरूंनीं केलेला चमत्कार पाहून आपण सप्त जन्मांपूर्वी ब्राह्मण असलों पाहिजे असें वाटून, त्या भावनेनें तो श्रीगुरूंस नमस्कार करून म्हणाला :–

विप्र होतों पूर्वी आपण । केवीं झालों जातिहीन ॥
सांगावें जी विस्तारोन । त्रिकाळज्ञान अंतरसाक्षी ॥ ५१ ॥

वरील प्रश्नाचें उत्तर श्रीगुरूंनीं पुढीलप्रमाणें दिलें :–

पुण्यपापाची गति । आपुलें अर्जित भोगिती ॥
**कर्मविपाकीं**[1] असे ख्याती । नीच श्रेष्ठ कर्मानुसारीं[2] ॥ ४ ॥

---

१ कर्मविपाक नांवाचा ग्रंथ आहे. त्यांत, इहजन्मींच्या कोणत्या कर्मानें पुढें काय भोगावें लागेल आणि इहजन्मीं निष्कारण असें वाटून भोगावें लागणारें दुःख मागील जन्मींच्या कोणत्या कर्माचें फळ आहे, इत्यादि विचार आहे. २. पूर्वजन्मींच्या कर्माप्रमाणें.

विप्रक्षत्रियवैश्यशूद्रवर्ण । यांत्रिपासून चांडालवर्ण ॥
उपजला असतां ज्ञातिहीन । जातिविभाग कर्मापरी ॥ ५ ॥
विप्रस्त्रियेपासीं एका । शूद्र जाय व्यभिचारिका ॥
पिंड उपजे तो चांडालिका । सोळावी जाती ॥ ६ ॥
गुरु अथवा मातापिता । सांडोनि जाय तत्त्वता ॥
चांडालजन्म होय निरुता । सोडितां कुलस्त्रियेसी ॥ ७ ॥

शूद्रहस्तें भोजन, अश्वविक्रय, शूद्रस्त्रीसंग, नित्य दासीभोग, देवपितृकर्मत्याग, बैलावर बसणें, तीर्थी जाऊन श्राद्ध न करणें योग्य विप्रनिंदा त्याचप्रमाणें विप्रेतर जातींचें भजन इत्यादि कर्में करणारा ब्राह्मण पुढील जन्मीं चांडाळ जन्मतो. याशिवाय आणखीही– ज्यांच्या योगानें चांडाळादि हीन व धर्मबाह्य जातींत जन्म होतो अशीं–अनेक दुष्कर्में गुरूंनीं त्या चांडाळास सांगितलीं आणि ते म्हणाले, ' तूं पूर्वी एकदां विप्र होतास, परंतु मातापिता आणि गुरु यांचा द्वेष तुझ्याकडून घडून तूं पतित झाला आहेस, तर आतां तूं ह्या संगमतीर्थात एक महिनाभर स्नान कर म्हणजे तुला पुढील जन्म ब्राह्मणाचा येईल. ' यावर तो पतित मातंग म्हणतो, ' महाराज ! मानस सरोवरास गेलेला कावळा जसा राजहंस होतो, किंवा परिस लागला असतां लोखंड जसें सोनें होतें, तद्वत् अत्यंत पापी असा जो मी तो आपल्यासारख्या जगदुद्धारसमर्थ महात्म्यांच्या दर्शनानें पवित्र झालेला व आपल्या कृपाप्रसादानें मतिमंद व अज्ञानी असतांही ज्ञानराशी झालेला असा, आपणांस शरण आलों आहे, तर मजला आपण अभिमंत्रून असाच विप्रांमध्यें मिळवा. ' हे चांडाळवचन ऐकून श्रीगुरु म्हणाले, ' बाबा ! पतित चांडाळाच्या कुशींत उपजून तूं त्याच्याच घरीं त्याच्याच अन्नोदकानें वाढलेला; तुझी कायाही हीन जातीची. तेव्हां

तुला ब्राह्मण कसा करतां येईल ? पूर्वी विश्वामित्र नांवाचा राजर्षि साठ हजार वर्षे तपश्चर्या करून सुद्धां त्याच देहांत ब्रह्मर्षि झाला नाहीं. आपणांस ब्रह्मर्षि म्हणावें म्हणून त्यानें वसिष्ठ ब्रह्मर्षींची अतिशय पायधरणी केली ! इंद्रादि देवांसही त्यानें पुष्कळ विनवलें; परंतु त्यांनीं वसिष्ठांस संमत असून त्यांनीं तुला ब्रह्मर्षि म्हटलें तरच आम्ही म्हणूं, एरवीं म्हणणार नाहीं, असें सांगितलें. तेव्हां वसिष्ठांची खोडकी मोडण्यास्तव त्यानें त्यांचे शत पुत्र मारिले आणि शेवटीं एक दिवस त्यांसही डोक्यांत धोंडा घालून ठार मारण्यास तो सिद्ध झाला होता; परंतु ज्याच्यावर आपलें ब्रह्मर्षित्व अवलंबून आहे त्यास मारलें तर आपणांस ब्रह्मर्षि कधींच होतां यावयाचें नाहीं असा विचार मनांत येऊन त्यास पश्चात्ताप झाला व त्यासरशीं त्यानें धोंडा भूमीवर टाकून दिला. त्यास अनुताप झाला हें ओळखून वसिष्ठांनीं ब्रह्मर्षि अशी त्यास हांक मारली. तेव्हां आपण मोठे कृतकृत्य झालों असें वाटून त्यानें मोठ्या संतोषानें वसिष्ठांस आपल्या घरीं सहभोजनास बोलाविलें. क्षत्रिय योनींतून उत्पन्न झालेलें शरीर नाहींसें झाल्याशिवाय तुमचेंआमचें सहभोजन होणें नाहीं. सहभोजनाचा आग्रहच असेल, तर हें शरीर सूर्यकिरणांत पचवून त्याचें भस्म केलें पाहिजे.' असें वसिष्ठांनीं त्यांस सांगितलें. विश्वामित्रानें तें मान्य करून, आपल्या अनुष्ठानसामर्थ्यानें पहिला देह जाळून नवा देह धारण केला. तेव्हां मग विश्वामित्र हे सर्वमान्य असे ब्रह्मर्षि झाले ! विश्वामित्रासारख्याची ही दशा मग तेथें तुझा काय पाड ? तूंही हा देह विसर्जन कर व अंतकाळीं, आपणांस ब्रह्मकुळींच जन्म असो अशी दृढ भावना ठेव म्हणजे ' अन्ते मतिः सा गतिः ' ह्या सिद्धांतानुसार तुलाही ब्रह्मयोनी मिळेल.

३२. वरील विश्वामित्राची गोष्ट ऐकून तो अंत्यज उमजेना. शेवटीं श्रीगुरूंनीं शिष्यांकरवीं त्यास फिरून स्नान घालवून त्याच्या अंगावरील ती अभिमंत्रित विभूति काढून टाकविली. तेव्हां त्याचें तें उपटसूळ क्षणिक ज्ञान आणि ब्राह्मणत्वाची महत्त्वाकांक्षा हीं नाहींशीं झालीं व तो आपल्या बायकामुलांकडे गेला. सारांश काय कीं, भयंकर पातकोपाधीनें अंत्यजाचा जन्म आणि आचार प्राप्त झालेल्यास कार्यकारण जरी श्रीगुरूंनीं विभूतिसिंचनानें ब्रह्मज्ञानी करून सोडिलें होतें, तरी उन्मत्त ब्राह्मणांचा म्हणजे वृत्तीनें अंत्यजच बनलेल्यांचा गर्वपरिहार होतांच, त्या चांडालास पुन्हां त्यांनीं पूर्ववत् अज्ञानी करून सोडिलें. ह्यावरून वर्णव्यवस्था ही अनेक जन्मार्जित बऱ्यावाईट संस्कारांच्या फळांवर अवलंबून चालते आणि कोणत्याही वर्णाची प्राप्ति मनुष्यास त्याच्या गर्भांतच होते, ही गोष्ट स्पष्ट होत आहे. वर्ण व जाति ह्या जन्मावर अवलंबून आहेत. त्यांचा जन्मानंतरच्या कर्मप्रवृत्तींशीं कांहीं संबंध नाहीं; कारण, त्या कर्मप्रवृत्ति प्रत्येक क्षणीं पालटणाऱ्या परिस्थितीबरोबर पालटत असतात. त्यामुळें एकाच मनुष्याचे एका दिवसांत अनेक बुद्धिभेद होऊन, तो सकाळीं ब्राह्मण, दुपारीं क्षत्रिय, तिसऱ्या प्रहरीं वैश्य आणि सर्व लाज व स्वाभिमान ह्यांस फांटा देऊन कधीं कधीं शूद्रही होण्यास सिद्ध होईल. दुसरा असाही एक ह्यांत विचार आहे कीं, सकृद्दर्शनीं परस्परविरुद्ध आणि अत्यंत घोंटाळ्याच्या अशा दिसणाऱ्या पुराव्याचें एकदां व्यवस्थित रीतीनें वर्गीकरण करून पाप, पुण्य, सात्त्विक, राजस, तामस इत्यादि असंख्य कर्मांपैकी समान पापानें समान पुण्याचा, –सात्त्विक कर्माचा त्याच तोलाच्या तामस कर्मानें–अति संक्षेप उडवून, शिल्लक राहणाऱ्या पुण्य किंवा सात्त्विक, चंचल किंवा

राजस आणि पाप किंवा तामस कर्मान्वयें ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य अथवा शूद्र ह्यांपैकी कोणता तरी जन्म प्राप्त होतो; म्हणजे जन्मतःच त्या त्या वर्गास योग्य ते ते अधिकार आणि कर्तव्यें त्या त्या मनुष्यास प्राप्त होतात. मग ज्या मानानें तो आपले अधिकार निरभिमानें चालवून आपलीं कर्तव्यें चोख बजावील त्या मानानें फिरून मरणोत्तर त्याच्या पापपुण्याचा जमाखर्च होऊन त्याच्या शिलकीच्या योग्यतेप्रमाणें त्याला नवा देह आणि वर्ण किंवा जाति प्राप्त होते. एक सबंध आयुष्य ही निसर्गतःच सकृद्दर्शनीं कमीअधिक पापपुण्यदायक कर्में करणाऱ्यांच्या पापपुण्याच्या आढाव्याची मर्यादा आहे. अशी मर्यादा प्रत्येक व्यवहारास लागतेच आणि ही मर्यादा जों जों कर्तव्य मोठें तों तों विस्तृत असावी लागते; तरच अधिकाराचा सदुपयोग करून कर्तव्य करण्याची पात्रता किंवा अपात्रता नीट ठरेल. आतां कांहीं विलक्षणच प्रकार झाला तर 'अत्युत्कटैः पुण्यपापैरिहैव फलमश्नुते' ह्या न्यायानें व्यवहारांत जसा एखादा परंपराप्राप्त राजपीठावरील राजाही आपल्या अत्यंत अन्यायानें पदच्युत होऊन रंक होतो, त्याप्रमाणें जन्मानें ब्राह्मणत्व प्राप्त झालेलाही अनन्वित पापकर्मांच्या परिस्फुटतेनें चांडालापेक्षांही नीच होतो. असें आहे तरी ज्याप्रमाणें व्यवहारांत त्या पदच्युत झालेल्या राजास 'महाराज' हें उपपद तो मरेपर्यंत चालत असतें, तसेंच ह्या चांडाळ झालेल्या ब्राह्मणासही नीच, पातकी अशीं हजारों वाईट विशेषणें लावूनही ब्राह्मणच म्हणतात. पदच्युत होणाऱ्या राजांचीं जितकीं उदाहरणें सांपडतात, तितकीं राजवंशाशीं संबंध, अतुल पराक्रम आणि विलक्षण साहस ह्यांपैकीं कांहींही नसतांना, उगाच आपला एखादा रंक, लोकांनीं होऊन शोधून काढून राजा

केल्याचीं उदाहरणें जगाच्या इतिहासांत नाहींत; किंबहुना असलें एकही उदाहरण पृथ्वीच्या पाठीवर अज्ञात कालापासून आजपर्यंत कोठें घडलेलें कोणाला आठवत असेल, असें वाटत नाहीं.

३३. चांडालत्वास पोंचलेल्या मदोन्मत्त ब्राह्मणांसही श्रीगुरूंनीं शापदग्ध करून ब्रह्मराक्षसांच्या योनीस कांहीं काल पोचविलें, हेंही वरील गोष्टींत ध्यानांत धरण्यासारखें आहे. श्रीगुरूंनीं, स्वतांच्या खऱ्या खऱ्या विद्वत्तेबद्दल आणि योगसामर्थ्याबद्दल अंमळ अधिक अहंकार असलेल्या त्रिविक्रमभारतीस ब्रह्मसाक्षात्कार देऊन पूर्ण शांतिसौख्य दिलें; आणि ह्या आपल्या विद्येचा दुरुपयोग करून इतर स्वज्ञातिद्रोहाचें पातक जोडणाऱ्यांस प्रत्यक्ष चांडाळाकडून फजीत करून चांडाळापेक्षांही नीचपणास पोंचवून पिशाचयोनींत रखडावयास लाविलें. म्हणजे ज्याची जी योग्यता तेंच त्याला दिलें. कोणावर विनाकारण विशेष कृपाही केली नाहीं किंवा कोणावर विशेष रोषही केला नाहीं. तर केवळ सनातन वैदिक धर्माच्या श्रुतिस्मृतिपुराणोक्त मर्यादा मात्र आपल्या कृतीनें लोकांच्या चांगल्या प्रत्ययास आणून, त्या संरक्षण कशा कराव्या, हें सोदाहरण दाखविलें.

३४. यापुढें श्रीगुरूंनीं भस्ममहिमा, रुद्राक्षमहिमा, पतिव्रताधर्म, सहगमन आणि विधवाधर्म, सोमवारादि व्रतांचें माहात्म्य इत्यादि प्रसंगाप्रसंगांनीं सांगितलीं. नंतर, दानप्रतिग्रहाचा त्याग करून परान्नभोजनास कधींच न जाणाऱ्या ब्राह्मणास त्याची स्त्री फार छळीत असे; कारण दंपत्यभोजनप्रसंगीं, नवरा परान्न घेत नसे, म्हणून तिलाही कोठें जावयास सांपडत नसे. घरीं दारिद्र्यामुळें चांगलें अन्न मिळूं नये; दुसऱ्या ठिकाणीं नवऱ्याच्या नेमामुळें जातां येऊं नये. शेवटीं ती श्रीगुरूंकडे गेली

आणि त्यांजकडून नवऱ्याचें मन परान्नग्रहणास तिनें वळविलें. त्या ब्राह्मणाचें मन परान्नग्रहणाविषयीं वळवितांना श्रीगुरुंनीं त्यास सांगितलें कीं

आणिक एक सांगेन तुज । जेणें धर्म घडती सहज ।
अडला असेल एखादा द्विज । देवपितृकर्माविणें पैं ॥
कोणी न मिळे विप्रासी । जावें तेथें भोजनासी ।
जरी तेथें तूं न जासी । अनंत दोष असे जाण ॥

ह्यावर एकंदरच ' कवणें घरीं अन्न घ्यावें, कवण्याद्वारीं घेऊं नये ' असा त्या द्विजानें श्रीगुरुंस प्रश्न केल्यावर ते सांगतात :—

गुरुभुवनादिकें हर्षी । जावें शिष्यवर्गाघरीं ॥
वैदिकादि द्विजवर । मातुलांश, आपुला श्वशुर ।
सहोदर, साधुजन थोर । तया गृहीं अन्न जेवावें ॥
अडला विप्र ब्राह्मणाविण । त्याचें घरीं घ्यावें अन्न ।
करावें गायत्रीजपन । दोष जाती अवधारा ॥

त्याचप्रमाणें कोणाकोणाचें अन्नग्रहण निषिद्ध ह्याविषयींही श्रीगुरुंनीं पुष्कळच सांगितलें आहे. त्यापैकीं कांहीं कांहीं भाग खालीं देतों :—

नित्य मातापितयांसी । सेवा घेती जे अतिदोषी ।
जेवूं नये त्या सदनासी । धनलोभिष्ठ द्विजाघरीं ॥
कलत्रपुत्र कष्टवोनी । धर्म करी विप्रालागोनी ।
अन्ननिषेध तया भुवनीं । दोष घडती जेविल्या ॥
**बहिष्कारी विप्राघरीं** । याचकवृत्तीनें उदरपूर्ति करी ।
अन्न वर्जावें तया घरीं । आत्मस्तुति परनिंदका ॥
धनगर्वी तामसाघरीं । क्रूर निर्दय व्यभिचारी ।
दांभिक दुराचारी विप्राघरीं । अन्न तुम्ही वर्जावें ॥
पुत्र पितयातें सोडोनी । वेगळा असे जो, ब्राह्मणीं ।
वर्जावें अन्न; साधुजनीं । महादोष बोलिजे ॥
**खळ राजसेवकाघरीं** । लोहकाष्ठ छेदनकारी ।

वस्त्रधूत रजकाघरीं । तया घरीं न जेवावें ।
रोगी सेवकाचे घरीं । **मद्यपान करी त्या नराघरीं ।**
**वेश्या असे जया नारी** । दान विप्रें न घ्यावें ॥
**द्रव्य घेवोनि शूद्राघरीं** । अध्ययन सांगिजे द्विजवरीं ।
अन्न वर्जावें तया घरीं । घोडीं विकिती ब्राह्मण जे ।

३५. त्याचप्रमाणें, द्यूतकर्मी, स्नानाविण भोजन करणारे, संध्याकाळीं संध्या न करणारे, पूर्वजमार्ग सोडून स्वधर्म त्यागणारे, गोब्राह्मणहत्यारी ह्यांचे घरीं; त्याचप्रमाणें इतर समस्त जातींस नमून जो आपल्या ब्राह्मण जातीशींच काय तो बांकून वागतो त्याला तर चांडाळ समजून त्याच्या घरीं अन्न वर्ज्य करावें. शूद्रें बोलावितांही जाऊं नये. आपण गृहस्थाश्रमी असून दानधर्म करीत नाहीं आणि लांबलांब अद्वैताच्या गप्पा मारतो, अशाच्या घरीं अन्न घेऊं नये. या श्रीगुरुक्तीवरून संतांस जाति-वर्णभेद व त्याचा अन्नोदकाशींही संबंध मान्य होता असेंच मानावें लागेल. असो. अन्नवर्ज्य प्रकरण संपल्यावर श्रोत्यांच्याच विनंतीवरून श्रीगुरूंनीं ब्राह्मणांचा आचार सांगितला आहे. त्यांत पहाटे ब्राह्ममुहूर्तावर उठून शौचमुखमार्जनादि विधीपासून तों रात्रीं निजेपर्यंतची दिनचर्या सांगितली आहे. त्यांतील देवपूजेचा विधि मात्र येथें घेतों. श्रीगुरु म्हणतात :—

रंगमालिका घालोनी । निर्मळ असावें देवताभुवनीं ।
मग बैसोनि शुभासनीं । देवपूजा करावी ॥
**जैसी संध्या ब्राह्मणासी । देवपूजा करावी तैसी ।**
त्रिकाळ करावें अर्चनासी । एकचित्तें मनोभावें ॥
त्रिकाळीं न घडे ज्यासी । प्रातःकाळीं करावी हर्षी ।
तेंही न साधे परियेसीं । मध्यान्हकाळीं करावें ॥
सायंकाळीं मंत्रेसीं । पुष्पें वाहोनी भक्तीसीं ।
ऐसें न साधे जयासी । भोजनकाळीं करावी ॥

देवपूजा करावयासी । सहा प्रकार परियेसीं ।
उदकीं नारायण विशेषीं । पूजितां तृप्ति जगन्नाथा ॥
दुसरा प्रकार सांगेन ऐका । अग्निदेवतापूजा अधिका ।
**मानसपूजा अतिविशेखा** । एकचित्तें परियेसा ॥
सूर्यपूजा करितां जाण । संतुष्ट होय नारायण ।
**सामान्य पक्षें स्थंडिलीं जाण । प्रतिमापूजा स्वल्पबुद्धि॥**
**ज्ञाता असेल बुद्धिवंत । यज्ञपूजा करावी त्वरित ।**
**स्वर्गापवर्गपूजा घेत । यज्ञपुरुषपूजा मुख्य जाणा ॥**
अथवा पूजावें धेनूसी । ब्राह्मण पूजावें विशेषीं ।
गुरुपूजा मनोभावेंसीं । प्रत्यक्ष तुष्टे गुरुमूर्ति ॥
आज्ञा घेवोनी श्रीगुरूची । पूजा करावी प्रतिमेची ॥
**श्रीगुरूच्या निरोपानें । पूजिजे काष्ठें पाषाणें ॥**
तेचि होती देव जाणें । होती प्रसन्न परियेसा ॥

३६. पुढें पूजेचा विधि, कोणते मंत्र कोठें म्हणावेत, हें सांगून फुलें अरण्यांतील किंवा बागेंतील स्वतः आणलेलींच चांगलीं, विकत घेणें गौण, त्याचप्रमाणें शिळें, छिद्रें पडलेलें तेंही त्याज्यच इत्यादि सांगितलें आहे. असो ! तात्पर्य काय कीं, प्रतिमा-मूर्ति-पूजा ही किती, कशी आणि कोणाला अवश्य आहे, याचा निर्णय ह्या श्रीगुरुवाक्यांत चांगलाच झाला आहे. त्याच-प्रमाणें, ह्या ३६ व्या अध्यायांत सर्व ब्रह्मकर्माची सरळ आणि सुबोध माहिती आहे. ती सर्व वाचण्यासारखी तर आहेच; परंतु त्यांत विशेष लक्षांत ठेवण्याची गोष्ट ती ही कीं, संस्कृत भाषेचा लोप होऊन जें अज्ञान माजलें होतें, तें दूर करून धर्मचारांची अशी उत्तम ओळख लोकांच्या जीवंत भाषेंत करून देणारा दुसरा ग्रंथच नाहीं. ह्या अध्यायास आन्हिक-कर्मनिरूपण हें नांव किती सार्थ आहे, तें, तो अध्याय काळजी-पूर्वक स्वतां वाचल्यावांचून कळणें दुर्घट आहे.

३७. यापुढें पूर्वी पोटदुखीच्या आजारानें पीडलेला सायंदेव नामक ब्राह्मण जो यवन बादशाहाचा नोकर होता व ज्याची श्रीगुरूंनीं पोटदुखी घालविली होती, तो फिरून श्रीगुरूंस गाणगापुरास येऊन भेटला. आणि अनन्य भावानें त्यांची त्यानें सेवा केली. त्या योगानें संतुष्ट होऊन श्रीगुरूंनीं त्याला यवनाची सेवा सोडण्याची संमति, नव्हे आज्ञा केली आणि ' तुझ्या वंशीं आपली निरंतर भक्ति राहील. तुझा वडील मुलगा माझा भक्तोत्तम होईल, ' असा वर दिला आहे.

३८. शेवटीं, जो रजक श्रीपादश्रीवल्लभांच्या अनुग्रहानें बेदरच्या राजघराण्यांत जन्मोन तेथील सुलतान झाला, तो पूर्व संस्कारामुळें वेदशास्त्रपुराणश्रवणाचा पक्षपाती आणि देहानें जरी यवन तरी अंतःकरणीं साधुसेवनसंस्कारामुळें पुण्यशील असल्यानें एकभावें समस्त यातींस, त्यांतहि विशेषतः ब्राह्मणांस दानधर्म करीत असे. हिंदूंच्या देवस्थानांस, जातिधर्मास अनुसरून उपसर्ग देणें तें बाजूस राहून तो त्यांचाही चांगला परामर्श घेत असे. हें त्याच्या यवनप्रधानादि हस्तकांस न आवडून ते त्याला शिकवीत कीं, ' आपण म्लेंच्छ. मूर्ति भंगणें आणि ब्राह्मणादि हिंदूंस छळणें हें आपलें काम. तें न करितां उलट आपण ज्यांचा द्वेष करावा त्यांची सेवा करून फार पातक जोडतां. आपला जातिधर्म करणें हें सुखास साधन होय. तें सोडून पहा कीं, पाषाणाची, लांकडाची, झाडाची पूजा करणाऱ्या ब्राह्मणादिकांचा तुम्ही तरफदारी करितां ! ते गाईला, पृथ्वीला, अग्नीला, सूर्याला, नदीच्या पाण्याला, वाटेल त्याला देव म्हणतात ! मूर्ख कोठले ! निराकार ईश्वराला साकार म्हणतात. असल्यांना जे कोणी मुसलमान चांगले म्हणतील ते नरकाचेच धनी. ' याप्रमाणें काजीमुल्लांनी सुलतानाची

वारंवार कानउघाडणी करण्याचा प्रयत्न करावा; पण त्याचा कांहीं उपयोग होऊं नये. कारण सुलतान त्यांशीं उलट असा बुद्धिवाद करी कीं, ' आपणच म्हणतां कीं, अणुरेणु, तृण, काष्ठ ह्या सर्वांत सर्वेश्वर–अल्ला–परिपूर्ण आहे. ही सर्व दृश्य सृष्टि–स्थावरजंगम–त्याच अल्लाची. तो एक अल्ला–देवच सर्व ठिकाणीं आहे. अनेक देव आणि हजार तर्कवितर्क हें खोटें होय. एकाच मातीचीं कुंभार जशीं अनेक भांडीं करितो, गाई वेगळाल्या असल्या तरी त्यांचें दूध जसें एकच, अलंकार अनेक झाले तरी सोनें जेथूनतेथून जसें सारखेंच त्याचप्रमाणें देह भिन्नभिन्न असले तरी त्यांतील परमात्मा–अल्ला–एकच आहे. तसेंच पृथ्वीवर नाना जातींचे लोक आहेत; परंतु त्या सर्वांचा ईश्वर एकच होय. त्यांत भिन्न भावाला जागा कोठें आहे ? बरें; सर्वांठायीं जर अल्ला आहे तर तो दगडांत, झाडांत, पाण्यांत आणि वाटेल तेथें आहेच आहे. शिवाय त्यांचें–हिंदूंचे–मत असें आहे कीं :–

प्रतिमापूजा स्वल्पबुद्धि । म्हणोनि सांगती प्रसिद्धि ।
आत्माराम पूजिती विधि । त्यांचे मतीं ऐसें असे ॥
स्थिर नव्हे अंतःकरण । म्हणोनि करिती प्रतिमा स्गुण ।
नांव ठेवूनी नारायण । तया नामें पूजिताती ॥

असें असून जर तुम्ही त्या हिंदूंची निंदा करीत असाल तर ' अल्ला सर्वांठायीं पूर्ण ' असें कां म्हणतां ? तुम्ही आपल्या मताची वाटेल तशी प्रतिष्ठा करा; पण मी त्यांचा द्वेष कां म्हणून करावा, हें मला समजत नाहीं.

याकारणें ज्ञानवंतीं । करूं नये निंदास्तुति ।
असती नानापरी जाती । आपुले राहाटीं रहाटती ॥

ह्याप्रमाणें सुलतान आपला काजी, मुल्ला, वजीर ह्यांचें समाधान करी किंवा त्यांस निरुत्तर करी. असा हा सुलतान देव,

गोब्राह्मण ह्यांच्या ठिकाणीं अनादर न करून राज्य हांकीत असतां त्याच्या मांडीवर एक स्फोटक–पुटकुळी–उद्‌भवली. तिच्या योगानें त्याला दिवसेंदिवस अनेक हकिमांचे उपाय चालत असतांही जास्त जास्तच पीडा होऊं लागली. शेवटीं सर्व उपाय थकल्यावर सुलतानानें आपल्या नगरांतील चार चांगल्या ब्राह्मणांस बोलावून आणून पुढें विचार काय करावा, म्हणून विचारलें असतां त्यांनीं—

पूर्वजन्मीं पापें करिती। व्याधिरूपें होउनी पीडिती।
दानधर्में तीर्थीं दैवतीं। व्याधि जाय परियेसा॥
सत्पुरुषाचे कृपादृष्टीं। पापें जातीं जन्मासाठीं।
मग रोग कैंचा पोटीं। स्फोटकादि त्वरित जाय॥

असें सांगितलें. हें विप्रवचन ऐकून सुलतान ब्राह्मणांस नमस्कार करून म्हणाला, ‘ तुम्हीं मला यवन म्हणून त्याज्य समजूं नका. मी ब्राह्मणांचा दास आहें. पूर्वजन्मीं मी गुरुचरणसेवा केली आहे. अल्पस्वल्प पातकानें मी यवनकुलांत जन्मलों आहें. तर तुम्हीं मला कोणाचा रोग पूर्वी कोणत्या तीर्थीं काय केल्यानें गेला, ह्याविषयीं एकादा पूर्व वृत्तांत सांगावा. ’ तेव्हां ब्राह्मणांस मोठी भीति पडली कीं, ह्या म्लेंच्छदरबारांत ह्या सुलतानाला आपले तीर्थाचा किंवा सत्पुरुषाचा महिमा कसा सांगावा? याचे वजीर, काजी, मुल्ला हे आपली व ह्याची बरोबरच रेवडी उडवितील. म्हणून ‘एकांत स्थळीं सांगूं. येथें सांगण्यास धीर होत नाहीं.’ अशी त्या ब्राह्मणांनी सुलतानास विनंति केली असतां ‘ जातविजात आपण कांहींएक मनांत आणूं नये; मला जातीची चाड नाहीं. आपण जो असेल तो उपाय सांगून माझा उद्‌धार करावा. ’ असें सुलतानानें अभय देतांच ब्राह्मणांनीं त्याला पापविनाशिनी तीर्थास सहज विनोदार्थ म्हणून जाण्यास सांगितलें. त्याप्रमाणें सुलतान

एकटाच सड्या स्वारीनें तेथें गेला. श्रीगुरुंस पूर्वींच्या अवतारांतील आपला रजकाशीं असलेला संकेत आठवला आणि त्याप्रमाणें तेही, आपण गाणगापुरींच राहिलों तर आपणाकडे येणारा सुलतान व त्याचे म्लेंच्छ परिजन यांचा द्विजांस उपसर्ग बाधेल म्हणून, गुप्त रीतीनें रहाण्याकरितां पापविनाशिनी–गौतमी तीर्थास सर्व शिष्यांसह ईश्वरनाम संवत्सरीं सिंहेचा गुरु-असतांना निघून गेले. ब्राह्मणांच्या सांगण्यावरुन सुलतान गाणगापुरास श्रीगुरु नृसिंहसरस्वतींच्या दर्शनास म्हणून गेला, तों तेथें श्रीगुरु नव्हते. पुष्कळ शोधाअंतीं अमरजासंगमीं श्रीगुरु असल्याची त्याला बातमी लागली. तेव्हां तेथें जाऊन त्यानें श्रीगुरुंचें दर्शन घेऊन त्यांस अनन्य भावानें वंदन केलें. श्रीगुरुंनीं त्याच्याकडे पाहतांच —

राजा म्हणे श्रीगुरुसी । कां उपेक्षिलें आम्हांसी ।
आपण झालों परदेशी । चरणांविगळें केलें मज ॥
उद्धरावें आतां मज । आलों आपण हेंचि काज ।
सेवोनि तुझे चरणरज । असेन आतां राज्य पुरे ॥

याप्रमाणें अनन्य शरण आलेल्या त्या सुलतानास श्रीगुरु म्हणतात, 'तूं खरा खरा भक्त आहेस. तुझी वासना पुरी होईल.' ह्यावर सुलतान म्हणाला, 'आपणांस स्फोटक झाला असून फार पीडा होत आहे, तर कृपादृष्टीनें मजकडे पाहून माझी तेवढी व्यथा नाहींशी करावी.' श्रीगुरु त्याचें हें भाषण ऐकून हास्य-वदन करून म्हणाले, 'कुठें आहे स्फोटक ? दाखव, पाहूं मला !' तो जो स्फोटक दाखविण्यासाठीं आपल्या पायाकडे पाहतो तों तेथें त्याला कांहींच दिसेना. तेव्हां आश्चर्यचकित होऊन त्यानें श्रीगुरुपायीं माथा ठेविला आणि म्हटलें कीं—

पुत्रपौत्र देखिलें नयनीं । पूर्ण निवालों अंतःकरणीं ।
संकल्प असे माझे मनीं । अष्टैश्वर्य माझें अवलोकावें ॥
यावर—
श्रीगुरु म्हणती तयासी । आम्ही तापसी संन्यासी ।
येऊं नये तुझे नगरासी । महापातकें होतीं तेथें ॥
नगरीं नित्य धेनुहत्या । यवनजाती करिती अकृत्या ।
जीवहिंसा मद्यपी कृत्या । वर्जावें आतां निर्धारें ॥

राजानें वरील सर्व करण्याचें अंगीकारिलें; आणि विनंति केली कीं, एकदां फिरून पुत्रादिकांचें दर्शन घेऊन मग स्वामिचरणाच्या सेवेस राहावें, अशी इच्छा आहे. श्रीगुरुंनीं त्यास आपण पापविनाशिनी–गौतमी-तीर्थी तुला भेटूं असें वचन देऊन त्याला जाण्यास आज्ञा दिली. सुलतान त्याप्रमाणें ठरल्या वेळेस सर्व सरंजामासह पापविनाशिनी तीर्थावर गेला. आणि सर्व नगर शृंगारून मोठ्या समारंभानें श्रीगुरुंस पालखींत बसवून त्यानें त्यांची मिरवणूक काढिली आणि आपण पायीं चालूं लागला. याप्रमाणें सुलतान श्रीगुरुपूजा करीत असतां—

ज्याचें पाहूं नये मुख । त्याची सेवा करा देख ।
राजा नष्ट म्हणूनि सकळिक । म्लेंच्छजाती बोलती ॥
विप्रकुल समस्त देख । संतोप करिती अति कौतुक ।
राजा झाला विप्रसेवक । आतां बरवें राज्यासी ॥
ऐसा हा राव असतां । **महाराष्ट्रधर्मी वर्ततां** ।
आपुला द्वेष तत्त्वतां । न करील हा जाणपां ॥

याप्रमाणें कडव्या मुसलमानांस संताप, अनादर आणि मराठ्यांस अत्यंत आनंद झाला. सुलतानाकडून यथासांग पूजा घेऊन स्वामींनीं त्यास, ‘ श्रीशैलीं तुझी आपली भेट होईल ’ असा आशीर्वाद दिला आणि ‘ लवकरच पुत्रादिकांस राज्य देऊन तूं आपली इहलोकयात्रा संपवावी ’ असें सांगितलें. त्याप्रमाणें

पुढें त्या त्या गोष्टी घडल्याच. त्यांच्यांशीं आपणांस विशेष कारण नाहीं; तथापि श्रीगुरुंनीं लौकिक दृष्टीनें ज्या मितीस समाधि घेतली, तेवढी मागें जरी झाली आहे तरी, पुन्हां येथें उतरून घेऊं. म्हणजे ह्या महात्म्याच्या चरित्राचा ऐतिहासिक भाग आटोपला. श्रीगुरुंनीं समाधि घेतल्याची गुरुचरित्रांत दिलेली मिति अशी :

कन्यागतीं बृहस्पति । बहुधान्य संवत्सरीं ख्याति ।
सूर्य चाले उत्तरगति । संक्रांति कुंभ परियेसा ॥
शिशिरऋतु माघमासीं । असितकृष्ण प्रतिपदेसीं ।
शुक्रवारीं पुण्यदिवसीं । श्रीगुरु बैसले निजानंदीं ॥

ह्या वरील ओव्यांत सांगितलेला काल म्हणजे शके १३८० इ. स. १४६० हा कसा येतो, हें प्रथमच दर्शविलें आहे. त्याप्रमाणें श्रीगुरुंचा शिष्य जो बेदरचा सुलतान हा कोणता, ह्याचा निर्णयसुद्धां प्रथमच केला आहे. तेव्हां आतां त्या सुलतानाच्या म्हणजे अल्लाउद्दीन दुसरा ह्याच्या कारकीर्दीतील राजकीय इतिहासाकडे आपण पुन्हां वळूं.

३९. हा सुलतान मागें सांगितल्याप्रमाणें इ. स. १४३५ त गादीवर आला. हा पूर्व जन्मींचा हिंदु होता. केवळ विषयसेवनाच्या वासनेनें श्रीगुर्वाशीर्वादानें मुसलमान राजघराण्यांत जन्मून सुलतान झाला. ह्याची अत्यंत आवडती बायको एका मराठा क्षत्रिय राजाची मुलगीच होती.कारण, देशाभिमानाचें खरें वारें ह्या भेदांत नांदत होतें. दक्षिणी पक्षांत सर्व बाटलेले मुसल्मान म्हणजे मूळचे शुद्ध हिंदूच किंवा ज्यांच्या रक्तांत आईच्या बाजूनें तरी हिंदूचेंच रक्त खेळत होतें असे मुसलमान, ह्यांचा समावेश होत असे. त्यांच्यांतच जे कांहीं मराठे वगैरे त्या वेळीं लष्करी किंवा इतर नोकरींत असत त्यांचाही समावेश होई.

तथापि मराठ्यांच्या हातांत अजून कांहीं विशेष सत्ता किंवा अधिकार नव्हता. त्यांचें पारडें हलकेंच होतें. परदेशी पक्षांत आरब, तार्तार, तुर्क, इराणी, मुसलमान व पुढें मोंगल इत्यादिकांचा समावेश होई. परदेशी पक्षांतील मुसल्मान लोक दक्षिणी मुसल्मानांस अकरमासे म्हणून हलके समजत; तरी शौर्यादिगुणांत ते हलके नव्हते. शिवाय दक्षिणी पक्ष हिंदूंचा जास्त कैवारी आणि परदेशी पक्ष त्यांचा पुरा वैरी, ह्यामुळें उत्तरोत्तर हिंदु आणि मुसल्मान हा भेद दक्षिणी पक्षांत कमी होऊन एका भूमीचीं लेकरें, हा विचार वाढला. ह्या सदभिमानानें दक्षिणी पक्ष बळावून दुसरा पक्ष जळांत राहून माशांशीं वैर संपादण्याच्या दुर्गुणानें उत्तरोत्तर कसा कमजोर झाला व त्यामुळें प्रथम ब्राह्मणी पादशाहीचे तुकडे करण्यास व नंतर त्या तुकड्यांतूनच अस्सल मराठे लोकांचें राज्य उभारावयास तो कसा कारण झाला, हेंच यापुढें पाहण्यासारखें आहे. तसेंच, हें वटबीजाप्रमाणें अतिसूक्ष्म असें महाराष्ट्रजनोत्कर्षाचें बीज पेरण्याचें श्रेय सर्वस्वीं श्रीगुरु नृसिंहसरस्वतींना आहे, हेंही वाचकांनीं विसरतां कामा नये. श्रीमन्नृसिंहसरस्वतींनीं जें हें स्वदेशस्वधर्मोत्कर्षाचें बीज पेरलें तें आपल्या धर्माचारांत केसाइतकाही फरक न करितां पेरलें; परधर्मीयांची स्वधर्माबद्दल अनुकूल वृत्ति करून पेरलें. स्वधर्मीयांस परधर्मीयांचे आचारविचार घेण्यास न शिकवितां पेरलें; इतकेंच नव्हे, तर परधर्मी बादशहास स्वतःचें शिष्यत्व करावयास लावून पेरलें; ही गोष्ट फारच महत्त्वाची आणि बोधदायक आहे. अल्लाउद्दीन ब्राह्मणीनें तख्तावर येतांच प्रथम विजयनगरकरांकडून खंडणी वसूल करण्याकरितां आपला भाऊ शाहजादा महंमद यास ससैन्य पाठविलें. तें काम करून परत येतांना तो अल्लाउद्दीनाच्या विरुद्ध असलेल्या कांहीं सरदारांच्या

चिथावणीवरून राज्याची वांटणी व्हावी, म्हणून ख्वाजाजहान आणि इमाद् उल्मुल्क घोरी ह्यांचें मन वळवूं लागला; परंतु ते सरदार ह्या गोष्टीस रुकार देईनात. तेव्हां त्यानें त्या दोघां सरदारांस ठार मारविलें आणि विजयानगरकरांची मदत घेऊन बंडावा आरंभिला. अल्लाउद्दीनानें हें बंड मोठ्या चातुर्यानें आणि शौर्यानें मोडलें व आपल्या भावास शांत करून त्यास मोठी जहागिरी दिली. पुढें लगेच अल्लाउद्दीनानें शके १३५८ त दिलावरखानास पोशाख देऊन कोंकणच्या मोहिमेस पाठविलें. ह्या स्वारींत रायरी व सोनखेड येथील राजे लवकरच नमले आणि दिलावरखानानें सोनखेडच्या राजाची एक अत्यंत रूपवती व गायनवादनादि ललितकलाप्रवीण अशी मुलगी शहाकरितां आणली. तिच्याशीं शहानें लग्न करून परीचेहेर ( स्वर्गांची रंभा ) असें तिचें नांव ठेविलें. असो!

४०. ह्याच अल्लाउद्दीनाच्या कारकीर्दीत (शके १३७५) मलिक उल्तुजार यानें आपल्या हाताखालीं बरेंच मोठें सैन्य घेऊन जुन्नरहून कोंकणांत स्वारी केली. ह्या स्वारींत प्रथम शिरके राजांचा प्रांत उद्ध्वस्त करून त्या कडव्या व स्वतंत्र मराठ्यांस जेरीस आणावयाचा त्याचा विचार होता. शिरके राजांची राजधानी ह्या वेळीं भैरवगडावर* होती. मलिकाचें सैन्य जवळ येत आहे, असें पाहतांच शिरक्यांनीं त्यांच्याशीं संधि करण्याचा किंवा कांहींतरी बोलणें चालवून वेळ मारून नेण्याचा पोक्त विचार काढला. मलिकानें विजयमदानें, शिरक्यांनीं एकदम मुसलमानी धर्म स्वीकारावा म्हणजे त्यांचें राज्य व वैभव आपण

*विशालगडाच्या थोडेंसें उत्तरेस भैरवगड हें स्थान आहे. शिरके राजे हे ह्या भैरवगडाच्या भोंवतालच्या म्हणजे पुण्याच्या जवळील कोंकण बांदमाध्यापासून वारणेपर्यंतच्या प्रदेशांत फार पुरातन काळापासून तों पुढें शके १६९० पर्यंत स्वामी होते.

सलामत राखूं, असें मोठें डौलाचें बोलणें लावलें. तेव्हां शिरक्यां-नींही खऱ्या मुत्सद्दीपणानें असें बोलणें लावलें कीं, आपला जातभाई व आप्त जो विशालगडचा राजा शंकरराव, तो जर मलिकास वश होईल किंवा त्यास जर मलिक प्रथम लढाईंत पाडाव करुन कुराणभक्त बनवील, तर मग आपण मुकाट्यानें मलिकाचें म्हणणें मान्य करूं. मलिकास हा विचार फारच आवडला; पण ह्या कामीं शिरक्यांनींही आपल्या सैन्यानिशीं शंकराविरूद्ध लढण्यास मदत करावी, असें त्यानें आग्रहाचें बोलणें लावलें. शिरक्यांनीं तें मान्य करुन 'यथा यक्षस्तथा बलिः' असें वागण्याचें ठरविलें. इकडे शंकरराव हा, शिरक्यांनीं त्यास सर्व भेद अगोदरपासूनच देऊन ठेविल्यामुळें आपल्या कडेकोट तयारीनें मलिकाची वाटच पाहत होता. मलिक आणि शिरके यांचें सैन्य संगमेश्वर आणि लांजे ह्यांच्या मधील माळांतून दोन दिवस प्रवास करीत होतें. तिसरे दिवशीं हें सैन्य दाट झाडांतून आणि दऱ्याखोऱ्यांतून वाट काढीत काढीत जात असतां संध्याकाळच्या सुमारास तें इतकें गुरफटलें कीं, एका तुकडीची दुसरीस दादही लागेनाशी झाली. अशा आडसंधींत शंकररावानें पूर्वसंकेताप्रमाणें ह्या सैन्यावर एकदम छापा घातला. शिरके राजांनीं सहजगत्याच आपलें सैन्य एका बाजूला राखिलें होतें, त्यामुळें विस्खलित झालेल्या आणि अवघड ठिकाणीं सांपडलेल्या मलिकाच्या सैन्यास शंकर-रावानें असें चोपलें कीं, तें अगदीं गांगरून जाऊन हात-ही उचलीनासें झालें. शंकररावाच्या सैन्यानें मुसल्मानांची सरसहा कत्तल चालविली आणि प्रहरसहा घटकांत मलिक उल्तुजारासह ७००० मुसलमानांस कंठस्नान घालून अल्लाकडे पाठविलें. ह्यांत ५०० आरब सय्यद आणि पुष्कळ अबि-

सीनियन अधिकारी होते. ही कत्तल विशाळगडाजवळच झाली. उरलेंसुरलें सैन्य घाटावर पळून गेलें. तें चाकण येथें पोंचल्यावर मोंगलादि परदेशी यांनीं अशी भीति घातली कीं, दक्षिणी लोक फौज सोडून मागें राहिले म्हणून ही दुर्दशा झाली, असें आपण हुजुर कळवूं. शेवटीं हें भांडण विकोपास जाऊन दक्षिणी सरदार निजाम उल्मुलुक इत्यादींनीं चाकणच्या किल्ल्यांत २५०० परदेश्यांची कत्तल उडविली.

४१. वरील शिरके यांच्या गहजबाचा प्रतिकार पुढें सोळा वर्षें म्हणजे शके १३९१ पर्यंत मुसलमानांकडून झाला नाहीं. इतक्या वेळांत उलट शंकरराव आपल्या ३०० तारवांच्या* साधनानें मुसलमानांस समुद्रकिनाऱ्यावरही सारखा त्रास देत असे. त्यानें आरबी, इराणी वगैरे परदेशी व इतर देशी मुसल्मानांचा व्यापार कधींही नीटपणें चालू दिला नाहीं. एकंदरींत, चौदाव्या शतकाच्या अखेरपर्यंत पश्चिम महाराष्ट्र—विशेषत: कोंकण आणि घाटमाथा- व दक्षिण महाराष्ट्र ह्यांतील मराठ्यांनीं आपलें स्वातंत्र्य कायम राखिलें. त्यांनीं मुसलमानांस दाद दिली नाहीं. शके १३९१ (इ. स. १४६९) त त्या वेळच्या ब्राह्मणी बादशहाचा मुख्य कारभारी महमूद ख्वाजा गावान यानें पश्चिम महाराष्ट्राचा विजय करण्याकरितां लाखांत सैन्य घेऊन दाभोळ व चौल ह्यांलगत स्वारी काढली. लवकरच त्याला असें आढळलें

---

* रा. दत्तात्रय बळवंत पारसनीस ह्यांनीं लिहिलेल्या ' मराठ्यांचें आरमार ' ह्या पुस्तकांत शके १५८२ च्या पूर्वी मराठ्यांच्या आरमाराचें कधींच अस्तित्व नव्हतें, असें ध्वनित केलें आहे; परंतु वरील खेळण्याच्या राजाचें ३०० तारवांचें आरमार शके १३५० पासूनच असल्याचें दिसतें. आणि समुद्र-किनाऱ्यालगतच्या प्रत्येक लहानमोठ्या मराठा राजाचें असेंच लहानमोठें आरमार असावें, असें मानण्यास जागा आहे.

कीं, आपले घोडेस्वार ह्या मुलखांत निरुपयोगी होत. तेव्हां त्यानें घोडेस्वार परतविले आणि पायदळच वाढवून मोठ्या कसोशीनें आणि धीरानें तो एकएक मुक्काम करीत व ठिकठिकाणीं आपलीं कायमचीं ठाणीं बसवीत चालला. होतां होतां विशाळगडालाही वेढा पडला. रोज घनघोर लढाई चालू झाली. विशाळगडकर वेळोवेळीं गडाखालीं उतरून मुसलमानांची कत्तल उडवीत व चालते होत. महंमद ख्वाजा गावानही दर चारदोन दिवसांनीं फौजेचे विडे उचलवून किल्ला सर करण्याचा जोराचा यत्न करीत असे; परंतु किल्ल्यावरून वर चढण्याचा यत्न करणाऱ्या मुसलमानांच्या अंगावर धोंडे लोटणें, बाणांचा वर्षाव करणें व तापलेल्या तेलांच्या कढयांच्या कढया लवंडणें असल्या प्रकारांनीं शंकरराव गावानाचा प्रयत्न निष्फळ करून प्रत्यहीं हजारों मुसलमानांस कंठस्नान घालीत असे. ह्याप्रमाणें आठवडे, पंधरवडे, महिने आणि ऋतुही लोटत चालले तरी किल्ला हस्तगत होईना. शेवटीं, पावसाळ्याचें तोंड लागतांच पांच महिने चालविलेलें व ज्याकरितां हजारों लोक बळी दिले तें वेढ्याचें काम तसेंच टाकून मुसलमानांस वेढा उठवून परत जाणें भाग पडलें. तथापि महंमद गावानानें नेहमींप्रमाणें ह्या वेळींही विशाळगडचा शह उठवून राजधानीचा मार्ग न धरितां, सर्व सैन्य तसेंच वरघाटी लढाईच्याच शिरस्त्यांत ठेविलें; आणि फिरून आणखी पायदळ जमवून व शंकररावास बाहेरून साहाय्य न पोंचेल अशा रीतीनें नाकेबंदी कायम ठेवून पावसाळा संपतांच फिरून नव्या दमानें आणि वाढल्या सैन्यानिशीं वेढा घालण्याची तजवीज चालविली. ह्याप्रमाणें पावसाळा संपतांच विशाळगडाला वेढा पडला व कांहीं दिवसांनीं एका घरभेद्याच्या साहाय्यानें तो किल्ला गावानाच्या हातांत आला. शंकरराव पळून

गेला, तरी पुढें दीड वर्षपर्यंत त्यानें आपल्याकडून ही लढाई खुल्या मुलखांत चालू ठेविलीच होती. शेवटीं शंकररावाचा निरुपाय होऊन गावानाचा जयजयकार झाला. तथापि ह्या वेळींही दक्षिण कोंकण गावानाच्या पुरें कबज्यांत आलें नाहीं तें नाहींच. कवडी, भारप किंवा सुधागड, पाली अथवा सहस्रगड, माहुली, दंडाराजपूर इत्यादि ठिकाणें अजूनही मराठ्यांच्याच ताब्यांत होतीं.

४२. इकडे विजयानगरास शके १३६६ च्या सुमारास चिमणा देवराय हा परलोकवासी झाला. त्याच्या मागें पांच एक वर्षें गादीवर कोण होता हें निश्चयानें सांगतां येत नाहीं. कदाचित् चिमणा देवरायच शके १३७१ पर्यंत जगला असेल, असेंही मानण्यास जागा आहे. तथापि विजयानगर येथें शके १३६४।६५ (इ. स. १४४२-४३) त चिमणा देवरायाच्या संबंधानें एक फार भयंकर गोष्ट घडली आणि त्यानंतर पांचसहा महिन्यांत त्याची इहलोकयात्रा संपली असावी असें म्हणावें लागतें. देवरायाच्या जिवावरच त्याच्या एका नातलगानें—अबदुल रझकच्या* म्हणण्याप्रमाणें भावानेंच—प्रसंग आणिला. ह्या वेळेपासून विजयानगरचें साम्राज्य जें अंतःकलहाच्या तावडींत सांपडलें तें बरींच वर्षें किंबहुना फिरून केव्हांही, त्यांतून सुरक्षित बाहेर पडलें नाहीं. असो! देवरायाच्या जिवावरचा प्रसंग पुढें दिल्याप्रमाणें घडून आला :—

४३. देवरायाच्या भावानें आपणाकरितां एक नवीन राजवाडा बांधिला. त्याच्या वास्तुसमारंभाच्या निमित्तानें देवरायास व इतर सर्व सचिव आणि सेनापति इत्यादि

* अबदुल रझक हा विजयानगरच्या व कालिकतच्या झामोरीनच्या दरबारीं इराणच्या शहाचा परराष्ट्रीय वकील म्हणून असे.

मोठमोठ्या अधिकाऱ्यांस निमंत्रण केलें. सर्व निमंत्रित मंडळी एका सभामंडपांत जमली. मंडळीच्या मनोरंजनार्थ सर्व प्रकारचीं वाद्यें वाजत होतीं. देवरायाच्या येण्याची वाट पहात असतां त्याजकडून असा निरोप आला कीं, रायाच्या प्रतिनिधी-दाखल अमुक अमुक मनुष्य येईल. त्याप्रमाणें तो रायप्रतिनिधी येतांच एकदम ठरलेल्या ठिकाणीं दोन मारेकऱ्यांनीं तो राजाच समजून त्याचें शिर उडविलें आणि धडाचे तुकडेतुकडे केले. हें कृत्य चाललें असतां वाद्यांचा गजर फारच दणक्यानें चालला होता. बसावयाच्या सभामंडपाहून उपाहाराची जागा वेगळी होती. तेथें एकएकास नेऊन यथेच्छ उपाहारास घालण्याची चाल असे. रायप्रतिनिधीची वाट लागतांच दुसऱ्या निमंत्रितांची पाळी आली; आणि ह्याप्रमाणें जो एकदां सभामंडपांतून उठून उपाहारस्थलीं गेला तो आपल्या प्राणांस मुकलाच. ढोल वगैरे सर्व तऱ्हेचीं वाद्यें त्या वेळीं इतकीं मोठ्यानें वाजविण्याची व्यवस्था होती कीं, ह्या भयंकर कृत्याची परिस्फुटता म्हणून मुळींच होऊं नये. सर्व मोठमोठे मानकरी ह्या राजवाड्यांत—नव्हे वेताळ-वाड्यांत – एकामागून एक प्राणांस मुकले. आतां कोणी शिल्लक राहिला नाहीं, असें होतांच, हा राजपुत्र किंवा मनुष्यरूपी राक्ष-साधम रायाच्या वाड्यांत गेला. प्रथम त्यानें चौकीवरील सर्वांस मोठ्या गोड शब्दांनीं आपल्या वाड्यांतील समारंभास जाण्या-बद्दल विनंति केली. राजपुत्राची विनंति म्हणजे आज्ञाच, असें समजून ते सर्व गेले व त्यांचीही तिकडे पहिल्या अभ्यागतां-प्रमाणेंच वाट लागली. आतां वाड्यांत कोणीही सशस्त्र मनुष्य राहिला नाहीं असें पाहून संरक्षकविरहित झालेल्या रायाकडे हा अधम आपल्या हातांत एक विड्याचें ताट घेऊन गेला. ह्या ताटाखालीं एक कट्यार होती. रायापुढें जाऊन तो त्यास

म्हणाला, ' महाराज ! सर्वजण आपणांकरितां अगदीं खोळंबून बसले आहेत. ' राजाला काय स्फूर्ति झाली कोण जाणे ! त्यानें उत्तर केलें कीं, ' आज माझें कपाळ दुखत आहे, आणि एकंदरींत प्रकृति नीट नाहीं, तेव्हां मी येत नाहीं. ' हें ऐकतांच आपला हेतु साधत नाहींसें पाहून त्या बांधवाधमानें आपली कट्यार काढली आणि रायाला दोनचार वार केले. त्यासरशीं तो आसनावरून निपचित खालीं पडला. तेव्हां तो मेला असें समजून त्याचें शिर कापून आणण्याकरितां तेथें आपला एक हस्तक ठेवून हा क्रूर, राजद्रोही, कुलद्रोही राक्षसाधम तेथून निघून गेला. बाहेर येतांच राजवाड्याच्या गच्चीवर उभे राहून ' आपण रायाचा, त्याच्या भावांचा, फलाण्या फलाण्या सेनापति सचिवांचा आणि ब्राह्मणादिकांचा वध केला आहे, तेव्हां आतां आपणच राय आहों. ' असें हा सृष्टिकलंक भाऊ मोठ्यानें ओरडून आपली आपणच थाळी पिटूं लागला.

४४. इकडे या नराधमाचा हस्तक राजाचें मस्तक तोडण्यासाठीं राजासनाजवळ गेला. राय केवळ मेलेल्याचें सोंग घेतलेला होता. त्या मारेकऱ्यास पाहतांच त्यानें आपलें तें आसनच उचलून त्याच्या छातींत अशा जोरानें मारिलें कीं, त्या योगानें कोलमडून तो जमिनीवर पडला. इतक्यांत चाललेल्या प्रकारास भिऊन कोपऱ्यांत लपलेला एक राजसेवक राजा जीवंत आहे असें पाहून धैर्यानें पुढें झाला; आणि त्यानें एका वारासरसें त्या मारेकऱ्यास पंचत्वास पोंचविलें व रायास घेऊन तो अंतर्गृहांतील गुप्त द्वारानें बाहेर पडला. तों वर सांगितल्याप्रमाणें रायाचा तो कुलकलंक भाऊ गच्चीवरून राजवाड्यापुढें जमलेल्या सर्व प्रजाजनांस, आपणांसच आतां सर्वांनीं राय म्हणावें म्हणून मोठ्या आवेशानें

सांगत असतांना पाहून चिमणा देवराय नागरिकांस म्हणाला :– ' हा पहा, मी जीवंत आहें. चांगला खडखडीत आहें. तुम्हांला माझी अशी आज्ञा आहे कीं, ह्या राजद्रोह्यास धरा; त्याला चतुर्भुज करा; त्याला देहांत शासन करा. ' मग काय विचारतां ? जमलेल्या राजनिष्ठ नागरिकांनीं लगेच त्या राक्षसास गांठून जागच्या जागीं ठार केलें.

४५. ह्या विलक्षण क्रूर सत्रांत मोठ्या अधिकाऱ्यांपैकी मुख्य दानाइक मात्र एकटा बचावला होता; कारण तो ह्या वेळीं सिलोन–सिंहलद्वीपा-च्या सरहद्दीकडे कांहीं व्यवस्था करण्यासाठीं गेला होता. देवरायानें त्याला ताबडतोब परत बोलाविलें. तो येतांच ह्या क्रूर कटांत जे कोणी सामील होते त्या सर्वांस देहांत प्रायश्चित्त देण्याची व्यवस्था झाली. इकडे ह्या विजया-नगरकराकडील घरगुती भानगडींची वार्ता सुल्तान अल्लाउद्दी-नाच्या दरबारीं लागतांच, ही संधि विजयानगरकरांशीं भांडण उकरून काढण्यास चांगली आहे, असें मुसलमान दरबारास वाटून त्याजकडून विजयानगरकरांवर सात लाख वराहांची मागणी करण्यांत आली. ही अन्यायाची मागणी पोचतांच आधींच संतापलेला देवराय विशेष चिडला आणि त्यानें सैन्याची जमवाजमव करून दानाइकास कलबुर्ग्यावर स्वारी करण्यास पाठविलें. फेरिस्तानें ह्या स्वारीस ' निष्कारण ' म्हटलें आहे, तें निवळ पक्षपातीपणाचें होय. असो. पहिल्या दणक्यास तुंगभद्रा पार होऊन विजयानगरकरांनीं मुदकलचा किल्ला सर केला. देवरायानें आपल्या दोघां मुलांस रायचूर आणि बंकापूर ह्यांना वेढा देण्यास पाठविलें व खासा स्वारीचा तळ कृष्णातीरास ठोकून भोंवतालचा सागर, विजापूरपर्यंतचा प्रांत लुटून, जाळून-पोळून उध्वस्त करण्याचा सपाटा चालविला.

४६. अल्लाउद्दीनही आपलें जाळें आपल्या गळ्याभोंवतीं आलेलें पाहून जागा झाला आणि वऱ्हाड, दौलताबाद व तैलंगण अशा सर्व प्रांतांतून शक्य तितकें सैन्य जमवूं लागला. हें सर्व सैन्य जमल्यावर सुलतानानें त्याची पाहणी आणि मोजणी केली; तों पन्नास हजार स्वार, साठ हजार पायदळ आणि शिवाय तोफखाना वगैरे इतकी जंगी जमात झाली. ह्या प्रचंड सैन्यानिशीं सुलतान देवरायाच्या तोंडावर निघाला. ही बातमी लागतांच देवरायानें आपला कृष्णातीरावरील उघडा तळ उठवून तो मुद्कलच्या किल्ल्याच्या तटाखालीं नेला; व एक मोठें सैन्य बाजूला काढून तें पुढें येणाऱ्या सुलतानास जेर करण्यास पाठविलें.

४७. ह्या स्वारींत तीन मोठमोठ्या लढाया झाल्या. त्यांत देवरायाचा वडील मुलगा मारला गेला. बाकी सरशी हिंदूंचीच झाली. शेवटच्या वेळीं हिंदूंनीं शत्रूस पाठीवर घेतलें आणि घुलवीत घुलवीत दोन मुसल्मान सरदारांस अगदीं नगरांत येऊं देऊन एकदम उलटून त्या दोघांसही पाडाव केलें. हे दोन मोठे सरदार हातीं येतांच देवरायानें अल्लाउद्दीनास असा निरोप पाठविला कीं, 'फिरून आपण माझ्या प्रांतास धक्का लावणार नाहीं असें जर वचनप्रमाण करीत असाल, तर लढाईच्या पूर्वी आपणां दोघांमध्यें असलेल्या नात्यास धक्का न लावतां मी आपले सरदार आपणांकडे परत करितों.' सुलतानानें ही गोष्ट मान्य केली आणि ह्या दोन विधर्मी राजांचा संधि झाला. हा संधि पुढें अल्लाउद्दीनाच्या कारकीर्दीत तरी कोणींही मोडला नाहीं. ह्या लढाईनंतर थोड्याच दिवसांनीं विजयानगरच्या पराक्रमी राजांतील अद्वितीय अशा ह्या देवरायानें राम म्हटलें; आणि त्याच्यानंतर त्याचा मुलगा सिंहासनारूढ

झाला. ह्याचें नांव पिनाराय. ह्याचें लवकरच देहावसान होऊन त्याचा मुलगा विरुपाक्ष गादीवर आला. विरुपाक्षाचा त्याच्याच वडील मुलानें राज्यलोभानें वध केला व ह्या पितृहत्याऱ्याचा प्रौढ देवराय नांवाच्या त्याच्या धाकट्या भावानें वध केला. ह्या प्रौढ देवरायाचेंहि सिंहासन स्थिर न राहतां तें नरसिंहराय नांवाच्या एका उपटसूळानेंच बळकाविलें व विजयानगरचें पहिलें राजघराणें अंत पावलें ! ह्याप्रमाणें श्रीमन्नृसिंह-सरस्वतींच्या अंतर्धानापासून म्हणजे शके १३८० पासून सुमारें ३०।३५ वर्षे दक्षिणेंत बेदरच्या मुसलमानी बादशाहींत व विजयानगरच्या हिंदु किंवा देशी साम्राज्यांत सर्वतोपरी घोंटाळाच माजून राहिला होता; त्यामुळें एकमेकांकडून एकमेकांच्या मुलखास विशेषसा उपसर्ग पोंचणें जवळजवळ अशक्यच होतें. तथापि अल्लाउद्दीनाच्या मागून बेदरच्या तख्तावर आलेल्या क्रूर हुमायुनानें शके १३८३ (इ. स. १४६१) त तेलंगणावर स्वारी केली होती; परंतु तेलंगी लोकांनीं मुसलमानांचा प्रतिरोध इतका धैर्यानें आणि निकरानें केला कीं, मुसलमानांस नाक मुठींत घेऊन माघारीं पळच काढावा लागला. ह्या वेळीं विजयानगरास मल्लिकार्जुन सिंहासनाधिष्ठित होता. हुमायुनाच्या मागून मागें दर्शविल्याप्रमाणें आठ वर्षांचा मुलगा निझामशहा शके १३८५ (इ. स. १४६३) त गादीवर आला असें आजपर्यंतच्या सर्व ऐतिहासिक पुस्तकांतून आढळतें; परंतु रा. रा. विश्वनाथ काशीनाथ राजवाडे बी. ए. यांस सांपडलेलें एक शके १३९६ तील फर्मान ब्राह्मणी बादशहा हुमायून ह्याचें आहे. तें अस्सल आहे. त्यावर दरबारच्या सर्व वजिरांचे स्पष्ट शिक्के आहेत. त्या फर्मानाचा विषय दुर्गाडी नांवाच्या सप्तवार्षिक दुष्काळानें उध्वस्त झालेल्या वतनांचा,

दुष्काळाच्या आधींच्या वतनदारांस फिरून भोगवटा मिळण्यासाठीं हुकूम देणें, हा होय. ह्याच सालचा असल्याच विषयाचा एक महजरही रा. राजवाडे यांजजवळ आहे* त्यावरून शके १३८९ (इ. स. १४६७) पासून शके १३९६ (इ. स. १४७५) पर्यंत महाराष्ट्रांत भयंकर दुष्काळ पडला होता. कारण फर्मानाचें साल खमस सबाइन व सामान मैया म्हणजे अरबी ८७५, तारीख ७ रमजान आहे. सुहुरसन ८७५ च्या रमजानच्या सातव्या तारखेस, शके १३९६ माघ शुद्ध ९ रविवार आणि सन १४७५ च्या जानेवारीची सोळावी तारीख पडते. ग्रांट डफ शके १३१८ (इ. स. १३९६) तील एकच दुर्गादेवीचा दुष्काळ सांगतो; फेरिस्ता इ. स. १४७१-१४७२ तील दोन वर्षांचाच एक दुष्काळ उल्लेखितो; आणि सोलापूर ग्याझेटियरमध्यें शके १३८२ (इ. स. १४६०) तील दुष्काळास दामाजींचा दुष्काळ म्हणून म्हटलेलें आहे. एकंदरींत, कशाचाच कांहीं मेळ नाहीं; तथापि फर्मानाची साक्ष खोटी धरितां येत नाहीं. कारण त्यावर अस्सल सहीशिक्के असून दुसऱ्या महजराचा व त्याचा उत्तम मेळ आहे. तेव्हां ग्रांट डफ, फेरिस्ता आणि ग्याझेटियरकार हे सर्व चुकले असून ह्या बाबतींत अविश्वसनीय होत. त्यांची अविश्वसनीयता ह्या दुष्काळाच्या कालनिर्णयापुरतीच किंवा त्याच्या विस्तारासंबंधींच नसून शके १३८२ त हुमायूनशहा बाहामणी मेला म्हणून जें त्यांनीं प्रतिपादिलें आहे तेंही साफ खोटें ठरतें; कारण वरील फर्मान व महजर हीं हुमायूनशहाच्या शिक्क्याचेंच आहेत. त्यावरून तो शके १३९६ म्हणजे इ. स. १४७५ त हयात होता असेंच मानावें लागतें.

---

* हे दोन्ही अस्सल कागद फर्मानाच्या प्रकाशलेखासह श्रीसरस्वतीमंदिराच्या चैत्र शके १८२६ च्या अंकांत छापले आहेत.

तथापि हुमायून शके १३८६ त मेला असें समजून पुढील १३ वर्षांचा इतिहास खालीं देतों.

४८. ब्राह्मणी बादशाहीचा उगम जसा एका ब्राह्मणाच्या आशीर्वादानें मिळालेल्या उत्तेजनानें झाला, तसा तिचा अंतही विनाकारण झालेल्या ब्रह्महत्येच्या पातकानेंच घडला. हुमायून बादशहाच्या मागून रूढ समजुतीप्रमाणें त्याचा मुलगा निजामशहा शके १३८३ त आणि त्याच्यामागून त्याचा भाऊ महंमदशहा शके १३८५ त केवळ ९ वर्षांचा असतांना तख्तनशीन झाला. अर्थात् ह्या दोन्ही कारकीर्दींत हुमायूनशहाची बायको, ख्वाजाजहान आणि ख्वाजेमहंमद गावान ही त्रयीच वास्तविक अधिकारारूढ होती. शिवाय हुमायूनचे हे दोन्ही मुलगे बापाप्रमाणेंच विषयलंपट, अविचारी आणि एकंदरींत दुर्व्यसनीच निपजल्यामुळें सरदारांचें फारच फावलें. हुमायूनशहाचा विषयलंपटपणा आणि अविचार शेवटीं शेवटीं इतका वाढला होता कीं, रस्त्यांतून लग्नाची वरात जात असली तर ह्यानें नवरीस धरून आणवून तिच्यावर बलत्कार करावा ! याचा वडील मुलगा जो निजामशहा तो तर केवळ दोन वर्षे एक महिनाच तख्तावर होता. त्याचा त्याच्या लग्नसमारंभांतच खून झाला. त्याचें लग्न तो बराच लहान होता तरी आईच्या केवळ हौसेखातर जमविलें होतें असा उल्लेख आहे. ह्यावरून हा निजामशहा दहाअकरांहून जास्त वयाचा नसावा. पुढें महंमदशहा तर नववे वर्षीच तख्तावर आला, असा स्पष्ट उल्लेख वर केला आहे; तेव्हां दरबारचा शिक्का राणीनें कदाचित् आपल्या नवऱ्याच्याच नांवाचा कायम ठेविला असण्याचा पुष्कळ संभव आहे. कारण खरी सत्ताही तीच चालवीत असे. मुलें तर इतकीं लहान होतीं. त्यामुळें महंमदशहा मोठा होऊन स्वतः कारभार पाहूं लागेपर्यंत

बापाचाच शिक्का चालू राहण्याचा असंभव तरी खास नाहीं. ह्या रीतीनें शके १३९६ तील दुष्काळानंतरच्या जुन्या वहिवाटी फिरुन दाखल करण्याचे कामीं दिलेल्या फर्मान व महजर यांत हुमायून बादशहाचें नांव आणि शिक्का असणें हें हुमायूनशहा जिवंत असल्याचेंच दर्शक समजून पुढील ह्या दोन कारकीर्दींच्या तारखा सर्वस्वीं चुकल्या, असेंच मानण्याचें अगत्य नाहीं. अस्तु.

४९. शके १३९६ म्ह. इ. १४७४ पुढें ब्राह्मणी बादशाही तख्तावर असणारा महंमदशाहा हळूहळू मोठा होऊन आपल्या मुखत्यारीनें स्वारीशिकारी करूं लागला. तो जसजसा मोठा होत गेला तसतसा त्याचा स्वभाव क्रूर आणि खुनशी बनून विशेषतः त्याच्या राजवटीच्या शेवटीं शेवटीं म्हणजे शके १३९८ पासून जें जाज्वल्य धर्मवेड त्याच्या डोक्यांत शिरलें तें कांहीं अवर्णनीय ! ह्यानें महाराष्ट्रांतील खानदेश प्रांतांत अंतूराच्या एका मराठे राजावर आणि वीरगडच्या बिजेसिंगराव नांवाच्या रजपूत राजावर हल्ले करवून ते किल्ले घेतले. त्याचप्रमाणें रांजणी ( रांजणगांव ) चाकिल्लाही घेतला. पुढें बेळगांव किल्ल्याचा विजयानगरचा मांडलिक राजा वीरकर्णराय व बंकापूरचा हिंदुराजा हे गांवें परत घेण्याकरितां जाणार असें समजतांच महमदशहानें त्यांजवर स्वारी काढली. वीरकर्णराय परत फिरला. किल्ला फार मजबूत आणि आंत सामग्री मातबर होती. भोवती उत्तम खंदक होता. तरी वीरकर्णराय तहास राजी होता; परंतु महंमदशहानें त्याचें म्हणणें न ऐकतां वेढा कायम केला. महंमदशहानें तोफांनीं तटास खिंडार पाडण्याचा व त्याच अवधींत खंदक भरून काढून फौजेस त्या खिंडारावाटे आंत जाण्यास सांपडावें म्हणून पंधरा दिवस प्रयत्न चालविला. परंतु दिवसा मुसलमानी सैन्यानें खंदकांत आणून टाकलेली खंडोगणती माती आणि लांकडें

रात्रीं वीरकर्णराय काढून टाकून फिरून खंदक साफ करून ठेवीत असे. शेवटीं महंमदशहानें जमीन खोदून आंत सुरुंग लावून तट उडविण्याची व खंदक बुजविण्याची एक अगदीं नवीनच क्लृप्ति योजली. ह्या क्लृप्तीचा वीरकर्णरायास कांहींएक थागा-दोराही नव्हता. तो पाण्यानें तुडुंब भरलेल्या आपल्या विस्तृत खंदकाच्या भरंवशावर आपणास निर्भय समजत होता. शेवटीं अदिलखान, महंमद गावान आणि इमाद उलमुल्क या तिघांच्या छावण्यांतून तीन सुरुंग उडाले आणि तटास तीन ठिकाणीं एक-दम तीन खिंडारें पडलीं. वीरकर्णानें लागलीच तिन्ही ठिकाणीं आपले लोक नेऊन खिंडारें बुजविणें आणि चालून येणाऱ्या शत्रूच्या सैन्याशीं लढणें हीं दोन्हीं कामें चालविलीं. ह्या झटा-पटींत शहाचें २००० लोक पडले. किल्ल्यांतील लोकांनीं तिन्ही खिंडारें फिरून दगड आणि माती यांनीं रिचून भरून काढिलीं, तथापि शेवटीं वीरकर्णरायास किल्ला खालीं करून वेबांतर करून शहास शिर नमवून जीवदान घ्यावें लागलें. ह्या स्वारींत शहा-बरोबर त्याची आई मायी राणी होती. तिच्याच शहाणपणानें व जरबेनें महंमदशहा अजून बेताल झाला नव्हता; पण याच सुमारास स्वारींतून परत येतांना ती वारली. शके १३९६ तील सुप्रसिद्ध दुर्गादेवी किंवा दामाजीचा दुष्काळ झाला, त्याची हकीकत पुढें दिली आहे. त्यानंतर कोंडापिल्लीच्या रक्षक सैन्यानें बंड करून आपल्या सुभेदारास ठार केलें आणि यथेच्छ लूट करून ओरि-साच्या राजाचा तेलंगणचा सुभेदार जो भीमराज त्याच्या स्वाधीन किल्ला केला. भीमराजानें आपल्या स्वामीच्या आज्ञेनें १०००० स्वार आणि ८००० पायदळ जमवून कोंडापिल्ली प्रांत व किल्ला यांचें धैर्यानें रक्षण करण्याचा निश्चय करून आपल्या तैलंगणच्या वडिलोपार्जित राज्याचा मुसलमानांनीं जिंक-

लेला मुलूख सोडविण्यासाठीं तो एकदम तैलंगण प्रांतांत शिरला. तेव्हां त्या बाजूच्या ब्राह्मणी सुलतानाचा राजमहेंद्री येथें असणारा सुभेदार निजाम उल्मुल्क ह्याचें धावें दणाणून त्यानें हुजुरास मदतीचा अर्ज केला. तेव्हां ह्या स्वारीवर महंमदशहा खासाच जाण्यास सिद्ध झाले. शहाबरोबर निवडक वीस हजार सैन्य असून शिवाय निजाम उल्मुल्काचें सैन्य त्या प्रांतांत होतें तें निराळेंच. शहाची स्वारी क्रूरपणानें गरीब निःशस्त्र खेडवळांची आणि ब्राह्मणादिकांची सरसहा कत्तल करीत आणि जाळपोळ करून मुलूख उध्वस्त करीत जी निघाली ती थेट ओरिसाच्या राजधानीपर्यंत जाऊन धडकली. ओरिसाचा राजा आपल्या सैन्यानिशीं आपल्या राज्याच्या दुसऱ्या टोंकाला गेला असल्यानें मुसल्मानांस मन मानेल तसें करण्यास सांपडलें. त्यांनीं सारखी लूट व कत्तलच सुरू केली. हें वर्तमान ऐकून ओरिसाच्या राजानें हत्ती व इतर जवाहीर यांचा नजराणा देऊन आपला वकील शहाकडे पाठविला आणि असें समजाविलें कीं, या प्रसंगीं शहा जर लढाई बंद करतील तर तैलंगणच्या जमेदारास आपण यापुढें कधींही पाठीशीं घालणार नाहीं. तेव्हां शहानें आपण मागूं ते आणखी पंचवीस हत्ती जर राजा आपणांस देईल तर तह करूं असें फर्माविल्यावरून ज्या हत्तींचें मोल आपल्या जीवाआगळें असें राजा मानीत असे, असे २५ हत्ती त्यांवरील सर्व सोन्यारुप्याच्या शृंगारांसह केवळ प्रसंगाकडे पाहून राजानें शहाकडे पाठविले. झालें! वास्तविक पहातां येथेंच हें प्रकरण संपावयास पाहिजे होतें; तथापि आपल्या निरंकुश क्रौर्यास अनुसरून परत फिरतांनाही ओरिसाच्या राजाचा एक किल्ला शहाच्या दृष्टीस पडला असतां, तो कुणाचा किल्ला असें शहानें तेथल्या

खेडवळ प्रजेपैकीं कांहींस विचारिलें. त्यांनीं तो अमक्याचा तमक्याचा म्हणून सांगून व आपल्या समजुतीप्रमाणें त्या किल्ल्याची 'हा अगदीं अभेद्य व अजिंक्य आहे' अशी थोडीशी स्तुतीही केली. ही स्तुति शहास न आवडून त्यानें त्या किल्ल्यावर हल्ला चढविला. किल्ल्यांतील लोक मोठ्या शौर्यानें लढूं लागले. दीडदोन महिने झाले तरी शहास ते दाद देईनात. ओरिसाच्या राजास ही बातमी समजतांच 'खेडेगांवच्या लोकांना सभ्यपणा व रीतिरिवाज ठाऊक नसल्यामुळें त्यांच्या हातून असा गुन्हा घडला; तरी किल्ला जिंकून शहानें आपला ताबेदार मांडलिक जो ओरिसाचा राजा यास तो दिला असें शहानें समजावें,' अशी त्यास विनंति केली. तेव्हां शहाची स्वारी प्रसन्न होऊन वेढा उठवून चालती झाली.

५०. तेथून पुढें महंमदशहा कोंडापिल्लीस वेढा देऊन बसला. तेथंही सहा महिनेंपर्यंत भीमरायानें त्याला दाद दिली नाहीं. परंतु शेवटीं कांहीं सरदारांच्या मध्यस्थीनें त्यानें माफी मागितली आणि किल्ला व शहर शहाच्या स्वाधीन करून आपण मोकळा झाला. त्याला म्हणजे मुख्य अपराध्याला माफी करून शहानें जाऊं दिलें; आणि आपण किल्ला पहावयास गेल्यावर केवळ धर्मवेडानें तेथील मारुती, नरसिंह इत्यादि देवांचीं देवळें पाडण्यास हुकूम करून पूजेसाठीं तेथें असणाऱ्या सर्व ब्राह्मणांस त्यानें आपल्या हातानें निष्कारण ठार केलें, त्यांतच गंगूच्या वेळीं दक्षिणेंत आलेल्या कनोजा जातीचा एक ब्राह्मण होता. तो परमभक्त आणि मोठा कर्मशील होता. त्याचाही वध ह्या महंमदशहानें केला. तो ब्राह्मण शहास पुष्कळ गोड शब्दांनीं त्या दुष्कर्मापासून परावृत्त होण्याविषयीं काकुळतीस येऊन विनवीत होता; परंतु कांहीं उपयोग न होतां

भुजंगास पयःपानाप्रमाणें होऊन शहानें विशेष हट्टानें त्याचा शिरच्छेद केला. त्यानें मरतांना ' ब्राह्मणी बादशाही थोड्याच दिवसांत नाहींशी होईल, आणि हे शहा, तुझें फार हालहाल होऊन अत्यंत पश्चात्तापांत तुला मरण येईल ' असा शापोच्चार केला, असें म्हणतात. त्याप्रमाणें पुढें अक्षरशः कसें घडून आलें हें पुढील प्रकरणाच्या प्रारंभींच दिसून येईल. असो ! शहानें ब्राह्मणवधाचें काम पुरें केल्यावर पाडलेल्या देवळाची मशीद बांधविली; आणि त्या मशिदींत स्वतः निमाज पढून आणि आपल्या नांवानें खुदबा वाचवून व स्वहस्तानें काफर ब्राह्मणांचा वध केल्याबद्दल आपणांस जाहीर रीतीनें ' गाजी' हा किताब घेऊन मग शहाची स्वारी आपल्या राज्यव्यवस्थेस लागली.

५१. शके १३९६ च्या दुर्गाडीच्या दुष्काळावरून संतमालिकेंतील दामाजीपंताचाही काळ ठरवितां येतो; कारण पुढें शके १४१०-११ त बेदरच्या ब्राह्मणी पादशाहीचे तुकडे होऊन बेदरचें सत्त्व नाहींसें झालें. तेव्हां त्या काळाच्या अगोदर आणि नृसिंहसरस्वतींच्या नंतर मोठा दुष्काळ असा हाच; शिवाय दामाजीपंत हा एकनाथांचे गुरु जनार्दनस्वामी ह्यांच्या आधींचा असल्यामुळें दामाजीपंतांचा काळ शके १३८९-९६ पर्यंतच्या दुष्काळाचाच होय. ह्याच दुष्काळांत दामाजीनें मंगळवेढ्यांतील बादशाही धान्याचीं कोठारें पंढरपूरच्या गोरगरिबांकडून यथेच्छ लुटविलीं आणि आपल्या देशधर्मबांधवांची विधर्मी राजसेवेपेक्षांही जास्त कळकळ आपणास असावयास पाहिजे, हें उदार तत्त्व लोकांपुढें मांडिलें. दामाजी हा विठ्ठलोपासक होता. देवानें त्याच्यावर त्याच्या भूतदयेनें झालेल्या राजकोपाचें निरसन केलें. नृसिंहसरस्वतींच्या

वेळेप्रमाणें ह्याही वेळीं हिंदुधर्माबद्दल मुसलमान बादशहास आदरबुद्धि उत्पन्न झाली. एकंदरींत, ह्या चव्दाव्या शतकांतील दामाजीपंतानें महाराष्ट्राची चांगलीच सेवा केली, ह्यांत तिलप्राय संशय नाहीं.

५२. दामाजीपंताची रसट म्हणून सुप्रसिद्ध अमृतरायशिष्य ब्रह्मगिरी यांनीं एक करुण आणि भक्तिरसानें ओथंबलेलें असें मोठें सुरस पद केलें आहे, तें महाराष्ट्र हरिदासांच्या व इतरही सामान्य रसिक जनांच्या तोंडीं आहेच. ब्रह्मगिरीच्या " वारी संकट हरि दामाजीचें । कौतुक देवाचें " ॥ ह्या सर्वतोमुखीं असणाऱ्या पदाखेरीज जनार्दन आणि नारायण पंडित या दोन महाराष्ट्रकवींचीही कांहीं काव्यरचना ह्या दीनदयाळ दामाजीच्या चरित्रावर आहे. परंतु त्यांपैकीं कोणतेंही काव्य येथें उतरून घेणें म्हणजे विषयांतर झालें नाहीं तरी विनाकारण पाल्हाळ होईल, म्हणून इष्ट नाहीं. पण फक्त स्वतः दामाजीपंतांचें श्रीविठ्ठलस्तुतिपर एकच पद उपलब्ध आहे तें मात्र येथें देतों. तें पद असें :—

**पद** ( मजला वरिल सुभद्रा काय—या चालीवर )
हरहर ! विठ्ठल जगदुद्धार ! ॥ जाहाला महार मजसाठीं ॥ ध्रु०॥
धन्य बेदरिंचा बादशाय ॥ त्याचा केला मीं अन्याय ॥
धान्य लुटण्याचा उपाय ॥ पूर्ण अपाय मजसाठीं ॥ १ ॥
षड्गुणैश्वर्य श्रीभगवान् ॥ सांडुनि देवपणाचा अभिमान ॥
पायीं घालून तुटकी वहाण ॥ नेसला जीर्ण लंगोटी ॥ २ ॥
माथां बांधुन चिंध्याभार ॥ काळी कांबळी खांद्यावर ॥
मुखानें म्हणत असे जोहार ॥ काळा दोर नेजकंठीं ॥ ३ ॥
ऐसें कां केलें देवा ॥ माझ्या सुकृताचा ठेवा ॥
माहार झालासि रे ! माधवा ॥ लाउनि वण्वा मजसाठीं ॥४॥

ज्याचें धान्य लुटिलें जाण ॥ तो तरि घेता माझे प्राण ॥
दामा म्हणे गुणनिधान ॥ ××××× जगजेठीं ॥ ५ ॥

५३. दामाजीपंत हा चौदाव्या शतकाच्या महाराष्ट्र इतिहासाकाशांत चमकलेला शेवटचा देदीप्यमान ताराच होय. श्रीपादश्रियावल्लभ व श्रीमन्नृसिंहसरस्वती हें अवतारद्वय या १४ व्या शतकाच्या इतिहासाचें आधारस्तंभ होय! ह्या द्वयानें, किंवा एकाच दत्तावतारानें म्हटलें तरी चालेल, मुसल्मानांच्या धर्मवेडास आळा घातला आणि मराठ्यांच्या व दाक्षिणात्यांच्या मनामध्यें स्ववर्णाश्रमधर्मपद्धतीविषयीं आणि श्रुति, स्मृति व पुराणादिकां-विषयीं पूर्ण आदर व दृढ श्रद्धा उत्पन्न करून महानुभावपंथा-सारख्या आपल्यांतीलच वर्णाश्रमधर्म झुगारून सर्व खिचडी करून टाकणाऱ्या धर्मपंथावर वेळींच प्रत्याघात करून सनातन धर्माची पुनः स्थापना केली. श्रीमन्नृसिंहसरस्वतींचा दत्तोपासनेचा सांप्रदाय पुढील शतकांत अधिक जोरास लागून मराठ्यांच्या भावी अभ्युदयाची मुहूर्तमेढ कशी रोवली गेली तो मनोरंजक आणि बोधप्रद भाग पुढील प्रकरणीं सादर करूं.

## प्रकरण ३ रें

## मराठ्यांचा मुसलमानी राजकारणांत विशेष प्रवेश
आणि
## राष्ट्रास उदयोन्मुख करणाऱ्या सत्पुरुषांचा-संतांचा-उदय.

१. चौदाव्या शतकाच्या अंतीं ब्राह्मणी बादशाही अंतःकोपानें जर्जर झाल्याचीं चिन्हें स्पष्ट दिसतच होतीं. तिच्या निरनिराळ्या कर्तृत्ववान् सरदारमंडळींत दक्षिणी आणि परदेशी अशा दुफळीनें जी चुरस वाढत चालली होती, तिचा परिणाम एक-

मेकांनीं एकमेकांच्या कागाळ्या बादशहाकडे करून एकमेकांचे दरबारांतलें वर्चस्व हाणून पाडण्यांत झाला. त्यांत त्यांनीं एकमेकांच्या कत्तली केल्या. वरिष्ठ सरदारांनीं मारेकरी घालून परस्परांचे खून उडविले. त्यांतच महंमदशहासारखा क्रूर, धर्मवेडा आणि अत्यंत हलक्या कानाचा व विषयलंपट बादशहा ब्राह्मणी तख्तावर असल्यानें हिंदु प्रजेचीं मनें वरचेवर दुखवून त्यांचा असंतोष संपादण्याच्या कामीं त्याजकडून मुळींच आळस झाला नाहीं. ह्या महंमदशहानें ह्या शतकाच्या अगदीं अरुणोदयींच एकाएकीं हिंदुप्रजेस निष्कारण गांजण्याकरितां म्हणून पुढील कृत्य केलें :— कोंडापल्ली प्रांताचा बंदोबस्त करीत असतां त्याच ठिकाणीं ह्या शहाचा मुक्काम असतांना त्यास कांहीं हलकट लोकांनीं अशी बातमी दिली कीं, येथून दहा दिवसांच्या मुक्कामावर★ कांचीचें देऊळ आहे. त्या देवळाच्या भिंती आणि छतें हीं सोन्याच्या पत्र्यांनीं मढविलेलीं आहेत व त्यावर हिरेमाणकांची नक्षी केलेली आहे. तें हिंदूंचें देऊळ कोणा मुसलमानानें अजून नुसतें पाहिलेंही नाहीं; कदाचित् त्याचें नांवही ऐकलें नसेल. हें ऐकून बादशहा खुलले ! लगेच बरोबर निवडक सातआठ हजार स्वार घेऊन स्वारी लांबलांब मजला मारीत निघाली, ती थेट त्या देवळाजवळ येऊन धडकली. देवळांत चोरांच्या वगैरे बंदोबस्तास म्हणून कांहीं सशस्त्र लोक असत. ते शहाची टोळधाड येतांच तिचा प्रतिकार करण्याकरितां पुढें सरसावले. पुष्कळ हिंदूंनीं प्रथम नानाप्रकारें शहाची व त्याच्या सरदारांची समजूत घालण्याचा उद्योग केला; परंतु कांहीं वळत नाहीं असें पाहून एका हिंदूनें ' मारीन किंवा मरेन ' अशा संकल्पानें नंग्या तरवारीसह आपला घोडा थेट शहाच्या

★ सध्याचें कांजीवरम्

अंगावर घातला. शहानें मोठ्या चपळाईनें त्याचें संधान चुकवून आपल्या तलवारीनें त्याच्या शरीराचे दोन तुकडे केले. इतकें होतांच इतर सर्व हिंदु चवताळून मुसलमानांवर चालून गेले. त्या चकमकींत शेंकडों हिंदूंचे मुडदे पडले. कित्येक वेळां शहाचाही मुडदा पडण्याचा प्रसंग आला होता. थोडक्याच वेळांत सर्व सशस्त्र हिंदु आपल्या धर्मार्थ धारातीर्थी पडल्यावर बाकीच्या निःशस्त्र व भ्याडांनीं देवळांत जाऊन देवळाचे दरवाजे बंद करून घेतले. शहानें सर्व फौज एकत्र करून ती एकदम सर्व देवळावर चालविली. आंतील लोकांनीं चार घटका चांगलाच टिकाव धरला; परंतु अखेर मुसलमानांचा आंत रिघाव होऊन सर्वत्र घनघोर कत्तल झाली. मुसलमानांनीं त्या देवळांतील सर्व संपत्ति लुटली आणि आठ दिवसपर्यंत शहराची लूटफाट, जाळपोळ व जुलूमजबरदस्ती ह्या मार्गांनीं खराबी करून शहाची स्वारी परत फिरली.

२. महंमद गावानावर शहाची अत्यंत कृपा झाली. त्याच्यासारखा एकनिष्ठ प्रधानच शहाच्या कारकीर्दींतील अफाट राज्यविस्ताराच्या सर्व श्रेयाचा स्वामी होता. निजाम उल्मुल्क, शरीफ उल्मुल्क इत्यादि सर्व दक्षिणी सरदार गावानाचा द्वेष करीत. गावानाच्या कर्तबगारीनें ह्या वाढलेल्या राज्याचे सर्व कारभार होत. पूर्वी ह्याचे चारच सुभे होते, ते गावानानें आठ केले. वऱ्हाडाचे दोन सुभे करून त्यांपैकीं गावल सुभ्यावर फत्तेल्लाउ इमादउल्मुल्क व दुसऱ्या माहूर सुभ्यावर खुदवंदखान हबशी यांस नेमिलें. दौलताबादच्या सुभ्यावर युसफ आदिलखानास आणि जुन्नरापासून वांई, इंदापूर व माणपासून खालीं गोवें व बेळगांवापर्यंतचा एकच सुभा करून त्यावर फकीर उल्मुल्क यास नेमिलें. विजापूर, भीमेच्या कांठचा मुलूख, रायचूर व मुद्गल हा सुभा

त्यानें आपणाकडे ठेविला. अहसनाबाद, कलबुर्गे, सागर, नळदुंग, सोलापूर इत्यादींचा एक सुभा दस्तूर दिनार ह्या हबशी खोजाच्या स्वाधीन केला. तैलगणचा सर्व प्रांताचा एकच सुभा निजाम उल्मुल्क बहिरी ह्याच्या ताब्यात असे, त्याचेही गावानानें दोन भाग केले. एकांत तैलंगण, राजमहेंद्री, मच्छलीपट्टण, बिल्कोंडा, ओरिसा इत्यादि खास परगणे राखून त्यावर बहिरीसच कायम केलें व दुसरा वारंगूळचा सुभा वेगळा करून तो अझिमखानाच्या हवालीं केला. ह्या आठही सुभ्यांत शहाच्या खाजगी खर्चाकरितां कांहीं गांवें राखिलीं असून त्यांचा वसूल व वहिवाट करण्यास हुजूरचे स्वतंत्र कारकून नेमिले असत. ह्या सुभ्यांतून फक्त एकच किल्ला सुभेदाराकडे ठेवून बाकीचे किल्ले व गडकरी हे थेट हुजूरकडे असावे असाही एक नवीन निर्बंध, सुभेदारांस बंडें करतां येऊं नयेत म्हणून, गावानानें केला होता. ही सर्व व्यवस्था जरी सकृद्दर्शनीं चांगली दिसली, तरी तीच इतर कांहीं कारणांच्या भरतीनें ब्राह्मण बादशाही पालथी घालण्यास कारण झाली. कारण प्रथम स्वतंत्रतेनें वागण्यास सवकलेल्या सुभेदारांस सर्वच बाबतींत आतां अडचण भासूं लागली. त्या सर्वांचा गावानावर रोष झाला आणि त्यांनीं अनेक प्रकारच्या गुप्त खटपटी चालू करून शेवटीं महंमद गावानाचा सूड घेतला. प्रथम त्यांनीं गावानाच्या नांवचें ओरिसाच्या राजास म्हणून एक बनावट पत्र तयार करून त्यावर गावानाचा गुलाम दारूंत गुंग असता गावानाचें मोर्तब करून घेऊन तें पत्र शहाच्या हातांत पडेलसें केलें. पत्रांत मजकूर असा होता कीं, " महंमदशहाच्या क्रौर्यास व स्त्रीलंपटपणास आपण अगदीं कंटाळलों असून त्याचें राज्य, आपण फौजेसह चालून आल्यास आपल्यास

सहज घेतां येईल. मी आपल्या सर्व सैन्यासह आपणास मदत करीन. शहास लढाईत किंवा अन्य तऱ्हेनें अल्लाकडे पाठवून दक्षिणेचें निष्कंटक राज्य आपण व मी अर्धें अर्धें वांटून घेऊं." हें पत्र पाहतांच शहा फार संतापला. त्यानें गावानास बोलावलें. तो एकनिष्ठ सेवक दरबारीं गेला. शहाच्या प्रश्नास 'परमेश्वरसाक्ष पत्र बनावट आहे' असा त्यानें शांतपणें जबाब दिला आणि शेवटीं इतकेंच सांगितलें कीं "आपल्या वडिलांच्या सेवेंत माझा सर्व जन्म गेला व माझे काळे केस पांढरे झाले. तेच आतां मुलाच्या सेवेंत जर रक्तानें रंगले तर कांहीं वाईट नाहीं. तो मानाचाच प्रकार झाला असें मी समजेन." शहाची कांहीं समजूत झाली नाहीं. त्यानें जोव्हर नांवाच्या गुलामास गावानाचें तेथल्या तेथें शिर उडवण्याची आज्ञा केली; आणि आपण जनानखान्यांत निघून गेला. गावानानें शांतपणानें ही अन्यायानें झालेली वधाची शिक्षा सोसली. गावानाबरोबरच त्याचा एक मोठा स्नेही व अधिकारी असदखान गिलनी ह्यासही त्या गुलामानें बिगरहुकूम ठार मारिलें. गावान ह्या वेळी ७८ वर्षांचा होता. ह्या गावानाचें मरण तेंच ब्राह्मणी बादशहा महंमदशहा ह्याचें मरण आणि त्याचें मरण तेंच ब्राह्मणी बादशाहीचेंही मरण असा पुढें ओळीनेंच अनुभव आला. आपल्या सरदारांची ही सर्व कपटकारस्थानें पुढें शहास लवकरच कळलीं. तेव्हां त्याचें मन पश्चात्तापानें करपूं लागलें. शहाचे इतर सरदार त्याचा भरंवसा न धरितां ते त्याच्या वाऱ्यासही उभे राहीनातसे झाले. ते त्याच्या हुकुमानें स्वारीशिकारीस येत तरी स्वतंत्र छावण्या करीत व चारआठ सशस्त्र लोकांसह दुरूनच शहास मुजरा करीत. शेवटीं शहानें आपल्या सर्व सरदारांस सुभ्यांचे स्वतंत्र अधिकार दिले. गावानाची जहागीर बिजापूर प्रांत हा

त्यानें युसुफ अदिल्खानास दिला. इमाद उल्मुल्कास वऱ्हाड व माहूर हे सुभे दिले. निजाम उल्मुल्क बहिरी यास रोज नव्या नव्या नेमणुका आणि किताब देऊन गावानाच्या जागीं मुख्य वजीर केलें. बहिरी हा दक्षिणी, मूळच्या पाथरी गांवच्या बहिरंभट कुळकर्ण्याचा मुलगा. ह्याचें मूळ नांव हेमाद्री असें होतें. विजयानगरवरच्या एका स्वारींत त्याचा पाडाव करून त्यास जुल्मानें बाटविलें होतें. ह्या मूळच्या हिंदूस व बाट्या दक्षिणीस हा एवढा मान व अधिकार मिळालेला इतर परदेशी मुसल्मानांस कसा पाहवेल ? ते सर्व त्याचा हेवा करूं लागले. त्याचें सामर्थ्य आणि चातुर्यादि गुण विलक्षण असल्यामुळें त्यांच्या हेव्यादाव्यानें त्याचें कांहीं वांकडें होण्यासारखें नव्हतें; तथापि ' वांकड्या मार्गांनीं हवें तें शक्य होतें ' ह्या न्यायानें शेवटीं ब्राह्मणी बादशाहीचे तुकडे होण्यास जीं कांहीं अनेक कारणें झालीं त्यांत ह्या कारणाचीही चांगलीच भर पडली. महंमदशहा रात्रंदिवस चिंतेनें व्यग्र होऊन, चितेपेक्षांही अधिक तापदायक अशा त्या चिंतेच्या निरसनार्थ दारू आणि इष्क ह्यांतच निमग्न राहूं लागला; तरी त्याला महंमदगावानाची मूर्ति सारखी डोळ्यासमोर दिसत असे. शेवटीं शके १४०४ सालीं तो त्या चिंतानलांत करपलेला बादशहा वैतागून मरण पावला.

३. यापुढें महंमदशहा ब्राह्मणी दुसरा शके १४०४–१४४० पर्यंत, अहंमदशहा ब्राह्मणी दुसरा शके १४४२ पर्यंत, अल्लाउद्दीन हा ब्राह्मणी शके १४४३ पर्यंत, वलीउल्लाशहा हा शके १४४६ पर्यंत आणि कलीमउल्ला हा शके १४४८ म्हणजे इ. स. १५२६ पर्यंत असे नांवाचे ब्राह्मणी बादशाहा, तख्तनशीन झाले; तथापि शके १४०५ त इमादशाही, १४११ त अदिलशाही, १४१२ त निजामशाही, १४१४ बरीदशाही आणि १४३४ त

कुतुबशाही ह्याप्रमाणें ब्राह्मणी बादशाहीचे पांच तुकडे झाले. ह्या पांच शाह्यांच्या प्रस्थापकांपैकीं निजामशाहीचा मूळ पुरुष हिंदु-ब्राह्मण व आदिलशाहीचा संस्थापक युसफ आदिलशहा याची बायको हिंदु मराठ्याची मुलगी. तिचाच मुलगा सुल्तान इस्माइल विजापूरच्या गादीवर बसला. बेदरच्या कासीम बेरीदचा मुलगा अमीर याची बायको साबाजी नामक एका हिंदु मराठ्याचीच मुलगी होती. ब्राह्मणी राज्यसंस्थापक हाही एका हिंदूचाच गुलाम. एकंदरींत हिंदूंचें रक्त आणि पुढे सहजच त्यांचा पक्षपात ह्यांची भरती ह्या ब्राह्मणी बादशाहींत व तिच्या तुकड्यांत मुबलक झाली होती. ह्या स्थितीचा फायदा मराठ्यांस ह्या पंधराव्या शतकांत होऊं लागून त्यांचें वजन वाढूं लागलें, हीच त्यांच्या उदयाची खूणगांठ होय.

४. इकडे विजयानगरासही ह्या कालांत मागें ध्वनित केल्याप्रमाणें बरीच उलथापालथ झाली. विरूपाक्षाला पुत्र नव्हता म्हणून त्यानें पेनुगोंड्याचा एक स्वकुलीन मुलगा दत्तक घेतला व त्याचें नांव प्रौढ देवराय ठेविलें. ह्या प्रौढ देवरायाच्या राजवटींत सर्व कारभार नरसिंहराव नांवाच्या त्याच्या मुख्य सेनापतीच्या हातीं असे. नरसिंहरायाचें कुल क्षत्रिय यादववंशी होतें. ह्याचा बाप नरस आणि पणजा तिम्म. तिम्म हा तुलव म्हणजे कर्नाटकचा संस्थानिक होता. तिम्माचा मुलगा ईश्वर ह्यानें विजयानगरच्या राज्यावर आलेल्या मुसलमानी व स्वकीयही परचक्रापासून त्याचें रक्षण केलें होतें. ईश्वराचा मुलगा नरस हा आपणास महामंडलेश्वर म्हणवीत असे. ह्याला चार मुलगे होते. पैकीं तिघांनीं विजयानगरच्या सिंहासनाचा एकामागून एक याप्रमाणें अर्ध अधिक शतकपर्यंत उपभोग घेतला. ह्या घराण्याचा वंशवृक्ष कामापुरता पुढें देतों.

तिम्म
|
ईश्वर
|
नरस ( शके १४१६–१९ )
|
१. वीरनरसिंह (शके १४१९-३०)
२. कृष्णराय (शके १४३०-५२)
रंगराय
|
५. सदाशिव (शके .४६५-९८)
३. अच्युतराय (शके १४५२-६४)
|
४. वेंकटाद्रि (शके १८६४-६५)

५. असें म्हणतात कीं, प्रौढ देवराय लहान असल्यामुळें सर्व अधिकार वस्तुतः नरसिंहरायाच्याच हातीं होता. पुढें तो कांहींसा वयांत येतांच एका लढाईंत अर्थात् ब्राह्मणी बादशहाबरोबर चाललेल्या लढाईंत त्याला जबर जखम झाली. त्या वेळेस नरसिंहानें त्याची औषधादि व्यवस्था नीट न करितां एक दिवस त्याला पंचत्वास पोंचविलें ! नरसिंहरायानें आपणांस प्रत्यक्ष राज्याभिषेक करून घेऊन विजयानगरच्या सम्राटाची पदवी घेतली नाहीं; तथापि सिंहासनस्थ होऊन त्यानें तीन एक वर्षे अप्रतिहत सर्व राज्योपभोग भोगिले. तो मेल्यावर त्याच्या मागून त्याचा मुलगा वीरनरसिंह यानें मात्र मोठ्या समारंभानें आपणांस राज्याभिषेक करून घेतला. म्हैसूरकडील कांहीं संस्थानिक वीरनरसिंहाच्या घराण्याची सत्ता मानीनात, म्हणून त्यांच्यावर वीरनरसिंहानें आपले दोघे भाऊ कृष्णराय आणि अच्युतराय ह्यांना पाठविलें. ह्या दोघांनीं शके १४२० च्या सुमारास त्या सर्व म्हैसुरी संस्थानिकांचे गड, कोट आणि ठाणीं घेऊन

त्यांच्याकडून आपल्या घराण्यास दक्षिणसार्वभौमत्वाचे सर्व मान मिळण्याची व्यवस्था केली.

६. ह्या सुमारास जगाचा ऐतिहासिक नकाशाच दोनतीन शतकांत फिरवून टाकण्याच्या सामर्थ्याची गुरुकिल्ली, जी भरतखंडास जवळचा जलमार्ग सांपडणें, ती पाश्चात्त्य राष्ट्रांच्या हातीं लागली. शके १४२० सालीं केप ऑफ गुड होप ( उत्साहभूशिर ) हें ज्यास सार्थ नाम मिळालें आहे, त्याला वळसा घालून परस्पर हिंदी महासागरांतून निर्वेध हिंदुस्थानच्या सुवर्णभूमीस तारवें लावण्याची कल्पना पूर्तकालीन ( पोर्तुगीज ) साहसी वीर वास्कोदिगामा ह्यानें अजमाविली व कारवाराजवळ त्यानें आपलीं जहाजें नांगरलीं.

७. वास्कोदिगामा कालिकत येथें किनाऱ्यास लागतांच (ता. २० मे सन १४९८ ) त्यानें आपल्याबरोबर आणिलेले काळ्या पाण्याच्या शिक्षेचे कांहीं कैदी किनाऱ्यावर उतरून सोडून दिले. त्यानंतर त्याला तेथें ट्यूनिसचे दोन मूर इसम भेटले ! ते जिनोआची आणि कास्टियाची भाषा बोलत असत. त्यांना वास्कोदिगामास पाहून अत्यंत आश्चर्य वाटलें. त्यांनीं त्यास पहिला प्रश्न असा केला कीं, ' हं ! आपण येथें कसे ? आपल्यास ह्या किनाऱ्यावर कोणीं आणिलें ? ' वास्को दि गामानें शांतपणानें उत्तर केलें कीं, ' ख्रिस्ती बंधूंचें दर्शन घेण्याची उत्कटेच्छा आणि मसाल्याचे पदार्थ ह्यांनीं मला ह्या ठिकाणीं आणलें.' ह्या दोन शब्दांत पुढील सर्व ऐतिहासिक उलाढालींचें बीज आहे. धर्मप्रसाराची हांव आणि व्यापार–पैसा मिळविण्याची धडपड, ह्या दोहींचा मिलाफ होऊन पाश्चात्त्य ख्रिस्ती राष्ट्रांस जें स्फुरण चढलें आणि त्यांच्या ठिकाणीं जी साहसप्रवृत्ति शिरली, ती आज सगळ्या जगास, चारी खंडांस, त्राहि त्राहि करून सोडीत आहे.

पूर्तकालच्या किनाऱ्यावरील मूर लोकांस हांकलून देऊन ज्या समुद्रभागांचें आजपर्यंत कधीं कोणीं उल्लंघन केलें नव्हतें, तें करून ह्या किनाऱ्यावर येण्यांत चंद्रकलाध्वजांची हिंदुस्थानांतील वरचढ हाणून पाडून हिंदूंना बाटवून आपला धर्म सर्व जगभर करण्याकरितांच आपण येथें आलो असल्याचें वास्कोदिगामानें आपल्या पृच्छकांस सविस्तर समजाविलें. वास्कोदिगामानें व त्याच्या अनुयायांनीं आपली ही महत्त्वाकांक्षा कशी शेवटास नेली आणि त्यापासून आम्हां निरपराध, शांत व समाधानी भारतीयांचे कसकसे आणि किती हाल झाले, होताहेत व होतीलही हें सांगणें कठिणच आहे. तथापि प्रत्येकाच्या स्वानुभवाची व पिढ्यानुपिढ्या ऐकिवांतीलच ती रडकथा असल्यामुळें त्यासंबंधानें नुसतें अंगुलिनिदर्शनही पुरें होणारें आहे.

८. प्रथमप्रथम ह्या साहसी दर्यावर्दी पूर्तकालांनीं किनाऱ्यावर चांचेपणा चालू केला; आणि कधीं त्राग्यानें तर कधीं नमून वागून होनावर व भातकळ येथील विजयानगरकरांच्या वतीच्या अधिकाऱ्यांकडून कांही सवलती मिळविल्या. ह्या सवलती मिळवितांना सभ्य, शांत आणि गरीब कोंकरांप्रमाणें पुढें वागण्याचें ख्रिस्ताच्या नांवाला स्मरून त्यांनीं जें वचनप्रमाण केलें होतें, तें लगेच कोल्ह्याच्या शीलानें विसरून जाऊन शके १४२५ त ह्या पूर्तकाली चांच्यांनीं होनावरावर हल्ला करून तें शहर लुटून, जाळून पोळून असें सुंदर रीतीनें खरें करून दाखविलें कीं सोळा आणे! होनावरची कुरापत पचतां-क्षणींच त्यांनीं भातकलावर मोर्चा लाविला. तेथें कांहीं लवकर डाळ शिजेना. तेथील अधिकारी ५०० पोतीं तांदूळ देण्यास सिद्ध झाला; ते न घेतां ह्यांनीं शह कायम राखून अग्निदिव येथें किल्ला बांधला. ह्या समयीं पूर्तकालांचा हिंदुस्थानांतील पहिला

गव्हर्नर अलमीढ हा होता. त्यानें होनावरावर तोफांचा मारा चालवून हल्ला चढविला. तेथील सैन्यानेंही पण चांगलाच टिकाव धरला; तथापि शेवटपर्यंत निभाव लागेल असें न दिसून तेथील विजयानगरकरांचा अधिकारी तिम्मया यानें युक्तीनें संधि करण्याचा घाट घातला. शेवटीं वीरनरसिंगरायाकडून संधि ठरविण्यास मंत्री येऊन भातकल खेरीज वाटेल तेथें पूर्तकालांनीं गडेकोट उभारावे ह्या सवलतीवर काननूर येथें शके १४२७ त संधि कायम झाला.

९. वास्तविक पहातां विजयानगरच्या सत्तेस ही पूर्तकालीन घूस चिरडून टाकणें अशक्य नव्हतें, परंतु केवळ खुशीची कसली शिकार करावयाची, अशा उदार अंतःकरणानेंच ती सुटली गेली. हें उंटाचें पिलूं पुढें सर्व भरतखंडास कसें जाचक होईल ह्याची कल्पना, जात्याच सहिष्णु धर्माच्या व स्वदेशाबाहेर विनाकारण कधींही केवळ विजिगीषेनें किंवा परस्वापहार बुद्धीनें डोळा फिरविण्याचें ज्यांच्या हजारों वर्षांत स्वप्नांतही आलें नाहीं, असल्या गमागमवर्जित स्वधर्मैकनिष्ठ व स्वदेशैकविहारी अशा हिंदूंस कशी व्हावी ? कारण ते ज्या भूमीचीं लेंकरें आहेत ती सर्व भूमि फळें, पुष्पें, धान्य, धातु, मौक्तिक, मणि, मंत्र, औषधी यांनीं स्वयंपूर्ण केवळ कामधेनूच असल्यामुळें प्रसंगीं तिचीं मुलें म्हणजे आम्ही हिंदु लोक कितीही पुष्ट, विद्वान् , कलासंपन्न आणि पराक्रमशाली असलों तरी अधिक उदार, दयाशील व भोळे असेच असावयाचे. मुसल्मानांचा प्रवेशही ह्यामागें चारपांच शतकें जो आमच्या देशांत झाला, तो ह्याच न्यायानें; आणि आतांही त्याच न्यायानें त्यांच्या अगदीं विरुद्ध दिशेकडून हा त्या खिस्ती टोळधाडीचा होत आहे. मुसलमानांच्या स्वाऱ्यांच्या कडू अनुभवानें अजूनही आमच्या

अमर्याद व निरुपयोगी, इतकेंच नव्हे, तर सद्गुणरूपानें केवळ महादुर्गुणच, अशा आमच्या उदारपणानें व दयाळू स्वभावानें आम्हांला सारखें भोळेंभाबडेंच ठेविलें आहे. स्वभावच तो ! त्याच्यापासून च्युति ही केवळ असह्य संतापादिकांच्या वेळेपुरतीच क्षणिक व्हावयाची. मुसल्मानांचा असह्य जाच आणि धर्मच्छल ह्यांचा प्रतिरोध करण्याकरितां ज्या विजयानगरकरांनीं लाखो प्राणांची शेंकडों वेळां आहुती दिली व जशास तसें ह्या न्यायानें मुसल्मानांच्या कत्तली करणें, त्यांच्या मशिदीही पाडणें व धर्मपुस्तकें जाळणें असलीं स्वस्वभावाविरुद्ध कर्मेंहि केलीं, त्याच विजयानगरकरांनीं आपल्या भरसत्तेंत हें खिस्ती भटांचें गाठोडें जें आपल्या राज्यांतील एका कोंपऱ्यांत ठेवूं दिलें, तें काय म्हणून बरें ? तर केवळ माणसें जशीं वरून दिसतात तशींच तीं आंतही असतात, एक लबाड किंवा दुष्ट व क्रूर आढळला तर तो केवळ अपवाद, पण त्यावरून इतरही तसेच असतील कशावरून ? असा संशय न येऊं देणारा सरळ न्याय व भोळेपणाच आमचा खरा शत्रु होय. त्यानेंच आमची आज जवळजवळ हजार वर्षें दिशाभूल होत आहे. अस्तु !

१०. आपण आतां फिरून मध्यमहाराष्ट्राकडे वळूं. कारण कोकणच्या हवेंतच असा दुर्गुण दिसतो कीं, तेथें कितीही शहाणे, धूर्त आणि चतुर लोक निपजले तरी, राष्ट्रीय संकटांतून स्वदेशबंधूंस मुक्त करण्यास योग्य, पूर्ण निःस्वार्थी, जनहितैकदक्ष, अत्यंत स्वधर्मनिष्ठ आणि निस्सीम ईश्वरभक्त असे साधुपुरुष तेथें निपजूंच नयेत ! त्यामुळें ह्या नवीन आलेल्या व नुकतेंच आपलें गाठोडें ठेवण्यापुरती जागा पाहण्यांत गुंतलेल्या खिस्ती लोकांच्या पूर्वी कितीक शतकें येऊन येथील सार्वभौम सत्ता बळकावून बसलेल्या व आपल्या अत्याचारांनीं हिंदुमात्रांस त्राहि त्राहि करून सोडणाऱ्या महाराष्ट्रचक्रवर्ती मुसल्मानांच्या जुलमांतून स्वधर्म व स्वजन यांस यथाशक्ति मुक्त करण्यास झटणारा एकादा महात्मा आढळल्यास पाहूं.

शके चौदाशें* ( १४०० ) । असती सत्तावीस ( २७ ) ॥
संवत्सर नाम । क्रोधन असे ॥ १४० ॥
ज्येष्ठ शुद्ध सप्तमी । रविवार असे ॥
नक्षत्र पुष्य । योग सिद्धि असे ॥ १४१ ॥
पांडुरंग मूर्ति । आणूनि ध्यानासि ।
आत्मा ब्रह्मांडासि । नेते झाले ॥ १५२ ॥

—अध्याय ७, मुधेश चांगदेव चरित्र शामजी गोसावीकृत

वरील ओंव्यावरून मुधेश चांगा हे शके १४२७ त म्हणजे इ. स. १५०५ च्या सुमारास समाधिस्थ झाले असें

* ' महाराष्ट्र कवि ' मासिक पुस्तकाच्या अधिक ज्येष्ठ शके १८२६ च्या अंकांत ह्याच चांगदेव चरित्राच्या वरील ओवींत ' शके बाराशें ( १२०० ) ' असा पाठ छापला आहे. ' शके चौदाशे ' हा पाठ ग्रंथमालेंत ( अंक ११४ ) सुप्रसिद्ध ऐतिहासिलेखकसंशोधक रा. राजवाडे यानी लिहिलेल्या ' मुधेश चांगा ' ह्या लेखांतून घेतला आहे. ग्रंथमालेच्या ११४ व्या अंकानंतर जवळजवळ आठनऊ महिन्यांनीं ' महाराष्ट्र कवी 'चा ९ वा अंक छापिला आहे, तेव्हां शुद्ध पाठ कोणता याबद्दल अर्थात् बराच संशय उत्पन्न झाला. कारण महाराष्ट्र कवि संपादक रा. विनायक लक्ष्मण भावे हेही पदवीधर व रा. राजवाडे हेही पदवीधर असून, आज जवळजवळ एक तप हा संशोधन व्यवसाय करीत असलेले. परंतु अंतःप्रमाणां-वरून व मास, तिथि, वार, नक्षत्र आणि योगादिकांच्या सामवायिक मेळानें रा. राजवाडे यांचाच शके चौदाशें हा पाठ गणितशुद्ध दिसला व तोच प्रशस्त मानणें न्यायाचें ठरलें. तेव्हां महाराष्ट्र कवि संपादकांस विनंति करावीशी वाटते ती इतकीच कीं, असल्या इतिहासाच्या प्राणभूत गोष्टींबद्दल तरी त्यांनीं विशेष चौकस असावें आणि कालादिकांचे उल्लेख असणाऱ्या काव्यपंक्ति जितक्या शुद्ध छापल्या जातील तितकें चांगलें, असें नेहमीं स्मरण ठेवावें.

दिसतें. ह्यांनीं राष्ट्रीय हिताच्या दृष्टीनें काय केलें हें त्यांच्या चरित्रांतील सारांश रूपानें दिसून येईल.

११. मुधेश चांगदेव ह्यांचें आडनांव मरुद्रण. हें घराणें मूळचें नारायण रोह येथें राहणारें. ह्या मुधेश चांगदेवाच्या वडिलांचें नांव मुधोपंत व मातुश्रीचें रुक्मिणी. ह्या सदाचरणी दांपत्यास वृद्धापकाळ होऊनही पुत्रसंतान झालें नाहीं. तेव्हां त्या उभयतांनीं तापीतीरीं सिद्ध चांगदेव यांच्या समाधीपुढें तीव्र अनुष्ठान आरंभिलें. सिद्धांनीं अनुष्ठानानें प्रसन्न होऊन,

काय ते अपेक्षा । तुमचे मनीं असे ॥
संतति संपत्तीची । मज सांगा ॥ १७ ॥
कोणते स्थळीं तुम्ही । करितसां वास ॥
कवण वृत्तीस । करीतसां ॥ १८ ॥

याप्रमाणें स्वप्नांत त्या ब्राह्मण श्रेष्ठाशीं संभाषण चालविलें. तेव्हां

आमुचिया वंशीं । पुत्राचें संतान ।
तुज ऐसें निधान । व्हावें बापा ॥ २२ ॥

असें ब्राह्मणानें प्रत्युत्तर केलें. त्यावर सिद्ध चांगदेवांनींही,

'तुमच्या वंशासी । येईन मी' ॥ २३ ॥
तुमचिये घरीं । भिक्षेलागी येती ॥
नाम म्हणविती कानफाटे ॥ २४ ॥
भिक्षा घेऊनीयां । वाजविती पुंगी ॥
नादाचिये संगीं । प्रकटेन ॥ २५ ॥
नादापासुनियां । प्रकटे लेकरूं ॥
तोचि मी अवतारू । घेईन तेथें ॥ २६ ॥
नियम तयासी । बारा वर्षें केला ॥

असा वर दिला.

१२. वरील वरदानाप्रमाणें एका श्रावण शुक्ल पंचमीस कोणी-एक गोरखपंथी कानफाट्या मुधोपंतांकडे भिक्षेस आला आणि अल्लख म्हणून त्यानें भिक्षेची आरोळी ठोकिली. त्याबरोबर कोण भिक्षेकरी आला आहे हें पाहून त्याला घालण्याकरितां

भिक्षाधान्य आणण्यासाठीं रुक्मिणी घरांत जाऊन येते तों असा चमत्कार झाला कीं,

‘ आदेश ’ म्हणुनीयां । ‘ भिक्षा द्यावी माई ’ ॥
ऐकुनी रुक्मिणी । उठलीसे ॥ ४१ ॥
सुपामध्यें धान्य । घेउनियां आली ॥
भिक्षेलागीं झोळी । पसरली ॥ ४२ ॥
पुंगी वाजवीत । घेऊनियां भिक्षा ॥
रुखमाईचें लक्ष । नादापाशीं ॥ ४३ ॥
पाहतां पाहतां । नाथाचें कौतुक ॥
आंगणीं बाळक । देखियेला ॥ ४४ ॥
नाथ गुप्त झाला । न दिसे कोणीकडे ॥
आश्चर्य रोकडें । तेथें झालें ॥ ४५ ॥
बालक देखोनी । विस्मय पावली ॥
तटस्थ जाहली । क्षण एक ॥ ४६ ॥
अकस्मात मुधो-- । पंत गृहा आले ।
तयां सांगितलें । वर्तमान ॥ ४७ ॥
उभयतां कौतुक । पाहती बाळकाचें ॥
स्तनीं रुक्माईच्या । दुग्ध स्रवे ॥ ४८ ॥
म्हणती मुधोपंत । ‘ उचलीं बाळक ॥
चांगदेवें भाक । सांभाळिली ’ ॥ ४९ ॥

पुढें पुत्रोत्सव करून यथाकालीं चांगदेवांचे कृपें लेकरूं झालें म्हणून चांगदेव हेंच त्या मुलाचें मुधोपंतांनीं नांव ठेविलें. तिसरे वर्षीं चौलकर्म व पांचवे वर्षीं व्रतबंध करून मुधोपंतांनीं चांगदेवाकडून ब्रह्मचर्य संपादविलें. सार्थ वेद आणि पूर्वोत्तर मीमांसेसह धर्मशास्त्रांचें चांगदेवानें उत्तम अध्ययन केलें व समावर्तन होतांच यथाकालीं अध्यापनही सुरू केलें. लवकरच मोठ्या थाटांत त्याचें लग्न होऊन गृहस्थाश्रमाचाही त्याला लाभ झाला. चांगदेवाची गृहस्थाश्रमाची दिनचर्या :—

त्रिकाळ स्नानसंध्या । अतिथिपूजन ॥
अन्नसत्र तेन ( त्यानें ) । घातलेंसे ॥ ७२ ॥
करी दान वस्त्र । गोदानांचीं शतें ॥
देऊनी याचका । तोषवीती ॥ ७३ ॥
ऋद्धिसिद्धी द्वारीं । वोळंगती पाहीं ॥
नारायणडोहीं । काळ क्रमे ॥ ७४ ॥
ऐसा क्रमितां काळ । वर्षं चोवीस ॥
वयासी जाहलीं । दोन तपें ॥ ७५ ॥
मुधोपंत चांग-। याचे तीर्थरूप ॥
आलासे समीप । काळ त्यांचा ॥ ७६ ॥
देहअवसान । झालेंसे तयासी ॥
सहगमनासी । माता करी ॥ ७७ ॥

१३. वरील ओंव्यांवरून मुधेश चांगदेवांचीं पहिलीं चोवीस वर्षें कशीं गेलीं, त्यांचा वेदशास्त्राभ्यास किती होता, गृहस्थाश्रमधर्म त्यांनीं कसा उत्तम पाळला होता, या गोष्टी कळून येतील. यापुढें ऐन पंचविशींत गयेस जाऊन त्यांनीं मातापितरांचें वर्षश्राद्ध केलें व गयावर्जनानें ते पितृऋणापासून मुक्त झाले. नंतर परत नारायणडोहीं येऊन मुधोपंतांनीं संचित केलेलें सर्व द्रव्य चांगदेवांनीं ब्राह्मणांस वांटून टाकलें. मुधोपंतांचें कुळकरण या त्यांच्या मुलानें त्यांच्या भावास म्हणजे आपल्या चुलत्यास दिलें आणि आपण सर्व व्यापांतून मुक्त झाला. येथून पुढें पूर्वावतारीं आपणास झालेली मुक्ताबाईची पंढरीस दर्शनास जाण्याची आज्ञा आठवून संतांचें माहेरघर, प्रत्यक्ष भूवैकुंठ जें पंढरीक्षेत्र तेथें दीनांचा सोयरा जो श्रीपांडुरंग त्याच्या दर्शनास निघाले. तेथें गेल्यावर यथामति श्रीविठ्ठलाचें त्यांनीं मोठ्या प्रेमानें दर्शन घेतलें. त्या वेळीं त्यांचा कंठ सद्गदित झाला, डोळ्यांत प्रेमाश्रु आले आणि त्यांनीं श्रीविठ्ठलाचीं अनन्यभावानें

व परोपरीनें पुष्कळ स्तुतिस्तोत्रें गायिलीं. मग रावळांतुन बाहेर येऊन :—

चंद्रभागा तीर्थी । बैसले त्रिरात्रीं ॥
तीर्थरूपें श्रीहरि । जेथें असे ॥ ९८ ॥
एकविध भाव । देखुनि तयाचा ॥
देव त्या तीर्थाचा । प्रगटला ॥ ९९ ॥
उभा विटेवर । कडेवरी कर ॥
श्रीमुख सुंदर । देखियलें ॥ १०० ॥
म्हणे चांगदेवा । हरि ' सावधान ' ॥
नेत्र उघडून । पुढें पाहें ॥ १०३ ॥
देखुनियां रूप । वेधलेंसें मन ॥
साष्टांग नमन । करीतसे ॥ १०७ ॥
त्राहें त्राहें । कृपादृष्टी पाहें ॥
येऊनियां राहें । हृदयामाजीं '। १०८ ॥
चरणीं मस्तक । ठेविलें सद्भावें ॥
' दीना उद्धरावें । पांडुरंगा ' ॥ १०९ ॥
अनुग्रह केला । मंत्र षड्क्षर ॥
विद्या मनोहर । संजीवनी ॥ ११० ॥

१४. याप्रमाणें या मुधेश चांगदेवांस प्रत्यक्ष श्रीविठ्ठलाचें दर्शन अनुग्रह आणि संजीवनी विद्या हीं प्राप्त होऊन ईश्वराज्ञेनें ते जगदुद्धारार्थ गोदातीरीं पुणतांबें गांवीं येऊन राहिले. तेथें,

कांहीं देवपूजा । मजला सांगावी ॥
कृपा करावी । दीनोद्धारा ॥ १०५ ॥

अशी चांगदेवाची विनंति ऐकून केशवाची चतुर्भुज मूर्ति प्रगट झाली. या मूर्तीची उपासना हें चांगदेवांचें यापुढें नित्यव्रत झालें. त्यांनीं त्या मूर्तीची स्थापना करून आपणांस चांगा केशवदास असें म्हणविलें. चांगदेव तेथें असतां कल्याण कलबुर्ग्याचा शंकर नामक यजुर्वेदी ब्राह्मण निपुत्रिक मरण पावला.

तेव्हां त्याची आई व बायको ह्या गयावर्जनाकरितां जात असतां मार्गांत चांगा केशवदास यांची कीर्ति ऐकून त्यांच्या दर्शनार्थ आल्या. त्यावेळीं तरुण शंकरपत्नीनें चांगदेवांस नमस्कार करितांच ' पुत्रवती भव ' असा त्यांनीं तिला आशीर्वाद दिला. तो ऐकून

' गतभर्तृ असे । कन्या सकेशी ॥
जातों वाराणशीं । यात्रेलागीं ॥ ५३ ॥
भ्रताराचीं अंगें । घेऊन सांगातीं ॥
गयावर्जनातें । जात असों ॥ ५४ ॥
तुम्हीं महापुरुष । दिधला आशीर्वाद
म्हणोनीयां खेद । वाटतसे ' ॥ ५५ ॥

असें त्या तरुण विधवेची आई म्हणाली. त्यावर ' माझा आशीर्वाद सत्य जाणा. तो कधींही असत्य होणार नाहीं, ' असें चांगदेव म्हणाले; आणि त्यांनीं षडक्षरमंत्रानें त्या मृत शंकर-ब्राह्मणाचीं हाडें अभिमंत्रून त्यांचें तीर्थ त्याच मंत्रानें त्या सकेशा विधवेस प्राशनार्थ दिलें. त्या योगानें तिला गर्भ राहून नऊ महि-न्यांनीं मुलगा झाला. त्यासह तिला आपल्याजवळ ठेवून त्यांनीं त्या मुलाचे जातकर्मादि संस्कार करविले व त्या मुलाचें नांव विठ्ठल असें ठेविलें. पुढें ह्या मुलाचा व्रतबंध करण्याकरितां चांगदेव त्याच्या आईसुद्धां पंढरपुरास गेले. तेथें चांगदेवांनीं श्रीविठ्ठलचरणीं या मुलाची सर्व हकीकत निवेदन केली व 'तुमचा मनोरथ असे सिद्ध ' असा श्रीपांडुरंगाचा आशीर्वाद घेऊन ते तेथेंच राहिले. क्षेत्रस्थ ब्राह्मण दर्शनास आले असतां त्यांना ह्या आपल्या वरदपुत्राचें सर्व वर्तमान सांगून ' याच्या व्रतबंधाचा विचार करा, ' असें ते म्हणाले. तेव्हां ब्राह्मणांनीं ' विधवेचे पोटीं हें पोरटें झालें ' असें म्हणून फार धिक्कार केला; तरी चांगदेवांनीं ' ईश्वरेच्छेनें हें मूल उत्पन्न झालें आहे ' असें

सांगून त्याचा व्रतबंध करण्याबद्दल ब्राह्मणांस पुनः विनंति केली. यावर आपण म्हणतां हेंच जर खरें तर—

बोलती ब्राह्मण । ' मनाची अपेक्षा ॥
असे एक इच्छा । पुरविणें ॥ ७६ ॥
तुमचा स्वयंपाक । जितका जाहला ॥
सर्व क्षेत्रस्थांला । पुरविणें ' ॥ ७७ ॥

ह्यावर चांगदेव—

' स्नानें करूनियां । यावें सर्वजनीं ॥ '
म्हणती ' लहान । थोर मिळवूनीयां ॥ ७८ ॥
पुत्र आणि माता वाढितील अन्न ॥
नव्हे तेंचि पूर्ण । करिल देव ' ॥ ७९ ॥

१५. त्याप्रमाणें हजारों ब्राह्मण स्नानसंध्या करून भोजनास आले असतां, चांगदेवांनीं विठ्ठलास ' पात्रीं भात लवंडीं ' म्हणून आज्ञा केली. त्यानें त्याप्रमाणें करतांच तें येवढेंसें अन्न ईश्वरकृपेनें सर्व ब्राह्मणांस आतृप्त पुरून पहिल्याइतकें शिल्लक उरलें. तेव्हांपासून ह्या शंकरपुत्रास ' भातलवंडे ' हें आडनांव मिळालें; व ब्राह्मणांनीं त्याला गायत्र्युपदेश केला. पुढें यथाकालीं त्याचा विवाह होऊन वंशविस्तारही झाला. भातलवंड्यांचें कुळ अजूनहि पंढरपुराकडे आहे. चांगदेव पुढें द्वारकेच्या यात्रेस गेले, तेव्हां धारूर गांवचा यादव नामक देशपांडे आडनांवाचा ब्राह्मण त्यांच्याबरोबर सपत्नीक होता. त्यानें चांगदेवांचा अनुग्रह घेतला व पुढें आपल्या गरोदर स्त्रियेस तेथें एकटीच टाकून तो निघून गेला. या स्त्रीसही, तिनें चांगदेवांचा अनन्य भावें धांवा केला असतां, कृष्णाबाई नांवाची एक वृद्ध विधवा तिजकडे येऊन आपणांस चांगदेवांनीं पाठविलें असें सांगून घेऊन गेली व तिनें तिचें यथासांग बाळंतपण केलें. इकडे चांगदेव राउळांत श्रीकृष्णदर्शनास गेले, पण त्यांना तेथें दर्शन

घडलें नाहीं. तेव्हां ज्ञानदृष्टीनें त्यांना असें कळलें कीं, यादव स्त्रियेच्या बाळंतपणास महानदीचे कांठीं रुक्मिणीपति स्वतःच वेषांतरानें गेला आहे. याप्रमाणें चांगदेवांचें माहात्म्य वाढून त्यांची शिष्यशाखाही वाढत चालली. वरील यादवपत्नीच्या मुलाचें नांव महादेव असें ठेविलें. नंतर चांगदेवांनीं त्याच्या बापास आणवून त्या त्रिवर्गास घेऊन ते पुनः द्वारकेहून पुणतांब्यास आले. येथें येऊन पांचसात दिवस झाले नाहींत तों पंढरीहून वर्तमान आलें कीं—

बेदरांचा राजा । बमणी पातशाहा ॥
ब्राह्मणांसी बहु । छळियेलें ॥ ५२ ॥
हिंदुधर्म जितुके । तितुके वर्जियेले ॥
**राऊळ विध्वंसिलें । पंढरीचें ॥ ५३ ॥**
**केलीसे मशीद । महाद्वार मोडून ॥**
सात मास पूर्ण । झाले यासी ॥ ५४ ॥
मूर्ति सिंहासना- । हूनी आच्छादिली ॥
गुप्त हो ठेविली । बडव्यांनीं ॥ ५५ ॥

१६. हें वर्तमान ऐकून ज्ञानचक्षूंनीं पहातां तें सत्य आहे असें दिसून आल्यावदर चांगदेवांचें चित्त फार उदास झालें. ते लगेच पुणतांब्याहून आपल्या शेंकडों शिष्यांसह बेदरास जावयास निघाले. मार्गांत दिंडी, टाळ, विणे, पताका यांसह हरिगुणकीर्तन आणि नामघोष यांचा सारखा गजर चालला होता. वाटेंत जंगम गुरु मल्लिकार्जुन याचा गर्व हरण करून चांगदेव बेदरच्या दरवाज्याशीं जाऊन पोंचले. तेव्हां बादशाहाकडून एक ब्राह्मण यांची चौकशी करण्याकरितां आला व हे कोण, काय व कशाकरितां आले, हें समजतांच चांगदेवांच्या पायांवर साष्टांग नमस्कार घालून तो म्हणाला—

' राजा बहु असे । दुष्ट ह्या स्थळींचा ॥
देखेल तुमचा । समारंभ ॥ ४३ ॥
देखूनि समारंभ । छळिल तुम्हांसी ॥
वर्जावें तयासी । तरी दुःखी असें ' ॥ ४४ ॥
पुसती चांगदेव । ' दुःख त्या कशाचें ॥
वर्तमान तयाचें । सांगा मज' ॥ ४५ ॥
ऐकुनि ब्राह्मण । सांगे समाचार ॥
' ऐका सविस्तर । स्वामी तुम्ही ॥ ४६ ॥
बहु प्रीतिपात्र । राजयाची पत्नी ॥
पावली मरण । सर्पदंशें ॥ ४७ ॥
बहु धन्वंतरी । केला प्रयत्न तीचा ॥
न चले कवणाच्या । उपायाशीं ॥ ४८ ॥
उदयीक प्रेत । पाठवीतो राजा ॥
बहु दुःख राजा । करीतसे ' ॥ ४९ ॥

यावर चांगदेव म्हणाले, ' तर मग ठीक आहे. श्रीविठ्ठलाच्या कृपेनें निर्जीव शरीरही सजीव होईल ! नंतर चांगदेवांनीं बादशाहाची मृतपत्नी अभिमंत्रित विभूतीनें सजीव केली; परंतु ती भ्रमांतच राहिली. तेव्हां दुसरी विभूति देऊन आणि—

' तुझे जें मनीं । असेल इच्छित ॥
पुरवीन आर्त । भाक माझी ' ॥ ८१ ॥

असें वचन देऊन, ती विभूति आपल्या पत्नीस लाव म्हणून त्यांनीं बादशहास सांगितलें. त्याप्रमाणें त्यानें करितांच राजपत्नी शुद्धीवर येऊन म्हणाली, ' ज्यांनीं मला प्रयत्नानें परलोकाहून फिरविलें, त्यांची जी आज्ञा असेल ती आपण मान्य कराल तेव्हां माझें देहभान स्वस्थ होईल.' बादशाहानें बाहेर येऊन चांगदेवांपुढें रत्नें, मुक्ताभरणें आणि द्रव्यांच्या राशी ठेवून झालेल्या वृत्तांताची विनंति केली. तेव्हां चांगदेवांनीं—

' आम्हां इच्छा नसे । तुमच्या द्रव्याची ॥
ऐकावी आमुची । गोष्टी तुम्हीं ॥ ९२ ॥
पुरातन स्थळ । आमुचें पंढरपूर ॥
मोडून महाद्वार । मशीद केली ॥ ९३ ॥
मोडून मशीद । देऊळ स्थापावें ॥
पहिलें होतें बरवें । जैसें तैसें' ॥ ९४ ॥

अशी उलट विनंति केली. त्यावर ' पत्र ल्याहा जैशी यांची आज्ञा ' म्हणून बादशहाचा हुकूम झाला. पत्राचे शेवटीं ' पुढें कोणी यवन पंढरीस येऊन कांहीं एक उपद्रव न करील ' असें शपथप्रमाण होतें. असो.

१७. याप्रमाणें इष्टकार्य संपादून चांगदेव पंढरपुरास आले; व त्यांनीं मशीद मोडून तेथें महाद्वार केलें. याबद्दल पंढरपूरच्या श्रीविठोबाच्या देवळांत–

' चांगदेवेतिविख्यातगोदातीरनिवासिना ।
श्रीमद्विठ्ठलनाथस्य नेमं देवालयं कृतम् ॥ १ ॥

असा शिलालेखही आहे.

१८. याप्रमाणें महाराष्ट्रसाधुसंतांचें माहेरघर व म्हणूनच महाराष्ट्र-महोदयाचें धार्मिक केंद्रस्थान असें जें पंढरपूर तेथील श्रीपांडुरंगाच्या देवाच्या देवस्थानास पोंचलेल्या विधर्मी राजाच्या उपसर्गापासून त्याची सुटका करून, फिरून, कधींही तसा उपसर्ग न पोंचेल अशी व्यवस्था ज्या सुधेश चांगदेवांनीं केली, त्यांची महती जितकी गावी तितकी थोडीच होणार आहे.

१९. चांगदेवांनीं श्रीविठ्ठलमूर्तीची पुनः पूर्वीचे जागेवर स्थापना केली. सांगतेप्रीत्यर्थ भातलवंडे यांजकडून अन्नशांति करविली; आणि या जगांतील आपला कार्यभाग संपला असें समजून त्यांनीं श्रीविठ्ठलापाशीं आपण समाधिस्थ होण्याविषयीं आज्ञा मागितली तेव्हां–

' आषाढ मासींची । शुद्ध एकादशी ॥
तुज समाधीस । वंदीन मी ॥ २५ ॥
पुण्यस्तंभीं महिमा । वडे पंढरीचा ॥
बोलतों त्रिवाचा । भाक माझी ॥ २६ ॥
दिंडी दशमीसी । कीर्तन एकादशी ॥
खिरापत द्वादशीं । करीन तेथें ॥ २७ ॥
ऐसें वरदान । दिधलें तुजशी ॥
आपुलें स्थळासीं । जावें आतां' ॥ २८ ॥

असा देवांनीं त्यास निरोप दिला. त्याप्रमाणें पुणतांब्यास येऊन चांगदेवांनीं शके १४२७ क्रोधननाम संवत्सरीं, ज्येष्ठ शुद्ध सप्तमी, रविवार, पुष्यनक्षत्र आणि सिद्धियोग असतां मोठ्या समारंभानें समाधि घेतली. या वेळीं चांगदेवांचे दोन्ही कृतकपुत्र व शिष्य विठ्ठल भातलवंडे आणि महादेव देशपांडे हे वयांत आलेले असून संसारी झाले होते. ह्यावरून चांगदेवांचें आयुष्यमान समाधिसमयीं पन्नाशीच्या पुढें असलेंच पाहिजे, हा तर्क खोटा होणार नाहीं. असो.

२०. या हकीकतीचा ऐतिहासिक काळाशीं मेळ घालतां असें दिसून येईल कीं, बेदरच्या ब्राह्मणी तक्तावर ह्या वेळीं महंमदशाहा बहामणी दुसरा हा होता. याचे कारकीर्दींत सर्वत्र बंडाळी होती व ब्राह्मणी बादशाहतीचे तुकडे होण्यास प्रारंभ झाला होता. कोंकणांत पोर्तुगीजांचा नवीनच धुडगूस सुरू होऊन हिंदुधर्मीयांचा विशेष छळ जारी होता. याची थोडीशी कल्पना एस्. एम्. नाईक यांच्या, पट्टणप्रभूंच्या इंग्रजीमध्यें लिहिलेल्या इतिहासाच्या ६९–७० पानांतील खालील आशयाच्या उताऱ्यावरून होईल.

२१. "शके १४३४ ( इ. स. १५१२ ) मध्यें कोंकणांतील कांहीं ठाणीं पोर्तुगीजांच्या ताब्यांत आलीं होतीं. हे पोर्तुगीज लोक आपल्या प्रजेस सरसहा वेठीस लावीत. त्यांत जातपात किंवा कुळशीळ यांचा काडीइतकाही विचार होत नसे. त्यांना कितीही हलक्या–प्रसंगीं भंग्याच्याही–कामाची गरज लागतांच रस्त्यांत दृष्टीस पडेल त्या गृहस्थास पकडून ते त्यास त्या कामाला लावीत. कांहीं शहरांत व खेडेगांवांत त्यांच्या वतीनें कित्येक पट्टण (पाताणे) प्रभु वरिष्ठ कामगार असत. ते आपल्या पोर्तुगीज वरिष्ठांप्रमाणें ब्राह्मणांसही वेठीस धरीत." नाईकांच्या म्हणण्यांत आपल्या त्या वेळच्या प्रभुपूर्वजांस स्वेच्छेविरुद्ध तसें वागावेंच लागे असें आहे. सारांश, ब्राह्मण आणि प्रभु यांच्यामधील शत्रुत्वाचें मूळ या पोर्तुगीजांच्या राजवटीच्या अव्वलींत आहे. नाईक म्हणतात, "ज्या आपल्या प्रभुपूर्वजांनीं वरीलप्रमाणें पोर्तुगीजांच्या, ब्राह्मणांसही वेठीस धरण्याच्या राजनीतीविरुद्ध वर्तन करण्याचें धैर्य दाखविलें, त्यांनाच त्यांच्या स्थावर जंगम मिळकती जप्त करून पोर्तुगीजांनीं जुलमानें बाटविलें. अशा बाटलेल्या प्रभूंचे वंशज आज वसई, ठाणें आणि साष्टी इत्यादि प्रांतांत पुष्कळ आहेत. त्याचप्रमाणें ह्या खिस्ती धर्मवेड्यांनीं कितीक मोठमोठ्या देवळांचा आणि त्यांतील मूर्तींचा विध्वंस केला आहे. अजूनही त्या छिन्नभिन्न झालेल्या देवळांचे व मूर्तींचे अवशेष, वरील प्रांतांतील हिंदू लेण्यांमधून व इतर ठिकाणींही जागोजाग आढळतात. ज्या प्रभूंनीं ह्या खिस्ती जेत्यांच्या हाताखालीं मोठमोठ्या मानाच्या आणि पगाराच्या व जबाबदारीच्या जागा पत्करिल्या होत्या, त्यांनाही आपले सर्व धर्मविधी गुप्तपणानें आणि रात्रीं उरकून घ्यावे लागत. पुढें महाराष्ट्रमहोदयाच्या सुखकालीं कैक प्रभुकुटुंबें आपल्या य

विधर्मी खिस्ती राज्यकर्त्यांचा मुलूख सोडून ब्राह्मण पेशव्यांच्या मुखछत्रांखालीं येऊन राहिलीं. "*

* "In 1434 (A. D. 1512) the Portuguese took possession of a few places in this part of India. Their officers used to exact all kinds of compulsory service popularly known as Vetha from their subjects and their political opponents without paying attention or regard whatever to their birth, position, caste &c. When they wanted a labouerer or a cooly they caught hold of any person whom they found and forced him to do any work however mean it might be. They had employed several Pattan Prabhus in high posts in most of their towns & villages. These had been several times against their will compelled by their Portuguese masters to exact this kind of service from their ancestors, relations & castemen of the future Peshwas of Poona. The Brahmins of that time not understanding the principles of the Portuguese Government attributed these acts to the Prabhus themselves; and thus arose the enmity which existed for a long time between the Peshwas & their followers on one side & the Prabhu caste on the other. The Prabhus had under pain of being forcibly converted to Christianity by their Portuguese rulers who were solely guided by their fanatical priests the Jesuits, to obey their orders & exact this kind of service from the Brahmins whom they were enjoined by their religion to honour. A few Prabhus, however, who had courage to disobey these orders were deprived of their effects & forcibly converted to Christianity. Their Christian descendants are still to be found in various parts of Salsette & the present Thana and Bassein districts. It may here be not out of place to mention the destruction of costly temples and idols by these Christian conquerors. The disfiguerd idols & images which are to be met with in various cave-temples cut out of solid work by ancient Hindus & in temples now wholly deserted in various parts of the late Portuguese dominions are the works of these fanatics. Even the Prabhus, who

२२. विजयनगरास याच सुमारास वीर नरसिंहाचा धाकटा सावत्र भाऊ कृष्णराय शके १४३० मध्यें आपल्या भावाच्या मागें सिंहासनारूढ झाला. ह्याच्या आईचें नांव नागलदेवी असें होतें. हा कृष्णराय विजयानगरच्या सर्व राजांत फारच पराक्रमी निपजला. ह्यानें २२ वर्षें राज्य केलें. तितक्या अवधींत विजयानगरच्या राज्याच्या चतुःसीमा पूर्व, दक्षिण आणि पश्चिम ह्या तीन्ही बाजूंस थेट समुद्रापर्यंत नेऊन भिडविल्या; व उत्तरेच्या अंगास ब्राह्मणी बादशाहीचेही त्यानें चांगले लचके तोडले. ह्यानें आपल्या राज्यांत उत्तम प्रकारची वसुलाची पद्धत सुरू केली; शेतकीस उत्तेजन देऊन तींत अनेक सुधारणा केल्या; तळीं, तलाव बांधले; भव्य देवालयें उभारून त्यांच्या नेहमीच्या खर्चास पुष्कळ जमिनी तोडून दिल्या; आणि हरएक प्रकारें कलाकौशल्यास उत्तेजन दिलें. हा आपल्या प्रजेस सख्या आईबापांप्रमाणें प्रिय वाटत असे. त्याचे होन ( सोन्याचीं नाणीं ) लोक अजूनही अभिमंत्रित ताईतांप्रमाणें गळ्यांत वगैरे धारण करितात. त्यानें आपल्या राज्यांत सर्व देशीविदेशी लोकांच्या व्यापारास भरपूर उत्तेजन दिलें. ह्या त्याच्या व्यापारोत्तेजक शीलाचा पूर्तकाली लोकांस

---

enjoyed the posts of honour under them on pain of being converted forcibly to Christianity, had to perform their religious ceremonies & ablutions in secrecy and under cover of night. After the rise of Maratha Power and establishment of seat of Government at Poona, a good many Prabhu families fled from their Christian rulers & sought refuge under the comparatively mild sway of the Marathas."

—S. M. Nayak's History of the Patton Prabhus. pp. 69-70.

चांगलाच लाभ झाला. शके १४३२ मध्यें याच्याच साह्यानें पूर्तकाली लोकांनीं युसफ अदिलशाहाच्या ताब्यांतील गोवें हिसकावून घेतलें. कृष्णरायाचा होनावर येथील सुभेदार तिमय्या हा ससैन्य गोव्यावरील पोर्तुगीजांच्या स्वारींत होता. गोवें याप्रमाणें पोर्तुगीजांच्या ताब्यांत आल्यावर कृष्णराय आणि पोर्तुगीज यांचा दोस्तीचा तह ठरला. कृष्णरायानें या तहांत पोर्तुगीजांस भातकल येथें वखार घालण्यास परवानगी दिली; मात्र पोर्तुगीज लोकांनी ते आणतील तितके आरबी आणि इराणी घोडे झाडून सर्व कृष्णरायासच विकले पाहिजेत, विजापूरकरांस एकही देतां कामा नये, विजापूरकरांशीं लढाई करतांना पोर्तुगीजांनीं कृष्णरायास साह्य केलेंच पाहिजे, अशा या तहाच्या अटी होत्या. कृष्णरायानें या वेळेपासून आपल्या सैन्यांत तोफखान्याची भरती केली; आणि त्यावर पुष्कळ पोर्तुगीजांस गोलंदाज किंवा तोफखान्याचे स्वतंत्र अधिकारी नेमले.

२३. याच सालीं युसफ अदिलशाहा वारला आणि त्याच्या मागें इस्माईल अदिलशाहा तख्तनशीन झाला. शके १४३४ त विजापूरकरांपासून कृष्णरायानें रायचूर व मुदकल हे किल्ले घेतले. ते परत घेण्याकरितां शके १४४२ त इस्माईल अदिलशाहा पुष्कळ धडपडला; परंतु कृष्णरायानें त्याचा पुरा मोड करून त्यास हांकून लावलें. ह्या लढाईंत पोर्तुगीज इतिहासकारांच्या लेखाप्रमाणें कृष्णरायाबरोबर पस्तीस हजार घोडेस्वार, पांच लाख पायदळ, पांचशें शायशीं हत्ती व बारा हजार भिस्ती इतका सरंजाम होता. ह्या पराजयानंतर विजापूरकरांनीं कृष्णरायाकडे पुन्हां केव्हांही वांकडा डोळा केला नाहीं. कृष्णरायाच्या सर्व लढायांत व कारस्थानांत त्यास त्याचे दोघे भाऊ अच्युतराय व रंगराय, त्याचा मुख्य प्रधान सुप्रसिद्ध तिम्मराय उर्फ आपाजी व या तिम्मरायाचा भाऊ गोविंदराय यांचें साह्य असे.

२४. ह्यापुढें कृष्णरायानें म्हैसूर येथील बंडावा मोडून श्रीरंगपट्टण व शिवसमुद्र हे दोन किल्ले घेतले. नंतर कूर्ग प्रांताची व्यवस्था करून तो मलबारवर चालून जाणार इतक्यांत मलबारच्या राजानें आपण शरण असल्याचें कळवून वार्षिक खंडणी देण्याचें व आज्ञा होतांच ससैन्य हजर होण्याचें कबूल केलें. नंतर तामील देशांत जाऊन तेथील पांड्य संस्थानिकांस जिंकून, मदुरा येथें कृष्णरायानें आपला इलाखाधिपति नेमला. या सर्व जिंकलेल्या प्रांतांच्या संरक्षणाकरितां त्यानें जिंजी, वेलूर आणि चंद्रगिरी ह्या ठिकाणीं अभेद्य किल्ले बांधले. नंतर तेलंगण प्रांत नव्यानें जिंकून नेलूर प्रांतांतील उदयगिरीच्या संस्थानिकांस त्यानें शरण आणलें. पुढें ओरिसाचा गजपतिराज ह्याच्यावर स्वारी करून त्यानें त्याचा सर्व मुलूख-सध्यां कृष्णा व गोदावरी या नांवाखालीं मोडत असलेला – पादाक्रांत केला. त्याचप्रमाणें सध्यां निजामाच्या राज्यांत मोडत असलेला तैलंगणाचा मुलूखही त्यानें हाताखालीं घातला; परंतु त्यांतील बराच भाग गोवळकोंड्याचें स्वतंत्र राज्य स्थापणारा ब्राह्मणी बादशहाचा सरदार कुतुबशहा ह्यानें परत घेतला. ओरिसाचा राजा प्रतापरुद्र यानें आपली मुलगी कृष्णदेवरायाला देऊन, त्याचें मांडलिकत्व कबूल केलें. तेलगू भाषेमध्यें कृष्णदेवरायाच्या या वैवाहिक संबंधावर एक मोठें सुरस काव्य आहे.

२५. कृष्णराय राज्यकारभारामध्यें स्वतः झटून प्रजेच्या कल्याणाकरितां व आपला दाब राहावा म्हणून उद्योग करीत असे. तो सारखा आपल्या राज्यांतील निरनिराळ्या प्रांतांत संचार करी. त्याच्या राज्यसभेंत आठ तेलगू कवी असत. भोजराजाच्या नवरत्नांप्रमाणेंच याचें हें कविरत्नाष्टक होतें. यांतच तेन्नलु रामकृष्ण या नांवाचा एक अत्यंत विनोदी कवि

असे. अकबराचा जसा बिरबल तसाच कृष्णरायाचा हा तेन्नलु रामकृष्ण होय. जशा बिरबलाच्या चातुर्याच्या गोष्टी आज प्रचलित आहेत तशाच तेन्नलूच्याही तेलगूमध्यें प्रसिद्ध आहेत. संस्कृत आणि कानडी कवींनाही कृष्णरायाचा भरपूर आश्रय असे. सुप्रसिद्ध आप्पय्य दीक्षित, तिम्मण, कुमारव्यास, भट्टमूर्ति असे त्या वेळचे अनेक कवि याच्या पदरीं असत. स्वतः कृष्णरायही चांगला कवि असून त्याचें तेलगूमध्यें एक काव्य आहे. कृष्णरायाची मुलगी मोहनांगी हीही चांगल्यापैकीं कवयित्री होती. वैष्णवपंथाचा मूळ प्रस्थापक वल्लभाचार्य यालाहि स्वपंथाची दीक्षा विजयानगरासच मिळाली आणि कृष्णरायानें त्याची भरपूर द्रव्य देऊन संभावना केली. जैन पंडितांसही कृष्णरायाच्या औदार्याचा लाभ घडत असे.

२६. देवस्थानें उभारण्याकडेही कृष्णरायानें असाच सढळ हातानें खर्च केला आहे. विजयानगरच्या अतिशय सुंदर म्हणून नांवजलेल्या देवळांपैकीं विजयविठ्ठलाचें देऊळ या कृष्णरायानेंच बांधण्यास प्रारंभ केला होता. या विजयविठ्ठलाचे देवळांत चालुक्य आणि द्राविड अशा दोन्ही प्रकारच्या शिल्पकौशल्याची कमाल झालेली आढळून येते, विजयानगरांतील कृष्णपुऱ्यांतील श्रीकृष्णाचें भव्य देवालय ह्यानेंच बांधविलें.

२७. कालवे बांधण्यांतही कृष्णरायानें भरपूर द्रव्यव्यय केला. यानें तुंगभद्रेचा जगत्प्रसिद्ध कालवा बांधून नगरामध्यें पाणी आणलें. याचा सचिव मद्द यानें असेच दुसरे सात कालवे तुंगभद्रेलाच धरणें बांधून काढले. धारवाड आणि म्हैसूर यांच्या सीमेवर मगदमसूरचा मोठा तलाव त्याचप्रमाणें शेगांव येथील तलाव या कृष्णरायाच्याच कारकीर्दींत बांधले गेले. कृष्णरायानें कर्नाटकामध्यें अनेक नवीन नगरें वसविलीं.

त्यांपैकीं हुबळी, बंगलूर, बल्लारी, चिकूबाळापूर इत्यादि आजही मोठमोठीं व्यापाराचीं ठिकाणें म्हणून प्रसिद्ध आहेत. जागजागीं अनेक नवे किल्लेही या कृष्णरायानें स्वराज्यसंरक्षणार्थ बांधलेले आढळतात. जमिनीची मोजणी करून वसुलाची पद्धत जमिनीच्या मगदुराप्रमाणें यानें कायम केली. जमिनीचे धारे फारच माफक होते. त्याचप्रमाणें साऱ्याची वसुली धान्यरूपानें किंवा द्रव्यरूपानें, जशी कुळाची सवड असेल तशी केली जात असे. कृष्णरायाच्या वेळची जमीनमोजणी हीच आजपर्यंतच्या म्हैसूर, कानडा आणि कर्नाटक यांतील पुढें झालेल्या सर्व जमीनमोजणीचा पाया होऊन बसली आहे. कृष्णरायादि विजयानगरच्या राजांनीं शेतकीला भरपूर उत्तेजन दिलें. त्यांनीं रयतेस शेतींत सुधारणा करण्याकरितां वेळोवेळीं आगाऊ द्रव्यसाहाय्यही करण्याचा उपक्रम ठेविला होता. पडित जमिनी लागवडीस आणण्यास उत्तेजन देणें, दहादहा, वीसवीस वर्षें त्यांवर सारा माफ करणें, पाणथळ व बागाईत करण्याकडे रयतेचीं मनें वळविणें, त्याचप्रमाणें रयतेकडून नवीं नवीं गांवें वसविणें इत्यादि गोष्टी कृष्णरायाच्या प्रजावात्सल्याची व राज्यकारभारपटुत्वाची उत्तम साक्ष पटवितात. कृष्णरायाच्या कारकीर्दींत व्यापाराला फारच उत्तेजन मिळत असे. त्या योगानें त्याच्या राज्यांतील डोंगराळ भागांतही वस्ती होऊन पुष्कळ सुव्यवस्थित खेडीं दिसत असत. समुद्रकिनाऱ्यावरील नौकांच्या साधनानें चालणारा व्यापारही चांगलाच भरभराटींत होता. सर्व धर्मांस या राज्यांत समान रीतीनें लेखलें जात असे. या वेळीं ब्रह्मदेश, सीलोन आणि स्थानिक खाणींतील हिरेमाणकांचा मुख्य बाजार विजयानगर येथेंच होता. हार्मज आणि केल येथील मोत्यांचीही उतारपेठ विजयानगरच झाली होती. चिनी

रेशमी कपडा आणि यूरोप व अलेक्झांड्रिया येथील सर्व जातींच्या रंगीत कापडाच्या वखारींच्या वखारी विजयानगर येथें असत. लोक सुखी, सधन व सोनें, रुपें, हिरेमाणकांच्या दागिन्यांनीं शृंगारलेले असे असत. न्यायव्यवस्था फारच उत्तम होती. पूर्व किनाऱ्यावरील बंदरें, चीन, पेगू, सिंहलद्वीप, अरबस्थान, मलबार, सुमात्रा, जावा वगैरेंकडून येणाऱ्या असंख्य तारवांनीं भरलेलीं असत. असल्या ह्या कृष्णरायासारख्या राजाचा आपल्या इतिहासांत फेरिस्ता उल्लेखही करीत नाहीं, ह्यावरून त्याचा इतिहास कितपत विश्वासपात्र आहे, हें वाचकांनींच ठरवावें. कृष्णरायानें कारणपरत्वें आपल्या आश्रयास आलेल्या मुसलमानांचाही अव्हेर केला नाहीं, इतकेंच नव्हे, तर त्यांना जमिनी वगैरे देऊन किंवा त्यांच्या योग्यतेप्रमाणें आपल्या लष्करांत शिपायापासून तों सरदारीपर्यंत जागा देऊन तो त्यांचा योग्य परामर्श घेत असे. त्यांच्याकरितां खुद्द विजयागरांत एक मशीदही बांधलेली होती. हे मुसल्मान कृष्णरायाच्या सैन्यांत मिळूनमिसळून वागत व अनेक प्रसंगीं जिवावर उदार होऊन ते आपल्या आश्रयदात्याच्या वतीनें आपल्या जातभाईविरुद्धही लढले असल्याचे दाखले आहेत. कृष्णराय हा शके १४५२ ( इ. स. १५३० ) त मरण पावला. याला पुत्रसंतति नसून, एक कन्या मात्र होती. ती रामराय या नांवाच्या एका मोठ्या अधिकाऱ्यास दिली होती.

२८. या कृष्णरायाच्या कारकीर्दीशींच महाराष्ट्रांतील एका सर्वमान्य साधूचा निकट संबंध आहे. तो साधू एकनाथाचा पणजा भानुदास हा होय. हा भानुदास लहान–नुकताच उपनीत झालेला असा–असतां त्याच्या वडिलांनीं विद्याभ्यासाबद्दल त्याची एक दिवस बरीच कानउघाडणी केली. त्याच्या मनास वडिलांचें

तें बोलणें फारच लागलें व तो कोणास नकळत तळघरांत जाऊन लपून बसला. इकडे वडीलमातोश्री मुलाचा सर्व गांवभर शोध करकरून दमलीं, परंतु कोठेंच पत्ता लागला नाहीं; तेव्हां कष्टी होऊन तीं पुत्रविरहानें अगदीं मरणोन्मुख झालीं. भानुदासानें तळघरांत पांचसात दिवस उपाशी राहून कंठले, तथापि तो दृढनिश्चयी मुलगा क्षुधाशांतीकरितां बाहेर आला नाहीं. मनांतील उद्देश हा कीं, आपणास देवानें प्रत्यक्ष दर्शन देऊन सर्व विद्या अवगत होण्याचा वर द्यावा. शेवटीं त्याच्या एकनिष्ठेचें फळ त्याला मिळालें. भानुदासांचे वडील परम सूर्योपासक होते. त्यांची उपासना आणि त्यांच्या या मुलाचें असें हें खडतर तप पाहून प्रत्यक्ष सूर्यनारायण एका ब्राह्मणाच्या रूपानें या भानुदासापुढें अवचित येऊन उभे राहिले व सात दिवसांच्या उपासानें विकल होऊन पडलेल्या त्या अर्भकास जागृत करून अत्यंत प्रेमानें आणि कळकळीनें त्यांनीं त्याला 'बा, हें घे' असें म्हणून प्रथम एक पेलाभर दूध प्यावयास दिलें. नंतर त्याचें हृद्गत जाणून 'असाच या तळघरांत तूं आणखी पांच दिवस राहा; तुला येथें आजच्याप्रमाणेंच दूध मिळेल व तुझ्या इच्छेप्रमाणें सर्व विद्याही तुला प्राप्त होतील.' असा त्यांनीं त्याला वर दिला. भानुदासास त्या ब्राह्मणाच्या ( सूर्याच्या ) सांगीप्रमाणें प्रत्यहीं त्या तळघरांत दूध प्यावयास मिळत असे. याप्रमाणें पांच दिवस होतांच भानुदास बाहेर येऊन आपल्या मातापित्यांस भेटला, तेव्हां त्यांस अतिशय आनंद झाला. आनंदाची पहिली उकळी शमून जरा समाधान वृत्तीवर आल्यावर, त्यांनीं आपल्या ह्या पुत्रास त्याच्या अज्ञातवासाची हकीकत आणि कारण विचारितां त्यानें त्यांना इत्थंभूत वृत्तांत निवेदन केला. तेव्हां आपल्या सूर्योपासनेचें

जणुं पक्व फलच, असा तो पुत्राचा यशस्वी वृत्तांत ऐकून त्यांना कृतार्थता वाटली. पुढें योग्य कालीं भानुदासांचें लग्न होऊन त्यांचीं वृद्ध मातापितरें निसर्गक्रमानें स्वर्गवास करितीं झालीं. अर्थात् भानुदासांवर सर्व संसाराचा भार पडला. त्यांनीं कापड विकण्याचा धंदा पतकरिला. ह्या धंद्यांत त्यांस प्रामाणिकपणानें वागूनच इतरांपेक्षां चांगली मिळकत होत असे. भानुदास आपल्या मातापित्यांचें भगवद्भक्तीचें व्रत परमश्रद्धेनें आणि अत्यंत प्रेमानें चालवीत. आपलीं ब्राह्मणधर्मास अनुसरून स्नान-संध्यादि ब्रह्मकर्में वेळच्या वेळीं सारून इतर वेळांत अखंड ईशनामसंकीर्तन व धंदा हीं दोन्हीं भानुदास सारखींच चालवीत. धंदा व स्नानसंध्यादि ब्रह्मकर्में ह्यांखेरीजचा जागृतीचा काळ भक्तिमार्गातील श्रेष्ठ कर्म जें भजन त्यांत ते वेंचीत असत. ह्या प्रमाणें त्यांचा आयुष्यक्रम चालला असतां, एके समयीं इतर सजातीय व्यापाऱ्यांबरोबर भानुदास उदीमानिमित्त फेरीस निघाले. वाटेंत असें झालें कीं, भानुदास एके जागीं कीर्तनरंगांत गुंगले असतां, इकडे त्यांच्या सोबत्यांनीं त्यांचें कापडाचें दिंड एका खाड्यांत टाकून दिलें आणि घोडें लांब आडवाटेस सोडून दिलें. भानुदास कीर्तन आटोपल्यावर आपल्या बिऱ्हाडीं येत असतां वाटेंत त्यांस अगदीं भलत्याच जागीं आपलें घोडें आढळलें. पुढें बिऱ्हाडीं गेले तों काय चमत्कार सांगावा ? त्यांचे सर्व सोबती केवळ एका वस्त्रानिशीं उघडेबोडके आणि शोक करीत असलेले त्यांच्या दृष्टीस पडले ! खरा प्रकार असा झाला होता कीं, त्या मत्सरग्रस्त सोबत्यांनीं भानुदासाचें घोडें उधळून देऊन त्यांचें कापडाचें दिंड खाड्यांत फेंकल्यावर कांहीं वेळानें चोरांनीं येऊन त्या सर्वांस यथेच्छ मार दिला व सर्व माल घेऊन ते चालते झाले होते. मत्सरास पेटून आपण भानुदासांचें निष्कारण नुकसान

करूं पाहात होतों, त्या पापाचेंच हें असें आपणांस प्रायश्चित्त मिळालें, अशी आतां त्या सर्वांची खात्री होऊन त्यांचें मन पश्चात्तापानें अगदीं होरपळत होतें. त्यामुळें भानुदास येतील केव्हां आणि त्यांस आपलें पापकर्म सांगून त्यांची क्षमा मागूं केव्हां, असें त्यांस होऊन गेलें होतें. भानुदास दृष्टीस पड-तांच त्या सर्वांनीं एकच कल्लोळ करून जो तो आपापल्यापरी केल्या पापकर्माचा पाढा वाचूं लागला. आपल्या कृतकर्माचे झाडे आपणांस लगेच कसे द्यावे लागले, हेंही निष्प्रांजल बुद्धीनें अगदीं गहिंवरून जाऊन त्यांनीं त्यांस सांगितलें. तेव्हां भानुदासांनीं त्यांचें सांत्वन केलें आणि त्यांनीं दाखवून दिलेल्या खाड्यांतून त्या सर्वांच्या साहाय्यानें आपलें कापडाचें दिंड वर काढून त्यांतील सर्व कापड त्या आपल्या सोबत्यांसच वांटून टाकलें व अतःपर आपण हा* चाटीपणाचा धंदा कर-णार नाहीं, अशी शपथ घेतली. असो !

२९. यापुढें भानुदासांनीं आपलें ब्रह्मकर्म, श्रीविठ्ठलनाम-संकीर्तन, महाएकादशीस पंढरीची वारी, साधुसंतांचें आतिथ्य आणि भक्ति व भक्तांचें माहात्म्यश्रवण व प्रसंगोपात्त निरूपण ह्यां-खेरीज दुसरा कोणताही ऐहिक व्यवसाय करण्याचें सोडून दिलें. चंदनाचा परिमळ ज्या प्रमाणें एकाच ठिकाणीं न राहतां वाऱ्या-बरोबर दूरवर पसरतो, त्या प्रमाणें भानुदासांची कीर्तिही कर्णोप-कर्णीं होऊन लवकरच सर्व महाराष्ट्रांत पसरली. तीच वृद्धिंगत होऊन ' यावच्चन्द्रदिवाकरौ ' दुमदुमत राहण्यास पुढील गोष्ट कारण झाली.

---

*निरनिराळ्या गांवांतून सोमवार, मंगळवारादि आठवड्यां-तील ठरलेल्या दिवशीं बाजार भरे, त्या त्या बाजारास जाऊन कापड विकणें, ह्यास चाटीपणाचा धंदा म्हणत.

३०. इकडे ह्या सुमारासच अशी गोष्ट घडून आली कीं, स्वभावतःच ईश्वरभक्तीकडे विशेष ओढा असलेला विजयानगराधीश कृष्णराय ह्याला श्रीविठ्ठलोपासनेचा अधिकच छंद लागून राहिला. भक्तोत्तम पुंडलिकाकरितां विटेवर उभी राहिलेली पंढरपूरची श्रीविठ्ठलाची कृष्णपाषाणमय मूर्तीच आपल्या राजधानींतील एका भव्य व रमणीय देवळांत असावी, म्हणजे तिच्या द्वारें आपणांस श्रीची अखंड सेवा घडेल, असें वाटून त्यानें एक दिवस पंढरपुरीं येऊन देवास अतोनात आळवून दृष्टांत मागितला. तेव्हां जर एका दिवसांत सांवळ्यानें श्रीची मूर्ति आपल्या नगरींत इष्ट ठिकाणीं नेऊन स्थापन करशील, तर तुझे मनोरथ सिद्धीस जातील, असा त्यास दृष्टांत झाला. कृष्णरायानें चांगले वैदिक आणि सदाचारी ब्राह्मण विजयानगरापासून थोडथोड्या अंतरावर असे जागोजाग ठेवले व त्या त्या जागीं त्यांच्या शिधासामग्रीची सर्व सोय उत्तम करून दृष्टांताप्रमाणें देवास पंढरपुरांतील राउळांतून उचलिलें आणि आपल्या इष्ट ठिकाणीं नेण्याची व्यवस्था करून एके रात्रीं श्रीची मूर्ति ह्या दक्षिण सार्वभौमानें महाराष्ट्रांतून कर्नाटकांत आपल्या राजधानींत नेऊन स्थापिली व तेथें सर्व प्रकारच्या राजभोगांनीं तिच्या द्वारें कृष्णपरमात्म्याची मोठ्या थाटांत उपासना चालू केली. इकडे एकादशीच्या महायात्रेनिमित्त महाराष्ट्रांतील ज्ञानदेव, नामदेव इत्यादिकांच्या संप्रदायांतील वारकरी भक्तमेळा पंढरपुरास जमूं लागला. बडव्यांनाहि श्रीची मूर्ति कोणीं, केव्हां आणि कशी नेली, याचा कांहीं पत्ता नव्हता; तथापि लवकरच, श्रीच्या संमतीनेंच श्रीचें विजयनगरास प्रस्थान झालें असल्याचें कळलें. राउळांत देवाची मूर्ति नसल्यानें दर्शनार्थ आलेल्या भोळ्या भाविक भक्तांची अगदींच निराशा झाली.

कोणीं निराहार भजनसप्ताह सुरू केले, कोणीं अनुष्ठानें मांडिलीं, कोणीं ' देवा, आमच्यावर कां रुसलासी– ' म्हणून परोपरींनीं धाय मोकलून, एखादें प्रेमळ बालक जसें आपल्या हरवलेल्या आईचा धांवा करीत असावें, त्याप्रमाणें मोठमोठ्यानें ' विठोबा, दीननाथ, विठाई माउली ' अशा करुणाजनक हांका मारून त्रागा करूं लागले. ह्या प्रमाणें पंढरपुरांत सर्वत्र गोंधळ उडून गेला. त्याचा प्रतिध्वनि सर्व महाराष्ट्रांत पसरून जणुं सर्व महाराष्ट्राची अधिष्ठात्री देवताच–नव्हे राष्ट्राचे पंचप्राणच–त्याला सोडून गेले कीं काय, असें जिकडेतिकडे सर्व भक्तांस होऊन गेलें. शेवटीं त्यांतील कांहीं धीर, गंभीर व वयोवृद्ध भक्त आपला शोक आवरून आपली हरवलेली उपास्यमूर्ति परत आणण्याची युक्ति शोधूं लागले. ह्या विचाराकरितां जमलेल्या त्या श्रेष्ठ भक्त-मंडळांत भानुदासही होते. सर्वांच्या विचारानें आणि आपल्या भक्तीच्या निस्सीमतेवर श्रद्धा ठेवून भानुदासांनीं विजयानगराहून श्रीची मूर्ति परत आणण्याचें काम पत्करिलें. जमलेल्या सर्व भक्तबांधवांचा विजयप्रद आशीर्वाद घेऊन भानुदास पंढरीहून जे निघाले ते रात्रीचा दिवस करून, तहानभूकही विसरून, विजयानगरास येऊन दाखल झाले. तेथें येतांच प्रथम तुंगेच्या तीरावर आपली स्नानसंध्या आटोपून ते त्या राजधानींत शिरले. नगरांत चहूंकडे हिंडून नम्रतापूर्वक अनेकांस अनेक रीतींनीं भाषणांत गोंवून त्यांजकडून त्यांनीं आपल्या उपास्य मूर्तीचें ठावठिकाण नीट समजून घेतलें. नंतर रात्रीं तेथें असलेल्या तीनचार चौकीपाहाऱ्यांतून मोठ्या दक्षतेनें आंत शिरकाव करून घेऊन त्यांनीं श्रीची प्रत्यक्ष भेट घेतली व भक्तकनवाळू श्रीपांडुरंगाच्या धांव्यास प्रारंभ केला. तेव्हां श्रीनें, ' हे भक्तोत्तमा ! सध्यां माझ्या

गळ्यांतील ह्या तुळशीमाळा प्रसाद म्हणून स्वीकारून तूं आलास तसाच परत तुंगाकांठीं जा. ' असा त्यांस दृष्टांत दिला. त्याप्रमाणें ह्यांनीं त्या तुळशीमाळांचा प्रसाद घेतला आणि आपला मार्ग सुधारला. ह्या तुळशीमाळांच्या प्रसादाबरोबरच श्रीच्या कंठांतील एक रत्नहार आला आहे, हें भानुदासांच्या ध्यानांतही नाहीं. दुसरे दिवशीं तो पृथ्वीच्या मोलाचा रत्नहार नाहींसा झाल्याचा बोभाटा होऊन कृष्णरायाच्या आज्ञेनें सर्व पुजाऱ्यांचा आणि इतर सेवकांचा झाडा घेऊन झाल्यावर रत्न-हार चोरणाऱ्यास हुडकून काढण्याकरितां गांवांत व गांवाबाहेरही चौर्यशोधनपटु राजपुरुष दशदिशा हिंडूं लागले. त्यांतील कांहींनीं तुंगभद्रेच्या तीरावर बसलेल्या ह्या महाराष्ट्र ब्राह्मणाचाही झाडा घेतला, तों त्याजवळील निर्माल्यांत त्यांस तो चंद्रहार आढळला ! त्याबरोबर त्याला पकडून त्यांनीं कृष्णरायाकडे नेलें. संतापाच्या आणि सत्तेच्या जोरांत राजानें ह्या चोराला आतांच्या आतांच सुळावर चढवा म्हणून आज्ञा केली. झालें ! भानुदास मातंगधृतदंड असे सुळाकडे चालले. शूलासंनिध येऊन पोंचतांच त्या मांगांनीं भानुदासांस आपल्या कुलदेवतेची शेवटची प्रार्थना करण्याकरितां अवकाश दिला. तेव्हां त्यांनीं अनन्य भावानें श्रीविठ्ठलाचें भजन सुरू केलें असतां, कांहीं काळ ते मांगही भक्तिरसानें विरघळून देहभान विसरले. भानुदास तर मुळीं देहावर नव्हते. परंतु ते मांग कांहीं वेळानें देहावर येऊन, ' हं ! आटप ! वेळ भरून गेली, सिद्ध हो. तुला आम्हीं उचलून सुळावर चढविलाच समज ! ' असें म्हणत सहज सुळाकडे पाह-तात, तों त्यास पल्लव ( अंकुर ) फुटलेला त्यांच्या दृष्टीस पडला. मग काय विचारतां ? त्या मांगांनीं भानुदासांस सुळावर चढ-विण्याचें टाकून हा शूलास पल्लव फुटल्याचा चमत्कार राजास

कळविण्याकरितां राजवाड्याचा मार्ग सुधारला. ही अद्भुत गोष्ट कळतांच राजास असें वाटलें कीं, आपण ज्याला सुळावर चढविण्याची आज्ञा केली तो सामान्य चोर नसून कोणीतरी महासामर्थ्यशील ईश्वरभक्त असावा. लगेच राजानें आपली पहिली आज्ञा फिरवून भानुदासांस समारंभानें आपणाकडे घेऊन येण्याची सेवकांस आज्ञा दिली व आपणही त्यांच्या मागोमाग मार्गांत त्यांस सामोरा गेला. दोघांची गांठभेट झाल्यावर भानुदासांनीं आदल्या रात्रींचा सर्व प्रकार जशाचा तसा राजाला सांगितल्यावर राजा त्यांस म्हणाला, 'महाराज! क्षमा करा. मीच अपराधी आहें. तथापि देवाला मीं जसें सोंवळ्यानें एका दिवसांत तेथून येथें आणिलें, तसेंच आपणही येथून घेऊन गेलें पाहिजे. कारण, देवाचा त्याच वेळीं मला असा दृष्टांत झाला आहे.' भानुदासांनीं तें मान्य केलें आणि ठरल्याप्रमाणें ईश्वराच्याच कृपेनें ते आपल्या व सर्व महाराष्ट्रवैष्णव भक्तांच्या उपास्य मूर्तीस पंढरपुरास घेऊन आले. पंढरपुरास सर्व भक्तमंडळींत जयजयकार होऊन भानुदासांची कीर्ति अजरामर झाली. ही गोष्ट शके १४३६ त घडली असें म्हणतात.* ह्याच भानुदासांच्या कुळांत, भानुदासांचे चक्रपाणी, चक्रपाणींचे सूर्याजीपंत आणि त्यांचे एकनाथ, अशा परंपरेनें त्याच शतकांत एकामागून एक साधुपुरुष जन्मास आले.

३१. कृष्णरायाच्या मागून विजयानगरच्या सिंहासनावर त्याचा धाकटा व सावत्र भाऊ अच्युतराय हा आरूढ झाला. कृष्णरायाच्या राजवटींतच अच्युतराय स्वतंत्रतेनें, स्वनामांकित राजमुद्रा वापरीत असे, असें मानण्यास जागा आहे. रंगराय

---

* ह्या भानुदासांच्या कथेस स्वतंत्र व प्रत्यंतर पुरावा मिळावा तसा मिळालेला नाहीं; त्यामुळें केवळ सांप्रदायिक आख्यायिकेप्रमाणेंच ती येथें दिली आहे.

आणि अच्युतराय हे दोघे सख्खे भाऊ होत. ह्या अच्युतरायाच्या कारकीर्दीतही पुष्कळ देवळें बांधलीं गेलीं; आणि तलावादिकांचीं कृष्णरायानें आरंभिलेलीं कामें पुढें चालविलीं गेलीं. इस्माइल आदिलशहा आणि कासीम वेरीद ह्या दोघांनीं एकत्र येऊन शके १४५४ च्या सुमारास रायचूर दोआब आणि मुद्गल हे दोन परगणे विजयानगरची तेथील ठाणीं उठवून आपापल्या शाह्यांस जोडले. शके १४५६ त विजापूरच्या आदिलशहानें गोवळकोंड्याच्या कुतुबशहाशीं लढण्यास विजयानगरकरांची मदत मागितली; आणि ती विजयानगरकरांनीं दिलीही. ह्या मूळच्या एकछत्री ब्राह्मणी राज्याच्या झालेल्या पांच उपटसुळ शाह्यांच्या परस्परांतील भांडणांत हे विजयानगरकर हिंदु राजे ह्याच वेळीं प्रथम पडले. पण ते जे ह्या वेळीं त्यांत पडले, ते शेवटीं स्वतःची आहुति देऊनच त्यांतून बाहेर म्हणजे ह्या जगाच्याच बाहेर पडले. असो ! अच्युतरायानें दक्षिणेस तिनवल्लीपर्यंत आपलें एकछत्री राज्य चांगलेंच हांकलें आणि शके १४६४ त तो हें नश्वर जग सोडून चिरलोकास गेला. त्याच्या मागें त्याचा लहान मुलगा वेंकटराय हा अभिषिक्त झाला व राज्य-कारभार राजशालक तिम्मराय ह्याच्या म्हणजे वेंकटरायाच्या मामाच्या हातांत गेला. राजशालकांचा कारभार प्रजेस व इतर राजपुरुषांस संतोषकारक झाला, असें क्वचित् घडतें. त्या प्रमाणें ह्या शालकांचा कारभारही लवकरच जुन्या कारभारी मंडळीस असह्य झाला. ह्यानें आपल्या विरुद्ध बोलणाऱ्या प्रत्येकास कार-भार सोडून घरीं बसावयास लावलें. तेव्हां ' अबला यत्र प्रबला बालो राजा निरक्षरो मन्त्री ' ही स्थिति ह्या राजशालकी कार-भारानें लवकरच प्राप्त झाली. असली ही सोन्यासारखी संधि आदिलशाहानें वायां जाऊं दिली नाहीं. इस्माइल आदिलशाहा मरून त्याच्या गादीवर त्याचा कर्ता मुलगा इब्राहिम आला

होता. त्यानें ह्या वेळीं विजयानगरावर मोठ्या सैन्यासह चाल केली. तेव्हां ह्या राजशालकांनीं ८० लाख होन देऊन त्याला परतविलें. हपापाचा माल गपापा! ह्यानें कुठें हें इतकें द्रव्य मिळविण्यास श्रमसाहस केले होते, तर त्याचें रक्षण करण्यासाठीं तो तरवार पाजळून उभा राहाणार! सारांश काय, ह्या शालकांचा कारभार प्रजापीडक होऊन राज्यांत जिकडेतिकडे ' बळी तो कान पिळी ' हाच न्याय सुरू झाला. इतक्यांत तें राजमुकुटधारी अर्भक परलोकवासी झालें आणि ह्या राजशालकांचा माथा उजळ झाला. लौकिकांत तर ह्यांनींच त्यास जिवें मारलें असें झालें. खरें खोटें ईश्वर जाणें! वेंकटराय ह्या प्रमाणें कांहीं महिने नामधारी राजा होऊन मरण पावतांच ह्या प्रजापीडक कारभाऱ्यांनीं स्वतःच राजमुद्रा घेऊन, स्वतंत्र कारभार आटोपला. इकडे इतर सचिव आणि राजपुरुष ह्यांनीं ह्या तिरुमलरायाविरुद्ध एक पक्ष उभा केला आणि त्या पक्षाचें आधिपत्य लोकप्रिय कृष्णरायाचा जांवई जो रामराय त्यास दिलें. त्या मंडळीनें तिरुमलरायास राजकारभारांतून हांकून लावण्याचा संकेत करून त्याकरितां आपली कडेकोट सामग्री चालविली. ह्या कटाची सूचना मिळतांच तिरुमलनें विजापूरच्या इब्राहिम आदिलशहास प्रत्यहीं तीन लाख होन सैन्यखर्चास देण्याचें कबूल करून आपल्या मदतीस बोलावलें. त्या प्रमाणें इब्राहिम एकाद्या विजयी राजाप्रमाणें मोठ्या थाटामाटानें विजयानगरांत ससैन्य शिरला. रामराजादिकांना हें इब्राहिमाचें नगरसंचरण मुळींच आवडलें नाहीं. तथापि तिरुमलरायानें आपण होऊन बोलावून आणलेल्या ह्या निधर्मी विजयी शत्रूशीं अंतःकोपानें पोळलून निर्बल झालेल्या आपल्या सैन्यास झगडतां येणें अशक्य आणि अहितकारक जाणून त्यांनीं आपली सर्व चळवळ बंद करून, अगदीं मूक व्रत स्वीका-

रिलें. तेव्हां ५० लाख होन देऊन तिरुमलानें इब्राहिमास परत पाठविलें. इब्राहिम जातांच ह्या रामराजप्रभृति सर्व जुन्या राजमंत्र्यांनीं एकाएकीं राजवाड्यास गराडा दिला. त्यांतून सुरक्षित बाहेर पडणें अशक्य असें जाणून तिरुमलरायानें रागाच्या आवेशांत वेड्यासारखी राजवाड्यांतील मौल्यवान् सामानाचीच तोडफोड करून शेवटीं अगदीं भ्रमून जाऊन आत्महत्या करून घेतली! तिरुमलरायाच्या आत्महत्येबरोबर विजयानगरांत आज आठनऊ महिने चाललेली झोटिंग दंडेलीही समाप्त झाली. रामराजानें रंगरायाचा मुलगा सदाशिवराय ह्यास सिंहासनाधिष्ठित केलें. ह्या वेळेपासून वास्तविक सर्व सूत्रें रामरायाच्याच हातीं आलीं. तीं त्यानें कशीं अप्रतिम चालविलीं हें पुढें ओघानें दिसणारच आहे. आतां वरील अवधींत पश्चिम किनाऱ्यावर म्हणजे कोंकणांत पूर्तकालांनीं काय काय धुमाकूळ उडविला होता तिकडे थोडें लक्ष देणें भाग आहे.

३२. पूर्तकालांनीं विजयानगरकरांशीं मित्रत्वाचा संधि करून, त्यांच्या पदरीं गोलंदाजी पतकरून आणि त्यांस घोडे वगैरे लागेल तें सामान पुरविण्याचा मक्ता घेऊन, हळूहळू कोंकणांत खेळणा (विशाळगड) इत्यादि ठिकाणच्या मराठ्यांच्या हातून तीसचाळीस वर्षांपूर्वीच मुसलमानांनीं जिंकून घेतलेला समुद्रकांठचा प्रदेश थोडाथोडा मुसलमानांच्या हातून हिसकविण्याचा उपक्रम सुरू केला. पूर्तकालांच्या आधीं हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्याचा व्यापार ईजिप्तच्या मुसलमानांच्याच हातांत होता. ह्या ईजिप्तच्या व्यापाऱ्यांकडून युरोपस्थ लोकांस हिंदुस्थानांतील माल वेनीसकर अलेक्झांड्राहून नेऊन पोंचवीत असत. ह्या दोघांच्याही व्यापारावर पूर्तकालांनीं आतां गदा आणिली. त्यांनीं मोठ्या साहसानें, धैर्यानें आणि अलौकिक चातुर्यानें

तांबड्या समुद्रापासून इराणच्या आखातास वळसा घालून हिंदुस्थानच्या पश्चिम व पूर्व किनाऱ्यावरून तों तहत चीन आणि जपानच्या समुद्रकिनाऱ्यापर्यंत यच्चयावत् आशिया खंडाच्या सर्व समुद्राचें व्यापारशास्त्र आपलेंसें करण्याचें योजिलें आणि तें पारही पाडलें. त्या वेळीं समुद्रावर व्यापार करण्याचा सर्व राष्ट्रांना सारखाच हक्क असावा, अशी कल्पना मुसल्मानांस कदाचित् कांहीं असेल, परंतु त्यांच्या या पूर्तकालीन यूरोपस्थ प्रतिस्पर्ध्यांस तर मुळींच नव्हती. त्यामुळें हे आपला ' बळी तो कान पिळी ' हा न्याय चालवून जेथें जेथें म्हणून त्यांचा पाय रुपला, तेथें तेथें पूर्वीच्या इतर राष्ट्रीय व्यापाऱ्यांस व्यापार करूं देत ना. अर्थात् ईजिप्तकरांचे आणि ह्यांचें प्रथम तांबड्या समुद्रापासूनच भांडण जुंपलें. ईजिप्तकरांस ह्या पूर्तकालांच्या विरुद्ध लागेल ती मदत करण्यास वेनीसकर एका पायावर सिद्ध होते. तसेंच, हिंदुस्थानांतील मुसल्मान व्यापारी आणि गुजराथ व कोंकण ह्यांवर राज्य चालविणारे विजापूर, अहमदनगर वगैरेकडील सुलतान हेही ह्या पूर्तकालांशीं झगडण्यास उभे राहिले. त्यामुळें कालिकतपासून जसजसे हे पूर्तकाल उत्तरेस एक एक बंदरांत आपलें ठाणें देऊं लागले, तसतसे त्यांचे व मुसल्मानांचे चारदोन हात व्हावयास लागले. ह्यांपैकीं पहिली सलामी शके १४२९ त चौलच्या बंदरांत झडली. ह्या वेळीं लरेन्झो ड आलमीडा ह्या पूर्तकालानें, चौलच्या बंदरांत असलेल्या मूर लोकांच्या जहाजांनीं आपल्या सलामीस उत्तर दिलें नाहीं, म्हणून त्यांचीं तेथील सातही जहाजें बुडविलीं व आपण दाभोळच्या बंदरांत चालता झाला. तेथें कालिकत येथील मुसलमानी आरमार होतें. त्यावर हल्ला करावा कीं न करावा या विचारार्थ आलमीडानें आपलें युद्धमंडळ भरविलें. त्यांत हल्ला

करूं नये असें ठरल्यामुळें त्यांच्या वाटेस न जातां त्यानें दाभोळ बंदरापासून नदीच्या मुखांतून १०।१२ मैल आंत जाऊन तेथील एका बंदरांतील सर्व जहाजें, अचानक छापा घालून पाडाव केलीं. त्यांत आर्मझ येथून आलेलीं, मूल्यवान् वस्तूंनीं भरलेलीं दोन जहाजें होतीं. त्यांची लूट करुन व बाकीचीं सर्व जाळून टाकून तो कोचीनला परतला. कालिकतच्या आरमारांचा चक्काचूर उडविल्यावांचून परत फिरल्याबद्दल आलमीडाचा बाप त्याजवर फारच रागावला. खरोखर, पूर्वेकडील मुसल्मानांदिकांस, जर " समुद्रांत व्यापार करण्याचा आपल्यालाच हक्क असावा व आपलें जसें बळ चाललें तसें आपण दुसऱ्याचें–तो निरपराध असतांही–साधेल तें नुकसान करुन आपलें घोडें पुढें ढकलावें, " अशा नीतीचें बाळकडूं असतें तर त्यांनीं ह्या पूर्तकालांचा इकडे मुळीं पायच ठरूं दिला नसता. परंतु हिंदुस्थानांतील विशेष सात्त्विक वृत्तीच्या यदृच्छालाभसंतुष्ट भारतधर्मी लोकांपेक्षां जरी ते अधिक कपटपटु, आडदांड आणि हावरे असले, तथापि यूरोपस्थ प्राच्यांपेक्षा भोळेच खरे; आणि म्हणूनच ह्या साहसी पूर्तकालांची हिंदुस्थानच्या, किंबहुना आशियाच्या पश्चिम किनाऱ्यावर इतक्या लवकर डाळ शिजली. असो ! एकदां विनाकारण आगळीकिचा, कपटाचा व दांडगाईचा मार्ग दोन पक्षांपैकीं एका पक्षानें स्वीकारला, म्हणजे दुसऱ्यासही स्वसंरक्षणार्थ तोच मार्ग पतकरावा लागतो. त्याप्रमाणें आलमीडानें केलेल्या विनाकारण आगळिकीचें उट्टें मुसल्मानांनीं शके १४३० त सव्याज काढलें. ह्या वेळीं आलमीडा कांहीं व्यापारी गलबतें घेऊन चौल बंदरांत शिरला. तेव्हां अहमदनगरच्या सुलतानाच्या तेथील हस्तकानें त्याचा चांगला गौरव करून त्याला तेथें व्यापार करण्यास परवानगी दिली. नंतर तो व त्याचे लोक विश्वासानें

पुरे गाफील आहेत, असें जाणून, गुजराथ व ईजिप्तकर ह्यांच्या आरमारांकडून त्याजवर हल्ला करवून त्यानें त्याची धांदल उडविली. ह्या वेळीं पूर्तकाल लोक बरेच शौर्यानें लढले; तरी त्यांचें निशाणाचें जहाज व सेनापति आलमीडा ह्यांना पाण्यांत गति घ्यावी लागली; शिवाय दीडएकशें लोक ठार व सवाशें जखमी झाले. मुसल्मानांचींही पुष्कळ माणसें कामास आलीं; तथापि ह्या चकमकींत जय त्यांचाच झाला, हें निर्विवाद आहे. पुढील वर्षी थोरल्या आलमीडानें दीव बंदरांत ईजिप्त व गुजराथ ह्यांच्या १०० जहाजांचा धुव्वा उडवून आपल्या मुलाच्या मरणाचा चांगला सूड घेतला. ह्या झटापटींत मुंबई व माहिम येथील लोकांना ह्या पूर्तकालांचा बराच मासला पाहावयास सांपडला. ह्या दोन्ही ठिकाणच्या गरीब कोळ्यांस त्यांचा फारच उपसर्ग पोंचून कित्येकांस जिवें मरावें लागलें व कित्येकांस बाटून खिस्ती व्हावें लागलें. ह्या थोरल्या आलमीडाचाही त्याच्या दुष्कृत्याबद्दल दैवानें चांगलाच सूड उगवला. तो शके १४३० च्या अखेरीस म्हणजे फेब्रुवारी इ. स. १५०९ त पोर्तुगालास परत जात असतां सालढाणा नांवाच्या आखातांत हाटेंटाट लोकांनीं त्याचा वध केला. त्यांनीं त्याला वाळूंत गुडघे टेंकून बसवून त्याच्या मानेंत नेमका बाण मारून त्यास ठार मारिलें. ह्याच्या मरणाबद्दल ‘ ऑरिजिन ऑफ बॉम्बे ’ नांवाचें पुस्तक लिहिणारे परलोकवासी विद्वान् पोर्तुगीज इतिहासलेखक डॉ. कुन्हा हे खालीलप्रमाणें उद्गार काढतात : ‘ * निर्घृण जुलमी आणि मुंबईच्या निरपराध व गरीब कोळ्यांची काळे म्हणून कत्तल

* “A sad but a fit epilogue to the life of one whose conduct was mercilessly atrocious, who wantonly slaughtered poor Bombay Kolis, whom Gaspur Correa calls blacks, to be in his turn killed by the genuine African Blacks.”

उडविणाऱ्यांच्या आयुष्याची इतिश्री आफ्रिकेंतील जातिवंत काळ्यांकडूनच व्हावी ही जरी कांहींशी दुःखद, तरी अति योग्य गोष्ट होय !' ह्यापुढें शके १४३९ त पोर्तुगीजांनीं फिरून मुंबई, माहिम बंदरांत वरच्या सारखाच अत्याचार केला. शके १४४१–४२ त त्यांनीं चौल येथें किल्लेबंदी चालविली असतां त्यास मलिक इयाझनें हरकत घेतली; तेव्हां डॉम द्वार्टेच्या गव्हर्नराचा भाई डॉम लुइझ यानें एक मोठें लढाऊ आरमार तयार करून मुसल्मानी आरमाराचा सारखा पिच्छा पुरविला. शेवटीं चौलबंदरापर्यंत ह्या पोर्तुगीजांचे पाय कायमचे रोवले आणि मुसलमानी आरमार पराजित झालें; तें फिरून बरेच दिवस इकडे वळलें नाहीं. ह्यानंतर शके १४५० त गव्हर्नर संपैओ ह्यानें एक जंगी लढाऊ आरमार तयार केलें आणि चौलहून दीव बंदर काबीज करण्याच्या हेतूनें तो निघाला; परंतु प्रतिकूल वाऱ्यामुळें त्याला एका लहानशा बेटासमोर नांगर सोडणें भाग पडलें. हें बेट ठाण्यानजीक होतें. ह्याच्या आरमारासमोरच अलीशहाचें आरमार होतें. अलीशहानें लगेच आपलीं जहाजें ठाण्याच्या खाडींत हाकारलीं. पोर्तुगीजांनीं वाऱ्याच्या अनुकूलतेवर आपलीं जहाजें खाडीच्या तोंडाशीं नेलीं, पण फिरून प्रतिकूल वारा झाल्यामुळें तेथेंच नांगरिलीं. अलीशहानें आपल्या चाळीस जहाजांनिशीं कांहीं अंतरावरून पोर्तुगीजांवर गोळ्यांचा भडिमार केला. परंतु अंतर बरेंच असल्यामुळें त्यापासून पोर्तुगीजांचें कांहींच नुकसान झालें नाहीं. संपैओनें एकही तोफ न डागतां आपलीं जहाजें आंत खाडींत बरींच दूर नेलीं; आणि सकाळपर्यंत तेथून मुळींच हालविलीं नाहींत. इकडे अलीशहानें नागोठण्याच्या खाडीचा मार्ग सुधारला. त्यानें ह्या वेळीं आपल्याबरोबर निवडक वीस मोठीं गलबतें घेतलीं होतीं. त्यांच्या सज्जावरून कुराणांचे

चित्रपट लटकावलेले होते. सेंपैओनें दुसरे दिवशीं गव्हर्नरच्या संमतीनें नागोठण्याच्या खाडीचे तोंडावर आपलीं निवडक गलबतें हांकारलीं आणि असावध असलेल्या शत्रूच्या अंगावर चालून जाऊन मार, जाळपोळ करून व पुष्कळ लूट घेऊन तो परत फिरला. अलीशहानें निसटून जाऊन एका लहान परंतु बळकट किल्ल्याचा आसरा केला होता. त्याच्यावर निवडक ५०० लोकांनिशीं हीरर डा सिल्व्हेरा ह्यानें चालून जाऊन त्याच्या भोंवतालचा सर्व प्रांत लुटून, जाळपोळून टाकला, आणि सांपडेल त्या निःशस्त्र मुसल्मानाचीसुद्धां कत्तल उडवून पुष्कळशी लूट घेऊन आणि तोफा वगैरे लढाऊ सामान पाडाव करून तो परत फिरला. तेव्हां ठाण्याच्या किल्लेदारानें भिऊन त्याला २००० सुवर्णमुद्रा दिल्या व प्रतिवर्षीं तितकीच खंडणी देण्याचेंही कबूल केलें. पुढें ह्या सिल्व्हेराची मुंबईच्या बंदरात राहून खंबायतच्या आखातापर्यंत चांचेपणा करण्यावर नेमणूक झाली. अलीशहानें ३५०० लोकांनिशीं वसईच्या जुन्या किल्ल्यांत तळ दिला होता. सिल्व्हेरानें आपलें मुलुख मारण्याचें, लुटालुटीचें व जाळपोळ करून लोकांस त्रासवून त्यांस जुलमानें बाटविण्याचें काम मोठ्या सपाट्यानें चालू केलें. शेवटीं तो वसईसही मोर्चे लावून बसला व सुरुंगांनीं किल्ल्याचें बांधकाम पाडून प्रथम अलीशहाच्या लोकांची आणि नंतर शहरांतील सुखवस्तूंचीही मनसोक्त कत्तल उडवून वसई शहरास आग लावून परत मुंबईस आला. तथापि अजून ह्या पोर्तुगीजांस लुटारू, दंगेखोर, चांचे, वाटमारू, ह्यापेक्षां जास्त पदवी प्राप्त झाली नाहीं ! हे लोक म्हणजे त्या काळचें एक भयंकर पेंढारच होय.

३३. हें ह्यांचें पेंढारीपण चालू असतां ननो डा कुन्हा ह्यानें एक अति मोठें आरमार आणि सैन्य जमवून जंगी स्वारी काढिली.

त्या स्वारींत त्यानें एतद्देशीयांस व मुसलमान सत्ताधीशांच्या ठिकठिकाणच्या हस्तकांस पुष्कळच उपसर्ग पोंचवून मुंबईचा दक्षिणोत्तर बहुतेक पश्चिम किनारा सर करून कायमचा बळकाविला शके १४२३ त कुन्हानें गोवें येथें फिरून एक मोठें आरमार एकत्र केलें, त्याचा व इतर ठिकाणच्या लढाऊ जहाजांचा मुंबई येथें मिलाफ झाल्यावर त्यानें आपल्या सर्व लढाऊ लोकांची पहाणी केली. तों सर्व संख्या तीस हजारांवर भरली. ह्यांत आठ हजार लढाऊ गुलाम म्हणजे पाडाव करून बाटवलेले काळे लोक, दोन हजार मलबारी, आणि कानडी शिपाई, ३००० बंदुकवाले आणि ४००० एतद्देशीय म्हणजे हिंदू मराठे खलाशी किंवा कोळी होते. कित्येक स्वतंत्र रसदेचीं म्हणून व्यापारी जहाजें होतीं, तींही काळ्या देशी कानडे मराठे लोकांचींच होतीं. बाकी सर्व पोर्तुगीज असल यूरोपांतील होते.

३४. ह्या एवढ्या जंगी आरमारानिशीं ही स्वारी प्रथम दमणवर गेली. तें थोडक्याच श्रमानें हातीं आलें. तेथून उत्तरेकडे शियाल बेटाकडे जाऊन सन १५३१ च्या ७ व्या फेब्रुवारीस कुन्हानें आपलें लष्कर जमिनीवर उतरलें. तेथें मोठी घनघोर लढाई झाली. तींत येथील मूर लोकांची सरसहा कत्तल होऊन तें ठिकाण पोर्तुगीजांच्या घशांत उतरलें. येथील कत्तल इतकी भयंकर झाली कीं, त्या बेटाला त्या कत्तल करणाऱ्यांनींच मृतांचें बेट " The Island of the dead " असें नांव दिलें. ह्या स्वारीहून गव्हर्नर कुन्हा माघारा गोंव्यास आला; तरी त्यानें मार्गे ६० लढाऊ गलबतें अनटोनियो डा सालडाना ह्याच्या ताब्यांत देऊन त्याला खंबायतच्या आखातांत फिरत राहून शत्रु म्हणजे हिंदु किंवा मुसलमान कोणीही जो असेल त्याला पोंचवेल तितका उपसर्ग पोंचवावा म्हणून ताकीद केली होती. त्याप्रमाणें सालडाना ह्यानें

सलाभीलाच गोगो शहर घेऊन जाळून टाकिलें आणि बंदरांतील पुष्कळ जहाजें पाडाव केलीं. बलसार, सुरत, तारापुर, माहिम, केळवें, आगाशी इत्यादि ठिकाणांचीही तीच वाट लावून हा साल्डाना वीर गोंव्यास परतला. नंतर कुन्हानें डियागो डा सिल्व्हेरा यास फिरुन गुजराथचा किनारा लुटण्यास पाठविलें. जणुं काय, ह्यांना लुटण्याकरितांच सृष्टिकर्त्यानें तो किनारा वसविला होता! डियागो डा सिल्व्हेरा येतांच तेथील लोक वस्ती उठवून चालते झाले. तेव्हां यास 'अतृणे पतितो वह्निः' होऊन परतावें लागलें. तरी तो का आपला पराक्रम गाजविल्याशिवायच परतणार! त्यानें ठाण्याच्या किल्लेदारास हीटर डा सिल्व्हेरा ह्यास कबूल केलेली खंडणी आपणास द्यावी म्हणून निरोप पाठविला. त्यानें कांकूं करितांच डियागो डा सिल्व्हेरा ह्यानें आपले लोक उतरून ठाण्यांत घातले आणि तें शहर लुटून फस्त करुन तीन मोठीं जहाजें भरुन रेशमी आणि तागी कापड घेऊन तो फिरुन आपल्या जहाजांत बसून चौलास जाण्यास निघाला. वाटेंत त्यानें मध्येंच वांद्याच्या खाडींत शिरुन एक तांदुळानें भरलेलें जहाज पाडाव केलें आणि शेवटीं, ह्या स्वारींत ठाणें, माहीम, वांद्रे आणि मुंबई इतकीं ठिकाणें नव्यानें जिंकलीशीं करुन ही स्वारी विश्रांतीसाठीं चौलास शके १४५४ त आली. येथून स्वारीनें वसईची सर्व खडान् खडा माहिती मिळवून ती गव्हर्नरास गोंव्यास लिहून पाठविली. मागें एकदां पोर्तुगीजांनीं वसईस आपली तरवार गाजविली होती, तरी त्यांची पाठ फिरतांच तेथें पूर्ववत् सर्व कारभार चालू झाला होता. तुर्की आरमारास लागणारें सर्व इमारती लांकूड वसईहून तांबड्या समुद्राच्या मार्गानें मक्केस जात असे. तेव्हां वसाहतीकरितां जरी वसईची

गरज नव्हती–कारण जवळच चौलास तटबंदीची मोठी वसाहत झालीच होती–तरी वसई घेऊन तेथें जर मजबूत समुद्रदुर्ग रचिला, तर तेथून लढाऊ गलबतांस खंबायतच्या आखाताकडे सहज जातां येऊन धुमाकूळ माजवितां येईल, व चौलापेक्षां वसई दीवच्या जवळ असल्यानें चौल सोडूनही देतां येईल, असें ह्या सिल्व्हेरानें गव्हर्नरास समजाविलें. त्यावरून शके १४५४ च्या मार्गशीर्षपौषांत गव्हर्नर कुन्हा यानें १०० लढाऊ जहाजें तयार केलीं; आणि २००० निवडक पोर्तुगीज शिपाई आणि ८०० कर्नाटकी, तिरकमट्यांनीं लढणारे बाणाईत लोक घेऊन, तो वसईच्या बंदरांत येऊन दाखल झाला. वसईच्या किल्लयांत १२०० मुसलमान सैन्य होतें. २० जानेवारी सन १५३२ ह्या दिवशीं पुढें कूच चालवून, सेबाश्चियन साधूंचें स्तोत्र गात धर्माधिकाऱ्यांनीं पुढें होऊन हा हल्ला चढविला. कुन्हानें सैन्याच्या तीन टोळ्या तीन बाजूंनीं धाडून, तिन्ही ठिकाणीं एकदम तटाला खिंडारें पाडिलीं. मुसलमान आंतील तटामागें गेले. तेथूनही त्यांस पोर्तुगीजांनीं हुसकिलें. शेवटीं हातघाईवर येऊन मुसल्मानांचे पुष्कळ मुडदे पडून बाकीचे नारळी वनांत व शेजारच्या टेंकड्यांतच लपले. ४०० तोफा आणि पुष्कळ दारुगोळा पोर्तुगीजांच्या हातीं सांपडला. मुसल्मानांनीं कडव्या डोंगरी मराठ्यांकडून म्हणजे शिरके, सुर्वे इत्यादिकांकडून कोंकण प्रांत जिंकल्यास कांहीं अजून पुरतीं शंभरही वर्षें लोटलीं नव्हतीं. तथापि साठपाऊणशें वर्षांच्या निर्भय सत्तेच्या उपभोगानें ते आतां सुखावले होते. त्यामुळें त्यांचा तितका जोम शिथिल पडला होता. कोंकणच्या मराठ्यांनीं १२५ वर्षें तरी टक्कर घेतली पण त्यांना जिंकणाऱ्या ह्या मुसलमानांनीं सवाशेंच्या

निम्मेंही वर्षे, ह्या 'कानामागून येऊन तिखट होणाऱ्या' मूठभर पोर्तुगीजांशीं टिकाव धरूं शकूं नये, ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे. अथवा आश्चर्य कसलें ? पोटाची आग शमल्यावर ती आग शमविण्याकरितां चाललेल्या जळजळीचा त्वेष हिंस्त्र पशूंमध्येंही कायम राहात नाहीं, मग माणसाचा कसा राहील ?" बुभुक्षितः किं न करोति पापम्" ह्या न्यायानें हे यूरोपस्थ पोर्तुगीज ह्या वेळीं लढत होते आणि मुसलमान आहारल्यासारखे झाले होते. दोघेही क्षुधेच्या तापानें भक्ष्यशोधास निघालेल्या हिंस्त्र पशूप्रमाणेंच हिंदुस्थानांत–ह्या कर्मधर्मभूमींत–शिरलेले होते. असो; वसईचा किल्ला सर होतांच गव्हर्नर कुन्हा ह्यानें एक जंगी भोजनसमारंभ केला. त्यांत ५० दारूचीं पिपें, कित्येक पोतीं पांढरीं बिस्किटें (शंकरपाळे), पुष्कळ गाई (गोमांसाकरितां) आणि वाटेल तितका चक्का (चीझ) इत्यादि वस्तु त्यानें दिल्या होत्या.

३५. पोर्तुगीजांस वरील त्यांच्या सर्व साहसी अत्याचारांचें आतां चिरकालिक दृश्य फळ मिळण्याचा समय आला. ह्या नव्या दमाच्या बुभुक्षितांपुढें आतां आपलें कांहीं चालत नाहीं, असें जाणून जुन्या बुभुक्षितांचा नायक जो गुजराथचा सुल्तान बहादुरशहा ह्यानें आपला वकील पोर्तुगीजांशीं दोस्तीचा सल्ला करण्यास पाठविला. ह्या त्याच्या कारस्थानास एक दुसरेंही कारण होतें. तें असें कीं, दिल्लीच्या मोंगल बादशहानें सर्व हिंदुस्थानांत आपला एकछत्री अंमल करण्याच्या हावेनें आपल्या स्वधर्मी राजांबरोबर युद्ध चालविलें होतें. त्यांत बहादूरशहाचाही मुलख तो मारीत असे. तेव्हां एकीकडून दिल्लीपतीचा व दुसरीकडून हा पोर्तुगीजांचा, अशा दोन शहांपैकी थोडक्यानें दूर होणारा हा पोर्तुगीजांचा शह, त्यांच्याशीं दोस्ती करून उडविण्याचा त्याचा इरादा होता.

स्वधर्मी दिल्लीपतीच्या स्नेहापेक्षांही विधर्मी पोर्तुगीजांचा स्नेह जोडण्यास सांगणारी ही राजनीति आणि धर्मनीति बरोबर मोठी गंमतीची होय! बहादुरशहापासून कुन्हानें वसई व तिच्या भोंवतालचा समुद्रकिनारा आणि वाड्या वगैरे सर्व घेतलें. सुदैवानें ह्याच वेळेस मार्टिन ऑल्फान्सो डी सौजा हा, ह्या नव्या मुलुखाचा ताबा घेण्यास एक मोठें नवें आरमार घेऊन आला. हा मार्टिन ऑल्फान्सो डी सौजा म्हणजे एक धारिष्टवान् नावाडी, मोठा शूर सेनापति आणि अत्यंत उलट्या काळजाचा मुत्सद्दी होता. ड्रेक, क्लाईव्ह आणि हेस्तिंग्स् ह्या तिघांचा हा एकच पूर्व अवतार होय. वसईच्या तहावर दोन्ही पक्षांच्या सह्या शके १४५६ च्या मार्गशीर्षांत ( ता. २३ डिसेंबर सन १५३४ ) झाल्या. वसई बेटाखेरीज पोर्तुगीजांस इतर बऱ्याच गोष्टी ह्या तहांत मिळाल्या. तांबड्या समुद्रास जाणारीं सर्व व्यापारी जहाजें प्रथम वसईस लागून पोर्तुगीजांची परवानगी घेऊन पुढें जावींत व परत तेथेंच लागून जकात भरून आपापल्या बंदरीं जावींत, गुजराथच्या किनाऱ्यावर बहादूरशहानें लढाऊ गलबत बांधतां कामा नये व तुर्काशीं दोस्ती करतां कामा नये, अशीं त्या तहांत कलमें होतीं.

३६. खालीं कालिकतकडे सिमाओ बोटेल्हो हा शके १४५३ त प्रथम हिंदुस्थानांत आला. त्यानें मल्याळी राजा, जो आपणांस कुन्नलक्कोन म्हणजे कुन्न=गिरि आणि अल=( समुद्राची ) लाट ह्याचा राजा किंवा सामुद्री म्हणवीत असे, त्याच्याशीं झगडा चालविला होता. ह्या सामुद्री शब्दाचाच मल्याळी लोक सामुतिरी, टामुतिरी, सामुरी किंवा टामुरी असा अपभ्रंश करितात. विदेशी लोक झामुरा म्हणत. ह्या मल्याळी राजानें पोर्तुगीजांशीं समुद्रकिनाऱ्यावर वर्षानुवर्षे चांगलाच झगडा

चालविला होता. शके १४५८ त पलिपोर्तीजवळच टुआ नदीवर सिमाओ बोटेल्हो आणि सामुरी ह्यांचें युद्ध झालें. त्यांत पोर्तुगीजांचें कांहीं विशेष वळलें नाहीं. कुन्नलक्कोन राजा फारच शूर होता. मल्याळी लोकांची त्याच्या राजवटींत जी कांहीं भरभराट झाली, तशी त्याच्या मागें फिरून कधींच झाली नाहीं. सिमाओ बोटेल्हो हा पुढें लवकरच व्हाइसरॉय झाला. नंतर तो आणि त्याचा वसुली कामगार मुख्य सचीव जाव डी कॅस्ट्रो ह्या दोघांनीं कोकणांत जो भयंकर राजकीय आणि धार्मिक गोंधळ घातला, त्याचें संपूर्ण वर्णन ह्या लेखांत देणें अशक्य आहे; तथापि प्रसंगोपात्त थोडथोडें दिग्दर्शन करण्यांत येईल. सध्यां म्हणजे शके १४६४ च्या सुमारास पोर्तुगीजांची स्थिति काय होती येवढेंच पाहणें होतें. तें मागील हकीकतीवरून बरेंच समजेल. ह्या शके १४६४ सालींच मेस्ट्रे फ्रेन्सिस्को किंवा पुढें सेंट फ्रॉन्सिस झेविअर याच्या हाताखालीं जॉसस मंडळाच्या पाद्र्यांचा पहिला तांडा गोंव्यास आला. दक्षिणेंत व उत्तरेस दोन मोठ्या राजांशीं बरोबरीचा व दोस्तीचा तह, किनाऱ्यालगत बराच मुलुख आणि धर्मप्रसारार्थ कंकण बांधून आलेलें धर्माधिकारी मंडळ इतकी जय्यत सिद्धता ह्या पोर्तुगीजांची सरासरी गेल्या पन्नासांस कांहीं कमी वर्षांच्या अवधींत झालेली होती. ह्या त्यांच्या सर्व विजयाचें अधिष्ठान विजयानगरकरांचा पाठिंबा हेंच होय. विजयानगरकरांनीं जर आपल्या हिंदुप्रजेस पोर्तुगीजांची नोकरी करण्याची सख्त मनाई केली असती व पोर्तुगीजांप्रमाणें जय्यत आरमार सिद्ध करून पश्चिम किनाऱ्याचा व्यापार पोर्तुगीजांच्या हातीं न जाऊं देतां हिंदूंच्याच हातीं ठेवण्याची दूर दृष्टि राखिली असती, तर ह्याच पोर्तुगीजांनीं कांहीं क्षुल्लक, केवळ व्यापारी सवलतींवर, विजयानगरकरांची – जशी तोफ-

खान्यांत तशीच लढाऊ आरमारांतही—नोकरी पत्करून सर्व दक्षिणोत्तर कोंकण किनारा मुसलमानांच्या हातून जिंकून घेऊन, तो विजयानगरच्या हिंदुसाम्राज्याचा एक उत्तम घटक करून ठेविला असता. मुसलमान लोक हे जसे इकडे हिंदूंचे तसेंच तिकडे ह्या पूर्तकालादि यूरोपस्थ खिस्त्यांचेही कट्टे दुष्मन् होते. त्यांच्या विरुद्ध स्वतंत्र लढाई करणें जर विजया-नगरकरांनीं ह्या पोर्तुगीजांस आंतरदेशाप्रमाणें अशक्य करून ठेविलें असतें, तर आपलें दृढ वैर साधण्याकरितां विजया-नगरच्या ध्वजाखालींही हे पोर्तुगीजलोक आनंदानें लढले असते. परंतु समुद्रकिनाऱ्याचा राजकीय दृष्टीनें विशेष फायदा काय, हेंच आमच्या ह्या शूर परंतु भोळ्या व महत्त्वाकांक्षी तरी अल्पसंतुष्ट हिंदूराज्यकारभारपटूंस पुरेसें समजलें नाहीं. त्यामुळें आणि सर्व भरतखंडांतील सनातनधर्मी लोक म्हणजे एकच होत, ही कल्पना रजपूत, मेवाडादिकडील राजेलोक व त्यांचे हस्तक आणि महाराष्ट्रांतील ज्ञानेश्वरादि साधुसंत यांवांचून इतरत्र फारशी कोठें नसल्यानें—आणि विशेषतः ती ह्या दक्षिणतम देशांत तर फारच क्वचित् असल्यानें—पोर्तुगीजांनीं केलेला स्वधर्मबांधवांचा छळ आणि जुलमाचें धर्मांतर ह्या गोष्टी एवढ्या विजयानगरासारख्या सामर्थ्यवान् राज्याच्या हिंदुप्रजांनीं उघड्या डोळ्यांनीं पाहिल्या. कोंकणांतील बहुतेक आरमारी लढायांत आणि इतर धुमाकुळींत पूर्तकालांबरोबर कानडी तिरंदाज लोक असतच असत. इकडे मुसलमानांच्या सैन्यांतूनही आमचे मराठे चमकत असत, तरी त्यांच्या स्वाऱ्याशिकाऱ्यांतून गोवध, ब्राह्मणादिकास जुलमानें बाटविणें ह्या क्रिया प्रत्यहीं होत असत. ह्याप्रमाणें मुसलमानी आणि खिस्ती ह्यांची सत्ता व त्यांचा धर्म यांची, आमच्या डोळ्यांदेखत आणि

आमच्याच साहाय्यानें वृद्धि होत होती. सर्वत्र हाच प्रकार चालू होता. अपवाद काय तो एक मेवाडच्या रजपूत घराण्याचा. तिकडे संगानें बाबराशीं आमरण झगडा चालवून दिल्लीचें मोंगली तख्त डिलें, किंबहुना नाहींसें, करून हस्तिनापुराचें चक्रवर्तित्वच पटकाविण्याची संधि आणिली होती; परंतु हिंदुलोक ईश्वराच्या घरीं स्वराज्यास पात्रच नव्हते असें दिसतें. कारण जयपुरकरादि मंडळी पटापट मुसलमानांस मिळाली व संगानंतर कांहीं वर्षें चितोडच्या प्रतापरवीस दुर्दैवाभ्रांनीं जर्जर करून सोडिलें; या वेळीं गुजराथचा बहादुरशहा चितोडवर स्वाऱ्या करूं लागल्यामुळें लवकरच चितोडला दुसरा जोहार पुकारण्याची वेळ आली व त्याप्रमाणें चितोडानें जोहार पुकारून आपल्या स्वदेशप्रीतीची व स्वधर्माभिमानाची पूर्ण कसोटी जगास दाखविलीच ! ह्या चितोडच्या झगड्यांत गुंतल्यामुळेंच बहादुरशहास पोर्तुगीजांशीं तह करावा लागला आणि वर लिहिल्याप्रमाणें वसई व भोंवताल्चा मुलुख, ह्या तिसऱ्या एका विधर्म्याच्या हातीं गेला.

३७. ह्या पोर्तुगीजांचे हिंदुलोकांस बाटविण्याचे रस्ते अनेक असत, त्यांत तरवारीचा जोर हा पहिला. प्रत्येक समाजांत अज्ञानी लोक असावयाचेच. त्यांचा सर्व धर्म काय तो तंत्रांत असावयाचा किंवा त्यांना त्या धर्माची मुळींच पर्वा नसावयाची. हिंदुधर्म आचारप्रधान, तेव्हां खालच्या अज्ञान लोकांत त्या आचाराच्या केवळ तांत्रिक स्वरूपाचेंच महत्त्व. मंत्राची, उपपत्तीची किंवा विपद्धर्माची त्यांना ओळखच नसावयाची. मुसल्मानी धर्मांत काय किंवा ख्रिस्ती धर्मांत काय, दोनही धर्मांतील मनुष्यांनीं मी मुसल्मान किंवा ख्रिस्ती आहें एवढें म्हटलें, म्हणजे तें शाब्दिक आश्वासनच त्या त्या धर्माच्या

महतीला पुरेसें होतें. याशिवाय दुसरें अवश्य असें बाह्य लक्षण त्यांना कांहींच नाहीं. तेव्हां त्यांच्यांतील कोणी बाटला किंवा धर्मच्युत झाला हें कळण्यास, तो तसें आपल्या तोंडानें म्हणेपर्यंत कांहीं मार्गच नाहीं. आचारप्रधानधर्म जितका आंतर तितकाच बाह्यलक्षणपरायण असल्यामुळें एखादें बाह्य लक्षण राखतां येणें अशक्य, अशी स्थिति कोणीं उत्पन्न केली कीं, अज्ञानी हिंदु सहजच स्वधर्मच्युत होतो; आणि आपण स्वधर्मच्युत झालों अशी त्याची समजूत झाल्यावर दुसरा कोणताही धर्म तो तेव्हांच पतकरितो; कारण, धर्मविहीन राहणें हें हिंदुधर्मांतल्या लोकांचें शीलच नव्हे. ही गोष्ट धूर्ततेनें जाणून पोर्तुगीज ख्रिस्ती लोक एखाद्या गांवच्या पाणवठ्यांत गोमांसाचे वगैरे तुकडे चोरून टाकीत आणि त्या ठिकाणचें पाणी लोकांनीं नेल्यावर ‘ तुम्हीं गोमांस भक्षिलेंत ’ असें त्यांस दाखवून देत; मग गरीब बिचारे गांवढळ लोक पश्चात्तापानें होरपळून निमूट ख्रिस्ती बनत. क्षणभंगुर व खोट्या ऐहिक सुखोपभोगासाठीं चोरी, दरोडे आणि खून ह्या मार्गांनीं जाणारांपेक्षांही सत्यस्वरूप ईश्वरी ज्ञानाच्या सात्त्विक सुखसाम्राज्यांत असले असत्यानें भरलेले मार्ग अवलंबन करणारांस धर्मप्रसारक म्हणावयाचें कीं सत्याचा खून करणारे, असत्याचें आणि अनीतीचें साम्राज्य माजविणारे म्हणावयाचें, हें वाचकांनींच ठरवावें. हिंदु लोकांच्या कनिष्ठ जातींतील ह्या अज्ञानाबद्दल त्याला आमच्यांतील कांहीं इतिहासानभिज्ञ लोक मोठ्या तोऱ्यानें आंधळी श्रद्धा, भोळेपणा ( Superstition ) असलीं नांवें ठेवितात व तें त्यांच्यांत राहूं दिल्याबद्दल ब्राह्मणादि श्रेष्ठ वर्णांस दोषी ठरवितात; परंतु हें अज्ञान आणि याच प्रकारच्या अंधश्रद्धा मुसलमान व ख्रिस्ती लोकांतही मुबलक असत व आहेत. उदाहरणार्थ, डुकर मारून टाकिलें असतां मुसल-

मानांची मशीद अपवित्र होते ! तींतून पीर निघून जातो ! खिस्ती लोकांचे अज्ञानाचा मासला पुढें एक देतों. त्यावरून ब्राह्मण, स्वधर्मी अज्ञानांचा उद्धार करण्यास कसे झटत असत, त्या-बरोबर त्यांचे खिस्ती प्रतिस्पर्धी किती खुळचट कल्पना लढवून त्यांचा प्रतिकार करीत ह्या दोहोंचाही बोध होण्यासारखा आहे.

३८. ब्राह्मण बहुशः ह्या विदेशी, विधर्मी आणि जुल्मानें दुस-ऱ्यास बाटविणाऱ्या धर्मवेड्यांच्या वाऱ्यालाही ह्या काळपर्यंत उभे राहत नसत. नोकरीचाकरी हा त्यांचा प्रभुंप्रमाणें अजून उपजीविकेचा धंदा बनलेला नव्हता. अपवाद अस-तील, तथापि आपले इतर वर्णांचे देशधर्मबंधु अज्ञानानें आणि जुल्मानें बाटलेले व बाटत असलेले पाहून त्यांना अत्यंत दुःख होत असे. त्याकरितां त्यांचें पुनः संसर्गदोषविहित स्वल्प प्राय-श्चित्तानें स्वधर्मांत परावर्तन करण्यासाठीं, निदान न बाटले-ल्यांची स्वधर्मश्रद्धा कायम राखण्यासाठीं शक्य ते प्रयत्न ब्राह्मण करीत असत, असें दिसतें. ह्या बाबतींत 'मुंबईची पूर्वपीठिका' हें पुस्तक लिहिणारा डॉ. कुन्हा, खालील गोष्टी देतो :—

But amidst their great successes, fame and opulence the members of the Society of Jesus in Bassein were not quite happy. *Their wily rivals*, the Brahmans, were constantly, instigating their converts to recant and to return to their ancestral faith. Many were the expedients resorted to for this purpose, but the *most irritating* to the Jesuit priests was the annual jubilee of general baptism in the water of the sea or rivers. This general bathing (lavatorio geral) took place once a year in the last quarter of the moon in the month of August. It was named by the Jesuit Missionaries of Bassein Gokula Astame, which we now with our *pedantic system of romanization write Gokula Astami.*

The Brahmins used to impress on the mind of the new Christians that a bath in the river on such festive occasion in the Hindu calendar was far more efficient to purify one's sins than all the lustrations *even of the Christians' purgatory*. Such an opinion was simply scandalous. (A simply scandalous sentence of the author of the 'Origin of Bombay'. म. म. पू. लेखक ). The priests of the Church of the name of Jesus, provoked by such blasphemous language tried at first to prevent the sacred ablutions of the Hindus by planting crosses all along the banks of the Bassein creek down to the Thana river and even as far as Bombay. But nothing would stop the jubilar baptism, as the Hindus shifted yearly from one place to another. Lastly the Brahmins chose a lake two leagues distant from the city; and now let the Jesuit chronicler himself describe the site and narrats the event in his own words :—

"Getting tired of changing places the Brahmans at that sought purposely a position about two leagues distant from the city. On the side of a rock there was a cavity and close to it a little lake surrounded by trees which looked very pretty. Here they built various chapels with their alters and idols, and round the lake built some stone steps, as they usually do in their tanks in order to reach down to the water safely. Above the arch of the cave there was a tree hanging over a lake, as if the devil had planted it there for the last act of that internal ceremony. (This does not strike the writer of "The Origin of Bombay" as simply "scandalous" or "blasphemous." म. म. पू. ले.) The penitants considered most famous used to go up that tree and amidst the acclamations of the populace let themselves perpendicularly into the lake *to be drowned* and to be afterwards counted among their saints. *So ignorant has the devil made these heathens that der the water he carries them straight to the infernal fire.*"

★ या उताऱ्यांतील इटालिक अक्षरें आमचीं होत.

३९. ह्या गोष्टींत वस्तुस्थितीचा किती विपर्यास भरला आहे, हें सुज्ञ वाचकांस उघड करून सांगावयास पाहिजे असें नाहीं. तथापि आज विसाव्या शतकाच्या अरुणोदयीं डॉ. कुन्हा-सारख्या विद्वानानें ख्रिस्ती दीक्षादानाच्या वेळेच्या जलमार्जनास तेवढें पापनाशक समजावें व हिंदूंच्या पार्वणिक तीर्थस्नानाच्या विधीची थट्टा करावी; स्वधर्मरक्षणार्थ झटणाऱ्या ब्राह्मणांस पोर्तुगीजांचे कपटी प्रतिस्पर्धी ब्राह्मण 'Their wily rivals' असें म्हणावें आणि ब्राह्मणांनीं आपल्या शास्त्रोक्त मार्गांचें अव-लंबन केल्यास त्या त्यांच्या मार्गांस अत्यंत चीड आणण्यासारखे 'most irritating' लेखावें व ब्राह्मणांच्या पार्वणिक स्नानाच्या सर्व पापनाशक सामर्थ्याविषयींच्या दृढ श्रद्धेस 'Such an opinion was simply scandalous' ह्या प्रकारची अत्यंत गर्ह्य, निंद्य किंवा अन्यायाची, असे अप-शब्द लावावे, हें उच्च संस्कृतीचें किंवा सात्त्विकतेचें लक्षण काय? तळ्याच्या कांठच्या कदंब किंवा तत्पर्याय वृक्षास त्या वेळच्या पोर्तुगीज इतिहासलेखकानें वेताळानें लावलेला वृक्ष, त्यावरून कृष्णाच्या गोपलीलेचें अनुकरण करणाऱ्या सद्भक्तांच्या पाण्यांत पडणाऱ्या उड्यांस जीव देणें, त्या उड्या टाकण्याच्या हेतूस वेताळाची माया, त्यांच्या बुडी देऊन तळ्याशीं जाण्यास रौरव नरकांत जाणें किंवा वेताळानें त्यांस रौरव नरकास नेणें, अशी भाषा वापरावी, हें केवळ्या विद्वत्तेचें, गाढ्या ज्ञानाचें आणि पवित्र व शुद्ध बुद्धीचें दर्शक तरी!! त्याचप्रमाणें जेथें जेथें हिंदु आपल्या पार्वणिक स्नानास जमतीलसें दिसेल तेथें तेथें त्यांना बुजविण्याला व फसविण्याला क्रूसांच्या आकृति उभ्या करावयाच्या, त्या ठिकाणीं त्यांना स्नान करूं द्यावयाचें नाहीं आणि यदाकदाचित् त्यांनीं एखादी निर्बंध जागा–जलाशय-

शोधून काढिली आणि तेथें आपलें पर्वस्नान व तीर्थविधि वगैरे उरकावयाचें योजिलें, तर त्यांचा छळ करावयाचा व निरपराध गाईचा वध करून ' चोर सोडून संन्याशास फांशी ' हा न्याय आदरावयाचा, ह्याला पाशवी मौर्ख्य किंवा क्रौर्य ह्यांवाचून दुसरें काय म्हणावें ? डॉ. कुन्हाच्या भाषेंत वरील गोष्टींचें पर्यवसान असें झालें —

The Hindus thought that this quiet and solitary lake was absolutely free from the persecutions o' the Jesuits and the planting of their crosses. But they were soon deceived. Fr. Christovas da Costa, much *annoyed* with pertinacity of the heathens, compalined bitterly against them to the captain of Bassein, who immediately ordered a body of 50 musqu. teers and 50 horsemen besides some noblemen to march forthwith to the lake, and disperse the mob of bathers. The troops went up to the lake, firing on the way their muskets in the air and crying "let these dogs die" morram estes ceaes.

अर्थात् लष्कर येतांच हिंदु आपलें सामान टाकून पळाले मात्र मूळचा अस्सल ख्रिस्ती, परंतु अलीकडे आपल्या मनानें हिंदु होऊन वैराग्याच्या वेशांत असलेला एक इसम, तेथें त्या पोर्तुगीजांस आपण हिंदु झालों आहों, असें सांगण्यास उभा होता. तेव्हां हिंदूंना चाटविण्यास गेलेल्या ह्या जेसूटांस आपला एक ख्रिस्तीच हिंदु झालेला पाहून विशेष त्वेष आला. त्याचें उट्टें, त्यांनीं म्हणजे डॉ. कास्टा यानें त्या ठिकाणचें तें हिंदूंचें देऊळ आंतील मूर्तींसह धुळीस मिळवून व त्या स्थलावर गाईचें रक्त व मांस पसरून काढिलें. ह्या गोष्टीचा व पुढें हिंदूंनीं —चिमाजी अप्पांनीं—वसई काबीज केल्यानंतर ह्याच निर्मळच्या तळ्याभोंवतालचें ख्रिस्ती स्मशान व त्यांच्या इतर धर्मसंस्था

यांचा कसा उत्तम परामर्श घेतला, ह्याचा मेळ घालतां खरे सात्त्विक, समबुद्धि व धर्मशील कोण, आणि तामसी व धर्मवेडे कोण याचा सहजच निर्णय होईल.

४०. ह्या पोर्तुगीज खिस्त्यांनीं एतद्देशीयांतच खिस्ती धर्मवेडे उत्पन्न करण्याकरितां जागजागीं शूद्रातिशूद्र व क्वचित् वरील जातींच्या बाटलेल्या हिंदु खिस्त्यांस शिकविण्याकरितां शाळा घातल्या होत्या व देवळें बांधलीं होतीं. ह्या शाळांच्या इमारती हिंदूंनीं आयत्या बांधलेल्याच असून त्यांतील हिंदूंस किंवा हिंदु देवमूर्तीस काढून टाकून घेतलेल्या होत्या. त्याचप्रमाणें ह्या संस्थांचा खर्च चालविण्यासाठीं हिंदु देवस्थानांचीं इनामें ते जप्त करीत किंवा हिंदुमुसलमानांस बेलाशक लुटीत. एकंदरींत अनिर्वचनीय अत्याचार आणि छळ करून ह्या खिस्त्यांनीं आपले पाय पसरण्याचा सपाटा चालविला होता. त्यांनीं ह्या सर्व गोष्टींना आपल्या राजापासून एक आज्ञापत्र मिळविलें होतें. हें आज्ञापत्र बिशप अल्बुकर्कानें अंमलांत आणिलें. त्या आज्ञापत्रांत ( १ ) खिस्ती राजांचे आपल्या राज्यांत मूर्तिपूजा नाहींशीं करणें हें कर्तव्य आहे, ( २ ) तेव्हां राजाला ( जुबांव ३ रा ) आपल्या पूर्वेकडील राज्यांतील मूर्तिपूजकांचे धर्मविधि अजून चालू दिले जातात ह्याचें फार दुःख होतें. ( ३ ) म्हणून त्याची अशी आज्ञा आहे कीं, मूर्ति फोडाव्या व मूर्ति घडणारे लोकांस शिक्षा कराव्या. ( ४ ) त्याचप्रमाणें बाटलेल्या लोकांस सर्व प्रकारच्या सवलती द्याव्या आणि त्यांजकडून वेठ घेऊं नये. ( ५ ) हिंदु मूर्तिपूजकांना खिस्ती मूर्ति विक्रीकरितां करूं देऊं नयेत. ( ६ ) शाळा उभाराव्या व त्यांत बायबल शिकवून पुढें खिस्ती होण्याकरितां हिंदूंनाही शिक्षण द्यावें. व ( ७ ) नव्या खिस्त्यांस फारच लाडानें वागवून त्यांची प्रीति

संपादावी. अशा प्रकारच्या आणखीही पुष्कळ अनन्वित आज्ञा होत्या. त्या सर्वांचा परिणाम, मुंबई, वसई इत्यादींच्या नजीकची कान्हेर, मंडपेश्वर यांसारखीं हिंदु कोरीव लेणीं व जुनीं देवधर्मस्थानें यांचा करवेल तितका विध्वंस करण्यांत झाला. मंडपेश्वर येथें दीडदीडशें वर्षांच्या वयाचे दोन योगी होते. त्यांनीं अंतर्दृष्टीनें पुढें येणारें संकट जाणिलें व इतरांस सूचना देऊन ते तेथून पळाले. मंडपेश्वराचें देऊळ ह्या खिस्ती भट्टांनीं नेऊन सेन्हेरा डा पिएडेड नांवाच्या आपल्या साधूला अर्पण केलें. कान्हेरीच्या लेण्यांत बहुतेक बाजारबुणगे, कांहीं बौद्ध भिक्षु व शूद्र बैरागीच होते, त्यांत ब्राह्मण मुळींच नव्हता. बौद्ध भिक्षु मरणभयानें कांहीं बाटले व इतर पळाले. ह्याप्रमाणें हे जेसुइट सांपडेल तेथें सांपडेल त्यांस जुलमानें बाटवीत व लूटफाट, जाळपोळ करीत. ह्या पोर्तुगीजांनीं पश्चिम किनाऱ्यावर धुमाकूळ मांडला होता व ते आतां दीवच्या किल्ल्यांत व बंदरांत ईजिप्त, तुर्कस्थान व हिंदुस्थानांतील मुसलमान यांशीं लढत होते.

४१. इकडे विजयानगरास पूर्वी सांगितल्याप्रमाणें शके १४६५त रामराजानें सदाशिवरायास राज्याभिषेक करून सर्व राज्यसूत्रें आपल्या हातीं घेतलीं होतीं. हा सदाशिवराय शके १४९९ पर्यंत जिवंत असून, त्या काळपर्यंतचीं त्याचीं दानपत्रें व शिलालेख आढळतात. त्या सुमारास तो पेनुगोंडा येथें मेला असावा असें वाटतें. रामराजा वस्तुतः शके १४८७ पर्यंत म्हणजे विजयानगरच्या तालीकोटच्या लढाईंत अत्यंत खेदकारक विध्वंस होईपर्यंत विजयानगरच्या मूर्धाभिषिक्त राजाप्रमाणें स्वतंत्र कारभार चालवीत होता, तरी त्यानें कधीं राजपदवी धारण केली नाहीं.

४२. रामराजा हा मूळचा विज्जल नांवाच्या कल्याणीच्या चालुक्य

वंशांतील राजाचा वंशज होय. ह्या विज्जलाचा उल्लेख महोद्-याच्या पूर्वरंगांत मागें बसवाच्या म्हणजे लिंगाईत धर्मप्रस्थापकांच्या इतिहासांत आलेला आहे. बसवानें कल्याणच्या विज्जल राजाचा खून करून पुढें तें राज्यही हरण केल्यावर रामराजाचें पूर्वज आपणांस नरपति म्हणवून कर्नूल प्रांतांत एका लहानशा संस्थानचा उपभोग करीत होते. रामराजा, आपल्या तारुण्यांत—ऐन विशीच्या सुमारासच—कांहीं काळ गोवळकोंड्याच्या कुतुबशाहाच्या पदरीं एक छोटा सेनापति म्हणून राहिला होता. विजापूर व गोवळकोंडा ह्यांच्या भांडणांत एकदां रामराजास कुतुबशाहानें विजापूरकरांवर पाठविलें होतें. त्या वेळीं विजापूरचें सैन्य दिढीदुपटीनें असल्यामुळें रामराजास हार खावी लागली. तेव्हां कुतुबशहानें रामराजाची कांहींशी निर्भर्त्सना केली. ती ह्या मानी तरुण राजबिंड्यास सहन न होऊन त्यानें कुतुबशाहासारख्या विधर्मी राजाची चाकरी सोडली आणि विजयानगरच्या स्वधर्मी कृष्णरायाची चाकरी पतकरिली. लवकरच आपल्या शौर्य, वीर्य, चातुर्यादि विविध गुणांनीं कृष्णरायासारख्या गुणी व गुणग्राहकाचें मन रामरायानें इतकें आकर्षिलें कीं, कृष्णरायानें आपली उपवर कन्या त्यास देऊन शिवाय एका स्वतंत्र पथकाचें सैनापत्यही दिलें. आंदणादाखल अदवाणीचा अभेद्य किल्लाही रामराजास मिळाला. हा अदवाणीचा किल्ला, रामराजानें ज्या वेळीं तिरुमलरायाच्या विरुद्ध कटांत आपणास गोंवून घेतलें त्या वेळीं विजापूरचा सेनापति असदखान हा आपला शहा तिरुमल याच्या साहाय्यार्थ विजयानगरास चालला असतां त्यानें चारी बाजूंनीं वेढून टाकिला होता. उद्देश हा कीं, साधल्यास ह्याच वेळीं अंतःकोपानें पोखरलेलें विजयानगरचें हिंदुराज्य एकाच घावानें रसातळास मिळ-

वितां यावें; परंतु विजयानगरास रामराजानें आणि अद्वाणीस त्याचा भाऊ वेंकटाद्री ह्यानें असा कांहीं जोर बांधला कीं, नुसते पन्नास लाख होन वाटखर्चीबद्दल घेऊनच विजापुरकरास परतावें लागलें, हें मागें आलेंच आहे. इकडे असदखानास खरपूस चोप खाऊन अद्वाणीचा वेढा उठवून चालतें व्हावें लागलें.

४३. ब्राह्मणी बादशाहीचें पांची स्वतंत्र सुलतान सध्यां एकमेकां-वरच हल्ले करीत असत. कित्येक वेळां त्यांतील दोघेदोघे मिळून तिसऱ्यास उपसर्ग देत. ह्याप्रमाणें बरीदशाही म्हणजे बेदरचें राज्य बहुतेक संपुष्टांतच आलें होतें. त्याचे, त्याच्या भोंवता-लच्या विजापूर, अहमदनगर व गोवळकोंडें येथील सुलतानांनीं, लचके तोडण्याचा सपाटा लावला होता.

४४. कृष्णरायाच्या मरणानंतर पुढील धामधुमींत कुतुबशहानें विजयानगरच्या सरहद्दीवरील कांहीं मुलख बळकावला होता. तो परत घेण्याची रामराजा अगदीं संधि पाहात बसला होता. तों इतक्यांत बुऱ्हाण निजामशहा आणि इब्राहिम अदिलशहा ह्यांची अगदीं जुंपून राहिली होती. बुऱ्हाणच्या पक्षास गोवळकोंडेकर कुतुबशहा मिळाला होता. तेव्हां अर्थात् दुसऱ्या पक्षास रामराजानें उचलून धरिलें. ह्या घनघोर लढाईंत राम-राजानें आपला हाडवैरी जो कुतुबशहा त्याला असा घाय केला कीं, त्या दुःखानेंच तो मरण पावला. कुतुबशहा मरतांच राम-राजाचें काम संपलें होतें, तथापि त्याला आपल्या स्वारीचा खर्च मागून शिवाय साधल्यास कांहीं अधिक लाभही साधाव-याचा होता. कुतुबशहा मरतांच त्याच्या मुलांत गादीविषयीं तंटा लागला. जमशीद आणि इब्राहिम हे दोन वारस आपा-पसांत भांडूं लागले. जमशीद वडीलपणानें तक्तनशीन

झाल्यामुळें दुसऱ्यानें बंड केलें, परंतु त्याचा मोड झाला तेव्हां रामराजानें त्याला आपल्या गोटांत आश्रय दिला. इतक्यांत विजापुरचा सेनापति असदखान यानें पुष्कळ द्रव्य देऊन रामराजास परतण्याची विनंति केली. रामराजाचे सर्व उद्देश साधलेच होते. त्यानें असदखानाकडून मागील तिरुमलरायाच्या वेळचें विजयानगरचें गेलेलें सर्व द्रव्य सव्याज परत घेऊन आपलें विजयी सैन्य परतविलें.

४५. पुढें शके १४६९ ( इ. स. १५४७ ) त जॉन डी कॅस्ट्रो ह्या पोर्तुगीज सरदाराशीं कृष्णरायाचा तह झाला. ह्या तहांत कृष्णरायानें अहमदनगरच्या सुलतानासही ओढलें होतें तहाचें मुख्य कलम विजापुरच्या राज्याविरुद्ध असून ह्या तिघांपैकीं कोणासही विजापुराशीं भांडणाचा प्रसंग आला तर बाकीच्यांनीं त्यास साहाय्य करावें, असें होतें. दक्षिणेंतील पांचही शाखांत विजापूरचें राज्यच विशेष जोरदार होतें. तेव्हां त्याचा नक्षा कमी करण्याची रामराजानें ही तात्कालिक फलदायी युक्ति तर चांगलीच काढिली; परंतु कित्येक वेळां उपायाच्या पोटींच दडून अपायाचें बीज असतें, तसें ह्यांतही तें होतें. पोर्तुगीजांची सत्ता आणि मान हीं ह्यामुळें बरींच वाढलीं व अहमदनगरकरांसही जरा उंची मिळाली. एकंदरींत मुसलमानांशीं मित्रत्वाचें नातें व दळणवळण दृढ होत गेल्यानें विजयानगरच्या हिंदुराज्यांतील भेद शत्रूंस कळण्यास चांगलीच सवड झाली. मुसलमान हे परदेशी असल्यानें केव्हांही आपल्या धर्मबांधवांस आपसांतील भेद विसरून, मूर्तिपूजक हिंदूंविरुद्ध साहाय्य केल्यावांचून राहणार नाहींत, हें रामराजाच्या ध्यानांत यावयास पाहिजे होतें. मूर्ति फोडणें व गोवध करणें हें धार्मिक कर्तव्य समजणारे मुसलमान लोक व मूर्तिपूजक आणि गाईस मातेप्रमाणें पूज्य

दैवत मानणारे हिंदु लोक, ह्यांची खरी दोस्ती, दोघांमध्यें जों-पर्यंत कांहीं शौर्यसामर्थ्य गाजत आहे व दोघांनाही स्वराज्याचा आधार आहे तोंपर्यंत शक्यच नाहीं. विजयानगर व पोर्तुगीज ह्यांच्याच पुरतीं विशेष कलमें ह्या तहांत आणखी अशीं होतीं कीं, बंकापुर, धारवाड वगैरेकडील सर्व धान्य विजयानगर-करांनीं पोर्तुगीजांच्या होनावर व अंकोला ह्या किल्ल्यांकडे पाठ-वावें आणि सर्व कापड पोर्तुगीजांच्या वखारींकडेसच जावें. त्याबद्दल पोर्तुगीजांनीं चीन, हार्मज वगैरेकडून आणलेल्या तांबें, कथील, पोवळीं, किरमिजी रंग, शेंदूर, रेशीम इत्यादि मालाशीं मोबदला करून विजयानगरकरांची भरपाई करून द्यावी. त्याचप्रमाणें शत्रूकडून जिंकलेला सह्याद्रि व किनारा ह्यांमधील प्रांत पोर्तुगीजांस द्यावा व वरघाटाचा प्रांत विजयानगरच्या राज्यास जोडावा. पुढें शके १४७२ च्या सुमारास जमशीद कुतबशहा मेला. त्याच्या मागून सुभानकुली हा तख्तावर आला; परंतु अमीरउमरावांस हें आवडलें नाहीं. त्यांच्या मतें राम-राजाच्या आश्रयास असलेला इब्राहिम कुतब हाच विशेष हक्कदार होता. रामराजानें ही संधि वायां जाऊं दिली नाहीं. त्यानें ह्या प्रसंगीं इब्राहिमास भर देऊन गोवळकोंड्यास तख्तनशीन होण्याची खटपट करण्यास चिथाविलें व आपलें कसलेलें सैन्य घेऊन इब्राहिमासह गोवळकोंड्यास जाऊन मनांत आणलेली राज्यक्रांति त्यानें घडवूनही आणिली. ह्या सुमारास असदखान मेला होता. तेव्हां रामराजाच्या चिथावणीवरून बुऱ्हाण निजाम-शहानें उत्तरेकडून विजापुरावर स्वारी करून त्यांचीं सोलापूर आणि परांडा हीं ठाणीं काबीज केलीं आणि इकडे रामराजानें रायचूर आणि मुदगल हे प्रांत सर केले. शके १४७५ त विजापूरकर आणि बुऱ्हाण निजामशहा यांच्यामध्यें फिरून लढा सुरू झाला.

रामराजानें ह्या वेळींही अहमदनगरची बाजू घेऊन आपलें घोडें पुढें ढकलिलें व बराच प्रांत सोडविला. तेव्हां विजापुरवाल्यांनीं रामराजाचीं मैत्री संपादली आणि दोघांनीं मिळून अहमदनगरवर स्वारी केली. रामराजाशीं मैत्री करण्यांत सोलापूर परत मिळविण्याचा इब्राहिम आदिलशहाचा हेतु होता. इतक्यांत अहमदनगरकरांकडील एक सेनापति सैफुन मुल्क हा इब्राहिम आदिलशहाकडे येऊन मिळाला. त्याच्या साहाय्यानें अहमदनगरच्या निजामशहानें विजापुर अगदीं काबीज करण्याच्या बेतांत आणिलें होतें; परंतु वेळेवर विजापुरच्या आदिलशहास राम-राजाचा भाऊ जो वेंकटाद्री ह्यानें कुमक पोंचविल्यामुळें विजापुर ह्या वेळीं बचलें. वेंकटाद्रीनें सैफुन मुल्कचा पण पुरा मोड केला. इतक्यांत शके १४७९ त विजापुरचा सुलतान इब्राहिम आदिलशहा वारला आणि त्याच्या जागीं अल्ली आदिलशहा हा आला. ह्या अल्लीनें प्रथम रामराजाशीं नुकतीच जडलेली मैत्री दृढ करण्याकरितां किश्वरखानास विजयानगरास पाठविलें. रामराजानें किश्वरखानास मोठ्या इतमानानें वागवून हुस्सेन निजामशहाच्या विरुद्ध अल्ली आदिलशहाशीं परस्पर साहाय्याचा तह कबूल केला. तेव्हां हुसेन निजामशहानें इब्राहिम कुतुबाकडे वकील पाठवून विजापूर व विजयानगर ह्यांच्या विरुद्ध द्विकूट करण्याचा घाट घातला. रामराजास ही बातमी समजतांच त्यानें इब्राहिम कुतुबास आपल्या पूर्वीच्या कृतोपकाराचें स्मरण देऊन विजापुरच्या पक्षास येऊन मिळण्यास आग्रह केला. इब्राहिमाची रामराजाच्या कलाविरुद्ध वागण्याची इतक्यांतच छाती झाली नाहीं, म्हणून तो विजापुरच्या पक्षास ससैन्य मिळाला. विजापुर, गोवळकोंडें व विजयानगर ह्या तिन्ही ठिकाणच्या सैन्यांचा हा प्रचंड जमाव नऊ

लाख पायदळ व एक लाख घोडदळ इतका झाला. ह्या तिघांनीं अहमदनगरास वेढा घातला; पण हुसेन निजामशहा अगोदरच पळून जाऊन पैठणास जोर करून बसला होता. इब्राहिम कुतुबशहानें बाह्यात्कारीं जरी रामराजाचा पूर्वोपकाराबद्दल मान राखला होता, तरी आंतून तो अहमदनगरच्या निजामास फितूर असे. त्यानें गुप्तपणानें आपल्या बाह्यतः असणाऱ्या स्वपक्षाच्या हालचालींची इत्थंभूत बातमी शत्रूस द्यावी व शिवाय इतरही होईल त्या प्रकारानें त्यास साह्य करावें. आपल्यास ज्याच्या साहाय्यानें तख्त मिळालें त्या रामराजासच तो पाण्यांत पाहत होता. त्याला असें वाटे कीं, हा रामराजा जोंपर्यंत जोरावर आहे, तोंपर्यंत त्याच्या उपकारऋणांत बद्ध असलेल्या आपणांस वर डोकें काढतां येणार नाहीं. ह्याकरितां ज्या उपायानें रामराजाचें पारडें खालीं होईल, तें उपाय योजण्याचा तो मनोभावानें प्रयत्न करीत असे. इकडे रामराजा व अल्ली आदिलशहा हे दोघे सारखे मुलुखगिरींत दंग होते. इब्राहिम कुतुबशहानें शेवटीं अल्ली आदिलाचा पक्ष सोडावा म्हणून रामराजाजवळ उघड बोलणेंही सुरू केलें व रामराजास त्यासाठीं कंडापिल्ली प्रांतही देण्याचा आपला इरादा कळविला; परंतु रामराजानें ह्या लालचीस भीक घातली नाहीं. इब्राहिमानें शेवटीं आपलें सैन्य काढून नेलें आणि हुसेनानें रामराजा व अल्ली ह्यांच्याशीं तह केला. त्यांत त्यानें कल्याणी प्रांत विजापुरच्या अल्लीस दिला आणि रामराजाचा मांडलिक म्हणवून त्यास वार्षिक खंडणी देण्याचें कबूल केलें. एकंदरींत, रामराजानें ह्या ब्राह्मणी राज्याच्या अवशेषाकडून तरी आपलें वर्चस्व कबूल करवून मुसलमानांची मानखंडना केली.

४६. वरील सर्व हकीकतीवरून वाचकांच्या इतकें ध्यानांत आलेंच असेल कीं, ब्राह्मणी राज्याच्या निरनिराळ्या झालेल्या ह्या पांची राज्यांच्या माना रामराजाच्या कांहीं काल तरी अगदीं हातांत होत्या त्यांतील विजापुरची आदिलशाही, अहमदनगरची निजामशाही आणि गोंवळकोंड्याची कुतुबशाही हीं तिन्ही मोठीं राज्यें अलीकडे १२–१५ वर्षें रामराजाच्या लहरीप्रमाणें लहानमोठीं आणि स्वतंत्र किंवा मांडलिक होत होतीं. रामराजाच्या सर्वस्वीं साहाय्यानें तख्तनशीन झालेला इब्राहिम कुतुबशहा मात्र पयःपान स्वीकारून तें पाजणाराच्याच अन्नांत गरळ वमणाऱ्या सर्पाप्रमाणें कृति करण्यांत गुंतला होता. वरील अत्यंत अपमानास्पद तहानें चिडलेला हुस्सेन निजामशहा, रामराजावर उलटण्याची संधि डोळ्यांत तेल घालून पाहत होता. त्यानें अहमदनगरचा किल्ला दुरुस्त करून अगदीं अभेद्य बनविला; पुष्कळ नवीन सैन्य उभारिलें आणि इब्राहिम कुतुबशहास आपली मुलगी देऊन त्याच्याशीं अखंड मैत्रीचा गुप्त तह केला. रामराजाला इब्राहिमानें वरकरणी अशा गोडगोड खलित्यांनीं आणि विश्वासाच्या आश्वासनांनीं भारण्याचा रिवाज ठेवला होता कीं, भारतीयांच्या भोळ्या शीलास अनुसरून तो इब्राहिमास आपला मित्रच मानीत होता. शेवटीं शके १४८५ त हुसेन आणि इब्राहिम ह्यांनीं विजापूरकरांस मागच्या तहांत दिलेल्या कल्याणीस वेढा घालून लढाईस सुरवात केली. ह्या विजापुरकर व अहमदनगर ह्यांच्या भांडणांत गोवळकोंडेकर इब्राहिमानें अहमदनगरचा पक्ष उचलून पडावें हें रामराजास मुळींच संमत नव्हतें. त्यानें इब्राहिमास पायबंद पोंचविण्यास एक मोठें सैन्य थेट गोवळकोंड्यावर पाठविलें आणि आपण स्वतां दुसऱ्या मोठ्या सैन्यानिशीं विजापूरकरांस जाऊन

मिळाला व लौंच मोठी निकराची लढाई देऊन त्यानें हुसेन आणि इब्राहिम ह्यांच्या सैन्याचा धुव्वा उडवून कल्याणीहून त्यांस पार हांकून लाविलें. तीं दोन्ही सैन्यें रानोमाळ पळवून रामराजा विजापूरच्या अल्लीचें व आपलें सैन्य एकत्र करून अहमदनगरच्या मुलखांत शिरला. प्रथम अहमदनगरच्या भोंवतालचा मुलख मारून लवकरच खुद्द अहमदनगरास रामराजानें वेढा दिला. हुसेन निजाम गुप्तपणानें राजधानी सोडून पळाला तो जुन्नरच्या आसऱ्यास गेला. रामराजास ही बातमी कळतांच अहमदनगरचा वेढा कायम ठेवून तो स्वतां थोड्या निवडक सैन्यासह जुन्नरावर चालून गेला. हुसेनास पळतां भुई थोडी झाली. शेवटीं तो एकटाच एखाद्या गरीब भिकाऱ्याप्रमाणें दऱ्याखोऱ्यांत लपून बसून आपलें अस्तित्वच जेव्हां जगाच्या दृष्टीनें संशयात्मक करूं लागला, तेव्हां रामराजानें त्याच्या सैन्याचा समाचार घेऊन फिरून अहमदनगरचा मार्ग सुधारला.

४७. इकडे विजापूरचा अल्ली सर्व भार रामराजावर टाकून आपण चैन करीत होता. इब्राहिम कुतुबशाहाकडून गुप्तपणानें अल्लीकडे जासूद येतजात असत. हुसेन निजामशाहाच्या वतीनेंही भाईचाराची खटपट जारी चालूच होती. रामराजा मात्र वीरास योग्य त्या रीतीनें लढाईच्या कामीं तनुमनधनानें गुंतला होता. वळिवाचे पाऊस सुरू झाले, तरी त्यानें वेढ्याचें काम नेटानें चालविलेंच होतें. पुढें पावसानें चांगलीच झड लावली व सीना नदीस पूर येऊन त्याचीं कांहीं माणसें दगावलीं व थोडें-फार सामानही नासलें तेव्हां तो अहमदनगरचा—जवळजवळ आतां स्मशानच बनलेल्या त्या शहराचा—वेढा उठवून दक्षिणेकडे चालता झाला. अल्ली आदिलशहा आपला गाड्याबरोबरच्या नळ्याप्रमाणें निमूटपणें ह्याच्या मागें होता. रामराजाच्या मनांत

सोलापूर मारण्याचें होतें; पण अल्लीनें त्याच्या वीर्याची पुष्कळ प्रशंसा करून, ' झालें इतकें पुरें आहे सध्यां ' असें बोलून त्याचें मन त्या कर्मापासून परावृत्त केलें. वास्तविक हेतु हा कीं, सोलापूर काबीज केल्यास रामराजा तें आपल्या प्रांतास जोडील व मग आदिलशाहीस फिरून कांहीं सोलापूरसारखा धनाढ्य आणि सुपीक प्रांत कधींही लाभणार नाहीं. रामराजाचें विजयी सैन्य, सोलापूर घेण्याकरितां मनापासून उत्सुक होतें. त्याचे सेनापति सोलापूरच्या मोहिमेस आपला आळशी व आपमतलबी दोस्त अल्ली आड येतो, असें कळतांच बरेच विमनस्क झाले; आणि त्या रागाच्या भरांत त्यांनीं मुसल्मान सैन्याच्या कांहीं कुरापती काढून त्याची व त्यांच्या शहाची बरीच नालस्तीही केली. शेवटीं आपल्याच अहमदनगराविरुद्ध केलेल्या मदती-दाखल अल्ली आदिलानें रामराजास बागलकोट आणि यादगिरी हे दोन प्रांत दिले. इकडे रामराजा अहमदनगराकडे असतांना त्याचा भाऊ वेंकटाद्री ह्यानें गोवळकोंड्याच्या प्रांतांत जागोजाग आपलीं ठाणीं बसवून व्यवस्थितपणानें मुसल्मानांकडून वसूल घेतला आणि रामराजाचा जांवई तिम्मराज ह्यानें देवरकोंड्याचा समाचार घेतला. इब्राहिम कुतुबशहास आपलें राज्यच जातें कीं काय, अशी भीति पडून शेवटीं त्यानें गंटूर, घणपुरा आणि पानगल हे तीन तालुके रामराजास देऊन आपलें रक्षण करण्याची विनंति केली. एकंदरींत शके १४६४ पासून शके १४८५ पर्यंतच्या ह्या एकवीस वर्षांच्या अवधींत ब्राह्मणी सुलतानांनीं मागील दीडदोनशें वर्षांत विजयानगरावर केवळ अमानुष अत्याचारानें जे क्षणिक विजय मिळविले होते, त्या सर्वांचें रामराजानें दुप्पट, तिप्पट उट्टें काढून घेतलें, तथापि त्यांत लढाईच्या न्याय्य आणि अन्याय्य सर्वमान्य तत्त्वांस सोडून रामराजा केव्हांही

वागलेला दिसत नाहीं. निःशस्त्र बायकामुलांची निष्कारण कत्तल करणें, शहरें जाळीत सुटणें, शत्रूच्या धर्मालयांची पाडापाड करून विडंबना करणें, हीं जीं कृत्यें मुसल्मानांनीं केलीं होतीं तीं रामराजानें कधींही केलीं नाहींत. सर्व धर्मांच्या ग्रंथांस व पूज्य स्थळांस समदृष्टीनें लेखणें, निदान मनुष्यत्वाच्या सामान्य न्यायास अनुसरून आगळिकीवांचून तरी इतरांच्या वाटेस न जाणें, अशा प्रकारची भारतीयांची — हिंदूंची — सहिष्णुता केसभरही ढळूं न देतां, शत्रूशीं तो शरण येईपर्यंत उघडउघड लढून आपलें विशुद्ध वीरव्रत गाजवावयाचें व आपल्या स्वदेश-धर्मबांधवांचा होईल तितका सरळ उपायांनीं उत्कर्ष करावयाचा ह्या सद्धर्मसंमत व सरळ मार्गाचाच रामरायानें अवलंब केला हें खरोखर आपणां हिंदूंस अत्यंत भूषणावह होय. रामराजाच्या डोळ्यांसमोर पोर्तुगीजांचे राक्षसी व स्वार्थी अत्याचार रोज येत होते. मुसल्मानांच्या अत्याचारांची तर त्याला पिढ्यान् पिढ्या म्हणजे हाडामासांतच ओळख होती. त्यांच्या अनुकरणानें रामराजासही थोडक्या श्रमांत पुष्कळ लाभ करून घेतां आला असता व मुसल्मानांस जिंकून त्यांची कत्तल उडवून सर्व भरतखंडाचेंही साम्राज्य संपादितां आलें असतें. त्या मार्गाचें अनुकरण करण्याचें मनांत मात्र यावयाचा अवकाश होता. तथापि मुसल्मानांच्या किंवा पोर्तुगीजांच्या (खिस्त्यांच्या), कपट, खादाडपणा व क्रौर्य इत्यादि तामस गुणांचें अनुकरण केल्या-वांचूनही रामराजा ह्या वेळीं दक्षिण सार्वभौम झाला. तो करील तें कारण आणि बांधील तें धोरण, अशी त्याची ह्या वेळीं थोरवी होती. ह्या घटकेस, इतकेंच नव्हे, तर आज वीस वर्षे मुसल्मान सुल्तान त्याची थुंकी झेलीत होते असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. पोर्तुगीजांचा सर्व उत्कर्ष त्याच्यावर अवलंबून

होता. आज वीस वर्षें रामराजानें विजयनगरचा राज्यकारभार मोठ्या धोरणानें आणि अतोनात श्रमसाहसाचीं कामें करून चालविला होता. आपला सासरा जो कृष्णराय त्याच्या मागें त्याच्या वंशजाची, म्हणजे त्याचा भाऊ अच्युतराय, त्या अच्युताचा मुलगा वेंकटाद्री, त्यानंतर कृष्णरायाचा तिसरा भाऊ रंगराय, त्याचा मुलगा लहान जो सदाशिवराय ह्या सर्वांची, कारभारी ह्या नात्यानें रामराजानें आज जवळजवळ अर्ध शतक सेवा बजाविली होती. रामराजाच्या हातीं मुख्य प्रधानकी किंवा राजप्रतिनिधित्व येतांच त्यानें आपल्या दोघांही भावांस त्यांच्या गुणांयोग्य अधिकार दिले. तिरुमलरायास अंतर्व्यवस्था पाहणारा अमात्य नेमून वेंकटाद्रीस त्यानें आपल्या हाताखालीं मुख्य सेनापति नेमलें. त्यानें सदाशिवरायास उत्तम रीतीनें वागवून वाढविलें. कृष्णरायानें सुरू केलेला विजयानगरचा मोठा समुद्र—तलाव त्यानें पुरा केला. हंपी येथील हजारी रामस्वामीचें भव्य देऊळ हें रामराजानेंच बांधविलें. त्यांतील नकासकामांत, मुसल्मान राजे रामराजास दांतीं तृण धरून शरण आल्याचीं चित्रें आहेत. आपल्याच जातभाईच्या जुल्मास कंटाळून कित्येक मुसल्मान अमीरउमराव व इतर सामान्य लोकही रामराजाच्या आश्रयास येऊन राहत. इतकी त्याची प्रजापालनांत समदृष्टि आणि धर्मसंबंधांत सहिष्णुता होती. खुद्द विजयानगरांत मशीदी बांधून आपल्या धर्माप्रमाणें ईश्वरस्मरण करण्यास त्यानें मुसल्मानांस पूर्ण मुभा दिली होती. ह्या मुसल्मानांचा त्यानें एक निराळाच मोहला बनविला होता. त्याचें नांव तुर्की मोहला. तेथें त्यांना आपल्या रुचीप्रमाणें प्राणिवधही करितां येत असे व त्यापासून हिंदुधर्मीयांसही उपसर्ग नसे. ह्यानें व ह्याच्या सचिवांनीं विजयानगरास

कित्येक भव्य राजवाडे व देवळें बांधिलीं असून त्या प्रत्येका-करितां निरनिराळा पाण्याचा पुरवठा करण्यासाठीं सत्तर धरणें बांधिलीं होतीं. प्रत्येक सचिव व सेनाधिकारी ह्यांच्या निर-निराळ्या विस्तृत उद्यानांतून अनेक तऱ्हेचीं देशीपरदेशी फळ-फळावळ, सुवासिक फुलझाडें, पुष्करण्या वगैरे असत. ह्याचे सुभेदार बहुतेक मदुरा प्रांतांतील नाईक असत. ह्या नाईकांची कलाकौल्ययुक्त भव्य मंदिरें उठविण्याची आवड जगद्विश्रुत आहे. रामराजा कारभार करीत असतां विजयानगरच्या विस्तृत राज्यांत अंतःकोपास यत्किंचित्सुद्धां वाव मिळाला नाहीं. तुंगभद्रेच्या दक्षिण तीरापासून कन्याकुमारीपर्यंत सर्वत्र अलौकिक शांतिसाम्राज्य नांदत होतें. काय दंगेधोपे होत, ते सर्व तुंग-भद्रेच्या उत्तरेस मुसलमानी मुलखांत. रामराजा सर्वदा विजयी होत असल्यामुळें त्याच्या प्रजेंत उत्साह, आनंद आणि उल्हास ह्यांचीच वृद्धि सारखी होत होती. एकंदरींत रामराजा हा एक दक्षिणेच्या इतिहासांत अलौकिक पुरुष होय, यांत कांहीं शंका नाहीं.

४८. विजयानगरच्या पाठिंब्यावर पोर्तुगीजांनींही कोकणांत शके १४७० च्या सुमारास, शके १४७७ आणि ७९ मध्यें अशा तीन जंगी स्वाऱ्या केल्या. ह्या तिन्ही वेळीं त्यांनीं आपल्या क्रौर्याची अगदीं कमाल करून गोव्यापासून श्रीवर्धन-पर्यंतचा किनाऱ्यालगतचा मुलुख बेचिराख करून टाकिला. ह्यांत त्यांचा दाभोळवर नेहमीं पहिला दणका येई. शके १४७७ चे स्वारींत त्यांनीं विजापुरच्या सैन्याचा मालवणनजीक आचरें येथें आणि कारली नदीवर असा दोनदां पराभव केला. ह्याचा असा परिणाम झाला कीं, शके १४८४ च्या सुमारास हे पोर्तगीज लोक गोव्यापासून तों तहत सुरतेपर्यंत सगळ्या

पश्चिम किनाऱ्याचे स्वामी बनले. किनारा सोडून आंतील मुलखावर स्वाऱ्या करण्याचें पोर्तुगीजांच्या मूळच्या संकेतांतच नव्हतें. आणि यदाकदाचित् त्यांनीं तसें कांहीं केलें असतें, तर रामराजाशीं झालेल्या त्यांच्या तहाप्रमाणें वर घाटाचा कोणताही भाग त्यांनीं जरी जिंकला असता, तरी तो ह्यांच्या पदरांत न पडतां रामराजाच्या विजयानगरच्या साम्राज्यांतच सामील झाला असता. तेव्हां इतका उपद्व्याप ते कशाला करितात ? रामराजास त्यांनीं वरघाटीं म्हणजे विजापुरकर किंवा इतर मुसलमान यांशीं चाललेल्या लढायांतून केव्हांही साहाय्य केल्याचें दिसत नाहीं व त्यालाही कधीं यांच्या साहाय्याची अपेक्षा झाली नाहीं. दुसरें असें कीं, नुसत्या किनाऱ्यावरील जिंकलेल्या प्रदेशाचीसुद्धां अस्सल यूरोपियांकडून व्यवस्था ठेवावयाची असें जर ते म्हणते, तर खुद्द पोर्तुगालच्या लोकसंख्येस केवढें खोरें लागलें असतें ? कदाचित् तिकडे घरें, गांवें आणि शहरें उजाड होऊन गेलीं असतीं. तसें होऊं नये, म्हणून तर अल्बुकर्कनें पोर्तुगीज शिपायांस महारमांगधेडांसुद्धां सांपडतील त्या हलक्याभारी जातींच्या पोरी जुल्मानें बाटवून बायका करून देण्याची वहिवाट घातली व अशा विषम जोडप्यांस गोवें प्रांतांत मिराशी जमीन देऊन त्यांची प्रजा युरोपीय प्रजेप्रमाणें सर्व बाबतींत सारखी हक्कदार गणली जावी, अशी व्यवस्था केली. तीच प्रजा हाफ् कास्ट – अर्धजातीय किंवा संकीर्ण खिस्ती पोर्तुगीज – अशी नांवाजली गेली. पोर्तुगीजांची – अस्सल किंवा बाट्या अशा दोघांची — कायम वस्ती गोवें प्रांतांतच बहुतेक होती. त्याच्या खालोखाल वसईच्या आसपास, अगदींच तुरळक तारापुराच्या लगत्यास व थोडीशी दीवदमणकडे. समुद्रकिनाऱ्यावरील त्यांचें स्वामित्व म्हणजे केवळ चांचेपणाचें, चोरटें,

किंवा पेंढारशाहीचेंच होय. कारण, ते जरा किनारा सोडून अलीकडे कधीं काळीं आले, तर लगेच कोंकणांतील कोळी वगैरे लढाऊ शूद्र जातीचे लोक, त्यांचें चांगलेंच कांडात काढीत. ते लोक त्यांना कधींच नमले नाहींत. एकजुटीमुळें समुद्रांतही ह्या पोर्तुगीजांस खडे चारण्याचें त्यांच्या अंगीं सामर्थ्य असतांही त्या वेळीं त्यांस कोणी सत्ताधारी वाली नसल्यानें तसें होऊं शकलें नाहीं. शांततेच्या सुखच्छत्राखालीं सुखावलेल्या हिंदु प्रजेवर एकाच काळीं मुसलमान व ख्रिस्ती हे दोन दांडगे बुभुक्षित लांडगे दोन अंगांनीं अचानक घुसल्यामुळें त्यांची सर्व व्यवस्था विस्कळित होऊन त्यांच्या शौर्य, स्वधर्मश्रद्धा व साहसादि गुणांची राखरांगोळी व्हावी, यांत कांहीं नवल नाहीं. तरीसुद्धां जातिभेदादिविवर्जित अशा एकाच ख्रिस्ती धर्मी लोकांनीं गजबजलेलें, व ग्रीस आणि रोमच्या साम्राज्यांतील सर्व सुधारणांचा गड्डा घेऊन बसलेलें यूरोपही जवळजवळ सर्व मुसल्मानी बनविण्याचा मुसल्मानांनीं जितक्या लवकर रंग आणिला आणि त्यांनीं तिकडे मुसल्मानांची जितकी लोकसंख्या वाढविली, तितकी बाट्यांची संख्या ह्या दोघांनीं मिळूनही तितक्या काळांत हिंदुस्थानांत वाढविली किंवा नाहीं, याचा संशयच आहे. त्याचप्रमाणें अजूनही तुर्की ग्रीससारख्या युरोपीय ख्रिस्ती राष्ट्रांच्या डोळ्यांतून काजवे पडतील अशी श्रीमुखांत भडकविण्यास समर्थ असा मुसल्मानी धर्म यूरोपांत नांदतो आहे. दक्षिण हिंदुस्थानांत रामराजानेंच सर्व मुसल्मानांची एकदम खोडकी जिरविली. पण रामराजाच्या धर्मांत गमागम नाहीं, म्हणून त्याच्या त्या जयांमुळें मुसल्मानांची संख्या कायमची कमी होऊन त्यांबरोबरच त्यांचें राजकीय व सामाजिक सामर्थ्य आणि महत्त्व हीं कमी झालीं नाहींत हें मुसल्मानांचें महद्भाग्य होय. हीच

गोष्ट भारतधर्माविरुद्ध ख्रिस्तीधर्मप्रसाराचीही होय. मात्र हा न्याय ख्रिस्ती व मुसल्मानी ह्या दोन धर्मांतील परस्परसंबंधास लागू नाहीं. ह्या दोन्ही हैदोसी आणि तरवारीच्या जोरावर वाढण्यास सुभा असलेल्या धर्मांपैकीं धाकट्यानें म्हणजे मुसलमानी धर्मानें पूर्वगोलार्धाचें किंवा त्यावेळच्या ज्ञात पृथ्वीचें त्रिखंड साम्राज्य, आपल्यापेक्षां सहाशें वर्षांनीं वडील असणाऱ्या ख्रिस्ती धर्माच्या अगोदर भोगिलें व अजूनही तिन्ही खंडांत त्याची स्वतंत्र सत्ता चालत असून तो आपल्या वडील भावाबरोबर सारखा झुंजतच आहे. भारतीयांचा जुना अनादिसिद्ध वैदिक धर्मही आपल्या शास्त्रोक्त मर्यादेंत, सायण, माधव, हरिहर, बुक्क, श्रीकृष्णराय, रामराज आणि ज्ञानेश्वरादि संतमंडळीच्या प्रवृत्त्यात्मक व निवृत्त्यात्मक उत्कर्षकर प्रयत्नामृतानें अखंड यौवन भोगीतच आहे. त्यांतही जेथें म्हणून भारतधर्मसूर्यास कालपरत्वें खग्रास ग्रहण लागण्याचा प्रसंग येतो, तेथें तेथें ‘ दे दान सुटे गिराण ’ ह्या तत्त्वांचा अवलंब करून इहसुखसर्वस्वाचें दान करून स्वधर्मसूर्याचें ग्रहण सोडविण्याची संतांची जणुं प्रतिज्ञाच आहे. त्यांच्या रूपानें दयाघन परमेश्वर ‘ संभवामि युगे युगे ’ हें आपलें वचन वरचेवर आपल्या भारतीय भक्तांच्या प्रत्ययास आणून देतो. त्याला आपणच उत्पन्न केलेल्या ह्या जगांतील हैदोसीळ जुलमी धर्म पाळणाऱ्या तामसप्रवृत्ति मनुष्यांची जशी ममता आहे, तशीच किंबहुना अधिकच ममता आपल्या सत्त्वगुणप्रवृत्ति, शान्तताप्रिय आणि गमागमवर्ज्य, वर्णाश्रममर्यादांनीं बद्ध असा आचारप्रधान वैदिक धर्म पाळणाऱ्या भारतीयांबद्दलही आहे.

४९. वरील विधानाचें प्रत्यंतर ह्या काळींही एक चांगलेंच दिसून येतें, तें असें : शकशतक पंधराव्याच्या उत्तरार्धांत, उत्तर

कर्नाटक हें, विजयानगरकर व ब्राह्मणी सुलतान विजापुरकर, अहमदनगरकर, गोंवळकोंडेकर इत्यादींच्या लढायांची रंगभूमिच बनलें होतें. तेव्हां मुसलमानांकडून सांपडेल तेथें हिंदूंचा व हिंदु देवतांचा उपमर्द करण्यांत येऊन फारच धर्मच्छल होत होता. याच वेळीं एकदा तृणामल्ल★ ( तिनवेल्ली ? ) नगरींत नृसिंहभट्ट नामें तेथील एक देशपांडे होता. तो तेथील शिवगंगा नांवाच्या सरोवराच्या तीरीं आग्नेय कोनास श्रीत्र्यंबकेश्वर नांवाचें एक जागृत शिवालय होतें, त्यांतील शिवलिंगाची मोठ्या भक्तिभावानें उपासना करीत असे. तेथील तूर्तातूर्त झालेल्या यवन अधिकाऱ्यानें ह्या शिवालयाची मशीद बनविण्याचा विचार करून ' ब्राह्मणाचा थार मोडावा ' असें ठरविलें. त्याप्रमाणें शिवालयावरील घुमट पाडूं लागतांच सर्व ब्राह्मण व नृसिंहभट्ट यवनांप्रती बोलते जाले :–' आम्ही येथील पूर्ण अधिकारी. तूं शिवालय मोडूं जाणतोसी, पण मोठा घात होईल. ' परंतु तें कांहींच न ऐकतां यवनानें गवंडी, पाथरवट बोलाविले आणि ' खणारे ! खणा ! ! ' म्हणून सांगितलें. त्याप्रमाणें ते कामगार खणावयास लागले असतां, नृसिंहभट्टासह सर्व ब्राह्मण, तसेंच कांहीं चांगले योगाभ्यासी असे सर्वजण स्त्रीपुत्रांसह उपवासी शिवालयांत गोळा होऊन देवावर पडले, आणि ' देवराया, या दुःखाचा सत्वर परिहार करीं ' म्हणून आक्रोश करूं लागले. तेव्हां यवनाच्या आज्ञेनें शिपायांनीं ब्राह्मणांस पायीं धरधरून ओढून टाकिलें आणि त्यांच्या स्त्रियांच्या डोक्यावर धोंडे देऊन त्यांना तो यवन स्वतः चाबकानें मारूं लागला. त्या वेळीं कित्येक स्त्रियांचें गर्भपतनही झालें. त्यानें कित्येकींचीं

★प्राचीन म्ह. मुसलमानी दक्षिणदेशविभागांत कर्नाटक हा सुभा दारुलजफर ऊर्फ विजापुर सुभ्यांतला एक सरकार होता.

तान्हीं भूमीवर आपटून मारलीं, कित्येक स्त्रियांच्या स्तनांस सांडस लावून त्यांस छळिलें व कांहीं पुरुषांच्या गळ्यांस दोर लावून त्या दुष्टानें त्यांस विहिरींत सोडिलें ! तो सर्वांस म्हणूं लागला कीं, ' येऊं द्या आतां तुमचा देव, मारा त्याला हांका ! ' याप्रमाणें मोठा हाहा:कार झाला. धन्य त्या पशूंसही लाजविणाऱ्या छलकांच्या क्रूरतेची ! त्या क्रूर यवनानें ब्राह्मणांस वरीलप्रमाणें त्रास देऊन त्यांचें धनधान्य, वस्त्रपात्र, अलंकार आणि वतनें हिसकून घेऊन त्यांस तेथून हांकून लाविलें आणि आपला हेतु तडीस नेला. तेव्हां आपल्या पतिव्रता आनंदीबाई स्त्रीसह नृसिंहभट्ट तेथून निघाले, ते उत्तरेस नारायणगिरीकडे चालले. इकडे तो यवन शिवालय खणवीत असतां साळुंकेस कुदळ लागली, आणि त्या ठिकाणांतून भडभडा रक्ताचा स्राव निघाला. तें पाहतांच मनांत दचकून खणणें बंद करून स्वारी नाकधुऱ्या काढावयास लागली. त्याला वाटलें कीं, हा हिंदूंचा देव—शिव आपणावर कोपला, आतां तो सर्व नगर जाळून टाकील. तेव्हां त्या यवनानें तें स्थान सोडून गेलेल्या नृसिंहभट्टादि ब्राह्मणांस परत आणण्याकरितां सत्वर दूत पाठविले. दूतांनीं ब्राह्मणांस समजावून परत आणिलें. ब्राह्मणांनीं देवस्थानाची सर्व धूतीपूती करून त्या यवनाच्या द्रव्यानें यथास्थित रुद्राभिषेकादिपूर्वक शिवार्चन करून देवता संतुष्ट करून घेतली. यवनानें त्यांची अनंत प्रकारांनीं क्षमा मागितली व त्यांस पूर्वींपेक्षांही अधिक इनामें व वतनें करून देऊन त्यांस संतुष्ट केलें. परंतु नृसिंहभट्ट कांहीं गिरीवरून खालीं आले नाहींत. ते तेथेंच राहिले. त्यांची —

वृत्ति झाली उदासीन । अष्टांगयोगसाधन ।<br>
करूनियां पूर्णपणें । देह शुष्क पैं केला ॥ ८० ॥

प्रथम मासीं निराहार । दुसरे मासीं प्यावें नीर ।
ऐसें तप करूनियां थोर । शुकयोगींद्रासारखें ॥ ८१ ॥
करूनियां पंचाग्निसाधन । धूम्रपानीं होऊनि मग्न ।
जटा पादपरियंत लांबून । नारायणीं बुद्धि ठेली ॥ ८२ ॥
घालोनियां सिद्धासन । नित्य करावें भस्मधारण ।
अक्षयीं नारायणाचें ध्यान । आदरेंसीं करावें ॥ ८३ ॥
" देवा ! देह कर्वतीं घालिन । कीं जीव पर्वतीं देईन ।
किंवा फेनीं जाईन बुडोन । देवराया ! श्रवण करीं ॥८४॥
नलगे मज पुत्रधन । तुझें नलगे मज धनधान्य ।
आतां हा किंकर जाण । पायांतळीं ठेवावा " ॥ ८५ ॥

तेव्हां देवानें स्वप्नांत नृसिंहभट्टास —

" अगा माझ्या बाळका ! । तुजलागीं शिणविलें फुका ।
तुझ्या निवारावया शोका । होईन पुत्र तुझा मी ॥ ८९ ॥
तुझिया तपेंकरून । बहु संतोषलें मन ।
आतां तुवां येथून । जावें " ऐसें आज्ञापिलें ॥ ९० ॥

५०. ह्याप्रमाणें नृसिंहभट्ट ईश्वराचा वर घेऊन जे निघाले ते स्त्रीसह गोदातीरीं येऊन आंत स्नानास उतरले. त्या प्रसंगीं ध्यानपूर्वक गंगेंत अघमर्षण करीत उभे असतां, अवचित त्यांच्या हातास एक श्रीनृसिंहमूर्ति* लागली. तेव्हां हीच आपली उपास्य-देवता, असा निश्चय करून त्यांनीं ती घेतली, व पुढें अखंड तिच्या द्वारेंच ईश्वरोपासना चालविली. तेथून ते पुणेवाडीस येऊन कायमचे राहिले. येथें त्यांच्या स्त्रीस कांहीं दिवसांनीं एका-मागून एक असे यथावकाशानें तीन मुलगे झाले. त्यांची अनुक्रमें त्रिंबक, विश्वनाथ व बापू अशीं नांवें ठेविलीं होतीं. पैकीं मधला विश्वनाथ हा पूर्ण विरक्त व सदा आनंदी असे. हाच

* अजून ह्यांच्या घराण्यांतील देवपूजेंत एक नृसिंहमूर्ति आहे, व ती हीच अशी दंतकथा त्यांच्या घराण्यांत परंपरेनें चालू आहे.

वरप्रसादाचा होय. पुढें ह्या तिघांचीही उपनयनें व लग्नें करून नृसिंहभट्ट व आनंदीबाई कैलासवासी झालीं. विश्वनाथास नेहमीं देवपूजेचाच काय तो एक नाद, घरकाम मुळींच करावयास नको, हें त्याच्या संसारी भावांस खपेना. त्यांनीं आईबापांच्या पश्चात् त्यास कटूक्तींनीं छळण्याचा क्रम चालविला; व शेवटीं गिरिजेसह त्यास हातीं धरून बाहेर घालवून लाविलें. तेव्हां एकेका वस्त्रासह निघालेलीं हीं स्त्रीपुरुषें तीर्थयात्रेच्या निमित्तानें त्रिंबकेश्वरास चाललीं असतां मार्गांत ओतुरास वसतीस राहिलीं. तेथें 'नेसावयास वस्त्र नाहीं, खावयास अन्न नाहीं' अशा विपत्तीमुळें स्त्रीनें त्यांस फार त्रास दिला. म्हणून ते एकदम मांडवी पुष्पावतीचे तीरीं जाऊन घोर वनांत स्नानसंध्येस बसले. तथापि पाणिगृहीत स्त्रीच्या त्या वज्रप्राय कठोर भाषणाचें स्मरण होऊन त्याच्या अंतःकरणाची शांति होईना; इतकेंच नव्हे, तर त्याबद्दल त्यांस अति दुःख होऊन शेवटीं त्यांना रडें कोसळलें. तेव्हां ध्रुवाला जसा नारद त्याप्रमाणें ह्या तरुणास व्यासपुत्र शुकयोगींद्रासारखा तपोनिधि केवळ ज्ञानसमुद्र असा राघवचैतन्य नामक यतींद्र पाठीशीं उभा राहून हळूच विचारूं लागला —

" तूं कोण आलासी येथें ? । किमर्थ करितोसी शोकातें ? ।
खेद सोडूनि स्वस्थ चित्तें । वृत्तांत सांगे सर्वही " ॥ १२ ॥

त्यावर त्या यतींद्रास साष्टांग नमस्कार करून व आपलें इतिवृत्त सांगून विश्वनाथ म्हणाला —

" भार्या म्हणे ' अहारे दैवा ? । दुःख झालें माझिया जीवा ।
पति मिळाला नाहीं बरवा । कैसें आतां करावें ? ॥ १७ ॥
पोटीं नाहीं पुत्रसंतान । पदरीं नाहीं कांहीं धन ।
वस्त्र फाटूनि जालें जीर्ण । पोटभरी अन्न मिळेना ॥ १८ ॥
कानीं नाहीं बाळी बुगडी । मिळालीं नाहीं चांगलीं लुगडीं ।
सुख नाहींच अर्ध घडी । जालें याचे संगतीनें ॥ १९ ॥

आपण मिळवीना अधेला । मिळालें दे ब्राह्मणांला
म्हणूनी बंधूनें घालविला । हात धरूनि बाहेरी ॥ २० ॥
हा कोणाचें आर्जव न करी । नाक धरूनि बसतो घरीं ।
जाईना गिरिगव्हरीं । स्नानसंध्येलागीं पैं ' ॥ २१ ॥
ऐसीं स्त्रियेचीं दुर्भाषणें । समक्ष ऐकूनियां कर्णें ।
त्रास घेतला माझिया मनें । म्हणोनि आलों या स्थळीं ॥२२॥
कोणाची स्त्री ! कोणाचा बंधू ! । हा अवघा दुःखसंबंधू ।
तुम्हां ऐसा दयासिंधु । भेटतां सुख होतसे ॥ २३ ॥
या त्रैलोक्याचे ठायीं । स्वामी ! मजला कोणी नाहीं ।
पुढें संततिही कांहीं । झाली नाहीं सर्वथा " ॥ २४ ॥

५१. हें ऐकून राघवचैतन्यांनीं त्याला सांगितलें कीं, ' बाबा रे ! मलाही पुत्र नाहीं. तुझ्यापेक्षां मी कितीतरी वयस्क आहें. तूं अजून तरुण आहेस, पूर्ववय – पोरवयच म्हटलें तरी चालेल. मला कोणी नाहीं असें तूं म्हणतोस, मग मीं कसें म्हणावें ? असो, तुला मी आहें, कांहीं काळजी करूं नकोस. ' असें म्हणून त्याच्या मस्तकावर त्यांनीं आपला वरदहस्त ठेविला आणि अनेक परींनीं त्याला उपदेश करून शांत करण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. विश्वनाथबाबांचें मन स्त्रीचीं दुर्भाषणें स्मरून फिरून फिरून शोकग्रस्त होई. तो म्हणे, " पुरे हा संसार. माझी भार्या फार क्रोधी–जशी तरवारीची धार आहे, मला तर प्रपंचाचें ज्ञान नाहीं, धन मिळवितां येत नाहीं आणि स्त्रीचें बोलणेंही सहन होत नाहीं. म्हणून तर मी तिला सोडून आलों; तेव्हां फिरून आतां तिचा माझा संबंध नको, मी आपल्या पायांशींच राहीन. " त्यावर राघवचैतन्य-स्वामी म्हणाले, " तुला स्त्रीत्यागास अजून अवधि आहे; मी सांगतो तें ऐक. पाणिग्रहीत स्त्रियेशीं तुजसह धर्मकामांसी सेवन करीन, म्हणून विवाहदिवशीं जो नेम केलेला

असतो, तो शास्त्राज्ञेप्रमाणें पुरा केला पाहिजे. 'जायमानो ह वै ब्राह्मणः' म्हणजे जन्मतःच 'त्रिभिःऋणैः' तीन ऋणांसह जन्मतो. त्यांत पितृऋण हें स्त्रियेच्या ठिकाणीं पुत्रोत्पत्ति करून फेडावें लागतें. तें पितृऋण फेडण्यांत स्त्रीऋणही फिटतें. आतां तुला नुकतें पंचविसावेंच वर्ष आहे. एक पुत्रसंतान होतांच तूं स्त्रीचा मोक्षेच्छेनें त्याग कर. माझ्या आशीर्वादानें तुला लवकरच पुत्र होईल. बरें असो! मला आतां क्षुधा लागली आहे, तेव्हां तुझ्या बिऱ्हाडीं चल आणि तुझ्या स्त्रीकरवीं पाक करवून मला अन्नप्रदान कर." याप्रमाणें श्रीगुरु राघवचैतन्यांची आज्ञा होतांच विश्वनाथबाबा आनंदानें गांवीं परतला आणि झालेला वृत्तांत स्त्रीस सांगून त्यांनीं तिच्या मनास संतोषविलें. नंतर तिनें आनंदानें इकडून तिकडून जमवून आणलेल्या सामग्रीनें सिद्ध केलेला पक्वान्नपाक घेऊन तो फिरून स्वामीकडे वनांत गेला व त्यांना अन्नसंतर्पण करून व त्यांचा

"तुज होईल उत्तम पुत्र। पुढें वंशवृद्धि करील पवित्र।
तुज मोक्ष होऊन चरित्र। प्रगट होईल भूमंडळीं" ॥ ४१ ॥

असा आशीर्वाद घेऊन परत आला आणि दोघां स्त्रीपुरुषांनीं संतोषानें प्रसाद म्हणून शेषान्न भक्षण केलें. पुढें हीं स्त्रीपुरुषें सुखानें कालक्रमणा करूं लागलीं.

५२. मध्यंतरीं आपण राघवचैतन्यांचें पूर्ववृत्त बघूं. पुणें जिल्ह्यांत जुन्नरापासून चारपांच कोसांवर 'उत्तमनाम नगरी' म्हणजे ओतुर या नांवाचें गांव पुष्पावती किंवा कुसुमावती नदीच्या तीरीं आहे. ही कुसुमावती नदी भांबोरीच्या डोंगरांतून निघून ओतुरापुढें चारपांच मैलांवर हिंवरें बुद्रुक येथें कुकडी नदीस मिळते. ह्या ओतुर गांवचा राघव नांवाचा ब्राह्मण खडतर तप करून व्यासांच्या दर्शनेच्छेनें फार काळपर्यंत

वातांबुपर्णाशन करून होता. त्याच्या नखांच्या चुंबळा झाल्या, अंगावर धुळीच्या वज्या वाढल्या, जटा भुईवर लोळूं लागल्या; तेव्हां त्याला शेवटीं व्यासदर्शन घडून ' ॐ नमो भगवते वासुदेवाय ' हा मंत्र मिळाला. व्यासांनीं ह्यांस परमहंस दीक्षेची आज्ञा देऊन सर्व वेदान्तरहस्य सांगितलें व वडवाळ सिद्ध नागनाथांस लौकिक गुरु कर असें सांगून आपण अदृश्य झाले. परमहंसदीक्षेंतील ह्यांचेंच नांव राघवचैतन्य झालें. राघवचैतन्यांची पुढें बहुत काळ खालीलप्रमाणें योगप्रक्रिया चालू असे :—

स्वतिकाकारी नाना आसनें । नित्य करावीं निश्चलपणें ।
पूरक, कुंभक, रेचक । प्राणायाम करावा ॥ ३८ ॥
जालंधर आणि उड्डियान । तिसरा मूलबंध जाण ।
अपानातें ऊर्ध्व करून । अधोगमन प्राणांचें ॥ ३९ ॥
करूनि कुंडिनीप्रबोध । सुषुम्नेचा शोधिला मार्ग ।
कर्णी अनुहताचा शब्द । श्रवण करीत असावा ॥ ४० ॥
नासिकांतरीं वाहे श्वास । नित्य सहस्रदळीं सहवास ।
पद अविनाश । जया म्हणती ॥ ४१ ॥
सदा असावें निवृत्तीं । भूतमात्रीं समान स्थिति ।
अंगावरी सर्व पक्षी बैसती । निर्भयत्वें येउनी ॥ ४२ ॥
अष्टमहासिद्धींचा पाळा । भोंवता होउनी गोळा ।
आज्ञा मागती वेळोवेळां । स्वामीलागीं प्रार्थोनी ॥ ४३ ॥
धैर्याचा मेरु अचल । अंगीं वैराग्याचें बळ ।
कदाचित् प्राशन करावें जल । अन्न न खावें सर्वथा ॥ ४४ ॥
एक मासपर्यंत एक वृक्षीं । द्वितीय मासीं दुसरे वृक्षीं ।
उडोनि जातो जैसा पक्षी । तैसें * जावें निजांगें ॥ ४५ ॥

---

* बाह्य साधनावांचून स्वयंसिद्ध असणारी ही वायुतरणविद्या ( Aerial navigation ) योगानें साध्य असल्याची ही एक ऐतिहासिक गोष्ट होय.

नग्नवृत्ति दिगंबर । शयन करावें वृक्षावर ।
एका वृक्षीं ठेवूनि शिर । दुज्या वृक्षीं चरण पैं ॥ ४६ ॥
कदाचित् सिद्धासन घालुन । वृक्षाग्रीं बैसावें जाऊन ।
करावें शीतोष्णाचें सहन । ऐसा काळ बहु गेला ॥ ४७ ॥

सारांश ! राघवचैतन्य म्हणजे साक्षात् योग्यमूर्तिच होते. त्यांच्या आशीर्वादानें विश्वनाथबावांस गिरिजाबाईच्या पोटीं वर्षाच्या आंत, ओतूरास ज्या ब्राह्मणाच्या घरीं यांचें बिऱ्हाड होतें, तेथेंच उत्तम पुत्ररत्नाची प्राप्ति झाली. तेव्हां फिरून पुत्रोत्सवाच्या हौसेनें गिरिजाबाई विश्वनाथबावांस 'हें आणा, तें आणा' म्हणून हट्ट घेऊन त्रास द्यावयास लागली. सरासरी दहा दिवस होऊन अस्पर्श स्थिति संपतांच, बाबा वनांत राघवचैतन्यांकडे गेले आणि —

"सरली संसाराची कथा । मजला संन्यास द्यावा आतां ।
दूर करावी जी भवव्यथा । स्वामिराया ! दयाळा" ॥ ४८ ॥

अशी श्रीगुरु राघवचैतन्यस्वामींची प्रार्थना करावयास लागले. तेव्हां वैराग्यें चित्त शुद्ध झालें व स्त्रीचें ऋणही फिटलें, ऐसें पाहून राघवचैतन्य प्रसन्न झाले आणि संन्यासपद्धतीचे प्रकारें आपल्या नामानुसार विश्वनाथबावांचें केशवचैतन्य असें नांव ठेवून त्यांस त्यांनीं सविधि उपदेशपूर्वक संन्यास दिला. मग तेथून नूतन संन्यासयोग्य जो तीर्थयात्रेचा सांप्रदाय, तो चालविण्यास्तव ते जनस्थान नासिक-पंचवटीस गेले. तेथें त्रिरात्र राहून पुढें कुशावर्तस्नानपूर्वक त्र्यंबकेश्वराचें दर्शन घेऊन गंगाद्वारीं तीन दिवस राहिले. पुढें द्वारका, नारायणसर, समुद्रस्नान, आदिनारायणदर्शनादिक करून अजमीराजवळ पुष्करतीर्थास गेले. नंतर नरनारायणबद्रिकेदारादि उत्तरमानसतीर्थें करून गंगायमुनासंगमीं येऊन ब्रह्मभावें त्रिविक्रमाचें दर्शन

घेते झाले. नंतर ह्या दोघां गुरुशिष्यांनीं श्रीक्षेत्र काशी, तेथील विष्णुपदगंगापूजनादि करून प्रत्येक ठिकाणीं त्रिरात्र राहून विश्वेश्वरदर्शन आणि मणिकर्णिका स्नान केलें. तेथें राघवचैतन्यांनीं जेव्हां केशवचैतन्यांकडून चैतन्यरूपी विश्वेश्वराचें स्तवन करविलें त्या वेळीं काशींतील सर्व अहंकारपूर्ण विद्वान् ब्रह्मवृंदासमोर विश्वेश्वराचें लिंग ह्या भक्तोत्तमाची स्तुति ऐकून हालूं डोलूं लागलें.★ तें पाहून त्या सर्व विद्वानांनीं गलिताहंकार अशा ह्या गुरुशिष्यांची अत्यंत वाहवा केली. व

स्वामी तुमचे दर्शनेंकरून । आम्ही संपूर्ण झालों धन्य ।
आणि हें क्षेत्र तुमच्या येणेंकरून । परम पावन झालें ॥३६॥

असें सर्व म्हणूं लागले. काशींतील विद्वज्जनांनीं ह्या दोघांचा जो पूजोपचारासह सन्मान केला, त्या द्रव्यानें हे स्वतां निःस्पृह असल्यामुळें ह्यांच्या शिष्यगणांस केशवचैतन्यांच्या नांवानें तेथें शिवालय बांधतां आलें. अजूनही हें शिवालय काशींत आहे असें म्हणतात. असो! काशींत अशी कीर्ति करून ही जोडी जगन्नाथदर्शनपूर्वक पर्वसमुद्रस्नान व पूर्वदक्षिणतीर्थें करून परत स्वदेशाकडे फिरतांना, पर्जन्यकाळांत कल्याणकलबुर्ग्यास येऊन थडकली. तेथें कोठेंच राहावयास स्थळ मिळेना, सबब एक भव्य मशीद पाहून, हे आंत शिरले. बाहेर पाऊस पडत होता व मशिदींत कोणी नव्हतें. तेथील कुराणाची पोथी ठेवण्याचा मधलाच कोनाडा प्रथम रिकामासा पाहून यांनीं आपल्या पादुका त्यांत ठेविल्या; तों इतक्यांत दिवे लावण्याच्या समयीं मुल्लाणा तेथें आला. त्यानें आपल्या पवित्रस्थानीं पादुका ठेवून

---

★ हा चमत्कार ज्यांनीं विद्युन्मानसाची व प्रयोगसिद्ध योगाची ओळख करून घेतली असेल त्यांस सहज पटेल, इतरांस श्रद्धेवरच खरा मानिला पाहिजे.

बसणारे हे हिंदु काफर पाहून एकदम चिडून बडबडीस आणि शिव्यागाळीस सुरवात केली. त्यानें यांस दरडावून
" तुम्हीं हें काय केलें ? । आमचे धर्मालागीं बुडविलें ? ।
मसीदीमध्यें जोडे ठेविले । मुख्य स्थानीं जाऊन " ॥ ४५ ॥
असें म्हटलें व काजीकडे जाऊन त्यास सर्व वृत्तांत सांगितला. झालें ! काजी चरफडत आला; आणि म्हणूं लागला :—
" ब्राह्मण गुरु तुम्ही संन्यासी । न जातां ब्राह्मणगृहासी ।
सोडुनि आपले धर्मासी । आमचे धर्मासी बुडविलें ॥ ४९ ॥
तुम्हीं येथून जावें सत्वरी । नाहीं तरी दंड होईल भारी " ॥
ऐसें ऐकूनहि ते यतिवरकेसरी । निर्भय बसते जाहले ॥ ५० ॥

५३. मग काजीनें मुल्लाणा पाठवून निजामशहा बादशहाला मशिदींतील साद्यंत वर्तमान कळविलें. मध्यंतरीं इकडे अनेक यवनांचा मेळावा—जसा व्याघ्राभोंवतीं जंबुकांचा तसा—या दोघांभोंवतीं मिळाला होता. निजामशहाही सैन्यासह तेथें येण्यास निघाला. त्यानें येतांयेतांच गांवांतील ब्राह्मणांस तंबी देण्यास सुरुवात केली होती. बादशाही शिपाई म्हणूं लागले कीं,
" ठोका येथील ब्राह्मणांसी । यांनींच आणविले संन्यासी ।
विघडविलें आमुचे धर्मासी । मसीद खराब पैं केली " ॥५७॥
यामुळें बादशहाच्याही पूर्वीं मुलाबाळांसह तेथील सर्व ब्राह्मण मशिदींत येऊन त्या दोघा स्वामींपुढें रडूं लागले. ते म्हणाले, ' तुम्हांकरितां आम्हांला बादशहा दुःख देतो, आतां ग्राम सोडून आम्हांला जाणें आलें. ' हें ब्राह्मणांचें भाषण ऐकून आपल्याकरितां ब्राह्मणांस दुःख होणें चांगलें नाहीं, यास्तव आपण हें ठिकाण सोडावें हेंच बरें, अशा विचारांत ते आहेत तों बादशहा येऊन ठेपला. त्यानें येतांच ' तुम्ही कोण आहांत ? मशिदींत कां राहिलां ? नमाज पढण्याच्या स्थानीं पादुका ठेवावयाच्या काय ? जा, निघा आतांच्या

आतां येथून, नाहींतर तुम्हांला शिक्षा करीन, ' याप्रमाणें त्यांस ताकीद दिली. तेव्हां या दोघांनीं त्याला उत्तर केलें कीं, ' तूं मशीद आपली म्हणतोस तर तिला बोलावून घेऊन जा. आम्ही पृथ्वीवर बसलों आहों, तुझ्या मशिदीस शिवलोंही नाहीं. आम्ही कोठून आलों नाहीं, कीं कोठें गेलोंही नाहीं, जेथल्या तेथेंच आहों. ' सगुण मूर्तिपूजक हिंदूंचें हें उत्तर निर्गुणपूजक म्हणविणाऱ्या व म्हणूनच मूर्तिभंजक व्रत पाळणाऱ्या निजामशहास बरेंच चुरचुरलें. त्याला स्वतः आपल्या करामतीचा म्हणजे सिद्धाईचा मोठा अभिमान होता. त्यानें 'मसीदमा, मसीदमा' म्हणून मशिदीस बोलावण्याचें बरेंच अवसान आणलें; पण तें सर्व व्यर्थ झालें. तेव्हां मग श्रीमद्योगेश्वर चैतन्यमूर्ति, ज्यांचा धर्मरक्षणार्थच अवतार, जे एक परमात्मा व एक ईश्वर असे, प्रत्यक्ष नरनारायण मानवरूपें प्रगटले होते, ते चमत्कार दाखविण्यास सिद्ध झाले.

मसीदीस पुसती, ' तूं कवण ? '। ती म्हणे, ' मी तुमची दासी आंदण '।<br>
स्वामी म्हणती, 'याचा ठिकाण सोडून। चाल येथुनी' ॥७२॥

५४. लगेच त्याप्रमाणें होऊन त्या योगेश्वर स्वामींच्या परमनोवशीकरणसामर्थ्यानें बादशहास मशीद उडाल्याचा भास झाला व घाबरून त्याचे नेत्रही मिटले. इतक्यांत यवनस्पर्श न व्हावा म्हणून स्वामी तेथल्या तेथेंच अदृश्य झाले. मागें बादशहा आपणांशीच विचार करीत बसला. त्याला खरेंच वाटलें कीं, मशीद उडाली ती पाव कोसावर जाऊन स्थित झाली; परंतु तिच्यांतील एक मातीचा कणही स्थानच्युत झाला नाहीं. हा सर्व प्रकार मानसिक सृष्टि उत्पन्न करून ती विवक्षित मनुष्यासच दिसावी, अशी जी योगशक्ति★ तिनेंच घडवून आणिला

★ Pscychic powers

होता. वस्तुतः मशीद जेथल्या तेथेंच होती, बादशाहाचें मन मात्र त्याच्या स्वाधीन नसून तें त्या योगिवरांच्या इच्छेच्या पूर्ण स्वाधीन झालें होतें. त्यामुळें त्याला यांच्या इच्छेनुरूप सर्व भास होत होता. बादशहा आपल्या मनांत –

' हा पुरुष महान थोर । हिंदूंमाजी पीर पैगंबर ।
तयाचा केला म्यां अनादर । धिःकार असो मजलागीं ॥ ७६ ॥
मी अधमांमाजीं अधम । केला सिद्धपुरुषाचा अतिक्रम ।
मजप्रति जाला भ्रम । आपण श्रेष्ठ म्हणवूनि ॥ ७७ ॥
हे उभयतां परमात्मस्वरूप । यांचे छळणेचें मज घडलें पाप !
आतां मज देउनी शाप । दग्ध करितील ये क्षणीं ॥ ७८ ॥
आतां तयांतें जावें शरण । करावा अपराध निवेदन ।
मग जैसें घडेल दैवेंकरून । तैसें घडो ये काळीं ' ॥ ७९ ॥

असा विचार करून स्वामींस पहातो तों स्वामी नाहींत. पुष्कळ शोध केला तरी ते कोठें सांपडेनात, तेव्हां त्यानें त्यांच्या दर्शनार्थ उपवास आरंभिले व त्या मशीदींत ' राघवदराज ' आणि ' केशवदराज ' ह्या नांवांचे दोन दरगे बांधून तेथें उभय चैतन्यांची पूजाअर्चा सुरू केली.

सव्यभागीं बैसुनि ब्राह्मण । करुनि रुद्रावर्तन ।
वेदोक्तमंत्रें पूजाविधान । करिते झाले सर्वदा ॥ ८० ॥
वामभागीं संपूर्ण यवन । कलमा पठति आपण ।
त्रिकाळ निमाज करून । उभे असते जाहले ॥ ८१ ॥

५५. निजामशहा बादशहा स्वतां उपोषित असल्यामुळें त्याची कींव करून कलबुर्ग्यापासून दीड योजनावर असलेल्या आळंद-गुंजोटी या गांवीं राघवचैतन्य प्रगट झाले. बादशहास ती वार्ता कळतांच तो मार्गांत दंडवत घालीत आपले सर्व यवन घेऊन आळंदगुंजोटीस आला आणि हात बांधून स्वामींच्या पुढें उभा राहून ' मी तुमचा अपराध केला, त्याबद्दल

आतां मला शासन करा म्हणजे मी निर्दोष होईन; मला आतां राज्य किंवा संपत्ति नको. मी आपल्या शरीराची माती करून आपल्या संगतीं फकीर होऊन फिरेन ' अशी त्यानें त्यांची विनंति केली. त्याचा दृढभाव पाहून स्वामींनीं त्याला अभय दिलें, तेव्हां बादशहानें फिरून विनंति केली कीं, ' स्वामिराया ! जरी मजवर आपली पूर्ण दया आहे, तरी या ग्रामास सोडून आपण अन्यत्र कोठें जाऊं नये. ' स्वामींनीं ' तथास्तु ' म्हणून त्याची रवानगी केली. याप्रमाणें राघवचैतन्यांनीं धर्मच्छलक मुसल्मानांस वैदिक धर्माचें सामर्थ्य दाखवून, ईश्वरास सर्व धर्म कसे सारखेच मान्य आहेत, हें दाखविलें. राघवचैतन्यांची समाधि उर्फ ' दराज ' म्हणजे केवढें स्थान झालें होतें व आहे, हें निरंजनबुवाकृत ' केशवचैतन्यकल्पतरु ' ग्रंथांतील खालील उताऱ्यावरून चांगलें लक्षांत येईल. वरील चरित्र त्याच ग्रंथावरून बहुतेक रेखाटलें आहे. सच्छिष्य केशवचैतन्यांस राघवचैतन्यांनीं म्हटलें, ' तुवां आमच्या अनुष्ठानस्थळीं उत्तम ग्रामासी म्हणजे ओतूरास जावें, कारण आमची बहु प्रसिद्धि झाली त्यामुळें उत्तरोत्तर जनोपाधि फार होईल. यासाठीं आम्ही आतां समाधि घेतों. ' त्याप्रमाणें लगेच राघवचैतन्य अंतर्धान पावले. तेव्हां सर्व यवनांनीं अमित द्रव्य खर्चून त्या ठिकाणीं म्हणजे आळंदगुंजोटीस त्यांची समाधि बांधिली. व्यवस्था येणेंप्रमाणें होती —

' राघवदराज ' तया लागुनी । नांव ठेविलें यवनांनीं<br>
' राघवचैतन्य ' ब्राह्मणांनीं । म्हणत असावें सर्वदां ॥ ९५ ॥<br>
एक भागीं पूजा करिती ब्राह्मण । एक भागीं पूजा करिती यवन ।<br>
अद्यापि तेथील महिमान । चालली असे यापरी ॥ ९६ ॥<br>
देशोदेशींचे यात्रेकरी येती । नानाप्रकारचे नवस करिती ।<br>
तयांचे नवस पूर्ण होती । नवसासी स्वामी पावूनि ॥ ९७ ॥

सभोंवतीं केलीं उपवनें । विचित्र स्थळें बांधिलीं जाण ॥
वापी कूप तडाग खनन । केलीं स्थळोस्थळीं पैं ॥ ९८ ॥
उत्साह महोत्साह होती । निशाणें पताका शोभती ॥
भेरी चौघडे वाजती । प्रतिदिनीं त्या स्थानीं ॥ ९९ ॥
जैसी इंद्राची अमरपुरी । कीं द्वारकेची आणिली दुजी सरी ॥
तैसें स्थळ तें अति कुसरी । निर्माण होतें जहालें ॥ १०० ॥

वरील अवतरणांत कांहीं अतिशयोक्ति असेल तर तेवढी वजा करावी. ही राघवचैतन्यांची आळंदगुंजोटीची समाधि शके १४८० पासून १४८५ पर्यंत केव्हां तरी झाली असावी. या पुढील केशवचैतन्यांचें चरित्र स्वतंत्र आहे; तें पुढें योग्य स्थलीं देण्यांत येईल. कारण, आपली राजकीय इतिहासाची हकीकत शके १४८५ सुमारापर्यंतच आलेली आहे. तेव्हां आतां मागील इतिहासाचा व वरील हकीकतीचा कितपत मेळ बसतो तो पाहूं.

५६. मागील इतिहासांत व वरील हकीकतींत कल्याण कलबुर्गा हें ठिकाण आणि निजामशहा हें बादशाहाचें नांव हींच काय तीं मेळ घालण्याचीं दोन सूत्रें. शके १४८५ च्या सुमारास हुस्सेन निजामशहानें विजापूरच्या अल्ली अदिलशहास कल्याण कलबुर्ग्याचा सुभा परत करण्याचें कबूल केलें आहे. विजापुरचे अदिलशहा व अहमदनगरचे निजामशहा यांचा झगडा शके १४७३ च्या सुमारास जो सुरू झाला, तो हा कालपर्यंत म्हणजे जवळजवळ बारा वर्षें चाललाच होता. ह्या बारा वर्षांत कल्याण कलबुर्गा हा सुभा, निदान खुद्द तेवढें ठिकाण तरी, अहमदनगरच्या निजामशहांच्याच ताब्यांत होतें. तेव्हां चैतन्यचरित्रांतील निजामशहा हें नांव ऐतिहासिक हकीकतीशीं मिळतेंच आहे. त्याचप्रमाणें दुसरी गोष्ट हीही सिद्ध

आहे कीं, ज्या अर्थी शके १४८५ च्या सुमारास कलबुर्गा निजामशहाच्या ताब्यांतून आदिलशहाकडे गेला, त्या अर्थी राघवचैतन्यांची समाधिही शके १४८५ च्या आंतच झाली असली पाहिजे; आणि ती तशीच झाली असण्यास पुढील केशवचैतन्यांच्या आयुष्यक्रमावरुन चांगला आधार मिळतो. तो कसा तें त्या त्या वेळेस दाखविण्यांत येईलच. हुस्सेन निजामशहास हिंदु रामराजाची राजकीय वरिष्ठता व हिंदु फकीर राघवकेशवचैतन्यांची धार्मिक वरिष्ठता एकाच कालीं स्वीकारण्याचा प्रसंग आला.तथापि त्याला हिंदु साधूंच्या धार्मिक वरिष्ठतेपेक्षां हिंदुराजा रामराजा याची राजकीय वरिष्ठता फारच अपमानकारक वाटली. त्यासाठीं त्यानें काय काय उद्योग केले! त्यानें मोठी कारवाई लढवून बेदर, गोवळकोंडा आणि विजापुर ह्या सर्व पादशाह्या रामराजाविरुद्ध उठविण्याची खटपट आरंभिली व तो मोठा धूर्त कारस्थानपटु असल्यामुळें त्याचें तें करणें सिद्धीसही जाण्याजोगें होतें. या भावी कटास विशेष बळकटी यावी म्हणून त्यानें आपली मुलगी चांदबिबी ही अल्ली अदिलशहास दिली. मागें त्यानें कुतुबशहासही आपली पहिली एक मुलगी देऊन जांवई केलें होतेंच. चांदबिबीबरोबर आंदणादाखल सोलापुर प्रांत त्यानें विजापूरच्या अदिलशाहीस जोडला. अल्ली अदिलशहानेंही आपली बहीण हुस्सेन शहाच्या मुलास देण्याचा मानस दाखविला, व त्यानें मोठ्या आनंदानें ती आपल्यास सून करून घेतली. ह्याप्रमाणें विजापुरकर, गोवळकोंडेकर आणि अहमदनगरकर म्हणजे एक कुटुंबच झालें म्हणावयाचें. बेदरकर म्हणजे केवळ बाहुल्याप्रमाणें हवें त्यानें नाचवावें असेंच प्रकरण होतें. आतां ह्या झालेल्या प्रकारांत विश्वासघात किती होता हें पाहिलें, म्हणजे अंगावर शहारे

येतात ! कारण, कुतुबशहा गोवळकोंडेकर हा तर केवळ रामराजाचा कृतक पुत्रच. ह्याला रामराजानेंच गोवळकोंडें येथें स्वतःच्या बळावर तख्तनशीन केलें होतें, हें मागें आलेलें वाचकांस स्मरतच असेल. अहमदनगरकर निजामशहांसही विजापुरच्या प्रबल अदिलशहाच्या तडाक्यांतून रामराजानेंच वांचविलें; इतकेंच नव्हे, तर विजापुरकरांबरोबरीनें प्रबळही करून सोडिलें. अहमदनगरकर व विश्वासघातकी सजातीय मित्र गोंवळकोंडेकर कुतुबशहा यांच्या वरचष्म्यांतून विजापुरकरांस सलामत बाहेर काढण्यास रामराजानें विजापुरकर अदिलशहा-च्याच खुद्द विनंतीवरून त्यास आपल्या मांडीवर बसवून आपला मुलगा समजून केलेलें साहाय्यच सर्वस्वीं कसें कारण झालें, हेंही वाचकांस स्मरत असेलच. तात्पर्य काय, वरील तिन्ही शाह्यांचे सुलतान म्हणजे रामराजानें उपकारबुद्धीनें पुष्ट होऊं दिलेले असे होते. त्यानें जर मागील दहाबारा वर्षांतील निरनिराळ्या मोहिमांत एकेकास अचानक गांठून गारोडी ज्याप्रमाणें सापास त्याप्रमाणें त्यांस आपल्या कारागृहरूपी पोतडींत टाकिलें असतें, तर तें अशक्य होतें असें नाहीं; परंतु शरणागतास मरण देणें किंवा संधि सांपडतांच परकीय राज्यें खालसा करून स्वराज्यास जोडणें व न्याय, औदार्य आणि परस्परसंधि यांजकडे सर्वथैव दुर्लक्ष करून लहरीखातर किंवा स्वार्थैकदृष्टीनें केवळ सामर्थ्याच्या व कपटपटुत्वाच्या जोरावर परस्वापहार करणें हें भारतीय वैदिक संस्कृतीच्या आर्य क्षत्रियांचें शीलच नव्हे. त्यामुळें मानार्ह विजिगीषेच्या लहरींतच काय ते आर्य क्षत्रिय इतर राज्यांकडे पाहात व निकरानें पराक्रम करून जय संपादीत. अर्थात् जया-मागें मान येतच असे. तेवढा मिळाला कीं, स्वयंपूर्ण देशाचे राजे असणारे हे आर्य क्षत्रिय पुढें केवळ सहज मिळत असलेल्या

लक्ष्मीचा उपभोग घेत; मनोरंजनार्थ व क्षात्रकलाभिवृद्ध्यर्थ मृगया करीत; परंतु अमर्याद राज्यविस्ताराची हांव धरून शेजारपाजारच्या अशक्त किंवा अडचणींत सांपडलेल्या राजांचीं राज्यें घशांत उतरविण्यासाठीं धडपडत नसत. ह्याच न्यायानें रामराजाही, आपले व ब्राह्मणी सुलतानांचे जे नुकतेच परस्पर-मैत्रीचे संधि झाले होते त्यांवर पूर्ण विश्वास ठेवून स्वराज्याची अंतर्व्यवस्था पाहण्यांत गुंतला होता. आज जवळजवळ तीस-चाळीस वर्षें तो ह्या मुसलमानांशीं लढत होता. इतक्या अवधींत त्यानें कृष्णेच्या तीरानें उत्तरेस जुन्नरपर्यंत प्रवेश करून मध्यमहाराष्ट्रासही स्वराज्य—आर्य क्षत्रियराज्य —अनुभविण्याची संधि दिली होती. परंतु वर राजस्तानांत ज्याप्रमाणें हस्तिनापुरचें राज्य स्वराज्य करण्याची संगानें आणून दिलेली उत्तम संधि पुढील रजपुतांनीं वांया दवडिली, त्याचप्रमाणें महाराष्ट्रांतही कृष्णराय व रामराजा ह्यांनीं स्वपराक्रमानें अनार्य मुसल्मानांस खडे चारून आर्य संस्कृतीच्या सर्व दाक्षिणात्यांस एक होण्याची व मुसल्मानांचें मुख्य पीठ जें बेदरादि नगरांभोंवतालचा प्रदेश, तेंच हस्तगत करून सर्व महाराष्ट्रांत व दक्षिणापथांत हिंदुसाम्राज्य अनुभविण्याची आणून दिलेली उत्तम संधि त्यांनीं वांया दवडिली. विशेषतः जसे वर जयपुरकरादि रजपूत—क्षत्रिय, तसेच इकडेही निंबाळकरादि अनेक मराठे—क्षत्रिय १५६० च्या सुमारास मुसल्मान बादशहांची सरदारी मिळविण्यांत धन्यता मानूं लागलेले दिसतात. ज्याप्रमाणें उत्तरेंतील दिल्ली—हस्तिना-पुरचें राज्य जयपुरकरादिकांनीं वाढविण्याची खटपट चाल-विली होती, त्याप्रमाणेंच मोरे, शिरके, जाधव, महाडिक, माने, निंबाळकर, घाटगे, इत्यादि सर्व मराठ्यांनीं ह्या काळीं विजापूर, अहमदनगर इत्यादि ब्राह्मण बादशाहीच्या भिन्नभिन्न सुलतान-

तींत असाम्या, जहागिरी मिळवून तीं तीं दक्षिणेंतील मुसल्मानी राज्यें इमानेंइतबारें वाढविण्याची खटपट चालविली होती. वास्तविक पाहतां त्यांनीं ह्या वेळीं घरापासून जरा लांब कां होईना परंतु स्वतंत्र व पराक्रमी रामराजासारख्या हिंदु क्षत्रिय राजाचीच सेवा प्रयत्नपुरस्सर स्वीकारून जेव्हां जेव्हां तो वर महाराष्ट्रांत येई तेव्हां तेव्हां आपल्या घराभोंवतालचा प्रदेश त्याजकडूनच आपणांस जहागिरीदाखल करून घ्यावयाचा व त्याच्या पाठ-बळावर आपल्या जहागिरींचा मुलुख वाढवीत राहून मोठ्या युक्तीनें परराज्याचा वरवंटा झिजवून झिजवून अगदीं नाहींसा करून टाकावयाचा. परंतु असें होण्यास लोकांस कोणीतरी ईश्वरी प्रसादाचा, प्रवृत्तिमार्गांतील लोकांचेंही इष्ट साधून देणारा निःस्पृह साधुच उपदेष्टा असावा लागतो. तसा साधु ह्या काळीं कोणी झालेला दिसत नाहीं. मागील हकी-कतीवरून व पुढेंही येणाऱ्या साधुचरित्रांवरून ह्या काळीं स्वधर्माभिमानी संतसज्जन महाराष्ट्रांत मुळींच नव्हते, अशांतला प्रकार नाहीं. परंतु केवळ स्वधर्माची निवृत्तिमार्गप्रधान पारमार्थिक बाजूच तेवढे संभाळणारे ह्या काळचे सर्व साधु असत. प्रवृत्तिमार्गांत लोकांस इष्ट वळण लावून स्वसमाजाच्या ऐहिक सुखसाधनांत अचूक भर टाकतां येण्याचा मार्ग सुचलेला असा वरिष्ठ धोरणाचा सत्पुरुष महाराष्ट्रास अजून लाभावयाचा होता. मुधेशचांगा, राघवकेशवचैतन्य ही मंडळी सत्पुरु-षांच्या कोटींतली, परमवैराग्यशील, उत्कट स्वधर्माभिमानी जरी खरी, तरी वरील दृष्टीनें केवळ निवृत्तीची साधक आणि वाऱ्याला पाठ देणारीच म्हणावी लागते. स्वयंप्रकाश, स्वयंसिद्ध आणि परिस्थितीचें अनिष्ट स्वरूप बदलून तिला अनुकूल करून घेण्यास ही मंडळी समर्थ असून सर्व समाजांत महत्त्वाकांक्षा भरवून त्यास

कार्यतत्पर बनविण्याची लोकोत्तर कल्पकता ह्यांच्यांत वसत नव्हती, असेंच खरें. तसें नसतें आणि जर कोणी खरा स्वधर्म-देशनिष्ठ, समाजधुरीण, निःस्पृह, ईश्वरभक्त, कार्यकर्ता साधुपुरुष ह्या वेळीं उत्तरेंत किंवा दक्षिण महाराष्ट्रांत असता, तर खचितच दोहींकडे असणाऱ्या मुसलमान राज्यपीठांचीं तो आपल्या स्वधर्मीयांकडून पाळेंमुळें खणविल्यावांचून राहताच ना. उदाहरणार्थ वल्लभाचार्य– हे मोठे साधु– एका नवीन पंथाचे प्रवर्तक ह्याच सुमारास म्हणजे कृष्णरायाचे राजवटींतच दक्षिणेंतून उत्तरेस प्रत्यक्ष राजपुतान्यांत गेलेले आढळतात. तेथें त्यांचा चांगला सन्मान झाला, इतकेंच नव्हे, तर त्यांनींच तेथें प्रथम सात प्रकारांनीं कन्हय्यालाल श्रीकृष्णाच्या मूर्ति कल्पून त्यांची सगुण पूजा सुरू केली. त्यांतच एक विठ्ठलनाथ ह्या नांवानें पंढरपुरच्या विठोबाची मूर्ति ( शके १४४० च्या सुमारास ) त्यांनीं स्थापिली होती. एकंदरींत महाराष्ट्र, राजस्थान व कर्नाटक ह्या तिन्ही ठिकाणच्या साधुसंतांचें आणि सर्वसामान्य लोक तदनुयायीच असल्यानें त्यांचेंही उपास्यदैवत एक झालें होतें; आणि हा नाथद्वारापासून विजयानगरपर्यंतच्या हिंदुमात्राचें एकोपास्य करण्याचा मान महाराष्ट्र संतांसच आहे, हें आम्हां मराठ्यांस मोठें भूषणावह आहे. पण ह्या उपास्याच्या ऐक्याचा उपयोग वल्लभाचार्यांस किंवा चैतन्यद्वयास राष्ट्राची प्रवृत्तिमार्गांत एकी करण्याकडे करतां येऊं नये, हें दुर्दैव होय! आणि त्याचा दुष्परिणाम तितक्याच भयंकरपणें वरपासून खालपर्यंत सर्व हिंदूंस भोगावा लागला. शिवाय येथें असेंही म्हटल्यावांचून राहवत नाहीं कीं, वल्लभांनीं, रामानुजांनीं व बंगाल्यांतील चैतन्यांनीं जो कृष्णभक्तीचा पंथ काढला व गुरुस सर्वस्वार्पण करणें, श्रीकृष्णाच्या श्रीमद्भाग-

वतवर्णित रासक्रीडादि कथांचेंच विशेष प्रस्थ माजवून प्राकृत भक्तांकडून त्या लीलांचेंच अनुकरण करविणें, इत्यादींची जी प्रवृत्ति वाढविली, ती तत्पंथानुयायांत नरमपणा आणि स्त्रैणता वाढविण्यास कारण होऊन त्या मानानें मर्दपणास कमीपणा आणती झाली. श्रीमद्भागवतोक्त श्रीकृष्णलीला वास्तविक केवळ आलंकारिक व कविकल्पनागम्य आहेत; परंतु प्राकृत जनांस त्या सर्वथैव खऱ्या भासल्या त्या ह्यांच्या उपदेशानेंच. महाराष्ट्रांतील सगुण मूर्तिपूजनांत आणि इतर ठिकाणच्या सगुण मूर्तिपूजनांत ह्यामुळें पुष्कळच फरक पडला. ईशमूर्तीस राजभोग करणें व द्वारें बंद करून दर्शनेच्छु लोकांस दिवसांतून दोनतीन वेळां दोनदोन वटका ईशमूर्तीचें दर्शनही वडूं न देणें अशी सगुणमूर्तिपूजा महाराष्ट्रेतर प्रांतांत फार दिसते. महाराष्ट्रांत भक्तवैष्णवांत जरी गुरूचा मान मोठा आहे, तरी स्त्रीही गुर्वर्पण करण्याची पाळी भक्तांवर कधींच येत नाहीं. त्याचप्रमाणें महाराष्ट्रांत गुरुवराणें राजविलासी होऊं शकलें नाहीं. महाराष्ट्रांत ब्रह्मचारी किंवा संन्याशी यांचीच गुरुपरंपरा गृहस्थाश्रम्यांच्यापेक्षां अधिक मान्य. गृहस्थाश्रम्यांची मुळींच गुरुपरंपरा नाहीं असें मात्र समजूं नये. एकंदरींत लोकांस प्रवृत्तींतही स्वावलंबनपरायण व पराक्रमप्रवण करणारा उपदेष्टा अजून यावयाचा होता हें खरें. अस्तु !

५७. तसा कोणी लोकनायक सद्गुरु नसल्यानें लवकरच तालीकोट अथवा राक्षसतागडीच्या घनघोर संग्रामाची वेळ येऊन ठेपली. त्या एकाच युद्धानें विजयनगरच्या टोलेजंग हिंदुराज्यप्रासादाची राखरांगोळी झाली. रामराजा आपले मुसलमानांवरील विजय चिरकाल टिकणाऱ्या चिऱ्यांवर चित्ररूपानें कोरवून हंपी येथील स्वतः बांधविलेल्या हजारी रामस्वामीच्या भव्य देवळांत बसवीत होता व ते बसवून झाल्यावर कौतुकानें ते पुरे चारदोन

वेळांही त्यानें निरखून पाहिले नाहींत, तोंच आपआपसांत सोयरे-धायरे बनून एक झालेले मुसल्मान सुल्तान आपापलीं सैन्यें जय्यत सिद्ध करून तीं विजयानगरच्या सरहद्दीवर गुपचूप नेऊन ठेवण्याच्या मार्गास लागले होते. अली अदिलशहा, इब्राहिम कुतुबशहा आणि हुस्सेन निजामशहा ह्या तिघांपैकीं निदान कुतुबशहाचें वर्तन असानुष विश्वासघाताचेंच होय. त्याचप्रमाणें अली अदिलशहानेंही, मागें तो जेव्हां विजयानगरास आला होता तेव्हां, रामराजानें आपणांस आपला पुत्र समजावें म्हणून केलेल्या विनंतीवरून रामराजा त्यास तसेंच मानीत होता, हें मागें आलेंच आहे. त्याच ह्या पुत्रानें ह्या वेळीं आपण होऊन आपल्या मानलेल्या पित्याच्या नाशाची सर्व मसलत केली व ती शेवटासही नेली. रामराजानें मात्र शेवटपर्यंत पुत्र म्हटलेल्या अली अदिलशहावर अकृत्रिम विश्वास ठेविला. त्याला जेव्हां आपल्या सरहद्दीवर चारी पातशाह्यांचीं सैन्यें जमताहेत असें देवाजी नांवाच्या त्याच्या जासुदाकडून कळलें, तेव्हां त्यानें लगेच अली अदिलशहाकडे बिसलिया नांवाच्या मनुष्यास पाठवून सांगितलें कीं, “ तुम्ही आमचे फर्जंद असे; तरी तूं आपले मुलुखामध्यें पातशहांसी ( राहूं देऊं ) नये. ” आणि इकडे सर्व सचिवांच्या मंत्राप्रमाणें सैन्य पाठविण्याची व्यवस्था ठरतांच सर्व खजिना सामग्रीसाठीं त्यानें मोकळा केला. शेवटीं युद्धास स्वतः जावें लागेल असें असल्यानें तो आपल्या सत्यभामा, त्रिवेगळी, आणि निजस्वरूपी अशा नांवांच्या तिन्हीं राण्यांकडे गेला. त्यांची सर्व समाधानी करून मग आशीर्वादासाठीं आपली आई जी चंद्रसाळा तिजकडे जाऊन रामराजानें तिची विनंती केली कीं, “ चार पातशहा मिळोन हे मुलकावरी चाल्ही करून येताती. हे धर्ममुलूख, देवस्थान, अन्नछेत्र व देवब्राह्मणस्थल असे.

त्याचे तसवीस होऊं नये. त्याकरितां लस्कर कटकबंदी करून आपण जाऊनी त्यासी गोशमाल देऊन ( देऊं ). आपणांसि निरोप देणें." असें म्हणून रामराजा मातेचे पायां पडला; आणि तिचा आशीर्वाद घेऊन विश्रांतीकरितां गेला असतां त्याला गाढ झोंप न लागतां 'आपलें सिंहासन कोणी हिरावून घेत असे' असें त्यास दुःस्वप्न पडलें. तेव्हा लगेच थोरथोर ज्योतिषी, पंडित यांस बोलाऊ पाठवून त्यानें आपलें स्वप्न त्यांस सांगितलें. त्यांनीं रामराजास 'तुझे शत्रु कोण येताती ते नास होऊन जातील, तुवा क्षेत्रपती मार्कंडी आवुश (अंश) होऊनी राजसिंहासनीं राज करसील' असें सांगून त्याचें समाधान केलें. तेव्हां रामराजानें उल्हासानें ब्राह्मणांस पुष्कळ दानधर्म केला आणि सुमुहूर्तावर आपल्या अमृतनिधान नांवाच्या सारंग्या घोडयावर बसून तो विजयानगरच्या बाहेर पडला व उत्तरेच्या बाजूस उभारलेल्या भव्य नवगजांत राहिला. एकदोन दिवसांत सर्व पागा, पीलखाना, उस्तरखाना, थट्टी, सिकारखाना, जामदारखाना, शरबतखाना, कोठी, फरासखाना, अंबारखाना इत्यादि अठरा कारखाने रामराजाच्या नवगजीच्या आसपास येऊन उतरले. कारण विजयानगरांत राजाज्ञेनें अशी दवंडीच पिटविली होती कीं, "एक घोडा व राऊत न राहतां लष्करासी चालणें." भिन्न भिन्न पथकांस तूर्तच्या खर्चास म्हणून १२३५७४११ होन लगेच वांटण्यांत आले. घोडे, राऊत, हत्ती आणि महात सर्वांस सिलेटोप देण्यास कोषाधिपतीस आज्ञा झाली. त्याप्रमाणें ३,५०००० घोडे, १,४८९१५ प्यादे, १२०५६ भाले-करी, भांडे (तोफा) फिरंगी सुमार ३५३८, बाण निरनिराळ्या प्रकारचे ४६,०९५७८, हुके १३,४३,८७०, लोहार १०९०, सिकार कुत्रे ७०९, नदीटोकरे २००, हुनरवंद ३००४, पान-

बुडे १८०० आणि दारू वजन खंडी ९३६५१० ॥ ३ ॥ ४ याप्रमाणें सर्व सिद्धता झाल्यावर कूच करण्यास सुरुवात झाली.

५८. इकडे निजामशहा–मराठा तख्त–भीमरथी उतरून सुलतान फेरोजाबादेजवळ, अकबर जलालदीन शाहादुर्गाजवळ आणि इब्राहिम कुतुबशाहा–गोवळकोंडेकर तेलंगण तख्त–मुदगल व रायचूर यांचे दरम्यान असे तिघांचे तळ पडले. रामराजाच्या मुलखांत चारी बाजूंनीं या मुसलमानांनीं बाजारबुणगे पाठवून ' चिंधीचोळी बंद धरून ' आणविण्याचा क्रम चालविला. हें पाहतांच रामराजानें बाजारबुणग्यांच्या तोंडावर चार हजार स्वार आणि पन्नास हजार पायदळ पाठवून इतर सर्वांस राक्षसतागडीस तळ देण्याची आज्ञा केली त्याप्रमाणें ब्रिसलिया नाईक, त्रिवेंगळाप्पा नाईक व कार्तिक वीरप्पा नाईक यांनीं राक्षसतागडीकडे कूच केला. ही बातमी मुसलमानी हेरांनीं आपआपल्या सुलतानांस देतांच त्यांनींही त्याप्रमाणें आपले संकेत ठरविले. त्यांची अवाडीची सेना, राक्षस तागडीपासून पांच कोसांवर येऊन तळ देऊं लागली. निजामशहा व कुतुबशहा हे दोघेजण फुटोन तलाव्यास फिरूं लागले. अली अदिलशहा कन्नडजाण व इमामनमुलुक पातशहा वराडी हे कुललष्कर घेऊन तोंडावर होते. त्यांच्याशीं विजयानगराच्या सेनापतींनीं एकजुटीनें तोंडावर तोफांचा मारा चालवून धैर्यानें झगडा केला. तलाव्याचे दोन्ही पादशाहा ह्या असह्य माऱ्यानें जर्जर झाले आणि दीड कोस मागें फिरले. त्यानंतर दुसऱ्या दोघांनीं कांहीं काळ तोंड दिलें. परंतु त्यांचाही लवकर मोड होऊन त्यांना माघार घ्यावी लागली. निजामशहा बहिरी याचे सिवाजी काटे नांवाच्या मराठ्या सरदारासह चार सरदार ठार झाले आणि केरोजी भोंसले आणि बसवाजी ह्या दोन मराठी सरदारांसह तिघे पाडाव झाले. कुतुब-

शहाकडील पाडाव झालेल्या चवघां मातबर सेनापतींत (१) केशव-राऊ (२) संताजी आणि (३) सटवाजी कवटाळ असे तीन मराठे होते. त्याचप्रमाणें ठार झालेले (१) मोतीराऊ (२) अगीराऊ (३) एसाजीराऊ आणि (४) देवाजी तुरूप असे चौघेही मराठेच होते. रामराजाकडीलही (१) रघुवीर कोमार, (२) सोमण्णा दळवी, (३) रामकोटी नाईक, हे व (१) मिरिया जामदार आणि (२) सेख अली हे दोन मुसल्मान जखमी झाले; व अनेगुंदीकर व दुसरा एक असे पाडाव जाहले. मुसलमानांचें पायदळ व स्वार किती जखमी झाले व मेले त्याची गणतीच नाहीं. बखरींत* जंगलोजंगल व रानोरान किती (मुडदे) पडले!" असे शब्द आहेत. हा मनुष्यसंहार ऐकून रामराजास फारच वाईट वाटलें. त्यानें शत्रूच्याही जखमी लोकांच्या व्यवस्थेस वैद्य व परिचारक पाठ-वून देऊन आपल्या सेनापतींस निरोप धाडिला कीं, "आपण येईतों झगडा न करणें. लोक बहुत जाया होताती. तमाम जमा जाहलियावरी शर्तमर्दीनें झगडा केला जाईल." त्याच-प्रमाणें फिरून हरियेपा नाईक यांस अली एदलशहा पादशहा कन्नडजाण यांजकडे चौकशीस पाठविला कीं, "तुवां आपण चालोन येऊनि आम्हापासी येऊनि मांडीवरी बैसून फर्जंद म्हणविलें कीं तुम्हाकडे आपण न येऊ म्हणोन. यैसे शर्तनामा केलेवरी रायेचूर व आदवानी हे दूध लोणीबद्दल दिल्हे. आपले साम्हेमधें पादशाही जमजम करून असावे यैसे असता तुम्ही आपले मुलुकामधून तिघे पादशहाचे लस्केरासी वाट देऊनी आपण कुल लस्केरासहित येऊनी मदती होउनी उतरले असे; बहुत बरें. चार पातशाही मिळून आलिया काय होणार असे?"

---

* ही बखर स. मं. अंक १४ मध्यें छापलेली आहे.

यावर अलीनें जवाब दिला जे, " तिघे पादशाही लस्केर जोरावर होऊन माझे मुल्कामधून आले. मजपासी जोरावर नाही; कुल लस्कर व मुल्क ( माझे त्यांनीं ) खराब केले. हे राजवटेमधे आम्ही पडलों नाही होतो. जैसे फर्जंद म्हणौन मांडीवरी बैसोन सवसपत दिल्हे असे त्यासी खता नाही, तुम्ही काही दिलगीर न होणें. " याप्रमाणें सांगून हरिअप्पास व त्याच्या बरोबरीच्या सर्व माणसांस शाल, कडी, कुडकी, मोतीजोडा, एक हत्तीचा छावा याप्रमाणें देऊन मोठ्या समारंभानें अलीनें त्यांस बोळविलें. बरोबर आपला सिवाजी गोपीनाथ म्हणून एक मनुष्य दिला होता. रामराजानेंही त्याचा इकडे तसाच मान करून त्यास परत पाठविलें. त्याच्या ह्या वकिलामार्फतीच्या बोलाचाली इतर तिघांस कळतांच त्यांनीं एदलशहास तंबी दिली कीं, आपण सर्व रामराजाच्या मुलखांत दंगा करण्यास आलों असतां तुम्हीं त्याशीं राजवटा करितां हें चांगलें नव्हे. " अवघे एकवट होऊनि गोशमाला देणे लागते, आलाहिदा राजवटा केलियाने काम होऊन येत नाही; × × × शर्तमर्दीने मुलुखगिरी करून तुम्ही आम्हाबरावरी मसलतीस येणे. " तेव्हां अलीनें त्यांस जाब दिला कीं, तुम्हांबरोबरच आहों. तुमचे दिलाचे जे काय मुद्दे असतील तेच कबूल.

५९. रामराजा राक्षसतागडीस येऊन दाखल झाला. करनाटकी सैन्य सर्व जमलें. पुन्हा झगडा सुरू झाला. सत्तावीस दिवस युद्ध चाललें होतें. रामराजानें मध्यंतरीं आपल्या निरनिराळ्या प्रांतांतील मुख्य मुख्य १५ किल्ल्यांवर निरनिराळ्या नायकांच्या हाताखालीं भरपूर सैन्य व द्रव्य देऊन त्यास साहाय्यार्थ पाठविलें. न जाणों, हे चार सुलतान आहेत; एकादुसरा फुटून ससैन्य राज्यांत शिरेल आणि गड, कोट, किल्ले भेदानें, दंडानें

जसे साधतील तसे हस्तगत करील. पहिल्याप्रथम निजामशहा व कुतुब यांचा चांगलाच मोड जाहला. बेदरवाल्यास या दोघांनीं एकट्यालाच तोंडाशीं दिला होता, त्याचा तर फडशाच उडाला. तेव्हां फिरून विश्रांती घेऊन ताजेतवाने झालेले निजामशहा व कुतुबशहा हे पुढें झाले. त्यांवर रामराजाच्या लोकांनीं एकदम ४००,००० बाण एकाएकीं टाकिले. त्यामुळें त्यांचे पुष्कळ लोक खराब होऊन दोघांसही मागें फिरावें लागलें. शेवटीं राम-राजानें हत्तीवर बसून स्वतः पुढें होऊन विजापूरकरांच्या पुढारपणाखालीं लढाईस उभें राहणाऱ्या मुसल्मानांवर चाल केली. या वेळीं तोफांचे मोर्चे बांधवून त्यानें मुसल्मानांस चांगलेंच डागून काढिलें. तोफांनीं त्यांची धांदल होतांच स्वार व पायदळ यांसह त्यांजवर एकदम हल्ला चढवून त्यांना कोस, दोन कोस पिटाळल्यावर रामराजा तळावर परत आला. याप्रमाणें शत्रूंस पळवून करनाटकी लोक तळावर किंचित् विश्रामार्थ व श्रमापनोदनार्थ कांहीं मनोरंजक प्रकारांत गुंतले आहेत, पायदळाचे लोक रोटीपोळी करून घेत आहेत, अशा संधीस अली अदिलशहा व बरीदशहा हे दोघे सड्या घोड्या-निशीं एकाएकीं दौड करून आले, ते थेट रामराजाच्या तळांत शिरले. तेव्हां रामराजा अली अदिलशहा कन्नडजाण यास हाताखालीं पाहून म्हणाला कीं, "तुवा माझे लेक म्हणौन बोलिला होतासी. तुवा एकाएकीं दगा करून मजवरी पडिलासी. तुवा आपण फिरंग (तलवार) घेऊन एकांग लढाई करावे. दुसरियानें आपुलियावरी हात देऊं नये." अलीनें रामराजाचे म्हणणें कबूल करून सौगंद दिली. मग रामराजा द्वंद्वास उभा राहून द्वंद्व सुरू होण्याच्या पूर्वी अली त्याच्या बाजूला सहज उभा राहिला आणि त्यानें रामराजाचें म्हणजे आपल्या मान-

लेल्या बापाचें, क्षणापूर्वी वाहिलेली शपथ विसरुन, मस्तक कापिलें. यांत अलीचा कमालीचा विश्वासघात आणि शंभ-रीच्या घरास आलेल्या रामराजाचें प्रशंसनीय धैर्य ह्यांपैकीं कशाची कीर्ति गावी हें वाचकांस सांगावयास नकोच. हिंदु मनाचा अनुपमेय आणि प्रशंसनीय उदारपणा आणि मुसल-मानांची पराकाष्ठेची विश्वासघातकी वृत्ति हीं ह्या राक्षस-तागडीच्या लढाईनें चांगलींच नजरेस आलीं.

६०. रामराजा पडतांच सैन्याची शिस्त मोडून सर्वत्र धांवपळ सुरू झाली. तथापि फक्त विजयानगर मात्र संपत्तीनें सोडलेलें आणि बहुतेक उध्वस्त झालेलें असें मुसल्मानांच्या हातीं लागलें. कारण, राणीवशास त्या पतिव्रतांनीं स्वहस्तेंच आग लावून घेतली होती व इतर सर्व लोकांनीं आपापल्या बहुमोल वस्तु शक्य तितक्या लांबवून सर्वांनीं इतर गडकोटांचा आश्रय केला होता. विजया-नगरचें हिंदुराज्य शके १४८६ च्या मार्गशीर्ष-पौषाच्या ( २५ जानेवारी सन १५६५ ) लढाईनें नाहींसें झालें; तरी मुसल्मानांस कन्याकुमारीपर्यंत सर्व दक्षिण देश लाभला असें मात्र नाहीं. तर किंचित् कमी विस्ताराचें परंतु पहिल्याप्रमाणेंच सुव्यवस्थित व समर्थ असें तें राज्य, पुढें चंद्रगिरी ही राजधानी होऊन चाललेंच. वास्तविक पाहिलें तर रामराजासारख्या धोरणी पुरुषानें ह्या वेळीं लढाईच द्यावयाची नव्हती. त्यानें जर हुल्का-वणीखालीं थोडें कालहरण केलें असतें तर मुसल्मान सुल-तानांची ही जूट खात्रीनें बिघडली असती. कारण, त्यांचीं परस्पर वैमनस्यें इतकीं दृढमूल होतीं कीं, कितीही शरीरसंबंधांनीं तीं निःशेष होणें कठीण होतें. परंतु धोरण व प्रसंगावधान ह्यांपेक्षां हिंदु क्षत्रियांस, चालून आलेल्या शत्रूंशीं युद्ध करणें, हेंच अधिक भूषणावह वाटतें. त्या योगानेंच अनेक वेळां हिंदुसाम्राज्यें शत्रूच्या

कपटास बळी पडलीं आहेत. त्याप्रमाणें ह्याही प्रसंगीं झालें. सद्गुण, सरळपणा हीं कुटिल नीतीपुढें फिकीं पडून मातीमोल कशीं होतात, ह्याचें हें उत्तम ऐतिहासिक उदाहरणच होय. उत्तरें-तील पृथ्वीराज चव्हाणाचें केवळ दयाशीलत्वच त्याच्या अंगाशीं येऊन तेथील हिंदु साम्राज्याचा नायनाट झाला ! तेथेंही 'आपला धाकटा भाऊ, मुलगा, शरणागत गरीब दास ' असें म्हणवून घेऊन आठ वेळां जीवदान मिळविलेल्या घोरीनें, शेवटीं आपल्या त्याच बापास किंवा थोरल्या भावास किंवा कृपाळू धन्यास कंठस्नान घातलें !

६१. असो; तालीकोटच्या मुख्य लढाईचा अंत झाल्यावर हिंदु सैन्य उधळलें. वेंकटाद्री आणि तिरुमल हे दोघे अनंत-पुर परगण्यांत पेनुगोंडा किल्ल्याचा आश्रय करून राहिले. मुसलमानांचीं सैन्यें लवकरच विजयानगरास पोंचलीं. परंतु नागरिकांनीं २५५० हत्तीं लादून सर्व जडजवाहिर आणि रत्न-खचित सिंहासनांसह सर्व कोष पूर्वींच लांबविला होता. तथापि मुसल्मानांसही पुष्कळ लूट सांपडली. त्यांनीं नगरास आग लावली, देवळें विध्वंसिलीं, मूर्ति भंगिल्या आणि इतरही सर्व सुंदर सुंदर प्रासादांची आणि घरांची नासधूस केली. आठ-पंधरा दिवसांत पूर्वींचें प्रत्यक्ष लक्ष्मीविलास असें शोभणारें तें भव्य नगर केवळ उजाड होऊन राहिलें. तेथील उरलेसुरले सर्व गरीबगुरीब लोक भोंवतालच्या टेंकड्यांवर गेले.

६२. विजयी मुसलमान सुलतानत्रय सहा महिने जिंकलेल्या राज्याचे विभाग कसे करावे हा वाद करीत तेथेंच बसले. शेवटीं त्यांच्या त्या वादाचा कांहींच निर्णय न होतां तिघेही आपापल्या राज्यांकडे परतले. रामराजाचा भाऊ तिरुमलराय ह्यानें नवी गादी स्थापन केली आणि अली अदिलशहाशीं एक गुप्त तह

करून त्याला बदामी, तोरगल आणि मुदगल हीं ठिकाणें देऊं केलीं. हुसेन निजामशहा थेट अहमदनगरास गेला तो तेथें थोडयाच दिवसांनीं वारला.

६३. शके १४८८ त अली अदिलशहानें पेनुगोंडयावर स्वारी केली. परंतु वेंकटाद्रीनें अहमदनगरकर आणि गोवळकोंडेकर यांच्याशीं तह करून त्यांजकडून विजापुरावर स्वारी करविली. असा काटशह निघाल्यामुळें अली अदिलशहाच्या किश्वरखानास परतावें लागलें. वेंकटाद्री व तिरुमल ह्यांनीं वरील अल्लीच्या विश्वासघाताचें प्रायश्चित्त, त्याला देऊं केलेले बदामी, तोरगल आणि मुदगल हे प्रांत आपणांकडेच ठेवून दिलेलें दिसतें. कारण, अदिलशहास शके १४९० त कै. रामराजाच्या पुतण्याकडून आदोणीचा किल्ला मिळवावा लागला आणि शके १४९५ त बदामी आणि तोरगल हीं ठिकाणें स्वतंत्र लढाया देऊन घ्यावीं लागलीं. शके १४९६ त धारवाड आणि एक वर्षभर सारखा वेढा देऊन १४९७ त बंकापूरचा किल्ला अदिलशहास मिळाला. याप्रमाणें तुंगभद्रेच्या उत्तरेकडील येवढयाशा मुलखाचें खरें खरें स्वामित्व अली अदिलशहास वर्षानुवर्षं लढून ह्या तालीकोटच्या लढाईनंतर दहा वर्षांत मिळून मिळालें. तुंगभद्रेच्या दक्षिणेस तिरुमलरायानें सर्व राज्य आटोपलें असून त्यानें आपला मुलगा श्रीरंगराय यास शके १४९५ त आपल्या मागें विजयानगरचा राजा म्हणून राज्याभिषेक करविण्याची व्यवस्था केली होती; त्याप्रमाणें त्याचें हें नवें घराणें पेनुगोंडयास चांगलेंच सामर्थ्यवान् बनून राहिलें. पंधराव्या शतकाच्या शेवटीं किंबहुना सोळाव्या शतकाच्या आरंभींच्या वर्षी अली अदिलशहानें ह्या पेनुगोंडयावर फिरून मोठ्या सैन्यानिशीं स्वारी केली; परंतु त्याचें तेथें कांहींच तेज न

पडून त्याला मुठींत नाक धरून परतावें लागलें. मात्र श्रीरंगरायानें ह्यापुढें आपलें सिंहासन चंद्रगिरीस नेलें. अली अदिलशहाचा विजापुरास आल्यावर शके १५०२ ( इ. स. १५८० ) मध्यें खून झाला. शके १५०७ मध्यें श्रीरंगराय वारला. त्याच्या मागें त्याचा भाऊ वेंकटपति हा चंद्रगिरीच्या सिंहासनावर बसला. त्यानें आपल्या राजवटीच्या सुमारें वीस वर्षांत तुंगेच्या खालील विजयानगरच्या स्वराज्यांतील सर्व विस्कळीतपणा नाहींसा करून निरनिराळ्या नाइकांच्या स्वतंत्रपणास चांगलाच आळा घातला व त्यांना पूर्ववत् आपले आज्ञाधारक अधिकारी बनविले. ह्या व्यंकटपतीनें कृष्णेच्या दक्षिण तीरावरील विजयानगरच्या स्वराज्यांतील गोंवळकोंड्याच्या कुतुबशहानें बळकावलेला प्रांत परत मिळण्यासाठीं सारखी सहा वर्षें लढाई सुरू ठेवून शेवटीं आपला मनोदय पूर्णपणें साधला व याप्रमाणें तालीकोटच्या लढाईचे भयंकर परिणाम पुष्कळ अंशीं हाणून पाडिले. तो वृत्तांत फारच मनोरंजक आहे, पण तो महाराष्ट्रमहोदयाच्या पूर्वरंगाच्या आणि शकशतक पंधराव्याच्या मर्यादेबाहेरचा असल्यानें वर केलेल्या दिग्दर्शनावरच वाचकांनीं समाधान पावावें अशी त्यांस विनंति करणें लेखकास भाग आहे. तथापि येथें इतकेंच सांगावयाचें आहे कीं, महाराष्ट्रमहोदयाचें बीज, ह्या विजयानगरच्या द्वितीय अवताराचें जें चंद्रगिरीचें राज्य, तें शेवटीं श्रीमच्छिवछत्रपति महाराष्ट्रराज्यसंस्थापक यांचे वडील जे शहाजी राजे त्यांच्या सर्वस्वीं स्वतंत्र पराक्रमानें जिंकलेल्या जहागिरींत मोडूं लागलें, ह्या गोष्टींत आहे. ह्याप्रमाणें ह्या जुन्या वठलेल्या हिंदु साम्राज्यांतूनच भावी महाराष्ट्र हिंदुसाम्राज्याची उभारणी व्हावी, हें सृष्टिक्रमानें नीटच आहे.

६४. तिरुमलरायानें शके १४८९ (इ. स. १५६७) त विजयानगरास येऊन तें फिरून वसविण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. परंतु त्याच्या यत्नास यावें तसें यश आलें नाहीं. कारण, त्याच सालीं एक वेनीसकर विजयानगराची स्थिति खालीलप्रमाणें वर्णितोः– " विजयानगर रिकामेंच होतें तरी त्याचा विध्वंस झाला असावा असें वाटत नसे. पुष्कळ घरें व्यवस्थित होतीं. परंतु नगराच्या कांहीं कांहीं भागांत व्याघ्रादि हिंस्र पशूंची वसति होऊं लागली होती. " त्यानें पाहिलेल्या जगावरील सर्व राजसभेंत विजयानगरचा राजवाडा आणि राजसभा हींच त्यास अत्युत्तम वाटलीं. " त्याला पांच महाद्वारें आणि चौक्या व चार अंतर्द्वारें व चौक्या असून त्या प्रत्येक ठिकाणीं योग्य पहारा होता. नगरांत चोरांचा उपद्रव होऊं नये ह्याकरितां योग्य तितके नगररक्षक यथायोग्य ठिकाणीं आपापल्या कामीं दक्ष दिसले. "

६५. महाराष्ट्रमहोदयाच्या पूर्वरंगकाळाच्या ह्या तृतीय शतकांतीच म्हणजे शके १४९९ च्या सुमारास श्रीशिवछत्रपतींचे आजे मालोजीराजे ह्यांस, अहमदनगरचे बारा हजार स्वारांच्या पथकाचे सेनापति लखूजी जाधव ह्यांच्या पदरीं एक शिलेदाराची असामी मिळाली. ह्या गोष्टींतच भोसले घराण्याच्या उदयाचा प्रारंभ आहे. निंबाळकरांशीं मालोजी राजांचा झालेला शरीरसंबंध ह्याच सुमाराचा होय. हा शरीरसंबंधही भोसल्यांच्या भावी उदयास पुष्कळच साहाय्यभूत झाला आहे. भोसल्यांचा उदय आणि महाराष्ट्रमहोदय हे एकच असल्यानें जाधव, भोसले, निंबाळकर इत्यादि मराठा क्षत्रिय कुलांचा ह्या शतकांतीं झालेला हा मिलाफ अत्यंत स्मरणीय होय, ह्यांत शंका नाहीं.

६६. तालीकोटच्या लढाईपासून शके १५०० पर्यंतच्या तेरा वर्षांत महाराष्ट्रांत सोळाव्या शतकांत प्रसिद्धीस येणाऱ्या अनेक संतांच्या बालक्रीडा चालल्या होत्या. त्याचप्रमाणें त्यांचे गुरु आपापल्या तपस्सामर्थ्यानें प्रौढावस्थेंत पूर्ण समाधानी असे नांदत होते. केशवचैतन्य किंवा बाबाचैतन्य हेही त्यांतील एक होत. यांची थोडीशी माहिती पूर्वी येऊन गेलीच आहे. त्यापुढील त्यांचा वृत्तांत पुढें दिल्याप्रमाणें आहे :

६७. आपले गुरु राघवचैतन्य यांची आज्ञा शिरसावंद्य करून बाबाचैतन्य हे ओतुरास आले. तों तेथें ते जी आपली सद्यः-प्रसूत पत्नी व मुलगा सोडून गुरुकडे गेले होते, त्या मुलाची भार्या पहिल्टकरीण बाळंत झालेली आणि तिचा नवरा म्हणजे बाबांचा मुलगा मृत झालेला अशी स्थिति होती. बाबाचैतन्य स्वग्रामास आल्याची वार्ता सर्व ओतुरांत तेव्हांच फैलावली. त्याप्रमाणें ती त्यांच्या पूर्वाश्रमींच्या सुनेसही लागतांच दहा दिवसांनंतर ती आपल्या तान्हुल्यास घेऊन बाबांसमोर गेली व तें बालक त्यांच्या पायांवर घालून तिनें त्यांस आपला सर्व करुणाजनक वृत्तांत सांगून त्यांची करुणा भाकिली. त्यांनीं तिला ' तुझ्या तान्हुल्याचे व्रतबंधादि सर्व संस्कार होऊन तो सन्मार्गास लागेल अशी आपण व्यवस्था करूं ' असें सांगून तिचें पूर्ण समाधान केलें आणि त्याबरोबरच मायलेंकरांच्या योगक्षेमाबद्दल कांहींएक अडचण पडणार नाहीं, असा तिचा विश्वास पटवून तिला परत लावून दिली. पुढें कांहीं काल मठांत उघड वास करून अनेकांचीं अनेक दुःखें निवारण केल्यावर वाढत्या लोकोपसर्गास त्रासून बाबाचैतन्यांनीं गुप्त समाधिवासाची युक्ति अवलंबिली. त्या प्रसंगीं त्यांच्या सुनेनें त्यांची तसें न करण्याविषयीं फारच विनवणी केली; परंतु त्यांनीं फिरून एकदां

आपल्या मागील आश्वासनाचें तिला स्मरण देऊन तिची समजूत केली व आपला गुप्त समाधिस्थ राहण्याचा संकेत सिद्धीस नेला. यथाकालीं मुलगा मुंजीस ओका दिसूं लागला तेव्हां बाईनें ' आतां कसें करूं ' म्हणून बाबांच्या समाधीशीं आपल्या जाणत्या मुलासह धरणें घेतलें आणि बाबांचा धांवा आरंभिला. तेव्हां त्यांनीं त्या मुलाच्या व्रतबंधाची व्यवस्था करविली आणि नंतर आपल्या समाधीजवळ भागवत, भगवद्गीतादि ग्रंथांचा पाठ करीत बसण्याची त्या आपल्या नातवास आज्ञा करून त्यास आपण समाधिस्थ असतांच सर्व विद्या शिकविल्या आणि योगक्षेमार्थ त्या मुलास प्रत्यहीं एक सुवर्णहोन तेथेंच मिळण्याची व्यवस्था केली. हा रोज मिळणारा होन घेऊन तो मुलगा बाजारांतील आपणांस हवी ती वस्तु विकत आणी. कित्येक होन शिल्लकही राहत. ह्या होनांची बातमी जातां जातां तेथील यवन अधिकाऱ्यास लागून त्यानें हे असे उत्तम सोन्याचे होन कोठून येतात ह्याचा शोध चालवितांच तें सूत्र ह्या दोघां मायलेंकरांपर्यंत आलें. मुलानें अधिकाऱ्याच्या प्रश्नास खरें खरें उत्तर दिलें. आईनें मोठ्या काकुळतीनें शिल्की होनांनीं भरलेलें मडकें पुढें करून आपल्या मुलास सोडण्याविषयीं त्या अधिकाऱ्याची विनवणी केली; परंतु त्याचा कांहींएक उपयोग न होतां त्यानें त्या मुलास " कोठें आहे तुझा देव तो दाखीव, " असें म्हणून धक्के मारीत त्यास बाबांच्या समाधीकडे नेलें. तेथें पोंचतांच त्या मुसल्मानानें आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्याच्या प्रत्यक्ष आज्ञेनें समाधि खणण्यास कुदळ घातली. भोंवतालचा प्रदेश खणीत खणीत समाधीच्या मध्यभागीं खणण्यास सुरवात होतांच एकाएकीं कुदळीस रक्त लागलें व एकामागून एक तेथें इतके भुंगे उत्पन्न होऊं लागले कीं, क्षणैक सर्व काम-

करी आश्चर्यमग्न आणि भयस्तंभित झाले. इतक्यांत त्या भुंग्यांनीं डसून कित्येकांचे प्राण कासावीस केले व कित्येकांस पंचत्वास पोंचविलें. जिकडे तिकडे आपल्या खणण्याचें काम टाकून ते लोक गेले, तिकडे तिकडे त्यांचा त्या भुंग्यांनीं पाठलाग करून शेवटीं त्यांच्या मुख्याधिकाऱ्यासही गांठिलें आणि त्याला अल्लाकडे न्यायाकरितां पाठवून दिलें. पुढें त्या यवनाधिकाऱ्याच्या नातलगांनीं पुष्कळ नाकधुऱ्या काढून 'क्षमस्व' म्हणून करुणा भाकिल्यावर हा भुंग्यांचा थवा गुप्त झाला. नंतर ओतुरच्या लोकांनीं समाधिस्थानशुद्ध्यर्थ अनेक रुद्राभिषेकादि अनुष्ठानें करून स्वामींची रागनिवृत्ति व्हावी म्हणून याचना केली तेव्हां स्वामींनी ' तथास्तु ' म्हटलें. परंतु ' इतःपर आपण कोणाशींही साक्षात् भाषणादि करणार नाहीं, ' असें सांगून त्यांनीं शके १४९३ त चिरसमाधि घेतली.* तथापि त्यांना फिरून एकदां प्रकट होऊन दुसऱ्या एका शिष्योत्तमास उपदेश द्यावाच लागला. तो त्यांचा भावी शिष्योत्तम पुढील म्हणजे सोळाव्या शतकांत अत्यंत प्रसिद्धीस आलेला साधुवर्य श्री तुकाराम होय. हा ह्या सुमारास जन्मून रांगत खेळत होता. त्याचें चरित्र व गुरूपदेश हीं पूर्वरंगाच्या मर्यादेबाहेरचीं असल्यामुळें त्यासंबंधानें येथें मुग्ध असणें बरें.

६८. ह्या केशवचैतन्यांप्रमाणेंच ह्या व पुढील शतकांत किंबहुना ह्या कालींही बराचसा प्रसिद्धीस येत असलेला साधुवर्य जो श्रीएकनाथ ( शके १४७०–१५२१ ) तो मात्र आपले गुरु जे श्रीमज्जनार्दनस्वामी, यांच्या येथें चांगला दहाबारा वर्षें राहून

*बाबा किंवा केशवचैतन्य ह्यांच्या चरित्राविषयी व समाधिसंबंधीं ज्यांस अधिक माहिती हवी असेल त्यांनीं काव्यसंग्रह अंक १३०-१३१ ह्यांतील केशवचैतन्य कल्पतरू ग्रंथ व त्याची प्रस्तावना हीं पहावीं.

कृतविद्य, पूर्ण ब्रह्मोपदिष्ट असा गुर्वाज्ञेनें पैठणास परतून आपल्या आजाआजींच्या मनोदयाप्रमाणे गृहस्थाश्रमी होऊन शके १५०० च्या सुमारास आपल्या आचारशील वर्तनानें व चारी वर्णांच्या लोकांस त्यांच्या ठायीं असलेल्या अलोट प्रेमानें वेदशास्त्र-पुराणांचें महाराष्ट्र भाषेंत रहस्य समजून देत होता. एकनाथाचे गुरु जनार्दनपंत हे दत्तसांप्रदायी म्हणजे नृसिंहसरस्वतींच्या शिष्य-परंपरेंतीलच होत. एकनाथांचे पणजे भानुदास हेही दत्तसांप्रदायीच होते असा त्यांच्या अभंगांवरून निर्णय होतो. एकनाथांच्या गुरुसंबंधीं अभंगांतही दत्त आणि नृसिंहसरस्वति हीं नांवें अभेदार्थानेंच येतात. जनार्दनपंत हे दौलताबाद किंवा प्राचीन देवगिरी येथें किल्लेदार होते. त्यांच्या हाताखालीं हजार-पांचशें तरी सैन्य असलें पाहिजे असें दिसतें. त्यांनीं हा हुद्दा कसा मिळविला आणि त्यांचें बाळपण कसें गेलें ह्याविषयीं अजून कांहींच माहिती उपलब्ध नाहीं. तरी त्यांचें मुसल्मान-शाहींतही धार्मिक आणि इतर सामान्य बाबींत केवढें तरी वर्चस्व होतें. त्यांची दत्तोपासना आणि योगप्रक्रिया, सरकारी किल्लेदाराची नोकरी बजावूनही कशी निर्वेध चालली होती. किंबहुना, त्यांच्या लोकोत्तर सामर्थ्यानें त्यांच्या वाटेस कोणीं जावें, असें समजून त्यांच्या योगप्रक्रियेसह सगुणोपासना-मार्गाच्या आड येण्यास विधर्मी मुसल्मान अधिकारी भीत असत असेंच मानावें लागतें. त्यांच्या वर्चस्वानें त्यांच्या मुस्यांत गुरुवारची सुटीही देत असत. कारण, गुरुवार हा पंतांच्या उपास्याचा वार होता. जनार्दनपंतांस कुराणादि ग्रंथांची चांगलीच माहिती असून त्यांनीं ती आपल्या शिष्यासही भरपूर दिली होती, असें ‘ हिंदुतुर्कका भांडण ’ यासारख्या एकनाथांच्या पदांतील मुसल्मान काजीस निरुत्तर करणाऱ्या

कोष्टयांवरून सहज सिद्ध होतें. एकनाथांचें भागवत ह्याच वेळीं म्हणजे शके १५०० च्या अगोदर प्रसिद्ध झालें असावें असें दिसतें. अस्तु ! एकनाथांचीही विशेष कृति पुढील शतकांतली असल्यामुळें त्यांचें साद्यंत सविस्तर चरित्र येथेंच देतां येत नाहीं.

६९. एकनाथांप्रमाणेंच दुसरे एक दत्तसांप्रदायी साधु दासोपंत हेही जोगाईच्या आंब्यास ह्या शतकांतीं थोडेफार प्रसिद्धीस येत होते. ह्यांचे वडील हे एक तालुक्याचे अधिकारी असून स्थानिक दुष्काळसमयीं त्यांनीं आपल्या प्रजेस सारा माफ केला. परंतु मुसल्मान बादशहास तें बरें न वाटून त्यानें त्यांस वसुलाकरितां हुजूर बोलावून प्रतिबंधांत ठेविलें. शेवटीं अमुक मुदतींत आपण वसुलाची झडती करावी व तोंपर्यंत आपला मुलगा ओलीस ठेवावा, अशा अटींवर त्यांस त्यानें सोडलें. दासोपंतांचे वडील दिगंबर हे मोठे भगवद्भक्त असत, त्यांनीं सरळ मार्गानें रक्कम उभारण्याचा अतोनात प्रयत्न केला; परंतु तो निर्फळ झाला. शेवटीं मुदत संपतांच दासोपंतांस बादशहानें असें फर्माविलें कीं, तूं जर आपला धर्म सोडून आमचा धर्म स्वीकारीत असशील तर तुझ्या बापास आम्ही माफ करितों. दासोपंत हे केवळ अल्पवयीच होते, तरी त्यांनीं बादशहाचें म्हणणें मान्य केलें नाहीं. ते ईश्वराचा धांवा करूं लागले आणि समोर बादशहा व काजी कांहीं वेळानें आपणांस जुल्मानें बाटविणार हें जरी त्यांच्याच सांगण्यावरून त्यांस टाम कळून चुकलें होतें तरी दासोपंतांच्या दृढ श्रद्धेनें त्यांचें मन एकाग्र होऊन सर्व भान विसरून त्यांचें परमेश्वराशीं तादात्म्य झालें. त्यांच्या भक्तीस ईश्वर पावला आणि त्याच्या प्रेरणेनें कोणीं उदारानें किंबहुना ईश्वरानेंच गुप्त दान म्हणून महाराकरवीं वसुलाचें पोतें बादशहाच्या दरबारीं

दासोपंतांच्या नांवानें भरण्यासाठीं पाठविलें. तें घेऊन हा ईश्वरी महार, बादशहा दासोपंतांच्या ध्यानाचा भंग करून त्यांच्या तोंडांत गोमांसादिक घालून त्यांस बाटविणार तों, राजद्वारीं ' जोहार ' म्हणून पुकारला. सारांश, दासोपंतांचें हें संकट निवारण होऊन बापलेंकांची सुखभेट झाली. बडिलांनीं त्याच वेळीं—बादशहा पश्चात्तापपूर्वक अत्यंत आग्रह करीत होता तरी तें न जुमानतां —' सेवाश्ववृत्तिराख्याता ' हें मनुवचन स्मरून आपली विधर्मी राजसेवावृत्ति सोडून दिली. दासोपंत हे तर ह्या प्रसंगींच्या अनुभवानें इतके ईश्वरपरायण झाले कीं, त्यांचा पुढील शतकांत साक्षात् दत्तावतार असा लौकिक झाला. प्रत्यहीं ढबूची शाई ग्रंथलेखनाकडे खर्च करायची अशा नियमानें त्यांनीं आपलें सर्व आयुष्य खर्चून ' गीतार्णवसुधा ' नांवाच्या सवालाख ओवी ग्रंथासह अनेक महाग्रंथ निर्माण केले. ती सविस्तर हकीकत ह्या प्रकरणाबाहेरची आहे.

७०. कथाकल्पतरुकार कृष्णयाज्ञवल्की, जनीजनार्दन, विठारेणुकानंदादि आणखीही कित्येक मंडळी दासोपंतांची समकालीन होती. त्या सर्वांचीं सविस्तर नव्हेच, परंतु अत्यल्प चरित्रें द्यावयाचीं म्हटलें, तरी तें सुद्धां आटोक्याबाहेरचें होईल. म्हणून त्या नादांत न पडतां ह्या शतकांतीं ज्यांच्या ग्रंथकर्तृत्वाची लोकांस चांगलीच साक्ष पटली होती, अशा दोन साधूंच्या चरित्रांतील व ग्रंथांतील थोडथोडा भाग देऊनच हें प्रकरण संपविणें बरें. या दोघां साधुग्रंथकारांपैकी पहिले महालिंगदास हे होत. यांचा गुरु कोणी रामकृष्णभट म्हणून होता. ह्यांचें उपास्यदैवत शिखरशिंगणापूरचा शंभुमहादेव हें असावें असें वाटतें. ह्यांनीं आपल्या ग्रंथांत म्लेंच्छसेवा करणाऱ्या ब्राह्मणांचा जो प्रसंगोपात्त निषेध केला आहे व ब्राह्मणाचा उत्तम धर्म कोणता ह्याविषयीं

जीं वचनें गोविलीं आहेत तीं जातिभेदाचें व वर्णाश्रमाचें संतांस किंवा भक्तमंडळीस कांहींच महत्त्व नव्हतें, असें मानणारांनीं विशेष लक्षांत बाळगण्यासारखीं आहेत. शिवाय त्यांच्या यवनराजसेवामग्नांच्या निंदापर ओव्यांत, स्वदेश व स्वधर्म यांच्या कळकळीची जी ज्योत प्रज्वळत असलेली दिसते ती पाहून स्वदेशाभिमानादि कल्पना आम्हीं पश्चिमेकडून घेतल्या असें म्हणणारांस, 'खरोखरच आपण फुकट पूर्वजनिंदेचें महत्पाप जोडिलें आणि स्वेतिहासाची अक्षम्य हेळसांड केली,' असें वाटून, पश्चात्तापानें त्यांचीं मनें पोळलींच पाहिजेत. ग्रंथोपसंहारात 'हा राजनीतीचा प्रास्ताविक ग्रंथ आपण केवळ बरवावोखटा प्रसंग ओळखून श्रोत्यांनीं येथील कार्यार्थी योजावा म्हणून बुद्धिपुरस्सर लिहिला' असें जें महालिंगदासांनीं म्हटलें आहे तेंही महाराष्ट्राच्या त्या वेळच्या उद्योन्मुखतेचेंच दर्शक होय. निदान महालिंगदासांचा उद्देश तरी मराठ्यांनीं स्वतंत्र होण्याचा उपक्रम करावा असा त्या वाक्यांत स्पष्ट दिसतो.

७१. मराठा क्षत्रियांचीं सामान्य कुलदैवतें जीं शिखरशिंगणापुरचा श्रीशंभुमहादेव आणि तुळजापुरची भवानी, त्यांच्या भक्तमंडळींत ह्या शतकाच्या अंतीं महालिंगदास आणि सिद्धेश्वर सांप्रदायाचा मूळ पुरुष भैरवात्मज त्र्यंबक असे दोघे स्वजनांच्या ऐहिक व पारमार्थिक हीनदशेविषयीं कळकळ बाळगणारे असे झाले. त्या दोघांचीं कांहीं वचनें खालीं देतों.

७२. महालिंगदास विक्रमबत्तिशींत ब्राह्मणाचीं दहा लक्षणें करितो. त्यांपैकीं परधर्मी राजाचे सेवक बनणाऱ्या व स्वजनावर अधिकार चालविणाऱ्या म्लेंच्छ ब्राह्मणाचें लक्षण असें—

आणि म्लेंच्छ तो ऐसा । यौवनाचि सेवा करि अहर्णिसा ।
तेणें पडे फासां । खोटेपणाच्या ॥

इच्छा हुद्दा महिमा । विसरला शट्कर्मा ।
वा बेटा बाप म्हणोनि साउमा । विनंति करी ॥
म्हणे ' मी किंकर तुमचा । काम सांगावे ' असें वाचा ॥
' लोभ दावि **सरकयांचा** । म्हणे मी **पैदास** करीन ' ॥
' मज सत्ता द्यावी खुनखारि । मी करी **पैदागिरी** ।
स्वामीस्वार्थी मी भारी ' । मग **हुद्दा** दिधला ॥
**येरु न्याय करी पापमूर्ति । परद्रव्यावरी अर्ति ॥**
**खोटेपण बहु चित्तिं** । थोर राजा अर्जवीतो देखा ॥
**जना पीडा करभारीं** । पापपुण्य न विचारि ॥
**अवध्या अंतर विचारीं । भरोवरी थोर भरला ॥**
**सत्पात्रीं कदा न भजणें । तरी पाप करी चौगुणें ।**
**एसी पापीष्ट तेणें । जन पीडिले** ॥
तया शट्कर्माचा विसर । **कारकोनिं** पडिभर ।
गायत्रीमंत्राचा अधिकार । थोडा तयासी ॥
**जेथें नागवण करि । तेथें आपण करी चोरी ।**
**नमन नाहीं कोणासी करी । पांचै लेखा आदळिल्या ॥**
दग्धचि बोलणें तेणें । सखासोइरा मैत्र नेणे ॥
**लाचावरी तेणें । ठेविलें चित्त** ॥
उरीं फुटोनि पुरण निघालें । तें स्वामीसि ठाउक झालें ।
मग धरोनि बंदीखाना घातलें । चाबुकामुखें आक्रंदे ॥
' स्वामी मारुं नको भारी ' । तेव्हां तोबा ! तोबा ! इचारि ॥
**बेटा बेटा** ऐसें वैखरी । दूत बोलत असे ॥
' म्यां केली **हरामखोरी** । आतां न मारावें सोटवेरी ' ।
ऐसें बोलतां **धोत्रावीरी । विष्टाचि केली** ॥
ऐसा नष्टा खंड आला । तो घेउनी देशत्याग केला ॥
मागें **नसूं लागला । भलतेयासी** ॥
ऐसा तो ब्राह्मण । **म्लेंच्छ होय चौगुण** ॥
इहपरत्रा चुकला हा अवगुण । थोर तयाचा ॥

७३. ह्याच महालिंगदासानें प्रसंगोपात्त आपल्या ग्रंथांत ३६ मुख्य क्षत्रिय राजकुळांची व ६० उपकुळांचीं नांवें दाखल केलीं आहेत. त्यांत " जैसे स्थानीं वसले । तेंचि आडनांव पावले । अथवा करणीस्तव झाले । नाना कुळांचे ॥ " असें म्हणून उपकुळांची व आडनांवांची उपपत्ति तो देतो. त्यानें दिलेल्या शेंकडों आडनांवांत जाधव, शितोळे, मोहिते, गायकवाड, प्रमार, चाळके, साळके, महाले अशीं अनेक महाराष्ट्रीय नांवें सांपडतात. परंतु भोंसले हें आडनांव कोठें सांपडत नाहीं. सिसोदिये हें सांपडतें. मालोजी हा शिंगणापुरच्या शंभुमहादेवाचा भक्तोत्तम असून तेथेंच रहात असे. त्याचें आडनांव ह्यांत यावयास हवें होतें. मग कदाचित् तें सिसोदिये असेंच महालिंगदासास माहित असलें तर नकळे. महालिंगदास हाही शिखर-शिंगणापुरचाच होय. असो ! यापुढें—

" साही शास्त्रांचे वक्ते । भट पिंगळे जे जाणते ॥ तर्क वेदांतीचे वक्ते । बोलती तेथें ॥ २० ॥ आधीं वेदांतीं बोलती । ते एकमेवाद्वितीये नास्ति म्हणती ॥ तर्क म्हणे भेदमतीं । प्रपंच असे ॥ २१ ॥ मग म्हणीतले चौघींजणीं । बुद्धीच ब्रह्मनिर्वाणीं ॥ **मी म्हणतसे कर्मावांचुनि । ब्रह्म न पविजे** ॥ २२ ॥ गौब्राह्मण अवघडीं । जो देखता करी सांडी ॥ तो अधर्म जोडी । मनुष्य जन्मासी ॥ २३ ॥

७४. ह्याप्रमाणें महालिंगदास आपलीं धर्ममतें किंवा सिद्धांत सांगतात. या ग्रंथाचा उपसंहार करितांना महालिंगदासांनीं खालीलप्रमाणें उल्लेख केला आहे :

" ऐसी बत्तीस पुतलीयांची कथा । येथोन संपली आतां । सांग ऐकतां सुलभ्यता । संतोष होय मना ॥ ३५ ॥ कां आधार मऱ्हाठी । केली म्यां बरवी प्रपाठी ॥ जे गायन कला गोमटी ।

चांग दिसे ॥ ३७ ॥ " मध्यें अनुष्टुप्, शार्दूलविक्रीडित व आर्या इत्यादि वृत्तांचीं आठपासुन ७६ पर्यंत नेमकीं अक्षरें व आर्येंत अक्षरांचा नियमच नाहीं, असें थोडेसें वृत्तदर्पणाचें स्वरूप सांगून शेवटीं— " हा ग्रंथ प्रास्ताविक। राज्यनीति आत्यंतिक ॥ **डोळस होये लोक**। आयकीलिया ॥ ४५ ॥ **बरवा वोखटा समय देखिजे। तेधवां हा वाक्यार्थ आठविजे ॥ मागें मनीं कीजे। विचार देखे** ॥ ४६ ॥ **म्हणवुनि याचा उपकार मानावा। हा ग्रंथ जीवासि धरावा ॥ प्रस्थान न घडतां योजावा। कार्यार्थ येथिल** ॥ ४७ ॥ हा ग्रंथ **अनाथसिद्धि** असे। वरी वोवियाबंध नेटका नसे ॥ मोकळिया गोष्टि या ऐसें। कवित्व असे ॥ ४८ ॥ म्हणोनि केलियां ओविया। उत्तम दिसती बरवीया ॥ गोपन कळे गातां सोपिया। वाटति सकळां ॥ ४९ ॥ आचर्य ! ( आश्चर्य ) देश **म्लेंच्छ म्हराष्टरीं**। बाहाळसमीप ग्री ( गिरि )जातीरीं ॥ वाडेग्राम पवित्र थोरी। तेथ हा ग्रंथ केला असे ॥ ५० ॥ शालीवाहन शकीं। चौदा सत्यशाहासी (१४८६) देखीं ॥ रक्ताक्ष संवत्सरी एकी– ( पुढें त्रुटित )

आतां बालबोधांतील कांहीं उतारे देतों. हा ग्रंथ फारच उत्तम आहे.

हें अहाच परी सघन। **देशस्थेमध्यें** ब्रह्मज्ञान ॥
तें हलुवें हें वचन। मानूं नये ॥ ८७ ॥
जैसा सुखासनाचा मार्गु। तैसा **महाराष्ट्रप्रसंगु** ॥
आंगीं बाणे राजयोगु। रोकडाची ॥ ८८ ॥
ये **मऱ्हाटीचे** पल्लवें। जीव उगमातें पावे ॥
तरी कासया उलथावें। पानाचे कवले ॥ ८९ ॥
हें अरुष आरुतें वचन। **रोकडें करींचें कांकण** ॥
वेदशास्त्रींचें दोहन। मोकलें तें हें ॥ ९० ॥

ते आदिवाचेची आठिं । उपसोनि कीजे **मऱ्हाटी** ॥
हा अर्थ जीवाचे गांठिं । बांधितां भला ॥ ९१ ॥
गुह्य कवटें फोडितां । मद्गला ( मगज ) जोडे आइता ॥
तेवि संस्कृता– । गर्भु **सुदेशी** हें ॥ ९२ ॥
नातरी इक्षुची शर्करा । स्वादूचि वाहेर भीतरां ॥
तेविं परावाचेचा गाभारा । सुदेशीमाजी ॥ ९३ ॥
जैसा कां कर्पुर कर्दलीचा । त्यासि नाहीं गर्भ त्वचा ॥
तैशी **महाराष्ट्रवाचा** । अर्थविषयीं ॥ ९४ ॥
वापी कूप देववाणी । मध्यें सखोल अर्थ पाणी ॥
तें **सुदेशी** सेंदणीं भरूनि । आहाच कीजे ॥ ९५ ॥
**याहीमध्यें कारण । अर्थ सगर्भ प्रमाण ॥**
**तेंचि देशभाषावांचून । येर कावाडकष्ट** ॥ ९६ ॥
**हे आहाच आरुति बोली । जरि शुद्ध बोधें आथिली ॥**
**तरिच संस्कृताची काढिली । पवित्र होइल** ॥ ९७ ॥
हे पल्लवचिंतामणि । मोक्षु गिंवसला आंगणीं ॥
बापु रे ! हे **पवित्रवाणी** । ऐसीच आहे ॥ १०४ ॥
शुद्ध स्वरूपीं निर्दोष । तें हे **सुदेशी** सुरस ॥
पूर्ण ब्रह्म उदास । करूनि दावि ॥ १०५ ॥
हे ब्रह्मरसाची पव्हे । **नटनाचु होय जिव्हे** ॥
**यास्तव हलुवें नव्हे** । बोलणें माझें ॥ १०६ ॥
कर्म केधवां न सांडावें । समूल फल त्यजावें ॥
अभिमानें न पडावें । कर्तव्याचे ॥ १०७ ॥
कुटुंबें देहींची ते कडी । देहीं करिती तडातोडी ॥
**तो दुष्ट घे आवडीं । महामोह** ॥ ७२ ॥
यास्तव जो अंतर त्यागु । या नांव राजयोगु ॥
येणें बाहेरील संयोगु । मोक्षरूप ॥ ७३ ॥

७५. यापुढें त्र्यंबकस्वामी महाराष्ट्रांतील किंवा भरतखंडांतील नाना पंथ व भेदमतें वर्णन करितांना म्हणतात :— पाशुपत शिवालाच मानितात, षडक्षर मंत्र जपतात, लिंग धारण करितात व आपण तरलों म्हणतात. तसेच चार्वाक, देहच कारण म्हणून त्याची पूजा करितात. दुसरे, मूलप्रकृति—जडद्रव्य-हेंच नित्य स्वयंसिद्ध तत्त्व मानून आत्मा हा तत्संयोगाचा परिणाम मानितात. जे शून्यवादी व इतर 'जेथें भोंक तेथें ढांक' म्हणतात, तेही अज्ञानीच. जैन, जीवदयापालनव्रती म्हणवून केशांचें लुंचन करून आपलेंच व्रत असंख्य वेळां मोडितात. याचप्रमाणें कापालिक, शरीर कर्मानेंच बली समजून भक्ष्याभक्ष्य दुफळी मानीत नाहींत. कानफाटे, जातिभेद न मानून आचांडाल सर्वत्र भिक्षा घेतात, प्रणवासहित स्वासाक्षर प्रमाण मानितात. आदिनाथ, आदि-माया, तमालवर हें त्यांचें गुह्य, आदि अनिल ( वायु ) तो त्यांचा कार्यकर्ता पुरुष. हे सोहंबीजासह साही गुह्यें मानितात, परंतु पुनर्जन्म न मानून प्राप्त देहाचेंच हव्या त्या प्रकारानें रक्षण करण्यास झटतात. यापुढें करामती—हठयोगी—सांगून कर्मिष्ठांचे शैव, शांभव, स्मार्त आणि वैष्णव असे चतुर्विध भेद सांगतात. वाचेला, कानाला, दृष्टीला विष्णूची गोष्ट शैवांस आवडत नाहीं ! मेलियांही वैष्णव शिव म्हणत नाहींत ! तसेच शक्तीचे भक्त शक्तीवांचून इतर कांहीं जाणीत नाहींत ! स्मार्त मात्र सर्वांचे भक्तींत सादर असून अभेदवादी असल्यानें त्यांनीं इतर सर्वांस हारविलें आहे. हा अभेदधर्म त्र्यंबकस्वामींनीं कसा वर्णिला आहे तो त्यांच्याच शब्दांनीं देणें बरें म्हणून खालीं फिरून ओव्या देतों.

वेद सर्वांसि उत्तमु । परी जे आचार, वर्ण, धर्मु ॥
तयांसि निर्धारें सीमु । वेदाशेची ॥
कर्मपंथु वर्णाचारु । जंबुद्वीपीं साचारु ॥

यासि प्रमाण विचारु । हा असे ॥
काश्मीरापासोनि कां वरु । मध्यें पहाड हिमधरु ॥
तेथूनि गंगा सागरु । जगन्नाथु ॥
त्यापासोनि श्वेतबंध । तेथुनि हरिग्राम प्रसिद्ध ॥
द्वारकेपासुनि सिंधु– । संगमवरी ॥
सिंधुसंगमापासुनि । पुन्हां काश्मीरभुवनीं ॥
हे कर्मभूमि कारण । सृष्टिमध्यें ॥
यांमध्यें चौवर्णाचें आचरण । हा वर्णपंथ कर्मभुवन ॥
वेदशास्त्र पुराण । याचमध्यें ॥
**आणिक कृष्णमृग जेथवरी । कर्मभूमि तेथवरी ।**
**हे मर्यादा कर्माचारीं । नेमिली असे ॥**

असें सांगून सर्व वर्णाश्रमकर्में यथास्थित निरूपिल्यावर ब्रह्म-सापेक्ष हीं सर्व असत्य म्हणून त्यांचा निरास करून जीवब्रह्मैक्य स्थापून झाल्यावर शिष्यानें शंका काढिली कीं, कर्माकर्म, धर्मा-धर्म, सजातविजात, सुवृत्तदुर्वृत्त हीं सर्व एका देवांतच आहेत आणि विचारांनीं सर्वजण मुक्तच आहेत; तेव्हां हा सर्व एकंकार अथवा वर्णसंकरच नव्हे काय ? आणि वर्णसंकराची तर आपण निंदा केली आहे. तेव्हां हें कसें काय ? ही शंका येतांच श्रीगुरु त्र्यंबकस्वामी विस्मित झाले आणि म्हणाले :– याचें हें ज्ञान घातक आहे. याचे शब्द केवळ कालकूट विष होय जेथून हें उत्तर निघालें तो कंठ दुष्टवृत्तीचें भांडार, ती रसना स्वधर्मावर खड्गधारच होय. शिष्या ! मिष्टान्नें विषें व्यापिलीं, कीं कस्तूरी लसुणें लेपिली, तसें हें तुझें बोलणें–शंका घेणें– आहे. तुज आम्हीं ब्रह्मपक्षा आणिलें खरें; परंतु हे–वर्ण-संकराची किंवा एकंकाराची–समक्षा कोठेंच प्रतिपादिली नाहीं. तर उलट जागोजाग ब्राह्मणादि चारी मुख्य व पोटजाति ह्यांनीं

आपापले श्रुतिस्मृत्युक्त सर्व क्रियाकलाप, यज्ञयागादिकांतील पशुहिंसेसही दोषार्ह न मानतां चालवावें, असेंच तुला निक्षून सांगितलें आहें. तरी आतां फिरून सांगतों ऐक :—

जें या कर्मातें टाळावें । वर्णाश्रम बाळावे ।
नाहीं बोलिलों गाळावें । स्वधर्मातें ॥ ३६ ॥
सर्वात्मा सच्चिदानंदु । सर्वथा दाविला अभेदु ॥
परि या धर्मांचा संबंधु । तोडिला नाहीं ।। ३७ ।।
तुं अकस्मात् एकसरिसें । घेऊनी उठिलासी कैसें ।
पशु विचरति तैसें । विचरावें म्हणोनि ॥ ३८ ॥
तरि गा सृष्टिकर्ता प्रजापति । प्रजा रचुनि क्षिति ।।
विश्व। घातलि सुति । वर्णाधर्माची ।। ३९ ।।
कर्मे रचिलीं आधीं । पाठीं प्रजांचि वृद्धि ॥
हें पूर्वि केली अवधि । विश्वजनकें ॥ ४० ।।
श्रौतें स्मार्तें नित्यें नैमित्यें । कर्में प्रसिद्धें विहितें ॥
विधि निषेध अनंतें । तैंचि नेमिले ॥ ४१ ॥
हे प्रभूची आज्ञा । पूर्वीचि केलि संज्ञा ॥
ते करितोसी अवज्ञा । तो तूंचि भला ! ! ॥ ४२ ॥
तुझें बोलें साचारू । तैं लोकीं वर्णसंकरू ॥
होये ते हा सुखें विचारु । गांठि बांध ॥ ४३ ॥
**या बहिर्मुद्रा उत्तरीं । तूंचि पडसि बाहेरिं ॥**
**परि हें विश्व साचारिं । चले ना ढले ॥ ४४ ॥**
**जो स्वजात्ति वालि (टाकी)। अन्यजाति कवलि (घेई)॥**
**तो प्राणि कोण्हे काळीं । पवित्र नव्हे ॥ ४५ ॥**
**ऐसा प्राणि अचोखढु । त्याचा होय घटस्फोडु ॥**
**त्या पतिताचा विढु । उभय लोकीं ॥ ४६ ॥**
आचार, व्यवहार प्रायश्चित । याचि कारणें चालत ॥

**यास्तव स्वधर्मरहित । होऊं नये ॥ ४७ ॥**
**मनुभानुब्रह्मादिक । हे देखती ब्रह्मचि सकलैक ॥**
**केधवांही कर्मनिंदक । नव्हतीच ते ॥ ४८ ॥**
ते ब्रह्मस्थिति वर्तती । **दाट्ठनि कर्में अनुष्ठिति ॥**
कां जे लोकप्रवृत्ति । राखितां भली ॥ ४९ ॥
जो अतिशयें ब्रह्मद्रष्टा । त्यासि विशेष कर्मप्रतिष्ठा ॥
कां जें बोलिला स्रष्टा । तें चुकों नये ॥ ५० ॥
यास्तव द्विजवर्ण । ते षट्कर्मीं प्रवीण ॥
येहिं न सांडावें आसन । स्वधर्माचें ॥ ५१ ॥
शुचि वस्त्र संध्यास्नान । यज्ञोपवीत पौंड्रधारण ॥
भक्तिनेम अनुष्ठान । हा शृंगारु तया ॥ ५२ ॥
कंठाभरणें वेदश्रुति । दाटल्या येति स्मृति ॥
पदें व्याख्यानें विपत्ति । **कलसु क्रिया** ॥ ५३ ॥
असो येरा उपजाति । जे जे धर्म आहेति ॥
तेणेंच त्यांसि गति । नेमस्त असे ॥ ५४ ॥
तीर्थ, व्रत, दया, दान, भक्ति । हे ग्राह्य सर्व ज्ञाति ॥
वरि असिजे ब्रह्मस्थिति । हा विशेष गुण ॥ ५५ ॥
तूं येथें तुझा कोण विचारु । करूं पाहसी वर्णसंकरू ॥
हा अंत्यजाचा आचारू । घेवों नये ॥ ५६ ॥

**वरील उताऱ्यावरून सोवळें, तीर्थें, व्रतें, स्नानसंध्या व** 'देवता **प्रतिमा** । सुखें पुजाव्या उत्तमा ॥ पूर्ण देखोनि परमात्मा, जावें सर्वां ॥ याग, कर्मे, व्रतें, दानें । तपें, अनुष्ठानें, उपोषणें॥ आत्मबुद्धि आचरणें । सर्वत्र देहीं ॥' **यावरून आजचा शुद्ध स्मार्तधर्म ब्रह्मनिष्ठानेंही सर्व पाळिलाच पाहिजे, असें त्र्यंबकस्वामी लिहून सांगतात. आणि नंतर सर्व जातींचा संसर्ग करणाऱ्या कापालिकांचें** ' तया नाहीं सुष्ट

दुष्ट। पुण्य, पाप, भ्रष्ट॥ उत्तम, मध्यम, कनिष्ठ। ते जाणती-चिना ॥' **असें वर्णन करून त्र्यंबकस्वामी म्हणतात** :— 'तेंही आणुनि नाना रसु। हाचि करावा उपदेशु। जना दावावा विश्वासु। येचि ठाई॥ तैसेंचि मद्यपानि अंत्यज। ज्ञातिहीन भ्रष्ट सहज॥ त्यांसि कांहीं निर्बिज। ज्ञान उठे॥ **ते वाचेचेनि वळें। युक्तिसिद्धांताचेनि मेळें॥ स्वाचारवंतासि खळें॥ मांडुनि ठाति॥ अनृत्यें असत्यें प्रमाणें**। तैसीं आणिती **अनुमानें** ॥ जातिसंकराचें नाणें। आंगिं जडिती। तैसेच वर्ण-भ्रष्टयुक्त। बाह्यशास्त्रीं होती सक्त॥ आणि म्हणविती मुक्त। नाडिती येरां॥ तरी **मातृ, भगिनी, दुहिता**। मित्र, बंधु, पुत्र, पिता॥ आहार, वेव्हार चित्ता। स्मरूं नसे॥ इत्यादि यांचें सर्वज्ञान। आणि आचरिती आन आन॥' **म्हणून तूं ह्या वर्ण-संकर माजविणाऱ्या स्वदेशी कापालिक, जैन, लिंगाइत इत्यादि त्याचप्रमाणें मूळपासूनच** वर्णजातिभेद ज्यांच्यांत **नाहीं असे मुसलमान, खिस्ती, पूर्तकाल इत्यादि विदेशीय विधर्मी दुर्बुधांचें वचन आयकोंच नको** ॥ शिष्यास आपला एकट्याचाच भरवंसा नसेल तर—

'जी जी संतहो तुम्ही साक्ष। हे विश्वब्रह्म अपरोक्ष॥ तरि पतन कां मोक्ष। कोण देखे॥ तेथेंही निःकामबुद्धि। **कर्मे करावि आधि**॥ ऐसा जो तो तुम्हांमधि। शोभा पावे॥ कदाचित् माझें वचन। हा मानील अप्रमाण॥ तुमचें बोलें निक्षेपणें। दृढ होईल॥'

७६. याप्रमाणें सर्व मागील व वर्तमान संतांचें वचनप्रमाण मानून त्या योगें त्रिंबकस्वामी शिष्याची शंकानिवृत्ति करवून शेवटीं सांगतात कीं, 'पुढति विकल्प न धरतां स्वाचारिंच रहा' अशी मी तुला **श्रीसिद्धेशाची** आज्ञा म्हणून सांगतों.

७७. वरील त्र्यंबकस्वामी हे बालबोध ग्रंथाच्या शेवटीं आपला सांप्रदाय व थोडेंसें चरित्र सांगतात तें असें :—आपला पिता कृष्णदेवाचा पुत्र, भैरव नामें होय. आपण यजुर्वेदी माध्यंजनी शाखेचे ब्राह्मण. भैरव हा राजयोगी ब्रह्मनिष्ठ, लोकसंग्रहार्थ कर्मनिष्ठ, देवधर्मी सभाग्य, संपन्न आणि श्रेष्ठ असे. त्यानें वंशवृद्धीस्तव पुत्रेच्छेनें तुळजापुरीं अनुष्ठानानें सर्वेश्वरी प्रसन्न केली. तिनें रात्रीं साक्षात्कार देऊन आपल्या या भक्तोत्तमास एकएक याप्रमाणें तीन फळें देऊन प्रत्येक वेळीं "ह्या फळानें तुला उत्तम पुत्र प्राप्त होईल" असें सांगितलें. मधल्या फळाच्या वेळीं "हें फळ शुद्धांशु । याचा मानि तूं विश्वासु । शोभा पावेल वंशु । येणें फलें ॥ पुत्र जालया केवळ । करिं देखशि त्रिशूल । तें ज्ञानगर्भ महाफल । माझें वरद ।" असें सांगून देवी अंतर्धान पावली. पुढें नृसिंह, त्रिंबक आणि कौंडण्य असे तीन पुत्र भैरवास झाले. देवीच्या वराप्रमाणें त्रिंबकाच्या हातावर त्रिशूळ स्पष्ट होता 'असो कोणाचा अवतारु । आम्हां न कळे निर्धारु ॥ म्हणोनि करि नमस्कारु । ते काळीं पिता ॥' याप्रमाणें भैरवाची भावना असल्यानें त्रिंबकास तो 'न बोले दुरुत्तर, न सांगे धुळाक्षर, मग विद्या कैंची?' योग्य कालीं व्रतबंध मात्र झाला. पुढें भारद्वाज गोत्रजाता अंबावती नांवाची त्रिंबकाची आई आपल्या पतीस मुलांचीं लग्नें करण्याविषयीं आग्रह करूं लागली. तेव्हां भैरव म्हणाला :– माझे पुत्र योगी जन्मले आहेत, प्रत्यक्ष देवीची तशी मला सांगी आहे. तेव्हां यांचें लग्न करून काय उपयोग? यथाकालीं भैरव कैलासवासी झाल्यावर मुलांनीं आपलीं आपण लग्नें केलीं. तरी पितृवंचना घडल्याबद्दल त्या तिघांसही फार दुःख झालें. त्यांत ज्येष्ठ नृसिंह हा विशेष जाणता होता. त्याचाच प्रथम त्रिंबकास उपदेश मिळाला.

तरी अनेक ज्ञानी, गुरू म्हणविणारांच्या वेळोवेळीं झालेल्या संगतीनें व उपदेशानें 'मी जालों देहाभिमानी' असें त्रिंबकस्वामी म्हणतात. यानंतर कमलाकर म्हणून एक ज्ञानी पुरुष भेटला. त्यानें व नृसिहानें फिरून त्रिंबकास अनेक रीतींनीं उपदेश केला. त्यांच्या आज्ञेप्रमाणें त्रिंबक उत्तम कर्मनिष्ठतेनें वागत असे. तरी त्याच्या मनाची तळमळ जाईना. तेव्हां शेवटीं 'ये युगीं साक्षात। फलद चंडी दैवत ॥' असें मानून तो तुळजापुरास जाऊन सोळा दिवस तपोनुष्ठान करीत राहिला. सोळाव्या रात्रीं पांच वर्षांच्या कुमारीच्या रूपानें देवीनें त्रिंबकास दर्शन देऊन 'तुझें फल आहे सप्तशृंगीं। लाहसी तेथें ॥' असें सांगितलें. त्रिंबक सप्तशृंगीं गेला. तेथें तीन दिवस 'नेमस्थ टालें धरूनियां ध्यान' असतां 'तृतीये रात्रीं' अंबा प्रसन्न झाली. त्या अंबेनें वरद होऊन त्रिंबकाची व प्रत्यक्ष श्री सिद्धेश शंकरांची गांठ घालून दिली. मग श्री शंकरांनीं ह्या त्रिंबकाचे सर्व संशय छेदून त्याला ब्रह्मसाक्षात्कार दिला. शेवटीं 'चिदांबिका बोले। म्हणे तुज ज्ञान जालें। तें तूं विस्तारिं आपुलें। ये क्षितिमंडळीं ॥ अकर्मी वर्णसंकरु। रचिती बोलाचे उठंगरु। तेथें लटिकेचि हरिहरू। साक्षी आणिती ॥ अकर्म बोलतांही पाहीं। ब्रह्मीं निर्धारु समूल नाहीं। ते काबाड पानरटेंकही। उलथून येती ॥ यास्तव पंचाननें। जें बोलिलें स्ववदनें। तेणें सबीज गहनें। पदें बोले ॥ **कृष्णोत्तर रेवादक्षिण। मध्य देशाचे प्रमाण। यामध्यें वाढेल महिमान। बालबोधाचें ॥'**

७८. याप्रमाणें वर देऊन देवी गुप्त झाली.हा बालबोधग्रंथ गतकलि ४६७९ शालिवाहन शके १५०० बहुधान्य संवत्सरे चैत्र शुद्ध प्रतिपदेस त्र्यंबकस्वामींनीं संपविला. याचा प्रारंभ त्यांनीं गतकलि ४६७३ शालिवाहन शके १४९४ अंगिरा संवत्सरीं

फाल्गुन शुद्ध पंचमीस केला होता. आरंभीं एकदां हा ग्रंथ संपूर्ण लिहून झाला होता. परंतु ' ऐसा तो ग्रंथ सिद्ध जाला । तो कोण्ही एक संन्यासि प्रतिसंचरला । तेणें तस्करेहेतु तो नेला । बालबोधु ॥ ' असें त्रिबकस्वामी सांगतात. याप्रमाणें पंधराव्या शतकांतींच्या ह्या एका महा साधुकवीचें अल्प चरित्र सादर केलें आहे.

७९. महाराष्ट्रसंतांनीं ह्या गेल्या तीनशें वर्षांत ब्राह्मणांचें निवृत्त-मांसत्व व तन्मूलक ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य ह्या इतर वेदाधिकारी द्विजांची व त्यांची ताडातोड ही एक पूर्वस्थितींत झालेली क्रांति व संस्कृतापासून प्राकृत व प्राकृतापासून मराठी ही दुसरी भाषाक्रांति ह्या दोन क्रांत्यांनीं श्रौतस्मार्त आचारप्रधान वर्णाश्रमधर्मास आलेली ग्लानी घालवून पूर्वोक्त वर्णाश्रम-धर्माचारांची, मराठी-देशी-भाषेंत स्वजनांस ओळख करून देऊन पुनःस्थापना केली आणि तीही चातुर्वर्ण्यबाह्यांचें राजकीय वर्चस्व असतांना, असें जें ह्या लेखकानें प्रथमपासून प्रतिपादिलें आहे त्याला विक्रमबत्तिशी व बालबोध ह्या दोन शके १५०० तील महासाधु ग्रंथकारांच्या वचनांनीं किती पाठिंबा मिळतो, ह्याचा वाचकांनींच विचार करावा. असो; शेवटीं बालबोधकार श्री त्र्यंबकस्वामींच्या खालील ओव्यांनीं हा लेखक वाचकांची आज्ञा घेत आहे.

अगा आमुचा वृद्धाचारु । ग्रंथा आदिअंतीं मनोहरु ॥
तुमतें न करितां नमस्कारु । पतन असो ॥
यास्तव तुमची स्तुति । आम्हीं करूं काकुलती ॥
तुम्ही स्वभावें सभापति । पूज्य आम्हा ॥
**माझे स्तुतीचेनि पाडें** । न पडावें भिडे ॥
शुद्धाशुद्ध तेव्हढें । निवडावें जी ॥

(परी) धन्य धन्य हे मऱ्हाठी । ब्रह्मविद्येची कसवटी ॥
हा द्वारशिलेचे पोटीं । परिसु जोडिला ॥
यास्तव भलतेही प्रश्निकें । येथें मन घालावें निकें ॥
गहिंवर न कळतां ग्रंथ भूमिके । वासिंपो नये ॥

# परिशिष्ट

## महाराष्ट्रप्रभात[1]

**महाराष्ट्रमहोदयाचा पूर्वरंग** प्रसिद्ध झाल्यास एक तपाहून अधिक काळ लोटला. पूर्वरंगास तें नांव योजिलें गेलें त्याच वेळीं पूर्वरंगापुढें लगेच **महाराष्ट्र-प्रभात** नांवाचें प्रकरण लिहावयाचें आणि मग **महाराष्ट्रमहोदय** रंगवावयाचा असा ' महाराष्ट्रमहोदयाचा पूर्वरंग ' लिहिणाराचा संकल्प होता. परंतु केवळ पूर्वरंग रेखाटण्यापलीकडे त्या वेळीं कांहीं करितां आलें नाहीं. कारण एकच **' उत्पद्यन्ते विलीयन्ते दरिद्राणां मनोरथाः । '**

तथापि आतां असें वाटतें कीं एक प्रकारें झालें तेंच बरें झालें. म्हणजे, महाराष्ट्रप्रभात बारा वर्षांपूर्वी लिहून प्रकाशित करितां आला नाहीं हें त्याच्या बऱ्यासाठींच झालें असें आतां निक्षून म्हणतां येत आहे. कारण महाराष्ट्राचा इतिहास हें केवळ नुकत्याच फुलूं लागणाऱ्या ज्ञानवल्लीचें पुष्प आहे; नव्हे ज्ञानवल्लीच्या पुष्पाचेंही पूर्वरूप अशी अत्यंत मुग्ध कळी आहे. बारासोळा वर्षांपूर्वी तर हें त्याचें कळीपणही पर्णांच्या देंठाआड लपलेल्या मोहोराच्या मुक्या गांठीप्रमाणेंच होतें. आजही पूर्ण विकसित फुलाचें गौरव त्या कळीला लाभलेलें नाहीं; तरी तिच्या पाकळ्यांची संख्या मोजतां येण्याच्या स्थितींत ती खचित आलेली आहे. महाराष्ट्रमहोदयाचा पूर्वरंग, आज फिरून छापणें झाल्यास त्याच्या स्वरूपांत विशेषसा फरक करावा न लागतांच, छापवितां येईल हें जरी खरें आहे, तरी त्याचा आकार निःसंशय वाढेल. महाराष्ट्रप्रभात जर बारा वर्षांपूर्वीच रंगविला जाता तर आज तो अगदींच निस्तेज आणि टाकाऊच भासला असता. कारण, गेल्या बारापंधरा वर्षांत महाराष्ट्राच्या इतिहासाचीं साधनें इतकीं झपाट्यानें उपलब्ध होत चाललीं आहेत कीं त्यांचें आतां

१. अरविंद वर्ष २ रें अंक ५ वा पा. २२५-२३५

विषयवारीनें, वर्षवारीनें इत्यादि प्रकारानीं वर्गीकरण न झालें तर तीं उत्तरोत्तर अनावर गळाठ्याच्या ढिगासारखीं पहाणाऱ्याच्या मनाला केवळ उद्वेग उत्पन्न करण्यासच कारण होतील. सुप्रसिद्ध इतिहाससंशोधक रा. रा. विश्वनाथपंत राजवाडे, वासुदेवशास्त्री खरे आणि पुण्याचें व धुळ्याचें भारतेतिहाससंशोधक मंडळ इत्यादिकांच्या अखंड चालणाऱ्या भगीरथ प्रयत्नांनीं भारतमहाराष्ट्रेतिहाससाधनांत खरोखरच अत्यंत आदरणीय, उपयुक्त आणि विविध प्रकारची भर झाली आहे, होत आहे आणि होत राहणारही. अशा अनुकूल परिस्थितींत महाराष्ट्रप्रभात चांगलाच चित्रितां येईल असें अनुमान सहज कोणीही करील. मात्र त्या सर्वतोपरी अनुकूल परिस्थितीचा पूर्ण लाभ करून घेण्याचें सामर्थ्य ह्या लेखकांत यथातथाच आहे हें येथें सुचवून ठेवणें अवश्य आहे.

'महाराष्ट्रमहोदयाच्या पूर्वरंगा'ची व्याप्ति शकाब्द १२०० ते शकाब्द १५०० पर्यंत धरण्यांत आली. त्यामुळें एकनाथ, मालोजी, दासोपंत, तुकाराम इत्यादि महाराष्ट्रीय पुरुषांचे केवळ नामनिर्देश आणि त्रोटक उल्लेखच त्यांत आले आहेत. तेव्हां 'पूर्वरंग' आणि 'प्रभात' यांचा सांधा नीट जुळण्यास्तव प्रभातारंभीं एकनाथजयंतीचाच ऊहापोह करण्यांत येईल. अर्थात् शकशतक पंधराव्याच्या उत्तरार्धाच्या इतिहासाचा समावेश पुनरुक्तिदोष टाळून 'महाराष्ट्रप्रभातां'त करण्यांत येईल. 'प्रभाता'ची उत्तरसीमा तुकाराममहाराजांच्या प्रयाणोत्तरांत आणि चाफळास श्रीसमर्थ रामदासस्वामींनीं श्रीरामाचें देऊळ बांधून त्यांत श्रीराममूर्तीची स्थापना केली त्याचे वर्णनांत आंखली जावी असा संकल्प आहे.

'महाराष्ट्रमहोदयाच्या पूर्वरंगां'त ज्याप्रमाणें महाराष्ट्राच्या धार्मिक, सामाजिक, राजकीय व वाङ्मयविषयक अशा चतुरंग इतिहासाचा समावेश साम्यानें करण्यांत आला आहे तसाच क्रम 'प्रभातां'तही स्वीकारण्यांत येईल. तरी वाचकांनीं 'पूर्वरंग' जसा आवडीनें पदरांत पाडून घेतला तसाच हा 'प्रभात'ही ह्या लेखकाकडून ते 'अरविंद' द्वारा सत्वर करून घेतील अशी प्रार्थना आहे.

वस्तुस्थिती अशी होती कीं महंमदानें पश्चिम आशियांतील लोकांस धर्म दिला. तो अर्थात् ईश्वरी योजनेनेंच आणि त्यांच्या उत्कर्षाकरितांच त्यांस

दिला गेला हें जितकें खरें तितकेंच मानवी बुद्धिदौर्बल्यानें स्वार्थानें लवकरच महंमदी धर्मानुयायांवर इतकी छाप बसविली कीं परमेश्वरी धर्मश्रद्धेहूनही सैतानी अरेरावीवरच ते अधिक प्रेम करूं लागले आणि आसुरी संपत्तीच्या लाभासाठीं आसुरी उपायांचीच योजना, त्यांजकडून राज्यें आक्रमण करण्यांत, अन्यधर्मी लोकांना शस्त्राच्या भीतीनें बाटविण्यांत, त्याच परक्या देशाच्या व धर्माच्या प्रजेला आपल्या राज्यकरभाराच्या यंत्राखालीं हवें तसें चिरडण्यांत, होऊं लागली. ह्या सैतानी शक्तीपुढें दीनवत्सल सात्त्विक वृत्तीचे हिंदु देवांस कांहीं काळ अगदीं हतप्रभ होऊन रहावें लागलें. अशा स्थितींत आपल्या दीन-वत्सलतेचा कांहीं उपयोग होत नाहीं म्हणून त्यांस लाज वाटावी हें स्वाभा-विकच होय.

श्री

ॐकारोच्चारमांगल्य- । पूर्वकप्रभुवंदनें ॥
**महाराष्ट्रप्रभाताख्य** । प्रबंधोपक्रमा करी ॥ १ ॥
स्वराष्ट्रविघ्न वाराया । विघ्नेश्वर गणाधिप ॥
समर्थशिव सद्भक्त । तत्पदांबुज वंदितों ॥ २ ॥
वीणावाणी बुधां जीची । दे सुधाधिक माधुरी ॥
शारदा स्वप्रसादें ती । देऊं माधुर्य मद्वचां ॥ ३ ॥
म्हणूनी वंदितों प्रेमें । भक्तीनें परमादरें ॥
स्वभक्तचरितें माय । वदवो लेंकरामुखें ॥ ४ ॥
वंदी श्रीनाथ मुक्तेश । साधु पूर्वकवीश्वर ॥
श्रीसमर्थतुकाराम । यद्वाणी लोकतारिणी ॥ ५ ॥
महरथाग्रणी साधु । स्वराष्ट्रोद्धारसाधक ॥
नाथ दास तुकाराम । शिवरामस्वरूप ते ॥ ६ ॥
मीन मी न ते पयोधीच । हंस मी ते हि मानस ॥
दास मी देव ते स्वामी । जीव मी ब्रह्म नित्य ते ॥ ७ ॥
राष्ट्रभूप्रिय पुत्रांचीं । चारित्र्यें चित्र पावन ॥
यथाश्रुत यथाभूत । आप्तवाक्याश्रयें लिही ॥ ८ ॥

पिता माता गुरुस्वामी । आणि वाचकबांधव ॥
नमूनि लागतों कामा । सर्वांचा नम्र सेवक ॥ ९ ॥

**महाराष्ट्र जें, सर्व राष्ट्रांसि राजे। जयाच्या भयें व्यापिले देव लाजे॥**
**सदाचारभंगें पळाली प्रतिष्ठा। प्रतिष्ठान त्या नाभिकारीत निष्ठा॥१॥**

— मुक्तेश्वरकृत संक्षेपरामायण

वरील श्लोकांत महाराष्ट्राची सोळाव्या शतकारंभीं काय स्थिति होती तिचें थोडक्यांत, उत्तम आणि यथास्थित वर्णन आलेलें आहे. वरील श्लोकाचा पद-पदार्थ पुढीलप्रमाणें : जें सर्व राष्ट्रांसि राजे, जयाच्या भयें देव लाजे व्यापिले, ( जयाच्या ) सदाचारभंगें ( जयाची ) प्रतिष्ठा पळाली, ( तें ) महाराष्ट्र; त्या प्रतिष्ठान निष्ठा नाभिकारीत. महाराष्ट्र हें ( मनुष्यांस जसा राजा तसें ) सर्व राष्ट्रांस शिरसा वंदनीय आहे. परंतु ज्या महाराष्ट्रावर ( सांप्रत ) अशीं कांहीं भयें संकटें ओढवलीं आहेत कीं तीं पाहून देवांनासुद्धां लाज वाटावी म्हणजे आपल्या हातून ह्या महाराष्ट्रावर असल्या आपत्ति वाटल्या जाऊं नयेत ह्या-सारखें आपल्या दयाशीलत्वाला दुसरें लाजिरवाणें तें काय ? ( मुक्तेश्वर म्हणतात तें कांहीं नाहीं. देव काय कुणाला फुकट तारणार आहेत थोडेच ! ) महाराष्ट्राची प्रतिष्ठा त्याच्या सदाचारभंगानें–म्हणजे महाराष्ट्रांतील लोकांचें सदाचरण-श्रुति-स्मृतिविहित आचरण भंगल्यामुळेंच त्याची प्रतिष्ठा-पळाली आहे. प्रतिष्ठा म्हणजे स्थैर्य, श्रेष्ठत्व, अधिकारप्राप्ति, शांति इत्यादि. स्थैर्य, श्रेष्ठता, अधिकार-प्राप्ति, शांति ह्या गोष्टी कोणत्याही राष्ट्रांत विदेशी, विधर्मी सत्तेबरोबर नांदणें कठीण आहे, किंबहुना अशक्य आहे. आणि महाराष्ट्रावर मुक्तेश्वराच्या कालीं शंभर वर्षांपूर्वींपासूनच रुजून दृढमूल आणि बहुशाखोपशाख अशा महंमदी--विधर्मीविदेशी–सत्तारूपी विषवृक्षाची छाया पडलेली होती. तीमुळें महा-राष्ट्रीयांच्या सामाजिक, धार्मिक आणि राजकीय चालीरीति आणि आचारविचार ह्यांमध्येंही पूर्वापार सुसंगतता सुटून कांहींच धरबंध उरूं न देण्यासारखी अनिष्ट व भयंकर क्रांति घडून आली होती. ह्या क्रांतीला उद्देशूनच ‘ जयाच्या सदाचार-भंगें ’ अशीं पदें मुक्तेश्वरानें योजिलीं आहेत. आणि तशा विसंगत व धरबंधरहित आचरणानें महाराष्ट्राची म्हणजे महाराष्ट्रीय जनतेची प्रतिष्ठा पळून गेली होती. तथापि अशा स्थितींतही प्रतिष्ठानक्षेत्र-प्रतिष्ठानक्षेत्रवासी प्रमुखजन-

-त्या महाराष्ट्र जनतेस मोठ्या निष्ठेनें ' भिऊं नका ' असा धीर देत आहेत.

शिरोभागीं घेतलेल्या मुक्तेश्वरी संक्षेपरामायणांतर्गत श्लोकाचा सरळ पदपदार्थ वरीलप्रमाणें आहे. ह्या श्लोकार्थानुसंधानानें विचार करतां मुक्तेश्वराच्या महाराष्ट्रेतिहासपरिचयाची चांगलीच साक्ष पटते. इतकेंच नव्हे तर, स्वजन्मभू-विषयक अभिमानाचीही योग्य अटकळ बांधितां येते. जन्मभूविषयक सादराभिमानांत मुक्तेश्वर आजकालच्या कोणत्याही कवीस अथवा पुढाऱ्यास निःसंशय उदाहरणीयसाच वाटेल; किंबहुना त्याच्या राष्ट्रीय सदाचारविषयक उत्कट निष्ठेची कसोटी आपल्या वर्तनाशीं लावून पाहण्यानें मुक्तेश्वर सांप्रतच्या पुष्कळ मान्य पुढाऱ्यांस लज्जेनें खालींच पहावयास लावील असें विधान अतिशयोक्तीचें होणार नाहीं अशीच या लेखकाची भावना आहे. वरील श्लोकांतीं जो निष्ठा शब्द आहे त्याचे अर्थ स्थिरता, दृढ भक्ति, श्रद्धा, निश्चय, निश्चित ज्ञान, पूर्णता, सिद्धान्त असे आहेत. ह्यांपैकीं कोणत्याही एका अथवा सर्व अर्थानीं तें पद वरील श्लोकांत अत्यंतोचित असेंच आहे. ऐतिहासिक वस्तुस्थितीचा विचार केल्यास पुढील ठळकठळक गोष्टी वरील श्लोकाभिप्रायासंबंधीं लक्षांत वागविण्यासारख्या दिसतात. महाराष्ट्रमहोदयीन कालांत म्हणजे सतराव्या शतकापासूनच्या कालांत पुण्यपत्तन म्हणजे पुणें हें जसें महाराष्ट्राचें राजधानीचें नगर तसें महाराष्ट्राच्या प्राचीन वसाहतीच्या कालोत्तर भागापासून त्याच्यावर महंमदी सत्ता प्रस्थापित होण्याच्या कालापर्यंत म्हणजे चांगलीं हजार एक वर्षें प्रतिष्ठान म्हणजे पैठण हें महाराष्ट्राचें राजधानीचें नगर म्हणून प्रसिद्ध होतें. आणि त्या वस्तुस्थितीची जाणीवच प्रतिष्ठानपुराविषयीं मुक्तेश्वरमुखांतून वरील प्रतिष्ठानगौरवाचे उद्गार निघण्यास कारण झाली. ' इतिहास आणि ऐतिहासिक ' नांवाच्या धुळें येथें प्रसिद्ध झालेल्या मासिकांतून रा. रा. विश्वनाथपंत राजवाडे यांचा ' महाराष्ट्राचा वसाहतकालीन इतिहास ' हा निबंध जर वाचक चाळतील तर त्यांस एक गोष्ट– जी आजपर्यंत केवळ आनुमानिक म्हणूनच मानली जात होती ती– म्हणजे आर्य चातुर्वर्ण्य हें नर्मदोत्तरप्रांतीय ब्रह्मावर्त आणि आर्यावर्त ह्या भारतवर्षाच्या उत्तरार्धव्यापक भागांतून श्रुतिसौत्र कालानंतर सरसकट असें दक्षिणेंत उतरूं लागले; आणि दंडकारण्य हें दंडक देश शापदग्ध होऊन ओसाड होण्याच्या पूर्वी ज्याप्रमाणें आर्यचातुर्वर्ण्ययुक्त आणि भरभराटलेलें होतें त्या-प्रमाणें फिरून नव्यानें भरूं लागून आपल्या अरण्यत्वास मुकून महाराष्ट्रनामक

देशपणाला कसें चढलें हें नीट समजून येईल. हा विषय येथें अस्थानीं वाटण्याचा बराच संभव असल्यामुळें सोडून देणें भाग आहे. तथापि इतकें अवश्य सांगितलेलेंच असावें कीं वर्तमान संवत्शकपूर्व अनेक शतवर्षांपासून महाराष्ट्र आणि दक्षिणापथ हीं भारतीय आर्यसंस्कृतीच्या वाढत्या नांदणुकीचीं आणि उत्कर्षाचीं स्थिर पीठें होत चाललीं आहेत. उत्तरेकडून बौद्ध व जैन धर्मांच्या चलतीनें उत्पन्न केलेल्या सावळ्या गोंधळानें आणि अत्यंत अनिष्ट परिस्थितीनें गोंधळून गेलेले पुरातन स्वधर्माचाराभिमानी ब्राह्मणक्षत्रियवैश्य हे त्रैवर्णिक विंध्य आणि नर्मदा ओलांडून गोदावरी आणि कृष्णा ह्या दक्षिणेकडील महानद्यांच्या दोआबांत बुद्धिपुरस्सरच उतरले आणि त्यांनीं आपल्या सर्व पुरातन संस्था इकडे थाटल्या. त्यामुळें एकनाथ, मुक्तेश्वर ह्यांच्या काळीं म्हणजे शालिवाहन शकाच्या सोळाव्या शतकारंभीं महाराष्ट्र लोक, महाराष्ट्र धर्माचार, महाराष्ट्रांतील सामाजिक चालीरीति आणि महाराष्ट्रांत आर्य चातुर्वर्ण्यघटित राजसत्ता असण्यास आवश्यकतेचें स्वाभाविकत्व ह्यांस जणूं अनादिसिद्धत्वच प्राप्त झालेलें होतें. समान देश, समान धर्म, समान भाषा, सर्वांस सारख्या मान्य चालीरीति आणि शिष्टाचारव्याख्यांचें सामान्यत्व इतक्या गोष्टी जेथें एकत्र असतात तेथें एकराष्ट्रीयत्वाची भावना जागती असलीच पाहिजे. मग तिला देशाभिमान, धर्माभिमान किंवा अन्य कोणतेंही नांव प्राप्त झालेलें असो ! कोणत्याही समाजास संख्याबल आणि वरील सर्व साम्राज्यत्वें हीं लाभतांच बहुतकरून स्वराज्यही लाभतेंच लाभतें. तथापि कित्येक वेळां त्यांचें स्वराज्य आपल्या चतुःसीमेबाहेरील दशदिशांस उद्भवणाऱ्या राज्यधर्मक्रांतिकारक वावटळींना बळी पडून अचानक लय पावतें. अशा प्रसंगीं स्वतंत्र राष्ट्रीयत्वास–महाराष्ट्रीयत्वास - चढलेला समाजहीं कांहीं काल म्हणजे कित्येक पिढ्याही दिशाभूल होऊन कर्तव्यभ्रष्ट अतएव अवनत होतो. तीच स्थिति मुक्तेश्वरपूर्वकालीन महाराष्ट्राची झालेली होती. आणि तिला अनुलक्षूनच त्यानें 'सदाचारभंगें पळाली प्रतिष्ठा। प्रतिष्ठा न त्या नाभिकारोत निष्ठा ॥' असे उद्गार काढिले आहेत.

मुक्तेश्वरापूर्वी शिखरशिंगणापूर येथें महालिंगदास नांवाचे एक शिवभक्त साधू होऊन गेले. त्यांनीं शके १४८६ त म्हणजे एकनाथ महाराजांचें भागवतादि ग्रंथकर्तृत्व जगापुढें येण्याच्याही पूर्वी आपला **विक्रमवत्तिशी** नांवाचा ग्रंथ संपविला. तो आज उपलब्ध आहे. ह्यांनीं आपल्या ग्रंथांत म्लेंच्छ म्हणजे

विदेशी, विधर्मी असे जे भरतखंडभर पसरलेले मुसलमान राजे त्यांची सेवा करणाऱ्या ब्राह्मणांचा प्रसंगोपात्त जो निषेध केला आहे व ब्राह्मणांचा उत्तम धर्म कोणता ह्याविषयीं जीं वचनें गोविलीं आहेत तीं जातिभेदाचें व वर्णाश्रम-धर्माचें संतांस वा भक्तमंडळीस कांहींच महत्त्व नव्हतें, असें प्रतिपादणाऱ्यांनीं विशेष लक्षांत बाळगण्यासारखीं आहेत. साधुसंतांस जातिभेदाचें वावडें नव्हतें तर जातिभेदाच्या नांवावर परस्परद्वेष जो कोठेंकोठें स्वार्थैकदृष्टि व्यक्तींमध्ये पाहाण्यास सांपडतो त्याचें मात्र त्यांना अत्यंत वावडें होतें. सदाचारपुष्टीच्या दृष्टीनें साधुसंत हे जातिभेदांतील शुचिशुचितर आचारांची प्रशंसा करून अनाचारांची आणि दुराचारांची निंदा करीत असत. असें करितांना अनाचर-निंदेनें जात्यभिमानाशीं सुसंगति राखण्याकरितां ज्या जातीच्यांस विशिष्ट तऱ्हेच्या सदाचारानें वागलेंच पाहिजे अशांस त्यांच्या परंपराप्राप्त म्हणूनच पुष्कळांशीं अंगवळणी पडून स्वाभाविक बनलेल्या सदाचारांत दृढ करावें आणि दुराचारनिंदेनें समाजाच्या तळाशीं त्याचप्रमाणें कानाकोंपऱ्यांतून सांठून राहिलेली आणि कित्येक वेळां जातीच्या नांवाखालीं खपली जाणारी दुराचारांची घाण नाहींशी व्हावी म्हणून मांसाहार, सुरापान, अमंगल राहणी इत्यादि विविध दुराचारांची सरसकट निंदा करण्याचा साधुसंतांचा परिपाठ आहे. असें करि-तांना त्यांस पुष्कळ वेळां अर्थवादाची भाषा वापरण्याचा प्रसंग येतो; आणि त्या अर्थवादवाक्यांच्या उत्तानार्थग्रहणानेंच आज सद्वचनांची विनाकारण ओढाताण करण्यांत आलेली आढळते. अस्तु ! महालिंगदासांच्या यवनराजसेवामग्नांच्या निंदात्मक ओंव्यांत स्वदेश, स्वधर्म यांच्या कळकळीची जी ज्योत दिसते ती पाहून स्वदेशाभिमानादि कल्पना पश्चिमेकडूनच पूर्वेकडे आल्या असें म्हणणा-रांस, ' खरोखरच आपण पूर्वजनिंदेचें महत् पाप जोडिलें आणि स्वेतिहासाची अक्षम्य हेळसांड केली ' असें वाटून पश्चात्तापानें पोळण्यावांचून गत्यंतरच नाहीं. ग्रंथोपसंहारांत ' हा राजनीतीचा प्रास्ताविक ग्रंथ आपण केवळ बरवाबोलटा प्रसंग ओळखून श्रोत्यांनीं येथील कार्यार्थ योजावा म्हणून बुद्धिपुरस्सर लिहिला, ' असें जें महालिंगदासांनीं म्हटलें आहे तें एकनाथकालीन महाराष्ट्राच्या उदयो-न्मुखतेचेंच निदर्शक होय. निदान महालिंगदासांचा उद्देश तरी मराठ्यांनीं स्वतंत्र होण्याचा म्हणजे आपलें गत स्वराज्य मिळविण्याचा उपक्रम करावा असा स्पष्ट आहे.

महालिंगदास ' विक्रमबत्तिशीं 'त ब्राह्मणाचीं दहा लक्षणें बांधितो. त्यांपैकीं परधर्मी राजाचे सेवक बनून स्वजनावर अधिकार चालविणाऱ्या म्लेंच्छ ब्राह्मणाचें लक्षण असें :–

आणि म्लेंच्छ तो ऐसा । यौवनाची सेवा करी अहर्णिसा ॥
तेणें पडे फासां । खोटेपणाच्या ॥
इच्छा हुद्दा महिमा । विसरला षट्कर्मा ॥
बा बेटा बाप म्हणोनि साउमा । विनंति करी ॥
म्हणे ' मी किंकर तुमचा । काम सांगावें ' असें वाचा ॥
' लोभ दावी सरक्यांचा । म्हणे मी पैदास करीन' ॥
' मज सत्ता द्यावी खुनखारि । मी करीं पैदागिरी ॥
स्वामीस्वार्थी मी भारी '। मग हुद्दा दिधला ॥
येरु न्याय करी पापमूर्ति । परद्रव्यावरी आर्ति ॥
खोटेपण बहु चित्तीं । थोर राजा अर्जवितो देखा ॥
जनां पीडाकर भारी । पापपुण्य न विचारि ॥
सत्पात्रीं कदा न भजणें । तरी पाप करी चौगुणें ॥
ऐसा पापीष्ट तेणें । जन पीडिले ॥
तया षट् कर्मांचा विसर । कारकोनिं पडिभर ॥
गायत्रीमंत्राचा अधिकार । थोडा तयासी ॥
दग्धचि बोलणें तेणें । सखा सोइरा मंत्र नेणें ॥
लाचावरी तेणें । ठेविलें चित्त ॥
उरीं फुटोनि पुरण निघालें । तें स्वामीसि ठाउक झालें ॥
मग धरोनी बंदिखाना घातलें । चाबुकामुखें आक्रंदे ॥
' ग्यां केली हरामखोरी । आतां न मारावें सोडवेरी '॥
ऐसें बोलत श्रोत्रावीरी । विष्ठाचि केली ॥
ऐसा नष्टा खंड आला । तो घेउनी देशत्याग केला ॥
मागें नमूं लागला । भलतेपासी ॥
ऐसा तो ब्राह्मण । म्लेंच्छ होय चौगुण ॥
इहपरत्रा चुकला हा अवगुण । थोर तयाचा ॥

वरील ओंव्यांत महालिंगदासांनीं विधर्मी, विदेशी म्लेंच्छ राजाची सेवा करणाऱ्या स्वार्थी ब्राह्मण व्यक्तीचें चित्र कसें स्पष्ट रंगविलें आहे ! वरील वर्णनाचा आजच्या सरळ गद्य भाषेंत जर सारांश दिला किंवा वरील ओंव्यांवर मोकळें भाष्य केलें तर तें वाचकांस कंटाळवाणें न होतां विशेष रुचेल अशा समजुतीनें तसें करण्याचा प्रयत्न होत आहे.

एक स्वार्थांध ब्राह्मण आपला शास्त्रोक्त षट्कर्माधिकार बुद्धिपुरस्सर बाजूस सारून ब्राह्मण धर्मचारांचा शत्रु आणि गोमांसभक्षक अशा विधर्मी व विदेशी मुसलमान राजाकडे जातो आणि त्यास 'धनी, मायबाप' असें संबोधून विनंति करितो कीं 'मी आपला दासानुदास आहें. मला कांहीं कामकाज सांगावें. मला जर आपण 'सरकी' म्हणजे सजातीय सामान्य अधिकाऱ्यांवरील मुख्याधिकारित्व दिलें तर आपल्या खजिन्यांत चांगलीच भर पडेल असें मीं करीन. मला आपण सरदेशमुखीसारखा कांहीतरी हुद्दा द्यावा. मला खुनाची माफी असावी. कोणालाही प्रसंगीं फांसावर चढवितां यावें. असा अधिकार आपण जर मला द्याल तर पहा आपला हर बाबतीचा वसूल मी गणितश्रेढीनेंच नव्हे तर भूमितिश्रेढीनेंही वाढवून दाखवीन. मला धनीसाहेबांचें हित हाच काय तो स्वार्थ !'

अर्ज मंजूर होऊन हुद्दा मिळाला. अर्जदार निग्रहानुग्रहसमर्थ असा अधिकारी झाला. म्हणजे त्याच्या मागणीप्रमाणें त्याला 'सरकी' प्राप्त झाली. अर्थात् स्वारी आपला अधिकार गाजवावयास लागली हें कांहीं सांगावयास हवेंच असें नाहीं. त्या वेळच्या आणि आत्तांच्याही म्हणण्यास कांहीं अजून विशेषशी अडचण नाहींच. तेव्हां मिळालेल्या न्याय निवडण्याच्या आणि दंड किंवा अन्य शिक्षा ठोठावण्याच्या आपल्या अधिकाराचा वापर धुमधडाक्यानें स्वारीनें सुरू केला. अधिकार मिळविण्याचा हेतुच जर खऱ्याखोट्या मार्गानें स्वार्थ साधणें हाच, तर मग निघेल तिकडून व काढवेल तितका पैसा आपल्या अधिकारकक्षेत सांपडलेल्या प्रजाजनांकडून काढणें हाच छंद स्वारीस लागल्यास कांहीं नवल नाहीं. तो पापमूर्ति खोट्या तोहमती, खोटीं भांडणें उत्पन्न करून दोन्ही पक्षांकडून हवें तसें द्रव्यादि उकळून आपली तुंबडी भरूं लागला. मात्र आपल्या धन्यापुढें अगदीं आर्जवानें वागावयाचें, त्याला भुईपर्यंत वांकून सलाम करावयाचा, बोलतांना तोंडावर हातरुमाल धरून बेतानें बोलावयाचें.

एकंदरींत ह्या पुरुषासारखा विश्वासास पात्र, लीन, गरिबांचा कनवाळू, निःस्वार्थ, पापभीरु असा सेवक अन्य मिळणें दुर्घटच ह्याप्रकारची अगदीं खात्री पटावी धनीसाहेबांस. राजाचा करभार वसूल करतांना जनांना किती पीडावयाचें त्याला कांहीं मर्यादाच नसावयाची. पापपुण्याचा विचारही ह्या राजनिष्ठ अधिकाऱ्याच्या चित्तास कधीं शिवत नसावयाचा. कोणा सत्पात्रास कधीं कांहीं याजकडून अन्नवस्त्र, पैका ह्यांची प्राप्ति होईल तर शपथच ! आपल्या स्नानसंध्यादि नित्यानुष्ठेय कर्मषट्कापैकीं एकही यथाकाल अथवा सवडीप्रमाणें संपादण्याची आठवण सुद्धां ह्यास चुकून व्हावयाची मारामार. कारकुनींत मात्र नेहमीं चूर असावयाचें ह्यानें. सारांश, ह्या ब्राह्मणाजवळ ब्राह्मण्याचा अंश कांहीं उरला असेल किंवा नाहीं ह्याची शंकाच. गायत्रीचा अधिकार तर त्यानें निःसंशय कधींच गमावलेला असणार. बाबाचें बोलणें नेहमीं दग्ध म्हणजे तोंडास सदा आग लागलेली; शिव्यासंतापाशिवाय घोटभर पाणी सुद्धां पिणें त्याला गोड लागावयाचें नाहीं. त्याला भरल्या जगांत कोणी सखा नाहीं, सोयरा नाहीं, मैत्र नाहीं. ह्याचें सर्व लक्ष काय तें त्याच्यावर. तोच काय तो त्याचा सखा, सोयरा, मैत्र, आप्त, इष्ट !

सर्व खरें ! पण हें असें आंधळें राज्य ह्या स्वारीचें किती दिवस चालणार ? पापाचे घडे केव्हांतरी भरावयाचेच. खाखा खातच सुटणारास अजीर्ण होऊन करपट ढेंकरा ह्या आल्याच पाहिजेत. त्याला हागओकही अनुभवण्याचा प्रसंग हा ओढवणारच. त्याप्रमाणें हे ' सर ' ही उरीं फुटले आणि ह्यांचें पुरण बाहेर पडलें. धनीसाहेबांस ह्यांचें सर्व कृष्णकृत्य समजलें. अर्थात् हातापायांत शृंखला पडून ह्यांस कैदी करण्यांत आलें; आणि वर चाबकांचे असे कोरडे ओढण्यांत येऊं लागले कीं त्या चाबकाच्या आवाजापुढें ह्यांचें रडणें-आरडणें किंवा किंचाळ्या अगदींच फिक्या पडत म्हणूनच महालिंगदास ' चाबुकामुखें आक्रंदे ' अशीं पदें वापरतात. शेवटीं ' मी हरामखोरी केली खरी ' असा कबूल जबाब देऊन ' मला आतां मारूं नका ' अशी अत्यंत काकुळतीची विनवणी करण्याचा प्रसंग ह्या राजनिष्ठावर आला. सारांश काय ? जें कांहीं लोकांना नाडून मिळविलें होतें तें सर्व ह्याच्या अधिकारासुद्धां सरकार-जमा होऊन ह्यांस भरपूर शिक्षा भोगल्यावर आपलें काळें तोंड घेऊन परदेश पहावा लागला. तेथें शेवटीं स्वारीनें धर्मांतरही केलें. कारण तेवढाच एक उपाय

फिरून राज्यकर्त्या जातीची प्रीति संपादन करण्यास चटकन् उपयोगी पडण्या-सारखा वरीलसारख्या बहादूरास उरलेला असतो. ह्याप्रमाणें तो मूळचा ब्राह्मण असला तरी महालिंगदास म्हणतो ' म्लेंच्छ होय चौगुण '. कारण स्वभावतः म्हणजे जन्मानेंच जो परधर्मी असतो त्याच्यापेक्षां बाटून विधर्मी होणारा गृहस्थ आपल्या पूर्व सधर्मी लोकांचा अत्यंत द्वेष्टा अतएव मोठा तोटा करणारा असा छळक बनतो. हा अनुभव सर्व भरतखंडास आज हजारों वर्षे अधिकाधिक स्पष्टपणें येत आहे. असा कटु अनुभव पचविण्याची पाळी येणें हीच परतंत्रतेची सीमा होय; हीच ईश्वराच्या अवकृपेची पराकाष्ठा होय. अशा स्थितींतही आपण जगतों हेंच स्वदेश, स्वधर्म इत्यादींविषयीं स्वाभिमान असणाऱ्यास अत्यंत अनिष्ट असें आश्चर्य होतें. म्हणूनच महालिंगदास आपल्या ग्रंथाच्या शेवटीं :—

आचर्य ( आश्चर्य ) देश म्लेंच्छमहाराष्ट्रीं ।
चाहाळसमीप श्री-( गिरि ) जातीरीं ॥
वाडेग्राम पवित्र थोरी ।
तेथ हा ग्रंथ केला ॥

असें ५० व्या ओवींतील ' आश्चर्य ' हें पद वापरतात. ' म्लेंच्छ महाराष्ट्र ' म्हणजे ' म्लेंच्छांच्या धनीपणाखालीं वांकणारें महाराष्ट्र ' असा स्वदेशाविषयीं उल्लेख करावा लागणार ही कल्पनाच त्या महालिंगदासांसारख्या स्वराष्ट्राभिमानी महाराष्ट्रीयास अत्यंत उद्वेगजनक भासली. आश्चर्य म्हणजेच विस्मय आणि विस्मय म्हणजे कांहीं एक लोकविलक्षण—अनैसर्गिक, अस्वाभाविक—व्यापार किंवा पदार्थ पाहिला असतां विचारी, विवेकी पुरुषाच्या मनाची होणारी जी वृत्ति तेंच आश्चर्य किंवा विस्मय होय. आणखीही चारएक ओंव्या ह्या महालिंग-दासांच्या देऊन त्यांचा थोडासा मुक्तपणें उकल करून मग ह्या पंधराव्या शतका-न्तीच्या स्वराष्ट्रस्वातंत्र्यार्थ तळमळणाऱ्या ताठर ग्रंथकाराचा निरोप घेऊं.

साही शास्त्रींचे वक्ते । भट पिंगळे जे जाणते ॥
तर्कवेदान्तीचे वक्ते । बोलती तेथें ॥ २० ॥
आधी वेदान्ती बोलती । एकमेवा ( स्ति ) द्वितीये ( यं ) नास्ति म्हणती ॥
तर्क म्हणे भेद मतीं । प्रपंच असे ॥ २१ ॥

मग म्हणितलें चौवीजणीं । बुद्धीच ब्रह्मनिर्वाणीं
मी म्हणतसे कर्मावांचूनी । ब्रह्म न पाविजे ॥ २२ ॥

गोब्राह्मण अवघडीं । जो देखतां करी सांडी ।
तो अधर्म जोडी । मनुष्यजन्मासी ॥ २३ ॥

वरील ओंव्यांत वेदान्ती, नैयायिक, तार्किक इत्यादींच्या केवळ बुद्धिगम्य सिद्धांताचा गौरवानें उल्लेख करून त्या घटपटादि खटपटींच्या गहन जाळ्यांत पडण्याची कांहीं आपणांस आवश्यकता नाहीं; इतकेंच नव्हे तर त्या खटपटींत कांहीं आपणासारख्या सामान्य जनांस पोटापाण्याचा प्रश्न सोडविण्यास किंवा इहलोकयात्रा सात्त्विक सुखाची करण्यास उपयुक्त नाहींत. म्हणून महालिंगदास म्हणतात, 'मला जर कोणी ब्रह्म–निर्मळ सात्त्विक स्वातंत्र्यसौख्य–मिळविण्याचा उपाय कोणता ? असें विचारील तर मी असें उत्तर देतों कीं प्राप्त कर्माचारावांचूनी उपरि निर्दिष्ट ब्रह्मस्वातंत्र्याची प्राप्ति कोणास केव्हांही व्हायची नाहीं. आणि सांप्रतचें प्राप्त कर्म कोणतें म्हणाल तर गोब्राह्मणछलाचा प्रतिकार करून त्यांचा छल न होतां त्यांचें म्हणजे लक्षणेनें महाराष्ट्र चातुर्वर्ण्याचें संरक्षण जेणेंकरून होईल तें करणें. गोब्राह्मण संकटांत सांपडलेले आहेत, त्यांना सुखानें आपली जीवितयात्रा क्रमितां येत नाहीं, मुसल्मान लोक बळेंच हिंदूंस बाटवितात, साधुसंतांचा छळ करितात, देवालय आणि त्यांतील मूर्ति फोडतात व त्यांच्या जागीं आपल्या नमाज पढण्याकरितां मशीदी बांधतात, गाईंचा वध करून त्यांचें मांस खातात, उभीं शेतें कापून नेतात, लूटमार करितात. अशा प्रकारचा त्यांचा हैदोस चालला असतांना तिकडे कानाडोळा करून जो महाराष्ट्रीय वेदान्तांत मग्न होऊन कर्मसंन्यासाच्या काथ्याकुटींत काल क्रमीत असेल तो मनुष्य जन्मास येऊन केवळ अधर्मच जोडीत आहे असें मी म्हणेन.'

निज कीर्तीनें अमर होऊन राहिलेल्या लोकमान्य टिळकांनीं गीताभाष्य नवें करून कर्मप्राधान्य सिद्ध करण्याचा खटाटोप केला. तेंच काम पंधराव्या शतकान्तीं महालिंगदासांनी 'विक्रमबत्तिशी' नांवाचा मूळचा गद्यांत असणारा कथाप्रधान ग्रंथ पद्यांत ओवीवृत्तांत गोवून केलेलें दिसतें. आपण हा ग्रंथ लोकांना राजनीतींत आत्यंतिक डोळसपणा यावा आणि बोखट प्रसंगीं त्यांनीं ह्यांतील वाक्यार्थ आठवून त्याप्रमाणें आपला वर्तनमार्ग आंखावा व प्रसंगा-

तून पार पडून कार्यार्थ साधावा म्हणूनच लिहिला असेंही ग्रंथकार स्पष्ट म्हणत आहे. सारांश वर एकदां आजकालच्या सर्वमान्य पुढाऱ्यांसही आपल्या स्वराष्ट्रविषयक अभिमान आणि प्रेमादर ह्यांच्या उत्कटतेंत खालींच पहावयास लावणारे मुक्तेश्वरादि ग्रंथकार सोळाव्या शतकारंभीं आणि कांहीं मागें पुढें होऊन गेलेले आहेत अशा अभिप्रायाचें जें कांहीं लिहिण्यांत आलें आहे तें किती व कसें सार्थ आणि त्रिवार सत्य आहे हें वाचकांस आतां पटावयाचें राहिलें नसावें असें वाटतें. ह्या सोळाव्या शतकारंभींच्या ऐतिहासिक विवेचनास ' महाराष्ट्रप्रभात ' असें नांव किती अन्वर्थ आहे याचाही वाचकांस आतां चांगलाच प्रत्यय आला असावा.

वाचकहो, संकल्प संपला. संकल्पांतच सर्व पर्वकाळ संपून जातो कीं काय अशी आपणांस भीति वाटली असण्याचा संभव खराच ! तेव्हां आतां एकदम मुक्तेश्वराचा आजा जो एकनाथ कविवर त्यांच्या जन्मशकाच्याच वाटाघाटीस लागूं.

## एकनाथ जन्मशकनिर्णय

वद्य षष्ठी फाल्गुनमास । जनार्दन जन्मदिवस ॥
दत्तात्रयदर्शनविलास । प्राप्त त्यांस तेचि दिनीं ॥
आम्हांसि जनार्दनाची भेटी । झाली तेव्हां हेचि षष्ठी ॥
जनार्दन, स्वच्छंदगति । याचि दिनीं देहाकृती ॥
लोपोनियां, सुखस्थिती । निजधामाप्रति गेले ॥
पांचवें पर्व याच दिनीं । पुढें होतां देखसी नयनीं ॥
षष्ठि पंचपर्वश्रेणी । विख्यात जनीं भावार्थि या ॥

वरील ओव्या केशवकृत नाथचरित्राच्या दहाव्या अध्यायांत आहेत.

मुळींच्या मुळीं एका जन्मला । मायबाप थोर धाक घेतला ॥ १ ॥
कैसें मूळ नक्षत्र आलें कपाळा । स्वयें लागलों दोहींच्या निर्मूळा ॥ २॥
शांती करितां अवघ्यांची जाली शांती । मुळीं लागोनियां लाविली ख्याती ॥ ३ ॥
एका जनार्दनीं मुळींच्या गोष्टी । माय सगट खंगला बापचि घोंटी ॥ ४ ॥

असा एकनाथांचा अभंगही आहे आणि ह्या अभंगाशीं समानार्थक असे वरील केशवकृत नाथचरित्रांत श्लोकही आहेत.

वरील उल्लेखांत एकनाथजन्मकालीं मुळींचें मूळ म्हणजे अभुक्त मूळ ज्येष्ठा नक्षत्रांश होता इतकीच गोष्ट मोघम कळते. त्याचप्रमाणें नाथनिर्याणकालीं, नाथगुरु जे जनार्दन ह्यांच्या जन्मदिवशीं, प्रथम गुरुदर्शनदिवशीं, नाथांस जनार्दन गुरूंचें दर्शन घडलें ते दिवशीं, सद्गुरु जनार्दनस्वामींनीं समाधि घेतली ते दिवशीं आणि शेवटीं एकनाथ महाराजांनींही महाप्रस्थान केलें ते दिवशीं मास, पक्ष, तिथि, वार, नक्षत्र ( आणि करण योगही ) एकच एक होतीं असा पहिल्या अभंगांतील उल्लेखाहून अधिक चांगला आणि स्पष्ट उल्लेख आढळतो. तथापि वर्षाचा माग मात्र कोठेंही नाहीं ही एक मोटीच उणीव त्यांत आहे. म्हणजे नाथांच्या समाधिकालीं फाल्गुन वद्य षष्ठी होती, त्याचप्रमाणें ती नाथगुरु जनार्दनस्वामींच्या समाधिदिनींही होती; इतकेंच नव्हे तर जनार्दनस्वामींचे जनन, त्यांस दत्तदर्शन आणि नाथांस जनार्दनस्वामींचें प्रथम दर्शन हीं घडलीं त्या त्या दिवशीं फाल्गुन वद्य षष्ठीच होती. आणि ह्या पांच गोष्टी ज्या फाल्गुन वद्य षष्ठीस घडल्या त्या वार, नक्षत्र, करणयोग ह्यांच्या अनुवृत्तीमुळें पर्वत्व प्राप्त होणाऱ्या फाल्गुन वद्य षष्ठीस घडल्यामुळें अशा पांच फाल्गुन वद्य षष्ठ्यांच्या ह्या पुनरावृत्त होणाऱ्या फाल्गुन वद्य षष्ठीस ' पंचपर्वश्रेणी ' असें अन्वर्थ नांव एकनाथ महाराजांनीं ठेविलें तें योग्यच होय. नाथांस पंचांग गणितज्योतिषाची चांगलीच ओळख होती ह्याविषयींचीं उदाहरणें त्यांच्या ग्रंथांतून भरपूर आढळतात. फलज्योतिषही त्यांस चांगलेंच उपस्थित होतें असें त्यांचे ग्रंथ पांक्त वाचणाऱ्यांच्या दृष्टोत्पत्तीस आल्याशिवाय राहणार नाहीं, येथेंच ह्या विधानार्थ पुरावा करूं लागल्यास होणारा विस्तार कंटाळवाणा आणि दुर्बोध होऊन मूळ विषयानुसंधान सुटेल म्हणून तसें करितां येत नाहीं. तथापि त्यांनी आपली प्रयाणतिथि मास, पक्ष, वार ह्यांसुद्धां आपल्या गुरूंचें प्रयाण होतांच त्यांच्या पुण्यतिथ्युत्सवाच्याच प्रसंगानें वरीलप्रमाणें सहज आगाऊच सांगून टाकिली होती हाही कांहीं नाथ महाराजांच्या फलज्योतिष-ज्ञानासंबंधीं लहान पुरावा नव्हे. अस्तु !

वरील मोघम पुराव्याच्या जोडीला आपणांस निर्विवाद ठाऊक झालेल्या गोष्टींची जोड देऊन जर मोघमास विशेष स्पष्टता आणतां आली तर पहावयाचें

आहे. निर्विवाद अशी गोष्ट आज आपणांस एकच वरील पुराव्याबाहेरच्या अशा उल्लेखानें ठाऊक आहे ती एकनाथ महाराजांच्या प्रयाणकालाची होय. पैठणास नाथांच्या समाधिमंदिरावर पुढीलप्रमाणें एक श्लोक कोरलेला आहे :

शालीवाहनपंधराशतशकीं एकागळें विंशती ।
वर्षानाम विकारी, मास बरवा फाल्गून वद्यप्रती ॥
षष्ठी वासर भानु या शुभ दिनीं निर्याण स्वच्छंदता ।
पावे श्रीगुरु एकनाथचि महास्वानंदसाम्राज्यता ॥१॥

हा श्लोक नाथचरित्रकार केशवबुवा यांनीं रचिलेला असून तो ४५–५० वर्षांपूर्वी एका ब्रह्मचारी बोवांनीं कोरविलेला आहे. ह्या श्लोकासही कृष्ण दयार्णवकृत एतद्विषयक अन्य श्लोकाचा प्रत्यंतर पुरावा देणें वावगें नव्हे. कृष्ण दयार्णव हा भागवतावरील 'हरिवरदा' टीकेचा कर्ता. ह्याचें जन्म शके १५९६ आणि प्रयाण १६६२.

भूबाहूशरचंद्रमा शकविधिक्षेत्रीं तिजा जो क्रमें ।
अब्दामाजि विकारिनामक रवी मीनगृहीं संभ्रमें ॥
षष्ठी फाल्गुन वद्य मित्रभशशी वज्राख्य वाणिज्यता ।
पावे श्रीगुरु एकनाथ करुणासिंधु स्वसायुज्यता ॥

१ भू, २ बाहू, ५ शर आणि १ चंद्रमा. 'अङ्कानां वामतो गतिः' म्हणजे अंकांची डावीकडे गति ह्या न्यायानें १५२१ ही वर्षसंख्या कोणत्या शकाची ? तर शकगणनाविधींत पंचागांत ज्याचा उल्लेख तिजा म्हणजे तिसरा असा असतो त्या गणनेचा शक. पंचागांत प्रथम युधिष्ठिरशक, नंतर विक्रम संवत् आणि मग शालिवाहन शक असे उल्लेख येतात. अब्द म्हणजे वर्ष कोणत्या नांवाचें ? साठ संवत्सर हीं वर्षनामें होत. शालिवाहन शक १५२१ ला विकारी संवत्सर होता. त्या वर्षी फाल्गुन वद्य षष्ठीस अनुराधा नक्षत्रीं चंद्र असतांना वज्रयोग वणिजकरणीं करुणासिंधु श्रीगुरु एकनाथ सायुज्य साम्राज्यपदास गेले. सारांश शके १५२१ फाल्गुन वद्य ६ रविवार आणि अनुराधा नक्षत्र, वज्रयोग, वणिजकरण अशा पंचांगशुद्ध मुहूर्तीं नाथ महाराजांचें प्रयाण झालें ही गोष्ट आतां सर्वसंमत होय. म्हणून आतां वरील मोघम उल्लेखांचा आणि ह्या निर्विवाद सिद्धीचा मेळ घातल्यास : १. एकनाथांचे गुरुजी जनार्दनस्वामी ह्यांचा जन्म, २. जनार्दनस्वामींस प्रथम दत्तदर्शनयोग,

३. एकनाथांस जनार्दनस्वामींची प्रथम भेट, ४. जनार्दनस्वामींची पुण्यतिथि ह्याही गोष्टी प्रत्येकीं फाल्गुन वद्य षष्ठी रविवारीं अनुराधा नक्षत्र असतांनाच घडल्या असें निःसंशय खरें मानण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं. शके १५२१ च्या मागे फिरूनफिरून वरील प्रकारच्या पंचांगयोगांची अनुवृत्ति शके १४९४, शके १४६७, शके १४४० आणि शके १४१३ ह्या शालिवाहन शकांत झालेली पंचांगगणितानें दिसते. अर्थात् शके १४१३ त जनार्दनजयंति आणि शके १५२१ त एकनाथप्रयाण ह्यांत अंतर १०८ वर्षांचें आहे. गुरुशिष्यांच्या आयुष्याची ही मिळवणी कांहीं अश्रद्धेय खचित नव्हे. आतां एकच गोष्ट ठरवावयाची उरली ती एकनाथजन्मशकवर्ष ‡ ही. जनार्दनस्वामीस एकनाथ प्रथम भेटले तेव्हां ते बारा वर्षांचे होते असा नाथांचे मागील व आजकालचे अशा सर्वच चरित्रकारांचा एकमेळाचा पुकारा आहे. म्हणून शके १४६७ त बारा उणे केला म्हणजे येईल तो नाथजन्मशक निश्चयानें मानण्यास शंका वाटण्याचें कांहींच कारण नाहीं. अर्थात् १४६७–१२=१४५५ हा नाथजन्मशक ठरला.

---

‡ नाथांचा जन्मशक ‘ नवनीतां ’त १४७० असा दिला असून समाधिशक १५३० दिलेला आढळतो. पुढें सहस्रबुद्धेकृत निर्णयसागरी नाथचरित्रांत हेच काल दिले आहेत. अलीकडे नाथभागवत निर्णयसागरासाठीं संपादितांना रा. रा. पांगारकरांनीं व नंतर एकनाथी भावार्थ रामायण संपादितांना रा. रा. देव-स्थळींनीं अनुक्रमें शके १४७० व १४५० असे दिले असून समाधिकाल शके १५२० व १५२१ असे दिले आहेत. रा. रा. पांगारकरांनीं निर्णय-सागरकरितां भागवत संपादिल्याचा शक १८३२ होय. ह्याच १८३२ च्या पौषांत रा. पांगारकरांचें एकनाथ महाराजांचें संक्षिप्त चरित्र प्रसिद्ध झालें. त्यांत ते एकविसाव्या पानावर “ भानुदासांनीं देह ठेविला ही गोष्ट शके १४३५ च्या सुमारास झाली असावी ” असें आणि नंतर २२ व्या पानांत “ सूर्यनारा-यणाच्या बालपणींच भानुदास निजधामास गेले, त्यानंतर २० वर्षांनींच... सूर्यनारायणापासून रुक्मिणीच्या पोटीं एकनाथ जन्मले ” असेंही म्हणतात. * तथापि मध्यें शकाचा अंक मात्र ‘शके १४५०’ असाच त्यांनीं दिला आहे. वास्तविक त्यांच्या मनांतील गणिताप्रमाणें म्हणजे १४३५ त होणाऱ्या भानु-

* अरविंद वर्ष २ रें, अंक ७वा, मे १९२२, पा. २८९–३०४

## एकनाथांची कुलपरंपरा

पूर्वी भानुदासनामक एक देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण पैठणांत राहत असे. ह्या भानुदासाचा जन्म शके १३७० असा कोठें दिलेला आढळतो आणि तो चुकीचा मानण्यास कांहीं कारण दिसत नाहीं. ह्या भानुदासाचा मुलगा चक्र-

---

दासाच्या मरणोत्तर त्यांच्या म्हणण्याप्रमाणें २० वर्षांनीं म्हणजे १४३५ + २० = १४५५ ह्या शकाब्दांतच एकनाथांचें जनन झालें असें ठरतें. तेव्हां शकाब्दाचा तेथें त्यांनीं दिलेला अंक जरी चर्मचक्षूंस १४५० असा दिसत असला तरी तो त्यांच्याही अंतश्चक्षूंस १४५५ असाच दृष्ट होता आणि वाचकांसही तसाच पहातां येण्याची त्यांच्या लेखांत स्पष्ट सोय आहे. १४५० ही मौद्रिक भूतचेष्टाही असण्याचा संभव आहे.

त्यानंतर ' महाराष्ट्र सारस्वत ' कर्ते रा. रा. विनायक लक्ष्मण भावे यांनीं शके १८४१ मध्यें प्रसिद्ध झालेल्या आपल्या पुस्तकांत पृष्ठ ९९ वर " **एकनाथाचा** जन्म शके १४७० मध्यें पैठणास झाला. " असाच अंध परंपरेचा उल्लेख केला आहे! मात्र शके या शब्दावर अशी टीप देऊन ' कदाचित् हा शक सुमारें १४५५ ही असेल ' असें अनुमान दर्शविलें आहे. मोठ्यांचें सहज होणारें अनुमानही कित्येक वेळां प्रत्यक्षाच्या कसोटीस कसें अचूक उतरतें हें येथें पहाण्यासारखें आहे. रा. भावे यांनीं आपल्या पुस्तकाच्या ह्या ९९ व्या पानावरच ६-७ ओळींत ' त्यांचा (जनार्दनपंतांचा) जन्म चाळिसगांव येथें शके १४२६ मध्यें रक्ताक्षी संवत्सरीं झाला ' असें छापून त्यावर खालीं ' २ कोणी हा शक १४१३ समाधिकाल १४९४ हा समजतात ' अशी टीप दिली आहे. सारांश जनार्दनजन्मशतकापासून एकनाथ-प्रयाणशकापर्यंत मधल्या ज्या शकांकांच्या साखळ्या प्रकरणारंभीं दिलेल्या ओव्यांतून जशा निघालेल्या वरील ऊहापोहांत दाखविल्या आहेत तशाच त्या रा. भावे ह्यासारख्यांसही, कदाचित् अस्पष्ट अशा कां होईना परंतु, दिसल्या होत्या हें एक बळकट प्रमाणच आहे. वरील ऊहापोहानें झालेला निर्णय सत्यच असला पाहिजे असें मानण्यास ह्या लेखकासारख्यास वाटल्यास वाचक तसें त्यानें उद्गारून दाखविल्याबद्दल त्याला क्षमाच करतील असा दृढ भरंवसा आहे.

पाणी, त्याचा सूर्यनारायण आणि सूर्यनारायणाचा एकनाथ अशी ही परंपरा आहे. एकनाथाच्या मातुश्रीचें नांव रुक्मिणी. ह्यांचें गोत्र विश्वामित्र, सूत्र आश्वलायन. यांची कुलदेवता एकवीरा देवी. ही सर्व माहिती नाथ भागवताच्या मंगलाचरणरूप प्रथमाध्यायांत आढळेल. नाथांचें हें कुल पिढ्यानुपिढ्या ज्या पैठणांत राहात आलें तें पैठण म्हणजे प्रतिष्ठान नगर हें शालिवाहन, सातवाहन म्हणजेच आंध्र, आंध्रभृत्य इत्यादि नांवानें संवत् पूर्वकालापासून दक्षिणेंत साम्राज्यपीठाचा मान लाभलेल्या राजवंशाचें राजधानीचें ठिकाण होय. हें गोदावरी-गौतमीच्या तीरीं आहे. ज्याप्रमाणें गोदेस गंगा म्हणण्याचा परिपाठ महाराष्ट्रांत सार्वत्रिक चालत आला आहे त्याप्रमाणें प्रतिष्ठान म्हणजे पैठण ह्या त्या गंगेच्या कांठच्या क्षेत्रासही दक्षिणेंतील काशी असेंच मानण्यांत येई. भागीरथीतीरस्थ-निवासी, जनतापहारी वाराणशी किंवा काशीक्षेत्राप्रमाणेंच हें क्षेत्रही निवासीजनतापहारी असेंच प्रख्यात असे. उत्तर हिंदुस्थानांतील काशीवाराणशी हें ज्याप्रमाणें सकलविद्यापीठ म्हणून प्राचीन कालापासून गाजत आहे तसें पैठणही बारापंधराशें वर्षें त्याच मानास पात्र होऊन राहिलें होतें. चारी वेद, साही शास्त्रें आणि अष्टादश पुराणें, त्याचप्रमाणें वैद्यक, ज्योतिष इत्यादि विद्यामात्राचा पाठ विद्यार्थ्यांस पैठणास सुलभ असे. ज्ञानेश्वरप्रभृति आपल्या भावंडांसह निवृत्तिनाथ आपणांस उपनयनपूर्वक शुद्धिपत्र मिळावें म्हणून पैठणच्याच ब्रह्मवृंदाकडे गेले असल्याविषयींची आख्यायिका सुप्रसिद्धच आहे.

एकनाथांचे पणजे भानुदास हे शके १३७० मध्यें जन्मले असें मागें उल्लेखिलेंच आहे. त्यावरून ते दुर्गादेवीच्या दुष्काळांत मंगळवेढें ठाण्याचे अधिकारी असणारे जे दामाजीपंत त्यांचे समकालीन ठरतात. ह्या दामाजीपंतानें दुष्काळानें अन्नान्नगतीस पोंचलेल्या प्रजाजनांच्या कळवळ्यानें आपल्या सरकारी धान्याचीं कोठारें उघडीं करून लोकांकडून मनसोक्त लुटविलीं. भानुदासांनींही आपल्या जिवाची काळजी सोडून विजयानगरच्या कृष्णरायानें पंढरपुराहून पळविलेली श्रीविठ्ठलमूर्ति परत आणल्याची कथा ' महाराष्ट्र महोदयाच्या पूर्वरंगां 'त यथायोग्य विस्तारानें येऊन गेलीच असल्यानें तिची पुनरुक्ति करतां येत नाहीं. आपल्या ह्या प्रथम कुलदीपक पणजासंबंधानें एकनाथच पुढें भागवताच्या नमनाध्यायांत म्हणतात :—

वंदूं **भानुदास** आतां । जो कां पितामहाचा पिता ।
ज्याचेनि **वंश भगवंता** । झाला **सर्वथा प्रियकर** ॥ १३० ॥
जेणें बाळपणीं आकळिला भानू । स्वयें झाला चिद्भानू ।
जिंकोनि मानाभिमानू । भगवद्भानू स्वयें झाला ॥ १३१ ॥
जयाची पदबंधप्राप्ति । पाहों आली श्रीविठ्ठलमूर्ति ।
कानीं कुंडलें जगज्योती । करितां रातीं देखिला ॥ १३२ ॥
तया **भानुदासाचा चक्रपाणी** । तयाचाही सुत सुलक्षणी ।
तया सूर्यनाम ठेवूनी । निजीं निज होऊनि **भानुदास** ठेला ॥१३३॥
तया **सूर्यप्रभा**प्रतापकिरणीं । मातें प्रसवली **रुक्मिणी** ॥१३४॥
धन्य निज भाग्याची लीला । आलों वैष्णव कुला जन्मोनी ॥१३५॥

वरील ओव्यांवरून नाथांचा स्वकुलगौरवाभिप्राय त्यांच्याच शब्दांनीं प्रतीत होईल. आपलें कुल भगवंतास प्रथमतः ज्याच्या अनन्य भक्तियोगानें सर्वथा प्रिय झालें तो **भानुदास** आपला प्रपितामह होय. त्यानें बाळपणांतच साक्षात् सूर्यनारायणास आपल्या एकनिष्ठ ध्यानानें ध्रुवानें जसें प्रत्यक्ष श्रीविष्णूस तसेंच वश करून घेतलें आणि त्या श्रीसवित्याच्या प्रसादानें आपणही केवळ चिद्भानु म्हणजे ज्ञानसूर्यच होऊन जो राहिला, आणि म्हणूनच ज्याच्या भक्तीनें चाललेल्या कीर्तनांत त्याची ' पदबंधप्राप्ति ' व्हावी ह्या उद्देशानें येणाऱ्या श्रीविठ्ठलमूर्तीसही तो म्हणजे भानुदास रात्रीच्या वेळीं जगावर प्रकाश पाडीत असणाऱ्या म्हणजे ' ध्येयः सदा सवितृमण्डलमध्यवर्ती नारायणः सरसिजासन-संनिविष्टः केयूरवान् मकरकुण्डलवान् किरीटी हारी हिरण्मयवपुर्धृतशङ्खचक्रः ।' ह्या सूर्यनारायणाच्या ध्यानांत सांगितल्याप्रमाणें मकरकुंडलवान् असाच दिसला. आतां पदबंधप्राप्ति ( किंवा पद्यबंधप्राप्ति ) होण्यासाठीं ' पंढरीचा राया ' येत असे असें मानण्यास भानुदासाच्या खालील अभंगाचा पुरावा स्पष्ट आहे :–

भाकितो करुणा । पंढरीच्या राया ।
अगा यादवराया । रामकृष्णा ॥ १ ॥
तूं माय माउली । जीवीं जीवनकळा ।
भक्तांचा ळळा । पुरविसी ॥ २ ॥

आवडे सावडे । भक्तांचें कीर्तन ।
नाचसी येऊन । निरभिमानें ।। ३ ।।
**भानुदास** म्हणे । पुरवि माझे लळे ।
**विठ्ठले** सावळे । माउलीये ।। ४ ।।

अशा लोकोत्तर भगवद्भक्ताच्या वंशांत जन्म मिळाल्याबद्दल एकनाथानें वरील ओव्यांतील ' धन्य निज भाग्याची लीला । आलों वैष्णवकुळा जन्मोनी ।' असे धन्योद्गार काढावे ह्यांत कांहीं आश्चर्यास वावच नाहीं. तर त्याचे ते उद्गार स्वभावोक्ति अलंकाराचेंच उत्तम उदाहरण होत. हे भानुदास कीर्तन करितांना तें ऐकण्यास वरील त्यांच्याच अभंगात वर्णन केल्याप्रमाणें **श्रीविठ्ठलमूर्ति** एकदां संतुष्ट होऊन त्यांजपुढें चालत्याबोलत्या सगुण मानवरूपांत साक्षात् उभी राहिली आणि ' **भानुदास**, भक्तोत्तम ! तुझ्या कीर्तनप्रेमानें मी संतुष्ट झालों आहे; तरी तुझें मीं कोणतें प्रिय करावें हें जर सांगशील तर मला बरें वाटेल' असें उद्गारली असतां भानुदास म्हणाले ' देवा, माझी कांहीं विशेष इच्छानाहीं. तथापि आपणांस काहीं माझें प्रिय करणेंच तर माझ्या वंशांतच आपण मानवस्वरूपी भक्त भागवतोत्तम होऊन अवतीर्ण व्हावें आणि आपल्या सगुणभक्तीचा मार्ग लोकांना स्वतः दाखवावा अशी माझी प्रार्थना आपल्या चरणीं आहे.' यावर ' तथास्तु ' म्हणून देव अंतर्धान पावले. ही गोष्ट अर्थात् शके १४३५ त विजयानगरचा राजा कृष्णराय यांजकडून पंढरीची विठ्ठलमूर्ति भानुदासांनीं परत आणिल्यानंतरची होय. त्या वेळीं भानुदासांच्या चक्रपाणी नामक मुलाची बायको प्रसूत्युन्मुखच होती. तेव्हां तिच्या त्या गर्भांत तरी आतां फरक करणें निसर्गनियमाविरुद्ध होतें. म्हणून तिच्या उदरीं कांहीं ईश्वराचा सगुण अवतार झाला नाहीं. चक्रपाणीस ह्या वेळीं मुलगाच झाला. त्याचें नांव भानुदासांनीं बुद्धिपुरस्सर सूर्यनारायण असें ठेविलें, म्हणजे आपलेंच नांव त्यास दिलें. ही गोष्ट शके १४३६त घडली. नातवाचें नामकरण करून भानुदासांनीं आपल्या वयाच्या ६६ व्या वर्षी देह ठेविला. त्यानंतर त्या नातवाचें वय पुत्रोत्पत्तिक्षम होण्यास सहजच १९–२० वर्षे हवींतच. त्याच्या स्त्रीचें वयही गर्भधारणक्षम असण्यास सामान्य मानानें चौदा एक वर्षांचें तरी असावयास पाहिजेना. अर्थात् सूर्यनारायण १८–१९ वर्षांचे आणि रुक्मिणी त्यांची भार्या चौदा एक

वर्षांची असतांना म्हणजे शके ( १४३६+१९ ) १४५५ ह्या वर्षी नाथांचें जनन चैत्र वद्य चतुर्थीस चंद्रोदयीं लग्नीं गुरुचंद्र असतांना झालें. लग्नस्थ चंद्र ज्येष्ठान्तीं मुळींच्या मुळीं होता असें नाथ स्वतःच सांगतात. त्याच नक्षत्रांत गुरुही त्या वेळीं असल्यामुळें पितृमातृकारक गुरुचंद्र दोघेही क्रूरनक्षत्रगामित्वानें बिघडून त्या दोघांच्या घाताचे सूचक झाले, असें फलज्योतिषाच्या दृष्टीनें म्हणतां येणार आहे. हे ग्रह लग्नीं नसतांनाही वरीलप्रमाणें बिघडले असल्यास पितृमातृघात सूचित करितातच. चैत्र वद्य चतुर्थीस ज्येष्ठा किंवा मूळ नक्षत्र असूं शकणें हें पंचाग गणिताचीं मूल तत्त्वें ठाऊक असणाऱ्यांस सहज कळण्यासारखें आहे. थोडक्यांत एकनाथांच्या जन्मस्थलकालाची गोष्टही अशी आहे. आतां त्या वेळची भारतीय, महाराष्ट्रीय परिस्थिति कशा प्रकारची होती हें पहावयाचें.

## एकनाथजन्मकालीन परिस्थिति

उत्तरेंत दिल्ली येथें मुसल्मानी बादशहा, राजपुतान्यांत मेवाडचें स्वतंत्र रजपूत राज्य, दक्षिणेंत कृष्णेपलीकडे विजयानगरचें दक्षिण हिंदु साम्राज्य आणि मध्य महाराष्ट्र व बंगाल, गुजराथ इत्यादि ठिकाणींही लहानमोठीं कित्येक मुसल्मानी आणि क्वचित् कोठें हिंदी राज्यें नांदत होतीं. एकंदरींत सर्व भरतखंडासंबंधानें जर अभिप्राय द्यावयाचा असेल तर अजून ह्या द्वीपकल्पाचा अधिकार स्वदेशी आणि स्वधर्मी राजसत्तेंतच नांदत होता. तथापि उत्तरोत्तर मुसल्मानी सत्तेचा वरवंटा अधिकाधिक बळानें देशी सत्तेचा चुराडा करीत असल्याचेंच लक्षण दिसत होतें. महाराष्ट्रांतील एकसूत्री मुसल्मानी सत्ता जी ब्राह्मणी पादशाहत तिचे जवळजवळ पांच तुकडे एकमेकांपासून पूर्ण स्वतंत्र असे होऊन एक पिढी लोटली होती. येथें या राजकीय परिस्थितिसंबंधानें अधिक विस्तार, ‘ महाराष्ट्र महोदयाच्या पूर्वरंगां’त हा भाग येऊन गेला असल्यामुळें, पुनरुक्तीच्या दोषास पात्र होणार आहे.

एकनाथचरित्राचा काल, स्थल आणि कृति ह्या तिन्ही अंगांची रूपरेखा मात्र येथें देण्यांत येत आहे. कारण हा भाग ‘ पूर्वरंगां ’त फारच अस्पष्ट आणि अशुद्ध असा रेखाटला गेला होता. एकनाथांचा जन्म शके १४५५

चैत्र कृष्ण चतुर्थी. नाथांचे आईबाप त्यांच्या जन्मशकांतच परलोकवासी झाले. तेव्हां नाथांचा संभाळ आजाआजींनीं केला. सहाव्या वर्षी नाथांचें उपनयन झालें. खेळांतही देवपूजा करण्याचा त्यांस नाद असे. स्नानसंध्यादि ब्रह्म-कर्मावश्यक शिक्षण त्याच प्रमाणें देवपूजा, वैश्वदेव, श्रावणी इत्यादींचा पाठ नाथांस घरीं आजोबांनींच दिला. कांहीं लेखन, वाचन, रूपावली, अमरकोश, काव्य, व्युत्पत्ति व पुराणवाचन ह्यांचीही ओळख कांहीं घरीं व कांहीं एका पौराणिकाच्या संगतीनें अशी त्यांस करून देण्याची व्यवस्था पैठणास झाली होती. ह्या सर्व व्यवस्थेनें नाथांचें समाधान झालें नाहीं. त्यांच्या बुद्धीची हांव कांहीं विलक्षण होती. एक प्रकारची मुग्ध महत्त्वाकांक्षा त्यांच्या हृदयांत वास करीत असे. ती त्यांच्या प्राप्त स्थितींत त्यांस समाधानानें राहूं देईना. या प्रमाणें नाथांचें बाल्य संपून पौगंडावस्थेस प्रारंभ झाला तों तों त्यांची चौकस-बुद्धि अधिकाधिकच उड्या मारूं लागली. तिनें त्यांस देवगिरी म्हणजे दौलताबाद येथें असणाऱ्या **परम दत्तोपासक जनार्दनपंत** ह्यांच्या कीर्ति-गंधानें वेडें होण्याचा प्रसंग आला. अशा स्थितींत त्यांस देवानें स्वप्नांत येऊन सांगितलें कीं ' एकनाथ, तूं देवगिरीस जाऊन जनार्दनपंतांचा अनुग्रह घ्यावा. ते तुला तुझ्या इच्छेप्रमाणें कृतार्थ करितील. ' ह्या वेळीं नाथांचें वय १२ वर्षांचें होतें. परमेश्वराची अनुज्ञा झाल्यावर मग काय विचारतां ? नाथ आजाआजींस न सांगतांच जे निघाले ते देवगिरीस जाऊन शके १४६७ च्या फाल्गुन वद्य षष्ठीस रविवारीं सुप्रभातींच जनार्दनपंतांपुढें जाऊन उभे राहिले.

जनार्दनपंतांसही ही सत्त्वगुणपूर्ण बालमूर्ति पाहून संतोष झाला. त्यांनीं त्या बालकाची मधुर वचनांनीं विचारपूस केली. नाथांनींही आपली खरीखरी गोष्ट त्यांजपुढें विनीतोत्तरांनीं स्पष्ट सांगितली. झालें ! जनार्दनपंतांनीं नाथांस आश्रय दिला. नाथांनींही त्यांची एकनिष्ठपणें सेवा केली. त्या सेवेचें फल म्हणून नाथांस क्रमाक्रमानें गुरु जनार्दनस्वामींचा अनुग्रह, नंतर त्यांच्याच कृपेनें प्रत्यक्ष श्रीदत्तगुरूंचें दर्शन आणि शेवटीं सद्गुरूंचा वरप्रसाद व तीर्थयात्रा-निमित्तानेंही कांहीं महिने गुरूंसह प्रवाससुख इत्यादि प्राप्त होऊन शेवटीं ग्रंथ-लेखनकलेचा पाठही गुर्वाज्ञेनेंच त्यांस मिळाला. ती गोष्ट अशी :—

तीर्थयात्रोद्देशानें फिरण्याचा ह्या दोघां गुरुशिष्यांनीं उपक्रम केल्यास फार दिवस झाले नाहींत तोंच एके रात्रीं ते गोदातीरस्थ **चंद्रभट**नामक ब्राह्म-

णाच्या आश्रमांत वसतीस गेले. हा महाब्राह्मण स्नानसंध्यादि नित्य कर्मे यथाकाल संपादून निवांत स्थळीं असंग्रही बाण्यानें राहून परमार्थसाधननिष्ठ असे. आपल्या आश्रमांत आलेल्या ह्या अयाचित वृत्ति पाहुण्यांची योग्यता त्यानें त्यांच्या मुद्रेवरूनच जाणिली आणि आसन, पादप्रक्षालनार्थ उदक इत्यादि देऊन कंदमूलफलार्पणानें त्यानें यांचें मनोभावानें आणि उत्तम प्रकारचें आदरातिथ्य केलें. फलाहारोत्तर नित्य नियमाप्रमाणें ब्राह्मण आपल्या चतुः-श्लोकी भागवताच्या निरूपणास प्रारंभ करितां झाला. त्याचें तें सुश्राव्य निरूपण ऐकून हे गुरुशिष्य फारच संतुष्ट झाले आणि त्याप्रमाणें त्यांनीं आपले संतोषोद्गार त्या महाब्राह्मणास ऐकविलेही. नंतर जनार्दनस्वामींनीं नाथांस ऐकिलेल्या चतुःश्लोकी भागवतावरच ओवी वृत्तांत टीका लिहिण्याची आज्ञा केली. गुर्वाज्ञा शिरसा मनसा वंद्य मानून नाथांनीं चतुःश्लोकी भागवताचें सारखें मनन चालविलें. अहोरात्र त्यांस तोच छंद लागून राहिला. चंद्रभटाच्या आश्रमाहून निघून हे गुरुशिष्य **पंचवटीकडे** चालले. तो द्विजवरही जनार्दन-स्वामींच्या संगतीच्या इच्छेनें त्यांची अनुज्ञा घेऊन यांच्या बरोबर निघालाच होता. पंचवटीस श्रीराममंदिरांतच तिघांनींही वसति केली. तेव्हां त्या ठिका-णींच रात्रीं नित्याचा फलाहार आटोपल्यावर सद्गुरु श्रीजनार्दन, द्विजश्रेष्ठ चंद्रभट यांच्या साक्षीनें नाथांनीं श्रीरामचंद्रासमोर चतुःश्लोकी भागवतावर निरूपण करण्याच्या संकल्पानें आसन ठोकिलें आणि ईश्वर व सद्गुरु यांना वंदन करून भागवताचा पहिला श्लोक मधुर स्वरांत म्हटला आणि त्यावर स्वरचित ओव्या म्हणून उत्तम प्रकारचें प्रवचन केलें. ह्याप्रमाणें जनार्दन-स्वामींनी नाथांस ग्रंथलेखनकलेंतही प्रविष्ट करून ती त्यास उत्तम साधते इतकी प्रतीति घेतल्यावरच कांहीं काळानें त्यांस चारी धामांच्या यात्रा करण्यास एक-टेंच जाण्याची अनुज्ञा दिली. चंद्रभट स्वच्छेनें जनार्दनस्वामींबरोबर देवगडास गेला आणि तेथें त्यानेंही जनार्दनस्वामींचा अनुग्रह घेतला आणि पुढें कांहीं कालानें त्यानें स्वामींच्या समक्ष गडावर देह ठेविला. त्याची समाधि अजूनही गडावर दाखविण्यांत येते.

* नाथांनी गुरुगृहवास आणि तीर्थयात्रा मिळून एक तपाधिक काळ सहज

---

* " एकनाथ आपल्या वयाच्या १२ व्या वर्षी घराबाहेर पडले, व २५ व्या वर्षी कृतार्थ होऊन परत आले. " असें रा. रा. पांगारकर स्वकृत

घालविला असला पाहिजे. अर्थात् गुरुगृहीं जाण्याच्या वेळीं बारा वर्षांचे असणारे नाथ आतां चांगले पंचविशीस पोंचलेले होते. तीर्थयात्रा संपवून स्वेच्छेनेंच घरीं जाणार असलेल्या नाथांचा शोध त्यांच्या आजाआजी ह्यांनींही अहर्निश चालविलाच होता. त्या त्यांच्या प्रयत्नांस इतके दिवस कांहीं नीटसें फळ आलें नाहीं. तथापि शेवटींशेवटीं ज्या पौराणिकाकडे नाथ, देवगडास येण्यापूर्वी, शिकावयास जात असत त्याच्या प्रयत्नांनीं नाथ एकटेच तीर्थयात्रेस गेल्यावर यश येऊं लागलें आणि त्या पुराणिकानें दक्षिणेकडील तीर्थयात्रा आटोपण्या-पूर्वींच एकनाथांस गांठून त्यांच्या हातीं आपण महाप्रयासानें मिळविलेलें जनार्दनस्वामींचें लेखी आज्ञापत्र टाकिलें. तेव्हां तें शिरसा वंद्य करून नाथ पैठणास येऊन आजाआजींस भेटले, आणि यथारुचि वर्तनक्रम ठेवून काल-क्रमणा करूं लागले. पुढें लवकरच गुरूंच्या म्हणजे जनार्दनस्वामी आणि आजाआजी ह्या तिघांच्याही आग्रहानें एकनाथांनीं गृहस्थाश्रम पत्करिला तेव्हां

---

नाथ चरित्राच्या ६६ व्या पृष्ठाच्या शेवटीं लिहितात. हेच रा. रा. पांगारकर आपल्या नुकत्या परवां छापलेल्या मुक्तेश्वर चरित्रांत २० व्या पानावर मुक्तेश्वराचा जन्म शके १४९५ त धरितात तो कसा हें एक कोडेंच आहे.

नाथांस दोन मुलींच्या मध्यें एक मुलगा याप्रमाणें तीन अपत्यें झालीं. नाथपत्नी गिरिजाबाई सोळा वर्षांच्या असतांना फलवती झाल्या असें मानि-ल्यास नाथांच्या ३४-३५ व्या वर्षी नाथांस पहिली मुलगी झाली असें होतें. म्हणजे शके १४५५ + ३४–३५ = १४८९–९० च्या सुमारास, कदाचित् एकदोन वर्षे अगोदरही म्हणजे १४८७–८८ च्या सुमारास, नाथांची वडील मुलगी जन्मली असें मानणेंच गणितशुद्ध म्हणून सत्यास धरून असलें पाहिजे. ह्या मुलीचा मुलगाच मुक्तेश्वर. अर्थात् त्याचा जन्म १४८८-८९ च्या पुढें सोळा वर्षांच्या आंत विशेषसा असूं शकत नाहीं. तेव्हां तो शके १४८८-८९ + १५-१६ = शके १५०४-५ च्या पूर्वी जन्मलेला खचित नव्हे इतकेंच येथें वाचकानीं लक्षांत ठेवावयाचें आहे. अस्तु! नाथांची आजाआजी नाथांचा संसार पाहून लवकरच समाधानानें वारलीं. नाथांसही पुत्रीपुत्रलाभ होऊन आपला गृहस्थाश्रम सार्थ झाल्याचें समाधान लाभलें.

वयाच्या पंचविशीपुढें २६-२७ व्या वर्षीं नाथांचें लग्न झालें. त्या वेळीं त्यांस त्या वेळच्या रीतीप्रमाणें मिळणाऱ्या वधूचें वय ८-९ हून अधिक असणें असंभवनीयच ! नाथांच्या स्त्रीचें नांव गिरिजाबाई. त्या मोठ्या होऊन यथा-काल अपत्यवतीही झाल्या.

नाथ मराठीमध्यें भागवतादि ग्रंथावर प्रवचनें करीत नित्य नियमानें आपलीं स्ववर्णजातिकुलोचित कर्में यथास्थित चालवीत असत. त्यांचा योगक्षमही प्रभु-कृपेनें पैठणांत चांगला चालत होता. लोकांची त्यांच्या प्रवचनश्रवणास अतोनात भीड होत असे. धनिक श्रद्धाळु श्रोते नाथांची भक्तिपुरस्सर यथाशक्ति संभावनाही करीत. नाथ मात्र अमुक श्रोता अमुक तऱ्हेनें आपली संभावना करितो, अमुक करीत नाहीं, असला भेद मनांत आणीत नसत. त्यांची 'सर्वभूतहिते रतिः' स्थिर असे; त्याचप्रमाणें ते 'सर्वत्र समबुद्धिः' असेंच वागत. क्रोध तर त्यांनीं पूर्णपणेंच जिंकला होता. त्यांनीं कामाला ईश्वरभजनीं नियुक्त केलें होतें. साधुसेवनाच्या ठिकाणीं लोभाला अडकवून ठेवून मदमत्सर ह्यांस तर त्यांनीं जसा एखादा वैद्यराज पारदादि रसांना पुनरुत्थित न होण्याइतकें मारून टाकून त्यांचीं भस्में करितो तसेंच करून सोडिलें होतें. नाथ तीर्थयात्रामग्न असतांनाच आपल्या जुन्या पौराणिकास भेटले ते यात्रेकऱ्याच्याच वेशांत भेटले. त्या वेळीं ते तेथें मूळच्या ग्रामस्थ गृहस्थाप्रमाणें न वागतां परप्रान्तस्थ पांथस्थाप्रमाणेंच वागत असत. पुढें आजाआजींस भेटल्यावरही पांथस्थ म्हणून ते ज्या ठिकाणीं उतरले होते ती जागा सोडून घरीं गेलेच नाहींत. पौराणिक बोवांजवळील आपल्या श्रीमत् सद्गुरु जनार्दन स्वामींचें पत्र ज्या पिंपळेश्वराच्या देवालयासंनिध नाथांच्या हातीं पडलें आणि तें वाचून त्यांनीं ज्या ठिकाणीं बैठक मारिली त्याच ठिकाणीं गुर्वाज्ञेप्रमाणें आपण आजोबा आणि आजी ह्यांच्या संतोषार्थ गृहस्थाश्रम स्वीकारण्याचें जरी वचन दिलें तरी आजीबरोबर ते घरीं मात्र गेले नव्हते.

आपलें पत्र मिळाल्यावर तीर्थयात्रेकरितां एक पाऊलही पुढें प्रवास करूं नये, आज्ञेप्रमाणें वर्तल्यास सर्व तीर्थें तूं असशील तेथेंच तुला भेटतील, असें गुरुजींनीं पत्रांत लिहिलें होतें. तेव्हां गुर्वाज्ञेचा तंतोतंत अर्थ पाळण्यासाठीं नाथांनीं पत्र जेथें मिळालें त्याच ठिकाणीं स्थिर होण्याचा निश्चय केला. आजा-आजी हींही तीर्थेंच ! तीं तर आपण होऊनच नाथांकडे आलींच होतीं. तेव्हां

तीच खूणगांठ समजून ज्या ठिकाणीं आजाआजी आणि पत्ररूपानें सद्गुरु ह्यांची भेट झाली त्याच ठिकाणीं झोपडी बांधून राहण्याचा नाथांनीं आपला संकल्प दृढ केला. त्या झोपडींतच नाथांचा विवाह झाला आणि आणि पुढें लवकरच ती झोपडी नाथांचा वाडा असें रूप पावली. तो वाडा अद्याप पैठणांत आहेही. हें सर्व कशाचें फळ ? तर हिंदु चातुर्वर्ण्यांत नाथकालापर्यंत टिकून असणारी जी ब्राह्मण्यबुद्धि तिचें. आजही ही ब्राह्मण्यबुद्धि म्हणजे आपल्या ह्या हिंदु समाजांतून अगदीं नष्टच झाली आहे असें नव्हे. जन्माप्रमाणें अंतर्बाह्य आचरणानें जर ब्राह्मण शुद्ध असेल तर त्याचा योगक्षेम, तो त्या कसोटीस उतरल्यावर, आजही हिंदु समाज चालविण्याचा यत्न करितांना दिसतो. नाथ हे सर्वस्वीं स्ववर्णाचारानें वागणारे होते. विधींचें पाळण आणि निर्बंधांचें वाळण म्हणजे वर्जन करून यदृच्छालाभसंतुष्ट वृत्तीनें ते आपला गृहस्थाश्रम संपादून असत. इतकेंच नव्हे तर कालकृत अनिष्ट क्रांतीनें हिंदु समाजाच्या धार्मिक आणि नैतिक त्याचप्रमाणें आर्थिक शिक्षणसाधनांत जी महत् कृशता उत्पन्न केली होती ती कशी घालवावी या गोष्टीचा ते आपल्याशीं सारखा विचार करीत असत.

त्या वेळीं बहुजनसमाजास सुलभ अशीं शिक्षणसाधनें मुळीं अस्तित्वांतच नव्हतीं म्हटल्यास अतिशयोक्ति केल्याचा आरोप होणेंच असंभवनीय ! त्यामुळें सर्व हिंदु समाजाच्या शिक्षणविषयक आकांक्षा अगदीं खुरटल्यासारख्या अथवा वठल्यासारख्याच झाल्या होत्या. ही स्थिति म्हणजे राष्ट्रदेहास झालेली राजयक्ष्म्याची बळकट भावना होय. राष्ट्रदेहास झालेल्या त्या राजयक्ष्म्याच्या भावनेचें मूळ म्हणजे प्रथमावस्था बुद्धजैन धर्मबंडांनीं चातुर्वर्ण्यव्यवस्थेंत उत्पन्न केलेल्या वैषम्यांत हुडकावें लागतें. त्या राष्ट्रीय राजयक्ष्म्याची द्वितीयावस्था महंमदी धर्मानें फिरून नव्या सामर्थ्यानें उत्पन्न केलेल्या सामाजिक वैषम्यांत आढळते. नाथांच्या काळीं हिंदी राष्ट्रास जडलेला हा राजयक्ष्मा आपल्या द्वितीयावस्थेस पोंचला होता इतकेंच येथें सुचवायचें आहे. हा विषय जितका मनोरंजक तितकाच गुंतागुंतीचा म्हणून प्रतिपादनास आणि प्रतिपादिला असतांही आकलण्यास कठिण असल्यामुळें थोडक्यांत आवरणें अशक्य होतें. 'महाराष्ट्र-महोदयाच्या पूर्वरंगां'त ह्याच्या कांहीं अंगोपांगांचा बराच विचार केलेला आहे. म्हणून येथें त्या संबंधांत केवळ अंगुलिनिर्देशावर भागविणें प्राप्त आहे. तथापि

पुनरुक्तिदोष टाळून जेवढें नवें देतां येईल तेवढें येथें देण्याची कसूर होणार नाहीं.

## पूर्वेतिहासाचें तात्त्विक समालोचन

जैन आणि बुद्धधर्म ह्यांच्या प्रवर्तकांनीं चातुर्वर्ण्यव्यवस्थेस जी मोठी धडक दिली तिच्या प्रतिकारार्थ चातुर्वर्ण्यव्यवस्थेच्या अभिमान्यांसही त्या श्रौतस्मार्त धर्मविरोधी जैनबौद्धधर्मप्रवर्तकांशीं आणि नंतर त्यांच्या अंधानुयायांशीं तितक्याच वेगाच्या टकरा माराव्या लागल्या आणि त्या त्यांनीं मारिल्याही. ह्या टकरा मारितांना त्यांना आपली शिष्टसंमत संस्कृत भाषा त्या वेळीं पुरी उपयोगी पडली. कारण जैनबुद्धधर्मप्रवर्तक हे स्वतः संस्कृत भाषेंतूनच व्युत्पन्न आणि कृत-विद्य झालेले होते. ते वर्णतः क्षत्रिय होते. क्षत्रियांस वेदाधिकार होता आणि तो ते वापरीतही असत. सारांश काय कीं चातुर्वर्ण्यांपैकीं ब्राह्मणक्षत्रियवैश्य ह्या तिन्ही वर्णांना वेदाधिकार समान असल्यामुळें वेदांची व वैदिक धर्मसारस्वताची भाषा जी संस्कृत तिशीं ह्या त्रैवर्णिकांचा चांगलाच परिचय असे. व्यवहारांत जरी प्रान्तभेदानें संस्कृतांत भ्रष्ट निरनिराळ्या भाषा अधिकउण्या प्रचारांत असत तरी शिक्षणमाध्यम सर्वस्वीं संस्कृत वाङ्मयच होतें. शूद्रांसही वेदाधिकार नव्हता तरी त्यांच्यांतील शिक्षणेच्छूंस संस्कृतांतूनच पुराणादिकांच्या द्वारें शिकविलें जात असे ह्याविषयी कोणास संशय असण्याचें कारण नाहीं. ज्यांना श्रुतींचा अधिकार नाहीं अशा स्त्रीशूद्रांकरितांच आपण भारतभागवतादि पुराणें लिहिलीं असें व्यास सांगतात. तेव्हां शूद्रास संस्कृत येत असलें पाहिजे. शूद्रांतील शिक्षणेच्छूंस संस्कृतांतूनच शिक्षण मिळत असे इत्यादि गोष्टी गृहीत धरून न चाललें तर व्यासादि पौराणिकांवर खोट्या प्रतिज्ञेचा आरोप करणें पतकरावें लागतें. व्यासा-दिकांवर तसा आरोप करणारे कोणी साक्षर आणि समंजस हिंदु सांपडतील असें ह्या लेखकास तरी वाटत नाहीं खचित !

वरील प्रतिपादन जर सत्याला धरून असेल तर प्राकृतग्रंथलेखनप्रवृत्ति उत्पन्नच कशी व्हावी हा प्रश्न येतो. त्याचें उत्तर असें : दृढमूल आचारप्रधान आणि समाजाच्या सर्व थरांचा त्यांच्या त्यांच्या अधिकार आणि आकांक्षा ह्यांच्या मानानें संग्रह करून घेणारा असा पूर्ण व्यवस्थित धर्म धिःकारून तद्वि-

रूढ एखादें नवीन धर्ममत ज्याला प्रचारांत आणावयाचें असतें त्याला आपल्या अनुयायांचें संख्याबल प्रचलितधर्मी समाजाच्या कानाकोपऱ्यांतील आणि बुडा-तळाशीं असलेल्या लोकांतूनच मिळवावयाचें असतें. त्या लोकांस देशांतील शिष्ट अथवा ग्रांथिक भाषा कळत नसते. त्यांस कोणताही विषय समजून सांगावयाचें काम करितांना उपदेशकास त्यांच्या हेंगाडी भाषेंतच बोलून समजून सांगणें प्राप्त आहे. शिवाय त्यांना एकंदरींतच शिक्षणसंस्कार कमी असल्यानें व त्यांच्यांतूनच नूतन धर्मप्रचारक निवडण्याचा प्रसंग असल्यामुळें त्यांजजवळ सोंपविलेलें काम करितां येण्याचीं साधनेंही सिद्ध असावीं लागतात. त्या लोकांस ' श्रीगणेशाय नमः ' पासून धडे देऊन शिष्ट नागरभाषा व्याकरणशुद्ध शिकविण्यास नूतन धर्मसंस्थापकांस वेळ नसतो. तेव्हां सरासरी त्यांच्याच खेडवळ भाषेंत त्याजकडून त्या नूतन धर्मतत्त्वांचे शाब्द सिद्ध करावयाचें असतें. आणि त्या प्रसंगांतच प्राकृत, खेडवळ, अनागर अशा मूळच्या केवळ वर्तमान व्यवहारोपयोगी भाषेस ग्रांथिक भाषेचें स्वरूप प्राप्त होण्यास सवड सांपडते. नूतन धर्मप्रस्थापकाचें निर्वाण होतांच त्याच्या अनुयायांत दोन तट होण्यास प्रारंभ होतो. तथापि प्रथम प्रथम कांहीं काळ आपल्या गुरुगौरवप्रसाराच्या कामीं त्या सर्वांचें ऐक्य असतें. त्या काळांत त्याच्या वचनांचा संग्रह ह्या प्राकृत, खेडवळ, अशिष्ट, अनागर भाषेंतच केला जातो. असा एखादा चांगलासा सद्वचनसंग्रह ज्या खेडवळ भाषेचा सिद्ध होतो तिचा पुढें मूळच्या नागर भाषेप्रमाणेंच अभ्यास करण्याची प्रवृत्तिही उत्पन्न होते; आणि त्या प्रवृत्तीबरोबर तिचें व्याकरण, निरुक्ति, शब्दकोश इत्यादिही सिद्ध होण्यास अवकाश सांपडून शेवटीं ती भाषा साहित्यपूर्ण होते. प्राकृत, मुख्यतः पालि म्हणविल्या जाणाऱ्या, खेडवळ संस्कृत भाषेंत बुद्धपरिनिर्वाणानंतर त्याच्या शिष्यप्रशिष्यांनीं बुद्धवचनांचा संग्रह स्मृतिबलानें ग्रंथरूपांत आणिला. आजची आमची पुस्तकी मराठी भाषा आणि कोंकण, वऱ्हाड, देश इत्यादि प्रांतांतून केवळ व्यवहारांत वापरली जाणारी बोली, तोंडी वाक्प्रचार, त्याचप्रमाणें त्याही प्रत्येक प्रांतांत ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर मराठे, गवंडी, सुतार, लोहार, चांभार, महार, मांग ह्या प्रत्येक जातीच्या लोकांच्या तोंडीं असणाऱ्या मराठी म्हणविल्या जाणाऱ्या भाषा-प्रकारांत जसें आणि जितकें अंतर वर्णविचार, शब्दविचार आणि वाक्यरचना-पद्धति ह्यासंबंधीं आढळून येतें त्याहून अधिक अंतर कांहीं संस्कृत आणि

पालि ह्यांच्या ग्रांथिक भाषास्वरूपांतून ह्या लेखकास तरी कोठें आढळलें नाहीं.

सारांश काय, कोणत्याही समाजांत त्याला स्थैर्य प्राप्त करून देण्यास साधनीभूत झालेल्या धार्मिक, नैतिक, सामाजिक समजुतीविरुद्ध जेव्हां एखाद्या तेजस्वी, ओजस्वी, मनस्वी पुरुषास क्वचित् केवळ सर्व समाजहितबुद्धीनें तर पुष्कळदां स्वप्नसिद्धीच्या आकांक्षेनें, जुन्याचा जुनें म्हणूनच कंटाळा येऊन त्याविषयीं शिथिलादर होऊन, अथवा जुन्या समजुतींच्या मुळाशीं असलेल्या सत्तत्त्वावर मळ चढून समाजाचा आचार आणि विचार ह्यांचा मेळ दिसेनासा झाल्यानें अथवा शेवटीं परंपरेनें स्थिर गौरवास पोंचलेल्या अशा एखाद्या वर्गाशीं अथवा व्यक्तीशीं वैयक्तिक अथवा स्ववर्गीय स्पर्धेनें नवीन विचार, नवीन आचार ह्यांची प्रवृत्ति पाडण्यास पाहतो तेव्हां त्याला जुन्या संस्थांची पायमल्लीही हेतुपुरस्सरच करण्याचा प्रसंग येतो. अशा प्रसंगीं त्या पुरुषविशेषाच्या प्रयत्नानें आचारांविचारांतल्याप्रमाणेंच समाजाच्या भाषेंतही इष्टानिष्ट क्रांति घडून येते. ही क्रांति मूळचें समाजस्थैर्य ज्या मानानें दृढतरतम असेल त्या मानानें सर्वस्वी मान्य किंवा रूढ होण्यास अधिकाधिक काळ लागतो. प्राकृत भाषेंत जरी बुद्धपरिनिर्वाणकालापासून म्हणजे चालू शकपूर्व ५०० वर्षांपूर्वींपासन ग्रंथलेखनारंभ झाला तरी सर्व समाजास ग्रांथिक म्हणून मान्य असलेल्या आणि शिक्षणसामग्रीनें परिपूर्ण अशा संस्कृत भाषेचें गौरव कमी होण्यास पुढें सहस्रावधि वर्षें लोटावी लागलीं आहेत.

बुद्ध स्वतः संस्कृत भाषापंडितच होता. तो जातीचा क्षत्रिय होता. त्याची शिष्टसंभाषणाची भाषा संस्कृतच होती. तरी तो कदाचित् केव्हां शिष्ट नागर संस्कृताचा गंधही ज्यांस नाहीं अशांपुढें खेडवळ किंवा अपभ्रष्ट संस्कृत भाषेंत व्याख्यान करीत असेल इतकेंच फारतर म्हणतां येईल. पुढें जेव्हां सार्वभौम राजपदधारी भारतसम्राट् अशोक बुद्धधर्मपक्षपाती झाला, तेव्हां अर्थात् इतरही पुष्कळ क्षत्रिय राजन्य समाज या नव धर्माचा अनुयायी व अभिमानी होऊन, राजनागरशिष्ट भाषा जरी पौराणिक संस्कृतच होती, तरी आचांडाल वैश्य व आर्यानार्य संकरजाति, ह्यांस समजावें म्हणून अशोककालीन धार्मिक राजशासनें, शिलालेख इत्यादिकांतून खेडवळ संस्कृतापभ्रष्ट पालि प्राकृत भाषेचा उपयोग करण्यांत आल्याचें दिसतें. परंतु ही स्थिति लवकरच पालटली; आणि शिला-

लेखादि फिरून शुद्ध संस्कृतांत दिसावयास लागले, इतकेच नव्हे तर बौद्धांचे धर्मग्रंथ किंवा बौद्ध धर्मग्रथांवरील टीका, बुद्धचरित्रपर ग्रंथ आणि बौद्धधर्मी पुराणेंही सर्व संस्कृतांतूनच व्हावयास लागल्याचें स्पष्ट आहे.

बुद्धधर्म दीडदोनशें वर्षांनंतर आपल्या सार्वभौमाश्रयास मुकल्यावर फिरून जिकडेतिकडे संस्कृत भाषेचेंच अकुतोभय साम्राज्य स्थिर झालें. आणि पूर्वोत्तरमीमांसाप्रस्थापक कुमारिल, मंडनमिश्र, श्रीमदाद्य शंकराचार्य ह्यांचे आणि ह्यांच्या ग्रंथांवर वृत्तिभाष्यें आणि टीका करणाऱ्या सर्वांचें वाङ्मय संस्कृत भाषेंतच व्यक्त झालें आहे. जैन धर्माचेंही थोडेंसें वाङ्मय मागधी, शौरसेनी, महाराष्ट्री इत्यादि प्राकृत भाषेंत असलेलें जरी आढळतें तरी त्यांचे स्याद्वादादि शास्त्रीय सिद्धान्तांचे प्रचंड ग्रंथ संस्कृतांतूनच लिहिलेले आढळतात.

इकडे महाराष्ट्रांत स्थानिक उत्पत्तीचें असें पहिलें पाखंड मत म्हणजे महानुभाव पंथ होय. हें मत महाराष्ट्रचक्रवर्ती जाधवांच्या राजवटींत, म्हणजे बरेच आधुनिक कालीं जन्मून, रात्रीं वाढणाऱ्या खरजेप्रमाणें, शूद्रातिशूद्र मातंगांतच पसरलें. ह्या पंथांचा मूल प्रवर्तक मात्र वर्णगुरु ब्राह्मण कुलांतीलच कृष्णंभट्ट नांवाचा एक वेदशास्त्रसंपन्न संस्कृतभाषापंडितच होता. कामतः मातंगीसंगदुष्ट अशा ह्यास, स्वदोष गुणत्वानें प्रदर्शित करतां यावा म्हणून, हें नवधर्मस्वरूप बनवावें लागलें. ह्या धर्माच्या ग्रंथांनीं मात्र सरसकट संस्कृत भाषेची नात महाराष्ट्रीची मुलगी जी मुकुंदज्ञानेश्वरकालीन मराठी भाषा तींतच आपला विषय व्यक्त केला आहे.

हें महानुभाव धर्ममत आणि सर्वस्वीं भारतीय धर्मसंस्कारविरोधी अशा महंमदी धर्मवेडानें धुंद झालेल्या लोकांचें हिंदुस्थानावर चालून येणें, नव्हे, हिंदुस्थान आपल्या कराल करवालीच्या सामर्थ्यानें आक्रमिणें हीं समकालीन होत. ह्याशिवाय दक्षिणेंत बसवाचें एक धर्ममतही ज्ञानेश्वर पूर्वकालांत उत्पन्न होऊन दृढमूल झालें. त्याची माहिती ' महाराष्ट्रमहोदयाच्या पूर्वरंगा 'त बरीच व्यवस्थित दिली असल्याचें स्मरतें, म्हणून येथें देण्यांत येत नाहीं. ह्या लिंगाईत धर्माचे, बसवपुराण, लिंगमाहात्म्य वगैरे ग्रंथ संस्कृतांतूनच आहेत. महानुभाव पंथाचेंही संस्कृत वाङ्मय मुळींच नाहीं असें नाहीं. बुद्धोदयापासून या महानुभाव पंथोत्पत्तीपर्यंतच्या म्हणजे उणींपरीं दीडपावणेदोन सहस्र वर्षें

चाललेल्या ह्या अंतःकोपापासून आपली वैदिक संस्कृति आणि तिच्या संरक्षणोपयोगी ज्ञानप्रसाराचें माध्यम जी संस्कृत भाषा तिचें पुनःपुनः संजीवन, संगोपन आणि संवर्धन करण्यास सारखे करावे लागणारे परिश्रम सोसून सोसून आतां भारतीय त्रैवर्णिकांस बराच थकवा आला होता. काश्मीर, राजस्थान आणि विजयानगरचें साम्राज्य वगळल्यास क्षत्रियब्रुवांनीं तर वैदिक संस्कारांशीं व संस्कृत भाषेशी अगदींच फटकून वागण्याचें व्रत धरिलें होतें. अर्थात् खालीं वैश्य तर ह्या संस्कृत भाषेशीं फटकून वागण्यांत त्यांच्याही वर ताण करून राहिले असल्यास नवल मानण्याचें कारणच नाहीं. वरती ब्राह्मणांतही, सर्व वैदिक संस्कार कायम होते तरी, व्यवहार ज्या क्षत्रियवैश्यांशीं अनेक बाबतींत व्हावयाचा त्या त्या व्यवहारांत उपयोगी पडणाऱ्या प्राकृत भाषांशींच ओळख ठेवण्याची आवश्यकता भासूं लागल्यानें उत्तरोत्तर संस्कृत भाषेच्या अभ्यासास ओहोटी लागूं लागली हें सहज होय.

ह्याच कालांत पुराणोक्त संस्कारपद्धति प्रचलित झाल्या. ह्या पद्धतींतील संस्कृत भाषा अत्यंत सोपी, उत्तानार्थप्रधान असते. पुराणें हीं ह्या काळांत फिरून संग्रहित केलीं गेलीं. त्यांमध्यें प्रक्षेपही बरेच घुसडले गेले. पुराणोक्त देवपूजा, ध्यानें, स्तोत्रें, सूक्तें यांचाही पुष्कळ सुळसुळाट आब्राह्मणशूद्रांत आस्तिक समाजांत झाला. तेवढ्या मानानें संस्कृत भाषेशीं असणारें अनन्यगतिकत्वाचें नातें आर्य त्रैवर्णिकांपैकीं बहुजन समाजाच्या बाबतींत शिथिल पडलें; आणि तितक्याच मानानें प्राकृत भाषाही प्रौढत्वास पोंचत चालल्या. कारण स्वतांस असलेलें ज्ञान, केवळ लोकहितबुद्धीनें असो किंवा स्वगौरववृद्ध्यर्थ असो, लोकांत पसरण्याची प्रवृत्ति मनुष्यसाधारण आहे. त्यामुळें संस्कृतांतून उपलब्ध होणारें विविधविषयक ज्ञान ब्राह्मण पंडित लोकभाषेच्या द्वारां लोकांत पसरविण्यास प्रवृत्त व्हावें हें नैसर्गिक होय. तात्पर्य, संस्कृतच एक जी ग्रंथलेखनाची भाषा या भरतखंडांत होती तिच्या जागीं प्राकृत भाषाही त्या कामीं खालील क्रमानें पुढें सरसावल्या :– ( १ ) संस्कृत भाषेंत ग्रंथ होणें व भावार्थ मात्र क्वचित् प्रसंगीं प्राकृताच्या सरणीनें जिज्ञासूंस सांगितला जाणें. ( २ ) क्वचित् प्राकृतांतही एकादा ग्रंथ होणें. ( ३ ) पुढें अमुक एका विषयांतच प्राकृत भाषेनें ग्रंथलेखनाची अधिक प्रवृत्ति व संस्कृत भाषेची कमी प्रवृत्ति. ( ४ ) विषय एकच असून संस्कृत भाषेंत त्याची मांडणी एका प्रकारची तर प्राकृतांत

ती भिन्न प्रकारची. ( ५ ) संस्कृत ग्रंथ ब्राह्मणांनीं तसेंच क्षत्रियांनींही लिहिणें आणि क्षत्रियत्वाभिमान्यांनीं आपले संस्कार वैदिक किंवा पौराणिक परंतु संस्कृत मंत्रांनींच करवून घेणें आणि वर्णोचित कर्में संस्कृतांतूनच आचरणें, त्याच प्रमाणें, आवश्यक वाटणारी साक्षरता संस्कृत भाषेच्या अभ्यासानेंच मिळविणें. ( ६ ) संस्कृत ग्रंथकर्तृत्वाचा, इतकेंच नव्हे, तर स्वकर्मधर्माचरणांतही क्षत्रिय-ब्रुवांस संस्कृताचा स्पर्शही न खपणें, आणि ब्राह्मणही, स्वतांची साक्षरता जरी संस्कृतांतूनच संपादून आपलीं नित्यनैमित्तिक कर्मेंही संस्कृतांतूनच चालवीत असतांही, प्राकृत मराठी ग्रंथकर्तृत्वाकडे आदर बुद्धीनें पाहातो आणि उत्तरोत्तर तसा ग्रंथकार म्हणून लौकिक संपादण्यास पुढें येतो. अशा सहा पायऱ्या एकनाथ महाराजांच्या कालापर्यंत प्राकृतभाषाग्रंथलेखनप्रवृत्तीच्या आक्रमिल्या गेल्या होत्या.

पृथ्वीवरील लोकसंख्येच्या एक पंचमांश लोकांच्या वसतीच्या ह्या भरत-खंडांतील वैदिक आर्यधर्माचारी लोकांचें विचारविनिमयाचें सामान्य साधन जेव्हां एकच एक संस्कृत भाषा होती तेव्हांचें तें भारतीय आर्य चातुर्वर्ण्याचें संघटित स्वरूप आणि एकराष्ट्रीयत्व हीं खरोखर मोठीं स्पृहणीय असावींत ! परंतु ह्या उत्तमोत्तमत्वास दृष्ट लागली आणि आजची ही ' नऊ भय्ये आणि दहा चुली ' असण्याची दुःस्थिति या भरतमहाराष्ट्रास प्राप्त झाली. हिच्यांतून पूर्व स्थितीस जर पुन्हां पोंचणेंच असेल तर उतरल्या क्रमानें माघारें चढणें हाच उपाय होय असें जरी आहे, तरी आजची आपली परिस्थिति ज्ञानेश्वरकालीन, एकनाथकालीन परिस्थितीपेक्षांही अधिक संकीर्ण आहे. म्हणून पुढें होऊं शकणारें भारतवर्षीय एकराष्ट्रही कमीअधिक संकीर्णच होणार हें विसरून चालावयाचें नाहीं. पूर्वकालीं एकदेशी, एकभाषी, एकधर्मी अशा लोकांच्या भिन्नभिन्न संप्रदायांची एक-वाक्यता करावयाची असे. तर आज भिन्नदेशी, भिन्नभाषी आणि भिन्नधर्मी अशा समाजांचें आणि त्यांच्या अंगोपांगांचें एकीकरण व्हावयाचें आहे. वरील प्रकारचें एकीकरण करण्याची कल्पना विशेषतः एकनाथासारख्यांस तरी शक्य कोटींतील वाटावी हेंही, त्यांचें शिक्षण ज्या सद्‌गुरूच्या कृपेनें व ज्या परिस्थितींत उभयतां गुरुशिष्य असतांना झालें, तिकडे लक्ष दिलें असतां स्वाभाविकच होय. नाथांचे गुरुजी जनार्दनपंत हे मुसलमानी राजसेवक. ह्यांस ब्राह्मणाच्या स्वाभाविक विद्या म्हणजे स्वशाखेची पूर्ण ओळख असून वेदार्थ-

ज्ञानास त्याच प्रमाणें स्मार्तधर्माचरणविधिनिषेध कळण्यास अवश्य साधनीभूत असें संस्कृत भाषेचें ज्ञान असून प्रारब्धप्राप्त, कालोचित यवनी राजसेवाही झोकांत आणि स्वधर्म व स्वाभिमान यांस धक्का न पोंचतांच करतां येण्यासारख्या थोर पदवीचें म्हणजे साचिव्य करतां येण्यास जें, यवनी भाषा, रीतिरिवाज इत्यादिकांचें ज्ञान हवें तेंही जनार्दनपंतांस चांगल्यापैकीं होतें. हे जसें शास्त्री तसें शस्त्रीही असत; जितके सहिष्णु आणि उदार तितकेच करारी व न्यायनिष्ठुर, तेजस्वी आणि उग्र तितकेच प्रेमळ व दयाळू असत. हे दत्तोपासक योगी आणि सगुण भक्तिमार्गी असत. हे ब्राह्म मुहूर्तीं उठून, प्रातःस्मरणशौचमुखमार्जनपूर्वक स्नानसंध्यावंदन यथाकाल उरकून, समाध्यन्त अष्टांगयोगसाधन करून श्रीगुरुदत्त-मूर्तीची पूजाअर्चा भक्तिभावानें करण्यांत दीड प्रहर दिवस येईपर्यंतचा काल घालवीत असत. तदुत्तर माध्यान्हसंध्यावैश्वदेवपूर्वक यथासंभव अतिथ्यभ्यागतां-सह भोजन उरकीत. तिसऱ्या प्रहराचा उत्तरार्ध व चवथ्याचा पूर्वार्ध सेवाधर्मो-चित कामकाज करण्यांत घालवून फिरून सायंस्नान करीत आणि 'उत्तमा तारकोपेता' या न्यायाची जशी प्रातःसंध्या त्याच प्रकारची 'उत्तमा सूर्यसहिता' अशी सायंसंध्या संपादीत. रात्रौ अल्प फलाहार करून तदुत्तर संस्कृत अध्यात्म ग्रंथांप्रमाणें ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, विवेकसिंधु असल्या प्राकृत वेदान्तपर ग्रंथांचें वाचनमनन चालवीत. ह्यांचा वरिष्ठ मुसलमान अधिकारी आणि हाता-खालचे मुसलमान व क्वचित् स्वजातीय सेवक या सर्वांवर सारखाच वचक असे. सर्वांशीं ह्यांचें वर्तन सरळ न्यायाचें असे. मुख्य धन्याला त्यांची सेवा मान्य होती, इतकेंच नव्हे तर, ह्यांची जाज्वल्य स्वधर्मनिष्ठाही त्याला आदरणीय व कौतुकास्पद वाटे. त्यानें ह्यांच्या सोयीकडे लक्ष देऊन गडावर प्रति गुरुवारीं सर्व सरकारी कामगारांस सुटी ठेविली होती. एकनाथ महाराजांनीं आपल्या भागवतांत प्रसंगोपात्त नवमाध्यायीं आपली गुरुपरंपरा सांगितली आहे. तींत जनार्दनपंतांस सद्गुरुलाभ झाल्याचेंही वर्णन आहे. तेव्हां तो उतारा देणेंच उचित :—

दत्तात्रयशिष्यपरंपरा । सहस्रार्जुन यदु दुसरा ।
तेणें जनार्दनु तिसरा । शिष्य केला कलियुगीं ॥ ४३० ॥
गुरुप्राप्तिलागीं सर्वथा । थोर जनार्दनासी चिंता ।
विसरेला तिन्हीं अवस्था । सद्गुरु चिंतितां चिंतनीं ॥ ४३१ ॥

देवो भावाचा भोक्ता । दृढ जाणोनि अवस्था ।
येणें झालें श्रीदत्ता । तेणें हातु माथां ठेवियला ॥ ४३२ ॥
हातु ठेवितांचि तात्काळ । बोधु आकळिला सकळ ।
मिथ्या प्रपंचाचें मूळ । स्वरूप केवळ स्वबोधें ॥ ४३३ ॥
कर्म करूनि अकर्ता । तोचि अकर्तात्मबोधु जाला देता ।
देही असोनि विदेहता । तेही तत्त्वतां आकळिली ॥ ४३४ ॥
गृहाश्रम न सांडितां । कर्मरेखा नोलांडितां ।
निज व्यापारी वर्ततां । बोधु सर्वथा न मैळे ॥ ४३५ ॥
तो बोधु आकळितां मना । मन मुकलें मनपणा ।
अवस्था नावरेचि जनार्दना । मूर्च्छापन्न पडियेला ॥ ४३६ ॥
त्यासि सावध करूनि तत्त्वतां । म्हणे प्रेमा राहे सत्त्वावस्था ।
तोहि गळुनि सर्वथा । होयी वर्ततां निजबोधें ॥ ४३७ ॥
पूजाविधि करोनियां । जव जनार्दनु लागला पायां ।
तव अदृश्य जाला दत्तात्रेया । योगमायेचेनि योगें ॥ ४३८ ॥

अशा पक्क्या गुरूचा ‘ शिष्यादिच्छेत् पराजयम् ’ या सद्गुर्वाकांक्षेच्या कसोटीस उतरलेला चेला एकनाथ होता. म्हणून त्यांस आपल्या परिस्थितींतील भिन्नधर्मी, भिनदेशी आणि जात्युपजाति ह्यांच्या परस्पर वैरांनीं व वैषम्यांनीं हवा तसा बुमाकूळ चालविला असलेला आपला महाराष्ट्रसमाज आवरून एकोद्दिष्ट करणें हें आपल्या अंगीं बाणलेल्या धृतीच्या योगानें शक्य वाटत होतें. महाराष्ट्र कवीश्वराचार्य जे ज्ञानेश्वर त्यांच्या ठिकाणींही नाथांची दांडगी श्रद्धा असे. त्या ज्ञानेश्वरांनीं जी धृतीची व्याख्या भावार्थदीपिकेच्या तेराव्या अध्यायांत केली आहे तीच ह्यांसही संमत होती. ह्यांनीं भागवतांतही धृतीची व्याख्या जवळजवळ तशीच केली आहे. तथापि येथें ज्ञानेश्वरी व्याख्याच देणें अधिक रुचतें :—

तत्वां परस्परें । उवड जातिवैरें ।
नव्हे पृथिवीयेतें नीरें । निनासिजे ॥ १४३ ॥
नीरातें आटी तेज । तेजा वायुसिं जूझ ।
गगन तंव साहाज । वायु भक्षी ॥ १४४ ॥

तेंवि चि कव्हणी वेळे । आपण काइसेया ही न मिळे ।
आंतु रिगौनि वेगळें । आकाश हें ।। १४५ ।।
ऐसि पांचै भूतें । न साहांति एकमेकातें ।
किं त्यें हिं ऐक्यातें । देहा यंति ॥ १४६ ।।
द्वंद्वाची उखींविखी । सांडूनि वस्ती एकी ।
एकातें पोखी । निजगुणें ।। १४७ ॥
ऐसें मिळतेयां साजणें । चळे धैर्यें जेणें ।
तेयां नांव म्हणे । धृति पैं गा ॥ १४८ ॥

आत्मा ज्या प्रमाणें आपल्या धृतिसामर्थ्यानें उग्रड जातिवैरी पंच महाभूतांस ह्या शरीराचे ठिकाणी एकत्र आणून, त्यांच्याकडून आपापसांतील द्वंद्वांचा ऊहापोह विसरावयास लावून, तीं एकमेकांस आपल्या गुणांनीं उलट पोषक होतील असें करितो त्या प्रमाणेंच चातुर्वर्ण्यघटितच नव्हे, तर निर्वर्ण अशा कोणत्याही वेळीं कोणत्याही वर्णाच्या समाजांत शिरूनही वेगळा राहाणाऱ्या मुसल्मान समाजाच्या मिश्रणानें पंचवर्णी झालेल्या महाराष्ट्र समाजास, राष्ट्रदेहांत एकत्र करून, त्यांच्यामधील परस्परांविषयींची असहिष्णुता घालवून, त्यांस परस्परांस पोषक अशा रीतीनें गुण्यागोविंदानें राहाटवून राष्ट्रदेहास सुयंत्रता आणणें हें काम साधेल तितकें साधावयाचें आहे अशी जाणीव एकनाथांस पूर्णपणें आली होती. आणि तदनुरोधानें त्यांनीं सर्वसंग्राहक भागवत धर्माची चर्चा करणारा 'एकनाथी भागवत' हा ग्रंथ रचिला. ह्या ग्रंथांत दोन, तीन, चार, पांच आणि एकोणतीस या अध्यायांतील विवेचन नाथांच्या स्वयमाचरित चारित्र्याचा आरसाच होय असें महाराष्ट्रसारस्वतकार कंठरवानें सांगतात तें कांहीं खोटें नाहीं; तर त्याहूनही अधिक म्हणजे सर्व स्वरचित भागवत व भावार्थ रामायण हे दोन्ही ग्रंथ नाथचरित्र आणि नाथांस पटलेले विचार ह्यांचा अर्थात् पूर्ण आदर्श होत असें ह्या लेखकास म्हणावेसें वाटतें.

नाथांच्या भावार्थ रामायणाचें अंतर्बाह्य आविष्करण अद्याप कोणी कोठें केलेलें आढळण्यांत नाहीं. म्हणून त्याचें थोडेसें दिग्दर्शन येथें करावयाचा विचार आहे. नाथांचें भागवत आणि भावार्थ रामायण हे दोन्ही ग्रंथ एका जनार्दन ह्या जोड नांवानें बोधित होणाऱ्या देहानें दोन तथापि मनानें एक

झालेल्या अशा दोन व्यक्तींच्या अंतरंगतरंगांच्या लहरींनीं पूर्णपणें उचंबळलेला असा सुविचाररत्नाकर, कालतः शालिवाहनाच्या पंधराव्या शतकाचीं पूर्वोत्तरार्धे आणि सोळाव्याचा प्रथम चरण आणि स्थलतः महाराष्ट्र आणि त्याच्या भोंवतालचें उर्वरित भरतखंड ह्यांतील स्वधर्मी जनसमूहास धर्म, अर्थ, काम, मोक्ष ह्या चारी पुरुषार्थांच्या सिद्धि प्राप्त करून घेण्याचा राजमार्ग व्हावा अशीच नाथांची आणि नाथगुरु जनार्दनस्वामींची आकांक्षा स्पष्ट दिसते. नाथगुरु जनार्दन स्वामींप्रमाणेंच नाथांचेंही स्वधर्मग्रंथपरिशीलन दांडगें असे. त्याशिवाय उर्दु, फारशी व आरबी ह्या भाषांचें व ह्या भाषान्तर्गत धार्मिक आणि तात्त्विक विषयांचें ज्ञानही ह्या गुरुशिष्यांना चांगलेंच होतें. नाथांचे भजनी भारूड आणि गारुडी, अर्जदास्त इत्यादि प्रकरणें लक्षपूर्वक पहाणारांस वरील विधानांची सत्यता पटण्यास वेळ लागणार नाहीं. नाथांच्या ग्रंथांत श्रुति, स्मृति, पुराणें आणि संस्कृत ग्रंथांतील इतर सुभाषितें हीं जागोजाग अवतरणास घेतलेलीं आढळतात. गणित व फलित हीं ज्योतिष्याचीं उभयांगें, संस्कारप्रयोगांसह धर्मशास्त्र, प्रायश्चित्तासह व्यवहारशास्त्र, राजनीति इत्यादि सर्व प्रकारच्या विद्या नाथांस त्यांच्या गुरूंपासून प्राप्त झाल्या होत्या, आणि त्या सर्व त्यांना नेहमीं उत्तम प्रकारें उपस्थित असत, असेंच त्यांचें भागवत आणि भावार्थ रामायण हे ग्रंथ पांक्त वाचणाऱ्याच्या दृष्टोत्पत्तीस येईल. ह्याशिवाय आपल्या पूर्वी होऊन गेलेले मराठी अभियुक्त ग्रंथकार जे मुकुंद, ज्ञानेश्वर, चोभा इत्यादि सत्कविवर्य ह्यांच्या ग्रंथांचेंही नाथांचें परिशीलन फार काळजीपूर्वक झालेलें होतें, असा दाखलाही पूर्व ग्रंथकारांच्या उक्तीशीं नाथांच्या उक्तींची अर्थतःच नव्हे तर शब्दतः सुद्धां आढळणारीं पुष्कळ सादृश्यें पाहून पटण्यासारखा आहे. सारांश, वयाच्या पांचव्यासहाव्या वर्षापासून तों मरेपर्यंत अधिक आगळीं साठ वर्षे अध्ययन व अध्यापन म्हणजे स्वाध्याय हाच ज्या नाथांचा व त्यांच्या गुरुजींचा व्यवसाय त्यांच्या जनतेस उपदेश करण्याच्या अधिकाराविषयीं शंका म्हणजे सूर्याच्या तेजस्वितेविषयीं संशय प्रकट करण्यासारखें प्रहसनीय धाष्ट्र्यच होय.

महाराष्ट्रीयांत विद्वान् कोणाला म्हणत असत याचा पडताळा पटण्यासाठीं खालीं ज्ञानेश्वरीच्या तेराव्या अध्यायांतील कांहीं ओव्या देण्यांत येत आहेत :—

आणि आत्मा गोचरु होए। ऐसी जे विद्या आहे।
तें आइकोनु डौरु वाहे। विद्वांसु जो॥ ८२३॥

उपनिषदांकडे न वचे । योगशास्त्र न रुचे ।
अध्यात्मज्ञानाचे । मनीं चि नाहिं ॥ ८२४ ॥
आत्मचर्चा एकि आथि । ऐसिये बुद्धीची भीति ।
पाड्डनि जेयाची मति । वोढाळ जाली ॥ ८२५ ॥
कर्मकांड तरि जाणे । मुखोद्गतें पुराणें ।
ज्योतिषिं तो म्हणे । तैसें चि होए ॥ ८२६ ॥
शिल्पि अतिनिपुणु । सूपशास्त्रिं प्रवीणु ।
विधि अथर्वणु । हातिं जेया ॥ ८२७ ॥
कोकिं नाहीं ठेलें । भरतु करी म्हणितलें ।
आगम उपासिले । मूर्त होंति ॥ ८२८ ॥
नीति सुझे । वैदिक बुझे ।
काव्यनाटकिं दुजें । चतुर नाहिं ॥ ८२९ ॥
स्मृतीची चर्चा । डंपु जाणे गारुडाचा ।
निघंटु प्रज्ञेचा । पाइकु करी ॥ ८३० ॥
व्याकरणिं चोखडा । तर्कीं अतिगाढा ।
एकिं अध्यात्मीं चि फुडा । जात्यंधु ॥ ८३१ ॥
तेंवांचूनु आघवां । शास्त्रिं । सिद्धांत निर्वाणसूत्री ।
परि जळो तें नक्षत्री । न पाहे गा ॥ ८३२ ॥

वरील ओव्यांतील विद्वान् हा विद्याजड सकाम कर्मी कर्मठ आहे. त्याला कर्मकांड म्हणजे पूर्वमीमांसा, पुराणें, गणित व फलित या उभय प्रकारचें ज्योतिष, शिल्पशास्त्र-वास्तुविद्यादि, सूपशास्त्र म्हणजे पाकशास्त्र, अथर्वणविधी म्हणजे जारण, मारण, मोहन आणि उच्चाटन इत्यादि मंत्रविद्या, कोकशास्त्र म्हणजे अनंगरंग किंवा कामशास्त्र, आगम-शाक्तादिकांचां शास्त्रें व स्मृत्यादिक, काव्यशास्त्र, नीति-राजनीति, वैद्यक, नाट्यशास्त्र, उत्तम प्रकारचे कशिदे काढणें, जर भरणें इत्यादि कला, निघंटु कोश, इंद्रजाल, व्याकरण, तर्कशास्त्र इतक्या विद्याकला जाणणाराच सर्वमान्य विद्वान् गणला जात होता. ही जशी ज्ञानेश्वर-कालीन स्थिति तशीच फारच थोड्या किंबहुना शून्य भेदानें एकनाथकालींही होती. ह्या अशा लौकिक विद्वानांत आणि ज्ञानेश्वर-एकनाथमान्य जगद्वंद्य

साधुसंतांत ' ब्रह्म जानाति ब्राह्मणः ' या व्याख्येंतील ब्रह्मज्ञ पुरुषांत फरक कोणता तेंही वरील ओव्यांत ज्ञानेश्वरांनीं लौकिक विद्वानाचे ठिकाणीं कोणत्या इष्ट गोष्टींचा अभाव असतो त्याचें वर्णन करून स्पष्ट केलें आहे. ज्या विद्येच्या योगानें आत्मा-परमात्मा गोचर — साक्षात् होतो अशी औपनिषदा विद्या, तिलाच उपकारक असें योगशास्त्र ह्यांचा मात्र ह्या लौकिक विद्वानांना विटाळ नसतो; इतकेंच नव्हे तर ते वेदान्त म्हणजे उत्तरमीमांसा आणि पातंजल योगशास्त्र ह्या विद्यांचे जे कोणी अधिकारी गुरु असतील त्यांचा द्वेषही करतात. आत्म-चर्चा म्हणजे आत्मानात्मविचार, सदसद्वस्तुविवेक अशी कांहीं एक आदरणीय गोष्ट आहे ही कल्पनाही त्यांच्या मनाला शिवलेली नसते. उलट आत्मा-नात्मविवेक घडविणारी चर्चा अमक्यातमक्या ठिकाणीं अमकातमका करीत असतो असें जर त्यांस कळलें तर न जाणो ती आपल्या कानावर पडून आपण वाहवूंही कदाचित् आपल्या सुखकर अशा रूढ मार्गावरून अशा भीतीनें त्यांची मति अत्यंत ओढाळ गुराप्रमाणें तद्विरुद्ध दिशेला जाण्याचाच प्रयत्न करीत राहाते. असा अध्यात्मज्ञानशत्रु, केवळ लौकिक विद्याभिमानी पुरुष, आपणाला मूळ नक्षत्रावर जन्मलेल्या पोराप्रमाणें, मुखावलोकनार्थही नको असें ज्ञानेश्वर म्हणतात. अस्तु ! ज्ञानेश्वरादिएकनाथान्त द्विजश्रेष्ठ साधुपुरुषांचे ठिकाणीं वरील सर्व प्रकारचें लौकिक विज्ञान तर पूर्णपणें वसतच असून ' ब्रह्म जानाति ब्राह्मणः ' या न्यायानें ब्रह्मनिष्ठत्वही त्यांच्या अंगीं पूर्णपणें बाणलें होतें; किंबहुना ते जीवन्मुक्त ब्रह्मीभूतच होते. एकनाथांचे ग्रंथ आणि आचरणच वरील विधानास उत्तम साक्ष आहेत.

नाथांचे सर्वांत मोठे आणि सर्वोपयुक्त ज्ञानाचे साठे असे ग्रंथ दोन. पहिला भागवत आणि दुसरा भावार्थ रामायण. त्यांच्या भागवतास दुसरें नाव उद्धव-गीता असें आहे. ह्याशिवाय त्यांचें प्रथम ग्रंथकर्तृत्व म्हणजे चतुःश्लोकी भागवतावरील टीका हें होय, असें वर येऊनच गेलें आहे. या लेखकाच्या मतें चतुःश्लोकी भागवतावरील टीका नाथांनीं शके १४७७–७८ मध्यें लिहिली असावी; आणि ही टीका सद्गुरूंना पसंत पडली; आणि ' पुढें केव्हांतरी भागवताच्या एकादश स्कंधावरही टीका कर ' अशी ह्या वेळींच नाथांस गुरूंची सांगी झाली असावी, असा तर्क केल्यास कांहीं बावगें नाहीं. नाथांनीं भागवतारंभ कधीं केला हें कांहीं कोठें स्पष्ट नाहीं. तथापि तो त्यांनीं

एकादशीला केला हें त्यांनीं स्पष्ट सांगितलें आहे. आतां ही एकादशी कोणत्या शकसंवत्सरांतील हा प्रश्न सोडविण्यासारखा आहे व तोच पुढें सोडवितां आल्यास पाहाण्याचा विचार आहे. ह्यांनीं आपलें हें, श्रीमद्भागवताच्या एकादश स्कंधावरील टीकाग्रंथ मराठीमधें, लिहिण्याचें काम संपविलें कधीं हें मात्र स्पष्ट स्थलकालशुद्ध सांगितलें आहेः—

ग्रंथारंभ प्रतिष्ठानीं । तेथ पंचाध्यायीं संपादूनी ॥
इतर ग्रंथाची करणी । आनंदवनीं विस्तारिली ॥३१.५२७॥
वाराणसी महामुक्तिक्षेत्र । विक्रमशक वृष संवत्सर ।
शके सोळाशें तिसोत्तर । टीका एकाकार जनार्दनकृपा ॥५५२॥
महामंगळ कार्तिकमासीं । शुक्लपक्ष पूर्णिमेशीं ॥
सोमवार शिवयोगेंशीं । टीका एकादशीं समाप्त जाहली ॥५५३॥
स्वदेशींचा शकसंवत्सर । दंडकारण्य श्रीरामक्षेत्र ॥
प्रतिष्ठान गोदावरीतीर । तेथील उच्चार तो ऐका ॥ ५५४ ॥
शालिवाहनशकवैभव । संख्या चौदाशें पंचाण्णव ॥
श्रीमुख संवत्सराचें नांव । टीका अपूर्व तैं जाहली ॥५५५॥

वरील ओव्यांवरून नाथांनीं भागवताच्या एकादश स्कंधावरील टीका पैठणास प्रारंभिली होती आणि ती १४९५ च्या पूर्वी कित्येक वर्षे प्रारंभिली असण्याचा संभव आहे. पैठणास पहिली पंचाध्यायी मात्र पूर्ण झाली होती. पंचाध्यायीपुढील सर्व म्हणजे २६ अध्याय त्यांनीं काशीक्षेत्रीं सलग वास करून रचिले. तेथेंच त्यांनीं आणखीही एक लहानसा पौराणिक ग्रंथ लिहिला. त्याचें नांव 'रुक्मिणीस्वयंवर'. ह्या ग्रंथाच्या शेवटीं :—

वाराणसी महापुरीं । मणिकर्णिकेच्या तीरीं ।
रामजयंतिमाझारीं । ग्रंथ निर्धारीं संपविला ॥

शके चौदाशें शहाण्णव ( पाठ. त्र्याण्णव ) । प्रजापती संवत्सराचें नांव ।

चैत्रमासाचें वैभव । पर्व अभिनव रामजयंति ॥
ते दिवशीं सार्थक अर्थी । रुक्मिणिस्वयंवर समाप्ति ।
एकाजनार्दन कृपेची स्थिति । वाराणसीप्रती संपवी ॥

असे उल्लेख कांहीं – पुष्कळ – प्रतींतून आढळतात. तथापि शके १४९६ त संवत्सर प्रजापति नसून भाव येतो. आणि त्याप्रमाणें कांहीं थोड्या उपलब्ध प्रतींतून ' हा शक १४९३ असाही दिलेला आढळतो ' अशी साक्ष महाराष्ट्र सारस्वतकार देतात. तेव्हां रुक्मिणीस्वयंवर हा ग्रंथ नाथांनीं भागवत एकादशी-वरील विस्तृत टीका चालली असतांना मधेंच लिहिला असें धरून चालणेंच, तो त्यांनीं काशीस संपविला या निश्चितार्थी अभिप्रायाशीं विशेष सुसंगत होईल. शके १४९३ ला प्रजापति संवत्सर आहे. येथें हीही एक गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे कीं, भागवत संपल्यानंतर नाथ महिनोगणती उगाच काशीस राहिले असण्याचा संभव मानणें सयुक्तिक नाहीं. आणि शके १४९४ च्या फाल्गुन वद्य षष्ठीस नाथगुरु हे समाधिस्थ झाले हें पूर्वीच ठरविलें असल्यानें गुरुंची प्रथम पुण्यतिथि जी शके १४९५ च्या फाल्गुन वद्य षष्ठीस पडावयाची ती थाटानें साजरी करण्यासाठीं नाथ पैठणासच परत आले असावेत असें मानणें मात्र निःसंशय सयुक्तिक दिसतें. नाथांनीं १४९३ चैत्र शुक्ल नवमीसच रुक्मिणीस्वयंवराचें लेखन संपविलें असें ज्या अर्थी ते सांगतात त्या अर्थी शके १४९२ प्रमोद संवत्सरीं नाथ काशीस गेले असले पाहिजेत असें मानणें ओघानेंच आलें. तेव्हां ही गोष्ट निर्णीत धरूनच नाथांनीं भागवतारंभ केल्याचा काल शोधला पाहिजे. भागवतांतील अंतःपुराव्यानें नाथांनीं भागवताची पहिली पंचाध्यायीच पैठणास लिहिली होती हें तर वर सांगितलेंच आहे. ही पंचाध्यायी केव्हां लिहून संपली तें नाथांनीं ज्योतिषाच्या सांकेतिक भाषेंत पंचाध्यायीच्या शेवटीं स्पष्ट केलें आहे असें ह्या लेखकास वाटतें. तेथें नाथ म्हणतात :–

कृष्णउद्धव गोड गोष्टी । हे निर्विकल्प कपिलाषष्ठी ॥
ते पर्वकाळ कसवटी । सांगों उठाउठी पंचाध्यायी आली ॥

या नाथभागवताच्या पांचव्या अध्यायांतील ५६३व्या ओवीशीं वर दिलेल्या ओवीची गांठ घालून निघणारा निश्चय हाच कीं पांचवा अध्याय संपविण्याच्या वेळीं नाथांस पुढील ग्रंथरचना पैठणास न होतां इतरत्र होणार ही गोष्ट ठाऊक होती आणि म्हणूनच त्यांना पंचाध्यायीच्या शेवटीं खालील ओव्या लिहिण्याची स्फूर्ति झाली :–

हें पंचमाध्यायीं म्हणणें घडे । पंचवक्त्र चंद्रचूडें ।।
एकादशाचें ज्ञान गाढें । वर्णावया फुडें ध्वज उभविला ।। ५५३ ।।
हे पंचमाध्यायी नव्हे सिद्ध । एकादशाचे पंच गंध ।।
भक्त आंवतावया शुद्ध । धाडिली प्रसिद्ध गंधाक्षता ।। ५५७ ।।
एकादश अतिविवेकी । यावया पंचाध्यायी पालखी ।।
पुढें धाडिली कवतुकीं । निजभक्तविखीं कृपाळुवें ।। ५५८ ।।
हे कृष्णउद्धव धर्ममात्रा । अर्धोदयो महायात्रा ।।
★ ते यात्रेलागीं हांकार । पंचाध्यायीं खरा साधकांकरीं ।। ५५९ ।।

वरील ओव्यांतून ध्वनि असा निघतो कीं ज्या वेळीं पंचाध्यायी संपली त्या वेळीं – किंवा त्या दिवशीं म्हणा – कपिलाषष्ठीचा वैकल्पिक योग होता. म्हणजे कोणास तो मान्य होता, कोणास नव्हता; अर्थात् लौकिकांत ही कपिलाषष्ठी सविकल्प झाली. कपिलाषष्ठी म्हणजे भाद्रपद वद्यांतच यावयाची, आणि ती मंगळवारीं रोहिणी नक्षत्रावर व्यतिपात योग घडत असतांना व रवि हस्त नक्षत्रीं म्हणजे कन्येच्या दहा अंशांपुढें असतांनाच व्हावयाची. अशी कपिलाषष्ठी येण्याचा संभव अशाच वर्षी असतो कीं प्रत्यक्ष भाद्रपद किंवा तत्पूर्वीचा एकादा महिना ज्यांत अधिक असतो. अर्थात् कपिलाषष्ठी येण्याचा संभव असणाऱ्या शके १४९३ च्या पूर्वीच्या वर्षी नाथांनीं पंचाध्यायी संपविली असा लख्ख ध्वनि वरील उताऱ्यांतून निघतो. आणि पंचांग गणिताच्या मार्गानें शोधीत गेल्यास शके १४९२ त असा योग संभवत असल्याचें निस्संशय दिसतें. तेव्हां नाथांनीं भागवत पंचाध्यायी शके १४९२ च्या भाद्रपद वद्य षष्ठीस मंगळवारीं संपविली असें म्हणतां येतें. शके १४९२ त भाद्रपदच अधिक आहे. शुक्ल प्रतिपदा गुरुवारीं आहे. कदाचित् बुधवारींही असणें संभवनीय दिसतें. तेव्हां कपिलाषष्ठीचा पुकारा होण्यासारखी स्थिति शके १४९२ त होतीच होती. तथापि तो योग स्वतः पंचांग गणित जाणणाऱ्या नाथांसारख्या निःस्पृहास मान्य नव्हता हेंच खरें. आणि म्हणूनच त्यांनीं त्या कपिलाषष्ठीला सविकल्प म्हटलें

---

★ अरविंद, वर्ष २ रें अंक ९ वा,
जुलै १९२२ पा. ३२७ ते ३३४

आहे, आणि आपल्या भागवत एकादशावरील टीकेची पंचाध्यायी संपावयाच्या पर्वासव निर्विकल्प कपिलाषष्ठीची उपमा योजिली. कपिलाषष्ठीप्रमाणेंच पौष वद्य अमावास्या रविवार, श्रवण नक्षत्र आणि व्यतिपात अशा संयोगाची ' अर्धोदय ' नामक महापर्वणी दुर्लभच हें त्यांस ठाऊक होतें; आणि त्या पर्वासाठीं लोक महायात्रेस निघण्याचा त्या कालीं संप्रदाय असे. नाथांच्या कालीं, नव्हे आगगाडीचा सुळसुळाट होण्यापूर्वीच्या परवांपरवांपर्यंतच्या काळापर्यंत, काशी-यात्रेस जावयाचें म्हणजे नगरांतील, प्रांतांतील महायात्रेच्छूनीं पूर्व संकेत करून शेंकडोंच्या जमावानेंच निघावयाचें असा प्रघात होता. त्याचप्रमाणें ज्याला श्रीकाशीविश्वेश्वराचें बोलावणें असेल त्यालाच काशीयात्रा घडेल असाही त्या वेळीं लोकसमज असे. ह्या सर्व वस्तुस्थितीस अनुसरून नाथांनीं वरील प्रत्येक ओवींत आपल्या काळच्या काशीयात्रेचें गौरव केलें आहे, आणि त्या यात्रा-गौरवाच्या उपमेनेंच आपल्या पंचाध्यायीचेंही गौरव साधिलें आहे.

आपल्या या पंचाध्यायीचें अवगाहन म्हणजे दुर्लभ अशा कपिलाषष्ठीच्या योगापेक्षां किंवा कोटिसूर्यग्रहणसम पुण्यदायक अर्धोदय पर्वाचे दिवशीं भागी-रथींत किंवा त्रिवेणी संगमांत घडणाऱ्या स्नानापेक्षांही अधिक श्रेयस्कर होय. कारण ही पंचाध्यायी वाचून किंवा श्रवण करून, आपल्या हातून निःसंशय पूर्ण होणारा पुढील सर्व ग्रंथ वाचण्याची किंवा ऐकण्याची उत्कंठा उत्पन्न होऊन वाचकाला किंवा श्रोत्याला मोक्षप्रापक ज्ञान मिळेल असा नाथांस भरंवसा होता. काशी-वाराणसीचा अधिपति काशीविश्वेश्वर म्हणजे पंचवक्त्र चंद्रचूड शिवच. त्यानेंच ह्या पंचाध्यायीपुढील ' एकादशाचें गाढें ज्ञान ' म्हणजे उद्धवकृष्णसंवादात्मक २६ अध्याय वर्णावयास्तव ही पंचाध्यायी ध्वजाच उभारिली आहे म्हणजे आपल्याकडून उभारविली आहे. ही पैउणास सिद्ध झालेली पंचाध्यायी म्हणजे त्या काशीविश्वेश्वरानें आपल्या अध्यात्मज्ञानेच्छु भक्तांना त्या ज्ञानभोजनाचें आमंत्रण देण्यासाठीं पंचगंधयुक्त अक्षतच मज एकनाथाकरवीं पाठविली आहे; किंबहुना एकादशभक्त आत्मानात्मविवेकी ब्रह्म-जिज्ञासूंस आणावयासाठीं त्या विश्वेश्वरानें ही पंचाध्यायी म्हणजे एक पालखीच मज एकनाथाकरवीं सिद्ध ठेवविली आहे. त्या पालखींत बसून आपल्या ब्रह्म-जिज्ञासू भक्तांनीं पुढील उद्धवगीता श्रवणास अगत्य यावें अशी त्या भक्तां-विषयीं अत्यंत कृपाळू परमेश्वराची इच्छा आहे. ही पंचाध्यायी म्हणजे पुढें

कधीं अर्धोदयपर्वानिमित्त काशीवाराणशीस जमणाऱ्या महायात्रिकांपूर्वींच सर्व साधकांस आपलें श्रेय जें ब्रह्मज्ञान तें गांठण्याची उत्तम संधि आली आहे असें सांगून त्या सर्व साधकांस हाकाच मारीत आहे. अशा तऱ्हेचा अभिप्राय वरील पंचाध्यायीच्या समारोपान्तर्गत ओव्यांमधून नाथांनीं व्यक्त केला आहे.

आपले काशीयात्रेच्छू शेंकडों अनुयायी, नातेवाईक, ऋणानुबंधी, सगेसोयरे, इष्टमित्र ह्यांसह नाथ हे शके १४९२ च्या भाद्रपद वद्य षष्ठीनंतर लवकरच निघून पौष वद्य अमावास्येच्या पूर्वी वाराणशीस गेले ही गोष्ट विशेष रीतीनें सांगण्याची आवश्यकता आतां उरली नाहींच. अर्थात् भागवतरचनारंभकाल ह्या-पूर्वी कित्येक दिवस, महिने असला पाहिजे हें सहजच कोणीही अनुमान करील. नाथांनीं प्रथमाध्यायांत

म्हणोनी एकादशाची टीका एकादशीस करी एका ।
ते एकपणाचि ये सुखा । फळेल देखा एकत्वें ॥ ११४ ॥

अशी ओवी घालून आपण ग्रंथारंभ एकादशीस केला असें स्पष्ट सांगितलें आहे. ही एकादशी जर आपण शके १४९२ च्या चातुर्मास्यारंभींची मानिली तर तसें करणें सत्यास सोडून होईल असें वाटण्याचें कांहींच कारण तर्कितां येत नाहीं. आषाढ शुक्ल एकादशीपासून, मध्यें भाद्रपद अधिक असल्यानें, खऱ्या भाद्रपदाच्या वद्य षष्ठीपर्यंत जवळजवळ शंभर दिवस होतात. एवढ्या काळांत ग्रंथरचनेच्या अभिनव उबळींत अडीच हजार ओव्यांची पंचाध्यायी सिद्ध होण्यास पंचाईत पडूं नये. हा झालेला अडीच हजार ग्रंथ पूर्ण ग्रंथाच्या एक अष्टमांशा-इतका आहे. अर्थात् पुढील सातपट ग्रंथ होण्यास तीन वर्षें लागलीं आहेत, तींही फार लागलीं आहेत असें वाटण्याचें कारण नाहीं. मध्यें एक रुक्मिणीस्वयंवरा-सारखें प्रकरण झालें आहेच. पुढलीं तीनही वर्षें नाथांचीं काशीवासांत गेलीं हें स्पष्टच आहे. तेथें इतरही कांहीं उद्योग नाथांनीं केले असण्याचा संभव आहे. सारांश इतकाच कीं, शके १४९२ च्या आषाढ कृष्ण एकादशीस भागवताच्या एकादश स्कंधावरील टीका लिहिण्यास नाथांनीं पैठणास आरंभ केला. ह्या टीकेची पंचाध्यायी त्यांनीं ह्याच वर्षाच्या भाद्रपद वद्य षष्ठीस संपविली आणि नंतर ते काशीयात्रेस गेले. आणि प्रवास, यात्रा वगैरेचीं कर्में सर्व आटोपल्यावर तेथेंच राहून पुढील सव्वीस अध्याय टीका त्यांनीं यथासांग संपविली. ह्याप्रमाणें

नाथांच्या आयुष्यांतील प्रौढ दशेचीं हीं पहिलीं चार वर्षे एक उत्तमोत्तम ग्रंथ आपल्या मराठी भाषेंत लिहिण्यांत व्यतीत झालीं. ह्याच कालांत नाथांच्या गुरूंचें देहावसान झालें अथवा नाथांचे गुरु अखंड समाधींत मग्न झाले. ह्या गोष्टीच्या सत्यतेसंबंधाचाही भरपूर पुरावा नाथभागवतांतच सांपडतो. जनार्दन-पंतांनीं नाथभागवताची पंचाध्यायीच काय ती प्रत्यक्ष पाहिली होती; आणि तेवढी पाहूनच त्यांनीं नाथांना ग्रंथसार्थकत्वाविषयीं आशीर्वाद दिला होता असें एकतिसाव्या अध्यायाच्या शेवटीं नाथच लिहितात :–

तया वाराणसीं मुक्तिक्षेत्रीं । मणिकर्णिका महातीरीं ।
पंचमुद्रापीठामाझारीं । एकादशावरी टीका केली ॥ ५३३ ॥
ऐकतां संतोषले सज्जन । स्वानंदें तुष्टला जनार्दन ।
पंचाध्यायीं संपतां जाण । स्वमुखें आपण वरद वदला ॥ ५३४ ॥
ग्रंथ सिद्धि पावेल यथार्थी । येणें सज्ञानही सुखी होती ।
मुमुक्षु परमार्थ पावती । साधक तरती भवसिंधू ॥ ५३७ ॥
भाळेभोळे विषयी जन । याचें करितां श्रवणपठण ।
हरिभक्त होती जाण । सन्मार्गी पूर्ण बहुत होती ॥ ५३६ ॥
हे टीका तरी मराठी । ज्ञानदानें होईल लाठी ।
ऐसें निजमुखें बोलोन गोठी । कृपादृष्टीं पाहिलें ॥ ५३७ ॥

पंचाध्यायी पाहून वरीलप्रमाणें ग्रंथ यथार्थ सिद्धीस जाईल असा मोठ्या संतोषानें गुरूंनीं आपणांस जेव्हां आशीर्वाद किंवा वर दिला, तेव्हां नाथ म्हणतात आपणांस एक विशेष प्रकारचा वर मागावयाचा होता आणि तो प्राप्त करून घेणें हाच, जर कांहीं असला तर, ग्रंथ लिहिण्यांत आपला हेतु होता. म्हणून सद्गुरु जनार्दन प्रसन्न झालेले पाहून त्याच वेळीं, म्हणजे त्यांच्या पुढें पंचाध्यायी ठेवून त्यांचा संतोष व ग्रंथ पूर्णतेस जाईल असा आशीर्वाद मिळविला त्याच वेळीं :–

तेथ म्यां ही केली विनंती । जे ये ग्रंथीं अर्थार्थी होती ।
त्यांसीं ब्रह्मभावें ब्राह्मणभक्ती । नामीं प्रीती अखंड द्यावी ॥ ५३८ ॥
ते न व्हावें ब्रह्मद्वेषी । निंदा नातळावी तयांसी ।
समूळ क्षय ब्रह्मद्वेषेंसी । निंदेपाशीं सकल पापें ॥ ५३९ ॥

ऐसें ऐकतां विनवण । कृपेनें तुष्टला जनार्दन ।
जें जें माझें वरदान । वरद आपण स्वयें वदला ॥ ५४० ॥
ये ग्रंथीं ज्या अनन्य भक्ती । निंदाद्वेष त्या नुपजे चित्तीं ।
रामनामीं अति प्रीती । सुनिश्चितीं वाढेल ॥ ५४१ ॥
अविद्यसुविद्य व्युत्पत्ती । न करितां ब्राह्मणजाती ।
ब्रह्मत्वें होईल ब्राह्मणभक्ती । तेणें ब्रह्मप्राप्ती अचूक ॥ ५४२ ॥
नामापरता साधनसद्भावो । नाहीं ब्राह्मणापरता आन देवो ।
तो ये ग्रंथीं भजनभावो । नीच नवा पहा हो वाढेल ॥ ५४३ ॥
ऐसें देवोनि वरदान । हृदयीं आलिंगी जनार्दन ।
म्हणे या ग्रंथीं ज्याचें भजन । त्याचें भवबंधन मी छेदीं ॥ ५४४ ॥

वरील ओव्यांवरून असें निश्चित आहे कीं ग्रंथसमाप्तीच्या काळीं इच्छा असती तरी नाथांस गुरुजी देहधारी जनार्दन हे प्राप्य नव्हते. कारण ते परंधामास गेले होते. पंचाध्यायी संपली तेव्हां म्हणजे शके १४९२ च्या भाद्रपदाअखेर जनार्दनस्वामी प्रत्यक्ष प्राप्य होते आणि त्यांच्याकडून नाथांनीं वरप्रसाद त्याच वर्षी ग्रंथ संपूर्ण होण्याचा आणि त्याच्या फलप्राप्तीचा असा दुहेरी मागून घेतला. अर्थात् शके १४९२ च्या भाद्रपदानंतर आणि शके १४९५ च्या कार्तिकापूर्वीच रविवारीं होणाऱ्या अनुराधा नक्षत्रयुक्त फाल्गुन वद्य षष्ठीस जनार्दनस्वामी निर्याण करिते झाले असले पाहिजेत. ह्या तीनचार वर्षांच्या अवधींत वरील योगांनीं युक्त अशी फाल्गुन वद्य षष्ठी शके १४९४ ह्या वर्षीच येते. नाथ ग्रंथोपसंहारांत ' अवघा जनार्दनची देखा । तोचि आडनांवें जाहला एका ॥' म्हणजे एका जनार्दन झाला. अशा ह्या एका जनार्दनाचा वृत्तांत पुसाल तर त्याला :–

एका जनार्दनाचा वृत्तांत । एक म्हणती भक्तियुक्त ।
एक म्हणती जीवन्मुक्त । प्रपंचीं निश्चित मानिती एक ॥५०४॥
अहो हा एका जनार्दन । नाहीं आसन न देखे ध्यान ।
नेम मुद्रा माळा जाण । उपासनालक्षण या नाहीं ॥ ५०५ ॥
कोण मंत्र असे यासी । काय उपदेशी शिष्यांसी ।
मंत्र न दें कोणासी । भुलली भाविकें त्यासी या भावार्थें ॥ ५०६ ॥

नुसत्या हरिनामाचा बोख । लावूनि भुलविले येणें लोक ।
ऐसे नाना विकल्प । जनार्दन देख उपजवी स्वयें ॥ ५०७ ॥

तात्पर्य काय कीं ग्रंथकर्ता स्वतः एकनाथ नसून श्रीसद्गुरु जनार्दनस्वामीच होय. त्या श्रीगुरूनेंच आपणांस 'एका' हें आडनांव लावून घेतलें आहे. म्हणून 'एका जनार्दन' असें ग्रंथकर्त्याचें नांव झालें असें 'एका जनार्दन' नांवाचें स्पष्टीकरण नाथ करितात.

चतुःश्लोकी भागवत टीका, रुक्मिणीस्वयंवराख्यान, भागवत एकादश स्कंधावरील विस्तृत टीका म्हणजेच 'नाथ भागवत' हे ग्रंथ शकाब्द १४७७-७८, १४९३ आणि १४९५ ह्या वर्षी नाथांनीं संपविले. रुक्मिणीस्वयंवराप्रमाणेंच पौराणिक प्रकरणांवर रचिलेले इतर लहानसहान ग्रंथ किंवा प्रकरणें म्हणजे बालक्रीडा, प्रल्हादचरित्र आणि शुकाष्टक हे होत. हे केव्हां लिहिले हें कळण्यास कांहीं गमकें त्या ग्रंथांतून सांपडत नाहींत. ह्याशिवाय केवळ वेदांतविचारपूर्ण अशीं शुकाष्टक, स्वानुभव, हस्तामलक अथवा अनुभवानंद म्हणजे श्रीमदाचार्यांच्या हस्तामलकावरील टीका, आनंदलहरी, चिरंजीवपद, गीतासार, आणि मुद्राप्रकाश हीं लहानसहान, मोठीं गोड, प्रासादिक आणि अद्वैतमतप्रधान प्रकरणेंही नाथांनीं रचिलेलीं असावींत असा ह्या लेखकाचा समज आहे.

आपला प्रथम ग्रंथ म्हणजे चतुःश्लोकी भागवतटीका लिहिण्याच्या वेळेस नाथ अविवाहित ब्रह्मचारी होते. त्यानंतर ते विवाहित आणि गृहस्थाश्रमी झाले. त्यांच्या गृहस्थाश्रमास प्रारंभ शके १४८१ च्या सुमारास झाला असावा असें पूर्वीच दर्शविल्याचें स्मरतें. तेव्हां त्यानंतर पांचसहा वर्षांनीं त्यांना संततिसंभवाचा काळ प्राप्त होऊन २-३ वर्षांच्या अवधीनें म्हणजे अत्यल्पकालीन नव्हे व अतिदीर्घकालीनही नव्हे अशा पाळण्यानेंच दोन मुलींच्या मध्यें एक मुलगा अशी संतति शकाब्द १४८७ पासून १४९३ पर्यंतच्या काळांत जहाली असावी असें अनुमान केल्यास तें सत्यापासून निस्संशय विशेष दूर असेल असें वाटत नाहीं. अर्थात् शकाब्द १४९६ पासून पुढील पांचसहा वर्षांचा काळ त्यांस आपल्या मुलींचीं लग्नें आणि मुलाचे चौल, उपनयनविधि इत्यादि मंगल संस्कार करण्यांत घालवावा लागला असेल. ह्या अवधींत मोठा ग्रंथ होणें जरा दुर्घटच. तथापि वर उल्लेखिलेलीं लहानलहान प्रकरणें वरील मंगल कार्यांच्या

चित्तंत विरंगोळ्याप्रमाणें होऊन त्यांजकडून सहज लिहिलीं गेलीं असावींत असा तर्क आहे.

ह्याप्रमाणें शकाब्द १५०१-२ पर्यंतच्या नाथांच्या आयुष्याची कार्यव्यापकता पटल्यावर पुढें शकाब्द १५०५ मधील त्यांचें एक मोठें कृत्य आळंदीस जाऊन ज्ञानेश्वरांच्या समाधीचा जीर्णोद्धार करणें हें होय. हा जीर्णोद्धार नाथांनीं शके १५०५ च्या ज्येष्ठांत केला. जसा ज्ञानेश्वरांच्या समाधीचा जीर्णोद्धार आपण केला तसाच त्या अद्वितीय साधुश्रेष्ठाचा श्रीमद्भगवद्गीतेवरील अद्वितीय महाराष्ट्री ग्रंथ जो ज्ञानेश्वरी त्याचाही जीर्णोद्धार म्हणजे स्वहस्तींची एक सुवाच्य सूलशुद्ध प्रत तयार करणेंही आपल्या हातून व्हावें अशी इच्छा होऊन नाथांनीं त्याही कामास हात घातला आणि तें काम :—

शके पंधरासें सावोत्तरीं । तारणनाम संवत्सरीं ।
एका जनार्दनें अत्यादरीं । गीता ज्ञानेश्वरीप्रति शुद्ध केली ॥ १ ॥
ग्रंथ पूर्वींच अति शुद्ध । परि पाठांतरें शुद्धाबद्ध ।
ते शोधूनि एवंविध । प्रति शुद्ध सिद्ध ज्ञानेश्वरी ॥ २ ॥
नमो ज्ञानेश्वरा निष्कलंका । जयाची गीतेची वाचितां टीका ।
गीताज्ञान होय लोकां । अति भाविका ग्रंथार्थियां ॥ ३ ॥
बहुकाळ पर्वणी गोमटी । भाद्रपदमास कपिलाषष्ठी ।
प्रतिष्ठानीं गोदातटीं । लेखनकामाठी संपूर्ण केली ॥ ४ ॥

असा आपला मुद्रालेख शेवटीं जोडून पुरें केलें.

नाथांच्या मुद्रालेखांत आणखी एक ओवी असल्याचें कित्येक नाथसांप्रदायी ज्ञानेश्वरीच्या प्रतींवरून दिसतें. ती ओवी अशी आहे :—

ज्ञानेश्वरापाठीं । जो ओवी करील मऱ्हाटी ।
तेणें रत्नखचिताचिया ताटीं । जाण नरोटी ठेविली ॥ ५ ॥

परंतु ही ओवी नसणाऱ्या प्रतीही पुष्कळ आढळतात; आणि नाथांच्या पैठण येथील मठांत जी सांप्रदायिक पोथी आहे तींत ही ओवी आढळत नाहीं असें ती पोथी पाहून आलेले सर्व गृहस्थ सांगतात.

तेव्हां ही ओवी प्रक्षिप्त असण्याचा संभव बळकट दिसतो. तथापि त्या ओवींतील भावार्थ कांहीं वाईट नाहीं. तो नाथांच्या मनोगत अभिप्रायाशीं

विरोधी मानण्यासारखाही नाहीं. उलट नाथांस खरोखरच तसें वाटलें असावें असें मानणेंच तर्कास धरून होईल. कारण नाथांच्या मतानें मूळचा अति शुद्ध ग्रंथ उतारे करणाऱ्या लेखकांच्या निष्काळजीनें किंवा चांभारचतुराईनें ' पाठांतरें शुद्धाबद्ध ' होऊन गेलेला म्हणून मूळच्या शुद्धाशीं अबद्ध म्हणजे न जुळणारा भाग ' शोधून ' मूळ प्रतीप्रमाणें शुद्ध ज्ञानेश्वरी आपण सिद्ध केली असें नाथ आपल्या मुद्रालेखांत स्पष्ट म्हणतात. आतां पुढें तरी ज्ञानेश्वरीच्या मूळच्या पाठांत जो कोणी उतारा करणारा फिरवाफिरव किंवा नवीन मराठी शब्दाची घुसडाघुसड करील तो एकाद्या रत्नखचित सुवर्णताटांत नरोटी ठकविण्याचीच कृति करील असेंच खरें नाथांस किंवा नाथसदृश कोणाही सुजाण सहृदयास वाटणें साहजिक आहे. नाथांच्या स्वहस्तें शुद्ध झालेल्या ज्ञानेश्वरीच्या शेवटील मुद्रालेखाशीं जुळता असा एक स्वतंत्र श्लोकही प्रसिद्ध झाला आहे तो असा :–

स्वस्ति श्रीनृपशालिवाहन शके पंश्राशतें सागळीं ।
श्रीमत्पैठणिं तारणाख्य वरुषीं गोदावरीच्या कुळीं ॥
षष्ठी कृष्ण कपील भाद्रपदिंची ग्रंथार्थ मूळान्वयें ।
केलें शोधन ज्ञानदेविप्रतिचें श्रीएकनाथें स्वयें ॥

वरील नाथमुद्रालेख आणि तदभिप्रायदर्शक श्लोक, हे, शके १५०६ ची भाद्रपद वद्य षष्ठी ही, महाराष्ट्रांत निदान पैठण प्रांतांत तरी, सर्वसंमत अशी निर्विकल्प ' कपिलाषष्ठी ' मानली गेली, असें सांगतात हें लक्षांत ठेविण्यासारखें आहे. दिवाणबहादुर पिल्ले ह्यांना शके १५०६ ची कपिलाषष्ठी मान्य नाहीं. अर्थात् पिल्ले ह्यांच्या गणितानें येणारी पंचांगस्थितिच महाराष्ट्रांत खरोखरीच पूर्वकालीं मान्य धरली गेली असेल असें म्हणणें कित्येक प्रसंगीं धाष्ट्र्याचें होणार आहे एवढेंच येथें या उदाहरणानें दर्शवावयाचें आहे.

मागें दर्शित केल्याप्रमाणें एकनाथांना शकाब्द १४८६ पासून सहासात वर्षांनीं मिळून तीन अपत्यें झालीं आणि त्यांतील दुसरें अपत्य म्हणजे त्यांचा मुलगा हरि होय. ह्यांचें जनन शके १४९० त झालें असावें. ह्यासही उत्तम प्रकारचें शिक्षण आणि तेंही जुन्या पद्धतीप्रमाणें पंडितपदवीस पोंचविणारें असें नाथांनीं दिलें होतें, हें त्याचें लौकिक नांव हरिपंडित असेंच आज तीनशें वर्षें गाजत आहे ह्यावरून सिद्ध आहे. ह्यास उपनयनपूर्वक कदाचित् काशींतच

गुरुमुख केलें असल्याचाही संभव आहे. तें कसेंही असो. शकाब्द १५०६ च्या सुमारास हा त्या काळाच्या मानानें विवाहयोग्य तरुण झाला असल्यानें त्याचें लग्न करून नाथांनी सून घरांत आणिली असावी. त्याचप्रमाणें त्यांचें प्रथमापत्य जी त्यांची वडील मुलगी गोदावरी हिचें वय ह्या वेळी अपत्यप्राप्तीचें निस्संशय झालें असावें. हिला एकच अपत्य असल्याचें निर्विवाद आहे. तें अपत्य म्हणजे दुसरेंतिसरें कोणी नसून सुप्रसिद्ध मुक्तेश्वर कविवर हेंच होय. हिचा जन्म शके १४८६-८७ त वर दर्शविल्याप्रमाणें सत्य मानिला कीं शकाब्द १५०१ पासून तें शकाब्द १५०५-६ पर्यंतच्या काळांतच केव्हांतरी मुक्तेश्वराचें जनन झालें असलें पाहिजे असें ओघानेंच प्राप्त होतें. मुक्तेश्वराचे जन्माविषयीं जर कांहीं अस्वाभाविक म्हणजे आईबापांचें वयातीतत्व इत्यादि प्रकार असता तर तशी कांही आख्यायिका सहजच प्रचलित असती. परंतु तशा कोणत्याही प्रकारच्या आख्यायिकेच्या अभावीं त्यांचें जनन त्यांच्या मातुश्रीच्या उदरांतून यथायोग्य कालींच जहालें असलें पाहिजे असें मानणेंच उत्तम पक्ष. अर्थात् गोदावरी अथवा सासरच्या नांवानें गंगाबाई हिच्या पोटीं मुक्तेश्वराचें जनन तिच्या वयाच्या सोळाव्या वर्षाच्या आसपासच झालें असेल असें मानिल्यास सत्याची ओढाताण केल्याचा आरोप करण्यास कोणी धजेल असें वाटत नाहीं. सारांश, मुक्तेश्वराचें जनन शकाब्द १५०१ च्या पुढें आणि शकाब्द १५०५ च्या पूर्वी झालेलें मानणें गणितशुद्ध होय. अर्थात् नाथांस ज्ञानेश्वरसमाधीच्या जीर्णोद्धारकालीं नातवंड झालेलें होतें. त्याचप्रमाणें दुसऱ्या मुलीच्या बाजूनें नाथांस ह्यानंतरच्या पांचसहा वर्षांत नातवंड झालें असलें पाहिजे व मुलाच्या बाजूनेंही त्याच सुमारास म्हणजे शकाब्द १५१०-१२ च्या सुमारास नातवंडाची प्राप्ति नाथांस झाली असावी. म्हणजे शकाब्द १५०५ पासून शकाब्द १५१०-१२ पर्यंतच्या नाथांच्या आयुष्यांतील काल हा कुटुंबी ह्या नात्यानें मोठ्या आनंदाचा आणि कार्यव्यापकतेचा असला पाहिजे. नाथांचें वयही या काळांत पन्नाशीपुढचें म्हणजे उताराचेंच होतें. तेव्हां वटवृक्षाप्रमाणें सघन झालेल्या संसारवृक्षाची यथायोग्य जोपासना करून एखादें मोठें ग्रंथरचनाकार्य हातीं घेणें हें त्यांस जवळ जवळ अशक्य होतें असें म्हणणें प्राप्त आहे.

ह्या कालानंतर हरिपंडितांचा आणि नाथांचा स्वभावविरोध आणि मतभेद ह्यांचा झगडा सुरू झाला असावा असा तर्क आहे. हा झगडाही निदान ५–६

वर्षे चालला असेल असें म्हणणें प्राप्तच आहे. हरिपंडित वडिलांवर रुसून कायमचे काशीसच रहावयास गेले आणि तेथेंच त्यांनीं घर केलें असें नाथांचे जुनेनवे सर्व चरित्रकार प्रतिपादितात. तेव्हा तें कांहीं खोटें असेल अशी शंका घेण्याचें कारण नाहीं. तथापि ह्या लेखकाचा असा तर्क आहे कीं नाथ आपली भागवत एकादश स्कंधावरील टीका पहिल्या पंचाध्यायीपुढील सव्वीस अध्याय लिहून संपेपर्यंत अधिकआगळीं तीन वर्षें वाराणशीस वास करून होते त्या वेळींच नाथांच्या लोकोत्तर कीर्तीनें उत्पन्न झालेल्या अनुकूलतेंतच नाथांच्या स्वामित्वाचें एकादें घर किंवा वाडा काशीस झाला असला पाहिजे. कारण हरिपंडित हे जरी पंडितपदवी पावले होते तरी त्यांची इतर कोणतीही आख्या चालत आलेली उपलब्ध नाहीं कीं जिच्या बळावर हरिपंडित स्वतः घर किंवा वाडा बांधण्याच्या अनुकूलतेस पोंचले होते असें मानितां यावें. नाथांचे चिरं-जीव आणि सुविद्य पंडित तथापि नाथांशीं विरोधानें वागणारे एवढ्याचमुळें हरिपंडिताचें नांव अजून टिकून आहे. वडिलांशीं लोकांच्या डोळ्यावर येण्यासारखा विरोध केल्यानेंच केवळ हरिपंडिताचें नांव लोकांच्या मुखीं चढलेलें दिसतें. नाथांच्या पश्चात् त्यांच्या कीर्तिपीठावरही हरिपंडित अत्यल्प काल कां होईना परंतु आरूढ झाल्याचा दाखला नाहीं. नाथांच्या पैठणच्या कीर्तिपीठावर हरिपंडितांचा वडील तर नव्हेच पण तिसरा मुलगा आरूढ झाला अशी माहिती चालत आलेली आहे. अस्तु ! ह्या पितापुत्रांच्या झगड्यांतही पित्यास म्हणजे नाथांस एकादा मोठा ग्रंथ स्वतः रचण्यास घेतां न यावा हें ठीकच आहे. तथापि ह्या सर्व अधूनमधून येणाऱ्या व तेवढ्याकरितां नाथांसारख्यांचेंही मनःस्वास्थ्य बिघडविणाऱ्या सांसारिक अडचणींच्या काळांत महाग्रंथरचनेचा उपक्रम करितां न आला तरी नाथांची स्फुट काव्यरचना चालूच असे. नाथांच्या स्फुट काव्यांची गाथाही कांहीं लहान नाहीं. ह्या स्फुट अभंगांत आत्मनिरीक्षणविषयक अभंग, पदें ह्यांच्या भरण्याप्रमाणेंच गुरुस्तवन, संत-स्तुति, नाना देवतांचीं स्तोत्रें हींही आहेत. प्रसंगविशेषीं रूपकाच्या भाषेंत देशांतील राजकीय, सामाजिक स्थितीवरही चमत्कृतिपूर्ण आणि कुतूहलजनक अशी विविध प्रकारची काव्यरचनाही ह्या स्फुट प्रकरणांत वाचावयास मिळते. नाथांचीं भजनी भारुडें आणि गारुडें, अर्जदास्त, हिंदुतुर्कांचा भांडण, महार, जोहार, महारीण, जागल्या, मोकाशी, देशमुख, कुळकर्णी, दिवट्या, अशा

अनेक प्रकारांनीं त्यांनीं आपल्या काळच्या राजकीय परिस्थिति आणि लोक-व्यवहार या गोष्टींचा बोध व्हावा अशी व्यवस्था आपल्या स्फुट प्रकरणांत साधिलीं.

शेवटीं आपल्या वयाच्या साठीनंतर त्यांनी ' भावार्थ रामायण ' नांवाच्या रामचरित्रपर, परंतु स्पष्ट स्वदेशीस्वधर्मी राजसंस्थेचा पुरस्कार करण्याच्या उद्देशानें ओतप्रोत भरलेल्या अशा महाग्रंथास आरंभ केला. हा ग्रंथ विस्तारानें पसतीसचाळीस हजार ओव्यांचा आहे.

भावार्थ रामायण रचनाकाल शकाब्द १५१६ पासून नाथांच्या प्रयाणाच्याही पलीकडे जाणारा असा दीर्घ आहे. कारण भावार्थ रामायण हा ग्रंथ युद्धकांडाच्या ४४ अध्यायांपर्यंत रचून झाल्यावर त्यांस आपल्या देहावसान दिवसाची स्मृति झाली आणि तो आतां लवकरच येऊन ठेपणार असें जाणून पुढील ग्रंथाचें काम त्यांनीं आपल्या आश्रयास असणाऱ्या एका गावबा नामक शिष्यास सांगितलें. हा गावबा मूळचा गंगा म्हणजे जी गोदावरीच तिच्या तीरीं राहणाऱ्या एका ब्राह्मण कुळकर्ण्याचा अगदीं टोणपा असा मुलगा होय. त्याची वृत्ति अगदीं गळदट होती. त्यास धड बोलतांही येत नव्हतें. परंतु त्याचें पूर्वकर्म कांहीं विशेष बलवत्तर असल्यानें तो येऊन नाथांकडे राहिला. नाथ आणि नाथपत्नी ह्यांनीं ह्या पोराचें परिपालन पोटच्या पुत्राप्रमाणेंच केलें. त्याला परकीपणा असा कधीं भासूंच दिला नाहीं. ह्याला नाथांच्या घरीं आल्यास चांगलीं पंधरा वर्षें नाथप्रयाणकालीं झालेलीं होतीं. अर्थात् बारा वर्षांचें वय असण्याच्या अलीकडेपलीकडे हा गावबा नाथांकडे येऊन राहिला असें मानिल्यास त्याचें वय नाथप्रयाणकालीं पंचविशीच्या पुढें व तिशीच्या आंत असलें पाहिजे. म्हणजे नाथांचा एकुलता एक औरस मुलगा जो हरिपंडित त्याच्या वयाचा हा गावबाही होता, म्हटल्यास कांहीं चूक होणार नाहीं. हरिपंडित आपल्या जाणत्या वयांत म्हणजे गाढव पंचविशींत नाथांशीं फटकूनच असत.

मराठी प्राकृत भाषा आणि प्राकृतिक व्यवहारी जन ह्यांशीं नाथ जी अत्यंत सलगी राखीत ती हरिपंडितांस संमत नव्हती. म्हणून ते आपल्या मुलांमाणसांसह काशीसच आपल्या वाड्यांत राहात असत. पैठणचा संबंध त्यांनीं सोडल्यासारखें केलें होतें. नाथांच्या अंतकालापूर्वी कांहीं वर्षें हा पिता-

पुत्रांचा कलह मिटला होता अशी आख्यायिका आहे खरी. परंतु नाथप्रयाणकालीं हरिपंडित किंवा त्यांचें कुटुंब हीं पैठणास असल्याचा दाखला नाहीं. हरिपंडितांचा तिसरा मुलगा अल्लड अर्भक; परंतु आईवांचून राहूं शकणारा असा काय तो आजाआजीच्या लळ्यानें किंवा आग्रहानें आणि लोकलाजेस्तव ठेवल्यासारखा पैठणास होता. ह्याची मुंजही झाली नव्हती. कारण त्याचें मुंजीचें वयच नव्हतें. ही स्थिति कांहीं पितापुत्रांचें अंतर्बाह्य प्रेम दाखवीत नाहीं. अस्तु. तात्पर्य सांगावयाचें तें इतकेंच कीं, आपलें भावार्थ रामायणाचें अपुरें काम करण्यास सांगावयाला नाथांस काय तो पुत्रसमान प्रेमानें पाळलेला गावबाच उपलब्ध होता. हरिपंडित जवळ असते किंवा नाथांचे जर त्यांचेविषयीं मन निष्कलंक असतें तर त्यांसच आपलें अपुरें राहिलेलें ग्रंथलेखन पुरें करण्यास त्यांनीं सांगितलें असतें. मराठी प्राकृत भाषा आणि तिच्यांतच व्यवहार चालवूं शकणारे प्राकृत जन ह्या दोहींचे ठिकाणीं निष्काम प्रेम ठेवणें हें नाथांचें शील; ह्या दोहींचा द्रोह करणें हेंच हरिपंडितांचें शील. नाथ मराठी प्राकृत भाषेंत ग्रंथरचना करून तिला सजवून संस्कृत भाषेच्या पंक्तीस बसवूं पहाणार आणि आपल्या प्राकृत ग्रंथांनींच प्रस्थानत्रयीच्या अभ्यासानें लाभणारें ज्ञान प्राकृत जनांस निस्संशय होईल असा भरंवसा बाळगणारे म्हणजे सर्वथैव प्राकृत भाषा आणि त्याच भाषेंत व्यवहार करणारे प्राकृत लोक ह्यांच्या उत्कर्षार्थ तनु, मन आणि धन ह्या तिहींनिशीं झटणार. तेव्हां अशा प्रकारें वागण्यास सिद्ध असणारा, केवळ अशा प्रकारें वागणाऱ्या आपल्या बापाला उवडउवड मूर्ख म्हणून त्याची निंदा करण्यापासून मात्र दूर असणाराच नव्हे, असा जो मुलगा असेल त्याच्याच ठिकाणीं नाथांचें निर्मल प्रेम असूं शकणार.

# सूची

अरबी–फार्सी–तुर्की–पोर्तुगीज व्यक्ति नामांचे उच्चार स्वतंत्रपणे दिले आहेत. स्थलनामांचे उच्चार सूचीत सुधारले आहेत. मराठी सानुस्वार शब्दांची स्वतंत्र बाराखडी केली आहे.


अक्का नागम्मा ३८
अग्निदिव्य १६५
अगीराऊ २५५
अच्युत ५
अच्युतराय १६३, १८२, १९३, १९४ २२७
अजमीर २३९
अदोनी ८१, २१७, २१८, २५५, २६०
अनहिलपट्टण १२, ७७
अनुभवानंद ३२८
अनेगुंदीकर २५५
अनेगोंदी ४०–४२
अनंत २७६
अनंतपूर २५९
अनंतभट्ट ३५
अब्दुर्रझ्झाक १४२
अब्दुल कादिर ९६
अमरकोश ३०४
अमरपुरी २४५
अमीर बरीद १६२
अमृतनिधान २५३
अमृतराय १५५
अमृतानुभव २१५, ३१५
अरबस्तान १८६
अरविंद २८३, २८४, २९८
अर्जुन १७
अलफखान १३, २४, ३२, ३३
अल्बुकर्क २१५
अली २२४, २५५, २५६, २५८
अली आदिलशाह २२१, २२२, २२५, २४५, २४६, २५७, २५९, २६०
अलीशाह २००, २०१
अली सेख २५५
अलेक्झांड्रा १८६, १९६
अल्लड ३३४
अल्लाउद्दीन १३, २३–२५, ६४, ९७, ९८, १०९, १३६–१३८, १४५–१४७, १६१
अल्लाउद्दीन खिलजी १२, ३२
अल्लाउद्दीन हुसेन गंगू ब्राह्मणी ४७, ५५, ५७, ५९
अशोक ३११
असदखान २१७–२२०
असीरगड २६
अहमद ६४, ७३
अहमदखान ८०
अहमदनगर १९७ १९८, २१८, २१९, २२१–२२५, २४५–

२४८, २६०, २६२
अहमदशाह ८८–९०, ९३–९९
अहमदशाह ब्राह्मणी १६१
अहसनाबाद १५९
अहिल्या ३१
आऊबाई ६, ३४
आगाशी २०३
आघा शहजादी ६३
आचरे २२८
आजिमखान १५९
आदिनाथ २७४
आदिमाया २७४
आदिलखान १५१
आदिलखान युसुफ १५८, १६१, १६२, १८२
आदिलशाह २४६, २४७, २५२, २५५, २५६, २६१
आदिलशाही १६१, २२३, २२५
आनंदलहरी ३२८
आनंदीबाई २३३, २३५
आप्तोर्याम ५
आपेग्राम ७
आफ्रिका २००
आर्य २८८
आलमखान ९०
आल्मीडा १६६, १९८, १९९
आलमीडा लारेन्झो १९७
आशिया १९७, १९८
आश्वलायन ३००
आळे ९
आळंद गुंजोटी २४३–२४५
आळंदी ७, ८, १३, १९, २५, ३२९
इब्राहीम १९४, १९६, २१८, २२४
इब्राहीम आदिलशाह १९५, २१८, २२१
इब्राहीम कुतुबशाह २५२
इमादशाही १६१
इमादुल्मुल्क घोरी १३८, १५१, १६१
इमामुल्मुल्क २५४
इराण १४२, १९७
इरुग ६३
इस्माईल १६२
इस्माईल आदिलशाह १८२, १९४
इजिप्त १९६, १९७, १९९, २१६
ईश्वर १६२
ईश्वरतीर्थ १०६
उत्तम २३७
उत्तर मानस २३९
उदयगिरी १८३
उद्धव ३२२–३२४
उपेंद्र ११२
ऋग्वेदी २९९
एकनाथ १५४, १८६, १९३, २६६, २६७, २८४, २८५,

२८८, २८९, २९५–३००, ३०२–३०८, ३१४–३३४
एकवीरा देवी ३००
एलिचपूर ६४
एसाजीराऊ २५५
ओतूर २३७, २३९, २४४, २६३, २६५
ओरिसा १५१–१५३, १५५, १८३
ओर्मझ १९८
अंकोले २२०
अंतूर १५०
अंबा २८०
अंबावती २७९
अंबा भवानी ९९, १०१
आंध्र ३००
इंदापूर १५८
इंद्र २४५
**कनोज** ४६
कनोजा १५३
कन्नडजाण २५४, २५५, २५७
कन्याकुमारी ४३, ४७, २२८, २५८
कमला १७
कमलाकर २८०
करंजगाव ९९, १०८
कर्णराय १५०, १५१
कर्नाटककी ३८, ४७, १६२, १८४, १८५, १९०, २३२, २५०, २५६, २५७
कर्नूळ २१७
कर्मविपाक १२२
कऱ्हा १९
कल्चुरी बिज्जल ३८
कल्बरगे = गुलबर्गा
कलीमुउल्लाह १६१
कल्याण ३८, १७२, २१७, २४०, २४५
कल्याणी ६, २१६, २२२, २२३
कवटाळ सटवाजी २५५
कवडी १४२
काटे सिवाजी २५४
कानडा १८५
काननूर १६६
कानफाटे १६९
कान्हेर २१६
काफर २४१
कारली २२८
कारवार २६४
कालमाधव ५५
कालिकत १४२, १६४, १९७, १९८ २०६
काशी ७, २४०, ३००, ३२१, ३२२, ३२४, ३२५, ३३०, ३३२, ३३३
काश्मीर २७५, ३१३
काश्यप गोत्र ५
कासार ३४

कासीम बरीद १६२, १९४
डॉ. कास्टा २१४
कास्टिया १६४
किश्वरखान २२१, २६०
कुकडी २३७
कुत्बशाह १८३, २१७, २१८, २४६, २४७, २५५, २५७, २६१
—इब्राहीम २२०–२२३, २२५, २५४
—जमशीद २१८, २२०
कुत्बशाही १६२, १९४, २२३
कुन्हा द १९९, २०२, २०३–२०६ २११, २१३, २१४
कुन्हा ननो डा. २०१
कुन्नलक्कोन २०६, २०७
कुमसी ११६
कुमारव्यास १८४
कुमारिल ३१२
कुमारिल भट्टपाद ४८
कुरवपूर ६९
कुराण २६, १३९, २००, २४०, २६६
कुर्ग १८३
कुलकर्णी बहिरंभट १६१
कुसुमावती २३७
कूर्मदास ३४, ३५
कृष्ण ५, ४९, ५१, ११२, १७४, २१३, २५१, २८८, २९७, ३०१, ३०३, ३०४, ३२२, ३२५, ३३०
कृष्णदेव २७९
कृष्णनाथ १७
कृष्णयाज्ञवल्की २६८
कृष्ण सरस्वती १०५, ११२
कृष्णभट्ट ३१२
कृष्णराय १६३, १८१–१८६, १९०, १९२–१९५, २१७–२१९, २२७, २३१, २४८, २५०, ३००. ३०२
कृष्णसरस्वती १०५, ११२
कृष्णा ४५, ६९, ७१, ९८, १४५, १४६, १८३, २३८, २६१
कृष्णाबाई १७४
केप ऑफ गुड होप १६४
केरोजी भोसले २५४
केशव २२, १७२, २९५, २९६
केशवबुवा २९७
केशवचरण १०
केशवराऊ २५५
केशव चैतन्य २३९, २४०, २४६, २६३, २६५
केशव चैतन्य कल्पतरु २४४
केशवदराज २४३
केशवदास १७३
केळ १८५
केळवें २०३
केलास ६१

कोकण ५, ४७, १३८, १४०, १४२, १६७, १७९, १९६, १९७, २०४, २०७, २०८, २२८, २३०. ३१०
कोचीन १९८
कोमार रघुवीर २५५
कौलादेवी १२, १३, २४
कंडापिल्ली २२२
कंपिला ४१
कुंभार गोरा ४
—महादू ४
केंदुरकर विश्वनाथ पाठक २५
कोंडाणें ( सिंहगड ) ४५
कोंडापल्ली १५१, १५३, १५७
कौंडण्य २७९
क्लाइव्ह २०६
खरे वासुदेवशास्त्री २८४
खान खानान ८०, ८२, ८८,
खानदेश २६, १५०
खिज्रखान १३
खुदावंदखान १५८
खेचर विसोबा १०, १४, १८, २०, ३४, ५०
खेळणा २६, १९६
खंबायतचे आखात २०१, २०४
ख्वाजा जहान १३८, १४९
गजपतिराज १८३
गणेश ३१०
गया १७३
गवंडी ३१०
गहिनीनाथ ८
गाणगापूर १०८, ११३, ११८,
गाव १३१, १३४
कवाड २७१
गायबा ३३३, ३३४
गावान ख्वाजा महमूद १४०–१४२, १४९, १५१, १५८–१६१
गिरिजाबाई २३५, २३९, ३०६, ३०७
गिलानी असदखान १६०
गीता २९४, ३२४, ३२८, ३२९,
गीतार्णवसुधा २६८
गुजराथ १२, १३, १६, २३, २४, ४६, ६४, ८८, १९७, १९९, २०३, २०५, २०६, २०९, ३०३
गुरव काशीबा ३५
गुलबर्गा ४७, ५७, ५८, ६१, ६४, ६७, १४५, १५९, १७२, २३७, २४०, २४३, २४५, २४६
गोकर्ण महाबळेश्वर ६९
गोगो २०३
गोजाई ३४
गोणाई ६, २०–२२
गोदावरी १९, २५, १०८, १७२, १८३, २३४, २८८, ३०४, ३२१, ३३०, ३३१, ३३३

गोपाळभट्ट २५
गोवळकोंडे १८३, १९४, २१७, २१८, २२०, २२१, २२३, २२५, २४६, २४७, २५४, २६०, २६१
गोवे ६३, १५८, १८२, २०२, २०३, २०७, २२८, २२९
गोविंदपंत ७
गोविंदराय १८२
गोसावी शामजी १६८
गौतम ३००
गौतमी १३४, १३५
गंगम्मा ३८
गंगा ९८, २३९, २४०, ३००
गंगातट १२१
गंगाधर सरस्वती ७०, ९८, ११२
गंगू १५३
गुंटूर २२५
गुंड ६३
गोंदा २१, ३४
ग्रीस २३०
ग्रँट डफ १४८
घणपुरा २२५
घाटगे २४८
घाटमाथा १४०
घियासुद्दीन ३२, ६४, ६७
घोरी २५९
चक्रदास २९९
चक्रपाणी १९३, ३०१, ३०२
चतुःश्लोकी भागवत ३२८
चतुर्वर्गचिंतामणि ६
चव्हाण पृथ्वीराज २५९
चाकण १४०
चाळिसगांव २९९
चाळके २७१
चिक्बाळापूर १८५
चितोड १२, २४, २०९
चिदानंद ३४
चिदांबिका २८०
चिद्घन ६
चिमणा राजा ८६
चिमाजी आप्पा २१४
चिरंजीवपद ३२८
चीन १८६, १९७, २२०
चैतन्य २५०
चैतन्यमूर्ति श्रीभद्योगेश्वर २४२
चोखामेळा २०, ३३-३५, ३७
चोंभा ३१८
चौल ६४, १४०, २००, २०३, २०४
चंद्रगिरि १८३, २५८, २६१
चंद्रभट ३०४, ३०५
चंद्रभागा २९, १७२
चंद्रमौळी ११८
चंद्रशाला २५२
चांगदेव १५, १९, २०, ३४, १७०-१७६, १७८
चांगदेव मुघेश १६८, १६९

चांदबीबी २४६
**जगन्नाथ** १३०, २४०, २७५
जनमित्र २०, ३४, ४७,
जनाबाई ४, ३४, ३५
जनार्दन स्वामी = जनी जनार्दन७०, १५४, १५५, २६६, २६८, २९५, २९६, २९८, २९९, ३०४ - ३०७, ३१४-३१८, ३२१, ३२६-३२९,
जपान १९७
जयपूर २४८
जरीफुल्मुल्क १५८
जलालुद्दीन १२, २५४
जाधव ३७, २४८, २७१, ३१२
जाधवराजे २६
जाधव लखूजी २६२
जाफरखान ४६, ४७
जाव डी कॅस्ट्रो २०७
जावा १८६
जिनोआ १६४
जीवन्मुक्तिकल्पलता ५५
जुन्नर १३८, १५८, २२४, २३७, २४८
जैमिनी ४८
जोगाई २६७
जोशी शंकरभट्ट २५
जॉन डी कॅस्ट्रो २१९
जौहर १६
जिंजी १८३
ज्ञानज्योति ११२
ज्ञानबोधगिरि १०६
ज्ञानेश्वर १, २, ४-११, १३-२०, २५, ३४, ४४, ५२-५४, १९०, २०८, ३००, ३१२, ३१६, ३१८-३२०, ३२९-३३१
ज्ञानेश्वरी ३, १८, ३१५, ३३०
झापूरी २०६
झामोरिन १४२
झेविअर सेंट फ्रांन्सिस २०७
**टिळक लोकमान्य** २९४
टुआ नदी २०७
ट्यूनिस १६४
**ठाणे** ५, १७९, २००, २०३, ३००
**डी सोजा** मार्टिन ऑल्फॉन्सो २०६
ड्रेक २०६
**तापी** १९
तारण ३२९, ३३०
तारापूर २०३, २२९
तालिकोट २१६, २५१, २५९-२६१, २६३
तिनेवेल्ली १९४
तिम्म १६२
तिम्मण १८४
तिम्मया १६६, १८२
तिम्मराय १९४, २२५
तिरुमलराय १९५, १९६, २१७,

२१९, २२७, २५९–२६१
तुकाराम १, २६५, २८४, २८५
तुघलक महमद ४०, ४१, ४५–४७
२५४, २७४
तुर्कस्थान २१६
तुर्की मुहल्ला २२७
तुळजापूर २७९, २८०
तेन्नालि रामकृष्ण १८३, १८४
तेरढोकी ४
तेलंगण २४, ३८, ५८, ५९, १४५,
१४७, १५१, १५२, १५९,
१८३, २५४,
तोरगल २६०
तांबडा समुद्र १९७, २०३, २०६
तुंगभद्रा ३८, ४०, ५६, ७७,
७८, ८९, १८४, १९२,
२२८, २६०, २६१
त्रिणामल २२४
त्रिविक्रम ११९
त्रिविक्रम भारती ११३, ११६,
११७,
१२७, १२१
त्रिविक्रम मुनी ११८
त्रिवेदी ११७
त्रिवेगळी २५२
त्रिंबक २३४
त्रिंबकस्वामी २८०, २८१
त्र्यंबकपंत ७
त्र्यंबक भैरव २६९
त्र्यंबकस्वामी २७४, २७५, २७७–
२७९
त्र्यंबकेश्वर ८, २०, १०८, २३२,
२३५, २३९
दक्षिण १४२, १४७, १५६, १९०,
२०७, २०८, २१९, २४९,
२५०, २५८, २६०
दक्षिण महाराष्ट्र १४०
दत्त १०५, २६६, २९५–२९७,
३१६
दमण २०२, २२९
दराज २४४
दस्तूर दीनार १५९
दळवी सोमण्णा २५५
दाऊदखान ६३, ६४
दण्णायक=दानाइक १४५
दाभोळ ६४, १४०, १९७, १९८,
२२८
दामाजीपंत १५४–१५६, ३००
दामाशेट ६, ३४, २१
दारुज्जाफर २२
दासबोध २
दासोपंत ७०, २६७, २६८, २८४,
२८५
दिगंबर–दासोपंत वडील २६७
दिलावरखान ९०, १३८
दिल्ली ११, २३–२५, ३२, ३३,
३८, ४२, ४६, ५८, ७७,

२०५, २०६, २०९, २४८, ३०३
दीक्षित अप्पय्य १८४
दीव १९९, २००, २०४, २१६, २२९
दुआम दुआर्ते २००
दुर्गाडी १४७
दुर्गादेवी ३००
देवगड ३०५, ३०६
देवगिरी ५, १२, २३, २४, ७७, २६६, ३०४
देवतीर्थ सरस्वती वृद्ध १०६
देवर कोंडे २२५
देवराय ८६, ८७, ९०, (चिमणा राजा) ९२, १४२, १४५
देवराव ७०, ७१, ७३–७५, ७७–८५, ८९, ९१, ९३, १४३, १४६, १४७, १६२, १६३, २३४
देवलदेवी १३, २४,
देवस्की थिऑसफी उर्फ ११५, १२०
देवस्थळी २९८
देवाजी २५२
देवाजी तुरुप २५५
देशपांडे यादव १७४
देशपांडे महादेव १७८
दौलताबाद ६४, १४६, १५८, २६६, ३०४
दंडनायक ३८
दंडाराजपुरी १४२
द्वारका ११, १७४, १७५, २३९, २४५, २७५
द्वारसमुद्र २६, ४०, ४४
धातुवृत्ति ५५
धारवाड १८४, २२०, २६०
धारूर १७४,
धुळें २८४, २८७
ध्रुव २३५
नरनारायण २४२
नरपति २१७
नर्मदा ४६, २८७, २८८
नरस १६२
नरसिंहराय १४७, १६२, १६३,
नरसिंह वीर १८१
नरसी १६९
नरसोबाची वाडी ११३
नरहरि १००, १०५
नरहरी सोनार ३४
नळदुर्ग १५९
नाईक एस्. एम्. १७८
नाईक कार्तिक वरप्पा २५४
नाईक त्रिवेंगळप्पा २५४
नाईक नाग ४५, ४६
नाईक बिसलिया २५४
नाईक रामकोटी २५५
नाईक हरियेपा २५५

नागनाथ २७, २९, ७०
नागलदेवी १८१
नागोठणे खाडी २००, २०१
भागवत नाथ ३२८
नामदेव १, ३, ४, ६, ७, १०, ११, १३–१५, १८–२३, २७–३७, ४४, ४७–५२, ५४, ६७, १९०, २२१, ३२७
नारद २३५
नारायण १४, १६, १९, २०, ३४, १३०, १३२, १६९, २३४, २९८, ३००
नारायणगिरी २३३
नारायणडोह १७१
नारायण पंडित १५५
नारायणसर २३९
नासिक १०८, २३८, २३९
निजस्वरूपी २५२
निजाम २२१
निजामशाह १४७, १४९, २४१–२४३, २४५–२४७, २५४, २५७
निजामुल्मुल्क १४०, १५२, १५८
निजामुल्मुल्क बहिरी १६१, २५४
निजामशाह बुर्हान २२०
निजामशाह हुसैन २२१--२२३, २४५, २४६, २५२, २६०
निजामशाही १६१, १६२, २२३
निरंजनबुवा २४४
निवृत्ति ४,७,–९, १५, १९–२१, ४३, २३१, २४९, ३००
नृसिंह २७९, २८०
नृसिंहतीर्थ १०६
नृसिंहभट्ट २३२–२३३, २३५
नृसिंहसरस्वती ६१, ६७–७०, ९८, ९९, १०७–१०९, ११३, ११६, ११८, १२१, १३४, १३७, १४७, १५४, १५६, २६६
नेवासे ९
नोरुम सेन्हेरा डा पिएडेड २१६
निंबाळकर २४८, २६२
पद्मनी राणी १२, २४
पद्मावती अक्का नागम्मा उर्फ ३८
परमहंस दीक्षा २३८
परमानंद ३५
परमामृत २
परमार २७१
पराशरमाधवीय ५४
परांडा २२०
पलिपोर्तो २०७
पाठक कृष्णाजी विश्वनाथ २५
पातीम प्रभु १८९
पानगल ८५, ८६, २२५
पायरी १६१
पारसनीस दत्तात्रय बळवंत १४०
पाळी १४२

पिन्नराय १४७
पिल्ले दिवाण बहादुर ३३०
पुणतांबे १५, १७२, १७५, १७८
पुणें २३७, २८४
पुणेवाडी २३४
पुण्यपत्तन ( पुणें ) २८७
पुराण ३०४
पुष्पावती २३५, २३७
पूर्णानंद ३५
पूर्वरंग २८४
पेगू १८६
पेनुगोंडे १६२, २१६, २५९, २६०
पैगंबर २४३
पैठण ८, २२, २६६, २८०, २९७, २९९, ३००, ३०४, ३०६–३०८, ३२१, ३२२, ३२५, ३२९, ३३०, ३३२–३३४
पंचगंगा ६९, ११३
पंचदशी ५५
पंचवटी २३९, ३०५
पंढरपूर ५, ६, १०, ११, २२, २९, १५४, १७१, १७३–१७५, १७७, १७८, १८९–१९१ १९३, ३००–३०२
पंपा ३८
पांगारकर २०८, ३०५, ३०६
पांडुरंग, ११, २२, २३, ३५, ४९, १७१, १७२
पिंगळे २७१, २९३
पुंडलीक ११, १९०
प्रजापति ३२१, ३२२
प्रतापरुद्र ४४, १८३
प्रभात २८४
प्रल्हाद ३२८
फकीरुल्मुल्क १५८
फतहुल्लाह इमादुल्मुल्क १५८
फिरिश्ता १४५
फीरोजशाह ६४, ६७, ६९–७१, ७३, ७४, ७९, ८० ८४, ८५, ८८, ८९, ९८
फीरोजाबाद २५४
फ्रॅन्सिस्को मेस्ट्रे २०७
बदरिकाश्रम ६९
बदामी २६०
बरीदशाह-ही १६१, २१८, २७७
बल्साड २०३
बल्लाळ राजे २६
बसव ३८, ३९, ४४, २५४, ३१२
बसवपुराण ३१२
बहमनी ४६, ६३, ७९, १७५, १७८
बहमनी मुहम्मद १ ला ५८, ६०, ६१,
बहाउद्दीन ४१, ४२
बहादुरशाह २०५, २०६, २०९
बहिणाबाई ३४
बहिरी १५९

बळ्ळारि १८५
बागलकोट २२५
बागेवाडी ३८
बाचण्णा ओडेयर ६३
बाणासूर ११८
बापू २३४
बाबर २०९
बाबा २९२
बाबा चैतन्य २६३, २६४
बाबाजी ७,
बालक्रीडा ३२८
बालबोध २७९-२८१
बाल सरस्वती ११२
बिजेसिंगराव १५०
बिज्जल २१६, २१७
बिज्जल राजा ३९
बिभीषण ३१
बिलकोंडे १५९
बीरबल १८४
बुक्क ४१-४३, ४५, ५६-५९, ६१, ६३, ७४, १०७, २३१
बुर्हान निजामशाह २१८
बृहस्पति १३६
बेदर ४७, ६४, ९८, ९९, १०९, १३१, १३६, १४७, १५४, १५५, १६२, १७५, १७८, २१८, २४६, २४८, २५७
बेळगांव १५०, १५८
बोपदेव ६, ९
बौद्ध २८८
बंकापूर ८१, १४५, १५०, २२०, २६०.
बंका महार ३४
बंगलूर १८५
बंगाल ४३, ३०३
ब्रह्मगिरी ८, १५५
ब्रह्मदेश १८५
ब्रह्मराक्षस ११३
ब्रह्मर्षि १२४
ब्रह्मदिक मनुभानु २७७
ब्राह्मण २४०, २५१, २८९, २९२, २९३, २९९, ३१०.
ब्राह्मणी ३३
**भक्तकथामृत** ६
भगवद् गीता ९, १४, १६, १८, २६४, ३२९
भगीरथ ३००
भट २९३
भटकळ १६५, १६६, १८२
भट्टमूर्ति १८४
भरत खंड ११८, २२६, २७४
भागवत २६७, २८८, २९७, २९८ ३००, ३०५, ३०७, ३०९, ३१५-३१८, ३२०-३२६, ३२८, ३३२
भागवत परिसा २०
भांडारकर ६
भातखंडे १७४,१७७-विठ्ठल १७८

भानुदास १८६–१८९, १९१–
 १९३, २६६, २९८–३०२
भारत ३७, २८७
भारतीय २८८
भारतीतीर्थ १०६
भारद्वाज गोत्र ५
भावे विनायक लक्ष्मण १६८, २९९
भिलवडी ११२
भीमदेव १३
भीमराज १५१, १५३
भीमसिंग १२
भीमा ३९, ११३, ११६, १५८
भीमाअमरजासंगम १३४
भुवनेश्वरी ११२
भैरव २७९
भैरवगड १३८
भैरवात्मज २६९
भोगनाथ ४४
भोरप १४२
भोसले २६२, २७१
भांबोरी २३७
भिंगारकर श्रीपतीबुवा ९, २५
मक्का २०३
मगदमसूर ( मासूर ) १८४
मच्छलीपट्टण १५९
मणिकर्णिका २४०
मदुरा १८३, २२८
मद्द ६३, १८४
महाराष्ट्र मध्य १६७
मनोहर १५
मराठे ३१०
मरुदण १६५
मलप्रभा ४३
मलबार १८३, १८६
मल्यानंद १०६
मलिकुत्तुज्जार १३८, १३९
मलिक इयाझ २००
मलिक काफूर २४, २५, ३२
मल्लादेवी ६३
मल्लांबिका ६३
मल्लिकार्जुन १४७–जंगम गुरु १९५
महतूनगर १९,
महाडीक २४८
महादेव १७५
महानदी १७५
महानुभाव ३१२ –पंथ १५६
महार ३१०
महाले २७,
महालिंगदास २६८, २६९, २७१,
 २८८–२९१, २९३, २९४
महाविष्णु १०
महमद २६, ३०, ३२, ३७, ३९,
 ४२, ४३, ६४, ७४, २८४–
 २८७, ३१२
महंमद बुरा ४३
महंमदशहा ५७, १४९–१५४,
 १५७–१५९, १६१, १७८
महंमद शाहजादा १३७

महांबा ३८
माण १५८
मादिगराय ३८
मादेवी ३८
माधव ९९, १०१, १५५, २३१
माधवनिदान ५४
माधव सरस्वती १०८, ११२
माधवाचार्य ३९–४१, ४३,४४, ४८, ५४, ५५, ६१–६३
माधवीय धातुवृत्ति ५५
माधुरी २८५
माने २४८
मायण ३८
माथी राणी १५१
मारुती ५०, ६१
मालवण २२८
मालोजी २७१, २८४
मालोजी राजे २६२
माहीम १९९, २००, २०३
माहुली १४२
माहूर १६१
माळवा २४, ६४
माळी सावता २०, ३४, ३५
मिरिया जामदार २५५
मीर फझलुल्लाह ८७
मुकुंद २, ३१२, ३१८
मुक्ताबाई ४, ५, ७, १९, २० ३४, १७१
मुक्ताफल ६
मुक्तेश्वर २८६–२८८, २९५, ३०६, ३३१
मुग्धबोध ६
मुजाहिद ६३
मुद्गल ७१, ७४, ७७–७९, ८४, ८८, १४५, १४६, १५८, १८२, १९४, २२०, २५४, २६०
मुद्राप्रकाश ३२८
मुधेश चांगदेव १७२, १७७, २४९
मुधोपंत १६९–१७१
मुलतानी अय्नुल्मुल्क २४
मूर १६५
मेवाड १२, २४, २०८, २०९, ३०३
मोकाशी ३३२
मोतीराऊ २५५
मोरे २४८
मोहनांगी १८४
मोहिते २७१
मंगळवेढें १५४, ३००
मंडनमिश्र ३१२
मंडपेश्वर २१६
मांडवी २३५
मुंबई १९९–२०३, २१६
मुंबईची पूर्वपीठिका २११
म्हादा २१, ३४
म्हाळसापूर ९

म्हैसूर ५, १६३, १८३-१८५
यतींद्र २३५
यमपूर ११५
यमुना २३९
यादगिरी २२५
यादव महादेव ५, १३, १७४, १७५
यादव रामचंद्र-रामदेव-रामराज ५
यादवेंद्र सरस्वती १०६
युधिष्ठिर शक २९७
युरोप १८६, १९६-१९८, २०५, २०८, २२९
येसू ३४
योगवासिष्ठ टीका १५, १६९
योगेश्वर स्वामी २४२
रखुमाबाई ७, १०, १७, २३
रजक १३१, १३४
रत्नाई १०८
राऊळ १७४, १७५, १९०
राक्षसतागडी २५१, २५४, २५६, २५८
राघव चैतन्य २३५-२३९, २४१, २४३-२४६, २४९, २६३
राजमहेंद्री १५२, १५९
राजवाडे १४७, १४८, १६८, २८४, २८७
राजस्थान १६, २३, २४८, २५०, ३१३
राजाई २२, २३, २९, ३४
राम ३१, २८४, ३०१, ३०५, ३२१, ३२७, ३३३
रामकृष्णभट २६८
रामचंद्र ३, १२, १६
रामदास १, २, २८४, २८५
रामदेव १२, १६, २३-२५
रामराजा १८६, १९५, १९६, २१६, २२९, २३१, २४६-२४९, २५१-२६०
रामानुज २५०
रामानंद ७, ८, ३५,
रामायण २६, ५१, २८७, ३१७, ३१८
रामायण भावार्थ २९८, ३२०, ३३३, ३३४
रामेश्वर ४०
रायचूर ७१, १४५, १५८, १८२, १९४, २२०, २५४, २५५
रायरी २६, १३८
रावण ३१, ११८
रुक्मिणी २९, १५७, १६९, १७५, २९८, ३००-३०२, ३२१, ३२२
रुक्मिणी स्वयंवर ३२५, ३२८
रूपावळी ३०४
रेणुका २६८
रोहिणी ७, ३२३
रंगराय १८२, १९६, २२७, २६०, २६१

रंगाबाई ३४
रांजणी ( रांजणगांव ? ) १५०
लखमसी १२
लालचीन ६४, ६७
लुइझ डॉम २००
लोदीखान ९०
लंका ३१
लांजे १३९
लिंगमाहात्म्य ३१२
वज्रयोग २९७
वणिज २९७
वरघाट २२०
वरंगल २६, ४०, ४१, ४४, ५५, ५८, ५९, ६१, ८९, ९७, १५९
वऱ्हाड १४६, १५८, १६१, ३२०
वलीउल्लाह १६१
वल्लभाचार्य १८४, २५०
वसई १७९, २०१, २०३, २०९, २१४, २१६, २२९
वसुदेव ३५
वाई १५८
वाघेला कर्णराज १२, २३
वाडेग्राम २७२, २९३
वायुतरण विद्या २३८
वारणा १३८
वाराणशी १०५, १०७, १७३, ३००, ३२१, ३२४–३२६, ३३२
वास्को द गामा १६४, १६५
विक्रम २६९, २९७, ३२१
विक्रमबत्तिशी २८१, २८८, २९०, २९४
विजयविठ्ठल १८४
विजयानगर ४३, ४४, ४७, ४८, ५४, ५६–५८, ६१–६३, ७०, ७३–८२, ८४, ८७, ८९, ९१, ९४, ९७, १०७, १३७, १३८, १४२, १४५, १४७, १५०, १६१–१६३, १६५–१६७, १८१, १८४–१८६, १९०, १९१, १९४–१९६, २०७, २०८, २१६–२२१, २२५, २२७,–२२९, २३३, २५०–२५४, २५८–२६२, ३००, ३०२ ३०३, ३१३
विजापूर ३८, १५८, १६०, १६२, १८२, १९५, १९७, २१७–२२४, २२८, २२९, २३८, २४५–२४८, २५७, २६०, २६१
विठ्ठल ६, १०, १७, २०–२३, २९, ३४, ३६, ५३, १७१–१७४, १७६, १७७, १९१, ३००–३०२
विठ्ठलनाथ २५०
विठ्ठलपंत ७, ८

विदुरा ११४
विद्यातीर्थ १०६
विद्यारण्य मुनि १०६, १०७
विनायकदेव ५९, ६०
विरूपाक्ष १४७, १६२
विवेकसिंधु ३१५
विशाळगड १३८–१४१
विश्वनाथ २३५, २३९
विश्वरूपाचार्य १०६
विश्वामित्र १२४, १२५, ३००
विश्वेश्वर १०५, २४०, ३२४
विष्णु २४०, २७४
विष्णुदास ११
वीरगड १५०
वीर नरसिंह १६३, १६६
वीर विजय ८५, ८६
वेनिसकर २६२
वेलूर १८३
वैजनाथ १११, ११२
वैदूरानगर ९९
वांद्रे २०३
विंध्य २८८
वेंकटपति २६१
वेंकटराय १९४, १९५
वेंकटाद्री २१८, २२१, २२५, २२७, २५९, २६०
व्यास १८, २३७, २३८
व्रतखंड ५
शम्सुद्दीन ६४, ६७
शहाजी २६१
शामा ३४
शारदा विद्यापीठ ४०
शालिग्राम देव १००
शालिवाहन २८८, २९७, २९८, ३००, ३१८, ३२१, ३३०
शाहदुर्ग २५४
शिखर शिंगणापूर २६८, २६९, २७१ २८८
शितोळे २७१
शियाल बेट २०२
शिरके १३८–१४०, २०४, २४८
शिरके राजे २६
शिराझ काझी ७१, ७२
शिवगंगा २३२
शिवराम–शिवतीर्थ १०६, २८५
शिवसमुद्र १८३
शिवाजी २६१, २६२
शिवाजी गोपीनाथ २५६
शुक योगींद्र २३५
शुकाष्टक १५, ३२८
शेगाव १८४
शंकर ( देव व मनुष्य ) ८, १४२; १७२–१७४
शंकरदेव १३, २४, २५
शंकरराव १३९–१४२
शंकराचार्य ४४, ४८, ५४, १०६, ३१२
शंभुमहादेव २६८, २६९, २७१

शांकरदिग्विजय ५५
शृंगेरी ४४–आचार्य४०,४४,५०, ५५, ३२५
श्रीगिरि ६९
श्रीगुरु १००, १०२–१०७, ११०–११३, १२०–१२२, १२५, १२७–१३१, १३४–१३६, २३७, २३९, २५०
श्रीपाद ९९
श्रीपादश्रीवल्लभ ६१, ६७–७०, ९८, ९९, १०२,१०५,१३१, १५६
श्रीपादस्वामी ६७, ६९
श्रीमती ३८
श्रीमुख ३२१
श्रीरंगपट्टण १८३
श्रीवर्धन २२८
श्रीशैल १३५
षड्दर्शनसंग्रह ५५
सगर ६४, १५९
सच्चिदानंद २७६
सच्चिदानंद बाबा ९, १०
सत्यभामा २५२
सदानंद ११२
सदाशिवराय १९६, २१६, २२७
सतशृंगी २८०
समर्थ १२३
सहस्त्रगड १४२
सहस्त्रबुद्धे २९८
सह्याद्री २२०
साखराई ३४
साबाजी १६२
सामुतिरी २०६
सामुद्री २०६
सामुरी २०६, २०७
सायण ४४, ४८, ५४, ६३, २३१
सायंदेव ७०, १०८, १०९, १११, ११२, १३१
सालडाना अँटोनियो डा १९९, २०२, २०३
साष्टी १७९
सासवड १९
साळके २७१
सिद्ध ११२
सिद्धगिरि १०६
सिद्धेश्वर २६९, २७७, २८०
सिद्धेश्वरपंत ७
सिमाओ बोटेल्हो २०६, २०७
सिलोन–सिंहलद्वीप १२, १४५, १८५, १८६
सिल्व्हेरा २०४
सिल्व्हेरा डियागो डा २०३
सिल्व्हेरा.हीटर डा २०१, २०३
सिसोदिये २७१
सुधागड १४२
सुभान कुली २२०
सुमात्रा १८६
सूरत २०३, २२८

सुर्वे राजे २६, २४०
सूर्यनारायण ३०२
सूर्याजीपंत १९३
सेंपैओ २००, २०१
सैफुनमुल्क २२१
सोनखेड २६, १३८
सोलापूर १४८, १५९, २२०, २२१,२२५, २४६
सोपानदेव ४, ५, ७, १९, २० ३४, ४९, ५१
संग २४८
संगम ४१, २७५
संगमेश्वर १३९
संतनगरी २२
संताजी २५५
संभाजी ७८
सिंधू २७५, ३२६
स्वात्मपत्र १५
स्वानुभव ३२८
**हजारा रामस्वामी** २२७, २५१
हबशी खोजा १५९
हम्मीर संक १२
हरपाळदेव २५
हरि ३३०
हरिआप्पा २५६
हरिग्राम २७५
हरि पंडित ३३१–३३४
हरिलीला ६
हरिवरदा २९७
हरिहर ४१–४३, ४५, ५५–६०, ६१, १०७, २३१
हरिहर २ रा ६३, ७१, ७४
हसन ८४
हसनखान ८५, ८८
हस्तामलक ३२८
हस्तिनापुर २०९, २४८
हार्टेंटाट १९९
हिवरे बुद्रूक २३७
हुबळी १८५
हुमायून १४७–१५०
हेमाद्रि ( हेमाडपंत ) ५, ६, २६, ३७, १६१
हेस्टिंग्ज २०६
हैदराबाद ३८
होजमल्ल ८०
होन्नावर १६५, १६६, १८२, २२०
होर्मझ १८५, २२०
होस्पेट ८१
हंपी २२७, २५१
हंपीविरूपाक्ष ४०
हिंगलेश्वर ३८
हिंदुस्थान १९७, २०५, २०६, २१६, २३०